विषय
सं. नं. ३५८९

# [illegible]-पुत्र-संबंध

यशवंत रामकृष्ण दाते,
बी. ए., एल्‌एल्. बी.,
एफ्. आय. एस. ए.

REFBK-0006257

श्री सयाजी साहित्यमाला पुष्प २८२ वें

# पितापुत्रसंबंध



# संकट काळीं—

'लॉंग–लाईफ' ची विमापॉलिसी आपणांस निभावून नेईल व निर्धास्त करील ! मात्र वेळ न गमावतां 'लॉंग–लाईफ' विमापॉलिसी घ्या.

---

## विविध आकर्षक विमा योजना

— शिवाय —

स्त्रियांसाठीं—स्वतंत्र सवलतीचीं कोष्टकें व 'मॅट-र्निटी बेनिफिट' ही उपयुक्त योजना

सर्वत्र एजंट्स् नेमणें आहेत.

### जास्त माहितीसाठीं भेटा अगर लिहाः—

मुख्य शाखाः
एम्प्रेस महाल,
व्हिन्सेंट रोड,
दादर मुंबई १४

मुख्य कचेरीः
दि लॉंग–लाईफ इन्शु. कंपनी लि.,
१८० बुधवार पेठ
पुणें २

# पित्याचें पवित्र कर्तव्य

आपल्या स्वतःच्या वार्धक्यांतील आर्थिक सुखासाठीं त्याचप्रमाणें आपल्या मुलामुलींच्या व पत्नीच्या सुखासाठीं मिळवत्या माणसानें तरतूद करून ठेवणें हें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे. सह्याद्रि विमा कंपनी ही आपल्याला अशी तरतूद करण्यास जरूर ती मदत करील· हप्ते अत्यंत कमी, उदार सवलती, प्रमाणिक सेवा इत्यादि चांगल्या गोष्टींमुळें अत्यंत लोकप्रिय झालेली हीच विमा कंपनी.

पॉलिसीप्रमाणें एजन्सीहि याच कंपनीची श्रेष्ठ ठरली आहे. भरपूर कमिशन, इंग्रजी येण्याची गरज नाहीं. काम मिळविण्याचें शिक्षणहि दिलें जातें. मुख्य किंवा जोड-धंदा म्हणून याच कंपनीची एजन्सी घ्या व आपला आर्थिक फायदा करून घ्या.

**प्रचार केंद्रें—मुंबई, पुणें, कोल्हापूर, बेळगांव, धारवाड, गोंवा, नगर, औरंगाबाद, धुळें, अकोला, नागपूर, इंदोर वगैरे.**

**गो. ग. सौंदणकर**

मॅनेजिंग डायरेक्टर

दि सह्याद्रि विमा कं. लि. नासिक.

श्री सयाजी साहित्यमाला पुष्प २८२ वें

# पिता-पुत्र-संबंध

अ. क्र. ६२५७

लेखक

यशवंत रामकृष्ण दाते,

बी. ए., एलएल्. बी., एफ. आय. एस. ए. (इंडिया)

संपादक

महाराष्ट्रीय वाङ्मयसूची, महाराष्ट्रीय ज्ञानकोश,
महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश,
महाराष्ट्र भाषाभ्यास.

[redacted]
REFBK-0006257

कर्तव्याश्रम-पुणें ४ ] [redacted] विक्रेते* [ शक १८६४

[redacted] ल्य ४ रुपये

82

ग्रंथ भांडार, गिरगांव, मुंबई

आवृत्ति १ ली
प्रती १०००

सन १९४३

प्रकाशक—यशवंत रामकृष्ण दाते,
कर्तव्याश्रम, पुणें ४

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक—विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराज साहेब सर सयाजीराव गायकवाड (तिसरे), सेनाखासखेल, समशेरबहादुर, जी.. सी. आय. ई., एलूएलू. डी., यांनीं रुपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्री सयाजी साहित्यमालें" त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येतात.

तदनुसार "**पितापुत्रसंबंध**" या नांवाचा ग्रंथ श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए., एलूएलू. बी. यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून २८२ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा, प्राच्यविद्यामंदिर, **बडोदें**.

**भा. प्र. कोठारी,** भाषांतर मदतनीस

**ज्यो. मा. मेहता** विद्याधिकारी, राज्य बडोदें.

ता. ३१-१-१९४३

# प्रस्तावना

**पितुर्न पुत्राः क्रतुं जुषन्त श्रोषन् ये अस्य शासंतुरासः ।**

ऋ. १·६८,५

[ पित्याची आज्ञा पुत्र पाळतात, त्याप्रमाणें जे कोणी ह्याच्या आज्ञा तात्काल ऐकतात, ते पराक्रमी होतात. ]

जग हें एक मोठें कुटुंब आहे असें मानण्यांत येतें; व परमेश्वरास सर्व विश्वाचा जनक अथवा पिता असें संबोधण्यांत येतें. परंतु ह्या मोठ्या कल्पनेच्या मुळाशीं मनुष्यप्राण्याचें एक लहानसें कुटुंब हीच कल्पना असते; व तिचेंच परिणत व अंतिम स्वरूप म्हणजे विश्व-कुटुंब होय. या विश्वकुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति विश्वबंधुत्वाच्या नात्यानें परस्परांशीं निगडित असावी हें मानव्याचें ध्येय मानण्यांत येतें. ह्या विश्वबंधुत्वाच्या कल्पनेच्या मुळाशींहि एका कुटुंबांतील व्यक्तींमध्यें जे परस्पर प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध असतात व ज्या प्रेमरज्जूंनीं एका कुटुंबांतील व्यक्ती परस्परांशीं निगडित होऊन एकमेकांची अभिवृद्धि व उन्नति होण्यास साहाय्य करतात तीच कल्पना असते. या अशा कुटुंबांत पिता व पुत्र या दोन अत्यंत महत्त्वाच्या अशा व्यक्ती असून त्यांमध्यें मानवजातीचा दोन पिढ्यांतील संबंध निगडित झालेला असून या सृष्टीचें कार्य मागील अनुभवादिक ज्ञान घेऊन तें संवर्धित करून पुढील पिढीस द्यावयाचें व अशा रीतीनें मानवसमाजाचा दिवसेंदिवस उत्कर्ष घडवून आणावयाचा हें असतें. तसेंच इंग्रजीमध्यें ‘पुत्र हा पित्याचा जनक असतो’ (Child is father to the man) अशी एक म्हण आहे. तीमध्यें ही कौटुंबिक परंपरा अनादि चालत असून पुत्र हा

पित्याची परंपरा मागील अनुभव गृहीत धरून त्यांत भर घालून पुढें चालवीत असतो हीच कल्पना व्यक्त होते. अशाच तऱ्हेचे विचार प्राचीन उपनिषदादि वाङ्मयांतहि अनेक ठिकाणीं व्यक्त केलेले आढळतात. उदाहरणार्थ,

**स पुत्रेणैवास्मिंल्लोके प्रतितिष्ठति** । बृह. १.५, १७.

**य एवायं पुत्रमयः पुरुषः स एषः** । बृह. ३.९, १७

**तस्यां प्रतिरूपः पुत्रो जायते** । बृह. ४.१,१६.

**पुत्राज्जन्म पितुर्यथा** । गौडपादाचार्य. ४.१५

**यः पिता स पुनः पुत्रो यो पुत्रः स पुनः पिता** । योगतत्त्व ४.

याच परंपरेनें मनुष्यसमाज दिवसेंदिवस अधिकाधिक सुखी कसा होत जाईल व परमेश्वरानें ज्या सृष्टींत त्याला उत्पन्न केलें आहे त्या सृष्टींतील अनेक सुखांचा आस्वाद त्याला दिवसेंदिवस अधिकाधिक कसा घेतां येईल, सृष्टींतील निरनिराळ्या शक्तींचा उपयोग मानवसमाजाच्या कल्याणाकडे अधिकाधिक कसा करून घेतां येईल, परमेश्वरानें मनुष्याच्या ठिकाणीं स्थापन केलेल्या बुद्धिमत्तेच्या देणगीचा पूर्ण उपयोग करून घेऊन तिचा दिवसेंदिवस अधिकाधिक विकास कसा करतां येईल आणि पृथ्वीच्या पाठीवर पसरलेल्या अनेक भिन्नभिन्न समाजांत प्रेम व सलोखा कसा निर्माण करतां येईल व याप्रमाणें सर्व मानवसमाजाचें अंतिम कल्याण कसें साधतां येईल इत्यादि गोष्टींचा जर आपणांस विचार करावयाचा असेल तर या सर्व गोष्टींचा आरंभ एका मानवी कुटुंबांत व विशेषतः त्याचे प्रणेते जे पिता व पुत्र यांचेमध्यें कसा होईल हें पाहिलें पाहिजे. याच दृष्टीनें पितापुत्रसंबंधाचा अभ्यास करणें विशेष महत्त्वाचें आहे.

पितापुत्रांचे संबंध अत्यंत प्राचीन व संस्कृतीच्या बाल्यावस्थेमध्यें असलेल्या समाजांत कसे होते, ज्ञानाच्या व इतर सांस्कृतिक विकासाच्या परिणतीबरोबर ते कसकसे बदलत गेले, त्यांमध्यें कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं, भिन्न भिन्न परिस्थितींचे त्यांवर कसकसे परिणाम होत गेले, या परिणामांचे एकंदर सामाजिक जीवनावर कसे ठसे उमटत गेले व त्यांचे अवशेष निरनिराळ्या परंपरांमध्यें कसे राहात आले आहेत इत्यादि गोष्टीहि पाहण्यासारख्या आहेत.

सामाजिक कल्पनांच्या विकासाबरोबर पितापुत्रसंबंधाच्या कल्पनांतहि कसकसे फेरफार होत गेले व निरनिराळ्या देशांच्या कायद्यांमध्यें वगैरे त्यांचे परिणाम कसे दृष्टोत्पत्तीस येत गेले हाहि एक मनोरंजक व अभ्यसनीय विषय आहे.

आजच्या प्रगत अशा आयुष्यक्रमामध्यें जेथें पूर्वापार संबंधापेक्षां व्यक्तिमत्त्वास विशेष प्राधान्य दिलें जातें अशा स्थितींत पितापुत्रसंबंध कसे असावे हाहि विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

आजच्या काळांत पित्याचें पुत्रासंबंधीं कर्तव्य व पुत्राचें पित्या-संबंधीं कर्तव्य कोणतें, त्यांच्यावर सामाजिक व वैय्यक्तिक दृष्ट्या कोणती जबाबदारी येते व ती त्यांनीं कशा तऱ्हेनें पार पाडली पाहिजे हेंहि या विषयाचा विचार करतांना आपणांस पाहिलें पाहिजे. पिता आणि पुत्र हे दोन्हीहि ज्या समाजाचे अथवा राष्ट्राचे घटक असतील त्या-संबंधीं त्यांचें जें कर्तव्य असेल तें त्यांनीं योग्य तऱ्हेनें पार पाडावें याकरितां त्यांच्या ठिकाणीं जे गुण अवश्य यावयास पाहिजेत त्या-संबंधीं कोणती योजना झाली पाहिजे, पित्यानें पुत्राचें पालन करीत असतां आपणावरील जबाबदारीची जाणीव कशी ठेविली पाहिजे व आपल्या मुलास आपल्या पुढील पिढीचा एक प्रतिनिधि व आपल्या

राष्ट्राचा एक नागरिक या दृष्टीनें त्याची जोपासना करून त्याची पूर्व तयारी कोणत्या प्रकारें करून दिली पाहिजे या गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत.

याकरितां या बाबतींत पिता अथवा पालक व शिक्षक यांचें सह-कार्य किती जरूर आहे व त्यांसहि आपलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें पार पाडतां यावें याकरितां जरूर तें दिग्दर्शन मिळणें किती अवश्य आहे ही गोष्टहि आपण पाहिली पाहिजे. अर्थातच पिता या शब्दामध्यें माता व पिता या दोन्हीहि पितरांचा अंतर्भाव करण्यांत आला असून पुत्र या शब्दामध्यें पुत्र व कन्या या दोहोंचाहि अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. एवढेंच नव्हे तर पिता या शब्दांत लहान मुलांचा जो पालक असेल त्याचाहि अनुषंगानें अन्तर्भाव करण्यांत आला आहे ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत येईलच.

वरील सर्व गोष्टींचा विचार यथाक्रम व यथावकाश पुढील प्रक-रणांतून करण्यांत आलेला आहे. केवळ पिता आणि पुत्र यांच्या परस्परसंबंधाचें दिग्दर्शन व वर्णन करून न थांबतां आजकालच्या पित्यांचीं अथवा पालकांचीं आपल्या पुत्रासंबंधींचीं अथवा पाल्यासंबं-धींचीं कर्तव्यें व तीं पार पाडण्याची दिशा यांचें या पुस्तकांत विवे-चन करण्यांत आलें आहे. एवढेंच नव्हे तर मुलांच्या शीलसंवर्धनाचें व आयुष्यास योग्य दिशा लावण्याचें कार्य शिक्षकाकडेहि बऱ्याच अंशानें येत असल्यामुळें मुलांचें शिक्षण योग्य तऱ्हेनें कसें करण्यांत यावें व त्यासंबंधीं शिक्षकाचें कर्तव्य व जबाबदारी काय आहे याचेंहि दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. केवळ शालेय शिक्षणापेक्षां मुलांची घरांतील वागणूक, घरांतील व इतर परिस्थितीचा मुलांवर होणारा परिणाम, मुलांच्या स्वाभाविक प्रवृत्तींस लावावयाचें इष्ट असें

वळण व त्यांच्या अंगीं असलेल्या विशिष्ट चांगल्या प्रवृत्तींस उत्तेजन वगैरे गोष्टींत पालकांनीं किती लक्ष घातलें पाहिजे व मुलाच्या अंगच्या निरनिराळ्या सत्प्रवृत्तींचा योग्य विकास होण्यास किती अवसर दिला पाहिजे व कोणत्या गोष्टींचें ज्ञान त्यांस कोणत्या वेळीं करून दिलें पाहिजे इत्यादि गोष्टींचा उहापोह करण्यांत आलेला आहे व सरतेशेवटीं पालकांसहि या आपल्या जबाबदारीचें योग्य ज्ञान होऊन ती पार पाडण्यास समर्थ करण्याकरितां त्यांसहि कांहीं गोष्टींचें ज्ञान करून देणें किती अवश्य आहे व या बाबतींत पाश्चात्त्य देशांत कसकसे प्रयत्न चालले आहेत यांचा निर्देश येथें मुद्दाम करण्यांत आलेला आहे.

यावरून हा विषय किती व्यापक आहे याची कल्पना वाचकांस सहजच येईल व त्या दृष्टीनें विचार करण्यास वाचकांची प्रवृत्ति होईल अशी अशा आहे.

पितापुत्रसंबंध या विषयाचे मुख्यतः पुढें पांच विभाग पाडण्यांत आले असून त्यांचा क्रमशः विचार करण्यांत आला आहे. (१) आपल्या समाजांत कुटुंब हा मुख्य घटक असल्यामुळें प्रथम कुटुंबपद्धतीचा इतिहास देऊन तींत पितापुत्राचा संबंध कसकसा बदलत जातो याचें वर्णन केलें असून नंतर एकत्र व विभक्त कुटुंब पद्धतीबद्दलहि विचार केला आहे. त्यानंतर भारतीय व पाश्चात्त्य समाजांत पितापुत्रांचें कुटुंबांतील स्थान काय असतें याचा विचार केला आहे. त्याबरोबरच कुटुंबपद्धतीचा जवळजवळ त्याग केलेला आजचा समाजवादी रशिया यांतील पिता व मुलें यांचे संबंध काय असतात व तेथील मुलांची जोपासना कशी होते याचें वर्णन केलें आहे. (२) याच विषयाच्या अनुषंगानें पितरांच्याबद्दल वसत असलेला आदर

व पितृपूजा यांचेसंबंधीं माहिती देऊन पुत्रमहत्त्वाचें वर्णन करून तदभावीं घेतलेल्या दत्तक पुत्राबद्दलहि माहिती दिली आहे व आजच्या प्रचलित कायद्याप्रमाणें पितापुत्रांचे व पाल्य-पालकांचे काय संबंध असतात ते सांगितले आहेत. ( ३ ) याचे उलट मुलांस अथवा वृद्धांस टाकून देण्याची प्रवृत्ति वगैरे कांहीं प्राथमिक किंवा अडाणी समाजांत कशी असते याचेंहि थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. ( ४ ) यानंतर मुलांच्या स्वाभाविक प्रवृत्तींचें वर्णन करून मुलांवर घरांतील व घराबाहेरील परिस्थितीचे होणारे परिणाम दिग्दर्शित केले आहेत. त्यानंतर मुलांचें शीलसंवर्धन व धार्मिक शिक्षण या विषयाचा ऊहापोह करून मुलांतील अनिष्ट प्रवृत्ति व दुर्वृत्त मुलें व त्यांची सुधारणा यासंबंधीं योजावयाच्या उपायांचें विवेचन करण्यांत आलें आहे. त्याबरोबरच मुलांचें बाल्यापासून निरनिराळ्या तऱ्हेचें शिक्षण, त्यांचे पोषाख, वाङ्मय, खेळ व आरोग्य वगैरे विषयांचा तदनुषंगानें ऊहापोह करून अखेरीस ( ५ ) माता व पिता यांची अपत्यसंगोपनासंबंधीं जबाबदारी व त्यांस योग्य शिक्षण मिळण्याची आवश्यकता या गोष्टींचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे.

हें पुस्तक लिहिण्याची कल्पना निघून तें कार्य मजकडे वास्तविक आपाततः आलें. मी एकदां कांहीं कामाकरितां बडोदें येथें गेलों असतां आमचे मित्र रा. वि. पां. नेने यांजकडे त्यांस भेटावयास गेलों होतों. तेथें सहज संभाषणामध्यें पितापुत्रसंबंधावर एखादें पुस्तक लिहिलें जावें अशी कै. श्री. सयाजीराव महाराजांची इच्छा होती व त्याप्रमाणें असें पुस्तक लिहिण्याकरितां एकदोन ग्रंथकारांस विचारण्यांतहि पण आलें होतें, परंतु कांहींनीं तें कार्य स्वीकारलें नाहीं व कांहींकडून पुढें नकार आला, याकरितां कदाचित् योग्य लेखकाच्या अभावीं असें पुस्तक

लिहिण्याची कल्पनाच सोडून देण्यांत येईल असें त्यांच्या बोलण्यावरून दिसून आलें. तेव्हां एखाद्या चांगल्या विषयावरील ग्रंथ केवळ लेखक मिळत नाहीं म्हणून मराठीमध्यें लिहिला जावा अशी महाराजांची इच्छा असतांहि लिहिला जात नाहीं ही गोष्ट महाराष्ट्राच्या व मराठी भाषेच्या दृष्टीनें योग्य नव्हे असें वाटून दुसरा कोणी लेखक न मिळाल्यास मी स्वतःच हें कार्य करण्यास तयार होईन असें त्यांस सुचविलें. ‘तर मग मी आपलें नांव सुचवूं काय?’ असा प्रश्न त्यांनीं विचारल्यावर मीं होकारार्थी उत्तर दिलें व पुढें लवकरच डायरेक्टर ओरिएन्टल इन्स्टिटयूट बडोदें यांचेकडून हें काम मजकडे सोंपविण्यांत आलें. त्याप्रमाणें पुस्तकाची रूपरेषा तयार करून मी लेखनाच्या तयारीस लागलों. परंतु महाराष्ट्र शब्दकोश पूर्ण करून त्यानंतरच्या कार्याची योजना करणें व एक कार्य पूर्ण झाल्यानंतर मंडळाची एकंदर परिस्थिति कशी काय होईल यासंबंधींच्या अनिश्चिततेमुळें मध्यंतरीं कांहीं दिवस या कार्याकडे मला फारसें लक्ष देतां आलें नाहीं. त्यांतून मध्येंच कांहीं कौटुंबिक अडचणीहि आल्या. तथापि हळूहळू हें कार्य सवडीप्रमाणें पुरें करीत आणलें.

या कामीं विशेषतः ओरिएन्टल इन्स्टिटयूट बडोदें या संस्थेचे डायरेक्टर श्री. भट्टाचार्य यांनीं वरचेवर स्मरण करून व इतर योग्य त्या सवलती देऊन हें कार्य मजकडून करवून घेतलें याबद्दल त्यांचे आभार प्रथम मानले पाहिजेत. नाहींतर मध्यंतरीं हें काम अर्धवट सोडून द्यावें लागतें कीं काय असेंहि मला इतर कार्यांच्या व्यापृततेमुळें व आमच्या संस्थेच्या सांक्रमिक अवस्थेमध्यें झालेल्या मनःस्थितीवरून वाटूं लागलें होतें. परंतु श्री. भट्टाचार्य यांनीं नेट धरून हें कार्य माझ्या हातूनच पूर्ण करून घेतलें.

पुस्तक बहुतेक पूर्ण झाल्यावर माझे मित्र डॉ. य. गं. लेले व रा. कृष्णाजी गणेश ऊर्फ काकासाहेब लिमये यांस एकदां तें नजरेखालून घालण्यास सांगितलें असतां त्यांनीं त्याप्रमाणें करून कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या, त्यांचा स्वीकार करून ग्रंथांत अन्तर्भाव केल्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता अधिक वाढली आहे यांत शंका नाहीं. याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

दररोज शब्दकोश कचेरींत दिवसभर लेखनकार्यच करून घरीं आल्यानंतर पुनः . तसेंच व त्याच प्रकारचें कार्य करावयाचें हें बरेंच अवघड जातें. इतर नाइट हायस्कूलमधील शैक्षणिक किंवा सहकारी चळवळीसंबंधींचीं सार्वजनिक कामें जीं माझ्या हातून झालीं त्यांत विषय बदलल्यामुळें मनास थारेपालट तरी मिळत असे. परंतु हें कार्य तसें नसल्यामुळें मनावर कांहींसा ताण पडत असे व स्वतः लिहित बसणें कांहीं कांहीं वेळां अशक्य होत असे. अशा स्थितींत सांगितलेला मजकूर लिहून घेण्याचें कार्य रा. यशवंत एकनाथ धायगुडे यांनीं नियमितपणें व जवळ जवळ माझ्या पाठीमागें लागून करून घेतल्यामुळें हें पुस्तक तयार झालें. याकरितां त्यांचाहि निर्देश येथें करण्यांत आला आहे.

पुस्तक तयार होऊन बडोद्यास पाठविल्यानंतर सध्यांच्या कागदाच्या दुर्मिळतेमुळें तें लवकर प्रकाशित होईल असें दिसेना. त्यामुळें मी स्वतःच तें प्रकाशित करीत असल्यास करावें अशी सूचना डायरेक्टर ओरिएन्टल इन्स्टिटयूट यांचेकडून आल्यामुळें लिहून झालेलें पुस्तक तसेंच पडूं देण्यापेक्षां अशा अडचणींतहि तें प्रकाशित करण्याचें मीं ठरविलें. त्याप्रमाणें आर्यभूषण व ज्ञानप्रकाश मुद्रणालयास विनंति करतांच रा. विश्वनाथ अनंत पटवर्धन यांनीं तें मान्य करून या अडचणीच्या दिव-

सांतहि शक्य तितक्या लवकर तें छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

हा ग्रंथ लिहिण्याच्या कामीं अनेक ग्रंथकारांच्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आलेला आहे. त्यांचा निर्देश मधून मधून ग्रंथामध्यें करण्यांत आलेला आहेच. तथापि प्रारंभीं आधारभूत ग्रंथांची विस्तृत यादी दिलेली आहे. यांतुनहि एखादा सुटला असण्याचा संभव आहे. या सर्व ग्रंथकारांचे आभार मानणें अवश्य आहे. तसेंच यांतील बऱ्याचशा ग्रंथांचा फर्ग्युसन कॉलेजच्या वाडिया ग्रंथालयांतून उपयोग करावयास मिळाला याबद्दल त्यांचेहि आभार येथें नमूद करून ठेवणें अवश्य आहे.

सदरहु ग्रंथामध्यें विशेषतः मातापिता व लहान मुलांचे पालक यांच्यावर आपल्या स्वाधीन केलेल्या बालकस्वरूपी परमेश्वरी देणगीचा आपण कसा उपयोग करून घ्यावयाचा व आपल्या देशाचे भावी नागरिक त्यांतून कसे तयार करावयाचे, आपल्या राष्ट्राचा उद्धार आपल्या व आपल्या भावी पिढीच्या हातीं असून तो करण्यास समर्थ होतील असे राष्ट्राचे आधारस्तंभ व ज्यांच्यामध्यें राष्ट्राच्या आकांक्षा केंद्रीभूत होतात असे प्रजाजन निर्माण करण्याची जबाबदारी आईबापांवर व मुलांच्या पालकांवर व शिक्षकांवर असते. ती त्यांनीं कशी पार पाडावी यासंबंधीं अल्पसें दिग्दर्शन या लहानशा ग्रंथांत करण्यांत आलेलें आहे. पितापुत्रसंबंध याचा व्यापक अर्थ घेऊन त्यामध्यें माता व बालक, पालक व पाल्य, गुरु व शिष्य यांचेहि संबंध दर्शविलेले असून प्रत्येक व्यक्तीच्या बालपणामध्यें तीवर वेळींच योग्य संस्कार होणें किती अवश्य आहे हें दाखविण्याचा उपक्रम जो या ग्रंथांत केलेला आहे त्याकडे सुज्ञ वाचकांचें लक्ष जाईल अशी आशा आहे

व पाश्चात्य देशांमध्यें या दिशेनें जे प्रयत्न आज चालू आहेत तशा तऱ्हेचा उपक्रम आपल्या देशांतहि लवकरच करण्यांत येईल व विशेषतः लोकमतानुवर्ती राजसत्ता जी हळूहळू अमलांत येत आहे तीमध्यें तरी या जिव्हाळ्याच्या विषयाकडे लक्ष दिलें जाईल, आणि बालकरूपी राष्ट्राच्या अत्यंत बहुमोल अशा संपत्तीचें योग्य तें चीज करून घेण्यांत येईल अशी आशा येथें व्यक्त करून ठेवणें अवश्य वाटतें. याप्रमाणें या अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे जर कांहीं विचारी लोकांचें लक्ष गेलें तर त्या कामीं केलेल्या अल्प श्रमांचें सार्थक झालें असें लेखकास वाटेल.

अशा तऱ्हेनें हा ग्रंथ लिहिण्याचें कार्य जें यदृच्छेनें माझ्या हातून घडून आलें त्यावद्दल सर्व कार्यांचा सूत्रचालक जो परमेश्वर त्याचें स्मरण करून ही प्रस्तावना पूर्ण करतों.

**अन्नं ह प्राणः शरणं ह वासो रूपं हिरण्यं पशवो विवाहाः ।**
**सखा ह जाया कृपणं ह दुहिता ज्योति र्ह पुत्रः परमे व्योमन् ॥**

कर्तव्याश्रम,
पुणें ४

**यशवंत रामकृष्ण दाते**

# संदर्भ ग्रंथसूचि

1 A. B. Parsons: Woman's Dilemma, 1926.

2 Aelian: Varia Historia.

3 Alfred Adler: The Education of Children.

4 Amy E. and Fred D. Watson: Opportunities for Parental Education, 1926.

5 Aristotle: Politics.

6 Arundale G. S.: Gods in the Becoming Vol. I & II.

7 Avesta: Vendidad.

8 Bancroft: Native Races of the Pacific States of America, San Fransisco, California, 1883.

9 Basset: Nouveaux Contes Berberes.

10 Beard Belle B.: Juvenile Probation—America Book Company.

11 Bent: Cyclades.

12 Bible.

13 B. T. Baldwin: Physical Growth from Birth to Matrimony, 1921.

14 Boas: Indianische Sagen.

15 Dr. E. W. Braithwaite: Parent and Child.

16 Burt Cyril: The Young Delinquent, University of London Press.

17 Cicero: Pro Roscio Amerino.

18 Cecil F. Lavell: Biography of the Greek People.

19 Codrington: The Melanesians.

20 Colonial Reports: British New Guinea, Annual Report, 1894–95.

21 Crantz: History of Greenland.

22 Crooke: Castes and Tribes of N. W. P. and Oudh.

23 Darinskly: In Z. V. R. W. L. Anthropologie.

24 Dillon: Russia Today and Yesterday.

25 Dionysius of Halicarnasus.

26 Dubois & Beauchamp: Hindu Manners.

27 E. C. Parsons: The Family, 1906.

28 E. L. Thorndike: The Learning Process, 1913.

29 E. S. Hartland: Primitive Paternity, 1910.

30 Euripides: Ion.

31 E. Westermarck: (a) Origin & Development of the Moral Ideas, 1906. (b) History of Human Marriage.

32 Fenton Norman: The Delinquent Boy and Correctional School.

33 F. Müller-Lyer: The Family.

34 Frederick Angells: Origin of the Family.

35 G. E. Howard: The History of Matrimonial Institutions, 1904.

36 Geiger: Ostiran Kultur.

37 G. H. Jones: Dawn of European Civilization, 1903.

38 Gubbins: Civil Code of Japan.

39 Gummere: Germanic Origins.

40 Gunye Y. L.: Prevention of Cruelty to Children 1921.

41 Haug and West: Arda Viraf.

42 Healy Dr. William: The Child, The Clinic and The Court.

43 Healy William and Bronner Augusta: New Light on Delinquency and its treatment—Yale University.

44 Herodotus: History.

45 H. H. Johnston: Uganda Protectorate.

46 H. H. Risley: Census of India, 1901.

47 H. Ling Roth: Sarawak, Benin.

48 Howitt: Native tribes of South-East Australia, 1904.

49 Hunter: Memoirs of a Captivity.

50 Indian Majority Act.

51 Indian Succession Act.

52 J. Muirhead: Historical Introduction to the Private Law of Rome, 3rd Edition, London, 1916.

53 K. Anthony: Feminism in Germany and Scandinavia, 1914.

54 Kohler: Z. V. R. W. XIV

55 Krauss: Sitte und Brauch der Sudslaven.

56 Lawson G. Lowrey: Suggested Further Developments in Education for Parenthood, 1926.

57 Livy.

58 Lloyd: A Japanese Problem Play

59 L. S. Hollingworth: The New Woman in the Making—Current History, 1927.

60 L. T. Hobhouse: Morals in Evolution, 1906.

61 Lumholtz: Among Cannibals.

62 Milman: History of Latin Christianity.

63 Moffat: Missionary Labours & Scenes in South Africa, 1842.

64 Mulla F. D.: Mahomedan Law.

65 Mulla F. D.: Hindu Law.

66 Pat Swan: Russia without illusion, Allahabad, 1933.

67 Paulitschke: Ethnographic Nordorst Africas.

68 Pindar: Olympia.

69 Plato: Republic.

70 Pliny.

71 Plautus: Cistelaria.

72 Ploss: Das Kind—Jesuit Relations and Allied Documents.

73 Plutarch: Lycurgus.

74 Al Quran:

75 Rink: Tales and Traditions of the Eskimo.

76 Robertson: Kaffirs of the Hindu Kush.

77 Robertson Smith: Kinship and Marriage in Early Arabia, 1903.

78 Ruth Reed: The Modern Family.

79 Shayasta La Shayasta:

80 Spencer and Gillen: Native Tribes of Central Australia, 1899.

81 Spiegel: Eranische Altertumskunde.

82 Story: Equity Jurisprudence.

83 Strabo:

84 Terence: Heautontimorumenos.

85 Trevelyn: Law of Minors.

86 Turner: Samoa.

87 U. S. Bureau of Education: (a) Typical Child Care and Parental Education in Home Economic De-

velopments—Bulletins, 1927. (b) The Parent and Teacher Association, Bulletins, 1927.

88 V. M. Colliers: Marriage and Careers, 1926.

89 Von den Steinen: Unter den Naturvol-Kern Zentral Brasiliens, Berlin, 1894.

90 Vullers Landauer: Shah Namah.

91 W. B. Grubb: Among The Indians of Paraguayan Chaco, London, 1904.

92 Wiedemann: Am Urquell.

93 Williamson Margaretta: The Social Worker in The Prevention and Treatment of Delinquency.

94 Zimmer: Altindisches Laben.

९५ अथर्ववेद.

९६ आपस्तंबस्मृति.

९७ ऋग्वेद.

९८ मनुस्मृति.

९९ यजुर्वेद.

१०० याज्ञवल्क्यस्मृति.

१०१ वसिष्ठस्मृति.

१०२ विष्णुस्मृति.

१०३ कुराण—मराठी भाषांतर–मौ. मीरमहमद याकूब

# पितापुत्रसंबंध

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें — | विषय-प्रवेश ... ... ... | १ |
| ,, | २ रें — | कुटुंबसंस्थेचें महत्त्व व तींत पितापुत्रांचें स्थान | ५ |
| ,, | ३ रें — | एकत्र कुटुंबपद्धति व ज्येष्ठायत्त दायपद्धति | ३५ |
| ,, | ४ थें — | पितापुत्रादि कुटुंब. ... ... ... | ४३ |
| ,, | ५ वें — | भारतीय समाजांत पितापुत्रांचें स्थान ... | ४८ |
| ,, | ६ वें — | पाश्चात्त्य समाजांत पितापुत्रसंबंध ... | ६४ |
| ,, | ७ वें — | समाजसत्ताक रशियांतील पितापुत्रसंबंध व मुलांचें संवर्धन. ... ... ... | ७३ |
| ,, | ८ वें — | पितापुत्रसंबंधांत पितृपूजेचें महत्त्व ... | ८३ |
| ,, | ९ वें — | पुत्रमहत्त्व व दत्तक पुत्र ... ... | ९४ |
| ,, | १० वें — | प्रचलित कायद्याप्रमाणें पिता व पुत्र यांचे संबंध | १०८ |
| ,, | ११ वें — | अर्भकत्याग ... ... ... | १२६ |
| ,, | १२ वें — | वृद्धत्याग ... ... ... ... | १३७ |
| ,, | १३ वें — | मुलांची सहजात प्रवृत्ति ... ... | १४६ |
| ,, | १४ वें — | आत्मप्रवृत्ति ... ... ... | १६० |
| ,, | १५ वें — | सांघिक अथवा सामाजिक प्रवृत्ति ... | १७१ |
| ,, | १६ वें — | मुलांचे मनोविकार ... ... ... | १८८ |
| ,, | १७ वें — | गृहपरिस्थितीचा मुलांवर होणारा परिणाम... | २२० |

प्रकरण १८ वें — मुलांचें शीलसंवर्धन अथवा त्यांच्या वर्तनास इष्ट वळण. ... ... ... २३८
„ १९ वें — धार्मिक शिक्षण व परमेश्वरविषयक कल्पना २७०
„ २० वें — मुलांतील कांहीं अनिष्ट प्रवृत्ती ... २७९
„ २१ वें — मुलांची अल्लड वृत्ति ... ... २९८
„ २२ वें — बिघडलेलें मूल व त्याची सुधारणा ... ३०१
„ २३ वें — शिक्षा ... ... ... ... ३१५
„ २४ वें — बाल-शिक्षण-मंदिर ... ... ... ३३१
„ २५ वें — मुलांचें शिक्षण ... ... ... ३४०
„ २६ वें — पोषाख ... ... ... ... ३६२
„ २७ वें — मुलांचें वाङ्मय ... ... ... ३६५
„ २८ वें — खेळ ... ... ... ... ३७१
„ २९ वें — विश्रांति-झोंप ... ... ... ३८०
„ ३० वें — आजार व अपघात ... ... ... ३८७
„ ३१ वें — प्रौढ मुलांचें शिक्षण ... ... ... ३९४
„ ३२ वें — माता व अपत्यसंगोपन ... ... ४०९
„ ३३ वें — पिता व पालकांवरील जबाबदारी व त्यांचें शिक्षण ... ... ... ... ४१८
„ ३४ वें — उपसंहार ... ... ... ... ४२७

८२५०

# पिता-पुत्र-संबंध

## प्रकरण पाहिलें

## विषय-प्रवेश

### मानवी समाजांत पितापुत्र-संबंध—

मानवी समाजामध्यें पिता व पुत्र यांच्या संबंधास अत्यंत महत्त्व आहे. इतर प्राण्यांत आणि मानवी प्राण्यामध्यें मुख्य फरक म्हणजे मानवी प्राण्यांत बुद्धीचा विकास विशेष झालेला असतो. इतर प्राण्यांतहि मनुष्याप्रमाणेंच संघजीवी प्राणी आढळून येतात; परंतु त्यांच्या संघांत विशेष व्यवस्था किंवा जीवनांत विशेष विकास आढळून येत नाहीं. पक्ष्यांमध्यें पिलूं स्वतःच्या पायावर आपली उपजीविका करण्याइतकें प्रबुद्ध होतांच त्यांतील पितापुत्र किंवा मातापुत्र हा संबंधहि नष्ट होतो; व प्रत्येक पिलूं मोठें झाल्यावर स्वतंत्र बनतें. तसेंच तोच नरमादीचा जोडा पुढें टिकून राहतो असेंहि नाहीं. पशूं-

मध्येंहि जवळ जवळ हीच स्थिति असते. मात्र कांहीं पशूंमध्यें कळप करून राहण्याची प्रवृत्ति असते; पण तिचें मूळ संरक्षण या वृत्तींत असतें. वाघ-सिंहादि हिंस्र प्राणी कधींहि कळप करून राहात नाहींत; ते एकएकटेच राहतात. कारण त्यांस संघशक्तीनें मिळणाऱ्या संरक्षणाची जरूरी नसते. अशा प्राण्यांतील माता अथवा पिता यांचें वात्सल्यप्रेम अर्भकास स्वसंरक्षण करण्याची पात्रता येईपर्यंतच टिकून राहतें. मनुष्यप्राण्याच्या अगदीं जवळचा असा प्राणी जो वानर तोहि कळप करून राहतो; परंतु त्याच्या कळपांत बहुधा एकच नर असून बाकी सर्व माद्या व पिलें असतात; व त्यांतील सर्वांत पराक्रमी वानर आपल्या प्रतिपक्ष्यास ठार मारून कळपाचा धनी बनतो. या प्रवृत्तींत पूर्ण प्रभावी अशा पितृसत्ताक पद्धतीचें मूळ दिसून येतें. मनुष्यप्राण्यामध्यें मात्र वात्सल्य, प्रेम, संरक्षणाच्या उपायांची योजना, उदरपोषण इत्यादि गोष्टी त्याच्या बुद्धीच्या विकासामुळें पुष्कळ वाढीस लागून त्यांचा विकास अनेक अंगांनीं होत गेला आहे, आणि त्यामुळें मनुष्यप्राण्यांत कुटुंब, गोत्र, जमात, जात, राष्ट्र, साम्राज्य वगैरे-सारखे एकापेक्षां एक मोठे असे अनेक सुसंघटित समूह तयार झालेले आहेत, व त्यांतील व्यवहारहि अनेकांगी व बरेच गुंतागुंतीचे आणि भानगडीचे होत गेल्यामुळें या निरनिराळ्या घटकांचें नियंत्रण व पोषण करण्याकरितां निरनिराळे उपाय व त्यांस अनुसरून निरनिराळे नियम, शास्त्रें व विद्या तयार झालेल्या आहेत.

याप्रमाणें मानव समाजाचा विकास व त्याचें संवर्धन आणि संरक्षण करण्याकरितां जीं आज समाजशास्त्र, राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षण-शास्त्र, वगैरे शास्त्रें आणि इतर भौतिक शास्त्रें यांची निर्मिति आणि वाढ होत गेली आहे तिचें मूळ या मनुष्याच्या संघवृत्ति व संरक्षण या स्वाभाविक प्रवृत्तींमध्यें आहे.

## मानवी समाजाचा मूळ घटक कुटुंब—

या मानवी समाजाचा मूळ घटक म्हणजे कुटुंब हा होय, व त्याचा प्रणेता म्हणून पिता व त्याचा संवर्धक म्हणून पुत्र या दोन व्यक्तींस कुटुंबव्यवस्थेंत विशेष महत्त्व आहे; व त्यांचे परस्परसंबंध निश्चित करण्यामध्यें समाजव्यवस्थेचा व समाजशास्त्राचा बराच विकास हळूहळू व पायरीपायरीनें होत गेला आहे. तो कसकसा होत गेला आहे, समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत पिता-पुत्रांचें नातें कसें होतें, आजहि वन्य समजल्या जाणाऱ्या समाजांमध्यें तें कसें आढळतें, त्यामध्यें परिस्थितीस अनुसरून हळूहळू कसकसा फरक पडत गेला व निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या समाजाच्या अवस्थांत पिता-पुत्रांच्या संबंधाच्या कल्पना कसकशा बदलत गेल्या व पिता आणि पुत्र यांचे सुसंस्कृत समाजांत वैय्यक्तिक व सामाजिक संबंध कसे असतात व ते कसे असावे, तसेंच त्यांचीं परस्परांसंबंधीं कर्तव्यें कोणतीं व तीं कर्तव्यें पार पाडण्याची जबाबदारी एका कुटुंबांतील घटक म्हणून त्यांच्यावर व्यक्तिशः कशी असते, व एका समाजाचे अथवा राष्ट्राचे घटक अथवा नागरिक म्हणून याच संबंधाबाबतचीं कर्तव्यें कोणतीं व त्या संबंधाची जबाबदारी कशा प्रकारची असते या गोष्टींचें निरीक्षण आपणांस करावयाचें आहे. तसेंच हीं कर्तव्यें पार पाडण्याकरितां त्यांची योग्य तयारी व्हावी म्हणून पुत्रांस व पित्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळालें पाहिजे व तें देण्यासंबंधीं आजच्या कल्पना काय आहेत, व त्या अमलांत आणण्याचे प्रयत्न कोठें व कसे चालले आहेत यांचेंहि निरीक्षण आपणांस करावयाचें आहे. आज आपणांस या दृष्टीनें कोणत्या प्रकारचें शिक्षण अवश्य आहे व तें कसें देतां येईल हें पाहिलें म्हणजे आपल्या आजच्या वैय्यक्तिक व सामाजिक कर्तव्यांची जाणीव आपणांस होऊन त्या मार्गानें योग्य ते

प्रयत्न कसे करावे याची आपणांस कल्पना करतां येईल. याच दृष्टीनें पुढील विवेचन करण्यांत आलें आहे.

त्यामध्यें अर्थातच समाजांतील कुटुंब या घटकास विशेष प्राधान्य असल्यामुळें त्याचाच आपणांस आरंभीं साकल्यानें विचार केला पाहिजे; व याकरितां कुटुंबसंस्था प्रथम कशी निर्माण झाली व समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांत तिचें स्वरूप कशा प्रकारचें असतें व त्या कुटुंबसंस्थेंत पितापुत्रांचें स्थान काय असतें या गोष्टीचा विचार आपणांस प्रथम केला पाहिजे. म्हणून आपण आतां पहिल्यानें या कुटुंबसंस्थेच्या इतिहासाचें स्थूल अवलोकन करूं.

# प्रकरण दुसरें

# कुटुंबसंस्थेचें महत्त्व

# व

# तींत पितापुत्रांचें स्थान

## कुटुंबसंस्थेची आवश्यकता—

मानव समाजांत मूल जन्मतें तेव्हां तें अगदीं असहाय स्थितींत असतें व त्यास स्वतंत्रपणें आपलें संरक्षण व उदरनिर्वाह करण्याची शक्ति येण्यास बराच दीर्घकाल लागतो. त्यामुळें या कालांत त्यास संरक्षण देणाऱ्या व त्याची काळजी घेणाऱ्या एखाद्या माणसाची नेहमीं जरूरी असते. अर्थात् या कामास योग्य व्यक्ति म्हटली म्हणजे त्या मुलाची आई होय. परंतु स्त्री स्वतः स्वसंरक्षणक्षम नसल्यामुळें त्या स्त्रीबरोबर एखादा पुरुष त्या मुलाची जबाबदारी घेण्यास अवश्य असतो आणि तो पुरुष म्हटला म्हणजे स्वाभाविकपणें त्या मुलाचा जनक हाच ठरतो. मूल व त्याची आई यांचा संबंध स्पष्ट असतो; परंतु मूल व त्याचा पिता यांचा संबंध तितका स्पष्ट नसल्यामुळें, विवाह या संस्कारानें तो स्पष्ट करण्यांत येतो. विवाहसंस्कारामुळें मुलाची जबाबदारी पित्यावर, येणें स्वाभाविक वाटतें व त्यामुळें विवाह–संस्कारास सार्वजनिक स्वरूप व विशेष महत्त्व देण्यांत येतें. मुलाचें संरक्षण व पोषण करावयाचें म्हणजे आई व बाप एकत्र राहणें अवश्य असतें, आणि याकरितांच विवाहित स्त्रीपुरुष एकत्र राहून इतर लोकांपासून पृथक् राहतात व कुटुंब या समाजाच्या महत्त्वाच्या घटकास जन्म देतात.

## मुलांचें पोषण व संरक्षण—

मुलांची योग्य तऱ्हेनें जोपासना व्हावी व त्यांचें योग्य तऱ्हेनें संरक्षण व पालनपोषण व्हावें याकरितांच विवाहसंस्था व कुटुंबसंस्था अस्तित्वांत आल्या. कुटुंबसंस्थेंतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लहान मुलांचें पालनपोषण ही होय. मूल जन्मल्यापासून त्याच्या पोषणाची, त्याच्या कपड्यालत्त्यांची व त्याच्या संरक्षणाची काळजी तें स्वतः या गोष्टी करण्यास समर्थ होईपर्यंत आईबापांसच घ्यावी लागते. मुलें शाळेमध्यें कांहीं विशिष्ट विषय शिकतात; परंतु सामान्य व कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचें ज्ञान—उदाहरणार्थ, रोगापासूनची भीति, पैशाचा उपयोग, देशांतील चालीरिती, शिष्टाचार, नियम व कायदे यांचें ज्ञान—वरींच आईबापांपासून मिळतें. तसेंच निरनिराळ्या प्रसंगीं कसें वागावें हें मुलें आईबापांपासूनच शिकतात. तसें शिक्षण त्यांस मिळणार नाहीं तर या जगांत वावरणें त्यांस बरेंच कठिण जाईल. मुलांचा स्वभाव बनण्याची क्रिया मुख्यतः त्यांच्या कौटुंबिक राहणीवर अवलंबून असते.

कुटुंबापासून प्राप्त होणारी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संरक्षण ही होय. अगदीं असहाय मनुष्यांचा जगांत निभाव लागणें कठिण असतें. आपणाला इतर स्त्रीपुरुषांचा सहवास असावा असें वाटतें व आपल्या अडचणीमध्यें आपण त्यांची मदतहि घेतों. कांहीं लोकांस सहवासाचें सुख त्यांचे शाळेंतील मित्र किंवा क्रीडासंघ वगैरेमधील संवगडी किंवा कारखाने, कचेऱ्या यांमधील सहकारी यांपासून मिळतें; परंतु सामान्यतः आपण सहवाससुखाकरितांहि आपल्या कुटुंबावरच अवलंबून असतों. तसेंच आपणाला द्रव्याची अगर कोणतीहि मदत लागली तर आपण आपल्या कौटुंबिक माणसाकडून ती मिळवितों. यामुळें आपण कुटुंबावर जास्त अवलंबून असतों.

## निरनिराळ्या समाजांतील कुटुंबसंस्थेचें स्थान—

याप्रमाणें जरी आईबाप व मुलें यांची कुटुंबसंस्था सर्व समाजांत व सर्व देशांत आढळते, तरी आईबापांची आपल्या मुलांची जोपासना व पोषण करण्याची जबाबदारी निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या प्रकारची असते; ही गोष्ट स्त्रीपुरुष आपल्या कुटुंबावर ज्या मानानें अवलंबून असतात त्या मानानें कमी अधिक असते. याचा अर्थ असा कीं कांहीं समाजांत कुटुंब-संस्थेस विशेष महत्त्व असतें व कांहीं समाजांत तितकें महत्त्व नसतें व त्या त्या मानानें कुटुंबांतील व्यक्ती कुटुंबावर अवलंबून असतात. कुटुंबसंस्थेस महत्त्व सामान्यतः दोन गोष्टींमुळें उत्पन्न होतें. ज्या समाजांत कुटुंबाशिवाय दुसरे संघच अस्तित्वांत नसतात अशा ठिकाणीं सहवास व संरक्षण यांकरितां स्त्रीपुरुषांस कुटुंबावरच अवलंबून राहावें लागतें. तसेंच ज्या समाजांत जमीन किंवा भांडवल हीं जीं उदरनिर्वाहाचीं मुख्य साधनें तीं खासगी मालकीचीं असतात; त्या समाजांत कुटुंबसंस्थेस महत्त्व प्राप्त होतें. कारण कुटुंबांत राहिल्याशिवाय त्यांतील व्यक्तींचा निभाव लागणें शक्य नसतें. अर्थात् जेथें कुटुंबसंस्थेस असें महत्त्व असतें तेथें त्या कुटुंबांतील मुख्य मनुष्य अथवा कर्ता म्हणजे पिता यावरच सर्व कुटुंबांतील माणसांस अवलंबून राहावें लागतें. कारण उदरनिर्वाहाचें साधन हें मुख्यतः त्याच्या हातांत असतें. या दृष्टीनें आपण निरनिराळ्या समाजांचें अवलोकन केल्यास, आपणांस निर-निराळ्या सामाजिक अवस्थांत कुटुंबसंस्थेस अथवा कुटुंबांतील पित्यास कोणत्या समाजांत महत्त्व असतें व कोणत्या समाजांत तें विशेष नसतें तें दिसून येईल.

## प्राथमिक अवस्थेंतील समाजांतील कुटुंब—

आपण एका अगदीं प्राथमिक अवस्थेंतील समाजांतील कुटुंबाकडे लक्ष

देऊं. अशा प्राथमिक अवस्थेतील समाज अथवा कुटुंबें आपणांस अंदमान बेटांत आजहि दृष्टीस पडतात. या बेटांत जंगलामध्यें वीसपासून चाळीस कुटुंबांची एकत्र वस्ती निरनिराळ्या ठिकाणीं आढळते. यांतील पुरुष शिकार करतात, स्त्रिया फळें, मुळें वगैरे रानांतील खाद्य वस्तु जमवितात आणि यावर कुटुंबाचा चरितार्थ चालवितात. एका वस्तींतील सर्व व्यक्ती परस्परांच्या परिचयाच्या असतात, त्यामुळें कोणताहि प्रश्न उपस्थित झाला तर तशाच प्रकारच्या परिस्थितींत पूर्वीं एखादे वेळीं जसें वर्तन करण्यांत आलें असेल, त्यास अनुसरून प्रस्तुत गोष्टीचा निकाल लावण्यांत येतो. त्यामुळें त्यांस सरकार वगैरे शासन-संस्थांची जरूरी लागत नाहीं. एखाद्या विशेष प्रसंगीं उदाहरणार्थ, सर्व जमातीनें दुसऱ्या जमातीशीं युद्ध करावयाचें असल्यास किंवा जंगलांतील एक जागा सोडून दुसऱ्या जागीं जावयाचें असल्यास, सर्व जमातींतील स्त्रीपुरुष एकत्र जमून अशा गोष्टीचा निकाल ठरवितात.

अशा समाजांत मुलें त्यांच्या आईबापांजवळ राहतात. मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांस एका विशिष्ट समारंभानें जमातींत दाखल करण्यांत येतें. यावेळीं मुलांस कांहीं विशिष्ट शारीरिक सामर्थ्याच्या वगैरे परीक्षाहि द्याव्या लागतात. अशा विधींमध्यें कांहीं जमातींत पुनर्जन्माचेंहि अनुकरण करण्यांत येतें. उदाहरणार्थ, कांहीं जमातींत मुलास कांहीं वनस्पति किंवा औषधांच्या साहाय्यानें बेशुद्ध करण्यांत येऊन कांहीं वेळानें शुद्धीवर आणण्यांत येतें. कांहीं जमातींत मुलास पोत्यांत शिवून ठेवून कांहीं वेळानें पुन: काढून घेण्यांत येतें. अशा तऱ्हेचे कांहीं नियम किंवा व्रतें पार पाडल्यानंतर मुलास जमातीचा पूर्ण सभासद होतां येतें. अशा तऱ्हेचा पूर्ण सभासद झालेला मनुष्य कुटुंबापासून निराळा राहूं लागतो व विवाह करून आपलें स्वतंत्र कुटुंब स्थापन करतो. यानंतर त्याचा आपल्या आईबापांशीं फारसा संबंध

रहात नाहीं. त्याची उपजीविका किंवा समाजांतील स्थान हीं त्याच्या स्वतः-च्या पराक्रमावर अवलंबून असतात. याप्रमाणें प्रत्येक कुटुंब स्वतंत्र रीतीनें आपापला चरितार्थ चालवितें व परस्पर कोणावरहि अवलंबून नसतात. अशा जमातींतिल मुलें एखाद्या निराळ्या कुटुंबांत दत्तक देण्याचीहि चाल आहे. त्यामुळें कोणत्याहि कुटुंबांतील मुलगा पूर्ण सभासद होण्यापूर्वी दुसऱ्या कोणत्याहि कुटुंबांत जाऊं शकतो. अशा समाजांत उपजीविकेचें साधन व राहणी हीं इतकीं साधीं असतात कीं, मुलांस आईबापांस मदत करावी लागत नाहीं व आईबापांसाहि मुलांकडून उतारवयामध्यें कांहीं मोबदला मिळण्याची अपेक्षा नसते. त्यामुळें अशा समाजांतील व्यक्ती साहचर्य, संरक्षण किंवा उपजीविका यांकरितां कुटुंबावर फारशा अवलंबून नसतात. त्यामुळें मुलें व आईबाप यांचे संबंधहि फारसे गुंतागुंतीचे नसून बहुतेक अलग असतात.

**गोत्र समाजांतील कुटुंब—**

यानंतर आपण गोत्र समाजाचें उदाहरण घेऊं. अशा समाजांत शंभर-पासून पांचशेंपर्यंत व्यक्ती असूं शकतात. उत्तर अमेरिकेमध्यें युरोपियन लोक येण्याचे पूर्वी तेथील देशाचे लोक अशाच जमाती करून रहात असत. अशाच तऱ्हेचे समाज आपणांस पॅसिफिक महासागरांतील बेटांत आढळतात. या समाजांचें उदरनिर्वाहाचें मुख्य साधन शेती हें असतें; परंतु ही शेतीहि अगदीं प्राथमिक स्वरूपाची असते. या शेतीची आजच्या सुधारलेल्या शेतीशीं तुलना करतां यावयाची नाहीं. अशा जमातीमध्यें दोन तीन गोत्रांतील लोक राहतात. एका गोत्रांतील लोक एकाच पूर्वजापासून उत्पन्न झालेले असून, त्यांतील प्रत्येक व्यक्तीनें इतरांस सर्व प्रकारें मदत केली पाहिजे अशी अपेक्षा असते. प्रत्येक गोत्राचें नांव

स्वतंत्र असतें. हीं नांवें बहुधा देवकांवरून पडलेलीं असतात. एका गोत्रांतील पुरुष अथवा स्त्री त्याच गोत्रांतील पुरुष अगर स्त्रीशीं लग्न करीत नाहींत, तर भिन्न गोत्रांतील व्यक्तीशीं विवाह करणें अवश्य मानतात. अशा विवाहापासून झालेलीं मुलें आपल्या आईच्या किंवा बापाच्या गोत्रांत अंतर्भूत होतात; व एका गोत्रांतील मनुष्य दुसऱ्या गोत्रांतील व्यक्तीशीं नात्याचा संबंध फारसा बाळगीत नाहीं. म्हणजे एखादा मुलगा पित्याच्या गोत्रांत सामील असला म्हणजे तो आपल्या आईकडील नातेवाईकांशीं संबंध ठेवीत नाहीं. पण तोच जर आईच्या गोत्रांत सामील झाला तर आईच्या नातेवाईकांशीं संबंध ठेवून, बापाच्या नातेवाईकांस विसरतो; किंवहुना बापासहि ओळखीनासा होतो. अशा जमातींत आईबाप व मुलें यांचीं कुटुंबें नसतात असें नाहीं. कांहीं अंशीं बहुतेक मुलें आपल्या कुटुंबावर व अंशतः आपल्या गोत्रावर अवलंबून असतात; परंतु एकदां विधिपूर्वक एखादी व्यक्ति एका गोत्राचा पूर्ण सभासद झाल्यावर तिचा कुटुंबाशीं असलेला संबंध तुटतो; व संरक्षण, साहचर्य इत्यादि गोष्टीं-करितां ती व्यक्ति आपल्या कुटुंबावर अवलंबून नसून आपल्या गोत्रावर अव-लंबून असते. अशा ठिकाणीं उपजीविकेचें साधन जें शेतीकरितां लागणारी जमीन ती मुबलक असल्यामुळें, कोणीहि आपणापुरतें पीक काढून आपली उपजीविका करूं शकतो. त्यामुळें जमिनीच्या मालकीलाहि विशेष महत्त्व नसतें. अशा व्यक्तींचें संरक्षण सर्व गोत्रांतील व्यक्ती मिळून होत असल्यामुळें, त्यांस सरकारची किंवा कायदेकानूंची जरूरी लागत नाहीं. यामुळें अशा समाजांतील पुरुष अथवा स्त्री हीं कोणत्याहि प्रकारें संरक्षण, साहचर्य अथवा उपजीविका यांकरितां कुटुंबावर अवलंबून नसल्यामुळें अशा समाजांत कुटुं-बांचें महत्त्व फारसें नसतें. त्यामुळें आईबापांचें वर्चस्वहि मुलांवर फारसें रहात नाहीं.

## युद्धप्रिय समाजांतील कुटुंब—

यापेक्षां थोडे मोठे असे कांहीं असंस्कृत समाज असतात. ते बहुतेक युद्धप्रिय समाज असतात. अशा समाजांत लष्करी व्यवस्था व सैन्य ठेवलेलें असतें. त्यांत शासनसंस्था तयार झालेली असते. यांचा प्रमुख बहुधा राजा असतो, परंतु खरी सत्ता कांहीं श्रीमंत लोक व पुरोहित यांच्याच हातांत असून, ते राजाला आपल्या मताप्रमाणें नाचवीत असतात.

अशा समाजांत मालमत्तेस महत्त्व असतें. या समाजांत व्यक्तिसंख्या बरीच मोठी असल्यामुळें, त्या मानानें शेतीची जमीन थोडी असते व ती कांहीं लोकांच्याच ताब्यांत असते. अशा समाजांत गुलाम ठेवण्याचीहि पद्धत असते. व्यवहाराकरितां धातूंचीं नाणीं वगैरे उपयोगांत आणावीं लागतात. यामुळें ज्यांच्याजवळ पैसा अथवा भांडवल असतें त्यांच्या हातांत उपजीविकेचीं साधनें असतात. या समाजांत गोत्रपद्धति नसते. स्त्रीपुरुष कुटुंबें करून राहतात व अशा समाजाचा घटक बहुधा कुटुंब हा असतो. मुलांचें शिक्षण व पोषण पूर्णतः कुटुंबाकडूनच केलें जातें. अशा समाजांतील स्त्रीपुरुष पूर्णतः कुटुंबावर अवलंबून असतात. कारण शेतीची जमीन व पैसा हीं कुटुंबाच्या मालकीचीं असल्यामुळें, त्यांस स्वतंत्रपणें उदरनिर्वाहाचें साधन नसतें. अशा समाजांतील शेती ही अगदीं प्राथमिक स्वरूपाची नसून थोडी सुधारलेली असल्यामुळें त्यांस नांगर, पाभर वगैरे औतें वापरावीं लागतात व कामावर गुलाम लावावे लागतात. या गोष्टी पैशाशिवाय मिळत नाहींत.

अशा समाजांत साहचर्य व संरक्षण याकरितां कुटुंबावरच अवलंबून राहावें लागतें. कारण शासनसंस्थेकडून व्यक्तींचें संरक्षण होत नाहीं. शासनसंस्था फक्त कर वसूल करणें आणि सैन्याकरितां लोक मिळविणें या गोष्टींकडेच पाहतात. कुटुंबांतील मुख्य मनुष्याकडून कर मिळावयाचा असतो व तरुण

लोक सैन्यांत दाखल करावयाचे असतात, म्हणून कुटुंबांतील मुख्य मनुष्यास शासनसंस्थेचें साहाय्य असतें व त्याची सत्ता कुटुंबावर अबाधित असते.

अशा समाजांत कुटुंबाची सत्ता त्यांतील सर्व व्यक्तींवर असल्यामुळें कुटुंबांत कलह लागल्यास कांहीं व्यक्ती साहचर्य व संरक्षण यांकरितां निराळे गट तयार करतात; परंतु असे गट शासनसंस्थेकडून आपल्या सत्तेवर आक्रमण होईल म्हणून मोडले जातात. इंग्लंडमध्यें दहाव्या शतकांत जवळ जवळ अशीच स्थिति होती व आज आफ्रिकेमध्यें डाहोमी लोकांत असे समाज दृष्टीस पडतात.

अशा समाजांत अर्थात् कुटुंबास महत्त्व असल्यामुळें, कुटुंबांतील मुख्य मनुष्याची म्हणजे पित्याची सत्ता मुलावर पूर्णपणें चालते.

## पशुपालवृत्तींतील समाजांतील कुटुंब—

याखेरीज पशुपालवृत्तीनें राहणारे कांहीं समाज आज अरबस्थानांत दृष्टीस पडतात. हे लोक गुरेंढोरें, मेंढ्या, घोडे, किंवा उंट वगैरेंचे कळप बाळगतात, व त्यांस जेथें चारा मिळेल तेथें तात्पुरती वसति करून तेथील चारा संपल्यावर दुसरीकडे भ्रमण करतात. अशा समाजांत कुटुंब हाच मुख्य घटक असून, त्यामध्यें कुटुंबाचा धनी, त्याची एक किंवा अनेक बायका, मुलगे व त्यांच्या बायका अशी बरीच मंडळी असते व कांहीं गुलामहि असतात. अशीं कुटुंबें मिळून एक जमात होते; व त्या जमातीस एक पुढारी असतो. या पुढाऱ्याच्या हातांत सामान्यतः फार थोडी सत्ता असते व प्रत्येक कुटुंब आपल्या कळपाचें वगैरे संरक्षण करून आपला चरितार्थ चालवितें. अशा दोन जमातींत युद्ध सुरू झाल्यास मात्र पुढाऱ्यास विशेष सत्ता वापरण्याचा अधिकार असतो. अशा कुटुंबांमध्यें त्यांचे कळप ही मालमत्ता असून ती कुटुंबाच्या धन्याच्या

हातांत असते. आणि अशा तऱ्हेचा मालकीचा एखादा कळप असल्याशिवाय कोणासहि आपली उपजीविका करतां येत नाहीं. यामुळें कुटुंबाची सत्ता त्यांतील प्रत्येक व्यक्तीवर पूर्णपणें असते; कारण त्यांतील प्रत्येक व्यक्ति संरक्षण व उपजीविका यांकरितां कुटुंबावरच अवलंबून असते. अशा कुटुंबांत पित्यास आपल्या मुलावर सर्व प्रकारें सत्ता चालवितां येते, म्हणून अशा कुटुंबास पितृसत्ताक कुटुंब असें म्हणण्यांत येतें.

## पितृसत्ताक समाजांतील कुटुंब—

अशा पितृसत्ताक कुटुंबामध्यें पित्याची आपल्या मुलांवर व स्त्रियांवर पूर्ण सत्ता असते. ही कुटुंबपद्धति पशुपालनवृत्तीनें राहणाऱ्या समाजांत विशेषतः आढळते. त्याचप्रमाणें कांहीं मोठमोठ्या असंस्कृत समाजांतहि ही पद्धति दृष्टीस पडते. युरोपमध्यें प्राचीन ट्यूटन लोकांत अशीच कुटुंबपद्धति होती. बायबलमध्यें वर्णन केलेल्या हिब्रू लोकांतहि हीच पद्धति असे.

अशा पितृसत्ताक कुटुंबामध्यें मुलांस फारसें चांगल्या रीतीनें वागविण्यांत येत नाहीं. त्यांस पित्याच्या पुढें बोलण्याची अथवा बसण्याचीहि परवानगी नसते. त्यांस पित्याची आज्ञा मग ती योग्य असो अगर अयोग्य असो तरी पण ती पालन करावीच लागते. अशीं मुलें मोठीं झालीं तरी सुद्धां बाप जिवंत असेपर्यंत त्यांस त्याच्याच सत्तेखालीं राहावें लागतें. मुलांनीं विवाह कोणाशीं करावा हें सर्वस्वीं पित्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. क्वचित् प्रसंगीं पित्यास बायका व मुलें यांस गुलाम म्हणून विकण्याचाहि अधिकार असतो. फिजी बेटांमध्यें एका काळीं एका बंदुकीस एक बायको विकत मिळत असे. ट्यूटन लोकांत आपलीं मुलें गुलाम म्हणून विकण्याची चाल असे. रोमन लोकांत क्षुल्लक कारणावरूनहि पित्यानें मुलांस किंवा स्त्रियांस ठार मारल्याचीं उदाहरणें आढळतात.

पितृसत्ताक कुटुंब हें कुटुंबाची आंतील व्यक्तींवर पूर्ण सत्ता असल्याचें उत्कृष्ट उदाहरण होय. अशा समाजांत व्यक्तीस साहचर्य व संरक्षण यांकरितां पूर्णपणें कुटुंबावर अवलंबून राहावें लागतें. कारण अशा समाजांत दुसरा कोणताहि मनुष्यसमूह घटकरूपानें असूं शकत नाहीं. तसेंच उपजीविकेचें साधनहि सर्वस्वीं कुटुंबाच्या आणि पर्यायानें त्याच्या धन्याच्या म्हणजे पित्याच्या मालकीचें असतें.

### पितृसत्ताक कुटुंबपद्धतीची व्यापकता—

पूर्वीं होऊन गेलेल्या सर्व संस्कृतींमध्यें—उदाहरणार्थ, ईजिप्त, बाबिलोनिया, अथवा असुरी संस्कृति, भारतीय संस्कृति, चिनी संस्कृति व ग्रीक संस्कृति या सर्वांमध्यें—कुटुंबसंस्थेस फार महत्त्व होतें, आणि हें कुटुंब पितृसत्ताक असे.

प्राचीन काळीं बाबिलोनियामध्यें पित्यास आपल्या मुली आणि मुलगे यांस स्वतःचें ऋण फेडण्याकरितां जास्तींत जास्त तीन वर्षे पर्यंत गुलाम म्हणून विकतां येत असे. विवाहसमयीं मुलास पित्याची परवानगी घेणें अवश्य असे. स्त्रिया आपले पति व पिता यांच्या पूर्णपणें ताब्यांत असत; परंतु इतरांशीं व्यवहार करतांना त्यांस पुष्कळच स्वातंत्र्य असे. त्यांस स्वतः स्वतंत्रतेनें धंदा करून आपली मालमत्ता करतां येत असे.

चिनी संस्कृतीमध्यें मुलांवर पित्याची पूर्ण सत्ता असे. त्यांचे विवाह सर्वस्वीं आईबापांच्या ताब्यांत असत; व पतिपत्नींची भेट किंवा दृष्टादृष्ट प्रथम लग्नाच्याच वेळीं होत असे. मुलांस सर्व प्रकारें आईबापांची सेवा करावी लागे. चिनी लोकांत पितृपूजेस फार महत्त्व असे; आणि पितरांची पूजा करण्यामुळेंच पित्यास फार महत्त्व येत असे. पित्याच्या परवानगीशिवाय मुलांस घराबाहेरहि जातां येत नसे. जरूर पडल्यास मुलाला विकून टाकण्याचीहि बापास सत्ता असे.

ग्रीस देशांत प्राचीन कालीं पित्यास आपल्या मुलांची विक्री देखील करतां येत असे. इतकी पित्याची पूर्ण सत्ता मुलावर असे. त्याकाळीं ही सत्ता प्रत्यक्ष कशी उपयोजीत असत यासंबंधीं व मुलांच्या शिक्षणा-संबंधीं विवेचन पुढें येणार आहे.

रोमन लोकांतहि पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच अस्तित्वांत होती. मुलावर पित्याची पूर्णपणें सत्ता असे व कांहीं चूक झाल्यास त्यास ठार मारण्याचाहि त्यास अधिकार असे. हळूहळू रोमची सत्ता वाढत जाऊन त्याचें साम्राज्य झाल्यावर व्यक्तीस शासनसंस्थेकडून संरक्षण मिळूं लागलें व हळूहळू पित्याची मुलावरील सत्ता कमी होत गेली. यासंबंधीं पुढें अधिक विवेचन करण्यांत येणार आहे.

## उमरावी अथवा सरंजामी सत्तेमधील कुटुंब—

पुढें रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर शासनसंस्था कमजोर होऊन व्यक्तीचें संरक्षण त्या संस्थेकडून व्हावें तसें होईनासें झालें, त्यामुळें पुनः कुटुंब-संस्थेस महत्त्व येऊन पित्याची कुटुंबांतील व्यक्तींवर सत्ता पूर्वीप्रमाणें स्थापित झाली. ट्यूटन लोकांतील पितृसत्ताक पद्धति रोमन सत्तेखालीं विस्कळित झाली होती ती पुनः जोमदार बनली व पित्याची कुटुंबांतील सर्व माणसांवर सत्ता अबाधितपणें चालूं लागली. परंतु मध्यंतरींच्या या धामधुमीच्या काळांत अनेक कुटुंबांस स्वतःचें संरक्षण करण्यास दुष्कर पडूं लागलें. त्यामुळें तीं एखाद्या जमीनदाराचा अगर सरदाराचा आश्रय करून राहूं लागलीं. याप्रमाणें सरंजामी अथवा उमरावी सत्ता सुरू झाली. हे सरदार मोठमोठ्या जमिनींचे मालक बनले व आपल्या जमिनीवर राहणाऱ्या लोकांवर पूर्णपणें सत्ता गाजवूं लागले. हे सरदार जमिनींच्या वांटणीबरोबर आपल्या कुळांचीहि वांटणी करून घेऊं

लागले व आपल्या कुळांनीं विवाहसंबंध वगैरे कोणाशीं करावा या बाबतींतहि आपली सत्ता चालवूं लागले. दोन भिन्न सरदारांच्या सत्तेखालील कुळांनीं विवाहसंबंध केल्यास त्यांपासून होणाऱ्या मुलांची वांटणी त्या दोन सरदारांत केली जात असे. याप्रमाणें या सरदार व उमरावांची सत्ता त्यांच्या कुळांच्या कुटुंबावर पूर्णपणें प्रस्थापित झाली व यामुळें कुटुंबसंस्थेस थोडासा धक्का बसला.

## रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती संप्रदायाचा कुटुंबसंस्थेवर परिणाम—

या उमरावशाहीशिवाय त्यावेळीं युरोपमध्यें ख्रिस्ती संप्रदायास फार महत्त्व होतें. त्यावेळीं रोमन कॅथॉलिक संप्रदायाची सत्ता समाजावर दृढ झाली होती. या संप्रदायांत बऱ्याचशा सामाजिक कल्पना रोमपासूनच घेतलेल्या होत्या. या संप्रदायानें स्त्रियांस व मुलांस गुलाम म्हणून विकण्याच्या पद्धतीस विरोध केला. त्यामुळें पित्याच्या आपल्या कुटुंबांतील व्यक्तींवरील सत्तेस बराचसा धक्का बसला. शिवाय या संप्रदायाचें ध्येय व्यक्तीच्या आत्म्याची उन्नति करावयाची हें असल्यामुळें, हा संप्रदाय कुटुंबापेक्षां व्यक्तीसच अधिक महत्त्व देऊं लागला.

या संप्रदायाचें एक असें तत्त्व होतें कीं, सर्व स्त्रीपुरुषांनीं परमेश्वरावर प्रेम केलें पाहिजे. त्यामुळें स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर प्रेम केल्यास तें परमेश्वरावरील प्रेमाच्या आड येतें अशी त्यांची समजूत असे. या संप्रदायांतील अधिकारी व्यक्तींची अशी समजूत असे कीं, स्त्रीपुरुषांनीं प्रणय करणें हें पातक आहे, आणि विवाह करण्यापेक्षां ब्रह्मचर्यपालन करणें हें पुण्यकारक आहे. तसेंच स्त्री ही सामान्यतः पातकी समजली जाऊन स्त्रीच्या जन्मास जाणें हें पातक समजलें जात असे. या समजुतीचा अवशेष अद्यापिहि कांहीं सुसंस्कृत समाजांत आढळून येतो. ज्या स्त्रिया

किंवा पुरुष लग्न न करतां भिक्षुणी अथवा भिक्षु होऊन जगामध्यें धर्मप्रचाराचें कार्य करीत, ते स्त्रीपुरुष इतर विवाहित स्त्रीपुरुषांपेक्षां श्रेष्ठ दर्जाचे समजले जात. तथापि विवाहित होऊन स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर प्रेम करण्यास मान्यता देण्यांत आली होती. मात्र विवाह हा संस्कार विशेष महत्त्वाचा समजण्यांत येऊन त्यास धार्मिक स्वरूप देण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें एकपत्नीत्व यास महत्त्व देण्यांत येऊन घटस्फोट सामान्यतः अमान्य करण्यांत आला होता.

## मठसंस्थेचा कुटुंबसंस्थेवर परिणाम—

या रोमन कॅथोलिक संप्रदायाचा कुटुंबसंस्थेवर दुसराहि एक महत्त्वाचा परिणाम झाला. तो परिणाम त्यांच्या मठसंस्थेमुळें विशेषतः घडून आला. ज्या मुलांस कुटुंबामध्यें त्रास होत असे तीं मुलें आपलें कुटुंब सोडून मठांत जाऊन भिक्षु किंवा भिक्षुणी होत. येथें त्यांच्या शिक्षणाची व योगक्षेमाची पूर्णपणें तरतूद करण्यांत येत असल्यामुळें कुटुंबाच्या नियंत्रणांतून सुटका करून घेण्यास त्यांस हा एक चांगला मार्ग असे.

तिबेटमधील बौद्ध मठांची तुलना या मठांशीं करतां येईल. तिबेटी लोकांत फक्त वडील भावासच विवाह करावयाचा अधिकार असतो व तोच बापाच्या सर्व मालमत्तेचा मालक बनतो. यामुळें लहान भाऊ हे बहुधा भिक्षु होऊन मठांत राहतात. या मठांच्या मालकीच्या मोठमोठ्या जमिनी वगैरे असतात. त्यांच्या उत्पन्नावर त्यांचा निर्वाह चालतो. हे मठ एखाद्या किल्ल्याप्रमाणें मजबूत बांधलेले असतात व बहुतेक भिक्षु लढवय्ये असून ते आपल्या मठाचें संरक्षण परकीय हल्ल्यापासून करूं शकतात. मठावर मुख्य लामाची पूर्ण सत्ता चालते. अर्थात् अशा मठांत

राहणाऱ्या भिक्षूंचा इतर समाजाशीं व अर्थातच त्यांच्या कुटुंबाशीं कांहींहि संबंध राहात नाहीं व ते आपलें सर्व आयुष्य मठांतील दैनंदिन कार्यक्रम व इतर मठाचीं कामें यांत व्यतीत करतात. यांतून जे धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास करतात ते मोठमोठे पंडित होतात व त्यांच्याकडून कांहीं उत्तमोत्तम ग्रंथरचनाहि होते. कांहीं केवळ तपश्चर्येच्या मागें लागून अनेक प्रकारचे जपतपादि प्रकार करीत आयुष्यक्रमण करतात.

## मध्यकालीन युरोपीय कुटुंबसंस्था—

याप्रमाणें उमरावी सत्ता व ख्रिस्ती संप्रदाय यांच्या महत्त्वामुळें जरी कुटुंब-संस्थेवर आघात झाला तरी कुटुंबसंस्था ही टिकून राहिलीच; व पित्याची कुटुंबावरील सत्ता अबाधित राहिली. विशेषतः समाजांतील उच्च वर्गांच्या लोकांमध्यें कुटुंबसंस्थेस विशेष महत्त्व असे. कनिष्ठ दर्जांतील कुटुंबें हीं एखाद्या सरदाराचीं कुळें बनल्यामुळें त्या समाजांत कुटुंबसंस्थेचें महत्त्व कमी झालें होतें, परंतु एकंदर सामाजिक घटनेंत या लोकांस फारसें महत्त्वच नसे. सुमारें ख्रिस्ती शकाच्या तेराव्या शतकाच्या आरंभीं असा कायदा करण्यांत आला कीं, आपली सर्व मिळकत आपल्या पश्चात् आपल्या वडील मुलास ठेवावी. अशा वेळीं लहान मुलें सैन्यांत वगैरे नोकरी करावयास जात किंवा भिक्षु होऊन रहात. अशा प्रकारें कुटुंबसंस्थेस जरी थोडासा धक्का बसला तरी पित्याची मुलावरील सत्ता बरीच असे. मुलांचीं लग्नें लहानपणींच होत असत. त्या वेळीं अज्ञानदशा सातव्या वर्षीं संपते अशी समजूत असे व मुलांचें विवाहासंबंधीं संमतीचें वयहि सात मानण्यांत येत असे. त्यामुळें पुढें मुलांनीं आपल्या मर्जीविरुद्ध विवाह करूं नये म्हणून आईबाप सात वर्षांच्या आधींच मुलांचीं लग्नें उरकून घेत असत.

## प्रॉटेस्टंट पंथाचा कुटुंबसंस्थेवर परिणाम--

सोळाव्या व सतराव्या शतकांमध्यें कुटुंबसंस्थेवर प्रॉटेस्टंट ख्रिस्ती संप्रदायाचा बराचसा परिणाम झालेला दृष्टीस पडतो. या संप्रदायानें आपल्या बऱ्याचशा सामाजिक कल्पना बायबलांतील जुन्या करारावरून घेतलेल्या आहेत. त्या वेळीं कांहीं हिब्रू लोकांत अनेकपत्नीत्वाची चाल असल्यामुळें, कांहीं प्रॉटेस्टंट पंथांत बहुपत्नीत्व मान्य असून त्याचा अवलंबहि केला जात असे. कांहीं सुधारक पंथांतून विवाह ही बाब धार्मिक समजली जात नसे. बऱ्याचशा अमेरिकन संस्थानांत विवाह या धार्मिक संस्कारास कायद्यानें बंदी करण्यांत आलेली होती. कांहीं पंथांतून तर विवाह ही केवळ दोन व्यक्तींमधील खासगी बाब समजली जाऊन, कोणताहि विधि केल्याशिवाय केवळ संमतीनें तो प्रचारांत यावा या गोष्टीस उत्तेजन देण्यांत येत असे. त्याचप्रमाणें घटस्फोटहि सुलभतेनें मिळावा असें प्रतिपादण्यांत येत असे. बहुधा अशा तऱ्हेच्या कल्पना केवळ त्या रोमन संप्रदायाच्या विरुद्ध आहेत म्हणूनच पुढें मांडण्यांत येत असाव्यात. तथापि बहुतेक महत्त्वाच्या प्रॉटेस्टंट पंथांनीं इंग्लंड व अमेरिका या दोन देशांत रोमन कॅथोलिक संप्रदायाचेंच अनुकरण केलें. बहुपत्नीत्वास बंदी करण्यांत आली, घटस्फोट मिळणें दुष्कर करण्यांत आलें व केवळ संमतीनें होणाऱ्या विवाहांत मुलांची जबाबदारी निश्चित करणें कठिण जाऊं लागल्यामुळें इंग्लंड व अमेरिका येथील शासनसंस्थांनीं नोंदणीपद्धतीचा विवाह सक्तीचा केला. इंग्लंडमध्यें प्रथम नोंदणीपद्धति विशेष यशस्वी झाली नाहीं. तथापि बहुतेक विवाह चर्चमध्यें धार्मिक संस्कार करून करण्यांत येत असत; परंतु अठराव्या शतकाच्या अखेरीस प्रत्येक विवाह नोंदणें सक्तीचें होऊन त्याचा अंमलहि पूर्णपणें होऊं लागला. अमेरिकेमध्यें ज्या ठिकाणीं धार्मिक विवाहसंस्कारास बंदी होती, त्या ठिकाणीं नोंदणीकडे विशेष लक्ष देण्यांत येत असे; व पुढें पुढें धार्मिक संप्रदायांची तीव्रता जस-

जशी कमी होऊं लागली तसतसे धार्मिक विवाह करण्यासहि मोकळीक मिळूं लागली. याप्रमाणें इंग्लंड व संयुक्त अमेरिका या दोन देशांत बहुतेक एकच स्थिति निर्माण झाली. नोंदणी विवाह व धार्मिक विवाह या दोहोंसहि मोकळीक देण्यांत आली, परंतु संमतिविवाहास बंदी करण्यांत आली. तथापि अद्यापिहि स्कॉटलंड व अमेरिकेंतील कांहीं संस्थानें यांमध्यें संमतिविवाह मान्य आहे.

प्रॉटेस्टंट संप्रदायांत कॅथोलिक संप्रदायापेक्षां एक गोष्ट विशेष प्रामुख्यानें दिसून येते; ती ही कीं, या पंथानें ब्रह्मचर्यापेक्षां विवाहास अधिक महत्त्व दिलें. त्यामुळें प्रॉटेस्टंट देशांत भिक्षू व भिक्षुणी यांचे पंथ निघाले नाहींत. यामुळें कुटुंबसंस्थेस महत्त्व येऊन कुटुंब हा सर्व समाजाचा पाया समजला जाऊं लागला. बनियन यानें तर ख्रिस्ती धर्माचें फळ कुटुंबांत राहून आपलें कर्तव्य पार पाडल्यानेंच मिळतें असें प्रतिपादन केलें आहे; आणि स्त्रीपुरुष व पितापुत्र यांनीं आपापलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें बजावलें पाहिजे असें सांगितलें आहे. कॅलव्हिन् यानें तर असें प्रतिपादन केलें आहे कीं, जे पित्याच्या आज्ञेची अवगणना करतील किंवा तीविरुद्ध वर्तन करतील, ते मनुष्य नसून राक्षस होत; व अशा पित्याची आज्ञा भंग करणारांस ठार मारावें अशी परमेश्वराची आज्ञा आहे. एका अमेरिकन संस्थानांत कॅलव्हिन् मतानुयायी लोकांची संख्या बरीच असल्यामुळें, तेथें अशा प्रकारचा कायदाहि करण्यांत आला होता.

## मध्ययुगीन कुटुंबसंस्था—

मध्ययुगांत सामान्यतः मध्यम स्थितींतील मनुष्याचें आयुष्य आपल्या कुटुंबांतच जात असे. मुलानें कोणता धंदा करावा हें बहुधा पिताच ठरवीत असे. अमेरिकेमध्यें शेतीस जमीन पुष्कळ असल्यामुळें मुलांस थोडें अधिक

स्वातंत्र्य असे. तथापि मुलांचें पालनपोषण व शिक्षण कुटुंबांतच होत असे. प्रॉटेस्टंट कुटुंबांतील मुलें बोर्डिंगांत राहण्याचे ऐवजीं घरूनच शाळेंत जात असत. प्रॉटेस्टंट कुटुंबांत पिता हा परमेश्वरी अंश असून, त्याची सत्ता स्त्री व मुलें यांवर अबाधित समजण्यांत येत असे; आणि त्यांनीं त्याची सेवा करावयाची असे. मुलांनीं कोणाशीं लग्न करावयाचें हें बहुधा आईबाप ठरवीत असत व मुलांनीं स्वतः आपलें लग्न ठरविलें तरी त्यास पित्याची संमति लागे. पित्याच्या मर्जीविरुद्ध किंवा संमतीशिवाय त्यांस कधींहि लग्न करतां येत नसे.

**व्यक्तिमत्त्वाचा उदय—**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत व्यक्तिमत्त्वास विशेष महत्त्व येऊं लागलें. व्यक्तिमत्त्वामुळें लोकांच्या दृष्टीमध्यें फार मोठा फरक पडला. कोणतीहि गोष्ट चांगली किंवा वाईट हें ठरविण्याची दृष्टि त्या गोष्टीचा ज्या व्यक्तीशीं संबंध येतो त्या व्यक्तीस अनुसरून बनूं लागली. प्रत्येक गोष्ट शासनसंस्थेस, कुटुंबास अगर संप्रदायास अनुकूल किंवा प्रतिकूल आहे हें पाहण्यापेक्षां तत्संबद्ध व्यक्तीवर तिचा परिणाम काय होतो या दृष्टीनें तपासली जाऊं लागली. यामुळें व्यक्तींवरील सरकार, संप्रदाय व त्याबरोबरच कुटुंब यांचाहि ताबा हळूहळू कमी होऊं लागला. जी गोष्ट शासनसंस्थेंत जरूर नाहीं तिची जरूरी कुटुंबांतहि अमान्य होऊं लागली. या व्यक्तिवादानें स्त्रियांची व कुटुंबांतील मुलांची स्थिति बरीच सुधारली. प्रेम-विवाहास प्रामुख्य आल्यामुळें आईबापांची मुलांवरील सत्ता विवाहाच्या बाबतींत कमी होऊं लागली; कारण यापूर्वींचे विवाह आर्थिक किंवा कौटुंबिक दृष्टीनें जुळविलेले असत ते आतां व्यक्तींच्या आवडीनिवडीवर जमून येऊं लागले.

एकोणिसाव्या शतकांत सामाजिक परिस्थितींतहि बराच फरक पडत चालला. घरगुती धंदे बंद पडून कारखाने निघाले. श्रमविभागणीचें तत्त्व अधिकाधिक विस्तृत प्रमाणांत अमलांत येऊं लागल्यामुळें स्त्रीपुरुषांस व मुलांस निरनिराळ्या प्रकारचीं कामें मिळूं लागलीं; व त्यामुळें त्यांस अधिक आर्थिक स्वातंत्र्य मिळूं लागलें. शासनसंस्था अधिकाधिक सामर्थ्यवान् व कार्यक्षम होऊं लागल्या. कायद्यांचा अंमल देशाच्या कोनाकोपऱ्यांतहि करतां येणें शक्य झालें. यामुळें स्त्रीपुरुषांस शासनसंस्थेकडून पूर्णपणें संरक्षण मिळूं लागल्यामुळें कुटुंबावर संरक्षणासाठीं अवलंबून राहण्याचें कारण उरलें नाहीं. सरकारकडून शिक्षण मोफत मिळूं लागल्यामुळें त्या बाबतींतहि कुटुंबावर मुलांस अवलंबून राहण्याचें कारण उरलें नाहीं. क्रीडासंघ, कारखानदार मजूर संघ व निरनिराळया सामाजिक संस्था निघाल्यामुळें साहचर्याकरितांहि कुटुंबावर अवलंबून राहण्याचें कारण उरलें नाहीं. मोफत दवाखाने व इतर सामाजिक दुःखनिवारण करणाऱ्या संस्था व मुलांस अगर निराश्रितांस मदत करणाऱ्या संस्था निघाल्यामुळें, व्यक्ति हळू हळू कुटुंबापासून स्वतंत्र होऊं लागली. लहान मुलांकरितांहि शिशुसंगोपनगृहें, बालशिक्षणमंदिरें वगैरेसारख्या संस्था निघून मुलांची काळजी घेण्याचें कामहि कुटुंबाकडे तितकें राहण्याची आवश्यकता उरली नाहीं. यामुळें हळू हळू कुटुंबसंस्थेचा ऱ्हास होत गेला व त्याबरोबर पित्याची मुलावरील सत्ताहि कमी कमी होत गेली.

**मातृसत्ताक कुटुंब—**

आतांपर्यंत विवेचन केलेल्या समाजांत सामान्यतः कुटुंब या समाजाच्या महत्त्वाच्या घटकांत पित्यास प्रामुख्याचें स्थान असे व त्याची सत्ता कुटुंबांतील सर्व व्यक्तींवर चालत असे, ही गोष्ट आपल्या नजरेस स्पष्टपणें आली आहे; परंतु ही एकच पद्धति सर्वत्र रूढ होती असें नाहीं. हिच्या इतकीच महत्त्वाची व किंबहुना या पद्धतीहूनहि प्राचीन अशी एक

कुटुंबसंस्था व समाजपद्धति जगाच्या फार मोठ्या प्रदेशावर एका काळीं रूढ होती व तिचे अवशेष या आपल्या भरतखंडांतच आजहि आपणांस स्पष्टपणें दृष्टीस पडतात. ही पद्धति पितृसत्ताक पद्धतीच्या अगदीं विरुद्ध घटनेची असून तीमध्यें पुरुषाच्या ऐवजीं स्त्रीस अथवा पित्याच्या ऐवजीं मातेस विशेष महत्त्व दिलेलें आढळतें व मनुष्याच्या प्राथमिक परिभ्रमण-शील वृत्तीमध्यें स्त्री व विशेषतः मूल झालेली स्त्री हाच कुटुंबाचा अधिक स्थिर असा घटक असून त्याच्या अनुषंगानें मनुष्याच्या स्थिर स्वरूपाच्या वसाहती व गोत्र, शासनादि संस्था निर्माण झाल्या असल्या पाहिजेत. यामुळें या मातृसत्ताक पद्धतीचेंहि अवलोकन करणें आपणास अवश्य आहे.

मातृकन्या परंपरेवर डॉ. बॅरन होमर रोल्फ एहरेनफेल्स यांनीं एक चांगला ग्रंथ* लिहिला आहे. हिंदुस्थानामध्यें मलबार व केरळ या नैऋत्येकडील आणि आसाम या ईशान्येकडील–खासी व गारो पर्वत-प्रांतांत मातृकन्या परंपरा अद्यापहि कांहीं अंशीं व कांहीं ठिकाणीं पूर्णपणें प्रचलित असलेली दिसून येते. एवढेंच नव्हे तर एकंदर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या समाजांचा मानवशास्त्रदृष्ट्या विचार केला व कांहीं समाजांतील कांहीं विशिष्ट चालीरिती व विवाहसंस्कार आणि समारंभ यांचा सूक्ष्मदृष्ट्या अभ्यास केला तर असें दिसून येईल कीं, प्राचीन काळीं भरतखंडांत मातृकन्या परंपराच निरनिराळ्या रूपांमध्यें सर्वत्र प्रचलित असावी. नंतर आर्यांचा प्रवेश आर्यावर्तांत झाल्यानंतर पितापुत्र परंपरा ही रूढ झाली असावी व पितृसत्ताक कुटुंबपद्धति अस्तित्वांत आली असावी. आर्यांच्या संस्कृतीचा जसजसा भरतखंडांत प्रसार होत गेला तसतसा हा फरक हळू हळू पडत गेला असला पाहिजे. ही गोष्ट

* Mother Right in India, Oxford University Press, 1941

आज मातृसत्ताक पद्धतीचे अवशेष असलेल्या प्रदेशांचें निरीक्षण केलें असतां दिसून येते. भरतखंडामध्यें आर्यांचें आगमन वायव्य दिशेकडून झालें आणि जसजशी त्यांची वसाहत वाढत गेली तसतसा त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव येथील तत्पूर्व संस्कृतीवर पडून आर्यांच्या सामाजिक संस्कृतीचा व कुटुंबपद्धतीचा प्रसार निरनिराळ्या प्रदेशांत होऊं लागला व त्यामुळें हिंदुस्थानच्या वायव्य दिशेकडून दक्षिणेकडे व पूर्वेकडे आपण जसजसा दूर दूर प्रवास करूं लागतों तसतसे मातृसत्ताक पद्धतीचे अवशेष आपणांस अधिकाधिक दिसून येऊं लागतात व अखेरीस वर सांगितल्याप्रमाणें मलबार व आसाम या प्रांतांत ते पूर्णत्वानें दृष्टीस पडतात. आणि या दोन प्रदेशांपासून दूर असलेल्या भागांत फार विरळ दिसून येतात; तथापि हिमालयाच्या पायथ्यापासून तों बलुचिस्तानाच्या कांहीं भागांतहि त्यांचें अस्तित्व कमीअधिक प्रमाणांत भासमान होतें.

**मलबारमधील तरवड—**

मलबारमधील मातृसत्ताक कुटुंबास तरवड असें म्हणतात. हें एक समाईक कुटुंब असून त्यामध्यें एका स्त्रीच्या सर्व संततीचा समावेश होतो. या कुटुंबांतील सर्वांत वडील स्त्रीचा पति ( हे पूर्वीं अनेकहि असत ) हा आपल्या आईच्या कुटुंबांत अथवा तरवडमध्यें राहात असतो व आपल्या एक किंवा अनेक पत्नींस केवळ भेट देण्याकरितां जातो. कुटुंबांतील मुख्य कर्ता मनुष्य हा वडील स्त्रीचा भाऊ असतो व त्यास कर्नीरवन् ( कर्ता ) असें म्हणतात. जर अशा कुटुंबांतील मंडळींची संख्या कांहीं दिवसांनीं सुमारें १०० अथवा अधिक झाली तर या कुटुंबाचे निरनिराळे विभाग पडतात व त्यांस तवजी असें म्हणतात. ही वांटणी व्हावयाच्या वेळींहि मातृकन्या परंपराच लक्षांत घेतली जाते, व तवजी या

शब्दाच्या अर्थावरूनहि याच पद्धतीचा बोध होतो. (त = माता, वजी = वंश.)

या तरवड घराच्या रचनेंत व स्वरूपांताहि कांहीं गोष्टी विशेष लक्षांत घेण्यासारख्या असतात. हें घर साधारणतः पूर्व दिशेस उतार असलेल्या जागेवर बांधण्यांत येतें. याची जागा चौकोनी असून तिचे चार भाग केलेले असतात. ईशान्य व नैर्ऋत्येच्या भागांत निरनिराळ्या इमारती असून आग्नेयीचा भाग स्मशानाकरितां राखून ठेवलेला असतो व त्याच्या मध्यभागीं नागाचें वारुळ अथवा बीळ असतें व ही गोष्ट नायर कुटुंबाच्या धर्मांतील फार महत्त्वाची बाब समजली जाते. मुख्य राहत्या घराचें तोंड पूर्व दिशेस असतें. पाहुण्यांची खोली व देवघर हीं अशा रीतीनें बांधलेलीं असतात कीं त्यांच्या दरवाजांतून सूर्याचे अगदीं पहिले किरण आंत येतात. प्रत्येक घरामध्यें पाण्याचें मोठें टाकें असतें व त्याचा उपयोग स्नान वगैरे करण्याकरितां होतो व स्नान हीहि नायर लोकांच्या आयुष्यक्रमांतील एक महत्त्वाची बाब असते. त्याचप्रमाणें विहिरीमधून थेट स्वयंपाक घरांत पाणी येईल अशी व्यवस्था केलेली असते. मुख्य घराच्या भोंवतीं लहान लहान इमारती व गुरांचे गोठे असतात.

विवाहित स्त्री माजघरांत किंवा इतर सर्व लोक जेथें निजतात त्या जागेंत निजत नाहीं. तिच्याकरितां एक दोन स्वतंत्र खोल्या असतात व तेथें ती आपल्या पतीची भेट घेऊं शकते. मुलांचा पिता मुलांच्या शिक्षणाकडे विशेषसें लक्ष देतांना आढळत नाहीं व ही गोष्ट बहुतेक मातृसत्ताक कुटुंबांत आढळून येते. कदाचित् ही गोष्ट नायर लोक हे सामान्यतः सैनिक वृत्तीचे असत यामुळेंहि घडून येत असेल.

नायर लोकांमध्यें १९व्या शतकापर्यंत बहुपतित्वाची चाल अस्तित्वांत होती व ती अलिकडे परकी अमलांतच हळूहळू नष्ट झाली.

उच्च नायर कुटुंबांतील स्त्रीस अधिकांत अधिक बारा पती असत असें कांहीं वृत्तांतांवरून दिसून येतें.

या पतींस आपल्या स्त्रीकडे पाळीपाळीनें राहण्याचा हक्क असे आणि त्यांच्या दिवसांची गणना एका दिवसाच्या मध्यान्हापासून दुसऱ्या दिवसाच्या मध्यान्हापर्यंत करीत असत (थर्स्टन ५·१०७–११३). १८ व्या शतकांतील पोर्तुगीज व डच प्रवासी लोकांनीं हे बहुपतित्वांतील विवाह स्थिर प्रवृत्तीचे असून यांतील पतिपत्नी परस्परांशीं एकनिष्ठेनें राहात असें वर्णन केलें आहे. यावरून या प्रकारची विवाहसंस्था या समाजांत अत्यंत प्राचीन कालापासून अस्तित्वांत असली पाहिजे असें दिसतें. लोगन यानें नायर स्त्रिया इतर स्त्रियांप्रमाणेंच पतीशीं एकनिष्ठ व शुद्ध वर्तनाच्या असतात असें म्हटलें आहे (मॅन्युअल ऑफ मलबार १. ३६). के. नारायण मरार यानें गेल्या महायुद्धाच्या पूर्वीच्या कालापर्यंत मलबारमध्यें अंतर्गत भागांत क्वचित् बहुपतिक विवाह दृष्टीस पडत असें म्हटलें आहे. तसेंच अनंत कृष्ण अय्यर् यांनींहि असें लिहिलें आहे कीं, पोन्नानी आणि वल्लुवनाड तालुक्यांमध्यें आणि कोचीनच्या सरहद्दीवर जुन्या सनातनी पद्धतीनें राहणाऱ्या नायर कुटुंबांत अद्यापहि बहुपतिक विवाह दृष्टीस पडतात; व त्यांच्या जुन्या परंपरेवर अद्यापहि ब्राह्मणी अथवा युरोपियन संस्कृतीचा परिणाम पूर्णपणें झाला नाहीं (कोचीन कास्ट्स ॲन्ड ट्राइब्स २. ८३.). परंतु वस्तुतः ही बहुपतित्वाची चाल आतां बंद करण्यांत आली आहे.

## मातृकन्या परंपरा—

मातृसत्ताक पद्धतीमध्यें माता ही कुटुंबांतील मुख्य व्यक्ति असल्यामुळें व मातृकन्या परंपरा रूढ असल्यामुळें मातेची संपत्ति तिच्या पश्चात्

मुलीकडे जाते. मलबार व केरळ प्रांतांत कुटुंबाची सर्व मालमत्ता कुटुंबांत जन्मलेली जी सर्वांत वडील स्त्री म्हणजे मातेच्या पश्चात् ज्येष्ठ कन्या तिच्याकडे जाते व सर्व तरवडची ती मुख्य मालकीण बनते. परंतु आसामांतील खासी व गारो पर्वतांतील लोकांत ती सर्व मुलींकडे जाते व विशेषतः सर्वांत कनिष्ठ मुलीस सर्वांत मोठा हिस्सा मिळतो, ती कौटुंबिक घराची मालकीण होते, आणि घरांतील सामान व मातेचे दागदागिने हे तीसच मिळतात. यांवर मुलांचा किंवा भावाचा हक्क नसतो. पितृसत्ताक कुटुंबांतहि मातेचें स्त्रीधन मुलीकडे जातें व त्यांतहि विवाहित मुलीपेक्षां अविवाहित मुलींचा त्यावर विशेष हक्क असतो. ही गोष्ट मातृसत्ताक पद्धतीचा अवशेष म्हणून दाखवितां येईल.

तथापि संस्थानच्या बाबतींत पितृसत्ताक परंपरेकडे अधिक प्रवृत्ति असलेली विशेषतः आसाम प्रांतांत दिसून येते. खासी संस्थानामध्यें शीएम हा संस्थानचा मुख्य असतो. तो काशिएम्-सद् हिचा भाचा किंवा इतर कोणी तरी पुरुष नातेवाईक असतो. सध्यां फक्त तिच्याकडे धार्मिक मुख्य पुरोहिताची भूमिका व सत्ता असते व आपले राजकीय अधिकार तिनें अशा रीतीनें आपल्या भावाला किंवा नातेवाईकास तात्पुरते देण्याची पूर्वी प्रथा असावी; परंतु त्या प्रथेसच पुढें हक्काचें स्वरूप प्राप्त झालें असावें. या संस्थानांतहि मातृकन्या परंपरेप्रमाणेंच वंश चालतो. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे मातृकन्या परंपरेमध्यें खासगी मालमत्ता कनिष्ठायत्त पद्धतीप्रमाणें नवीन वारसाकडे जाते. म्हणजे, सर्वांत लहान मुलीस सर्वांत प्राथम्य मिळून मोठा हिस्साहि मिळतो. परंतु वर सांगितलेल्या राजकीय पुरुष वारसाच्या बाबतींत मात्र याच्या उलट ज्येष्ठायत्त पद्धतीचा अवलंब केला जातो ( गर्डन. पृ. ६७-६८ ).

या संस्थानांतहि स्वकष्टार्जित संपत्ति कोणाहि व्यक्तीस आपल्या इच्छेप्रमाणें पुढील वारसाकडे देण्याची स्वतंत्रता असते. अशा वेळीं असें तरुण जोडपें बहुधा स्वतंत्र घर करून आपल्या एकदोन मुलांसह स्त्रीच्या माहेरीं राहूं लागतें.

मलबारांतील ही मातृकन्या परंपरा हळूहळू कमी होत चालली आहे आणि नवीन तरुण स्त्रीपुरुष मातृप्राप्त धन व स्वकष्टार्जित धन मिळून स्वतंत्र कुटुंब व घर करून राहूं लागलीं आहेत. यामुळें वैय्यक्तिक पितृसत्ताक कुटुंबाची वाढ होऊं लागली आहे. त्यामुळें मूळचें मोठें तरवड अथवा समाईक मालमत्तेचें कुटुंब मोडत जाऊन त्या ठिकाणीं लहान लहान तवजी उत्पन्न होत आहेत पण याचा एक परिणाम म्हणजे या समाजांत दारिद्र्य वाढत आहे.

**मातृकन्या परंपरेंत मामाचें महत्त्व—**

मातृकन्या परंपरेंत मामाचें स्थान फार महत्त्वाचें असतें.* तो घरांतील कर्ता असतो व आपल्या बहिणीच्या हातांत असलेली सर्व सत्ता

---

* हें मामाचें महत्त्व आज पितृसत्ताक पद्धति प्रचलित असलेल्या कांहीं जातींत अजूनहि दृष्टीस पडतें; यावरून पूर्वीं या प्रदेशांत मातृसत्ताक पद्धतीस महत्त्व होतें व तिचाच हा अवशेष आहे असें दिसून येतें व आपल्या वरील विधानास पुष्टि मिळते. पुढील जातींमध्यें मामाचें महत्त्व सामाजिक व धार्मिक विधींमध्यें विशेषें करून आढळतें.

( १ ) भुंजिया,—बहिणीच्या मुलांना विशेष मान असतो ( रसेल २. ३२६ ).

( २ ) चमार—मामा व भाचा दोघे मिळून मंत्रतंत्र, जादूटोणा वगैरे करतात ( रसेल ४. ४२१ ).

वापरतो, एवढेंच नव्हे तर इतर बाबतींतहि त्याचें महत्त्व बरेंच असत. विवाहप्रसंगीं मामाचें गाणें म्हणण्यांत येतें. मुलांवरहि कांहींसा मामाचाच ताबा असतो, व मुलांच्या नांवांत मामाच्या नांवाचा उल्लेख करण्यांत येतो

---

( ३ ) गोवारी— विवाहामध्यें आतेभाऊ पौरोहित्य करतो ( रसेल ३. १६२ ).

( ४ ) गोंड—मुलीचा मामा मुलीचें शुल्क घेतो. मात्र घर हा त्याचाच मुलगा नसावा ( रसेल ३. ७१–७५ ).

( ५ ) हळबी—भाचा मामाच्या मुलीशीं लग्न करतो आणि त्याचेपासून त्यास वारसा म्हणून एकदोन म्हशी मिळतात. मामाजवळ भाच्याचें महत्त्व विशेष असतें ( रसेल १. १४५ ).

( ६ ) कमार—वरीलप्रमाणेंच. मामा बहिणीच्या मुलींचीं तीं गरीब असल्यास लग्नें करतो. मामा–भाचे एका ताटांत जेवीत नाहींत ( रसेल ३. ३२५ ).

( ७ ) कोळी—मामास लग्नामध्यें महत्त्व असतें ( रसेल ३. ४१६ ).

( ८ ) माळी—वराचा मामा वधूला विवाह स्थळीं घेऊन येतो ( रसेल ४. १६७ ).

( ९ ) मराठा–विवाहामध्यें मामाचें महत्त्व विशेष असतें ( रिसले १. ९७ ).

( १० ) ब्राह्मण—कांहीं ब्राह्मण जातींत मामाभाचीचा विवाह होतो. कांहीं जातींत मामाच्या मुलीवर भाच्याचा पहिला हक्क असतो व कांहीं ब्राह्मण जातींत बहीण भावाची मुलगी आपल्या मुलाकरितां मागते व त्याकरितां दार अडवते. मामा सोडमुंजीच्या वेळीं आपली मुलगी भाच्यास देण्याचें कबूल करतो. तसेंच लग्नाच्या वेळीं मामा मुलीकडून वरास माळ घालवितो. या गोष्टी मातृकन्या परंपरेचे अवशेष दाखवितात.

(थर्स्टन ५-२९४). अशा कुटुंबांत सर्वांत जी वडील स्त्री असेल तिची जी सर्वांत मोठी मुलगी असेल तिला फार महत्त्व असतें व ती बहुधा कुटुंबांत दिवाणजी सारखा अधिकार चालवीत असते. [या ठिकाणीं मराठा कुटुंबामध्यें भावजय वडील नणंदेस दिवाणसाहेब असें संबोधते ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.]. तिच्या भावांस तिच्या आज्ञेंत राहावें लागतें व या भावाबहिणींतहि सर्व आयुष्यभर विशेष सख्य असतें. याप्रमाणें मलबार वगैरे भागामध्यें जी मातृसत्ताक पद्धतींतहि ज्येष्ठायत्त वृत्ति आढळून येते ती ईशान्य हिंदुस्थानांतील मातृसत्ताक पद्धतींत आढळणाऱ्या कनिष्ठायत्त वृत्तीशीं अगदीं विरुद्ध दिसते.

---

पुढील जातींमध्यें धार्मिक व सामाजिक विधी व समारंभामध्यें मामाचें विशेष महत्त्व असतें.

(१) दंदासी, (२) दर्जी, (३) डोंब, (४) गंगदिकर, (५) ओक्कल, (६) गणिग, (७) गोल्ला, (८) हलिकार ओक्कलिग, (९) कोलेया, (१०) इदिगा, (११) म्हैसूरमधील जैन, (१२) जलारी, (१३) जोगी, (तेलगु) (१४) कप्पू (रेड्डी), (१५) किलेक्यता, (१६) कोमटी, (१७) खोंड, (१८) कोर्चा, (१९) कुंभार, (२०) कुरूब, (२१) मादिग, (२२) मारवान्, (२३) मोंडारू, (२४) मुकदोरा, (२५) सदस्, (२६) तिगल तोरेया, (२७) तोत्तियान, (२८) वसकल, (२९) उप्पर.

मातृकन्या परंपरा आज पुढील जातींत विशेष आढळून येते.

ईशान्य-(१) खासी, (२) गारो. नैऋत्य-(३) कादिर, (४) तोडा, (५) पुलय्यन किंवा चेरुमान, (६) परायन् किंवा मल्ल, (७) नायर.

## साम्यवादी समाजांतील कुटुंब अथवा पितापुत्रादि संबंध—

वर विवेचन केल्याप्रमाणें या विवाहसंस्थेस व कुटुंबपद्धतीस आरंभ विवाहसंस्कारापासून होतो; या गोष्टीस फक्त एक अपवाद आहे व तो म्हणजे रशियांतील सध्यांचा साम्यवादी समाज. सोव्हिएट रशियामध्यें विवाहाची नोंद करतात; परंतु कायद्यानें विवाह नोंदणें आवश्यक नाहीं. तेव्हां अशा बाबतींत विशिष्ट मुलाची बापावर जबाबदारी कशी सोंपवावयाची याकरितां तेथें असा नियम केला आहे कीं, मूल जन्मल्यानंतर विशिष्ट दिवसांच्या आंत त्याची नोंद झाली पाहिजे व त्या नोंदीच्या दाखल्यांत त्या मुलाच्या बापाचें नांव अवश्य असलें पाहिजे. याप्रमाणें एका मनुष्यावर त्या मुलाची जबाबदारी निश्चितपणें टाकतां येते; व त्या मनुष्यास त्या मुलाच्या पोषणाचा खर्च द्यावा लागतो; व त्याला ही जबाबदारी टाळतां येत नाहीं. त्यानें त्या स्त्रीच्याबरोबर एकत्र राहिलेंच पाहिजे असा नियम नाहीं. उलट विवाह नोंदल्याशिवायहि स्त्री आणि पुरुष एकत्र राहूं शकतात; आणि विवाहित स्त्री–पुरुषहि घटस्फोटाशिवाय वेगळे राहूं शकतात.

यामुळें असा समज होण्याचा संभव आहे कीं, रशियांतील मुलांची जोपासना योग्य प्रकारें होत नसेल; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. रशियामध्यें जरी केवळ इतर कुटुंबसंस्थांप्रमाणें बाप हा मुलाची सर्व प्रकारें काळजी घेत नसला व केवळ पैसे देण्यापुरताच बांधलेला असला तरी तेथें सरकारी बालसंस्था व शिशुसंस्था आहेत; व त्यांमध्यें मुलांची सर्व प्रकारें काळजी घेण्याची व्यवस्था केलेली असते; त्यामुळें तेथें मुलांचे आईबाप एकत्र राहात नसले तरी मुलांची वाढ व्यवस्थित रीतीनें होऊं शकते. मुलें ही राष्ट्राची संपत्ति आहे या गोष्टीची जाणीव त्यांस पूर्णपणें असून आईबापांनीं मुलांकडे दुर्लक्ष केलें तरी त्यांचें योग्य तऱ्हेनें

संगोपन होणें राष्ट्राच्या बलसंवर्धनाच्या दृष्टीनें आवश्यक असल्यामुळें, शासनसंस्थेनेंच ती जबाबदारी आपल्या अंगावर घेतली आहे व तेथील सरकार प्रत्यक्ष आईबापांवर या बाबतींत विसंबून राहात नाहीं. याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीचा साक्षात् संबंध राष्ट्राशीं जोडला जातो व वैयक्तिक संबंध त्या मानानें शिथिल होत जातो व त्यामुळें कुटुंबसंस्थेस फारसें महत्त्व राहात नाहीं. यासंबंधीं अधिक विवेचन पुढें केलें आहे.

**घटस्फोट–सुलभतेचा सामाजिक संस्थांवर परिणाम—**

अशाच रीतीनें ज्या समाजांत घटस्फोट मिळणें सुलभ असतें त्या समाजांत मुलांची काळजी घेणाऱ्या संस्था स्थापन होतात; व ज्या समाजांत घटस्फोट मिळणें फार कठीण असतें अशा समाजांत शिशु-संवर्धकसंस्था निर्माण होत नाहींत. अशा समाजांतील व्यक्ति त्या मानानें कुटुंबावर पूर्णपणें अवलंबून नसते. कारण अज्ञानपणींहि व्यक्तीची काळजी घेणाऱ्या सामाजिक संस्था कुटुंबाचें कांहीं अंशीं कार्य करूं शकतात व त्यामुळें अशा समाजांत कुटुंबाची सत्ता व्यक्तीवर मर्यादितच राहते.

भरतखंडामध्यें आपणांस असें दिसतें कीं, हिंदुसमाजापेक्षां मुसलमानी समाजांत घटस्फोट अधिक सुलभ रीतीनें मिळण्याची व्यवस्था आहे व त्याचा अवलंबहि कमीअधिक प्रमाणांत केला जातो; त्यामुळें आपणांस असें आढळून येतें कीं, हिंदुलोकांचीं अर्भकालयें व अनाथालयें कमी असून मुसलमानांचीं त्या मानानें अधिक आहेत व अशा गृहांतून अनाथ अथवा बेवारस मुलांची काळजी घेतली जाऊन समाजाचें व्यक्तिबल वाढविण्यांत येतें व त्याचा ऱ्हास होऊं दिला जात नाहीं.

प्रत्येक मुसलमानानें आपल्या कांहीं विशेष प्राप्तीचा पांचवा हिस्सा धर्मादायामध्यें खर्च केला पाहिजे अशी कुराणाची आज्ञा आहे, व अनाथांचें संरक्षण केलें पाहिजे असाहि आदेश आहे. त्यामुळें मुसलमानांत धार्मिकदृष्ट्या अशीं अनाथालयें काढणें हें पुण्यकृत्य समजलें जातें व त्याचा फायदा त्यांच्या समाजास मिळतो.

हिंदूंमध्यें घटस्फोट हा गौण समजला गेल्यामुळें अशा अनाथालयासारख्या संस्थांची आजपर्यंत फारशी वाढ होऊं शकली नाहीं. त्यामुळें हिंदुसमाजांतील व्यक्तीस कुटुंबाचाच आश्रय करून राहावें लागतें व त्यामुळें हिंदुसमाजांत कुटुंबसंस्थेस महत्त्व अधिक आहे.

**कुटुंबसंस्थेचें भवितव्य—**

याप्रमाणें कुटुंबसंस्था ही एक समाजांतील स्त्रीपुरुष अनेक बंधनांनीं एकत्र करणारी संस्था असून, खासगी मालमत्ता व उपजीविकेच्या साधनांचा ताबा यामुळें कुटुंबसंस्थेस महत्त्व प्राप्त होतें; व जेथें संरक्षणाकरितांहि दुसरी चांगलीशी संस्था नसते तेथें कुटुंबसंस्था सामर्थ्यवान् बनते. मुलांचें संरक्षण व संगोपन यांची आवश्यकता व विवाहसंस्थेवरील निर्बंध यामुळेंहि कुटुंबसंस्थेस महत्त्व येतें. नवीन युगांत विवाहावरील निर्बंध जरी दूर झाले आणि आईबापांवरील मुलांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी कमी होऊन ती शासनसंस्थेनें पूर्णपणें आपणांकडे घेतली तरी सुद्धां कुटुंबसंस्था ही जिवंत राहील, मात्र ती आईबाप व मुलें यांच्या परस्परांवरील प्रेमामुळेंच जिवंत राहूं शकेल; व त्याकरित कायदे किंवा मुलांचें सर्वस्वीं आईबापांवर अवलंबून राहणें यांची जरूरी राहणार नाहीं. कारण कुटुंबांतील व्यक्तींमध्यें जें एक प्रेमाचें व आपलेपणाचें बंधन निसर्गतःच उत्पन्न झालेलें असतें त्याची जागा दुसरे

कोणतेहि संबंध पूर्णपणें घेऊं शकत नाहींत व परस्परांबद्दल एका कुटुंबां-तील माणसांस जो जिव्हाळा वाटतो तो कोणत्याहि संस्थेंतील कितीहि निकटच्या संबंधामुळें उत्पन्न होऊं शकणार नाहीं. तसेंच जोंपर्यंत कुटुंबसंस्था बलवती व कार्यकर्ती असेल तोंपर्यंतच पितापुत्रांचे संबंध घनिष्ट व प्रेमळपणाचे राहतील. कुटुंबसंस्था दुर्बल होऊन विघटित झाल्यास पितापुत्रसंबंधहि दुरावत जाईल यांत शंका नाहीं. त्याप्रमाणेंच व्यवहारांतील अनेक गोष्टींचें शिक्षण, विशेषतः धर्म, नीति, स्वकीयां-वरील प्रेम, समाजांतील वागणूक यांसंबंधीं जें शिक्षण कुटुंबसंस्थेमार्फत मिळूं शकतें तें शिक्षण देण्याचें कार्य कोणतीहि आधुनिक शिक्षण-संस्था, मग ती कितीहि शास्त्रीय पायावर उभारलेली असो व ती कितीहि पद्धतशीर शिक्षण देत असो, कुटुंबसंस्थेसारखें सहज सुलभ पद्धतीनें व परिणामकारक रीतीनें देऊं शकणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाचा पाया या कुटुंबसंस्थेंत घातला जातो व त्यावरच पुढील सर्व शिक्षणाची इमारत बनावयाची असते. या दृष्टीनें प्रत्येक समा-जांत कुटुंब ही अत्यंत महत्त्वाची संस्था आहे व तिचें महत्त्व अबा-धित राहणार यांत शंका नाहीं.

या कुटुंबसंस्थेच्या अंगभूत असे एकत्र व विभक्त कुटुंब आणि ज्येष्ठा-यत्त दायपद्धति हे दोन महत्त्वाचे प्रश्न असून त्यांचाहि विचार पिता-पुत्रसंबंध निश्चित करण्याच्या कामीं महत्त्वाचा असल्यामुळें प्रथम त्या प्रश्नांचा विचार येथेंच करून नंतर पित्याचें व पुत्राचें कुटुंबांतील स्थान या प्रश्नाकडे वळूं.

## प्रकरण तिसरें

# एकत्र कुटुंबपद्धति व ज्येष्ठायत्त दायपद्धति

### कृषिप्रधान समाज व एकत्र कुटुंब—

कुटुंबसंस्थेच्या इतिहासाबरोबरच आपणां भारतीयांस विशेष परिचित व अगत्याचा विषय जो एकत्र कुटुंबपद्धति तिचाहि विचार आपणांस येथें केला पाहिजे. भारतीय समाज हा सामान्यतः भरतखंडांत स्थायिक झाला त्यावेळीं विशेषतः कृषिप्रधान व पशुपालनप्रवण असा समाज होता व 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ चाकरी' ही जी म्हण आपणांत आज रूढ झाली आहे तीवरून आपल्या समाजांत शेतीस किती महत्त्व होतें हें दिसून येतें. चातुर्वर्ण्य संस्थेमध्यें जरी विद्यासंवर्धन, स्वदेशरक्षण, कृषिवाणिज्य आणि सेवा असे चार धर्म चारी वर्णांचे यथाक्रम सांगितलेले होते तरी समाजांत सामान्यतः जो उच्च व ब्राह्मणवर्ण तो कृषिसंवर्धनावरच अवलंबून असलेला दिसून येतो. ब्राह्मणाचें तपोवन अथवा आश्रम हें शस्यविपुल व फलपुष्पान्वित वृक्षांनीं सुशोभित असलेलें असेंच वर्णन सर्वत्र आढळतें. या शेतीच्या उद्योगधंद्यास स्वतःच्या मालकीची जमीन असणें अवश्य असतें; व साधनेंहि बरींच लागतात. तसेंच पशुपालन हाहि धंदा शेतीच्या आनुषंगिक म्हणून चालवितां येतो; व भारतीय समाजांत ऋग्वेद कालापासूनहि पशु म्हणजे गाईबैलांचे कळप यांस विशेष महत्त्व दिलेलें असून तेंच त्यांचें मुख्य धन असे, याबद्दल ऋग्वेदांत अनेक उल्लेख आढळतात. यामुळेंच भारतीय कुल, गोत्र या संस्थांस महत्त्व आलें; व कृषिप्रधान समाजांत कुटुंबसंस्थेस विशेष महत्त्व प्राप्त होतें ही गोष्ट आपण

मागील प्रकरणांत पाहिलीच आहे. यामुळें भरतखंडांत एकत्र कुटुंब-पद्धति निर्माण झाली व ती अद्यापहि टिकून राहिली आहे. शेतीच्या धंद्यामध्यें जमीन व आउतें याप्रमाणेंच मनुष्यबलहि विशेष लागतें. यामुळें सामुदायिक रीतीनें शेती करणें हें विशेष फायदेशीर होतें. म्हणून कुटुंब ही एक सहकारी पद्धतीनें शेती करणारी संस्थाच तयार झाली होती; व जोंपर्यंत शेती हाच सर्व कुटुंबाचा मुख्य उपजीविकेचा धंदा होता तोंपर्यंत एकत्र कुटुंबांत राहणें प्रत्येक व्यक्तीच्या हिताचें असे; व कुटुंबांतून विभक्त होणें हें सामाजिक दृष्ट्याहि कमीपणाचें मानलें जाऊन आर्थिक दृष्ट्याहि हानिकारक वाटत असे.

## संपत्तीची विभागणी व ज्येष्ठ वारस—

याकरितां सामाजिक निर्बंध व कायदेहि एकत्र कुटुंबपद्धतीस पोषक असेच बनविण्यांत आले होते. एका कुटुंबाच्या मालकीची जमीन त्याच कुटुंबांत राहावी म्हणून पित्यास कुटुंबामध्यें प्राधान्य मिळून त्याच्या हातीं सर्व सत्ता देण्यांत आलेली असून आपल्या मागें ती कोणाच्या हातांत जावी हें सर्वस्वीं त्याच्याच मर्जीवर ठेविलेलें असे व त्याच्या पाठीमागून बहुधा वडील मुलगा कुटुंबाचा धनी होत असे. हा वारसाचा कायदा स्मृतिकालांत पुढें कसकसा बदलत गेला हें पुढील एका प्रकरणांत दाखविलें आहे. पाश्चात्य देशांतहि मोठमोठ्या घराण्यांमध्यें जेथें घराण्याची मालमत्ता मुख्यतः जमीनजुमला ही असते अशा ठिकाणीं ती सर्व मालमत्ता वडील मुलास मिळावी असा ज्येष्ठ वारसाचा कायदा अनेक देशांत प्रचलित असलेला आढळतो. या पद्धतीमुळें कुटुंबांतील संपत्तीची विभागणी न होतां ती एकत्र राहून त्या कुटुंबास स्थैर्य प्राप्त होतें व त्या कुटुंबाचें महत्त्व कायम राहतें.

कृषीप्रमाणेंच वाणिज्य वृत्तिहि भरतखंडांत याच पद्धतीनें चालू असे व कुटुंब ही एक समायिक पेढी असून सर्व कौटुंबिक पुरुष तिचे यथाप्रमाण भागीदार असत. यामुळें कुटुंबांतील भांडवल विभागलें न जातां एकत्र राहून मोठमोठे व्यवहार करतां येत असत.

**समायिक भांडवल व आनुवंशिकता—**

विशेषत: जे धंदे भांडवलाच्या साहाय्यानें चालणारे असतात त्या धंद्यांसहि ही एकत्र कुटुंबपद्धति आजच्या समायिक भांडवलाच्या कंपनीप्रमाणें उपयुक्त ठरत असे. प्रत्येक व्यक्तीचा धंद्यांतील भांडवलाचा हिस्सा हा कुटुंबांतील वारसाहक्काइतकाच असल्यामुळें व त्या मानानेंच त्याचें कुटुंबांतील स्थान असल्यामुळें त्यास त्या प्रमाणांत अधिकार व मान प्राप्त होत असे; व वयांत आल्यावरोबर कोणता धंदा करावयाचा हा प्रश्न अशा व्यक्तीपुढें उभा राहत नसे.

ज्या कुटुंबाकडे विशेष सत्ता अथवा अधिकार असतो. उदाहरणार्थ, राजे, संस्थानिक, सरदार वगैरे अशा कुटुंबांतहि ज्येष्ठ वारसापद्धति पूर्वीपासून आतांपर्यंत चालत आली आहे व ती त्या संस्था अस्तित्वांत ठेवण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची मानण्यांत आलेली आहे. राज्याचा वारसा पुरुषसंततीकडेच राहावा व स्त्रीसंततीकडे मुळींच जाऊं नये अशा तऱ्हेचा कायदा 'सॅलिक लॉ' या नांवानें युरोप खंडांत दीर्घकाल प्रचलित होता. त्याच्याहि मुळाशीं हीच कल्पना होती. भरतखंडांतहि राज्याचा वारसा फक्त पुरुषवंशजाकडे जावा अशीच प्रथा आहे व याकरितां दत्तकाचीहि तजवीज करण्यांत आली आहे.

**एकत्र कुटुंबपद्धतीचे लाभ—**

अशा एकत्र कुटुंबपद्धतीपासून कांहीं फायदेहि समाजास होत असतात. त्यांत महत्त्वाचा फायदा म्हणजे कुटुंबाच्या संपत्तीची विभागणी

न होतां ती दीर्घकालपर्यंत टिकून राहूं शकते. यामुळें त्या कुटुंबाचें समाजांतील महत्त्वाचें स्थान कायम राहतें. कुटुंबाचा धंदा सहकारी पद्धतीनें करण्यांत आल्यामुळें फायदेशीर होतो. तसेंच आनुवंशिक रीतीनें तोच धंदा कुटुंबांत करीत राहिल्यानें त्या धंद्याचें शिक्षण मुलास सहजच मिळून पूर्वींच्या सर्व अनुभवाचा फायदा पुढील पिढीस मिळतो व कुटुंबांतील बुद्धिमान् व्यक्तीस त्यांत वेळोवेळीं सुधारणा करण्यास अवसर मिळतो. प्राचीन काळीं अशा मोठ्या कुटुंबास संरक्षण व साहचर्य याचाहि फायदा मिळूं शकत असे. समायिक पद्धतीनें धंदा केल्यामुळें लागणारें भांडवल कुटुंबांतच उत्पन्न होऊन तें वाढीस लागत असे. तसेंच धंद्यास लागणाऱ्या साधनांतहि वरचेवर भर पडत असे; आणि सुधारणा करण्यासहि वाव मिळत असे. अशा कुटुंबांत एक-प्रकारची शिस्त राखली जात असून तीमुळें कुटुंबांतील मंडळींचे स्वभाव बनण्याच्या कामीं तिचा उपयोग होत असे, व कोणाहि व्यक्तीच्या स्वैर वर्तनावर आळा बसत असे. कुटुंबाच्या कर्त्यासहि कुटुंबाची मालमत्ता विकण्यास मनाई करण्याचा अधिकार कुटुंबांतील मुलांससुद्धां असे या गोष्टीवरून सर्व मालमत्ता एकत्र ठेवण्याकडे या पद्धतीचा किती कटाक्ष होता हें दिसून येतें.

तसेंच जे धंदे हस्तकौशल्यावर अवलंबून असत अशा धंद्यांमध्यें आनुवंशिकतेचा उपयोग पुष्कळच प्रमाणावर होत असे व अशा धंद्याचें शिक्षण मुलांस बालपणापासून व घरींच मिळण्याची तजवीज होत असून तें सप्रयोग मिळत असे. उदाहरणार्थ, सुवर्णकाराचा धंदा हा अत्यंत कौशल्यपूर्ण असून आपल्याकडे अनेक कुशल सुवर्णकार पिढ्यानुपिढ्या झालेले आढळतात; परंतु या धंद्याची एकहि शाळा कोठें अस्तित्वांत असल्याचें दिसत नाहीं. चित्रकार व संगीत विद्येचें

शिक्षण देणाऱ्या आज जरी बऱ्याचशा शाळा दिसत असल्या तरी हे धंदे बऱ्याचशा घराण्यांत आनुवंशिक असलेले आजहि दिसून येतात.

पाश्चात्य देशांत धंदेवाईक लोकांचे जे संघ स्थापन होत त्यांमध्यें उमेदवार पद्धतीनें शिक्षण देण्याची पद्धति असे व हे उमेदवार त्याच धंद्यांतील लोकांच्या मुलांतून निवडण्याची दक्षता घेण्यांत येत असे यावरूनहि वरील गोष्टीसच पुष्टि मिळते.

**ज्येष्ठायत्तपद्धतीचे फायदे—**

एकत्र कुटुंबपद्धतीच्या आनुषंगिक जी ज्येष्ठ वारस पद्धति तिच्यापासूनहि समाजास कांहीं बाबतींत विशेष फायदा झाल्याचें दिसून येतें. या पद्धतीमुळें कुटुंबाची संपत्ति व वैभव आणि महत्त्व हीं कायम राहात; त्याप्रमाणेंच कुटुंबांतील कनिष्ठ मुलांस या संपत्तीपैकीं विभाग मिळावयाचा नाहीं ही गोष्ट प्रथमपासूनच स्पष्ट असल्यामुळें त्यांस आपल्या पुढील आयुष्यक्रमास कोणतें वळण लावावें याचा प्रथमपासूनच विचार करावा लागत असे व त्यांची पूर्वतयारी करून देण्याची नैतिक जबाबदारी वडील भावावर असे. इंग्लंड देशांतील निरनिराळ्या क्षेत्रांतील बरेचसे धाडशी व कर्तबगार लोक हे अशा तऱ्हेचे मोठ्या घराण्यांतील कनिष्ठ पुत्र असल्याचें दिसून येतें. कुटुंबांतील संपत्ति एकत्र असल्यामुळें अशा लहान भावांचें शिक्षण व त्यांच्या आयुष्यक्रमास लागणारी पूर्व तयारी करण्याचें पूर्ण सामर्थ्य त्या कुटुंबाच्या ठिकाणीं राहात असे व लहान भावांच्या बुद्धिमत्तेस व कर्तबगारीस पूर्ण अवसर मिळूं शके. याप्रमाणें एकीकडे मोठमोठीं घराणीं पूर्ववैभवांत कायम राहून नवीन साहसी व कर्तबगार माणसें तयार करण्याचें कार्यहि या पद्धतीनें साधत असे.

## या पद्धतींतील दोष—

याप्रमाणें एकत्र कुटुंबपद्धति किंवा ज्येष्ठ वारसापद्धति यांमध्यें जरी कांहीं गुण असले तरी त्यांमध्यें कांहीं दोषहि आढळून येतात. उदाहरणार्थ, एकत्र कुटुंबपद्धतीमध्यें कर्त्याच्या हातांत सर्व सत्ता असल्यामुळें तो जर पूर्णपणें लायक व कर्तव्यदक्ष असेल तर सर्व गोष्टी व्यवस्थितपणें चालू राहतील; परंतु एखादा पुरुष नालायक निघाल्यास सर्व कुटुंबाचा नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. अशा कुटुंबांतील कर्त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींस पूर्णपणें त्याच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें आपल्या कर्तबगारीस पूर्ण वाव देणें अशक्य होतें. यामुळें अशा व्यक्तींच्या बुद्धिमत्तेचा पूर्ण फायदा त्या व्यक्तीस स्वतःहि घेतां येत नाहीं व कुटुंबासहि मिळूं शकत नाहीं. उलट कुटुंबांतील मालमत्तेवर उत्पन्न होणारा हक्क वारशानें प्राप्त होणारा असल्यामुळें व सर्व जबाबदारी कुटुंबाच्या कर्त्यावर पडत असल्यामुळें कुटुंबांतील दुय्यम दर्जाचे लोक आळशी व अपात्र निघण्याचाहि संभव बराच असतो; व एकाच्याच श्रमावर अनेक लोक ऐदीपणाचा आयुष्यक्रम आचरतांना आढळून येतात व कुटुंबाच्या अब्रूकरितां कर्त्या मनुष्यास त्यांच्या दुर्गुणावरहि पांघरूण घालावें लागतें. या पद्धतींत व्यक्तिमत्त्वास मुळींच वाव नसून अनेक व्यक्तींचें स्वातंत्र्य मर्यादित होतें व त्यामुळें अनेक व्यक्तींच्या अंगीं असलेल्या गुणांचा पूर्णपणें विकास होणें अशक्य होतें.

ज्येष्ठ वारसापद्धतींतहि ज्येष्ठ बंधु जोंपर्यंत कर्तव्यदक्ष असेल व आपली जबाबदारी ओळखून कनिष्ठ बंधूंस आपल्या योग्यतेप्रमाणें शिक्षणादि साधनांनीं कार्यक्षम बनविण्याचें कार्य योग्य प्रकारें पार पाडीत असेल तोंपर्यंत ती पद्धति उपयुक्त ठरेल; परंतु असा ज्येष्ठ

बंधु नालायक निघाल्यास त्याचे परिणाम सर्व कुटुंबास भोगावे लागतील व एकामागून एक अनेक पिढ्या सर्व ज्येष्ठ बंधु योग्य व लायक निघणें अशक्य आहे. त्यामुळें या परंपरेंत मधून मधून खंड पडणें स्वाभाविक असल्यामुळें ही पद्धति त्याज्य ठरविण्यांत आलेली आहे. मात्र शेतीसारख्या कांहीं विशिष्ट धंद्यांमध्यें विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जमिनीची व मालमत्तेची विभागणी होणें आर्थिक दृष्ट्या सर्वांसच नुकसानकारक असल्यामुळें अशा ठिकाणींच फक्त ज्येष्ठ वारसापद्धतीचा कांहीं मर्यादित प्रमाणापर्यंत अवलंब करणें उपयुक्त ठरेल.

हल्लींच्या लोकशाहीच्या काळांत राजसत्ता व उमरावी सत्ता या यापुढें फार दिवस टिकून राहणें शक्य नसल्यामुळें त्यांच्या बाबतींतील ज्येष्ठ वारसापद्धति नष्ट होण्याच्या मार्गास लागली आहे.

**व्यक्तिमत्त्वाचा विकास—**

दिवसेंदिवस व्यक्तिमत्त्वास विशेष महत्त्व येत असल्यामुळें व प्रत्येक व्यक्ति ही राष्ट्राचा एक घटक असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं असलेल्या गुणांचा पूर्ण विकास करून घेणें हें राष्ट्रास फायदेशीर आहे. याकरितां प्रत्येक व्यक्तीस कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे व त्यानें कोणता व्यवसाय करणें राष्ट्रास हितकारक होईल हें ठरविणें त्याच्या पित्याचें अथवा कुटुंबांतील ज्येष्ठ व्यक्तीचें कर्तव्य नसून त्याच्या मनाच्या कलाप्रमाणें त्यास स्वातंत्र्य देणें हेंच त्यांचें कर्तव्य आहे. या गोष्टी दिवसेंदिवस तज्ज्ञांच्या साहाय्यानें होणें अवश्य आहे व मुलांचें शिक्षण ही बाब ज्याप्रमाणें आज अमेरिकेमध्यें राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची व राष्ट्राचें कर्तव्य म्हणून समजली जाते, व त्याकरितां विशिष्ट मर्यादेपर्यंत सर्व शिक्षण मोफत पुरविलें जातें तशी स्थिति सर्वत्र दिसून येऊं लागली म्हणजे एकत्र कुटुंब-

पद्धति किंवा ज्येष्ठ वारसापद्धति या पूर्णपणें नष्ट होऊन मुलें ही एक राष्ट्रीय संपत्ति असून तिचें संगोपन व संवर्धन राष्ट्रीय दृष्ट्या केलें जाऊन प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या स्वाभाविक गुणांस पूर्ण अवसर मिळून त्यास राष्ट्राचे कर्तबगार नागरिक बनविण्याची क्रिया प्रत्येक राष्ट्रामध्यें चालू झालेली दृष्टीस पडेल व याप्रमाणें व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विजय झालेला दृष्टीस पडेल.

याप्रमाणें मानवी समाजांतील महत्त्वाचा घटक जें कुटुंब त्याचा आतांपर्यंत विचार करण्यांत आला व तदनुषंगिक समायिक कुटुंबपद्धति व ज्येष्ठायत्त दायपद्धति या प्रश्नांचाहि उहापोह थोडक्यांत करण्यांत आला. आतां या कुटुंबांतील महत्त्वाचे घटक जे पिता व पुत्र त्यांच्याकडे आपण लक्ष्य देऊं.

## प्रकरण चवथें

# पितापुत्रादि कुटुंब

### पितापुत्रसंबंध—

मागील एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मनुष्यप्राणी व कांहीं पक्षी आणि सस्तन प्राणी यांच्यामध्यें लहान मुलास मातेनें स्तनपान वगैरे देऊन पोषण करावें लागतें, त्यामुळें एक प्रकारचें साद्दश्य दिसून येतें. मनुष्याप्रमाणेंच पक्षी व सस्तन प्राणी यांतहि पिता आपल्या पिलांचें रक्षण करतांना आढळतो, व पिलें त्याच्या हांकेस साद देतात. याच संबंधाची वाढ मनुष्यजातींत पूर्णत्वास पोंचलेली आढळते. अशा तऱ्हेनें मातापित्याकडून अपत्यांचें उदरपोषण व संरक्षण आवश्यक असण्याच्या क्रियेमुळें कुटुंब, कायदा, समाजव्यवस्था व आर्थिक संबंध या बाबींवर या व्यवस्थेचा परिणाम होतो. तसेंच धर्म, नीति व कला यांवरहि हा परिणाम झालेला आढळून येतो.

ख्रिस्ती लोक पितापुत्रसंबंध हा ईश्वराच्या पहिल्या दहा आज्ञांमध्येंच दिसत असल्याचें मानतात; व मातृहृदय हें वात्सल्याचें चिन्ह मानतात. ख्रिस्ती संप्रदायाची उभारणी ईश्वर व ख्रिस्त यांचा पितापुत्र असा संबंध होता या तत्त्वावर झालेली आहे. ख्रिस्ती लोकांच्या त्रयीमध्यें पिता व पुत्र यांस प्राधान्य असून तिसरा पवित्र आत्मा हा मानण्यांत आला आहे. आपल्याकडेहि शिव, शक्ति व कुमार या आद्यशक्ति मानण्यांत येतात.

तसेंच परमेश्वरास जगत्पिता मानण्यांत येतें.* यावरून पितापुत्राचें नातें हें किती श्रेष्ठ दर्ज्याचें आहे तें दिसून येतें.

कुलदेवतेची कल्पनाहि या अज्ञानावस्थेंत संरक्षणाची आवश्यकता भासल्यामुळेंच उत्पन्न झालेली आहे. पितृपूजेचा उगमहि आपणांस या कल्पनेंतच आढळून येईल. याच कल्पनेमुळें देवकें व भूतपिशाच्चादिकां-वर विश्वास ठेवण्याची प्रथा उत्पन्न झालेली आहे. या सर्व समजु-तींचा परिणाम आपणांस धर्म व कला यांच्यावर झालेला आढळतो व त्यामुळेंच धर्मशास्त्र, समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांचा उगम झालेला आहे.

**या संबंधावरच इतर सर्व संबंध आधारलेले आहेत—**

सर्व संस्कृतीचा पाया या पितापुत्रादि संबंध व आप्तसंबंध यांमध्यें आहे. या संबंधामुळेंच गृहव्यवस्थेचा आरंभ होत असून प्रजननशास्त्र व कौटुंबिक व्यवस्थेचें तंत्र निर्माण झालें आहे.

सर्व आप्तसंबंधामध्यें पितापुत्रसंबंध हा विशेष असून त्यांत व इतर आप्तसंबंधांत फार फरक आहे. आपणांस कुटुंब म्हटलें म्हणजे पिता, माता व त्यांचीं मुलें येवढा समूह प्रथम नजरेसमोर येतो; व हेंच खरें मूळ कुटुंब आहे; व अशा तऱ्हेचें कुटुंब सर्व सामाजिक अवस्थांमध्यें आढळून येतें. अत्यंत रानटी अवस्थेपासून अत्यंत सुसंस्कृत असा कोणताहि समाज आपण घेतला तरी त्यामध्यें मूळ घटक, म्हणून हें आदर्श कुटुंब असतें. हें आपण मागील एका प्रकरणांत सविस्तर पाहिलेंच आहे. तसेंच कोणत्याहि सुसंस्कृत किंवा असंस्कृत

* वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ॥ कालिदास–रघुवंश.

समाजांतील दैनिक आयुष्यक्रम पाहिला तर रोजचें एकत्र जेवण करणें, स्त्रीपुरुषांनीं घरांतील व बाहेरील कामें करणें व रात्रीं सर्वांनीं विश्रांति घेणें व दुसरा दिवस उजाडला कीं, पुनः याच क्रमानें कामाला लागणें हा दिसून येतो. या दृष्टीनें वैय्यक्तिक कुटुंब या समूहास फार महत्त्व आहे.

आपण ज्याप्रमाणें मनु हा मानवजातीचा मूळ पुरुष मानतों किंवा यम व यमी हें प्रथम स्त्रीपुरुष युग्म ऋग्वेदांत उल्लेखित आहे त्याप्रमाणें ख्रिस्ती संस्कृतीच्या पायाशीं आदाम आणि ईव्ह यांचें कुटुंब आहे; व बायबलमध्येंहि पितृसत्ताक कुटुंबाबद्दल वर्णन आहे. अवेस्तामध्यें यिम हा आद्य पुरुष मानण्यांत आला आहे. गोत्र, टोळी किंवा जमात हे जरी समाजाचे घटक घेतले तरी त्यांत मूळ घटक वैय्यक्तिक कुटुंब हेंच असतें व त्याचा पाया व्यक्तिशः विवाह हा आहे. त्यामुळें विवाहास सर्व समाजांत महत्त्व दिलेलें आढळतें.

**कुटुंबांत पित्याचें महत्त्व—**

अशा तऱ्हेच्या कुटुंबांत पिता हा मुख्य असून त्याच्या हातीं सर्व सत्ता असे. कुटुंबांत पिता ही सर्वांत महत्त्वाची व्यक्ति असून कुटुंबांतील सर्व व्यक्ती व मालमत्ता यांवर त्याची हुकमत पूर्णपणें चालत असे व तो आपली समाजांतील पदवी, संपत्ति व हक्क आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या कुटुंबांतील पुढें मुख्य होणाऱ्या व्यक्तीच्या स्वाधीन करून जात असे.

याप्रमाणें ही परंपरा अव्याहत चालत असे व ही परंपरा न मोडण्याची काळजी बहुतेक समाजांत घेतली जात असे.

तथापि पितृसत्ताक पद्धति हा एकच समाजाचा पाया नव्हता. याच्याच बरोबर मातृकन्यापरंपराहि कांहीं समाजांत रूढ असलेली आपण पाहिली

आहे. अशा समाजांत स्त्रीचा भाऊ हा वरांतील मुख्य व्यक्ति असून बहिणीचीं मुलें वारस होतात. पौराणिक काळांत प्रमिलेचें स्त्रीराज्य प्रसिद्ध होतें. आजहि भरतखंडांत मलबारमध्यें अद्यापहि ही पद्धत रूढ आहे व तेथें मरुमकत्तयम् हा स्वतंत्र वारसाचा कायदा प्रचलित आहे या गोष्टीचें विवेचन पूर्वीं केलेलेंच आहे.

पुरुष व स्त्री या समाजाच्या दोन घटकांमध्यें पुरुष हा अधिक भ्रमणशील वृत्तीचा असून स्त्री ही अधिक स्थायी वृत्तीची असते व विशेषतः अपत्यजन्मप्रसंगीं तीस कांहीं काल तरी स्थायिक होऊन रहावें लागतें. यामुळें प्राथमिक अवस्थेमध्यें स्त्री ही प्रथम घर करून राहूं लागली असावी व पुरुष हा तिच्या अनुषंगानें स्थायिक झाला असावा. यामुळें मातृकन्यापरंपरा ही अधिक प्राथमिक व पुराणव्यवस्था असून पुढें पित्यानें आपली सत्ता सर्व मालमत्तेवर स्थापन करून पितापुत्रपरंपरा रूढ केली असावी. परंतु जगामध्यें तीच अधिक संवर्धित होऊन श्रेष्ठत्व पावली.

याप्रमाणें वंशगणना ही पिता किंवा माता या दोहोंमार्फत करण्याची पद्धति असली तरी पहिलीस विशेष महत्त्व आहे. आपल्याकडे विवाहांत सापिंड्याचें महत्त्व फार मानलेलें आहे व तें

**‘ पञ्चमात्सप्तमात् ऊर्ध्वं मातृतः पितृतस्तथा ॥ ’**

म्हणजे मातेकडून पांच पिढ्या व पित्याकडून सात पिढ्या पाहण्यांत येतें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत पित्याकडून जितकें पाहिलें जातें तितकें मातेकडून पाहिलें जात नाहीं. याप्रमाणें पितृवंशपरंपरेस हळूहळू अधिक महत्त्व येत गेलें यामुळें पितापुत्रसंबंधास विशेष महत्त्व साहाजिकच प्राप्त झालें आहे. सुसंस्कृत समाजांत पितापुत्रसंबंध निश्चित असतो. परंतु प्राथमिक

अवस्थेंत असलेल्या किंवा असंस्कृत स्थितींतील समाजांत पितृसंबंध दर्शविणारा एक संस्कार करण्यांत येतो. यावरून अशा समाजांताहि पितापुत्र-संबंधास किती महत्त्व दिलें जातें हें दिसून येतें.

याप्रमाणें पितापुत्रसंबंधाचें महत्त्व वर्णन केल्यानंतर निरानिराळ्या समाजांमध्यें हे संबंध कसे होते व त्यांचा विकास जगांतील निरनिराळ्या समाजांत कसकसा होत गेला हें आपणांस पाहिलें पाहिजे. त्याकरितां आपण निरनिराळ्या समाजांतील या संबंधाचें अवलोकन करूं. त्यांत प्रथम आपला भारतीय समाज याकडेच आपणांस विशेष लक्ष्य देणें आवश्यक आहे.

## प्रकरण पांचवें

# भारतीय समाजांत पितापुत्रांचें स्थान

### भारतीय कुटुंब—

मागील एका प्रकरणांत सामान्यतः कुटुंबपद्धतीचा उगम कसा होतो व तिचा विकास निरनिराळ्या समाजाच्या अवस्थांमध्यें कसकसा होत जातो हें आपण पाहिलें व जगांतील निरनिराळ्या सामाजिक व सांस्कृतिक अवस्थांतील समाजांमध्यें कुटुंबसंस्था कोणत्या अवस्थेंत असते याचेंहि निरीक्षण केलें व कुटुंबांत पिता व पुत्र यांचें महत्त्व काय हेंहि पाहिलें. आतां आपणांस विशेष जवळचा व आपल्या परंपरेस मूलभूत असा जो वैदिक आर्यांचा समाज त्याकडे आपणांस विशेष आपुलकीच्या नात्यामुळें अधिक सूक्ष्मपणें पाहिलें पाहिजे व त्या समाजांत कुटुंबपद्धति व पितापुत्रसंबंध कसे होते याचें निरीक्षण केलें पाहिजे.

सामान्यतः आर्यमानववंश व त्यापासून निघालेले निरनिराळे समाज यांची घटना जगामध्यें विशेष महत्त्वाची व आदर्शभूत मानली जाते व भरतखंडामध्यें या समाजाची परंपरा फार दीर्घकालपर्यंत अव्याहत टिकून राहिली आहे व जरी परिस्थितीनुसार तीमध्यें थोडा फार बदल होत आला असला तरी अद्यापहि अनेक परंपरागत कल्पना व समजुती ज्या दीर्घकालापर्यंत या समाजामध्यें दृढमूल होऊन बसल्या होत्या त्यांमध्यें आमूलाग्र असा फरक पडला नसल्यामुळें बऱ्याच परंपरागत कल्पनांचे अवशेष आजहि आपणांस आपल्या समाजांत पहावयास सांपडतात. याकरितां या समाजाचें विशेषत्वानें अवलोकन करणें अवश्य आहे.

वेदकालापासून आपल्या समाजांत पितृसत्ताक पद्धतीचें कुटुंबच अस्तित्वांत आहे तेव्हां अशा पितृसत्ताक पद्धतीच्या कुटुंबांत पितापुत्र-संबंध कसे असत हें आपण पाहूं.

### वेदकालीन समाजांतील पितापुत्र—

पिता व पुत्र हे शब्द संस्कृत भाषेंत ऋग्वेदकालापासून आढळून येतात. पिता हा शब्द ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आला आहे, व त्याचा अर्थ निव्वळ मुलास जन्म देणारा असा नसून मुलाचें रक्षण करणारा असा आहे व तोच व्युत्पत्तिदृष्ट्या बरोबर दिसतो. ऋग्वेदांत जेथें जेथें पिता शब्द आढळतो तेथें तेथें त्याच्या ठिकाणीं प्रेमळपणा व उपकारकता हे गुण असल्याचें दिसून येतें. कांहीं ठिकाणीं अग्नीला पिता म्हणून संबोधिलें असून इन्द्रास पित्यापेक्षांहि प्रिय असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं पिता आपल्या मुलास मांडीवर बसवितो व मुलगा त्याचें लक्ष्य आपणांकडे वेधावें म्हणून त्याच्या वस्त्राचा पदर ओढीत आहे असेंहि वर्णन आढळतें.* मुलास संकटकाळीं बापाचें सहाय्य लागत असे असेंहि वर्णन आढळतें. तसेंच एका ठिकाणीं मुलगा बापाचें आनंदानें स्वागत करीत आहे असेंहि वर्णन आढळतें.

### पित्याची पुत्रावरील सत्ता—

ऋग्वेदामध्यें बापाची सत्ता मुलावर जवळ जवळ पूर्णपणें असावी असें दिसतें. एका ठिकाणीं द्यूत खेळल्याबद्दल बापानें मुलास शिक्षा

---

* पितुर्नपुत्रः सिचमा रभेत इन्द्र स्वादिष्टया गिराशचीवः।

मुलानें बापाचा पदर धरावा त्याप्रमाणें मी अत्यन्त मधुर स्तुती करून तुझा पदर धरीत आहें ( ऋ. ३. ५३, २ ).

केल्याचें उदाहरण आहे. व ऋज्राश्व याचे तर त्याच्या बापानें डोळे काढले असें वर्णन आढळतें.* मुलानें अथवा मुलीनें कोणाशीं विवाह करावा या गोष्टीस बापाची संमति अवश्य असे व त्यांस आपल्या मर्जीविरुद्ध असलेलें लग्न मोडतां येत असे. तथापि पिता वृद्ध झाल्या-वर त्याला सर्व मालमत्तेची वांटणी आपल्या मुलांमध्यें करून देऊन मुलांमध्येंच रहावें लागत असे व सुनेकडे घराची मालकी जात असे. 'चार दिवस सासूचे व चार दिवस सुनेचे' या म्हणींत ही स्थिति पूर्णपणें व्यक्त होत आहे. तथापि सामान्यतः मुलगा बापाच्या पूर्णपणें आज्ञेंत वागत असे. याबद्दल सूत्रग्रंथांत नियम दिलेले आहेत.

**पुत्रविक्रयाचा पित्यास अधिकार—**

ऐतरेय ब्राह्मणांत अजीगर्तानें शुनःशेपास विकत दिल्याबद्दलची गोष्ट प्रसिद्ध आहे. यावरून बापाची मुलावर पूर्ण सत्ता असल्याचें आढळतें.

वासिष्ठानें तर या बाबतींत स्पष्टच म्हटलें आहे कीं—

**शुक्रशोणितसंभवः पुरुषो मातापितृनिमित्तकस्तस्य**
**प्रदानविक्रयपरित्यागेषु मातापितरौ प्रभवतः ।**

—वसिष्ठस्मृति ( १५.२ )

---

* शतं मेषान्वृक्ये चक्षदानमृज्राश्वं तं पितान्धं चकार ।
तस्मा अक्षी नासत्या विचक्ष आधत्तं दस्रा भिषजावनर्वन् ॥

ऋज्राश्वानें शंभर मेंढे लांडगीकरितां खाण्यासाठीं कापले तेव्हां त्याला त्याच्या पित्यानें अंध केलें. त्या वेळीं हे पराक्रमी नासत्य, तुम्ही त्याला पाहण्यासाठीं उत्तम डोळे दिलेत. ( ऋ. १.११६,१६ ).

पुत्र हा मातापित्यांपासून शुक्रशोणितामुळें उत्पन्न झालेला असतो. त्याला दान देण्यास, विक्रय करण्यास अथवा टाकून देण्यास त्यांस पूर्ण अधिकार आहे. मात्र त्यानें एकच पुत्र असला तर तो देऊं नये असा जो निर्बंध घातला होता तो मात्र अर्थवाद म्हणून पुढें टिकून राहिला नाहीं.

**न त्वेकं पुत्रं दद्यात्प्रतिगृह्णीयाद्वा । सहिसंतानाय पूर्वेषाम् ।**

—वसिष्ठस्मृति

शौनकानेंहि

**'नैकपुत्रेण कर्तव्यं पुत्रदानं कदाचन ॥'**

असा एकच पुत्र दत्तक देण्यासंबंधीं निषेध केला आहे. पण आज तो व्यवहारांत राहिला नाहीं.

**औरस पुत्राचे अभावीं दत्तक पुत्र—**

औरस संतति नसेल तेव्हां दत्तक घेण्याची चाल होती, परंतु असा दत्तक मुलगा विशेषतः विशेष गुणांनीं युक्त असेल तेव्हां घेत असत असें दिसतें व ऋग्वेदांत तर दत्तक घेण्याच्या चालीचा निषेध केला आहे व दुसऱ्याचा मुलगा आपला होऊं शकत नाहीं असें म्हटलें आहे.* एखाद्यास मुलगा नसून मुलगी असेल तर तिचा मुलगा दत्तक

---

*** परिषद्यं ह्यरणस्य रेक्णो नित्यस्य रायः पतयः स्याम ।**
**न शेषो अग्ने अन्यजातमस्त्यचेतनास्य मा पथो विदुक्षः ॥**

स्वतः संपादन केलेली संपत्ति पुरी पडते म्हणून आम्हांस स्वसंपादित धनाचे मालक कर. हे अग्ने, दुसऱ्याचा मुलगा आपला होत नाहीं म्हणून अडाणी लोकांचे पथ जाणण्याची वेळ आम्हांस येऊं नये ( ऋ. ७·४, ७ ).

घेतां येत असे. याकरितांच एखाद्या मुलीस भाऊ नसेल तर तिच्या लग्नाची अडचण पडत असे. कारण तिचा मुलगा तिचे बापाकडे जाण्याचा संभव असे. अशा तऱ्हेच्या मुलीस पुत्रिका म्हणत व ती देतांनाच तिचा वंश पित्याकडे राहील अशी समजूत असे.

## कौटुंबिक धन व त्यावरील सत्ता—

साधारणतः समाजामध्यें एकत्र कुटुंबपद्धति असून कुटुंबावर पित्याची सत्ता पूर्णपणें चालत असे व सर्व मालमत्ता कुटुंबाच्या मालकीची असे. यामुळें एखादा बाप जर कौटुंबिक मालकीची जमीन विकूं लागला तर त्यास प्रतिबंध करण्याचा मुलास हक्क असे.

## पुत्र व सूनु—

स्वतःच्या मुलाला पुत्र किंवा सूनु असे शब्द ऋग्वेदामध्यें लावलेले आढळतात. पु नांवाच्या नरकापासून जो रक्षण करतो तो पुत्र अशी जी पुत्र शब्दाची व्युत्पत्ति मनूनें केलेली आढळते ती जरी ग्राह्य धरली तरी बहुधा या शब्दाचा मूळचा अर्थ केवळ लहान असा असावा. पुत्रक हा शब्द आपणांहून कोणाहि लहान माणसाला हांक मारतांना योजीत असत. प्रत्येक मनुष्याला आपणांस पुत्र व्हावा अशी उत्कट इच्छा असे व त्याप्रमाणें परमेश्वरास प्रार्थना केल्याचीं उदाहरणें अनेक ठिकाणीं आढळतात.

प्राचीन आर्य लोकांत पुत्र शब्दापेक्षां सूनु हा शब्द अधिक रूढ असावा असें वाटतें. कारण संस्कृत पुत्र शब्दाशीं सदृश असे पुत्र-वाचक शब्द इतर इंडोयुरोपीय भाषांत फारसे आढळत नाहींत. उलट सूनु या शब्दाशीं सदृश असे शब्द इतर इंडोयुरोपीय भाषांत विशेषत्वें-

करून आढळतात. उदा. संस्कृत–सूनु; झेंद्–हूनु; गॉथिक–सूनुस्; प्राचीन सॅक्सन–सिनु; इंग्लिश–सन. पुत्र शब्दाशीं सदृश शब्द फक्त संस्कृत–पुत्र; झेंद्–पुथ्र; ऑस्क–पुक्लो एवढेच आढळतात. असो.

**स्मृतिकालीन पुत्रमहत्त्व—**

मनुस्मृतीमध्यें पति हाच भार्येच्या ठिकाणीं पुत्ररूपानें जन्म घेतो असें म्हटलें आहे:

**" पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वात्वेह जायते ।**
**जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः "*** ( ९·८ )

हीच गोष्ट

**" अङ्गादङ्गात् संभवसि हृदयादभिजायसे ।**
**आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदश्शतम् "** ॥†

या श्रुतीमध्यें व्यक्त केली आहे. बह्वृच ब्राह्मणांत:

**" पतिर्भार्यां प्रविशति गर्भो भूत्वेह मातरम् ॥**
**तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते ॥ "**‡

---

* पति हाच भार्येच्या ठिकाणीं प्रवेश करून गर्भ होऊन पुनः जन्म घेतो व तो तिच्या ठिकाणीं पुनः जन्म घेतो. म्हणूनच तिला ज्याया असें म्हणण्यांत येतें.

† अंगाअंगापासून संभव होऊन हृदयापासून उत्पन्न होतोस, तो पुत्र-नामक आत्माच आहेस असा तूं शंभर वर्षें जिवंत राहा.

‡ पति हाच भार्येच्या ठिकाणीं प्रवेश करतो व मातेच्या ठिकाणीं गर्भ-रूपानें राहतो. तिच्या ठिकाणीं पुनः नव्यानें उत्पन्न होऊन दहाव्या महि-न्यांत जन्मतो ( ऐ. ब्रा. ).

असें म्हणून पति हाच पत्नीच्या ठिकाणीं पुत्ररूपानें जन्म घेतो ही कल्पना व्यक्त केली आहे.§ यावरून पुत्रास पित्याइतकेंच महत्त्व होतें ही गोष्ट स्पष्ट होते.

मनुस्मृतीमध्यें पहिल्या पुत्राचें महत्त्व विशेष वर्णन केलें आहे :

**" यस्मिन् ऋणं सन्नयति येन चानन्त्यमश्नुते ।**
**स एव धर्मजः पुत्रः कामजानितरान्विदुः "*** (९·१०७)

हीच गोष्ट

**" ऋणमस्मिन् सन्नयत्यमृतत्वं च गच्छति ।**
**पिता पुत्रस्य जातस्य पश्येच्चेज्जीवतो मुखम् ॥ "†**
**यावन्तः पृथिव्यां भोगा यावन्तो जातवेदसि ।**
**यावन्तो अप्सु प्राणिनां भूयान्पुत्रे पितुस्ततः ॥**
**शश्वत्पुत्रेण पितरोऽत्यायन् बहुलं तमः ।**
**आत्माहि जज्ञ आत्मनः स इरावत्यातितारिणी ॥**

---

§ **जायेदस्तं मघवन्सेदु योनिः** ।–पत्नीचें निवासस्थान म्हणजे पत्नी होय. (ऋ. ७·४, ४).

* ज्याच्या योगानें ऋणाचें अपकरण होतें, ज्यामुळें पुरुषास अनन्तत्व मिळतें, तोच खरा धर्मपुत्र होय. बाकीचे केवळ कामज होत.

† ज्याच्यामध्यें ऋणाचें आदान करतो व स्वतः अमृतत्वाप्रत जातो अशा जन्मलेल्या पुत्राचें मुख पिता जिवंत असतांना त्यानें पाहावें. (ऐ. ब्रा. ७.१३)

किंनु मलं किमजिनं किमुश्मश्रूणि किं तपः।
पुत्रं ब्रह्माण इच्छध्वं स वै लोकोऽवदावदः॥*

या श्रुतीमध्यें वर्णन केली आहे. मनूनें पुत्राचें महत्त्व आणखीहि एका ठिकाणीं वर्णन केलें आहे :

"पुत्रेण लोकाञ्जयति पौत्रेणानन्त्यमश्नुते।
अथ पुत्रस्य पौत्रेण ब्रध्नस्याप्नोति विष्टपम्॥
पुन्नाम्नो नरकाद्यस्मात् त्रायते पितरं सुतः।
तस्मात् पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयम्भुवा॥"‡

(मनु. ९·१३७–८)

---

* पृथ्वीवर जे भोग असतात, जे अग्नीमध्यें (भोग) असतात, जे प्राण्यांना पाण्यामध्यें भोग मिळतात ते सर्व पित्याला पुत्रापासून मिळतात.

पुत्रामुळें पिता तात्काल अंधकाराच्या पलीकडे जातो. स्वतःपासून मनुष्य स्वतःलाच जन्म देतो व तो त्याचें तारण करतो.

मल, अजिन, श्मश्रू किंवा तप (ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ वगैरे आश्रम किंवा तपाचरण) यांपासून काय लाभ आहे. पुत्राची इच्छा करावी. तो सर्व लोकांत कीर्ति मिळवितो। (ऐ. ब्रा. ७·१४–१६)

‡ पिता पुत्रप्राप्तीमुळें स्वर्गलोक प्राप्त करून घेतो, नातू झाल्यास अनंतत्व मिळतें व पणतू झाल्यास त्यास उत्तम लोकाची प्राप्ति होते. ज्याअर्थी पु नांवाच्या नरकापासून पित्याचें रक्षण करतो त्याअर्थी त्यास स्वतः स्वयंभुव मनूनें पुत्र असें म्हटलें आहे.

बौधायन स्मृतीमध्यें पुढील वचन आढळतें.

**पुदिति नरकस्याऽख्या दुःखं च नरकं विदुः।**
**पुतस्त्राणात्ततः पुत्रमिहेच्छन्ति परत्र च॥§**

**द्वादश पुत्र—**

हें सर्व स्वतःच्या औरस पुत्रासंबंधीं झालें, पण स्वतःचा औरस पुत्र नसेल तरीहि वंशसंवर्धनासाठीं पुत्र असावा ही समजूत विशेष प्रचलित असल्यामुळें औरसाखेरीज अन्य पुत्रहि मानण्यांत येत असत व त्यांस निरनिराळ्या कारणांमुळें पुत्रत्व प्राप्त होत असे. अशा तऱ्हेनें स्मृतिकालीन समाजांत बारा प्रकारच्या पुत्रांचें वर्णन आढळतें.

मनूनें एकंदर बारा पुत्रांचें जें वर्णन केलें आहे तें असें :

**“ औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिम एव च।**
**गूढोत्पन्नोपाविद्धश्च दायादा बान्धवाश्च षट्॥**
**कानीनश्च सहोढश्च क्रीतः पौनर्भवस्तथा।**
**स्वयंदत्तश्च शौद्रश्च षडदायादबान्धवाः॥ ”***

[ ९·१५९–१६० ]

---

§ पु नांवाचा नरक आहे व नरक हा दुःखमय असतो. त्या पु नरकापासून पुत्र रक्षण करतो म्हणून या लोकांत व परलोकांत पुत्राची इच्छा करतात.

* औरस, क्षेत्रज, दत्तक, कृत्रिम तसेच गूढोत्पन्न व अपविद्ध हे सहा प्रकारचे पुत्र दायाद होत. त्याचप्रमाणें कानीन, सहोढ, क्रीत, पुनर्भूजात, स्वयंदत्त व शौद्र हे सहा पुत्र अदायाद असून केवळ बांधवाप्रमाणें होत.

यांतील पहिल्या सहांस दायाद् मानलें आहे व पुढील सहांस दायाद् मानण्यांत आलेलें नाहीं. यांतील औरस पुत्रास विशेष महत्त्व दिलेलें आहे व त्यास पित्याची सर्व संपत्ति मिळावी असें सांगितलें आहे :

**“ एक एवौरसः पुत्रः पित्र्यस्य वसुनः प्रभुः ।**
**शेषानामानृशंस्यार्थं प्रदद्यात्तु प्रजीवनम् ॥ ”** [ ९.१६३ ]

औरस वडील पुत्रानें पित्याचें सर्व धन घ्यावें व बाकीच्या आपल्या भावांचें संगोपन करावें असें सांगितलें आहे.

**ज्येष्ठ पुत्राचें महत्त्व—**

अनेक पुत्रांमध्यें ज्येष्ठ पुत्रास विशेष महत्त्व त्या कालीं देत असत ही गोष्ट वर उल्लेखिलीच आहे; व पितृसत्ताक पद्धतीमध्यें ज्याप्रमाणें पिता हा सर्व संपत्तीचा मालक असे त्याप्रमाणें सर्व कुटुंबाचा मालक पुढें त्याचा वडील मुलगा होत असे, ही गोष्ट मनूनें पुढील श्लोकांत सांगितली आहे :

**“ ज्येष्ठ एव तु गृह्णीयात् पित्र्यं धनमशेषतः ।**
**शेषास्तमुपजीवेयुर्यथैव पितरं तथा ॥ ”** * [ ९.१०५ ]

याप्रमाणें ज्येष्ठ पुत्रास पित्याचे सर्व अधिकार प्राप्त होत व कुटुंबांतील इतर मंडळी सर्वस्वीं त्याच्यावर अवलंबून असत. याचें कारण मनूनें पुढील श्लोकांत सांगितलें आहे :

---

* वडील मुलानेंच पित्याचें अशेष सर्व धन घ्यावें, इतर लोकांनीं त्यावर अवलंबून असावें व पित्याप्रमाणें त्यास मानावें.

" ज्येष्ठेन जातमात्रेण पुत्री भवति मानवः।
पितॄणामनृणश्चैव स तस्मात् सर्वमर्हति ॥ "†

[ ९·१०६ ]

आध्यात्मिक रामायणांतहि 'ज्येष्ठो भ्राता पितुः समः' (युद्ध. २·३४) असें म्हणून ज्येष्ठ भ्रात्यास पित्यासारखें मानावें असें सांगितलें आहे.

**पुत्र हें मोक्षाचें साधन—**

पुत्रप्राप्तीशिवाय मनुष्यास परलोकप्राप्ति होत नसे अशी त्यावेळीं समजूत असे. ती

" नापुत्रस्य लोकोऽस्ति "‡

या श्रुतीमध्यें व्यक्त झाली आहे. तसेंच मनुष्यास या जगामध्यें जीं तीन ऋणें असतात, त्यांतील पितृऋण पुत्रप्राप्तीनें फेडलें जातें

---

† ज्येष्ठ पुत्राच्या जन्मानेंच मनुष्य पुत्रवान् होतो, व आपल्या पितृ-ऋणांतून मुक्त होतो. याकरितां त्याला सर्व मिळालें पाहिजे.

‡ निपुत्रिकास स्वर्गप्राप्ति होत नाहीं. मूळ ऐतरेय ब्राह्मणांतील वचन असें आहे :

**नापुत्रस्य लोकोस्तीति तत्सर्वे पशवो विदुः। तस्मात्तु पुत्रो मातरं स्वसारं चाधिरोहति। एष पन्था उरुगावः सुषेवोयं पुत्रिण आक्रमन्ते। विशोकाः तं पश्यन्ति पशवो वयांसिच। तस्मात्ते मात्रापि मिथुनी-भवष्यन्तीति ह स्मा आख्याय।** ऐ. ब्रा. ७·१३.

अशी जी समजूत आहे, ती समजूत " प्रजया पितृभ्यः "* या श्रुतींतहि व्यक्त झाली आहे. तसेंच.

" **पुत्रेण जातमात्रेण पितृणामनृणश्चसः ॥** "

म्हणजे पुत्र जन्मल्याबरोबर मनुष्य पितृऋणांतून मुक्त होतो, असेंहि वचन आढळतें.

याप्रमाणें प्रथम पुत्रास विशेष महत्त्व प्राप्त झाल्यामुळें त्यास सर्व पैतृक संपत्तीचा मालक मानण्यांत येत असे. परंतु पुढें या समजुतींत हळूहळू पालट होत जाऊं लागला व इतर पुत्रांसहि पैतृक संपत्तींतील कांहीं भाग मिळाला पाहिजे अशी समजूत हळूहळू दृढ होऊं लागली व मुलांनीं कुटुंबांत एकत्रांत रहावें किंवा त्यांस इच्छा झाली तर पृथक्पणें राहावें अशी व्यवस्था मान्य होऊं लागली. ही समजूत

" **एवं सहवसेयुर्वा पृथग्वा धर्मकाम्यया ।**
**पृथग्विवर्धते धर्मस्तस्माद्धर्म्या पृथक्क्रिया ॥** "†

या श्लोकांत मनूनें व्यक्त करून ठेविली आहे. [ ९.१११ ]

---

* **जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते ब्रह्मचर्येणार्षिभ्यः**
**यज्ञेन देवेभ्यः प्रजयापितृभ्यः । एष वा अनृणो यः पुत्री ॥**
( तै. सं. ६.३,१० )

ब्राह्मणास जन्मतः तीन ऋणें असतात. ब्रह्मचर्य हें ऋषींचें, यज्ञ हें देवांचें व प्रजा हें पितरांचें. ज्यास पुत्र होतो तो अनृणी होतो.

† याप्रमाणें पाहिजे तर एकत्र राहावें किंवा धर्म आचरण्याच्या इच्छेनें पृथक् राहावें. वेगळें राहिल्यास धर्माची वाढ होते त्या अर्थी वेगळें राहणें हेंहि धर्मास अनुसरून आहे.

## ज्येष्ठ पुत्राचें दायभागांत महत्त्व—

याप्रमाणें बंधु पृथक् झाले तरी ज्येष्ठ पुत्राचें महत्त्व एकदम कमी झालें नाहीं. तर त्यास संपत्तीच्या वांटणींत विशेष अधिक भाग मिळूं लागला व त्याहून कनिष्ठ भावास त्या मानानें कमी कमी अंश मिळूं लागला व ज्येष्ठायत्त दायप्रथा अस्तित्वांत आली. प्रथम हा अधिक भाग एकंदर मालमत्तेचा विसावा भाग असे, ही गोष्ट पुढील श्लोकांत नमूद आहे:

**" ज्येष्ठस्य विंश उद्धारः सर्व द्रव्याच्च यद्वरम्।**
**ततोर्ध्वं मध्यमस्य स्यात्तुरीयं तु यवीयसः॥***

[ ९·११२ ]

पुढें पुढें ज्येष्ठ पुत्रानें घ्यावयाच्या अधिक अंशांत फरक पडत गेला; व त्यास इतर मुलांपेक्षां एक भाग जास्त द्यावा व त्याच्यापेक्षां धाकट्यास अर्धा वांटा अधिक द्यावा असेंहि ठरविलेलें आढळतें:

**" एकाधिकं हरेज्ज्येष्ठः पुत्रोऽध्यर्धं ततोऽनुजः।**
**अंशमंशं यवीयांस इति धर्मो व्यवस्थितः॥†**

[ ९·११७ ]

---

* ज्येष्ठास वीस हिस्से अधिक मिळावे व सर्व संपत्तींत जें श्रेष्ठ असेल तें मिळावें. त्याच्या निम्में मध्यम पुत्रास मिळावें व चतुर्थांश लहानास मिळावें.

† ज्येष्ठ पुत्रानें एक भाग अधिक घ्यावा, त्यापेक्षां लहान असेल त्यानें त्याचा अर्ध अधिक घ्यावा व त्यांहून लहान असतील त्यांनीं आपापला एक एक वांटा घ्यावा असा धर्म आहे.

तसेंच ज्या ठिकाणीं भाऊ संपन्न असतील त्या ठिकाणीं वडील पुत्रास केवळ मानाकरितां थोडें अधिक द्यावें, विशिष्ट अंश अधिक देऊं नये असेंहि ठरविण्यांत आलें:

**"उद्धारो न दशस्वस्ति संपन्नानां स्वकर्मसु।**
**यत्किंचिदेव देयं तु ज्यायसे मानवर्धनम्" ॥‡**

[ ९·११५ ]

**सर्व बंधूंचा समान विभाग—**

परंतु पुढें या सर्व समजुती जाऊन सर्व मुलांमध्यें पैतृक धनाची सारखी वांटणी होऊं लागली, ही गोष्ट पुढील श्लोकावरून स्पष्ट होत आहे.

**"ऊर्ध्वं पितुश्च मातुश्च समेत्य भ्रातरस्समम्।**
**भजेरन् पैतृकं रिक्थमनीशास्ते हि जीवतोः ॥***

[ ९·१०४ ]

याप्रमाणें हळू हळू सर्व भावांची पैतृक धनावर सारखी सत्ता मानण्यांत येऊन एकत्र कुटुंबांत राहण्याच्या ऐवजीं प्रत्येक भाऊ स्वतंत्रपणें आपलें पृथक् पृथक् कुटुंब करून राहूं लागला. याप्रमाणें पितृसत्ताक पद्धतींत हळू हळू फरक पडत जाऊन अर्वाचीन आर्थिक व्यवस्थेच्या

‡ आपापल्या कर्मांमध्यें बंधु संपन्न असतील तर त्यांत अधिक अंश नसतो. ज्येष्ठास वडीलपणाच्या सन्मानार्थ मात्र कांहीं तरी अल्प देण्यांत यावें.

* माता–पित्यांच्या पाठीमागें सर्व भावांनीं एकत्र मिळून पितृद्रव्य समसमान घ्यावें. मातापितर जिवंत असेपर्यंत त्यांची सत्ता नसते.

कल्पनांस महत्त्व प्राप्त होऊं लागलें, ही गोष्ट वरील कल्पनांत एकापुढें एक कसा फरक पडत गेला आहे तें पाहिलें असतां दिसून येईल.

**पितृकृत दायविभाग—**

ही गोष्ट पिता मृत झाल्यानंतरच्या वांटणीसंबंधीं झाली. परंतु पिता जिवंत असतां त्याला जर आपली संपत्ति मुलांमध्यें वांटून द्यावी असें वाटत असेल तर त्यानें ती आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल तशी वांटावी अशीहि रूढि होती. ही गोष्ट मनूच्याच बाबतींत त्याचा पुत्र नाभानेदिष्ठ यास त्यानें धनाची वांटणी दिली नाहीं म्हणून ऐतरेय ब्राह्मणांत जी कथा दिली आहे तीवरून स्पष्ट होते. ती कथा अशी:— नाभानेदिष्ठ हा मनुपुत्र तपाकरितां अरण्यांत गेला असतां त्याच्या भावांनीं त्याच्या पाठीमागें सर्व पैतृक धनाची वांटणी करून घेतली व त्यास मुळींच भाग ठेवला नाहीं. ज्या वेळीं तो आपली तपस्या पूर्ण करून घरीं आला त्यावेळीं त्यानें मनूस विचारलें कीं माझ्या मागें पैतृक धनाची वांटणी झाली असतां तींत माझा भाग कां ठेवण्यांत आला नाहीं? तेव्हां मनूनें त्यास वांटणींत भाग न देतां असा सल्ला दिला कीं, ‘वांटणींतच काय आहे? सध्यां अंगिरस हे एक सत्र करीत आहेत. त्यांचें सत्र पूर्ण होत नाहीं. याकरितां तूं त्यांस मदत करून तें सत्र तूं पूर्ण कर म्हणजे ते तुला धन देतील तें घे.’ याप्रमाणें त्यानें एकदां झालेल्या वांटणींत बदल केला नाहीं. पुढें त्या सत्रांतील अवशिष्ट गोधन नाभानेदिष्ठास मिळालें*

---

*नाभानेदिष्टं वै मानवं ब्रह्मचर्यं वसन्तं भ्रातरो निरभजन्। सोऽब्रवीदेत्य किं मह्यमभाक्तेत्येतमेव निष्ठावमववदितारमित्यब्रुवंस्तस्माद्धाप्येतर्हिंपितरं पुत्रानिष्ठावोऽववदितेत्येवाऽऽचक्षते। स पितरमेत्याब्रवीत्त्वांह

यावरून वैदिक कालांत पित्याची कुटुंबावर व कुटुंबाच्या संपत्तीवर अप्रतिहत सत्ता असून त्याचा त्यास वाटेल तसा विनियोग करण्याचा पूर्ण अधिकार असे असें स्पष्ट दिसतें. कालांतरानें या सत्तेस हळूहळू अपवाद उत्पन्न होऊन तींत परिस्थितिनुसार फरक पडत गेला व अर्वाचीन काळीं समायिक कुटुंबपद्धति मागें पडून वैयक्तिक कुटुंबपद्धति रूढ होऊं लागली असून विद्याधन, स्वकष्टार्जित धन, अन्यप्राप्तधन, स्त्रीधन वगैरे अनेक प्रकारांमुळें पूर्वीची दायविभागपद्धतिहि बदलत चालली आहे. तसेंच प्रचलित युगास अनुसरून व्यक्तीचें महत्त्व वाढत चाललें असून प्रत्येक व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य देण्याकडे विचाराची व आचाराचीहि प्रगति होत आहे व तीस अनुसरून नवीन नवीन कायदे व रूढी अंमलांत येत आहेत. याप्रमाणें भरतखंडांतहि व्यक्तिमत्त्वास महत्त्व येऊन प्रत्येक व्यक्ति ही समाजाचा एक पूर्णांश घटक आहे ही कल्पना ग्राह्य होऊन त्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीस समाजाचा समर्थ घटक बनविण्याच्या दृष्टीनें सामाजिक नियम, कायदे व शिक्षणपद्धति यांत इष्ट ते फरक हळूहळू होत आहेत ही समाधानाची गोष्ट होय.

---

वाव मह्यं तताभाक्षुरिति तं पिताब्रवीन्मापुत्रक तदादथा अंगिरसोवा इमे स्वर्गाय लोकाय सत्रमासते ते षष्ठं षष्ठमेवाहरागत्य मुह्यान्ति तानेते सूक्ते षष्ठेहनि शंसय तेषां यत्सहस्रं सत्रपरिवेषणं तत्ते स्वर्यन्तोदास्यन्तीति तथेति। (ऐ. ब्रा. ५·१४ मनुः पुत्रेभ्यो दायं व्यभजत्।... तै. सं. ३. १. ९, ४).

## प्रकरण सहावें

# पाश्चात्य समाजांत पितापुत्र संबंध

### असुरी संस्कृतींत पितापुत्र—

पाश्चात्य देशांत आर्यसंस्कृतीच्या कक्षेबाहेरील पण प्राचीन काळीं एक प्रभावी संस्कृति म्हणून असुरी अथवा असीरियन संस्कृति प्रचलित होऊन गेली. या असुर राष्ट्रांचा संबंध अत्यंत प्राचीन काळीं वैदिक राष्ट्राशींहि येत असे व त्यांच्यामध्यें दीर्घकालीन कलह चाललेले असत. ही एक अत्यंत प्राचीन व विशेष प्रगत अशी संस्कृति होऊन गेली असून तीमध्यें समाजरचना, कायदेपद्धति वगैरे बऱ्याच परिणत अवस्थेपर्यंत पोंचल्या होत्या. या असुर राष्ट्रांमध्यें ज्याप्रमाणें सार्गन-सारखे पराक्रमी राजे होऊन गेले त्याप्रमाणें हमुरब्बीसारखे नीतिशास्त्रवेत्ते व कायदे करणारे राजेहि होऊन गेले. तथापि ही संस्कृति लवकरच नष्ट झाल्यामुळें तिचे आर्वाचीन समाजावर फारसे परिणाम झाल्याचे अवशेष दिसत नाहींत. याकरितां तिचें केवळ येथें दिग्दर्शन केलें आहे.

ॲसीरियामध्यें पित्याची सत्ता घरांतील मुलांवर व गुलाम वगैरे सर्व लोकांवर अप्रतिहत चालत असे. कांहीं कांहीं वेळां तर गरीब, स्वतंत्र ॲसीरियन मनुष्याची स्थिति गुलामापेक्षांहि वाईट असे. त्यामुळें कांहीं दरिद्री ॲसीरियन लोक स्वतःस किंवा आपल्या मुलांस गुलाम म्हणून विकून टाकीत असत.

## ग्रीक व रोमन संस्कृति—

यानंतर पाश्चात्य देशांतील महत्त्वाची संस्कृति म्हटली म्हणजे ग्रीक संस्कृति होय. ग्रीसमध्यें प्राचीन कालीं स्पार्टा व अथेन्स या शहरांस विशेष महत्त्व असे. स्पार्टा हें शहर लहान असूनहि त्यानें आपल्या विशिष्ट, कडक व शिस्तीच्या समाजनियमनपद्धतीमुळें आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेविलें होतें. तसेंच अथेन्सनें तर सर्व आजच्या पाश्चात्य संस्कृतीचा पायाच घातलेला आहे. याकरितां या समाजांत पितापुत्रांचा संबंध कसा काय होता व मुलांच्य संवर्धनाची व शिक्षणाची काळजी पिता अथवा समाज कोणत्या प्रकारानें घेत होता हें पाहणें फार महत्त्वाचें आहे. तसेंच त्यांच्या शिक्षणासंबंधीं कल्पना कोणत्या प्रकारच्या होत्या हें समजून घेतलें असतांहि आपला बराच कार्यभाग होणार आहे. यानंतर युरोपांतील महत्त्वाची संस्कृति म्हटली म्हणजे रोमन संस्कृति होय. ही संस्कृतिहि आपल्या कडक शिस्तीबद्दल व कायदेपद्धतीबद्दल प्रसिद्ध आहे. व युरोपांतील आजचे सर्व कायदे प्राधान्येंकरून रोमन कायदेपद्धतीवर आधारलेले आहेत. तेव्हां या समाजाचेंहि आपणांस निरीक्षण करणें अवश्य आहे. याकरितां पुढें अनुक्रमानें या तीन समाजांतील पितापुत्रसंबंधाचें व शिक्षण-पद्धतीचें अवलोकन केलें आहे.

## स्पार्टामधील पितापुत्र व मुलांचें शिक्षण—

स्पार्टामधील शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतु स्पार्टन लोकांच्या आयुष्य-क्रमास अनुसरून मुलास कामकरी नव्हे तर शूर योद्धा बनविण्याचा असे. त्यांच्या आयुष्यक्रमांत शारीरिक सामर्थ्य व कौशल्य यांची जरी मुख्यतः जरूरी होती तरी त्यांचें विशेष लक्ष संयम, आदर, व मान-

नीय व्यक्तींबद्दल पूज्यभाव या गोष्टींकडे असे, असें हेसिअड या ग्रंथकारानें म्हटलें आहे. त्यानें औद्धत्य, क्रौर्य, अनियंत्रित स्वार्थ व आत्मगौरव या गोष्टी त्याज्य मानल्या आहेत. सामाजिक संबंध अथवा सामाजिक नीति हा हेसिअडच्या नीतितत्त्वांचा गाभा होता. अत्याचार व अन्याय हे त्यास तिरस्करणीय वाटत. न्याय हा सर्व गोष्टींचा पाया असून अन्याय हा समाजाचा शत्रु होय. प्रत्येक व्यक्तीचें वैय्यक्तिक अस्तित्व हें समाजाच्या सांघिक आयुष्यापेक्षां कमी महत्त्वाचें मानणें हें स्पार्टन लोकांतील शिक्षणाचें आद्य तत्त्व होतें व हेंच त्यांच्या यशाचें बीज होतें. देशाभिमान हा प्रत्येक स्पार्टन व्यक्तीचा स्वभावच बनलेला असे. प्रत्येक तरुणास नैतिक व सामाजिक शिक्षण देण्यांत येत असे. त्यास केवळ मल्ल अथवा भालाईत तयार करण्यांत येत नव्हतें. प्रत्येक स्त्रीपुरुषाची दृष्टि आपल्या राष्ट्राच्या हितांत आपलें हित कसें आहे हें पाहण्यांत गुंतलेली असे. याच तत्त्वास अनुसरून त्यांच्या समाजांत पिता व पुत्र यांचा संबंध निश्चित झाला होता व प्रत्येक मूल हें पित्यापेक्षां समाजाच्याच अंकित असे.

मूल सात वर्षांचें झालें म्हणजे त्यास आईबापांपासून काढून शासनसत्तेच्या दिग्दर्शनाखालीं त्याच्या बरोबरीच्या सवंगड्यांमध्यें ठेवण्यांत येत असे. अशा मुलांचे गट करून त्यांमध्यें मुलगे व मुली एकत्र खान, पान, शयन, क्रीडा व युद्ध करीत असत व शिक्षणाहि घेत असत. प्रत्येक गटावर इरेन या नांवाचा एक मुख्य असे. हा या मुलांपेक्षां सरासरी दोन वर्षांनीं मोठा म्हणजे २० वर्षांचा असे. प्रत्येक नागरिकाची या सर्वांवर दृष्टि असे. पण इरेन याचेवर त्याच्या गटाची जबाबदारी असे. या मुलांस गायन व व्यायाम शिकवीत. आज्ञाधारकता, श्रमसहिष्णुता, युद्ध करणें, जय मिळविणें या गोष्टींकडे या मुलांची प्रवृत्ति व्हावी.

असें त्यांस शिक्षण देत असत. या मुलांमध्यें जो विशेष धीट किंवा शूर असेल त्यास पुढारी नेमीत व इतर मुलें त्याच्या आज्ञेंत वागत व त्याचें अनुकरण करीत. त्यांचे खेळ चालू असतां कांहीं प्रौढ वृद्ध गृहस्थ हजर असत; व त्यांचें धैर्य वगैरे अजमावून पाहात. सायंकाळीं इरेन एखाद्यास गाणें म्हणावयास सांगे व कित्येकांस निर-निराळे प्रश्न विचारी. त्यांचें स्वरूप असें असे : गांवांत मोठा मनुष्य कोण आहे ? अमुक गोष्टीबद्दल तुझें काय मत आहे ? अशा तऱ्हेनें मुलांस विचार करण्यास प्रवृत्त करून मनुष्याच्या अंगच्या गुणांची पारख व तुलना करावयास त्यांस शिकवीत असत.

## स्पार्टन लोकांतील चौर्यस्वातंत्र्य—

इतकें असून स्पार्टन लोकांत चोरी करण्यावर निर्बंध नसे ही गोष्ट अनेकांस आश्चर्यकारक वाटते. परंतु या गोष्टीकडे निराळ्या दृष्टीनें पाहिलें असतां तींत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. स्पार्टन मनुष्य हा व्यापारी नसून शेतकरी होता. अर्थात् संग्रह करण्याकडे व माल-मत्ता वाढविण्याकडे त्याची प्रवृत्ति नसे. त्यामुळें मोठी चोरी करण्याकडे कोणाचीहि सामान्यतः प्रवृत्ति होत नसे. स्पार्टन मनुष्यास स्वतःच्या कर्तबगारीवर जगावयाचें असे आणि तें न साधल्यास त्यास उपाशी मरण्याची पाळी येत असे. त्यामुळें त्याच्या अंगीं सावधपणा येणें अवश्य असे व चोरी पकडली गेल्यास त्यास मार खावा लागे व ही गोष्ट चौर्यास पुरेशी प्रतिबंधक असे. तसेंच या गोष्टीचा उद्देश सर्वांस माहीत असल्यामुळें कोणाचा गैरसमज होण्याचा संभव नसे.

## स्पार्टाचा ऱ्हास कां झाला—

स्पार्टन लोकांचें शिक्षण व शिस्त इतकी कडक असूनहि त्यांस

शेवटीं अपयश कां आलें या गोष्टीचाहि येथें जातां जातां निर्देश केल्यास तो उपयुक्त होईल.

( १ ) स्पार्टन लोकांनीं आपल्या राहणींत व शिक्षण पद्धतींत काल व परिस्थिति यांस अनुरूप असा फरक कधींच केला नाहीं. त्यांचें राष्ट्र अगदीं एकाकी असून केवळ स्वदेशाभिमानावर अवलंबून असे.

( २ ) केवळ आपल्या संस्थानाकरितां सर्वस्व अर्पण करणें, हेंच त्यांचें ध्येय असून त्याच्या पलीकडे त्यांची दृष्टि कधींच गेली नाहीं. संस्थानचा कायदा हाच सर्वश्रेष्ठ मानण्यांत येत असून कायद्याचा हेतु केवळ आपलें संस्थान टिकविणें हा होता.

( ३ ) प्रत्येक व्यक्तीचें आयुष्य अगदीं कायद्यानें जखडून गेल्यासारखें होतें व त्यांतून मरण किंवा हद्दपारीशिवाय त्याची सुटका होणें शक्य नव्हतें.

( ४ ) लायकरगसचे कायदे अतिशय व्यापक, अप्रागतिक व अशिथिल असे होते. त्यांचा विस्तार करणें, त्यांमध्यें बदल घडवून आणणें किंवा ते परिस्थितीस अनुरूप करून घेणें या गोष्टी शक्य नव्हत्या. उलट मानव समाज हा तर सारखा विकास पावत असून त्याच्या विचारांत, परिस्थितींत व आयुष्यक्रमांत एकसारखा बदल होत असतो. स्पार्टन कायद्याचें महत्त्व केवळ एक विशिष्ट काटक व सुबद्ध अशी घटना एवढेंच आहे.

**अथेन्समधील शिक्षणपद्धति—**

अथेन्समधील शिक्षण संगीत, वाङ्मय व व्यायाम या तीन आधारभूत गोष्टींवर आधारलेलें असे. प्लेटोचें म्हणणें असें असे कीं, शिक्षणामध्यें मुलांस निरनिराळ्या गोष्टींतील विसंवादी घटना अथवा विसंगति

यांचें ज्ञान करून देण्याऐवजीं त्यांचें लक्ष सर्व गोष्टींतील सुव्यवस्था, सौंदर्य व शुचित्व वगैरे गोष्टींकडे वेधण्यांत यावें. त्यांच्या मनावर विधायक गोष्टींचा परिणाम घडवीत असावें व विनाशक गोष्टींपासून त्यांस दूर ठेवावें. दुष्ट गोष्टीहि दृष्टीस पडल्यास आपल्या मनावर त्यांचा परिणाम होतो, तसेंच नियम, न्याय व व्यवस्था या गोष्टींचाहि आपल्या मनावर परिणाम होतो. परमेश्वर हा सत्कृतींचा जनक आहे. मुलांच्या प्रवृत्ति चांगल्या गोष्टींकडे वळविणें आणि विधायक मार्गानें त्यांस नेऊन जगांत उत्तम गोष्टींशीं त्यांचा परिचय करून देणें हेंच शिक्षणाचें आद्य तत्त्व होय. मुलांस चांगल्या, सुंदर व पथ्यकर ( सत्य, शिव व सुंदर ) अशा गोष्टींचेंच फक्त ज्ञान व्हावें व इतर गोष्टी त्यांपासून दूर ठेवण्यांत याव्या. प्लेटोच्या मतें संगीत अथवा Music या शब्दामध्यें कथा, गायन व वाङ्मय या सर्व बुद्धिप्रधान गोष्टींचा अन्तर्भाव होत असे. ज्याप्रमाणें आपण विषयुक्त अन्नापासून दूर राहतों त्याप्रमाणें सर्व कुरूपता व ज्यापासून क्रौर्य, विश्वासघात, भ्याडपणा, नीचपणा आणि भीति उत्पन्न होईल अशा गोष्टी त्याज्य समजल्या पाहिजेत.

## रोमची कुटुंबपद्धति—

रोमची परंपरा इतकी उज्ज्वल असण्याचें कारण तीमध्यें असलेली पितृसत्ताक कुटुंबपद्धति होय ही गोष्ट अनेक समाजवेत्त्यांनीं मान्य केली आहे. रोमन कुटुंबांत पित्याप्रमाणें मातेचाहि दरारा मोठा असे व नैतिक निर्बंध फार कडक असून ते अतिशय सक्तीनें अंमलांत आणले जात असत. त्यामुळें रोमन लोकांत शिस्त अतिशय कडक दिसून येत असे. जसजसा रोमचा ग्रीक संस्कृतीशीं संबंध आला तसतसा त्यांच्यामध्यें जरी उदात्त भावना व नागर संस्कृति यांचा प्रसार झाला तरी त्याबरोबर त्यांच्यांतील शिस्त हळू हळू शिथिल होत

गेली व नैतिक नियमहि शिथिल होत गेले. यामुळेंच पुढें रोमन साम्राज्याचा व रोमन समाजाचा ऱ्हास झाला.

तथापि तिच्या वैभवकालीं ती एक आर्दशकुटुंबपद्धति व समाजरचना असल्यामुळें तिच्याकडे विशेष लक्ष्य देणें व तिचा अभ्यास करणें आजहि फार महत्त्वाचें आहे. याकरितां थोडक्यांत तिचें निरिक्षण करूं.

## पितृसत्ताक कुटुंबाची महती—

रोमन कुटुंबांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पितृसत्ताक कुटुंबपद्धति होय. यास 'पॅट्रिया पोटेस्टस' असें म्हणत. या पद्धतींत पित्याची कुटुंबांतील सर्व व्यक्तींवर—स्त्रिया, मुलें, गुलाम वगैरे—मग त्या कुटुंबांत जन्मलेल्या असोत किंवा दत्तक वगैरे कारणानें समाविष्ट केलेल्या असोत—अप्रतिबद्ध सत्ता चालत असे. यांत मुलांचे विवाह लावणें, कुटुंबाची संपत्ति आपले मनाप्रमाणें वांटून देणें, कुटुंबांतील व्यक्तींस शिक्षा करणें, एवढेंच नव्हे तर आपल्या कुटुंबाचें दुसऱ्या कुटुंबाशीं वैर असेल तर तें पुढें चालू ठेवण्यास सांगणें इत्यादि गोष्टींचा अन्तर्भाव होत असे. पित्यास त्यांपैकीं कोणासहि मृत्यूची शिक्षाहि करण्याचा अधिकार असे. एवढेंच नव्हे तर खासगी बाबतींत त्याचा शब्द म्हणजे कायदा असे. मुलानें मिळविलेल्या सर्व संपत्तीवर बापाची पूर्णपणें सत्ता असे. मुलास खर्चावयाकरितां तो कांहीं रक्कम देत असे, त्यास 'पिक्यूलियम' असें म्हणत. पण कायद्यानें सर्व मालमत्तेवर त्याची सत्ता असे.

पुढें हळूहळू ही सत्ता कमी कमी होत गेली. पित्यानें द्यावयाच्या शिक्षेची मर्यादा मृत्यूपासून सामान्य शिक्षेवर आली. तसेंच गुलाम व

धनी या नात्याप्रमाणेंच मुलानें केलेले करार पित्यावर बंधनकारक समजण्यांत येऊं लागले. सैनिक म्हणून मिळविलेलें धन मुलाचें खासगी समजण्यांत येऊं लागलें; त्यास 'पिक्यूलिअम् कॅस्ट्रेन्स' म्हणत. हें धन मुलास मृत्युपत्रानेंहि आपले मागें कोणासहि देण्याचा अधिकार प्राप्त झाला.

## पितृसत्तेस ओहोटी—

जस्टिनियनच्या काळांत या कायद्यांत आणखीहि बदल झाले. बापाकडून मुलास दिलेल्या मालमत्तेवर बापाचा हक्क मानण्यांत येई, परंतु शिपाईगिरीप्रमाणें इतर धंद्यांतहि मिळविलेल्या पैशावर मुलाची सत्ता मानण्यांत आली; यास 'पिक्यूलियम् केसाय कॅस्ट्रेन्स' म्हणत. तसेंच मातेकडून मिळालेलें धन मुलाच्या अधिकारांत असे; व पित्याची सर्व मालमत्तेवरील सत्ता त्याच्या मरणापर्यंतच चालावी असें ठरलें. तसेंच मध्यंतरींहि ही सत्ता सोडून देण्याचा पित्यास अधिकार मिळाला. मुलीवरील पित्याची सत्ता तिच्या लग्नाबरोबर संपुष्टांत येऊं लागली.

जस्टिनियननंतर तिसरा लिओ यानें या कायद्यांत कांहीं फेरफार केले; व मुलगे वयांत आल्यावर त्यांस पितृसत्तेंतून बाहेर पडण्याच्या बाबतींत अधिक सवलती देण्यांत आल्या; व पित्याची सत्ता फक्त अज्ञानावस्थेपुरती मानण्यांत येऊं लागली. पालकासंबंधींच्या कायद्यांतहि बराच फरक करण्यांत आला.

यानंतर बेसिल पहिला व लिओ सहावा यांनींहि या कायद्यांत कांहीं फेरफार केले व हळूहळू व्यक्तिस्वातंत्र्याचा पाया घालण्यांत आला.

यांप्रमाणें पाश्चात्य समाजांतील महत्त्वाच्या ज्या असुरी, ग्रीक व रोमन संस्कृति त्यांतील पितापुत्रांचें समाजांतील स्थान व त्यांचे परस्पर संबंध व मुलांची शिक्षणपद्धति याचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यांत आलें. आतां अलिकडे रशियामध्यें जी एक महत्त्वाची नवीन समाज-घटना निर्माण झाली आहे तीमध्यें हे पितापुत्रसंबंध व मुलांचें संवर्धन व शिक्षण यांसंबंधींच्या काय कल्पना व व्यवस्था आहेत त्यांचें थोड-क्यांत अवलोकन करूं. यासंबंधी ओझरता उल्लेख पूर्वी एकदां केलाच आहे.

## प्रकरण सातवें

# समाजसत्ताक रशियांतील पितापुत्रसंबंध व मुलांचें संवर्धन

### साम्यवादी रशियांतील मुलें—

समाजसत्तावादी रशियन राजवटींत मुलें ही एक राष्ट्रीय संपत्ति समजून त्यांचें संगोपन, पालनपोषण व शिक्षण शासनसंस्थेमार्फतच झालें पाहिजे ही गोष्ट तेथील राज्यकर्त्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबलेली असल्यामुळें तेथें इतर देशांतील आईबापांप्रमाणें मुलांच्या संगोपनाचा व शिक्षणाचा भार त्यांचेवर न पडतां शासनसत्तेनेंच तो आपल्या अंगावर घेतला आहे. मात्र पित्यावर कांहीं अंशानें आर्थिक जबाबदारी टाकलेली आहे. या गोष्टींचा उल्लेख प्रसंगोपात्त कांहीं ठिकाणीं केलाच आहे. परंतु रशियांतील समाजवादी संघटना ही एक जगांतील पूर्वपरंपरागत समाजव्यवस्थेपेक्षां अगदीं एक निराळीच व नवीन अशी घटना असल्यामुळें तिचें स्वरूप व या संघटनेमध्यें पिता व पुत्र यांचे संबंध कसे असतात व मुलांचें संवर्धन व शिक्षण या बाबतींत रशियन राज्यघटनेमध्यें व समाजामध्यें कोणत्या प्रकारची व्यवस्था रूढ आहे या गोष्टींचें थोडेंसें विस्तृत ज्ञान करून घेणें अवश्य आहे. याकरितां तेथील व्यवस्था प्रत्यक्ष पाहून आलेल्या लोकांनीं आपल्या ग्रंथांत ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्यांचें येथें थोडेंसें दिग्दर्शन करूं.

राशियामध्यें सामान्यतः इतर देशांपेक्षां सांपत्तिक सुबत्तेचें मान कमी असल्यामुळें तेथील लोकांत मुलांची काळजी विशेष घेतली जात नसावी असें वाटतें. परंतु त्या देशांत जाऊन प्रत्यक्ष परिस्थिति पाहून आलेल्या लोकांनीं जी वस्तुस्थिति वर्णन केली आहे तीवरून याच्या अगदीं उलट स्थिति आहे हें दिसून येतें.

## इंग्लंडमधील कामगारांच्या मुलांशीं तुलना—

इंग्लंडमध्यें काम करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण शेंकडा २८ आहे, तेंच राशियांत शेंकडा ३५ इतकें आहे. म्हणजे दोन्ही देशांत एकंदर स्त्री-वर्गांतील जवळ जवळ सारख्याच प्रमाणांत स्त्रियांस काम करावें लागतें. परंतु इंग्लंडमध्यें अशा स्त्रियांच्या मुलांची काळजी घेण्यास कांहीं बाल-संगोपनगृहें (Creches) किंवा बालोद्यान पद्धतीच्या (किंडरगार्टन) शाळा असतात, पण त्यांचें प्रमाण फारच थोडें आहे. याच्या उलट राशिया-मध्यें अशा सर्व मुलांची सोय अशा तऱ्हेच्या सरकारनें चालविलेल्या संस्थांतून होत असते. इंग्लंडमध्यें कामाचे तास मुलांकरितां आठ किंवा त्यापेक्षां अधिकहि असतात, परंतु राशियामध्यें जास्तींत जास्त आठ तास असतात. इंग्लंडमधील कामगारांचीं मुलें सामान्यतः ओंगळ व गलिच्छ दिसतात, व बहुतेक रस्त्यांतून खेळतांना आढळतात. याच्या उलट मास्कोमध्यें सहसा रस्त्यांत मुलें खेळतांना आढळत नाहींत किंवा तीं गलिच्छहि दिसत नाहींत. मॉस्को शहरांत जेथें जेथें म्हणून मोकळी जागा असेल तेथें तेथें मुलांची खेळण्याची व्यवस्था केलेली असते. शहरांत ठिकठिकाणीं मोकळ्या बागा व मैदानें मुलांस खेळण्याकरितां उघडीं ठेवलेलीं असतात. लंडनमध्यें लहानपणींच मुलांस काम करावें लागतें. शाळेंत जाण्याऐवजीं त्यांस उपाहारगृहांत जिन्नस देण्याचें किंवा कचेरीं-तून निरोप नेण्याआणण्याचें किंवा दुकानांतून माल देण्याचें वगैरे

काम करावें लागतें. अशा मुलांस सामान्यतः असे दुकानदार त्याचा सक्तीनें विमा उतरावा लागण्याचें वय होईपर्यंत ठेवतात व नंतर काढून देतात. त्यामुळें अशा अर्धवट वयांत मुलें बेकार राहतात. मॉस्कोमध्यें १७–१८ वर्षांपर्यंत सर्व मुलांस शाळांतून सक्तीनें शिक्षण देण्यांत येतें. लहान मुलांस कामास लावण्याची बंदी केलेली आहे व शाळाहि दिवसांतून दुबार भरविण्यांत येतात. मॉस्कोमध्यें उद्यानसंघ (Green Trust) नांवाची संस्था आहे. तिची स्थापना १९३२ सालीं झाली. या संस्थेमार्फत मॉस्को शहरांतील प्रत्येक मोकळी जागा मुलांसाठीं खेळण्याकरितां तयार केली जाते व तेथें खेळाची कांहीं सामुग्री पुरविली जाते.

## रशियांतील मुलांची छावणी—

रशियांतील प्रत्येक कारखान्यातर्फे एक मुलांची छावणी चालविली जाते. या छावणीमध्यें सामान्यतः एका वेळीं ७० मुलें घेतलीं जातात. व त्यांस १५ दिवस छावणींत ठेवण्यांत येतें. अशा रीतीनें आळीपाळीनें सर्व मुलांस छावणींत नेण्यांत येतें. यांत मुलांची व मुलींची संख्या जवळ जवळ सारखीच असते व तीं दिवसभर एकत्रच खेळत असतात. रात्रीं निजावयाची मात्र त्यांची स्वतंत्र व्यवस्था केलेली असते. या छावणीकरितां स्वयंपाकी, नोकर व शिक्षक कारखान्यातर्फे पुरविले जातात व कांहीं तरुण समाजसत्तावादी कार्यकर्ते त्यांस मदत करतात. डॉक्टर व नर्स यांचीहि योजना केलेली असते. या मुलांतीलच कांहीं मुलांस पुढारी नेमून त्यांच्या हाताखालीं त्यांचे गट पाडण्यांत येतात. त्यांस दिवसभर निरनिराळ्या प्रकारचे खेळ शिकविण्यांत येतात व ओढ्यावर स्नान वगैरे करण्यास नेण्यांत येतें. अशा मुलांची शारीरिक, कलात्मक व बौद्धिक वाढ चांगली होते. अशा छावणींत मुलेंच

वर्तमानपत्रेंहि चालवतात. त्यांमध्यें वाङ्मयीन व नाट्यसंघ स्थापन होतात. कांहीं मुलें निसर्गाचा अभ्यास करतात. कांहीं कलावंत मुलें चित्रकलादि विषयांत वेळ घालवतात तर कांहीं पोहोणें, व्यायाम इत्यादि विषयांत लक्ष घालतात. सर्वच मुलें खेळांत भाग घेतात. या सर्व गोष्टींमुळें त्यांच्या ठिकाणीं सांघिक वृत्तीची वाढ होऊन त्यांची शारीरिक वाढहि चांगली होते. त्यांच्यामध्यें नेहमीं आनंद व उत्साह आढळून येतो व कोणीहि मूल कंटाळलेलें आढळत नाहीं. अशा छावणींत तरुण समाजवादी, नुकतेच पदवी घेतलेले व मुलांशीं वयानें व वृत्तीनें समरस होणारे बराच महत्त्वाचा भाग घेतात. अशा तरुणांस कोमसॉर्ग ( Komsorg ) म्हणतात. त्याचा अर्थ तरुण साम्यवादी संघटक ( Young Communist Organiser ) असा आहे. असे तरुण आपल्या जवळच्या कारखान्यांतील मुलांचा रिकामा वेळ आनंदांत जाईल अशी व्यवस्था करण्यांत उत्साहानें भाग घेतात. हे बहुतेक एक तरुण व तरुणी अशा जोडीनें काम करतात. यांचें वय १८–२५ वर्षांचें असतें.

## शाळेबाहेरील मुलांचें शिक्षण—

शाळेबाहेरहि मुलांचें शिक्षण योग्य चाललें आहे किंवा नाहीं हें पाहणाऱ्या कांहीं संस्था व चळवळी चाललेल्या असतात. यांचें काम कामगार लोकांच्या मुलांस शिशुसंगोपनगृह व बालोद्यान ( किंडरगार्टन ) पद्धतीनें योग्य शिक्षण मिळतें किंवा नाहीं हें पाहण्याचें असतें. ठिकठिकाणीं भिंतीवरील वर्तमानपत्रांत या गोष्टींची चर्चा केलेली आढळते. मजूरसंघ समितीची ( ट्रेड युनियन कमिटीची ) या गोष्टीवर देखरेख असते व दरवर्षी या सर्व चळवळीचा आढावा घेण्यांत येतो व पुढील वर्षीच्या चळवळीचा अंदाज करण्यांत येतो. प्रत्येक

मुलास योग्य तें शिक्षण, खेळ व करमणूक यांचीं साधनें भरपूर मिळतील अशी व्यवस्था करण्यांत येते. मोठमोठ्या कुटुंबास विशेष मदत किंवा भत्ता देण्यांत येतो. त्यास शिशुगृहा (क्रेच) मध्यें व बालोद्यान शाळेंत नादारी देण्यांत येते. त्यांच्या मुलांस खेळण्याच्या जागा, विश्रांतिगृहें व आरोग्यसदनें यांचे पास देण्यांत येतात. अशा संस्थांस लोकांकडून व सरकारकडून पैसा मिळतो.

## कामगारांस योग्य घरांची सोय—

रशियामध्यें कामगार लोकांस मजूरसंघ समिती (ट्रेड युनियन कमिटी) मार्फत त्यांच्या कुटुंबाच्या आकाराप्रमाणें घरें मिळण्याची व्यवस्था करण्यांत येते. कुटुंबांत मुलें अधिक असल्यास त्यांस अधिक खोल्या असलेलें घर देण्यांत येतें. अशीं घरें नियमित असल्यामुळें हुषार व कुशल कामगारास अधिक पसंती देण्यांत येते. मुलें असलेल्या कुटुंबास मुलें नसलेल्या कुटुंबांपेक्षां अधिक सवलती देण्यांत येतात. मुलें असलेल्या आईस इतर स्त्रियांपेक्षां अधिक सोयी करून देण्यांत येतात व अधिक हुषार कामगारास अधिक प्राप्ति होते.

## मुलांमध्यें उपयुक्त छंदांची आवड—

कीव्ह, खारकोव्ह, या शहरीं ‘पूर्वगामी प्रासाद’ (Palace of pioneers) या नांवाच्या फक्त मुलांकरितांच चालविलेल्या संस्था आहेत. त्या संस्थांत मुलांस शाळेच्या वेळेखेरीज इतर रिकाम्या वेळीं खेळण्याकरितां व कांहीं उपयुक्त छंद चालविण्याकरितां साधनें व माहिती पुरविण्यांत येते. अशी संस्था पाहणाऱ्या एका प्रेक्षकानें असें लिहून ठेविलें आहे, कीं, “या संस्थेंतील एक मुलगा निरनिराळ्या पक्षांचीं अंडीं जमवीत होता. त्यानें निसर्गशास्त्रामध्यें केलेली प्रगति व त्याची

निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांच्या उत्पत्तीची माहिती वगैरे पाहून मला फार आश्चर्य वाटलें." या शाळेंत अनेक प्रकारच्या कलांच्या अभ्यासांत गुंतलेलीं मुलें आढळलीं. यांमध्यें कांहीं वैमानिक, यांत्रिक, नर्तक, गायक, कलावंत, क्रीडासक्त, नाट्यभक्त, टीकाकार, लेखक, नाटककार, उत्तर-ध्रुवसंशोधक, वनस्पतिशास्त्रज्ञ वगैरे आढळले. मुलांनीं केलेलें सर्व कार्य ऐच्छिक असून त्यांस स्वच्छंदपणें खेळण्यास व आपल्या आवडीचें काम करण्यास भरपूर वेळ दिला जातो. अशा संस्थांत सध्यां फक्त शेंकडा १० मुलांसच प्रवेश करण्याची संधि मिळते. हा प्रवेश त्यांच्या गुणाधिक्यावर म्हणजे शाळेंतील प्रगतीप्रमाणें दिला जातो. या संस्थेंत कोणतीहि फी आकारली जात नाहीं. शाळेंत विशेष प्रगति करणा-रासच या संस्थांत प्रवेश मिळत असल्यामुळें मुलांस शाळेंतहि चांगला अभ्यास करण्यास उत्तेजन मिळतें. या संस्थांत कांहीं सदोष मुलां-सहि त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति पाहण्याकरितां म्हणून पाठविलें जातें. व त्यांच्यामध्यें सुधारणाहि झालेली आढळते.

**संस्कृतिसंवर्धक व विश्रांतिस्थानें—**

मॉस्को शहरांत मुलांचीं 'संस्कृतिसंवर्धक व विश्रांतिदायक उद्यानें' म्हणून (Children's Park of Culture and Rest) विशेष तऱ्हेचीं उद्यानें राखून ठेविलेलीं असतात. या ठिकाणीं मुलांस, गाणें, नाचणें, पाठ म्हणणें वगैरे शिकवितात. एका मुलीनें सांगितलेली पुष्किनची गोष्ट एका प्रेक्षकास फार आवडल्याचें त्यानें नमूद करून ठेविलें आहे. याखेरीज 'पूर्वगामी संवस्थान' (Pioneer Out post) या नांवाच्या कांहीं संस्था असतात. त्या मुलांस खेळण्याच्या जागा व मैदानें यांची तजवीज करतात. जे कामगार चाळीसारख्या इमारतींत राहिल्यामुळें त्यांच्या मुलांस मोकळ्या जागेंत खेळतां येत

नाहीं अशा मुलांस या संस्थांमार्फत खेळण्याची व्यवस्था करण्यांत येते. अशा संस्था तरुण साम्यवादी संघ (Young Communist League) मधील तरुण कार्यकर्ते चालवितात. यांच्या ताब्यांत एक क्रीडागृह, बालगृह व कांहीं मोकळी जागा व बाग असते. अशा ठिकाणीं एक यहुदी शिक्षिका आपलें काम अत्यंत उत्साहानें करतांना आढळल्याचें ग्रंथकारानें नमूद केलें आहे. राशियामध्यें क्रांति होण्यापूर्वी सामान्यतः कामगारांचीं मुलें रस्त्यांत खेळत असत, परंतु आतां मोठमोठ्या इमारतींतहि मुलांकरितां एक स्वतंत्र खोली व लहानशी मोकळी जागा व बाग राखून ठेवण्यांत येते व तेथें एका शिक्षिकेच्या स्वाधीन मुलें करण्यांत येतात. त्यामुळें आईबापांस काळजी राहात नाहीं व मुलेंहि रस्त्यावर खेळतांना आढळत नाहींत.

**स्त्रीपुरुषांचीं सहकार्य क्षेत्रें—**

रशियामध्यें चापीवका या नांवाचीं कांहीं स्त्रीपुरुषांनीं चालविलेलीं 'सहक्षेत्रें' आहेत. अशा ठिकाणीं मुलांस १७ वर्षें पूर्ण होईपर्यंत शाळेंत पाठविलें जातें व त्यांची सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय केली जाते. या क्षेत्रांत कांहीं स्त्रिया पुरुषांपेक्षांहि अधिक पैसा मिळवितांना आढळतात. जे आईबाप स्वतः अशिक्षित असून ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य अज्ञानांत घालविलें त्यांस आपलीं मुलें शिकून पुढें युनिव्हर्सिटींत जाणार, त्यांतून कांहीं शिल्पशास्त्रज्ञ, शेतकी तज्ज्ञ वगैरे होणार व आपला पुढील आयुष्याचा मार्ग स्वावलंबनानें व स्वतःच्या पसंतीनें ठरवून आक्रमण करणार हें पाहून फार आनंद होतो. जे मजूर १९१७ पूर्वी पूर्णपणें अडाणी होते त्यांच्या उत्पन्नांत आज पुष्कळच वाढ झाली असून त्यांना निरनिराळ्या तऱ्हेचे खेळ, आखाडे, सिनेमा, नाट्यसंस्था, बॅन्ड, सायंकाळचे वर्ग वगैरेंचा लाभ घेतां

येत असून त्यांच्या कामांतहि यांत्रिक सुधारणा झाल्यामुळें त्यांचे श्रम कमी झाले आहेत व त्यांस विजेचे दिवे, टेलिफोन वगैरे अनेक आधुनिक सोयी प्राप्त झाल्या आहेत.

## रशियांतील कौटुंबिक परिस्थिति—

आपल्या सध्यांच्या सामाजिक परिस्थितींत जे लोक नोकर वगैरे ठेवूं शकतात व दिवसभर मुलांस नोकरांच्या स्वाधीन करून आपली लहर लागेल तेव्हांच त्यांचें कौतुक करण्याकरितां त्यांस जवळ करतात तेच लोक कौटुंबिक राहणीच्या गप्पा मारतात. रशियामध्यें कुटुंबसंस्थेस विशेषसा मान नाहीं व त्यामुळें तेथील मुलांची आबाळ होत असेल अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. रशियामध्यें विवाह हा पूर्णपणें प्रेममूलक आहे. तेथें विवाह करणें व घटस्फोट मिळविणें या गोष्टी सुलभ असल्यामुळें कोणत्याहि स्त्रीस आपल्या मर्जीविरुद्ध विवाहबंधनांत जखडून राहावें लागत नाहीं. रशियांत अनौरस संतति नाहीं. प्रत्येक मुलाच्या जन्माबरोबर त्याच्या पित्याचें नांव नोंदावें लागतें व पित्यास आपल्या उत्पन्नाचा चतुर्थांश मुलाच्या मातेस द्यावा लागतो. मग तीं स्त्रीपुरुष एकत्र राहात असोत किंवा नसोत. यामुळें स्त्रियांस केवळ स्वास्थ्याकरितां आपलें स्वातंत्र्य सोडावें लागत नाहीं. अनौरसतेचा अभाव असल्यामुळें मातृत्वास उत्तेजन मिळतें. घटस्फोटाची सुलभता असल्यामुळें वैषयिक नीतिमत्ता कमी होण्याच्या ऐवजीं अधिक सुधारते. रशियांतील नवीन पिढी नीतिमत्तेमध्यें इतर देशांपेक्षां कमी खास नाहीं. रशियांत प्रत्येक तरुणी स्वावलंबी व स्वतंत्र असते. तेथें कामाची वाण नसते त्यामुळें बेकारीची भीति असत नाहीं. याकरितां केवळ आर्थिक

स्वास्थ्याकरितां तिला एखाद्या पुरुषावर म्हणजे नवऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज राहात नाहीं. त्यामुळें आर्थिक लाभासाठीं आपलें शील विकण्यास अशा तरुणी सहसा तयार होणार नाहींत. रशियामध्यें वेश्याव्यवसाय पुष्कळच कमी झाला आहे. लंडनमध्यें पिकॅडेली, लीस्टर स्क्वेअर, रीजंट स्ट्रीट, वगैरे भागांत रात्रीं ११ चे पुढें जात असतां बाजूच्या गल्लींतून स्त्रियांची आवाहन सूचक हांक ऐकूं आली नाहीं असें सहसा घडत नाहीं. इतरहि मोठमोठ्या शहरांतून तोच अनुभव येतो. मॉस्कोमध्यें तसें फारसें आढळत नाहीं. म्हणजे रशियांत वेश्याव्यवसाय अजिबात बंद झाला आहे असें नव्हे. परकीयांच्या बाबतींत व विशेषत: दुष्काळाच्या दिवसांत तो सुरू असतो. परंतु लंडन, पॅरिस, बर्लिन, टोकियो, वगैरे शहरांसारखा तो भरमसाट नाहीं. एका हॉटेलांत एका इंग्लिश बोलणाऱ्या अनोळखी स्त्रीनें कांहीं तरी निमित्तानें टेलिफोन केल्याचा अनुभव एका ग्रंथकारानें नमूद करून ठेविला आहे. परंतु एकंदरींत हें प्रमाण इतर देशांच्या मानानें कमीच आहे व रशियांतील राहाणी अधिक सुधारली म्हणजे कदाचित् अजिबातहि कमी होईल. निदान रशियामध्यें स्त्रियांस पोटाकरितां वेश्याव्यवसाय करावा लागत नाहीं. कोणतीहि स्त्री मूल होण्याबद्दल गुन्हेगार धरली जात नाहीं. उलट मूल असलेल्या स्त्रीस मूल नसलेल्या स्त्रीपेक्षां अधिक हक्क मिळतात. कुमारी माता ही समाजाकडून निंद्य मानली जात नाहीं. घटस्फोट सुलभ असल्यामुळें स्त्रियांमध्यें परस्परांबद्दल मत्सर विशेष वाढत नाहीं.

हल्लींच्या रशियन राष्ट्रसंघामध्यें अनेक लहान लहान राष्ट्रें समाविष्ट झालीं आहेत. प्रत्येक राष्ट्रांत मातृभाषेचें शिक्षण सक्तीचें केलेलें आहे. रशियन भाषेची सक्ति करण्यांत आलेली नाहीं. पूर्वीं झारशाहीमध्यें मातृभाषेकडे दुर्लक्ष होत असून रशियन भाषा सक्तीनें शिकविली जात

असे. जॉर्जियामधील एक जुना अधिकारी अलिकडे राशियन भाषा शिकविली जात नाहीं म्हणून तक्रार करीत होता. याचे उलट वेल्स-मधील लोकांची वेल्श भाषा न शिकवितां इंग्रजी भाषा शिकविली जाते म्हणून तक्रार आहे.

झारशाहींत अनेक खेड्यांत लिहिणारा, वाचणारा एकहि मनुष्य आढ-ळत नसे. पोरकोव्हस्की या जिल्ह्यांत दरवर्षी शिक्षणावर ३० पौंड खर्च होत असत, पण या जिल्ह्यांत एकंदर ७०० गुत्ते व हॉटेलें होतीं व त्यांत २० लाख रुबल खर्च होत असत. या जिल्ह्यांतील एखाद्या गांवीं एखादा सरकारी हुकूम आल्यास दुसऱ्या गांवाहून तो वाचण्याकरितां माणूस आणवावा लागे.*

नवीन राजवटीनें आतां ही स्थिति अगदीं पूर्णपणें पालटली असून प्रत्येक व्यक्तीचा आयुष्यक्रम शिक्षण, उद्योगधंदा, आचार व विचार-स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि प्रगतिपर शासनसंस्था यांमुळें अगदीं निराळ्या प्रकारचा बनून गेला असून प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या गुणांचा पूर्ण विकास होण्यास भरपूर क्षेत्र व साधनें उपलब्ध करून देण्यांत आलीं आहेत. यामुळेंच आज राशियामधील राष्ट्रतेज जगाचे डोळे दिपविण्याइतकें उज्ज्वलतेनें झळकत आहे.

---

* Official Report of G. P. Sazonoff.

## प्रकरण आठवें

# पितापुत्रसंबंधांत पितृपूजेचें महत्त्व

### मृत पितरांबद्दल आदर—

मागें सांगितल्याप्रमाणें पितृसत्ताक पद्धति ही जगांतील विशेष पुढारलेल्या व सुसंस्कृत समाजांत रूढ झाल्यामुळें पित्यास कुटुंबामध्यें विशेष महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. या गोष्टीस कुटुंबांतील पिता हा सर्वांचें पोषण करणारी व्यक्ति व कुटुंबाच्या मालमत्तेचा परंपराप्राप्त धनी असणें ही गोष्ट प्रामुख्यानें कारणीभूत झाली असली तरी आणखीहि एक महत्त्वाची गोष्ट मनुष्यसमाजामध्यें पित्याचें महत्त्व स्थापन होण्यास कारणीभूत झालेली आहे. मनुष्यास भौतिक बाबतींत समृद्धि व सुख प्राप्त व्हावें अशी ज्याप्रमाणें इच्छा असते त्याप्रमाणेंच पारमार्थिक सुखाचीहि इच्छा असते व या दृश्य जगापेक्षां निराळ्या अशा कांहीं शक्ती मानवाच्या आयुष्याचें व सृष्टींतील महाभूतांचें नियंत्रण करीत असतात ही कल्पना प्रत्येक मानवसमाजांत दृढमूल झालेली असते. यामुळें परमेश्वर व मृत पितर यांबद्दल त्याच्या ठिकाणीं एक साशंक, सभय व सादर वृत्ति असते.

### पितरांचीं श्राद्धें—

या वृत्तीचाहि त्याच्या एकंदर कल्पनांवर व वागणुकीवर फार महत्त्वाचा परिणाम होतो. तोहि या कुटुंबव्यवस्थेचा व पितापुत्रांच्या संबंधाचा विचार करतांना आपणांस विचारांत घेतला पाहिजे. कुटुंबामध्यें पित्याचें विशेष महत्त्व स्थापन होण्याच्या कल्पनेच्या मुळाशीं ज्याप्रमाणें पित्याचें

कुटुंबांतील ज्येष्ठ स्थान व कुटुंबाच्या मालमत्तेवर असलेली त्याची सत्ता या गोष्टी कारणीभूत झाल्या; त्याप्रमाणेंच पितरांबद्दल वाटणारी एक प्रकारची श्रद्धा व विशेषतः मृत पितरांबद्दलचा भीतियुक्त आदर या गोष्टीहि कारण होत्या. मृत पितरांबद्दल ज्या मानानें आपण आदर अथवा अनादर दाखवूं, ज्या मानानें त्यांस संतुष्ट अगर रुष्ट करण्याची आपण कृति करूं, त्या मानानें त्यांचे आत्मे संतुष्ट अगर असंतुष्ट होऊन ते आपणांस लाभ अथवा हानि करण्यास प्रवृत्त होतात अशी समजूत फार प्राचीन कालापासून सर्व समाजांत रूढ होती. मृत पितरांचे आत्मे या जगांतल्याच आयुष्यक्रमाप्रमाणें पितृलोकांत आयुष्यक्रम आचरीत असावे अशी समजूत बहुतेक जगांतील सर्व लोकांत रूढ असून त्यांच्या स्वास्थ्याकरितां त्यांस पुरण्याच्या अथवा दहन करण्याच्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांच्या प्रीतींतलीं अगर सेवेंतलीं माणसें व आवश्यक वस्तु पुरण्याची अथवा दहन करण्याची चाल सर्वत्र प्राचीन काळीं रूढ असलेली आढळून येते व त्यानंतरहि पितरोद्देशानें श्राद्धादि विधि करून त्यांस तृप्त करण्याची प्रथाहि सर्वत्र रूढ आहे. अशा रीतीनें ही पितृपूजेची प्रथा पित्याच्या कुटुंबांतील महत्त्वासहि कारण झाली आहे. याकरितां या पितृपूजेसंबंधींच्या कल्पना निरनिराळ्या समाजांत कशा रूढ झालेल्या होत्या तें पाहूं.

### मृत पितरांबद्दल कल्पना—

मनुष्य मृत झाला असतां तो पितृलोकांत जातो व तेथें आपल्या स्वकीयांचें हित व परकीयांचा अथवा शत्रूंचा नाश करण्याच्या कामीं प्रयत्न करीत असतो, अशी समजूत अनेक मनुष्यजातींत आढळून येते. तथापि कांहीं जातींत अशीहि कल्पना रूढ असलेली आढळून येते कीं, मृतात्मे हे सामान्यतः त्रासदायकच असतात. तेव्हां मृतात्म्यां-

बद्दल ज्या समाजांत जशी भावना असेल त्या मानानें त्या समाजांत पितृपूजेच्या विधींमध्यें फरक आढळून येईल.

सामान्यतः प्राथमिक अवस्थेंतील समाजांत पितर आपल्या भूलोकावरील कुटुंबियांच्या हितार्थ प्रयत्न करीत असतात, अशीच समजूत असून, पितरांस चांगल्या चांगल्या वस्तू अर्पण करून त्यांस संतुष्ट ठेवण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें दिसून येते. उलट ज्या लोकांत पितरांबद्दल भयदायक कल्पना आहेत त्यांमध्येंहि पितरांपासून आपणांस त्रास होऊं नये म्हणून त्यांची कशी तरी समजूत करून त्यांस तुष्ट करून त्यांचा उपसर्ग आपणांस होऊं न देण्याची वृत्ति आढळते.

**वन्य समाजांतील कल्पना—**

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, टास्मानिया इत्यादि देशांत पितृपूजेचे प्रकार अगदीं प्राथमिक स्वरूपाचे व विशेष अवडंबर नसलेले आढळतात; तर पॉलिनेशिया, मॅलेनेशिया इत्यादि प्रदेशांत तिचा प्रसार बराच असून तिचें स्वरूपहि अधिक परिणत असलेलें आढळतें. आफ्रिकेंतील बांटू लोकांत व विशेषतः पश्चिमेकडील जमातींत पितृपूजा बरीच रूढ झालेली आढळते. तसेंच मलाया द्वीपकल्पांतील जमातींत ती प्रचलित असलेली दिसून येते. याप्रमाणें बहुतेक वन्य समाजांत जरी थोडी फार असंस्कृत स्थितींत असली तरी सर्वत्र पितृपूजा ही कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत रूढ असलेली आढळून येते.

**चिनी व जपानी लोकांतील पितृपूजा—**

चिनी लोकांमध्यें मृतात्म्यांस संतोषित करणें हें धार्मिक कृत्य मानतात. तसेंच आपल्या सत्कृत्यांवर पितृलोकांतील पितरांची स्थिति अवलंबून आहे अशी त्यांची समजूत आहे.

जपानी लोकांत आपले पितर आपल्या सर्व वागणुकीवर नजर ठेवतात अशी समजूत आहे व ही भावना त्यांस पराक्रमाचीं कृत्यें करण्यास प्रेरक होते व त्यामुळें त्यांच्याकडून युद्धांमध्यें शौर्याचीं कृत्यें होतात.

## पाश्चात्य समाजांतील पितृपूजा—

रोमन लोकांतहि पितृपूजेचें महत्त्व विशेष होतें. त्या लोकांत मृत पितरांचीं मेणाचीं वगैरे चित्रें करून व त्यांवर त्यांच्या संबंधीं माहिती लिहून तीं सार्वजनिक जागीं अगर घरांत प्रमुख ठिकाणीं ठेवण्याची पद्धत होती. त्याप्रमाणेंच भारतीयांप्रमाणेंच पितृतिथि पाळण्याचीहि प्रथा रोमन लोकांत असून पिंड देण्याच्या अधिकाराप्रमाणें दायविभागाचा अधिकार हें तत्त्व त्यांच्या कायद्यामध्येंहि रूढ होतें.

हर्बर्ट स्पेन्सरनें जगांतील सर्व धर्मांच्या मुळाशीं पितृपूजा होती असें तत्त्व प्रतिपादलें आहे व या पितरांनाच पुढें देवतास्वरूप प्राप्त झालें असेंहि म्हटलें आहे; पण आज हें मत बरोबर नाहीं असें प्रस्थापित झालें आहे.

## भरतखंडांतील पितृपूजा—

भरतखंडांत तर पितृपूजेस विशेष महत्त्व आहे ही गोष्ट आपण मृतांसंबंधीं जे और्ध्वदेहिक व श्राद्धादि विधि करतों त्यांवरून स्पष्ट होतेच. याकरितां पिंडदानादि क्रिया व श्राद्धादि विधि व्हावे म्हणून औरस पुत्र नसल्यास दत्तक पुत्रहि घेण्याची प्रथा आपणांत रूढ आहे.

मृत पितरांबद्दल पहिल्या दहा दिवसांत त्याचा पितृलोकीं जाण्याचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून उत्तर क्रियेमध्यें अनेक दानें देण्याची आपणांत चाल आहे व प्रत्येक मनुष्य आपल्या सामर्थ्याप्रमाणें तीं देत

असतो. त्याप्रमाणेंच पहिल्या बारा महिन्यांत प्रतिमासीं मासिक श्राद्ध करण्याची पूर्वी चाल होती. तीं सर्व श्राद्धें आतां वर्षश्राद्धाच्या आधीं त्याला जोडूनच करण्यांत येतात. वर्षश्राद्धासहि विशेष महत्त्व असून त्यावेळींहि मृताचा पितृलोकांतील रहिवास सुखाचा व्हावा म्हणून अनेक दानें देण्यांत येतात.

## मृत पितरांस कौल लावणें—

देवाप्रमाणेंच मृत पितरांस कौल लावून त्यांची कृपा संकटनिवारण करण्याकरितां संपादन करून घेण्याची प्रथा अनेक वन्य समाजांत आढळते. तसेंच पितरांस योग्य प्रकारें पूजा करून संतुष्ट न ठेवलें व त्यांची अवकृपा झाली तर वंशजांवर संकटें येतात अशीहि कल्पना अनेक वन्य समाजांत रूढ असून बहुतेक आपत्तींचा संबंध अशा लोकांकडून पितरांच्या रोषाशीं जोडण्यांत येतो व त्यांस संतुष्ट करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो.

## पितृपूजा व देवक—

पितृपूजेचा देवकांशींहि संबंध असावा असेंहि म्हणण्यास कांहीं जागा आहे. कांहीं वन्य समाजांत मृत पितर विशिष्ट प्राण्यांमध्यें वास करतात अशी समजूत आहे. श्राद्धाच्या दिवशीं कुत्र्यास मारूं नये अशी समजूत आपणांकडेहि रूढ आहे. सुमात्रांतील लोक पितर वाघामध्यें वास करतात असें मानतात. तेव्हां अशा समजुतींवरून कांहीं प्राण्यांची पूजा करण्यांत येते. कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, देवतापूजनानंतर पितृपूजेची कल्पना निघाली असावी व देवतांकरितां मंदिरें बांधण्याच्या चालीवरून पितरांच्या स्मरणार्थ इमारती बांधण्याची कल्पना निघाली असावी किंवा अशा प्रकारच्या इमारती प्रथम बांध-

ण्यांत येऊन नंतर त्यांत देवतांची स्थापना झाली असावी. उदाहरणार्थ, आपल्याकडे समाधिमंदिरामध्यें वर देवाच्या मूर्ती बसविण्याची पद्धति आज रूढ आहे.

यावरून आपणांस असें दिसतें कीं, पितृपूजेचें महत्त्व मानवसमाजांत फार प्राचीन काळापासून मानण्यांत येत असून पितरांचा संतोष साध्य करण्याची प्रवृत्ति, किंवा त्यांच्या रोषाची भीति व संकटसमयीं त्यांच्या सहाय्याची अपेक्षा या गोष्टी या पितृपूजेच्या मुळाशीं वास्तव्य करीत असतात. या पितृपूजेमुळें मृत पितरांचा, त्यांच्या जिवंत वंशजांशीं संबंध कायम ठेवण्यांत येतो, त्यामुळें कौटुंबिक मंडळींत व समाजांत सलोखा उत्पन्न होतो व कांहीं सामाजिक इष्ट असे परिणाम घडून येतात. तसेंच या पितृपूजेमुळेंच कुटुंबांतील ज्येष्ठ व्यक्तीस श्राद्धादि विधि करण्याचा अधिकार असल्यामुळें महत्त्व प्राप्त होतें. त्याचा वारसा व दायभागावरहि प्रत्यक्ष परिणाम होतो व त्यामुळें कुटुंबांत पित्याची सत्ता प्रस्थापित होण्यास मदत होते. याप्रमाणें पितृपूजा हा पितृसत्ताक पद्धतीचा एक महत्त्वाचा आधार होय.

**जिवंत पितरांबद्दल आदर—**

येथपर्यंत मृत पितरांबद्दलचा आदर व त्यांचा संतोष व अनुकूलता हीं श्राद्धादि द्वारां व इतर उपायांनीं प्राप्त करून घेण्यासंबंधीं कल्पना वन्य समाजापासून आजपर्यंतच्या सुसंस्कृत समाजांत कशी रूढ होत गेली आहे त्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. याप्रमाणें ज्या समाजांत मृत पितरांबद्दल आदर दाखविण्यांत येतो त्या समाजांत जिवंत पितरांबद्दलाहि आदर दाखविण्यांत येत असला पाहिजे हें उघड आहे. मातापित्याची सेवा करणें, त्यांच्या आज्ञा मानणें व जोंपर्यंत घरांतील कुटुंबव्यवस्था त्यांच्याकडे आहे तोंपर्यंत त्यांच्या मर्जीप्रमाणें

वागणें व वृद्धपणीं त्यांस सौख्य होईल व त्यांचा वृद्धापकाळ आनंदांत जाईल अशा रीतीनें योग्य ती तजवीज करणें व त्याप्रमाणेंच आदरयुक्त व विनयशील रीतीनें त्यांच्याशीं वर्तन ठेवणें हें सुसंस्कृत समाजांतील प्रत्येक मुलाचें कर्तव्य समजलें जातें.

आपल्या रामायण महाभारतादि ग्रंथांत याबद्दल अनेक ठिकाणीं वर्णन केलेलें असून पितरांबद्दल आदर दाखविण्याविषयीं अनेक ठिकाणीं उपदेश केलेला आहे.

## पितृसेवेचें महत्त्व—

पितृपूजा अथवा पितृसेवा हा इतर अनेक पुण्यकारक मार्गांपेक्षांहि श्रेष्ठ मार्ग आहे व वृद्ध मातापितरांची सेवा करणें हें तपश्चर्येपेक्षांहि श्रेष्ठ आहे ही गोष्ट महाभारतामध्यें जी धर्मव्याधाची गोष्ट दिलेली आहे तीवरून स्पष्ट होत आहे [महा. वन. २०९–२१८].*

---

* या ठिकाणीं कौशिक ब्राह्मण व धर्मव्याध यांची जी कथा आहे ती विस्तारभयास्तव संपूर्ण देतां येत नाहीं. परंतु त्या कथेंतील कांहीं भाग प्रस्तुत विषयास इतका महत्त्वाचा आहे कीं, कौशिक ब्राह्मण व धर्मव्याध या दोघांमधील संवाद व धर्मव्याधाची पितृपूजा यासंबंधीं कांहीं निवडक श्लोक येथें दिल्यावांचून राहवत नाहीं म्हणून या आख्यानांतील कांहीं श्लोक व त्यांचा अनुवाद येथें दिला आहे. जिज्ञासूंनीं धर्मव्याधानें केलेलें धर्मावरील विवेचन मूळांतून अवश्य वाचावें.

तत्र शुक्लांबरधरौ पितरावस्य पूजितौ ।
कृताहारौ तु संतुष्टावुपतिष्ठौ वरासने ॥ २१७–७ ॥

त्याप्रमाणेंच रामायणांत श्रावण हा आपल्या वृद्ध मातापितरांस तीर्थयात्रा घडवून आणण्याकरितां त्यांस कावडींत घालून नेत होता ही जी कथा वर्णन केलेली आहे तीमध्यें त्याची पितृभक्ति किती श्रद्धायुक्त व अंतःकरणापासून होती हें स्पष्ट होत आहे.

मध्ययुगीन कालांत पुंडलीकाचीहि अशीच कथा वर्णन करण्यांत येते व त्याची पितृभक्ति आदर्श म्हणून मानण्यांत येते. तसेंच त्याच्या

तस्य व्याधस्य पितरौ ब्राह्मणः संददर्शह।
धर्मव्याधस्तु तौ दृष्ट्वा पादेषु शिरसापतत्॥ ८॥

जामदग्न्येन रामेण यथा वृद्धौ सुपूजितौ।
तथा त्वया कृतं सर्वं तद्विशिष्टं च पुत्रक॥ १४॥

माता पिता च भगवनेतौ मे दैवतं परम्।
यद्दैवतेभ्यः कर्तव्यं तदेताभ्यां करोम्यहम्॥ १९॥

त्रयस्त्रिंशद्यथा देवाः सर्वे शक्रपुरोगमाः।
संपूज्या सर्व लोकस्य तथा वृद्धाविमौ मम॥ २०॥

एतौ मे परमं ब्रह्मन्पिता माता च दैवतम्।
एतौ पुष्पैः फलैरत्नैस्तोषयामि सदा द्विज॥ २२॥

एतदर्थं मम प्राणा भार्या पुत्रः सुहृज्जनः।
सपुत्रदारः शुश्रूषां नित्यमेव करोम्यहम्॥ २४॥

पञ्चैव गुरवो ब्रह्मन्पुरुषस्य बुभूषतः।
पितामाताऽग्निरात्मा च गुरुश्च द्विजसत्तम॥ २८॥

अतन्द्रितः कुरु क्षिप्रं मातापित्रोर्हि पूजनम्।
अतः परमहं धर्मं नान्यं पश्यामि कंचन॥ २१८–१४॥

या पितृभक्तीकरितां प्रत्यक्ष परमेश्वरानेंहि पंढरपूर येथें त्याच्यावर संतुष्ट होऊन कायमचें वास्तव्य केलें अशी आख्यायिका आज महाराष्ट्रांतील प्रत्येक आबालवृद्धाच्या तोंडीं असून लाखों लोक आज मोठ्या भक्तीनें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्या पुंडलीकानें विटेवर उभ्या केलेल्या त्या पंढरिनाथाचें दर्शन घेण्याकरितां शेंकडों मैलांवरून व कष्टकर प्रवास

---

तेथें शुभ्र वस्त्रें धारण केलेले व पूजा केलेले असे त्याचे आईबाप, भोजन झालेले व संतुष्टचित्त अशा स्थितींत उत्तम आसनावर बसलेले होते ॥ २१७, ७ ॥. त्या व्याधाचे आईबाप त्या ब्राह्मणानें पाहिले. धर्मव्याधानें त्यांना पाहिल्याबरोबर त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें ॥ ८ ॥. ज्याप्रमाणें जामदग्न्यरामानें ( परशुरामानें ) आपल्या वृद्ध पितरांची पूजा केली त्याप्रमाणें सर्व विशेष गोष्टी हे पुत्रका तूं केल्या आहेस ॥ १४ ॥. पिता व माता हीं हे भगवन् ! माझें परम दैवत आहे. जें दैवतांकरितां करावयाचें असतें तें मी यांच्या करितां करतों ॥ १९ ॥. ज्याप्रमाणें सर्व लोक इंद्रप्रमुख तेहतीस देवांची पूजा करतात, तशी मी या वृद्धांची पूजा करितों ॥ २० ॥. हीं माझीं पिता व माता माझें दैवत असून परम ब्रह्म आहे. यांस मी, हे ब्राह्मणा ? नेहमीं पुष्पें, फळें, अन्न देऊन संतुष्ट करीत असतों ॥ २२ ॥. यांच्याकरितांच माझे प्राण, भार्या, पुत्र व सुहृज्जन आहेत व यांची मी स्त्रीपुत्रांसह नित्य शुश्रूषा करतों ॥ २४ ॥. श्रेष्ठ पुरुषाला, हे ब्राह्मणा ! पांच गुरु असतात. पिता, माता, अग्नि, आत्मा व गुरु, हे ते द्विज श्रेष्ठा ! गुरु होत ॥ २८ ॥. अतन्द्रित मनानें मातापित्यांचें वरचेवर पूजन कर, यापेक्षां श्रेष्ठ धर्म दुसरा कोणताहि मला दिसत नाहीं ॥ २१८, १४ ॥.

करून पायांनीं चालत प्रतिवर्षी येत असतात व परमेश्वराबरोबर त्या भक्तश्रेष्ठाचेंहि दर्शन घेऊन आपण पावन झालों असें मानीत मोठ्या आनंदानें तो सोहळा अनुभवून आपापल्या घरीं जातात; एवढेंच नव्हे तर ही परंपरा अथवा वारी आपल्या घराण्यामध्यें सतत चालावी असें व्रत पिढ्यानुपिढ्या अंगीकारतात. या गोष्टीमध्यें पितृपूजेची एक प्रकारें परमावधि झालेली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

याप्रमाणें आपल्या पौराणिक व संत वाङ्मयामध्यें अशा तऱ्हेचीं मातृ-पितृभक्तांचीं उदाहरणें अनेक दाखवितां येतील.

## अर्वाचीन कालांतहि पितरांबद्दल आदर—

अर्वाचीन काळच्या सुधारलेल्या म्हणविणाऱ्या व अनेक बाबतींत अश्रद्धा बाळगणाऱ्या जगांतहि शोध केल्यास आपणांस आदर्श पितृ-भक्तीचीं अनेक उदाहरणें आढळल्यावांचून राहणार नाहींत. माझ्या परिचयाचे एक गृहस्थ कोठेंहि गांवास जावयास निघाले म्हणजे घरून निघतांना आपल्या वृद्ध मातोश्रीस सप्रेम भक्तीनें वंदन केल्याशिवाय बाहेर पडत नाहींत व त्याच वेळीं जणूं कांहीं आपलें उदाहरण पुढें आपल्या मुलांनींहि आपल्या डोळ्यांसमोर ठेवून हीच परंपरा पुढें चाल-वावी म्हणून आपल्या सर्व मुलांस बोलावून त्यांचेकडून अभिवंदन घेऊन नंतर पुढें प्रयाण करतात. याप्रमाणें आपणां भारतीयांच्या मनांत मातापित्यांबद्दलचा आदर हा संस्कार अगदीं हाडींमांसीं खिळल्यासारखा झाला आहे.

अशाच तऱ्हेचें व यापेक्षांहि विस्मयकारक उदाहरण मीं नुकतेंच नाशिक येथें साहित्यसंमेलनाकरितां गेलों असतां अवलोकन केलें. तेथें रा. शिंदे नांवाचे एक मिलिटरी पेन्शनर गृहस्थ एक सायकलीचें दुकान

चालवितात. ते स्वतः पन्नाशीच्यापुढें असून त्यांचे वडील व मातोश्री सुमारें नव्वद व ऐशीच्यापुढें असलेल्या वयाचीं आहेत. हे गृहस्थ अत्यंत पितृभक्त असून प्रत्येक बाबतींत वाडिलांची आज्ञा घेतल्याशिवाय कोणताहि व्यवहार करीत नाहींत. वाडिलांची आज्ञा पालन करणें हें ते आपलें प्रथम कर्तव्य समजतात. एवढेंच नव्हे तर प्रत्येक एकादशीस आपल्या वृद्ध वडील व मातोश्रींचें ईश्वराच्या मूर्तीप्रमाणें पूजन करून त्यांचें पादोदक तीर्थ म्हणून ग्रहण करतात. ही पितृपूजा पाहण्यास ते अनेक सद्गृहस्थांस व मित्रांस आमंत्रण करतात. त्याप्रमाणें आम्हांसहि हा पितृपूजा पाहण्याचा योग आला होता. अनेक पाश्चात्य गृहस्थहि त्यांचें या पितृपूजेबद्दल कौतुक करतांना आढळले. त्याप्रमाणेंच अनेक तरुणांनींहि त्यांचें अनुकरण करून आपआपल्या मातापित्यांचें पूजन करण्याची प्रथा सुरू केल्याचें सांगण्यांत आलें. या त्यांच्या वृद्ध पित्याच्या ठिकाणीं गुरुमूर्तीचा संचार होऊन अवश्य त्यावेळीं व विशेषतः संकटप्रसंगीं अथवा मनामध्यें संशय उत्पन्न झाला असतां आपणांस त्यांचेकडून योग्य तो संदेश किंवा आदेश व पूर्व सूचनाहि मिळतात अशी त्यांची श्रद्धा आहे व अशा सूचनांचा त्यांनीं दैनंदिनी रूपानें संग्रह करून ठेवला आहे.

याप्रमाणें या पितृपूजेचें महत्त्व सर्व जगामध्यें व विशेषतः भरतखंडामध्यें प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत कसें चालत आलेलें आहे तें आपणास वरील विवेचनावरून कळून येईल. तसेंच पितापुत्रसंबंधामध्यें पित्याबद्दलचा आदर वाढविण्याच्या कामीं तिनें किती कार्य केलें असलें पाहिजे त्याची कल्पना येईल.

---

# प्रकरण नववें

# पुत्रमहत्त्व व दत्तक पुत्र

**औरस पुत्राची इच्छा—**

याप्रमाणें निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या अवस्थांमध्यें पित्याचें महत्त्व कुटुंबांत व समाजांत कसकसें होतें यासंबंधीं विवेचन आतांपर्यंत करण्यांत आलें. यानंतर मनुष्यप्राण्यामध्यें जी स्वसंरक्षणाची प्रवृत्ति आहे तीमुळेंच पुढें प्रतिनिधीमार्फत स्वतःस चिरस्थायी करण्याची जी वृत्ति उत्पन्न होते तीमुळें पुत्रास महत्त्व प्राप्त होतें. प्रत्येक मनुष्यास आपलें व आपल्या वंशाचें नांव कायम राहावें, आपण संपादन केलेली मालमत्ता अविच्छिन्न रहावी व ती आपल्यापुढें आपल्या नांवानें कोणी तरी उपभोगावी अशी इच्छा असते. ही इच्छा ही एक निसर्गाची फार महत्त्वाची शक्ति आहे व या शक्तीमुळेंच निसर्ग आपले सृष्टिक्रम यथार्थपणें पुढें चालविण्याचें कार्य करीत असतो. याकरितां प्रत्येक मनुष्यास आपणांस पुत्र व्हावा ही इच्छा योग्य वेळीं उत्पन्न होते व ती इच्छा पूर्ण करण्याकरितां तो शक्य ती खटपट करीत असतो. याकरितां तो स्त्रीचें प्रेमाराधन करून किंवा स्वसामर्थ्यानें तीस वश करून तिला आपलीशी करतो व तिच्या ठिकाणीं संतती निर्माण करतो. पुत्राचें महत्त्व किती आहे हें पूर्वीं एका ठिकाणीं वर्णन केलेंच आहे. वैदिक आर्यांमध्यें परमेश्वराची प्रार्थना करून त्यापाशीं अभीष्ट याचना करतांना 'आम्हांस वीर पुत्र दे' अशीच त्याची अनेकदां प्रार्थना केलेली आढळते. अश्वमेध यज्ञाची फलश्रुति म्हणून परमेश्वरास प्रार्थना करतांना 'अस्य यजमानस्य वीरो जायताम्।' [वाज. सं.

२२.२० ] अशी प्रार्थना करण्यांत येत असे. तसेंच नववधूस आशीर्वाद देतांना ती वीरांस जन्म देणारी श्रद्धाळु व आप्तेष्ट व पशूंस सुख देणारी व्हावी असें म्हणत असत व तिच्या ठिकाणीं दहा पुत्र व्हावेत अशी प्रार्थना करण्यांत येत असे. तसेंच तिनें पुत्र व नातवांसह घरांत नांदावें अशी इच्छा व्यक्त करण्यांत येत असे.*

यावरून वैदिक समाजांतील लोकांस पुत्राचें महत्त्व किती वाटत असे तें व्यक्त होतें.

## निपुत्रिकाबद्दल अनादर—

याचबरोबर निपुत्रिक मनुष्यास समाजामध्यें फार दुर्दैवी व अपशकुनी समजलें जात असे. त्याच्या घरीं अन्नसुद्धां घेऊं नये अशी समजूत असे.

पुत्ररूपानें वंशाची वृद्धि झाली नाहीं तर पितर पिंडोदकाच्या अभावीं दुर्गतीस जातात अशी समजूत प्राचीन कालीं आर्यलोकांत प्रचलित होती. याचें उत्तम उदाहरण म्हणजे महाभारताच्या आदि पर्वांतील जरत्कारूची कथा होय. जरत्कारू हा एकटाच वंशज उरल्यामुळें त्याचे

---

* अघोरचक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः ।
वीरसूर्देवकामा स्योना शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥
इमां त्वमिन्द्र मीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ।
दशास्यां पुत्राना धेहि पतिमेकादशं कृधि ॥
सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञी श्वश्र्वां भव ।
ननान्दरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधि देवृषु ॥
ऋ. १०.८५,४४–४६

पितर एका वृक्षाच्या एका मुळाच्या आधारावर लोंबकळत असलेले त्यास दिसले व त्यांस सद्गति मिळावी म्हणून त्यानें विवाह करण्याचें कबूल केलें व नागकन्या जरत्कारी हिच्याशीं लग्न करून आस्तिक ऋषीस जन्म दिला व त्यानें पुढें आपल्या मातुल कुलाचें जनमेजयाच्या सर्पसत्रापासून रक्षण केलें.

**पुत्रप्रशंसा—**

पुत्राची प्रशंसा अर्वाचीन कालींहि अनेक कवींनीं केली आहे. भवभूतीचा प्रसिद्ध श्लोक अनेक लोकांच्या परिचयाचा असेल :

**“ अन्तःकरणतत्त्वस्य दंपत्योः स्नेहसंश्रयात् ।**
**आनन्दग्रन्थिरेको यं अपत्यमिति बुध्यते ॥ ” ***

[ उ. रा. ]

कालिदासाचेंहि

**अङ्काश्रयप्रणयिनस्तनया वहन्तो ।**
**धन्यास्तदंगरजसा मलिनीभवन्ति ॥ ” ‡**

हें वचन सर्वश्रुतच आहे.

अशा तऱ्हेनें पुत्राची प्रशंसा अनेक सुभाषितांतून केलेली आढळते. उदाहरणार्थ,

---

* पतिपत्नींच्या प्रेमळपणामुळें त्यांच्या अंतःकरणतत्त्वाची जणूं काय एक ग्रंथीच बांधली जाते व तिलाच अपत्य म्हणून ओळखलें जातें.

‡ प्रेमानें मुलाचे मांडीवर घेऊन लाड करतांना ज्यांचें अंग धुळीनें मलीन होतें ते लोक धन्य होत.

**स्वगर्भशुक्तिनिर्भिन्नं सुवृत्तं सुतमौक्तिकम् ।**
**वंशश्रीतिलकीभूतं मन्दभाग्यस्य दुर्लभम् ॥ " ***

तसेंच महाभारतांत

**" पुत्रस्पर्शात्सुखतरः स्पर्शो लोके न विद्यते । " †**

[ महा. भा. १.७४,५८ ]

असें म्हटलें आहे.

याच्या उलट निपुत्रिकास दूषणें दिलेलींहि अनेक ठिकाणीं आढळतात. उदाहरणार्थ,

**" निन्द्यन्ते पितृभिस्तैर्निरपत्यधनः पुमान् ।**
**अध्वनीनैरतिश्रान्तैरवकेशीव पादपः ॥ " ‡**

त्याप्रमाणेंच

**" अपुत्रस्य गृहं शून्यं सन्मित्ररहितस्य च ।**
**मूर्खस्य च दिशः शून्याः सर्वशून्या दरिद्रता ॥ " §**

अशा प्रकारचीं अनेक सुभाषितें आढळतात.

---

* गर्भरूपी शिंपल्यांतून निघालेलें वाटोळें असें पुत्ररूपी मोतीं वंशास ललामभूत असें असतें व अभागी लोकांस दुर्लभ असतें.

† पुत्रस्पर्शापेक्षां सुखकारक असा दुसरा कोणताहि स्पर्श नाहीं.

‡ निपुत्रिक मनुष्याची पितर निंदा करतात, ज्याप्रमाणें निष्पर्ण अशा वृक्षाची थकलेले वाटसरू लोक निंदा करतात.

§ निपुत्रिकाचें घर शून्यवत् असतें, त्याप्रमाणें ज्याला कोणी चांगला मित्र नाहीं त्याचेंहि घर शून्यवत् असतें. मूर्खाला सर्व दिशा शून्यवत् असतात व दरिद्री मनुष्याला सर्व जग शून्यवत् असतें.

## पुत्रप्राप्त्यर्थ तळमळ व परिश्रम—

हरिश्चंद्रानें जन्मलेला पुत्र बलि देण्याच्या अटीवरहि पुत्र मिळण्याची याचना वरुणाजवळ केल्याची कथा ऐतरेय ब्राह्मणांत आहे. तिचा उल्लेख आतांपर्यंत अनेकदां आला आहे.

शंतनूनें आपले सात पुत्र आपल्या देखत गंगेनें पाण्यांत बुडविलेले पाहून आठवा पुत्र बुडविण्यास तिला प्रतिबंध केला व असें करण्यानें गंगेच्या सहवासास मुकण्याचेंहि त्यानें पतकरलें. यावरून पित्यास केव्हां केव्हां स्त्रीसुखापेक्षांहि पुत्रसुख अधिक प्रिय असतें ही गोष्ट स्पष्ट होते.

## दत्तकपुत्र–वैदिक परंपरा—

याप्रमाणें पुत्र असणें ही मोठ्या भाग्याची गोष्ट व पुत्र नसणें ही अतिशय दुर्भाग्याची गोष्ट मानली जात असे. याकरितां औरस पुत्र नसेल तर दत्तक पुत्र तरी घ्यावा अशी कल्पना प्रचलित झाली.

या दृष्टीनें पाहूं गेल्यास अनेक समाजांत दत्तक पुत्र घेण्याची पद्धति रूढ असलेली आढळते व या सर्व खटपटीच्या मुळाशीं स्वतःचा वंश वाढावा ही स्वत्वरक्षणाची भावना असते. तेव्हां आपण या दृष्टीनें निरनिराळ्या समाजांचें निरीक्षण करूं.

दत्तक देण्यासंबंधींचा उल्लेख प्रथम ऋग्वेदांत आढळतो (ऋ. १. २४). या वेळीं अजीगर्तानें आपला मुलगा हरिश्चंद्रास नरमेधाकरितां विकत दिला होता, तो विश्वामित्रानें दत्तक घेतला. याचें नांव शुनःशेप असें होतें तें बदलून विश्वामित्रानें देवरात असें ठेविलें. देवरात हा पुढें प्रसिद्ध होऊन प्रवर ऋषि झाला. हीच कथा ऐतरेय ब्राह्मण

(७.१८) व भागवत (९.१६,२८–३६) यांत सांगितली आहे. या कथेचा पूर्वी एका प्रकरणांत उल्लेख केलाच आहे.

यजुर्वेदांत अत्रि ऋषीनीं आपलीं सर्व मुलें उर्वाच्या पुत्रास दत्तक दिल्याचा उल्लेख आहे.[1]

**पौराणिक व ऐतिहासिक परंपरा—**

रामायणांत दशरथानें लोमपादास आपली मुलगी शांता दत्तक दिली व ती त्यानें ऋष्यशृंगास विवाह करून दिली अशी कथा आहे (वाल्मिकी रामायण बालकाण्ड ११·२–७).[2] दुसऱ्या पाठाप्रमाणें शांता ही लोमपादाची मुलगी असून दशरथानें दत्तक घेऊन ऋष्यशृंगास दिली होती असें म्हटलें आहे. वसुदेवानें आपली मुलगी पृथा ही कुंतिभोजास दत्तक दिली होती व तीच त्यानें पुढें पंडूस दिली (हरिवंश ३४·२७). याखेरीज हेमाद्रीच्या दान खंडामध्यें (५.१२) अनेक उल्लेख आहेत. पुत्राप्रमाणें कन्या दत्तक देण्याची चालहि प्राचीन असून ती कलिवर्ज्य प्रकरणांत वर्ज्य म्हणून सांगितलेली नाहीं व ती पूर्वीप्रमाणें सध्यांहि रूढ आहे.

---

१ अत्रिरददौर्वाय प्रजां पुत्रकामस्य स रिरिचानोऽमन्यत निर्वीर्यः शिथिलो यातयामास एतं चतूरात्रमपश्यत्तमहस्तेनायजत ।

(तै. सं. ७·१,८)

२ इक्ष्वाकूणां कुले जातो भविष्यति सुधार्मिकः ॥
नाम्ना दशरथो वीरः श्रीमान् सत्यपराक्रमः ॥ २ ॥
सख्यं तस्याङ्गराजेन भविष्यति महात्मना ॥
कन्या चास्य महाभागा शान्ता नाम भविष्यति ॥ ३ ॥

## स्मृतिकालीन दत्तकाबद्दलची कल्पना—

ही दत्तक पुत्र देण्याची चाल मनूपेक्षांहि प्राचीन असून मनूनें आपल्या संहितेंत फक्त त्या चालीचा निर्देश केलेला आहे. दत्तकाच्या बाबतींत वय व संख्या यांची मर्यादा घातलेली कोठें आढळत नाहीं. फक्त सदृश असावा एवढाच निर्बंध आढळतो. बाकीचे इतर सर्व निर्बंध अर्वाचीन आहेत.

मनूनें निपुत्रिकानें कसेंहि करून पुत्र करावा व त्याचा हेतु आपणास पिंडोदक मिळावें व आपलें नांव पुढें चालावें असा मुख्यतः असतो,[1] असें म्हटलें आहे.

पिंडदानाचा हेतु आपलें पारलौकिक कल्याण व्हावें, व आपणांस उत्तम लोकाची प्राप्ति व्हावी हा असतो. तसेंच नामसंकीर्तन म्हणजे आपला

अपुत्रस्त्वङ्गराजो वै लोमपाद इति श्रुतः ॥
स राजानं दशरथं प्रार्थयिष्यति भूमिपः ॥ ४ ॥

अनपत्योऽस्मि धर्मज्ञ कन्येयं मम दीयताम् ॥
शान्ता शान्तेन मनसा पुत्रार्थे वरवर्णिनी ॥ ५ ॥

ततो राजा दशरथो मनसाभिविचिन्त्य च ॥
दास्यतेतां तदा कन्यां शान्तामङ्गाधिपाय सः ॥ ६ ॥

प्रतिगृह्य तु तां कन्यां स राजा विगतज्वरः ॥
नगरं यास्यति क्षिप्रं प्रहृष्टेनान्तरात्मना ॥ ७ ॥

१ अपुत्रेण सुतः कार्यो यादृक्तादृक् प्रयत्नतः ।
पिंडोदकक्रियाहेतोर्नामसंकीर्तनाय च ।

मनु

लौकिक पुढें चालावा. यामध्यें अनेक प्रकार उद्दिष्ट असतात. आपल्या पुत्रानें अनेक गोष्टी करून आपली कीर्ति चिरंतन करावी अशी अपेक्षा पित्यास असते व हा लौकिक पुढें दिलेल्या सहा साधनांनीं प्राप्त होतो असें म्हटलेलें आढळतें. तीं साधनें म्हणजे ( १ ) स्वाध्याय ( २ ) दान, ( यासंबंधीं मत्स्यपुराण २·६७२. १·७६०; अग्नि. १·१०९–१४; ३७६–३८६ पहा. ) ( ३ ) तीर्थयात्रा ( –मदन पारिजात तीर्थप्रकरण; तीर्थेंदुशेखर. ) ( ४ ) पुराणश्रवण. ( ५ ) योगसाधन. ( ६ ) संन्यासग्रहण.

अत्रिस्मृतीमध्येंहि अशाच तऱ्हेचा श्लोक आढळतो.

**अपुत्रेणैव कर्तव्यः पुत्रप्रतिनिधिः सदा ।**
**पिंडोदक क्रियाहेतोर्यस्मात्तस्मात्प्रयत्नतः ॥**

याप्रमाणेंच ऐतरेय ब्राह्मणांतहि पुत्राचें महत्त्व वर्णन केलें आहे. त्याचा उल्लेख पूर्वीं केलाच आहे.

तैत्तिरीय संहितेंतहि ब्राह्मण हा जन्मतः तीन ऋणांनीं युक्त असतो. व तो पुत्रप्राप्तीनंतर ऋणमुक्त होतो असें वर्णन आहे. त्याचाहि उल्लेख त्याच ठिकाणीं केला आहे.

पुत्रग्रहण हा विधि नित्य नसून काम्य मानला आहे. याबद्दल असें वचन आहे कीं, ' तस्मादन्वयव्यतिरेकाभ्यां निरुक्तपिंडोदकक्रियाहेतुकः उक्तवाक्यैर्विहितः पुत्रप्रतिनिधिः काम्य एव । कामवाचात्र जीवतो वाक्यकरणान्मृताहे भूरिभोजनात् गयायां पिंडदानाच्च त्रिभिः पुत्रस्य पुत्रतेत्यादिः ॥

**नियोगपद्धति—**

ज्याप्रमाणें औरस पुत्र नसल्यास दत्तक पुत्र घेण्याची प्रथा होती, त्याप्रमाणेंच एखादा मनुष्य निपुत्रिक वारला असतां त्याचा वंश पुढें



62457

चालावा व त्याला परलोकीं चांगली गति प्राप्त व्हावी याकरितां त्याच्या स्त्रीच्या ठिकाणीं नियोग पद्धतीनें पुत्र उत्पन्न करण्याची चालहि भारतीय समाजांत प्राचीन काळीं रूढ असलेली दिसून येते. मनूनें उल्लेखिलेल्या बारा पुत्रांमध्यें क्षेत्रज म्हणून जो पुत्र सांगितलेला आहे तो अशा नियोग पद्धतीनें एका मनुष्याच्या स्त्रीच्या ठिकाणीं परकीय पुरुषानें नियोग पद्धतीनेंच उत्पन्न केलेलाच असे व ज्याच्या स्त्रीच्या ठिकाणीं तो जन्म घेत असे त्या स्त्रीचा पति हा क्षेत्रपति असल्यामुळें तो त्या मुलाचा पिता मानण्यांत येत असे व हा औरसानंतर तितक्याच महत्त्वाचा मानण्यांत येत असून त्यास पहिल्या सहा दायाद पुत्रांत स्थान असे. महाभारतामध्यें विचित्रवीर्याच्या स्त्रीच्या ठिकाणीं सत्यवती-पुत्र पाराशर व्यास यांनीं पंडु व धृतराष्ट्र यांस उत्पन्न केल्याची कथा हें या नियोगजन्य संततीचें सर्वांत ठळक उदाहरण आहे.

सामान्यतः स्त्रीच्या दिरानें नियोग पद्धतीनें पुत्र उत्पन्न करावा अशी पद्धति असे. व म्हणूनच त्यास देवर असें म्हणत. यासंबंधीं याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें नियम दिलेले आढळतात. अर्थात् ही पद्धति पुढें त्याज्य मानली गेली व याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें जरी तिचा उल्लेख असला तरी मनूनें ती गर्ह्य मानल्यामुळें विज्ञानेश्वरानेंहि आपल्या मिताक्षरा-टीकेमध्यें तिचा निषेध केला आहे.

## दत्तक घेण्यांतील हेतु—

दत्तक पुत्र घेण्यामध्यें दोन हेतु असतात. एक आपली वंशवृद्धि व्हावी, आपलें घर व नांव पुढें कायम राहावें, व अशा रीतीनें जणूं कांहीं आपणांस चिरजीवित्व मिळावें ही कल्पना असते व दुसरी आप-णांस परलोकांतील वस्ती सुखावह व्हावी म्हणून आपल्यामागें कोणी

तरी आपणांस पिंडदान वगैरे क्रिया कराव्या ही इच्छा असते. या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका इच्छेनें प्रेरित होऊन बहुतेक सर्व समाजांत दत्तकपुत्र घेण्याची प्रथा रूढ झालेली आढळून येते. या ऐहिक व पारलौकिक कल्याणासंबंधींच्या कल्पना वर व्यक्त केल्या आहेतच.

### दत्तविधानाचा विधि—

दत्तविधानविधीमध्यें आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेणाऱ्यानें देणाऱ्याजवळ मुलाची मागणी करणें व त्याप्रमाणें त्यानें दान करून घेणारानें प्रतिग्रह करणें या गोष्टींस प्राधान्य देण्यांत येतें व प्रचलित कायद्याप्रमाणेंहि दान आणि प्रतिग्रह या गोष्टीच प्रमुख मानल्या आहेत. त्यानंतर करावयाचा होम हा विधीमध्यें अंतर्भूत असला तरी कायदेशीरपणास अवश्य मानलेला नाहीं. परंतु या दत्तकाच्या मुळाशीं जी पुत्र करून घेण्याची कल्पना आहे तीमुळें अनेक समाजांत निरनिराळे पुत्रीकरणदर्शक विधि अथवा संस्कार प्रचलित झाले आहेत.

### ग्रीक वगैरे लोकांतील विधि—

दत्तक मुलगा हा दत्तक घेणाऱ्या पित्याचें अपत्य समजण्यांत येत असल्यामुळें दत्तविधानाचा जो विधि करण्यांत येतो त्यांतहि दत्तक घेणारा त्या मुलास जणूं कांहीं जन्म देत आहे अशा प्रकारची क्रिया करण्यांत येते. अशा क्रियेमध्यें माता मुलास स्तनपान देते त्याप्रमाणें दत्तक मुलास स्तनपान करण्याच्या विधीस प्राधान्य दिलेलें कांहीं समाजांत आढळून येतें. डायोडोरसनें लिहिलेल्या दंतकथेमध्यें हिरानें हिराक्लिसला दत्तक घेतांना त्यास स्तनपान दिलें होतें असा उल्लेख केला आहे. यावरून ग्रीक लोकांमध्यें असा प्रघात होता असें दिसतें. रोमन

लोकांतहि अशाच प्रकारची पद्धति होती. बॉस्नियामधील तुर्क लोकांत अद्यापहि हा प्रघात आहे.

**आशियांतील प्राथमिक समाजांतील विधि—**

हिंदुकुश पर्वतावरील एका वृद्ध काफीर माणसानें सर जॉर्ज रॉबर्ट-सन् यास आपला दत्तक पिता मानलें होतें व याकरितां त्यानें रॉबर्ट-सन याच्या छातीस डाव्या बाजूस लोणी लावून तें चोखून घेतलें ( Kafirs of the Hindukush ).

सरकॅशियन लोकांमध्येंहि स्तनपानविधीस दत्तविधानामध्यें प्राधान्य देण्यांत येतें व भावी आई दत्तक पुत्रास स्तनपान करविते. या समजु-तीचा सरकॅशियन लोकांत इतका प्रभाव आहे कीं, एखादा मनुष्य आपल्या प्रतिस्पर्ध्याचा खून करून त्याच्या आईचें केव्हां केव्हां जबरदस्तीनेंहि स्तनपान करतो व आपणच तिच्या मृत पुत्राच्या ठिकाणीं तिचा पुत्र होऊन पुढील वैराचें उपशमन करतो. सरकॅशियन लोकांत स्त्रीच्या स्तनाचें तीन वेळां चुंबन घेतलें कीं, तिचें पुत्रत्व प्राप्त होतें.

**ईजिप्त व अबिसीनियामधील विधि—**

प्राचीन इजिप्शियन वाङ्मयांतहि दत्तविधानविधीमध्यें स्तनपानास प्रथम स्थान देण्यांत आलें आहे. स्वाभाविकतः दत्तक मुलास स्तनपान देण्याचा मान आईचा असे. परंतु समाजामध्यें जसजसें स्त्रीचें महत्त्व कमी होऊन पुरुषाचें महत्त्व वाढत गेलें तसा हा मानहि पुरुषानें आपणांकडे घेऊन तोच दत्तकास स्तनपान देण्याचा विधि करूं लागला. आफ्रिकेंतील गॅला नांवाच्या लोकांत या दत्तक मुलांबद्दल असा दुर्लौ-किक आहे कीं, ते आपल्या दत्तक पित्याचें स्तनपान इतक्या जोरानें करतात कीं, त्यांतून रक्त निघतें.

अबिसिनियामध्यें दत्तक पिता दत्तक मुलास आपलें एक बोट चोखा-वयास देतो व दत्तक मुलगा तें चोखून आतां मी तुमचा मुलगा झालों असें म्हणतो.

**इतर ठिकाणचे विधि—**

ब्रिटिश कोलंबियामध्यें सिंपशियन नांवाच्या जमातीमध्यें अशी पद्धत आहे कीं, ज्या स्त्रीस मूल दत्तक घ्यावयाचें असेल ती त्या मुलास आपल्या दोन पायांमध्यें धरून त्यास जन्म दिल्याचा भाव करते.

इंग्लंडमध्यें विवाहपूर्व झालेल्या संततीस विवाहसमयीं आपल्या झग्या-खालीं झांकून घेऊन औरसपणाचा हक्क देतां येतो अशी जी समजूत थोड्याच कालापूर्वी कांहीं लोकांत प्रचलित होती तिच्या मुळाशीं वरीलच कल्पना असावी. आपल्याकडेहि म्होतूर लावतांना पहिलीं मुलें स्त्रीनें आपल्या पदराखालीं घेण्याची चाल आढळते. यावरून पहिल्या घरच्या मुलास पदराखालीं आलेला असें संबोधण्याची प्रथा आहे.

कँबोडियामध्यें दत्तविधानाचा एक मोठा समारंभ करण्यांत येतो व निसर्गाच्या चुकीमुळें विशिष्ट मुलगा भलत्याच आईबापांच्या पोटीं जन्मला असून ती चूक दुरुस्त करण्याकरितां त्यास आज अमूक आईबाप दत्तक घेत आहेत तरी पितरांनीं त्यास आशीर्वाद द्यावा अशी प्रार्थना करण्यांत येते.

**परंपरा कायम राखण्याची इच्छा—**

बेहरिंग सामुद्रधुनीवरील एस्किमो लोकांत पितृपरंपरा कायम राहावी यासाठीं दत्तक घेण्यांत येतो. त्याप्रमाणेंच यांचेपासून अतिशय दूर असलेल्या आफ्रिकेंतल्या बांटू लोकांतहि याच हेतूनें दत्तक घेण्यांत येतो

व या लोकांत पितृपूजेस फार महत्त्व आहे. बांटू लोकांत निपुत्रिक अवस्थेंत मृत्यु येणें ही फार मोठी आपत्ति समजतात व ती टाळ-ण्याचा शक्य तो प्रयत्न करतात. यामुळें बहुधा बांटू लोकांत मनुष्य निपुत्रिक अवस्थेंत मरत नाहीं. डेलागोआ बे वरील बरोंगा लोकांत पुत्रहानीमुळें वंशखंडन होणें हें अत्यंत मोठें दुर्भाग्य समजलें जातें व तें टाळण्याकरितां बहिणीच्या मुलास बहुधा दत्तक घेण्यांत येतें व याकरितां तीस बाळंतपणाकरितांच घरीं आणून ठेवण्यांत येतें.

झुलू लोकांतहि मृत पूर्वजांची स्मृति जागृत राहावी व त्यांचीं श्राद्धें यथासांग होत राहावीं याच हेतूनें दत्तक पुत्र घेण्यांत येतो.

वर उल्लेखिलेल्या एस्किमो लोकांतहि मृत पितरांचे आत्मे हे संरक्षक पुरुष मानण्यांत येऊन त्यांचें श्राद्ध व संस्मरण अविछिन्न होत राहावें व त्यांच्या प्रतिमांस उत्सवांमध्यें वगैरे योग्य स्थान मिळावें अशी इच्छा असते. याकरितां ते दत्तक पुत्र घेतात. नाहीं तर आपणांस अनेक जन्म दारिद्र्य भोगावें लागेल अशी त्यांची समजूत असते. ( Rink–Tales and Traditions of the Eskimo; p. 44–63. )

### समाजबलसंवर्धन—

परलोकप्राप्तीप्रमाणेंच समाजाचें बलसंवर्धन हाहि एक दत्तक घेण्या-मध्यें महत्त्वाचा हेतु असतो. त्याप्रमाणें उत्तर अमेरिकेंतील कॅन्सस लोकांत लढाईमध्यें कैद केलेल्या स्त्रिया आणि मुलें यांस आपल्या जमातीमध्यें सामील करण्यांत येतें व अशा रीतीनें आपल्या जमातीं-तील संख्याबल कायम राखण्यांत येतें. ( Hunter–Memoirs of a Captivity ).

याप्रमाणें आपला वंश व समाज यांची वृद्धि व्हावी याकरितां जेथें नैसर्गिक रीत्या पुत्र होणें शक्य नसतें तेथें कृत्रिम उपायांनीं पुत्रप्राप्ति करून घेऊन आपल्या वंशाचें अस्तित्व व जमातींतील लोकांची संख्या कायम ठेवणें व वाढविणें या क्रिया समाजाच्या प्राथमिक अवस्थेपासून आतांपर्यंत अनेक समाजांत चालू आहेत. यावरून पुत्राचें कुटुंबसंस्थेंत व सामाजिक दृष्ट्या किती महत्त्व आहे हें स्पष्ट होतें.

---

## प्रकरण दहावें

# प्रचलित कायद्याप्रमाणें पिता

## व

# पुत्र यांचे संबंध

**अज्ञानावस्था—**

भरतखंडामध्यें श्रुतिस्मृतिकालीं व पौराणिक कालांत पितापुत्रसंबंधाच्या कल्पना काय होत्या यासंबंधीं विवेचन आतांपर्यंत केलेंच आहे. यानंतर अर्वाचीन कालांत यासंबंधींच्या कल्पनांमध्यें पुष्कळच फरक पडत गेलेला आहे व आज या सर्व गोष्टी कायद्यानें निर्बंधित केलेल्या आहेत. तेव्हां आजच्या समाजांत पितापुत्रांचें कायदेशीर नातें व हक्कसंबंध काय आहेत या गोष्टींचें ज्ञान करून घेणें आपणांस अवश्य आहे. आजचा काल व्यक्तिस्वातंत्र्याचा असल्यामुळें प्रत्येक व्यक्ति कायदेशीर रीतीनें वयांत आल्यावर तिच्या वागणुकीवर कोणासहि बंधन घालतां येत नाहीं व त्या व्यक्तीस आपला आयुष्यक्रम स्वतंत्र रीतीनें आचरण्याची पूर्ण मोकळीक असते. आजच्या कायद्याप्रमाणें वयास २१ वर्षें पूर्ण झालीं म्हणजे प्रत्येक व्यक्ति सज्ञान व पूर्ण नागरिक होण्यास पात्र होते. परंतु हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें १६ वर्षें पूर्ण झालीं म्हणजे मुलगा सज्ञान होतो अशी समजूत आहे. यासंबंधीं मनुस्मृतीमध्यें अज्ञानाच्या मिळकतीचें सर्व पितृप्राप्त धन जोंपर्यंत तो शैशव संपून वयांत आला नाहीं तोंपर्यंत राजानें रक्षण करावें

असें म्हटलें आहे.* व त्यावर कुल्लुक भट्टानें टीका करतांना '**बाल्यं च षोडश वर्षपर्यंतम्**' असें म्हणून नारदाचा आधार दिला आहे. नारदस्मृतींत '**बाल आषोडशात् वर्षात्**' असें म्हटलें आहे. '**लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् । प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्**' या उक्तींतहि हेंच तत्त्व नमूद केलें आहे. यावरून वयास १६ वर्षें पूर्ण होईपर्यंत मुलावर पित्याची अथवा पालकाची सत्ता असते. हा अधिकार कोणत्या बाबतींत व कोणत्या मर्यादेपर्यंत वापरतां येतो या गोष्टींचें विवेचन पुढें करण्यांत आलें आहे व त्यावरून अज्ञानावस्थेंतलि पितापुत्रांचा संबंध लक्षांत येईल.

**अज्ञान अवस्थेंतील हक्क—**

हिंदु कुटुंबव्यवस्थेंत एकत्र कुटुंबपद्धति हा एक विशेष आहे. व प्रत्येक मूल जन्मास आल्याबरोबर समायिक कुटुंबाच्या मालमत्तेंत त्याला कांहीं अधिकार प्राप्त होतात. हा अधिकार मुलीच्या बाबतींत केवळ पोषण व विवाह इतक्यापुरताच मर्यादित असतो. परंतु मुलगा हा एक पूर्ण घटक असून आपल्या यथाप्रमाण अंशाचा पूर्ण मालक असतो. मात्र सज्ञान झाल्याशिवाय त्यास हा हक्क बजावतां येत नाहीं, किंवा विभक्तहि होतां येत नाहीं. अज्ञानावस्थेंत हा हक्क त्याचेबद्दल कोणी तरी दुसऱ्यानें त्याचा पिता, माता अथवा योग्य पालक यानें बजावावयाचा असतो. तेव्हां अशा तऱ्हेचे मुख्यतः पिता व तसेच माता अथवा पालक यांचे व अज्ञान मुलाचे हक्क काय आहेत यासंबंधीं विवेचन पुढें करण्यांत आलें आहे.

---

* **बालदायादिकं रिक्थं तावद्राजानुपालयेत् ।**
**यावत्स स्यात्समावृत्तो यावच्चातीतशैशवः ॥**

मनु. ८·२७

## अज्ञानाचा पालक—

हिंदु धर्मशास्त्रप्रमाणें अज्ञान मुलाचीं बाप व आई हीं क्रमानें पालक समजलीं जातात. अज्ञान अविवाहित मुलगे व मुली यांचें पालकत्व प्रथम पित्याकडेच असतें. तो नसल्यास त्याच्या नंतर मातेकडे येतें. दत्तक पिता याचा अधिकार जन्मदात्या पित्याइतकाच असतो. मुलांचें पालकत्व ही एक धार्मिक जबाबदारी आहे. पिता ही जबाबदारी दुसऱ्यावर टाकूं शकत नाहीं. आपल्या हयातींत पिता दुसऱ्यास पालक नेमूं शकत नाहीं असा निर्णय 'बेझंट वि. नारायणस्वामी' या प्रसिद्ध खटल्यांत लागला आहे. हा निर्णय मुसलमान व इतरांसहि लागू आहे. पित्याच्या पश्चात् मुलांचें पालकत्व मातेकडे येतें. दत्तक मातेचा अधिकार स्वाभाविक मातेइतकाच असतो. मिथिला संप्रदायाप्रमाणें पित्याच्या हयातींतहि माताच मुलाची पालक असते.

## मिळकतीचा व्यवस्थापक—

अज्ञान मुलगा समायिक कुटुंबांत असेल तर कुटुंबांतील कर्ता हा सर्व मिळकतीचा व्यवस्थापक असतो. विभक्त कुटुंबांत पिता नसल्यास माता ही मुलाच्या मिळकतीची व्यवस्थापक होते. अज्ञान मुलाची स्वतंत्र मिळकत असेल तर ती विभक्त किंवा अविभक्त कुटुंबांतहि मातेच्याच ताब्यांत राहते. या मिळकतीची व्यवस्था पाहण्याच्या कामीं तिला नवऱ्याच्या आप्तांचा सल्ला घेण्याची आवश्यकता नाहीं.

पिता व माता यांच्या अभावीं अज्ञान मुलांचें पालकत्व भाऊ किंवा इतर पूर्वजांकडे जातें. यांचा क्रम ज्येष्ठ बंधु, सापत्न बंधु, नंतर पित्याचे नातेवाईक व नंतर मातेचे नातेवाईक असा असतो. मातेच्या अभावीं अज्ञान मुलाचें पालकत्व सापत्न मातेपेक्षां पित्याच्या नातेवाइकांकडे

प्रथम जातें. अनौरस संततीचें पालकत्व मातेकडे असतें व त्यांच्या बाबतींत पित्यासाहि मातेपेक्षां अधिक अधिकार असत नाहीं.

## मुलीचा पालक—

मुलीचा विवाह झाला म्हणजे तिचें पालकत्व तिच्या नवऱ्याकडे जातें. तो स्वतः अज्ञान असला तरी तो जर अपात्र नसेल तर त्याचा हा हक्क कायम असतो. विवाहित पत्नीस नवऱ्याच्या घरींच राहिलें पाहिजे असा नियम आहे. ती वयांत आलेली नसली तरीहि तिला नवऱ्याचें घर सोडून राहतां येत नाहीं.

## मृत्युपत्रानें पालक नेमण्याचा अधिकार—

पित्यास मृत्युपत्रानें आपल्या पश्चात् मुलांचा पालक नेमण्याचा हक्क आहे. या हक्काप्रमाणें तो कोणासहि पालक नेमूं शकतो व या बाबतींत मातेचा अधिकारहि चालत नाहीं.

## अज्ञानास दत्तक देण्याचा अधिकार—

पित्यास आपल्या अज्ञान मुलास दत्तक देण्याचा पूर्ण अधिकार आहे. या बाबतींत मुलाच्या मातेची संमति असलीच पाहिजे असें नाहीं. तिच्या संमतीविरुद्धहि तो आपल्या मुलास दत्तक देऊं शकतो. मातेस मात्र आपल्या मुलास दत्तक द्यावयाचें असल्यास पित्याची संमति आवश्यक आहे व पित्याची संमति नसेल तर तिला मुलास दत्तक देतां येणार नाहीं. पित्याच्या पश्चात् पित्याची विरुद्ध आज्ञा नसेल तर मातेस आपल्या मुलास दत्तक देण्याचा अधिकार आहे. अज्ञान मुलाच्या पालकास एखाद्या मुलास विशिष्ट धंद्यामध्यें उमेदवार म्हणून ठेवण्याचा करार करतां येतो व तो करार त्या मुलावर बंधनकारक आहे.

## अज्ञान मुलांच्या पोषणाची जबाबदारी—

हिंदुधर्मशास्त्र, मुसलमानी कायदा किंवा इंग्रजी कायदा या तिन्ही-प्रमाणेंहि पित्यावर आपल्या अज्ञान मुलांचें पोषण व संगोपन करण्याची पूर्ण जबाबदारी आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें अज्ञान व अविवाहित मुलें यांचें पोषण करणें हें पित्याचें कर्तव्य आहे, व ही जबाबदारी नैतिक स्वरूपाची आहे. मुलांची त्यांच्या पोषणापुरेशी जर स्वतंत्र मालमत्ता असेल तर त्यांच्या पोषणाची जबाबदारी पित्यावर पडत नाहीं. अविवाहित मुलींच्या पोषणाची जबाबदारी पित्यावर व कुटुंबाच्या मालमत्तेवरहि असते. मुलगी विधवा झाल्यास व तिच्या पोषणाची दुसरी तजवीज नसल्यास अथवा ती आपलें पोषण करण्यास असमर्थ असल्यास तिच्या पोषणाची नैतिक जबाबदारी पित्यावर असते. ही जबाबदारी नैतिक असल्यामुळें पित्यावर पूर्णपणें बंधनकारक नसते. परंतु त्याच्या पश्चात् त्याच्या मालमत्तेवर पूर्णपणें बंधनकारक होते. विधवा सुनेच्या बाबतींतहि पोषणाची जबाबदारी नैतिक असून मरणोत्तर मालमत्तेवर ती कायदेशीर होते. अनौरस संततीच्या पोषणाची जबाबदारी द्विजांच्या बाबतींत हयातींत नैतिक असून मृत्यूनंतर मात्र पोषणापुरेशी कायदेशीर होते. शूद्रांच्या बाबतींत अनौरस संततीस वारसाचा हक्क नसेल तर पोषण हें बंधनकारक असतें. अनौरस मुलीच्या पोषणाची जबाबदारी मात्र कायदेशीर रीत्या पडत नाहीं. क्रिमिनल प्रोसीजर कोडप्रमाणें बापावर मुलाच्या पोषणाची सक्ति करतां येते. पण शिक्षणाची सक्ति करतां येत नाहीं. व पोषणाच्या बाबतींतहि अमुक विशिष्ट दर्जाप्रमाणें त्या मुलांचें पोषण झालें पाहिजे अशी सक्ति करतां येत नाहीं.

## अज्ञानाचा विवाह करण्याचा अधिकार—

अज्ञानास पालकाच्या संमतीशिवाय विवाह करतां येत नाहीं. पालकाचे संमतीनें झालेला अज्ञानाचा विवाह अज्ञानावर बंधनकारक असतो. पित्यावर अथवा पालकावर मुलीच्या विवाहाची जबाबदारी नसते. एखादा पिता मुलीचा विवाह करीत, नसेल व तो मातेनें केला असेल तर त्या कामीं मातेनें खर्च केला असल्यास त्या खर्चाची जबाबदारी पित्यावर कायदेशीर रीतीनें येत नाहीं. पण त्याच्या पश्चात् त्याच्या मिळकतीवर मात्र तो खर्च देणें बंधनकारक होऊं शकतें.

अज्ञानाचा विवाह करण्याचा अग्राधिकार पित्याचा आहे. तो अधिकार त्यास दुसऱ्यास देतां येतो व तसा त्यानें प्रत्यक्ष दिला नाहीं तरी प्रतिबंध न केल्यास तो दिला आहे असें गृहीत धरण्यांत येतें. अज्ञान मुलाचा अथवा मुलीचा विवाह करण्याचा हक्क पित्यानें योग्य काळांत बजावला नाहीं तर तो अधिकार त्याच्या हातून जातो. पित्यानंतर हा अधिकार त्याचे जवळचे जे पुरुष नातेवाईक असतील त्यांस प्राप्त होतो. याचा क्रम प्रथम आजा, नंतर बंधु व नंतर इतर दहा पिढ्यांपर्यंतचे पुरुष नातेवाईक; यांचे पश्चात् मिताक्षरा संप्रदायाप्रमाणें माता–मातामह–मामा व इतर आईकडचे नातेवाईक यांचेकडे हा जातो. बंगालमध्यें हा अधिकार पित्याच्या नातेवाइकांनंतर प्रथम मातामह–मामा यांचा असून त्यांचे पश्चात् आईकडे येतो. एखाद्या अज्ञानाचा विवाह पित्याशिवाय इतर पुरुष नातेवाईक करीत असेल तर त्यानें त्या अज्ञानाच्या मातेची संमति वास्तविक घेतली पाहिजे. परंतु हें बंधन केवळ नैतिक आहे. पुरुष नातेवाइकांच्या संमतीनें स्त्री नातेवाइकांसहि अज्ञान मुलामुलींचें लग्न लावण्याचा अधिकार असतो. कोणत्याहि पालकानें अज्ञानाचा विवाह लावण्याचा हक्क योग्य प्रकारें न बजा-

वल्यास तो हक्क गमावून बसतो. जेव्हां अज्ञानाचा विवाह मातापित्यां-खेरीज इतर नातेवाईक करीत असेल तेव्हां त्यानें मृत पित्याची तत्संबंधीं कांहीं इच्छा व्यक्त झाली असल्यास ती लक्षांत घेतली पाहिजे व मातेचीहि संमति मिळविली पाहिजे. विवाहाच्या बाबतींत मुलीची संमति आवश्यक नसली तरी तिच्या मर्जीविरुद्ध तिचा विवाह लावतां येणार नाहीं असें 'श्रीधर वि. हिरालाल विठल' या दाव्यांत स्पष्ट म्हटलें आहे. अज्ञान मुलगा अथवा मुलगी वयांत आल्यावर त्यांच्या पालकांचा विवाहाच्या बाबतींतील हक्क नष्ट होतो.

## पुत्राचा विवाह करण्याचा भार—

मुलाचें लग्न करणें पित्यावर मुळींच बंधनकारक नाहीं. तथापि विवाह हा एक धार्मिक संस्कार आहे व शूद्रांच्या बाबतींत तेवढाच संस्कार त्यांस विहित आहे, याकरितां मुलांचा विवाह करणें हें बापाचें कर्तव्य आहे. पित्याच्या पश्चात् वरीलप्रमाणें मुलीसारखेच मुलाच्या बाबतींतहि इतर नातेवाइकांस विवाह करण्यासंबंधीं हक्क प्राप्त होतात. विवाहासंबंधीं सर्व नियम अथवा निर्बंध केवळ अर्थवादात्मक असून विधायक अथवा बंधनकारक नाहींत. यामुळें योग्य संस्कारपूर्वक झालेला विवाह कोणाच्या संमतीच्या अभावीं अगर इतर किरकोळ दोषांमुळें रद्द ठरत नाहीं. वास्तविक अयोग्य विवाह कोर्टानें मोडला पाहिजे. परंतु ज्या जातींत पुनर्विवाह रूढ नाहीं त्या जातींत विवाह मोडलेल्या मुलीस दुसरा वर मिळणें अशक्य असल्यामुळें सामान्यतः विवाह न मोडण्याकडे प्रवृत्ति असते. तथापि कपटानें किंवा बळजबरीनें लावलेला विवाह रद्द ठरूं शकतो. एखादा विवाह जर अयोग्य रीतीनें होण्याचा संभव असेल तर कोर्टास अशा विवाहास बंदी करतां येते. अशा बाबतींत अयोग्य विवाहास व अयोग्य प्रकारें अधिकारबजावणीस

कोर्ट पालकावर बंधन घालील, परंतु इतर बाबतींत विशेष अयोग्य असल्याशिवाय पालकाच्या सर्वसामान्य अधिकारांत व सारासार विचारांत कोर्ट ढवळाढवळ करणार नाहीं. योग्य वेळीं विवाह न झाल्यास मुलीस तो स्वत: करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार सामान्यत: तिनें विवाहयोग्य वय झाल्यानंतर तीन वर्षांनीं बजावणें योग्य व न्याय्य समजलें जातें. नारदस्मृतींत मुलीनें स्वत: विवाह करावयाचा असल्यास राजाची संमति मिळविली पाहिजे असें सांगितलें आहे. परंतु सामान्यत: अशा बाबतींत कोणी कोर्टाकडे जात नाहीं व गेल्यास झालेला विवाह कायदेशीर समजला जातो. कोणत्याहि पालकानें योग्य वेळीं अज्ञानाचा विवाह न केल्यास हा हक्क त्याच्या नंतरच्या दुसऱ्या पालकाकडे जातो व त्यानेंहि तो न बजावल्यास मुलीस स्वत: विवाह करतां येतो. मुलीनें स्वत: विवाह केल्यास तिला पिता, बंधु अगर माता यांनीं दिलेले दागिने बरोबर नेतां येत नाहींत.

अज्ञान विधवेच्या बाबतींत विवाह जर योनिविद्ध नसेल तर पालकाच्या संमतीच्या अभावीं तो मोडतां येईल. पण सामान्यत: विरुद्ध गोष्ट सिद्ध झाल्याशिवाय अशी संमति गृहीत धरली जाईल. विद्ध विवाह केव्हांहि मोडतां येणार नाहीं. कारण मुलीची संमति त्या विवाहास मान्यता देण्यास पुरेसें कारण समजलें जाईल. मात्र विवाह होण्यापूर्वी योग्य संमति नसेल तर भावी विवाह बंद पाडतां येईल.

मलबारांत संबंधम् विवाहासहि योग्य पालकाची संमति नसली तरी झालेला विवाह मोडतां येत नाहीं. उलट पालकास आवश्यक तें प्रतिज्ञापत्र भरून द्यावें लागतें.

## पित्याच्या ऋणाचा पुत्रावर भार—

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पित्यानें केलेल्या सर्व कर्जास त्याचीं मुलें पूर्णपणें जबाबदार असत. केवळ अनैतिक गोष्टीकरितां केलेलें कर्ज मुलांवर बंधनकारक नसे. ही कर्जाची जबाबदारी पित्याकडून मुलांस कोणतीहि मालमत्ता मिळाली नाहीं अगर मिळालेली मालमत्ता अपुरी असली तरी टाळतां येत नसे. याप्रमाणें पित्याच्या कर्जास मुलें पूर्णतः जबाबदार असत. परंतु १८६६ सालच्या 'मुंबईचा हिंदु वारस मुक्तता कायदा' (Bombay Hindu Heirs Relief Act) नांवाच्या कायद्याप्रमाणें ही जबाबदारी केवळ बापाकडून मिळालेल्या मिळकती-पुरतीच मर्यादित करण्यांत आली. यामुळें आतां हिंदु मुलें हीं इतर धर्मांतील मुलांच्याप्रमाणेंच वडिलार्जित मिळकतीपुरतींच जबाबदार धरण्यांत येतात. आतां त्यांची स्थिति इतर सर्वसाधारण मुलांप्रमाणेंच करण्यांत आली आहे.

## पुत्रत्यागाबद्दल शासन—

मातापित्यानें बारा वर्षांच्या आंतील मुलास टाकून दिल्यास त्यास १८६० च्या ४५ व्या कायद्याच्या कलम ३१७ प्रमाणें ७ वर्षांपर्यंत शिक्षा अथवा दंड किंवा दोन्हीहि शिक्षा सांगितल्या आहेत. शिवाय अशा व्यक्तीवर सदरहू अर्भक मृत्यु पावल्यास 'पीनल कोडा'प्रमाणें सदोष मनुष्यवधाचाहि खटला करतां येतो. जीवनास पुरेसें अन्न न दिल्यास अथवा उपासमारीनें मुलास मृत्यु आल्यास पालकास शिक्षा होते. मुलास पुरणें, गर्भपात करविणें वगैरेसारखे बालहत्या, भ्रूणहत्या, वगैरे गुन्हे शिक्षेस पात्र आहेत. पित्यानें आपल्या मुलांचें जर नीट संगोपन केलें नाहीं तर त्याचा पालकत्वाचा हक्क तो गमावून बसतो.

स्टोरी या ग्रंथकारानें आपल्या ग्रंथामध्यें पित्याचीं आपल्या मुलाच्या बाबतींतील कर्तव्यें व त्यांत कोर्टानें करावयाचा हस्तक्षेप यांच्या मर्यादा स्पष्ट रीतीनें नमूद करून ठेविल्या आहेत व त्यांत मुलांचें पालनपोषण, शिक्षण वगैरे सर्व गोष्टी नमूद करून ठेविल्या आहेत त्या अशा :

'अज्ञान मुलाच्या वैयक्तिक बाबतींत कोर्टाचा अधिकार त्याचें योग्य प्रकारें संरक्षण होईल अशा आवश्यक तेवढ्या मर्यादेपर्यंत व त्याच्या मालमत्तेच्या बाबतींत तिची योग्य प्रकारें काळजी घेतली जाऊन तिची व्यवस्था नीट चालू राहील व तिची योग्य निगा राखली जाऊन तिचा उपयोग त्याच्या पोषणाकडे होईल इतक्या आवश्यक मर्यादेपर्यंत चालतो. याच विशेषतः पहिल्या मुद्यावर, म्हणजे मुलाचें योग्य संरक्षण व्हावें व त्यास आवश्यक तें शिक्षण मिळावें म्हणून कोर्ट, मातापित्याचा अथवा पालकाचा स्वाभाविक निसर्गतः अथवा पोषक म्हणून जो हक्क असतो, व त्यामुळें मुलाचा ताबा व काळजी घेण्याचें काम त्याच्याकडे रहावयाचें असतें, त्यांत स्वतः हात घालतें. कारण यद्यपि आईबापांच्या स्वाधीन जरी मुलाचा ताबा व त्याची काळजी घेण्याचें व त्यास शिक्षण देण्याचें कार्य केलेलें असतें तरी तें हीच स्वाभाविक गोष्ट गृहीत धरून केलेलें असतें कीं, मुलांची योग्य काळजी घेतली जाईल व त्यांचें संवर्धन योग्य प्रकारें केलें जाऊन त्यांस वाङ्मयीन, नैतिक व धार्मिक शिक्षण योग्य प्रकारें दिलें जाईल; आणि त्यांस ममताळूपणानें व प्रेमानें वागविलें जाईल. परंतु जेव्हां ही स्वाभाविक गृहीत धरलेली गोष्ट वस्तुस्थितींत नसते, आणि जेव्हां ( उदाहरणार्थ ) पिता हा अत्यंत निष्ठुरपणें व क्रूरपणें लहान अल्पवयीन मुलास वागवीत असतो, किंवा नेहमीं मद्यपान करण्याची व शिवीगाळी करण्याची किंवा अत्यंत नीच व व्यभिचारीपणाची त्याची वागणूक असते, किंवा नास्तिक अथवा अधा-

र्मिक ( धर्मबाह्य ) मतांचें तो नेहमीं प्रतिपादन करीत असतो किंवा त्याचे घरगुती संबंध असे असतात कीं त्याचीं मुलें बिघडण्याचा व अनिष्ट मार्गास लागण्याचा संभव असतो, किंवा त्याची वर्तणूक मुलांच्या नैतिक संवर्धनाच्या किंवा हिताच्या विरुद्ध असते, अशा प्रत्येक बाबतींत कोर्ट लक्ष्य व हात घालून पित्याच्या ताब्यांतून मुलांस काढून घेईल आणि योग्य मनुष्याची त्या मुलाचा पालक म्हणून व त्याची काळजी घेऊन त्याच्या शिक्षणावर देखरेख करण्यास नेमणूक करील. परंतु अगदीं ढोबळ व ठळक दुराचरणाच्या बाबतींतच पित्याच्या स्वाभाविक हक्कांवर आतिक्रमण करण्यांत येईल. पिता व माता यांपैकीं पित्याकडेच मुलाचा ताबा स्वाभाविकपणें असतो आणि पूर्वीं हा अधिकार त्यास इतरांकडे सोंपवितां येत नसे '.*

---

* 'The jurisdiction of the court extends to the care of the person of the infant, so far as necessary for his protection and education, and to the care of the property of the infant, for its due management and preservation and proper application for his maintenance. It is upon the former ground, principally, that is to say, for the due protection and education of the infant that the court interferes with the ordinary rights of parents as guardians by nature, or by nurture, in regard to the custody and care of their children. For although parents are entrusted with the custody and care of the persons and the education of their children yet this is done upon the natural presumption that the children will be properly taken care of and will be brought up with a due education in literature and morals and religion and that they will be treated with kindness

## पित्याच्या निष्ठुरतेचा परिणाम—

पित्याच्या ठिकाणीं निष्ठुरपणा, क्रौर्य वगैरे दिसल्यास त्याचेकडून मुलांचें पालकत्व हिरावून घेण्यास तें पुरेसें कारण समजलें जाईल. इंग्लंडमध्यें समाजास विघातक अशीं मतें पित्यानें धारण केल्यास तें पालकत्व गमावण्यास पुरेसें कारण समजलें जातें. पित्यानें आपला पालकत्वाचा हक्क दुसऱ्यास दिल्यास त्याचा तो हक्क जातो. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें देशत्याग, संन्यास, वैराग्यदीक्षा, जातिबाह्यता, गैरवर्तणूक

---

and affection. But whenever the presumption is removed; whenever (for example) it is found that a father is guilty of gross ill treatment or cruelty towards his infant children or that he is in constant habits of drunkenness and blasphemy or low and gross debauchery or that he professes atheistical or irreligious principles, or that his domestic associations are such as tend to the corruption and contamination of his children or that he otherwise acts in a manner injurious to the morals or interests of his children; in every such case the court will interfere and deprive him of the custody of his children and appoint a suitable person to act as guardian and to take care of them, and to superintend their education. But it is only in cases of gross misconduct that paternal rights are interfered with. As between husband and wife the custody of the children generally belongs to the husband, and the latter could not formerly alienate his right to the custody and care of the children'.

[Story—Equity Jurisprudence S. 1341]

व स्वतः हक्क सोडून देणें या गोष्टींमुळें पित्याचा पालकत्वाचा हक्क नाहींसा होतो. मुलीच्या बाबतींत मातेचें अनैतिक वर्तन हें तिच्याकडून पालकत्व काढून घेण्यास पुरेसें कारण समजलें जातें. स्त्रीनें पुनर्विवाह केल्यास प्रथम पतीपासून झालेल्या मुलांचें पालकत्व तिच्याकडून स्वाभाविकपणें जात नाहीं. परंतु दुसऱ्या एखाद्या योग्य मनुष्यास अशा मुलांचें पालकत्व मागण्याचा हक्क प्राप्त होतो. मातेच्या संमतीनें व मुलांच्या पोषणास पुरेशी मिळकत नसल्यास इतर मनुष्यासहि अज्ञान मुलाचे पालक होतां येतें. अज्ञान मुलाचे संस्कार पिता जर जातिबाह्य असेल तर इतर जवळच्या नातेवाइकांस करतां येतात.

### पाल्य-पालक-संबंध—

'पालक व पाल्य यांचा कायदा,' १ जुलै १८९०, याप्रमाणें पालकांच्या बाबतींत कांहीं विशिष्ट नियम करण्यांत आले आहेत. या कायद्याप्रमाणें मुलांचा पिता, अथवा नोकर मुलांचा मालक, यांस त्यांना योग्य प्रमाणांत शिक्षा करण्याचा अधिकार आहे. तसेंच पित्यास मुलांना योग्य शिक्षण वगैरे देण्याकरितां स्वतःच्या ताब्यांत ठेवण्याचा अगर इतरांच्या ताब्यांत देण्याचा अधिकार मान्य केलेला आहे. अशा बाबतींत शाळामास्तर, शिक्षक वगैरेंसहि कांहीं विशिष्ट हक्क प्राप्त होतात. तसेंच अशा अधिकाऱ्यांच्या ताब्यांतून काढून घेण्याचाहि पित्यास अथवा पालकास अधिकार असतो. पित्यास अथवा पालकास आपला अधिकार परदेशांत जातांना दुसऱ्याच्या स्वाधीन करतां येतो.

### पिता हाच स्वाभाविक पालक—

अज्ञानाचा पालक नेमण्याच्या बाबतींत पुढील गोष्टींकडे विशेष लक्ष देण्यांत येतें. अज्ञान मुलाचा पिता हाच स्वाभाविक पालक समजण्यांत

येतो व त्याचा तो हक्क इतर सर्व नातेवाइकांपेक्षां अधिक असून तो सहसा विशेष कांहीं महत्त्वाचें कारण त्याच्याविरुद्ध असल्याशिवाय त्याच्याकडून काढून घेतां येत नाहीं. उदाहरणार्थ, पित्यानें द्वितिय विवाह केल्यास अथवा धर्मत्याग केल्यासाहि त्याचा हा हक्क नष्ट होत नाहीं. पिता आपल्या मिळकतीची उधळपट्टी करीत आहे हेंहि कारण त्याचें पालकत्व काढून घेण्यास पुरेसें नाहीं. मुलाच्या मातेस निष्ठुरपणें वागवून नंतर द्वितीय संबंध केला हेंहि कारण हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पित्याचें पालकत्व नष्ट होण्यास पुरेसें मानण्यांत आलें नाहीं. अज्ञान मुलास जन्मापासून आजोळीं आजीनें वाढविलें एवढ्याच कारणानें पित्याचा पालकत्वाचा हक्क नष्ट होत नाहीं. परंतु एका खटल्यामध्यें मुलास आजोबाचाच सर्व प्रकारें लळा लागला आहे असें पाहून कोर्टानें मुलास आजोळींच राहण्यास परवानगी दिल्याचा दाखला आहे.

**पित्याचें पालकत्व रद्द—**

पित्यानें देशान्तर करून दूरदेशीं वस्ती केल्यास त्याचा पालकत्वाचा हक्क नष्ट होईल. तसेंच त्यानें स्वतः होऊन पालकत्वाचा अधिकार सोडल्यास त्याचा तो हक्क नष्ट होईल. जातिबाह्यता हेंहि पालकत्व गमावण्यास पुरेसें कारण समजलें जातें. सामान्यतः मुलाचें योग्य हित-संरक्षण व संवर्धन पित्याकडून होत आहे किंवा नाहीं हें पाहूनच पित्याकडील पालकत्वाचा अधिकार काढून घेणें किंवा ठेवणें या गोष्टींचा निर्णय करण्यांत येतो.

**पालकासंबंधीं मुसलमानी कायदा—**

आपल्या भरतखंडांत व विशेषतः महाराष्ट्रांत आपल्या हिंदुसमाजा-प्रमाणें मुसलमानसमाजाहि आज वावरत असून त्यांचे कांहीं बाबतीं-

तील नियम आपल्या नियमांपेक्षां निराळे आहेत. तेव्हां या पाल्य-पालकासंबंधीं त्यांचे नियम काय आहेत याचेंहि येथें अवलोकन करणें इष्ट आहे.

मुसलमानी कायद्याप्रमाणें अज्ञानाचे पालक नेमण्यामध्यें त्याच्या नातेवाइकांत जवळचे व दूरचे असा फरक करण्यांत येतो. जवळच्या आप्तांमध्यें मुलाच्या पिता व त्याचे वारस, यानंतर आजोबा ( पितामह ) व त्याचे वारस व त्यानंतर त्यांचे वारस असा क्रम लागतो. याशिवाय इतर सर्व आप्त दूरचे समजले जातात. हनाफी कायद्याप्रमाणें अज्ञानत्व मुलाच्या बाबतींत ७ वर्षेपर्यंत मानण्यांत येतें व मुलीच्या बाबतींत ती वयांत येईपर्यंत पालकाच्या ताब्यांत राहूं शकते व तोंपर्यंत तिचा ताबा नवऱ्यासहि मागतां येत नाहीं. मलिकी, शफी व हनबली कायद्याप्रमाणें मुलीचा ताबा पालकाकडे तिच्या विवाहापर्यंत राहूं शकतो. या कायद्याप्रमाणें मातेनंतर मातामही हिला पितामहीपेक्षां पालक होण्याचा अधिकार प्रथम मिळतो व यांचे मागून तो हक्क बहिणीकडे जातो. मुसलमानी कायद्याप्रमाणें मृत्युपत्रान्वयें पित्यास आपल्या अज्ञान मुलांचा पालक नेमण्याचा हक्क आहे व तो मातेखेरीज इतर व्यक्तींसहि पालक नेमूं शकतो. हा हक्क त्याच्या वारसासहि बजावतां येतो. शिया मुसलमानांत आई ही मुलांची पालक होऊं शकते व पित्यासहि तिला पालक नेमतां येतें.

**अज्ञान मुलांची मालमत्ता—**

अज्ञान मुलांची जी मालमत्ता असेल ती अत्यंत कसोशीनें संरक्षण करण्याची आज्ञा महंमदानें कुराणांत दिली आहे. त्यांचा माल सुरक्षित ठेवून योग्य वेळीं त्यांच्या हवालीं जसाच्या तसाच अफरातफर

न करतां परत करण्याबद्दल त्याचा कटाक्ष दिसतो. अज्ञान मुलीच्या पालकानें तिच्याशीं आपण योग्य रीतीचें वर्तन करूं अशी खात्री असल्यास तिच्याशीं विवाह करण्याचीहि त्यास अनुमति दिली आहे. तशी खात्री नसेल तर मात्र अज्ञान पाल्य मुलीशीं विवाह करण्यापेक्षां इतर दोन, तीन, चार स्त्रियांशींहि विवाह करण्यास त्यानें मोकळीक दिली आहे.*

---

* अनाथ बालकांची मालमत्ता तुम्ही त्यांच्या हवालीं करा; आणि चांगल्या मालाचे बदली रद्दी माल घेऊं नका व त्यांचे माल आपल्या मालांत मिसळून गिळंकृत करूं नका. ( कारण ) हें ( फारच ) महापातक होय. ४. २.

आणि जर तुम्हांस या गोष्टीची भीति वाटत असेल कीं तुम्ही अनाथ बालिका यांचे बाबतींत इनसाफ कायम न ठेवूं शकाल तर तुम्हांस भल्या वाटतील त्या दोन दोन व तीन तीन व चार चार स्त्रियांशीं लग्न लावून घ्या. पण जर तुम्हांस त्या गोष्टीचें भय असेल कीं ( अनेक बायकांमध्यें ) बरोबरी ( नात्याचें वर्तन ) न करूं शकाल तर अशा ( परिस्थितींत ) एकच ( बायको करणें ) अगर जी ( दासी ) तुमच्या हस्तगत असेल ( तिच्या वरच संतुष्ट राहाणें ). तुमच्या हातून अन्याय न घडावा म्हणून ही ( युक्ति बुद्धीस ) विशेष अनुसरती होय. ४. ३.

आणि मालमत्ता जिला परमेश्वरानें तुम्हासाठीं ( एका प्रकारचा ) आधार बनविला आहे. ती कमअक्कल (अनाथ) बालकांचे हवालीं करूं नका. पण त्यांतून त्यांच्या पोटापाण्यास द्या व त्यांचे कपडेलत्ते करा आणि त्यांना ( जें ) बोलणें तें नरमाईनें बोलून समजावा. आणि अनाथ बालकांस व्यवहारांत लावून ठेवा येथपर्यंत कीं तीं लग्ना ( चे वया ) स पोहोंचतील. त्यावेळीं जर तुम्ही त्यांच्यांत कांहीं योग्यता पाहाल तर त्यांचा माल त्यांच्या

## अज्ञानांचें पोषण—

मुसलमानी कायद्याप्रमाणें अज्ञान व कांहीं काम न करतां येणारे मुलगे व मुली यांच्या पोषणाची जबाबदारी पित्यावर असते. परंतु तो केवळ त्यांचें पोषण करण्यापुरताच जबाबदार असतो. अज्ञानांचा हा हक्क त्याच्या मालमत्तेवर बंधनकारक नसतो. पिता असमर्थ असल्यास त्याच्या जवळच्या नातेवाइकावर अज्ञानाच्या पोषणाची जबाबदारी असते. पतीवर पत्नीच्या पोषणाची जबाबदारी असते.

---

हवालीं करून टाका. आणि असें करूं नका कीं (उद्याला) ते मोठे होतील म्हणून घाईघाईनें तो (त्यांचा माल) खाऊन (पिऊन) टाका. आणि जो (पालक) श्रीमंत असेल त्यानें (अनाथांचा माल आपल्यावर खर्च करण्याविषयीं) जपलें पाहिजे. आणि जो गरीब असेल त्यानें यथारीती (निर्वाहापुरतें) खावें. (त्यास हरकत नाहीं). आणि जेव्हां तुम्ही त्यांचा माल त्यांच्या स्वाधीन करूं लागाल तेव्हां (लोकांस) त्या (नीं आपला माल घेतल्या) चे साक्षी करून ठेवा आणि एरवीं हिशोब घेण्यास तर परमेश्वर पुरा होय. ४.६.

जे लोक अन्यायानें अनाथ बालकांची मालमत्ता खाऊन चट करतात ते आपल्या पोटांत केवळ अंगारेच भरतात. आणि ते लवकरच (मेल्यावर) नरकाग्नींत पडतील. ४.१०.

आणि (हे पैगंबरा, लोक) तुजपाशीं अनाथ स्त्रियां (शीं) विवाह करण्याविषयीं हुकूम मागतात. तर (तूं त्यांना) समजावून दे कीं परमेश्वर तुम्हांस त्यांच्या (शीं विवाह करण्या) विषयीं परवानगी देतो. (व पूर्वींहि परवानगीच होती) आणि कुरआनांत जो (हुकूम पूर्वीं) तुम्हांस ऐकविला जाऊन चुकला आहे, तो (वस्तुतः) अशा अनाथ स्त्रियांसंबंधींच होय; कीं ज्यांना तुम्हीं (त्यांचा) हक्क जो त्यांच्यासाठीं ठरविला गेला

**मुसलमान अज्ञानाचा विवाह--**

मुसलमानी कायद्याप्रमाणें अज्ञानाचा विवाह करण्याचें बंधन पालकावर नाहीं. पालकानें अज्ञान मुलाचा लावलेला विवाह तो सज्ञान झाल्यावर त्यास मोडतां येतो, परंतु हा हक्क त्यानें शक्य तितक्या लवकर बजावला नाहीं तर तो हक्क गमावला जातो. अज्ञानास वयांत आल्यावर पहिलें लग्न मोडून दुसरें लग्न करतां येतें व तें मात्र पक्कें होतें. अज्ञानाचा विवाह लावण्याचा हक्क त्याच्या मालमत्तेवरील हक्कापेक्षां निराळ्या पद्धतीनें त्याच्या नातेवाइकाकडे जातो. या बाबतींत पिता व पितृपरंपरेंतील सर्व आप्त यांचेमागून माता व तिचे आप्त यांचा हक्क येतो. विधवा ही मुलांची पालक राहूं शकते. परंतु तिनें विवाह केल्यास अथवा निष्काळजीपणा केल्यास तिचा हा हक्क जातो.

याप्रमाणें अपत्यसंवर्धनाची जबाबदारी पित्यावर असून सर्व सुसंस्कृत देशांत यासंबंधीं कायदे करण्यांत आले आहेत. पण हें पित्याचें कर्तव्य सर्वतः योग्य प्रकारें बजावलें जातेंच असें नाहीं. तर कांहीं प्रसंगीं अपत्य ही एक मातापित्यांस अडचणच वाटून तीं या आपल्या कर्तव्यापासून च्युत होऊन अपत्याचा त्याग करण्यासहि प्रवृत्त होतात. तीं कशीं तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

---

आहे तो देत नाहीं व (असें असतांहि) तुम्ही त्यांच्याशीं विवाह करण्याची अभिलाषा बाळगितां ! आणि तसाच (परमेश्वर) दुर्बल बालकांसंबंधींहि (हुकूम देतो कीं त्यांच्या हक्कांचें संरक्षण करा) आणि (अनाथाशीं) कोणाहि तऱ्हेची भलाई कराल तर परमेश्वर तीस जाणून आहे. (म्हणजे तुम्हांस मोबदला देईल).

## प्रकरण अकरावें

# अर्भकत्याग

### अपत्यप्रेमाची मर्यादा—

सामान्यतः मुलें हीं आईबापांस प्रिय असतात; तथापि ही गोष्ट पूर्णतः बरोबर असतेच असें नाहीं. मातापितरांस मुलें कितीहि प्रिय असलीं तरी कांहीं कांहीं प्रसंगीं तीं नकोशीं वाटून त्यांचा त्यागहि करण्यांत येतो. विशेषतः समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत मुलांच्या त्यागाची प्रवृत्ति अनेक कारणांमुळें रूढ असलेली आढळून येते. अगदीं पहिलें कारण म्हटलें म्हणजे विवाहपूर्व संतति झाल्यास माता तीस टाकून देण्यास प्रवृत्त होते. याचें उदाहरण आपल्या पुराणांत कुंतीनें कर्णास टाकून दिल्याचें प्रसिद्धच आहे. तसेंच मेनकेनें शकुंतलेचा त्याग केल्याचीहि कथा आहे. कबीर हाहि असाच एक टाकून दिलेला मुलगा होता अशी कथा सांगतात. समाजास असंमत असलला किंवा रूढीविरुद्ध विवाह झालेला असल्यास त्यापासून झालेली संतति टाकून देण्याची प्रवृत्ति त्यांच्या आईबापांत दिसून येते. मूल जन्मतःच जर विचित्र आकाराचें असेल तर त्यासहि टाकून देत असत. पुढें आपणांस घातक होणारीं मुलें टाकून देण्याची प्रवृत्ति आईबापांमध्यें किंवा पालकांमध्यें दिसून येते.

### भ्रमणवृत्तींतील लोक—

पारधी किंवा भटके लोक यांच्यामध्यें सर्वांचें उदरंभरण करणें अशक्य असल्यास मुलें टाकून देण्याची प्रवृत्ति होते. दाक्षिण ऑस्ट्रे-

ालियांत मुलांस उपाशी ठेवून मृत्यूच्या स्वाधीन करतात,[1] दक्षिण महासागरांतील बेटांत सामोआ लोकांत मुलांस बुडवून टाकण्याची किंवा पुरण्याची चाल आहे.[2] एस्किमो लोकांत मुलींच्या तोंडांत गवत भरून मृत्यूच्या स्वाधीन करण्याची पद्धति आहे.[3] अरब लोकांत मुलीस टाकून देण्याची किंवा पुरून टाकण्याची चाल असे, पण ती महंमदानें बंद केली व कुराणामध्यें या चालीविरुद्ध आज्ञा लिहून ठेविली. ( सुरा १६.५९–६१; सुरा ६. १३८, १४१; ८१. ८–१० ).*

---

१ ह्वॉविट ७४८.

२ सॅमोआ–टर्नर २८६, ३३३.

३ बॅंक्रॉफ्ट–१.८१.

* तो ज्या ( मुलीच्या जन्मण्या)चें शुभवर्तमान त्याला दिलें गेलें आहे तिचें वाईट मानून लोकांपासून ( लज्जेमुळें ) लपत लपत फिरेल. ( आणि मनांत तर्क करील कीं या ) अपमानावरहि मुलीला धरून राहावें कां तिला मातींत दडपून टाकावें ? पहा ! तर ( परमेश्वरासंबंधानें ) या लोकांचा ( कसा ) वाईट अभिप्राय १६. ५९. वाईट ( वाईट ) उपमा तर जे लोक ( नास्तिक असून ) परलोकींचा विश्वास धरीत नाहींत त्यांसच लागू होत; आणि परमेश्वरा- ( च्या महिम्या ) स ( योग्य ) तर ( अत्युत्कृष्ट व ) उंचांत उंच अशा उपमा होत. आणि तोच परम समर्थ ( व ) बुद्धिमान् होय ६०.

आणि जर परमेश्वर, लोकांस त्यांच्या आज्ञाभंगाच्या शासनांत पकडता तर, तर तो भूतलावर कोणाहि एका चालत्या फिरत्या प्राण्यास ( बाकी ) न सोडता. परंतु तो एका नियमित काळा ( म्हणजे मृत्यु ) पर्यंत यांस अवकाश देतो आहे. मग जेव्हां ( तो ) काळ येऊन पोहोंचतो तेव्हां ते

## अपत्याबद्दल शुल्क मिळाल्यास त्याचा परिणाम—

पितृसत्ताक पद्धतींत मुलांस वाढविण्याची व मुलींस टाकून देण्याची पद्धति विशेष दिसून येते. परंतु जेथें मुलीबद्दल शुल्क घेण्याची— पद्धति असे अशा ठिकाणीं मुलींचा त्याग करीत नसत, तर उलट मुलगेच टाकून देत असत. होमरच्या काळीं ग्रीस देशांत मुलींबद्दल गाई देण्याची पद्धत असे. बोर्निओमध्यें साराबाक प्रांतांत जांवई सासऱ्याच्या घरीं येऊन राहण्याची पद्धति आहे. त्यामुळें पुष्कळ मुली

---

( त्यापासून ) एक घटका मागें राहूं शकत नाहींत व पुढेंहि जाऊं शकत नाहींत ६१.

ज्या लोकांनीं मूर्ख समजुतीनें व आज्ञानानें आपलीं मुलें मारून टाकलीं ते खरोखरच ( मोठ्या ) तोट्यांत होत. आणि परमेश्वरानें त्यांना तें ( पोटापाण्यास ) पुरविलें होतें तें त्यांनीं परमेश्वरावर कुभांड रचून ( आपल्या-ठायीं ) निषिद्ध करून घेतलें ६. १४१.

आणि अशाच तऱ्हेनें बहुतेक मूर्तिपूजकांस त्यांच्या ( ठराविक ) सरकत-दारांनीं खुद्द त्यांचींच मुलें मारून टाकणें हें त्यांच्या नजरेंत उत्तम करून दाखविलें आहे. अशासाठीं कीं ( अखेर ) त्यांनीं त्यांस ( समग्र ) पायमल्लींत घालावें. व हें कीं त्यांचा धर्म त्यांना भ्रांतिमूलक करून टाकावा. ( कीं त्यांना सरळ मार्गच सुचूं नये ) आणि परमेश्वर इच्छिता, तर हे लोक हें (निर्दयपणाचें कार्य) न करते. तर ( हे पैगंबरा ) यांना व यांच्या फंदफितुरांस ( परमेश्वरावर ) सोडून दे. ( तो त्यांशीं समजून घेईल ). ६.१३८.

व जेव्हां जिवंत पुरून टाकलेल्या मुलीस विचारलें जाईल ८ कीं तिला कोणत्या अपराधाबद्दल ठार केलें गेलें, ९ आणि ज्यावेळीं ( लोकांचे ) कर्मपट उघडले जातील १० ८१. ८–१०

असणें हें भाग्याचें समजतात. याचे उलट मुलास टोपलींत ठेवून झाडांस टांगून ठेवण्याची पद्धत आहे. ( सारावॉक–एच. लिंग रॉथ पृ. १२५. )

हिंदुस्थानांत हुंड्याचे चालीमुळें मुलींची अनास्था करण्याची प्रवृत्ति प्राचीन काळापासून दिसून येत आहे. चीन देशांतहि मुलींस टाकून देण्याची पद्धति विशेष रूढ होती, परंतु अलीकडे अनेक अनाथ अर्भकालयें निघाल्यामुळें त्यांची त्यांत व्यवस्था होते. रोममध्यें प्राचीन काळीं एक किंवा दोन मुलींस वाढवीत असत व अधिक झाल्यास टाकून देण्याची चाल असे. दुसऱ्या प्यूनिक युद्धानंतर अशी चाल असे कीं, मूल झाल्यावर तें बापापुढें आणून ठेवीत व त्याच्या मर्जीवर त्याचें पुढील जीवित अवलंबून असे. हॅलिकार्नेसस येथील डायोनिसी-यस ( २·१५ ) यानें असें म्हटलें आहे कीं, रोम्युलसच्या कायद्यानें ज्येष्ठ पुत्र किंवा कन्या यांचा त्याग करण्यास मनाई असे. तसेंच एखाद्या मुलाचा त्याग करावयाचा झाल्यास पांच शेजाऱ्यांची संमति लागे. नाहीं तर त्या पित्यास त्याच्या अर्ध्या मालमत्तेइतका दंड पडत असे.

## पित्याच्या मर्जीवर अपत्यजीवित—

प्राचीन जर्मन लोकांत अशी चाल होती कीं, मूल जन्मल्यावर तें बापाच्या पुढें आणून ठेवीत. त्यानें जर त्यास वर उचलून घेतलें तर त्यास वाढवीत; नाहीं तर टाकून देत. त्यास दूध आणि मध खाऊं घातल्यावर तें कुटुंबांत सामील झालें असें समजण्यांत येई. आपल्या जातकर्म व नामकर्म संस्कारांत सोन्याच्या वस्तूनें मुलाच्या तोंडांत मध घालण्याचा विधि आहे, त्या विधीशीं वरील विधीचें साम्य दिसतें.

## लोकभ्रम—

कांहीं लोकभ्रमामुळेंहि मुलांस टाकून देण्याची प्रवृत्ति होत असे. ओडेसिअस याच्या जन्माचे वेळीं तो घातक होईल असें देववाणीनें सांगितल्यामुळें त्यास टाकून देण्यांत आलें होतें. पॅरिस यास ट्रायला जाळणारी मशाल म्हणत व तसें स्वप्न त्याच्या जन्माचे वेळीं पित्यास पडलें होतें. सायरस याच्यासंबंधानेंहि अस्त्यागस या त्याच्या आजास स्वप्न पडून आपल्या मुलीचा मुलगा आपलें राज्य घेईल असें त्यास वाटल्यामुळें त्यानें त्यास टाकून दिलें होतें (हिरोडोटस १. १०७-८). कंसानें देवकीच्या मुलांस मारल्याची कथा प्रसिद्ध आहे. मूळ नक्षत्रावर जन्मलेलें मूल घातक अशी समजूत अद्यापहि प्रचलित असलेली आढळते. जुळीं मुलें अशुभ समजण्याची चाल अनेक लोकांत आढळते. एखाद्याचीं मुलें जगत नसल्यास झालेलें मूल पारावर नेऊन ठेवणें किंवा कोणाच्या तरी ओटींत घालणें हा प्रकार आपल्याकडे अजून दिसून येतो व असें मूल पुन्हां दुसऱ्याकडून धर्माचें म्हणून मिळालें म्हणजे जगतें अशी समजूत आहे.

## राष्ट्रबलसंवर्धन—

मुलांचा त्याग करण्याकडे प्रवृत्ति होण्यास आणखी एक कारण आढळतें. तें म्हणजे आपलें राष्ट्र किंवा जाति ही बलिष्ठ असावी ही समजूत होय. स्पार्टन लोक अशक्त अथवा रोगी मुलास एका दरींत टाकून देत.[1] प्लेटो यानें लिहिलेल्या आपल्या आदर्श राज्यघटनेंतहि यासंबंधीं विवेचन केलें आहे (४६१). अथेन्समध्येंहि बापानें जर मुलाचा जातकर्म विधि केला नाहीं तर त्यास वाढविण्यांत येत नसे. थिबिस

१ प्लुटार्च-लायकरगस १६.

शहरामध्येंहि बऱ्याच उत्तरकालीं मुलांचा त्याग करण्यास मनाई करण्यांत आली व टाकून दिलेलीं मुलें कोणास तरी गुलाम म्हणून वाढविण्यास देण्यांत येत असत.[1]

**मुलांचें लचांड—**

असंस्कृत जातींमध्यें केवळ लबेदा किंवा अडगळ नको म्हणून मुलांस टाकून देण्याची चाल दृष्टीस पडते. ऑस्ट्रेलियामध्यें जे भटके लोक आहेत ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं लागले म्हणजे लहान मुलांस सोडून जातात असें अनेक ग्रंथकारांनीं वर्णन केलें आहे.[2] ग्रीक व रोमन तत्त्ववेत्त्यांनीं मुलांस टाकून देण्याच्या चालीसंबंधीं अनेक ठिकाणीं चर्चा केल्याचें आढळतें व त्यांच्या नाटकांतहि प्रथम टाकून दिलेलीं मुलें पुढें ओळख पटून स्वीकारल्याचीं उदाहरणें आढळतात. प्लीनीनें ट्राजन बादशहाला परित्यक्त मुलांस दुसऱ्यानें वाढविल्यास त्यांचे हक्क कोणते असा प्रश्न विचारला आहे. अशीं मुलें त्यास बिथ्निया प्रांतांत आढळून आलीं. रोमन नाटकांतून टाकलेलीं मुलें गुलाम किंवा वेश्या म्हणून वाढविलेलीं आढळतात. अशुभ वाटणारीं मुलें सहसा आढळणार नाहींत अशा ठिकाणीं टाकण्यांत येत असत. अथीनियन लोकांत मूल भांड्यामध्यें ठेवून जणूं काय देवतेस अर्पण करण्यांत आलें आहे अशा रीतीनें टाकून देत.

---

१ एलियन—व्हेरिआ हिस्टोरिया—२·७.

2 Spencer & Gillen: Native Tribes of Central Australia, 1899, p. 51. Howitt: Native Tribes of South East Australia, 1904, p. 750.

यहूदी लोकांतहि मुलें टाकून देत असत हें आपणांस हॅगर व तिचें मूल, तसेंच इश्माईल याच्या उदाहरणावरून दिसून येतें. (बायबल उत्पत्ति. २१). मोझेस यासहि बिकट परिस्थितीमध्यें नदींत सोडून देण्यांत आलें होतें.

**मातापित्यांची पूर्ण सत्ता—**

वसिष्ठ स्मृतीमध्यें (१५.२) बापास व मातेस मुलास देऊन टाकण्याचा, विकण्याचा किंवा त्याग करण्याचा अधिकार आहे असें म्हटलें आहे. याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. यजुर्वेदामध्यें मुलगी झाल्याबरोबर तिचा त्याग करण्यांत येतो असें म्हटलें आहे; परंतु याचा अर्थ निश्चित नाहीं. महाभारतामध्यें गंगेनें आपल्या पहिल्या सात पुत्रांस नदींत बुडविल्याची कथा प्रसिद्ध आहे. मुलीस टाकून देण्याची चाल बऱ्याच अर्वाचीन काळींहि प्रचलित होती. यावरून प्राचीन काळींहि ती रूढ असण्याचा संभव आहे. मनुस्मृतीमध्यें जे द्वादश पुत्र सांगितले आहेत त्यांत एक अपविद्ध म्हणून सांगितला आहे (९.१७१). यावरून त्या कालांत मुलांचा त्याग करीत हें स्पष्ट होतें. मेधातिथि त्याग करण्याचें कारण पित्याचें दारिद्र्य किंवा त्यावर आलेलें एखादें संकट किंवा मुलामध्यें असलेला दोष हें देतो. तथापि यावेळींहि मुलांचा किंवा नातेवाइकांचा त्याग करणें हें दोषार्ह समजलें जात असे असें दिसतें; कारण याज्ञवल्क्य स्मृतींत अशा त्यागास १०० पण दंड सांगितला आहे (२.२३७). विष्णुस्मृति (५.११३) व मनुस्मृति (८.३८९) यांमध्येंहि असेंच प्रतिपादन करण्यांत आलें आहे. आपस्तंब धर्मसूत्रांत मुलें विकणें किंवा विकत घेणें हें गर्ह्य मानलें आहे (२.१३,११). एखाद्या स्त्रीची वर्तणूक वाईट असेल तर तिचा त्याग करावा अशी शिक्षा सांगितली आहे, तथापि

तीस पोटगी देण्यांत यावी असें म्हटलें आहे. व्यभिचाराखेरीज स्त्रीचा त्याग करणें योग्य नव्हे असें मानण्यांत येत असे. सामान्यतः उच्च जातींमध्यें योग्य कारणांशिवाय घटस्फोट किंवा स्त्रीचा त्याग करणें ही गोष्ट संमत नसे. मात्र खालच्या जातींत विशेषतः द्राविडवंशीय जातींत या गोष्टी विशेष आढळून येतात.

**असंस्कृत संतातिनियमन—**

एस्किमो लोकांत दोन मुलांपेक्षां अधिक होणारीं मुलें त्यांचा गळा दाबून किंवा त्यांस उपाशी ठेवून मारीत असत. यास मुख्य कारण अन्नाचा तुटवडा हेंच असे. सामान्यतः रानटी लोकांत ही मुलांचा त्याग करण्याची प्रवृत्ति दिसून येते; व याबद्दल अनेक ग्रन्थकारांनीं उल्लेख केलेले आहेत.

दक्षिण अमेरिकेंतहि निरनिराळ्या जमातींमध्यें लहान मुलांस मारून टाकण्याची चाल आढळते. सातिवा व मनाको लोकांत व्यंग मुलांस भुतानें पछाडलेलें समजून टाकण्यांत येत असे. ग्वेकुरम लोकांत तीस वर्षांच्या वयाच्या आंतील तरुण स्त्रिया बहुधा आपल्या मुलांस ठार मारून टाकीत; याचें कारण असें असे कीं, मूल अंगावर पीत असलेल्या काळांत अशा स्त्रिया पतीच्या विषयवासना तृप्त करण्यास असमर्थ असल्यामुळें त्यांचे पती दुसऱ्या बायकांशीं विवाह करीत. अबिपोन लोक दोन मुलांपेक्षां अधिक होणाऱ्या मुलांस जीवंत ठेवीत नसत. तथापि या लोकांत मुलांपेक्षां मुलीस अधिक पसंत करण्यांत येत असे, कारण पित्यास कन्याधन बरेंचसें मिळत असे व मुलांकरितां उलट द्यावें लागत असे. पॅटेगोनियामध्यें मुलास जीवंत ठेवावयाचें किंवा नाहीं हें आईबापांच्या मर्जीवर असे व ठेवावयाचें

नसल्यास गळा दाबून मारून टाकण्यांत येत असे ( प्लॉस. २-२५२–२५३ ). अमेझॉन स्त्रिया बाळंतपणापेक्षां गर्भपात पसंत करीत ( व्हॉं डेनस्टेन. ३३४,५०३ ) पॅराग्वांतील चाकोमधील इंडियन लोकांत विरूप मुलें किंवा पश्चाज्जात मुलें किंवा मुलांपूर्वीं जन्मास येणाऱ्या मुली यांस बहुधा जीवंत ठेवीत नसत ( W. B. Grubb–Among the Indians of Paraguayan Chaco, London, 1904, P. 64 ).

**अपत्यत्याग हा गर्ह्य होय—**

सामान्यत: मुलांचा त्याग करण्याच्या विरुद्ध इराणमध्यें प्रवृत्ति होती असें दिसून येतें. कारण अनैतिक संबंधापासूनहि होणाऱ्या गर्भाचा पात करणें पातक समजलें जात असे व पुरुषानें अशा मुलाचें पालन केलें पाहिजे अशी आज्ञा असे ( व्हेंदिदाद १५·५–१६ ). सातव्या शतकांतील शायस्त–ला–शायस्त या ग्रंथांत उपस्त्रीस झालेल्या मुलांसहि पित्यानें आपले पुत्र मानलें पाहिजे असें सांगितलें आहे, परंतु तेथेंच अशा मुलांपासून कांहीं फायदा नाहीं असेंहि म्हटलें आहे ( १२·१४ ). यावरून त्यांस न मानण्याचा प्रवात असावा; पण त्यांचा त्याग करण्यांत येत असे असें निश्चितपणें मानण्यास जागा नाहीं. अर्दविराफ या ग्रंथांत अनौरस संततीचें पित्यानें पालन न केल्यास तो नरकांत जातो व तेथें तीं मुलें त्याच्यासभोंवतीं जमून ओरडतात व त्यास कुत्र्याप्रमाणें फाडतात असें वर्णन आहे. जी आई मुलास मारते तीहि नरकांत जाते असें म्हटलें आहे. तसेंच स्वत:चीं मुलें टाकून दुसऱ्या मुलांस द्रव्याकरितां पाजणाऱ्या लोभी स्त्रियाहि नरकांत जातात असें वर्णन आहे ( Haug and West–pp. 42, 44, 59, 87, 94 ).

## व्यंग मुलें—

तथापि मूल जर कुरूप असेल तर त्याच्या ठिकाणची कुरूपता ही सैतानाची कृति मानण्यांत येत असे व या प्रवृत्तीमुळें मुलांचा त्याग करण्याचा संभव असे (व्हेंदिदाद २·२९). साम यानें आपला मुलगा झाल यास त्याचे केंस पांढरे होते म्हणून तो अहरिमनाचा पुत्र असावा असें समजून टाकून दिलें होतें अशी कथा शहानामा या ग्रंथांत आढळते (शहानामा. वुलर्स पृ. १३१–१३५). सायरसला त्याचा आजा अस्त्यागस यानें तो आशियाचा राजा होणार असें स्वप्न पाहिलें होतें म्हणून टाकून दिलें होतें ही कथा हिरोडोटसनें वर्णन केली असून ती प्रसिद्धच आहे व तिचा पूर्वींहि उल्लेख केला आहे (हिरो. १·१०७).

## जपानांतील वृत्ति—

जपानमध्यें मुलींचा मात्र क्वचित् त्याग करण्यांत येत असावा, पण तशी सर्रास चाल असावी असें दिसत नाहीं. कुरूप मुलांचा मात्र त्याग करीत असें मानण्यास हिरुको या देवाची कथा जागा करून देते. हा तीन वर्षांचा झाला तरी त्यास चालतां येईना म्हणून त्याच्या आईबापांनीं त्यास कापराच्या होडींत घालून नदींत सोडून दिलें असें निहोंगीमध्यें वर्णन केलेलें आढळतें. या गोष्टीची तुलना मोझेस किंवा कर्ण यांच्या कथेशीं करतां येईल.

याप्रमाणें मातापितरांस पुत्र किंवा अपत्य हें कितीहि प्रिय असलें तरी प्रसंगीं आत्मसंरक्षणाकरितां किंवा त्रास चुकविण्याकरितां मनुष्याची पोटच्या गोळ्यासहि टाकून देण्याची प्रवृत्ति कशी होते व 'आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि'। या सुभाषिताप्रमाणें मनुष्य स्वतःच्या

स्वार्थाकरितां किंवा संरक्षणाकरितां मुलाच्या प्राणांवरहि कसा उदार होतो ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट होत आहे.

तथापि ही प्रवृत्ति विशेषत्वानें असंस्कृत कुटुंबामध्यें व समाजामध्येंच आपणास प्रमुखत्वानें आढळते. जसजसा समाज सुसंस्कृत होत जातो तसतशी त्याच्यामधील पाशवी वृत्ति कमी होत जाऊन दैवी वृत्ति अथवा मानुषवृत्ति व सहानुभूति ही वाढत जाते. जसजसें राष्ट्र प्रगतिपथावर पुढें पुढें आक्रमण करूं लागतें तसतसें मुलें ही एक राष्ट्रीय संपत्ति आहे ही गोष्ट अधिकाधिक मान्य होत जाऊन या संपत्तीचें संवर्धन व पोषण हें राष्ट्राचें एक अवश्य व अगत्याचें कर्तव्य असून तें योग्य रीतीनें पार पाडलें पाहिजे याची जाणीव समाज व राष्ट्रधुरीणांस होऊन हें कार्य करणाऱ्या संस्था खासगी व राष्ट्रीय प्रयत्नानें स्थापन होतात व अनाथ अर्भकांसहि योग्य तो आश्रय मिळून त्यांचें संगोपन, संवर्धन व शिक्षण पद्धतशीर रीतीनें होऊं लागतें व अशा रीतीनें समाजाचा हा महत्त्वाचा घटक कार्यक्षम होऊन राष्ट्राच्या उपयोगी पडूं लागतो.

याकरितां समाजाच्या नेत्यांनीं या प्रश्नाची उपेक्षा न करितां त्याकडे राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें पाहिजे व त्या दृष्टीनें बालकें हीं खरोखरीच राष्ट्रीय संपत्ति समजून तिचें जतन व संवर्धन केलें पाहिजे.

---

# प्रकरण बारावें

# वृद्धत्याग

**पितरांबद्दलच्या भावना—**

आईबापांस पुत्र कितीहि प्रिय व आवश्यक असला तरी मुलें विरूप, अशुभ अथवा पोषणास किंवा संरक्षणास जड झालीं किंवा अनैतिक संबंधापासून झाला म्हणजे ज्याप्रमाणें टाकून देण्याची प्रथा अनेक समाजांत रूढ असे त्याप्रमाणें पित्याचें कुटुंबामध्यें कितीहि महत्त्वाचें स्थान असलें किंवा कुटुंबपोषणास त्याची कितीहि आवश्यकता असली व तरुणपणीं त्याच्या हातांत कितीहि सत्ता असली तरी वार्धक्यामध्यें त्याच्या पोषणाची अडचण किंवा तो व्याधिग्रस्त वगैरे झाल्यास त्याची शुश्रूषा करण्याची पीडा किंवा त्याचें दुर्बलत्व वगैरे अनेक कारणांमुळें त्याच्याबद्दलच्या वृत्तीमध्यें त्याच्या कुटुंबियांच्या ठिकाणीं विपरीत भावना उत्पन्न झाल्याशिवाय राहात नसे ही गोष्ट अनेक समाजांच्या निरिक्षणावरून आपणांस दिसून येते. अर्थात् या भावना म्हणजे एक प्रकारच्या रानटीच भावना होत व त्या जे समाज अशा रानवट अवस्थेमध्यें असतात त्यांच्या ठिकाणींच उत्पन्न होतात व जसजशी त्यांची सामाजिक, आर्थिक व नैतिक उन्नति होत जाते तसतसे त्यांचेवर चांगले संस्कार घडून येतात; पण तोंपर्यंत त्यांच्या वृत्ति प्राथमिकच अवस्थेस अनुरूप असतात व अशा वेळीं त्यांची आपल्या पितरांशीं वागणूक कांहीं अंशीं आपणांस क्रूरपणाची वाटेल अशीच असते; पण समाजाच्या व पितापुत्रसंबंधाच्या अभ्यासाच्या दृष्टीनें ती कशी असे हें आपणांस पाहिलें पाहिजे.

**पोषणाची अक्षमता—**

ज्याप्रमाणें आईबाप कांहीं प्रसंगीं मुलास टाकून देत त्याप्रमाणें मुलेंहि वृद्धपणीं आईबापांचा त्याग करीत असत असें दिसून येतें. असंस्कृत जातींमध्यें अन्नाचा तुटवडा हें वृद्ध व अशक्त लोकांस टाकून देण्याचें मुख्य कारण असे. ऑस्ट्रेलियन लोकांत सहसा वृद्ध लोकांस टाकून देण्याची प्रवृत्ति आढळत नाहीं, तर उलट त्यांस सन्मानानेंच वागविण्यांत येतें व त्यांस योग्य तो अन्नाचा वांटा देण्यांत येतो. दक्षिण आफ्रिकेंत व पॅसिफिक किनाऱ्यावरील अमेरिकन इंडियन लोकांत वृद्ध लोकांस टाकून देण्याची चाल विशेष आढळते. कुराणांत वृद्ध मनुष्यास ममताळू-पणानें वागवावें व मुलांस मारूं नये अशी स्पष्ट आज्ञा आहे.

**रोगी मनुष्य—**

अमेरिकन इंडियन लोकांत वृद्ध व रोगी या लोकांस टाकून देण्याची चाल सररहा होती व अनेक दिवसांचा रोगी अथवा वृद्ध मनुष्य यास मारून टाकणें हें दयाळूपणाचें मानीत. एखाद्या वृद्ध रोग्यास टाकून देऊन तीन दिवस झाल्यावर तो मेला नसल्यास मृत गीतें म्हणत त्याचें पोट फाडून त्यास मारीत असत. इरॉक्वा लोकांत वृद्ध पतीचा वा पत्नीचा त्याग करीत. ह्यूरॉन लोकांत वृद्ध स्त्रिया व वैदू वगैरे लोकांस टाकून देत. बनाकी लोकांत तर तरुण रोग्यासहि स्थानत्याग करण्याचे वेळीं टाकून देण्यांत येत असे (जेसुइट रिलेशन्स).

**उद्धित पितर—**

अथर्ववेदामध्यें* (१८·२,३४) उद्धित पितरांस आमंत्रण करण्याचे

* ये निखाता ये परोप्ता ये दग्धा ये चोद्धिताः।
सर्वांस्तानग्न आवह पितॄन्हविषे अत्तवे॥

मंत्र दिले आहेत, त्यावरून वृद्ध पितरांस टाकून देत असत असें म्हणतां येईल. परंतु यांतील उद्धित शब्दाचा अर्थ मृतांचीं शरीरें असाहि होण्याचा संभव आहे. वृद्ध लोकांनीं गंगेमध्यें जलसमाधि घेण्याची पद्धति ब्रिटिश अमदानीपर्यंत रूढ होती. ती अलीकडे सरकारनें बंद केली. जाट लोकांत व पंजाब प्रांतांत अजूनहि मुलींचा त्याग केला जातो (Census of India, General Report, 1901).

ऋग्वेदांतहि उद्धित* शब्दावरूनच टाकून दिलेला असा अर्थ करून वृद्ध लोकांच्या त्यागाची प्रथा असावी असें झिमरनें म्हटलें आहे पण तेथेंहि उद्धित शब्दाचा परित्यक्त असाच केवळ अर्थ होतो असें निश्चितपणें म्हणतां येत नाहीं. यावरून ऋग्वेद कालीं वृद्धांचा त्याग करीत असत असें म्हणण्यास निश्चित पुरावा नाहीं. त्यांस कुटुंबांत पुत्र व स्नुषा यांचेजवळ रहावें लागत असे असें मात्र मानण्यास पुष्कळ जागा आहे.

**व्यंग व वृद्ध लोक—**

इराण व आर्मेनिया देशांत लंगडे वगैरे व्यंग लोकांस टाकून देत असत. बॅक्ट्रियामध्यें तर वृद्ध मनुष्यास कुत्र्यास खाण्यास देत (स्ट्रॅबो ११.११,३). अवेस्तामध्यें वृद्ध मनुष्याजवळ थोडें अन्न ठेवून त्यास सोडून देत, असा उल्लेख आहे (व्हेंदिदाद ३.१८). अधार्मिक मनुष्यास जन्मभर कोंडून ठेवीत (स्पीगेल ३.६८२). कास्पियन समुद्राजवळील

* पार्षद्वाणः प्रस्कण्वं समसादयच्छयानं जीव्रिमुद्धितम्।
सहस्राण्यसिषासद्गवामृषिस्त्वोतो दस्यवे वृकः॥
ऋ. ८.५१, २

लोकांमध्यें सत्तर वर्षांवरील लोकांस उपाशी ठेवण्यांत येत असे किंवा टाकून देण्यांत येत असे, किंवा जंगली प्राण्यास खाण्यास देण्यांत येत असे ( स्ट्रॅबो ११.११.३ ). हिरोडोटस यानें मसागेटी, पाडी व इसेडोन लोकांत वृद्ध लोकांस टाकून देत असें वर्णन केलें आहे ( हिरो १.२१६, ३.९९, ४.२६ ). ग्रीक लोकांतहि वृद्ध लोकांस घरांतून काढून देण्याची चाल असे. सिऑसच्या कायद्याप्रमाणें दुराचारी लोकांस गांवांत राहण्याची बंदी करण्यांत येत असे व साठ वर्षांवरील लोकांस हेमलॉक वनस्पतीचें विष देऊन मारीत असत ( स्ट्रॅबो १०.५,६ ). रोमन लोकांत साठ वर्षांच्या वरील वृद्ध लोकांस टायबरमध्यें पुलावरून ढकलून देण्यांत येत असे असें सिसरोनें म्हटलें आहे ( प्रो. रॉसिओ अमेरिनो §१०० ). उत्तरेकडील जर्मन वगैरे लोकांतहि अशाच दुष्ट चाली असत ( गुमेर-जर्मानिक ओरिजन्स २०३ ). न्यू हेब्रिडिस बेटांत सत्तर वर्षे वयाच्या-वरील वृद्ध लोकांस त्यांच्या विनंतीवरून पुरण्यांत येत असे. सामोआ बेटांत तर असें त्यांस न पुरणें ही गोष्ट कुटुंबास कमीपणा आणीत असे ( टर्नर ३३५ ). सारावाक राज्यांत वेड्या लोकांस किंवा अतिशय आजारी असणाऱ्या लोकांस टाकून देत ( एच. लिंग रॉथ ३१२ ).

याप्रमाणें नको असलेल्या मुलांप्रमाणेंच प्रसंगीं निरुपयोगी म्हणून किंवा अडगळ म्हणून अगर रोगी, अशक्त व जीवित कंठण्यास अक्षम म्हणून वृद्ध मनुष्यास टाकून देणें किंवा वेळप्रसंगीं मृत्यूच्या स्वाधीन करणें या गोष्टी समाजाच्या विशेषतः प्राथमिक व अप्रगत अवस्थांमध्यें कशा रूढ होत्या हें आपण पाहिलें.

**या प्रवृत्तींत सुधारणा—**

परंतु ही भावना अत्यंत स्वार्थी व निष्ठुरपणाची असून एक प्रकारें कृतघ्नपणाचीहि आहे या गोष्टीची जाणीव समाज जसजसा सांस्कृतिक

प्रगति करूं लागला तसतशी होत जाणें अपरिहार्य होतें व ज्या समाजांतील व्यक्तींनीं तरुणपणीं समाजाचें संवर्धन, संरक्षण व परिपोषण केलें त्या व्यक्तींस वार्धक्यामुळें दौर्बल्य आलें असतां निष्ठुरपणें वागविणें किंवा प्रसंगीं त्यांचा त्याग करणें अगर त्यांचा मृत्यु जवळ आणणें या निर्घृण वृत्तीस आळा पडणें साहजिक होतें व त्यामुळें आज जीं राष्ट्रें सुसंस्कृत असून प्रगतिपथावर आहेत त्यांनीं वृद्ध लोकांस वृद्धवेतन मिळण्याची, तसेंच त्यांचें संरक्षण, पोषण व पालन होण्याची तजवीज चालविली आहे. सार्वजनिक रुग्णालयांतून व अनाथालयांतून त्यांची तजवीज लावण्यांत येत आहे व त्यांची असहाय स्थितींत आबाळ होणार नाहीं व वार्धक्यांतील त्यांचें आयुष्य शक्य तितक्या चांगल्या स्थितींत व सुखावह रीतीनें जाईल अशी तरतूद करण्याचें तेथील शासनसंस्थांनींहि धोरण स्वीकारलें असून तसे उपक्रम सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत चालू आहेत.

## * * सिंहावलोकन * *

आतांपर्यंत आपण कुटुंबसंस्थेचे जे मूलघटक पितापुत्र त्यांचे संबंध व त्यांवर आधारलेली कुटुंबसंस्था यांचा विकास निरनिराळ्या समाजांच्या सांस्कृतिक वाढीस अनुसरून व इतर परिस्थितीप्रमाणें कसकसा होत गेला, कुटुंबसंस्थेचें महत्त्व निरनिराळ्या समाजांत कसें कमी-अधिक होत जातें, व्यक्तीस कुटुंबसंस्थेवर कोणत्या परिस्थितींत विशेष अवलंबून रहावें लागतें व कोणत्या परिस्थितींत त्यास कुटुंबसंस्थेपासून पृथक्पणें राहतां येतें, तसेंच कुटुंबाची अविभक्त कुटुंबापासून वैयक्तिक कुटुंबाकडे कशी प्रवृत्ति होत गेली व आतां व्यक्तीचें व्यक्तिमत्व हळू-

हळू कसें महत्त्वाचें मानलें जाऊं लागलें व त्याच्या अंगच्या अनेक गुणांस शक्य तों अवसर देऊन इतर निर्बंध कमी करण्याकडे समाजाच्या विचाराची प्रगति कसकशी होत गेली हें पाहिलें. तसेंच आजच्या प्रचलित कायद्यानुसार मुलें आणि पिता अथवा पालक यांचे संबंध काय आहेत याचेंहि अवलोकन केलें.

त्याप्रमाणेंच पितृसत्ताक कुटुंबपद्धतीस महत्त्व प्राप्त झाल्यामुळें पित्यास कुटुंबामध्यें महत्त्वाचें स्थान कसें प्राप्त होत गेलें व हळू हळू प्रत्येक व्यक्तीच्या विकासास व तिच्या अंगच्या अनेक प्रकारच्या स्वभाविक शक्तींस व गुणांस योग्य तो अवसर मिळावा व तिच्या सर्व शक्तींचा पूर्ण विकास व्हावा म्हणून व्यक्तींवरील सामाजिक व कौटुंबिक निर्बंध हळूहळू दूर कसे होत गेले व समाजाची आजची विचाराची दिशा प्रत्येक व्यक्तीस समाजाचा व राष्ट्राचा योग्य नागरिक होण्याकरितां शक्य त्या सर्व सवलती देण्याकडे कशी झुकत आहे हें पाहिलें.

तसेंच प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं असलेल्या स्वसंरक्षण व स्वजाति व स्ववंशरक्षण या प्रवृत्तीमुळें कुटुंबामध्यें पुत्रास महत्त्व किती होतें व त्याकरितां नैसर्गिक किंवा दत्तक पुत्रास प्राधान्य देऊन प्रत्येक मनुष्य आपलें ऐहिक व पारलौकिक कल्याण साधण्याचा प्रयत्न कसा करीत होता हेंहि आपल्या नजरेस आलें.

एकीकडे पुत्राचें व पित्याचें महत्त्व मान्य असूनहि कांहीं परिस्थितीमध्यें त्यांस टाकून देण्याकडेहि मनुष्याची प्रवृत्ति कशी होत असे व आजहि कांहीं वन्य समाजांमध्यें ही प्रवृत्ति कशी वसत आहे आणि जसजशी सांस्कृतिक प्रगति होत जाते तसतसा या पाशवी प्रवृत्तीस आळा कसा बसत जातो हेंहि आपणांस आढळून आलें आहे.

याप्रमाणें समाज जसजसा विकास पावत जातो तसतसा तो प्रत्येक व्यक्तीस अधिक स्वतंत्र व कार्यक्षम बनाविण्याचा प्रयत्न करीत असतो व अशा रीतीनें समाजाची प्रगति होत असतांहि तो परंपराप्राप्त संस्था व समजुतींस इष्ट तें वळण देऊन त्यांचा समूळ त्याग न करतां त्यांचा कसा योग्य उपयोग करून घेतो हें अर्वाचीन कुटुंबें व समाज यांकडे पाहिलें असतां आपणांस दिसून येतें. कुटुंबसंस्था जी पूर्वी केवळ कांहीं सामाजिक अगर राजकीय निर्बंधांमुळेंच टिकून राहिली होती ती कुटुंबांतील व्यक्तींच्या परस्परांवरील प्रेमामुळें व साहचर्य व सहकार्य यांमुळें पुढेंहि टिकून राहील ही गोष्ट आतां आपणांस स्पष्ट दिसत आहे.

याकरितां या कुटुंबांतील प्रमुख घटक जे पितापुत्र यांचे संबंध दिवसें-दिवस अधिकाधिक सहकार्याचे व प्रेमाचेच राहतील हेंहि निःसंशय आहे. अशा प्रेमाच्या पायावर आधारलेल्या कुटुंबामध्यें अपत्यपोषणाची व अपत्यसंवर्धनाची जबाबदारी यापुढेंहि पित्याकडेच राहणार आहे व माता ही त्याची सहकारी होणार आहे. या दृष्टीनें मातापित्यांवरील जबाबदारी ही अधिकाधिक स्पष्ट होत आहे व आपल्या अपत्यरूपानें होणारे आपल्या राष्ट्राचे भावी नागरिक हे कार्यक्षम कसे होतील, त्यांच्या अंगच्या नैसर्गिक गुणांस योग्य तो अवसर मिळून त्यांचें संवर्धन कसें होईल व त्यांस इष्ट गोष्टींमध्यें गोडी उत्पन्न होऊन अनिष्ट गोष्टींपासून ते दूर कसे राहातील, त्यांच्या अंगीं असणाऱ्या निरनिराळ्या स्वाभाविक मनोवृत्तींचा योग्य परिपोष होऊन त्यांस अनिष्ट वळण कसें लागणार नाहीं, तसेंच त्यांच्या ठिकाणीं आढळणाऱ्या निरनिराळ्या मनोविकारांवर योग्य तें नियंत्रण व त्यांस योग्य तें स्वातंत्र्य मिळून त्यांचा परिपोष त्यांस अनुकूल कसा होईल, त्यांच्याभोंवतीं असलेल्या घरांतील व बाह्य परिस्थितीचाहि त्यांच्यावर इष्ट तो परिणाम कसा

होईल, त्यांचें शिक्षण योग्य दिशेनें कसें चालवितां येईल, त्यांस योग्य असे खेळ कसे आवडूं लागतील, त्यांचा पोषाख वगैरेहि त्यांस आरोग्य-कारक व हितकर कसा होईल, त्यांच्या हातीं या वयांत पथ्यकर व हितकर वाङ्मयच कसें पडेल इत्यादि अनेक गोष्टींकडे लहानपणापासून लक्ष्य देणें मातापित्यांस अवश्य होऊन बसलें आहे.

सामान्यतः पांच वर्षांतच मुलाचा स्वभाव जवळ जवळ पूर्णपणें बनतो असें अलीकडील मानसशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. याकरितां या बालवयांतच मुलांचें संगोपन इष्ट त्या मार्गानें करण्याची जवाब-दारी आतां पालकांवरच असते अशी बालमानसशास्त्रज्ञांची खात्री होत चालली असून पालकांनीं या दिशेनें आतां आपल्या वागणुकी-कडे लक्ष्य देण्याची वेळ आली आहे.

तेव्हां सध्यांच्या पित्यांवर व पालकांवर केवढी जबाबदारी असते याची जाणीव त्यांस झाली पाहिजे. परमेश्वरानें आपल्या स्वाधीन केलेल्या बालकाचा सर्व भविष्यकाल आपल्या हातांत असून त्याचें सोनें किंवा माती करणें हें पूर्णपणें पित्यावर अवलंबून असतें व यापुढें बालकाच्या संगोपनाकडे केवळ वरवर पाहून चालणार नाहीं. आतां-पर्यंत ही कामगिरी शिक्षकाची आहे असें मानण्याची प्रवृत्ति असे. पण आतां शिक्षकाच्या हातांत मूल जाण्यापूर्वींच त्यावर अनेक सुफलदायी संस्कार होणें इष्ट असतें, हें दिसून आलें असून या वयांत जर मुलाची हयगय झाली तर तिचे परिणाम त्यास जन्मभर भोगावे लागतात ही गोष्ट स्पष्ट झाली आहे.

याकरितां प्रत्येक पित्यानें ही आपली जबाबदारी ओळखून ती योग्य तऱ्हेनें पार पाडली पाहिजे. याकरितां पित्यासहि जरूर तें शिक्षण

मिळण्याची सोय झाली पाहिजे व प्रगतिपर राष्ट्रांमध्यें अशा तऱ्हेचे प्रयत्नहि सुरू आहेत व त्या दृष्टीनें इतर राष्ट्रांतहि प्रगति होत आहे.

याप्रमाणें या पितापुत्रसंबंधांतील सामाजिक बाबींचा आतांपर्यंत विचार करण्यांत आला असून पुत्राची किंवा अपत्याची भावी आयुष्याच्या दृष्टीनें योग्य तयारी कशी करतां येईल या विशेषतः शैक्षणिक अंगाकडे आपणांस लक्ष्य द्यावयाचें आहे. त्याकरितां प्रथम लहानपणापासून मुलांच्या अंगच्या प्रवृत्तींचा प्रारंभापासून अभ्यास करून त्यांस इष्ट तें वळण लावून त्यांस राष्ट्राचे सुयोग्य नागरिक बनविण्याचें कार्य कसें साधावयाचें या महत्त्वाच्या अंगाकडेहि लक्ष्य दिलें पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन पित्यानें आपल्या अपत्याचें बालपणीं संगोपन कसें केलें पाहिजे व त्यानंतर तें सज्ञान होऊन आपली स्वतःची काळजी घेण्यास योग्य होईपर्यंत त्यास कसें वागविण्यांत आलें पाहिजे याचा क्रमशः विचार करूं.

पाश्चात्य राष्ट्रांत अनेक शिशुसंवर्धक केंद्रें व बालशिक्षणालयें स्थापन झालीं असून बालमानसशास्त्राचाहि अभ्यास बराच चालू आहे. तथापि सर्व मुलांची काळजी घेण्याइतक्या संस्था कोणत्याहि राष्ट्रांतील सरकार स्थापन करूं शकणार नाहीं. रशिया हें राष्ट्र सर्वच गोष्टींस अपवाद म्हणून धरून चालण्यास हरकत नाहीं. पण इतर राष्ट्रांत सर्वत्र अशीच स्थिति आहे. याकरितां सर्व राष्ट्रांत कुटुंबसंस्था ही अस्तित्वांत राहणार असून कौटुंबिक शिक्षण व कौटुंबिक आचाराचा मुलाच्या मनावर परिणाम होणें अपरिहार्य आहे. याकरितां प्रत्येक कुटुंबानें व प्रत्येक कुटुंबांतील पित्यानें आपल्या अपत्याचें संगोपन कसें केलें पाहिजे याची दिशा पुढील प्रकरणांतून दाखविण्यांत आली आहे.

## प्रकरण तेरावें

# मुलांची सहजात प्रवृत्ति

### पित्याची भूमिका—

आतांपर्यंत आपण समाजव्यवस्थेमध्यें कुटुंबाचें महत्त्व किती असतें व त्या कुटुंबामध्यें पित्याचें स्थान किती महत्त्वाचें असतें, तसेंच अपत्य व विशेषत: पुत्र यांचेंहि वंशवृध्द्यर्थ कुटुंबामध्यें किती महत्त्व आहे या गोष्टी पाहिल्या. तसेंच पितापुत्रांचे संबंध निसर्गत:च कसे प्रेमळ असतात, परंतु परिस्थितीमुळें या त्यांच्या वृत्तींमध्यें कसा पालट होतो व कांहीं स्वार्थी वृत्तीनें तर कांहीं लोकभ्रम व भीति यांमुळें कित्येक आईबाप आपल्या मुलांचा त्याग कसा करतात व याच कारणामुळें पुत्रहि आपल्या वृद्ध मातापितरांचा त्याग करण्यास कसे प्रवृत्त होतात हेंहि आपण पाहिलेंच आहे. या गोष्टी अपवादात्मक म्हणून सोडून दिल्या तरी आतांपर्यंतच्या एकंदर पृथ्वीवरील सामाजिक व्यवस्थेमध्यें कुटुंब हा एक महत्त्वाचा घटक मानण्यांत आलेला आहे व त्यामध्यें पित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पशुपालन व कृषिप्रधान आयुष्यक्रमामध्यें अविभक्त कुटुंबपद्धतीस विशेष महत्त्व असल्यामुळें तेव्हां कुटुंबांत पुष्कळ मंडळी असत. परंतु जसजशी पशुपालनवृत्ति ही वाढत्या आर्थिक परिस्थितीमध्यें टाकून देण्यांत आली व कृषिसंवर्धनहि आजच्या औद्योगिक युगामध्यें आर्थिकदृष्ट्या मागें पडत गेलें तसतसा कुटुंबपद्धतींतहि हळूहळू फरक पडूं लागला. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनाहि वाढीस लागत गेल्यामुळें पित्याची आपल्या मुलावरील अप्रतिहत

सत्ता अमान्य होत जाऊन ती हळूहळू नियंत्रित होऊं लागली व पायरीपायरीनें मुलांस अधिकाधिक स्वातंत्र्य मिळूं लागलें. तसेंच अविभक्त कुटुंबपद्धति हळूहळू नवीन परिस्थितीस अयोग्य वाटूं लागून वैय्यक्तिक कुटुंबपद्धतीस प्राधान्य येऊं लागलें. पित्याची आर्थिक बाबींतील सत्ता कमी होत गेली. त्याबरोबर सामाजिक बाबतींतहि ती मर्यादित होऊं लागली व विवाहादि बाबतींत मुलांस स्वातंत्र्य मिळूं लागलें.

## पित्यावरील जबाबदारी—

याबरोबरच पित्यावरील नैतिक जबाबदारी कमी होत जाऊन तिची विभागणी होऊं लागली. पित्याचें कर्तव्य पूर्वीं जें सर्व कुटुंबाचा योगक्षेम चालविणें हें होतें त्याच्याऐवजीं आपल्या मुलांस योग्य कालीं कार्यक्षम बनवून स्वतःच्या पायांवर उभें राहण्यास समर्थ करणें हेंच प्रामुख्यानें मानण्यांत येऊं लागलें. याकरितां मुलांचें बालपणांत योग्य प्रकारें संगोपन करून त्यांस त्यांच्या आयुष्यक्रमास योग्य तें शिक्षण देणें या गोष्टीस विशेष महत्त्व प्राप्त झालें व आज पित्याचें पुत्रासंबंधीं कर्तव्य त्यास राष्ट्राचा कर्तबगार नागरिक बनविणें व या दृष्टीनें त्याची शिक्षणादि पूर्वतयारी करणें हेंच ठरतें. कांहीं समाजांत शिक्षणाची जबाबदारीहि कांहीं बाबतींत शासनसंस्थेनें घेतल्यामुळें तेवढ्यापुरती आईबापांची जबाबदारी कमी झाली आहे व मुलांचें पालनपोषण, त्यांचें शीलसंवर्धन व त्यांस सुनागरिक बनविणें याच गोष्टी प्रामुख्यानें पित्याच्या अथवा पालकाच्या क्षेत्रांत येतात. याकरितां शिशुसंवर्धन या गोष्टीस अलीकडे फारच महत्त्व प्राप्त होत चाललें आहे. शालेय शिक्षण एक वेळ शासनसंस्था करूं शकेल पण गृहशिक्षण व शीलसंवर्धन या गोष्टी जितक्या मातापितरांकडून अथवा

पालकांकडून पूर्णतेनें पार पाडल्या जातील तितक्या दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें व्यवस्थितपणें व कार्यक्षम रीतीनें होऊं शकणार नाहींत. यामुळें हींच पित्याचीं विशेष कर्तव्यें ठरतात व याकरितां लहानपणापासूनच मुलांकडे विशेष लक्ष्य देणें व त्यांना क्रमाक्रमानें योग्य तें शिक्षण देणें इकडे पित्यानें लक्ष्य पुरविलें पाहिजे.

हें कर्तव्य पार पाडण्यास आजच्या आधुनिक शैक्षणिक व इतर कल्पनांप्रमाणें पित्यानें मुलांचें बालपणांत संवर्धन कसें करावें व त्यांस योग्य तें शिक्षण कसें देण्यांत यावें यासंबंधीं विवेचन पुढें करण्यांत आलें आहे.

## लहान मुलाचा अभ्यास—

हें शिक्षण पद्धतशीर व व्यवस्थितपणें देणें याकरितां या कार्याचें साधन जें लहान मूल त्याचाच नीट अभ्यास झाला पाहिजे. कोणीहि मनुष्य कितीहि कर्तबगार असला तरी त्याच्याजवळ जीं साधनें उपलब्ध असतील व ज्या परिस्थितींत तो कार्य करीत असेल त्यावर त्याचें यश अवलंबून असणार. या सिद्धांतास अनुसरून मूल ज्या परिस्थितीमध्यें उत्पन्न झालें असेल व ज्या मानानें त्याची जन्मतः वांशिक व परंपरेनें प्राप्त झालेली पूर्वतयारी असेल त्या मानानेंच त्याचें संवर्धन व पोषण होणार. प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं कांहीं तरी आनुवंशिक गुणधर्म व प्रवृत्ति वास करीत असतात. त्यांचें योग्य ज्ञान करून घेऊन व त्यांस योग्य तें वळण लावून त्यांचा यथायोग्य परिपोष व संवर्धन करणें म्हणजेच मुलास योग्य तें शिक्षण देणें होय. आपणांस या जगांत फारच थोड्या गोष्टी नवीन करतां येतात. मुख्यतः निसर्गनिर्मित साहित्य घेऊन व उपलब्ध साधनें

वापरून त्यापासून सुंदर कृति निर्माण करणें हेंच मनुष्याचें खरें कर्तव्य आहे. या दृष्टीनें मुलाच्या ठिकाणीं ज्या उपजत बुद्धि, सहज प्रवृत्ति वगैरे वृत्ती असतात त्यांचें यथातथ्य ज्ञान करून घेऊन त्यांचा योग्य मार्गानें विकास कसा करतां येईल हेंच आपणांस यापुढें पाहावयाचें आहे.

### मुलाचा स्वभाव बनविणारे घटक—

सामान्यतः लहान मुलाचा स्वभाव त्याच्या पांचव्या वर्षाच्या सुमारास बनतो ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे, व ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. सामान्यतः मुलाचा स्वभाव पुढील दोन गोष्टींनीं निश्चित होतो. (१) त्याच्या अंगीं उपजत असलेले गुण व (२) बाह्य परिस्थितीचा विशेषतः त्याच्या मातापितरांचा त्याच्यावर झालेला परिणाम. या दोन गोष्टींमध्यें जर एकतानता असेल तर त्या मुलाचा स्वभाव सुदृढ असा बनेल; मग तें मूल स्वावलंबी व धाडसी बनून सामाजिक जीवनामध्यें संयमशील, आवेशयुक्त, कोमल व स्थिरप्रेम करणारें असें होईल. मुलीच्या ठिकाणींहि अशाच तऱ्हेचे समान पण स्त्रीजातीस अनुसरून गुण उत्पन्न होतील. याकरितां ही एकतानता कशी निर्माण करतां येईल या गोष्टीकडेच पित्यानें आपलें लक्ष्य पुरविलें पाहिजे.

### जीवनाशीं समरसत्व—

मनुष्यास सुख प्राप्त व्हावयाचें असेल तर त्यास आपल्या स्वभावास आपला व्यवसाय, आपला समाज व आपलें प्रेमविषयक जीवन यांशीं समरस करून घेतां आलें पाहिजे. या बाबतींत त्यास जितकें यश मिळेल व त्यापासून जी त्यास सुखप्राप्ति होईल तीवरूनच त्याचा स्वभाव चांगला किंवा वाईट बनला आहे हें आपण ठरवूं शकतों.

जर तो याप्रमाणें समरस होणार नाहीं तर त्याच्या स्वभावांत आपणांस असमाधान, चिंतायुक्त मुद्रा, समाजापासून तुटक वागण्याची प्रवृत्ति व कधीं कधीं मानसिक अगर मनोदौर्बल्यासंबंधीं विकार दृष्टीस पडतील. आपल्या आयुष्यांतील अनेक प्रसंगींची चिंता, असमाधान, दुराचार-प्रवृत्ति किंवा मानसिक रोग वगैरे गोष्टी आपल्याला टाळतां येण्यासारख्या असतात. बहुधा शारीरिक अथवा मानसिक व्यंग जर जन्मतःच प्राप्त झालें नसेल तर अशा प्रकारच्या गोष्टींपासून आपणांस अलिप्त राहतां येणें शक्य आहे.

**बाह्य परिस्थितीचें आकलन—**

याचे उलट आपणांस जगामध्यें पुष्कळ लोक ज्यांना या गोष्टींचें कांहींच ज्ञान नाहीं असेहि सुखी असलेले दिसून येतात. परंतु ती गोष्ट केवळ आपाततः घडून आलेली असते. तींत मनुष्याची कर्तबगारी दिसून येत नाहीं. वास्तविक प्रत्येक व्यक्तींचें कर्तव्य म्हणजे अनुकूल परिस्थितीचा शक्य तितका आपल्या कार्यास उपयोग करून घेणें व प्रतिकूल परिस्थिति आपल्या सामर्थ्याप्रमाणें दूर करून तींतून मार्ग काढणें हें आहे. याकरितां या बालसंवर्धनाच्या कामींहि पित्यानें आपल्या सभोंवतींच्या परिस्थितींचें योग्य आकलन करून तीस आपल्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**मुलाचा स्वभाव केव्हां बनतो—**

मुलाचा स्वभाव बनविणें व तदनुषंगानें त्याची सुख प्राप्त करून घेण्याची प्रवृत्ति वाढविणें या गोष्टी आईबापांच्या हातीं बऱ्याच अंशीं असतात. मुलाचे शिक्षकास त्याच्या आईबापांनीं त्याचा जो स्वभाव बनविला असेल त्यामध्यें फारसा फरक करतां येत नाहीं. शिक्षकास

फार तर या प्रवृत्ती दृढ करतां येतात. शिक्षकाचें सामान्यतः असें म्हणणें असतें कीं, मुलाच्या ठिकाणीं दिसणाऱ्या वाईट प्रवृत्ती तो येण्याच्या वेळींच त्याच्या ठिकाणीं असून त्या बदलणें त्यास शक्य झालें नाहीं. थोडक्यामध्यें तें मूल शाळेंत यावयाचे पूर्वीच बिघडलेलें होतें, असें ते म्हणतात व त्याच्या प्रवृत्तींत शिक्षकास फार झालें तर वरवर कांहीं फरक करतां येतात, पण मूलतः मुलाच्या स्वभावांत शिक्षकास फारसा फरक करतां येत नाहीं. कोणत्याहि बालकाचा स्वभाव पांचव्या वर्षानंतर बदलणें असल्यास तो फक्त कांहीं विशिष्ट पद्धतीनेंच बदलूं शकतो. पण सामान्यतः तो अपरिवर्तनीय असतो. याकरितां मुलाच्या पहिल्या पांच वर्षांतील स्वभावपरिपोषाबद्दलची जबाबदारी सर्वस्वीं मातापितरांवर आहे.

**मुलाचा स्वभाव बनविण्याची पित्यावर जबाबदारी—**

मुलांच्या पालकांस ही गोष्ट माहीत होणें अतिशय महत्त्वाचें आहे. कारण मानवसमाजाचा विकास यावरच अवलंबून आहे. मानवसमाजाचें सुख व उत्कर्ष हीं त्या समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या जशीं हातांत असतात तशीं तीं सरकारच्या हातांत नसतात. यामुळें वरील गोष्टींचें ज्ञान असण्याची जबाबदारी मुलांच्या पालकांवर विशेष रीतीनें येऊन पडते. आतां त्यांस आपलें मूल शाळेंत घातल्यानें किंवा धंदा करूं लागल्यावर अथवा थोडें मोठें झाल्यावर सुधारेल असें म्हणण्याची सोय राहिली नाहीं. तें आपलेंच काम आहे असें त्यांनीं समजलें पाहिजे. याचे उलट वरील गोष्टींचें थोडेसें ज्ञान मिळवून त्याचा जर योग्य उपयोग केला तर कुटुंबामध्यें आढळणारी अशांतता, काळजी, दुःखें वगैरे गोष्टी ज्या आपणांस मुलाच्या हट्टामुळें किंवा अनुदारतेमुळें उत्पन्न होतात असें वाटतें, पण वास्तविक त्या पालकांच्याच हातून

अजाणतः मुलांचे जे लाड केले जातात किंवा अज्ञानामुळें त्यांना ज्या पद्धतीनें वागविलें जातें, त्या पद्धतींत या सर्व गोष्टींचें मूळ आहे, ही गोष्ट त्यांस दिसून येईल. जर आपल्या मुलाच्या ठिकाणीं क्रूरपणा, खोटें बोलण्याची, चोरी करण्याची, नासधूस करण्याची, बढाईखोरपणाची किंवा अमंगळ प्रवृत्ति दिसून येत असेल, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपलें मूल बिघडलें असें जर आपणांस वाटत असेल तर तो दोष आपला आहे. आपल्या हातीं एक अत्यंत नाजूक व सूक्ष्म अवयवांचें बनविलेलें असें यंत्र आलें असून तें आपणांस नीट हाताळतां न आल्यामुळें आपण जणूं काय तें बिघडवून टाकलें आहे, अशा प्रकारची ही गोष्ट आहे. आपलें एखादें घड्याळ बिघडलें व तें आपण घड्याळजीकडे घेऊन गेलों असतां त्यानें जर आपणांस सांगितलें कीं, तुम्हीं यास अधिक किल्ली दिल्यामुळें अथवा खालीं पाडल्यामुळें किंवा नीट न वापरल्यामुळें तें बिघडलें आहे तर आपण तें त्याचें म्हणणें मान्य करतों. मग आपल्या मुलाच्या बाबतींत एवढी देखील उदार मनोवृत्ति आपण दाखविणार नाहीं काय ? अर्थात् आपण आपली या बाबतींतील जबाबदारी पूर्णपणें ओळखली पाहिजे व परमेश्वरानें आपणांला अपत्यरूप जी बहुमोल देणगी दिली आहे तिचें योग्य तें चीज करून त्या मुलाचें आयुष्यहि सार्थकीं लावलें पाहिजे. याकरितां आपणांस मुलांच्या प्रवृत्तींचा चांगला अभ्यास केला पाहिजे. तो करीत असतां अगदीं प्रारंभीं आपल्यापुढें प्रश्न उभा राहतो तो हा कीं,

**मूल म्हणजे काय ?—**

प्रथम मूल म्हणजे तरी काय ? मूल हें शरीर व मन या दोन घटकांचें बनलेलें असतें. यांपैकीं मुलाच्या शरीराच्या सर्व क्रिया एखादा रोग किंवा अपघात न झाल्यास इतर सर्व प्राण्यांप्रमाणें सृष्टिनियमांस

अनुसरून चाललेल्या असतात. त्यांचें कार्य इंद्रियविज्ञानशास्त्राच्या नियमां-प्रमाणें चालू असतें. या सर्व क्रियांचें नियमन मेंदूमधील विशिष्ट मुख्य केंद्राकडून व निरनिराळ्या शरीराच्या अवयवांच्या ठिकाणीं असलेल्या दुय्यम केंद्रांकडून होत असतें. श्वासोच्छ्वास, अन्नपचन, रुधिराभिसरण ह्या सर्व जीवनविषयक क्रिया आपोआप होत असतात. त्यांचें नियमन बुद्ध्या करावें लागत नाहीं; तथापि या क्रियांवरहि बुद्धिजन्य असे जे मानसिक विकार त्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. अशा प्रकारचे विकार म्हटले म्हणजे भीति, राग, द्वेष, मत्सर इत्यादि होत. श्वासोच्छ्वासासारख्या क्रियांचें कांहीं अंशीं ऐच्छिक नियमन करतां येतें. उदाहरणार्थ, आपल्याला दम छाटेपर्यंत श्वास बंद करतां येतो. आपल्या अवयवांची व मुख्य शरीराची हालचाल किंवा स्थिति यांवरहि आपल्या इच्छेप्रमाणें कांहीं अंशीं नियमन करतां येतें. परंतु तें नेहमींच करतां येतें असें नाहीं. लैंगिक क्रिया या अशा प्रकारच्या होत कीं, ज्यांचें नियमन आपणांस आपल्या इच्छेप्रमाणें करतां येतें.

## मुलाच्या मानसिक क्रिया—

जाणून बुजून किंवा अजाणतः होणाऱ्या मानसिक क्रियांचा परिणाम शारीरिक नियमांच्या सुसंवादी क्रियांवर होतो आणि कधीं कधीं अशा क्रियांमुळें शरीरावर तात्पुरते किंवा कायमचे अनारोग्यकारक परिणाम झाल्याचेंहि दिसून येतें. अशा प्रकारचे परिणाम मेंदूच्या कार्यांतील कांहीं विकारांवरून दिसून येतात.

लहान मुलाचें मन हें अगदीं साधें असतें. त्याला एक वर्षाचें होई-पर्यंत स्वतःची म्हणजे सभोंवतालच्या वस्तूपासून आपण भिन्न आहों अशा तऱ्हेची बहुधां जाणीवहि झालेली नसते. त्याच्या सर्व मानसिक

क्रिया केवळ उपजत बुद्धीस अनुसरून होत असतात. त्याला आंतून किंवा बाहेरून जी एखादी चेतना मिळते तीस अनुसरून होणाऱ्या क्रिया त्याच्याकडून आपोआप होत असतात. त्यास भूक लागली किंवा थंडी वाजली तर तें रडूं लागतें. त्याच्या एखाद्या अवयवास टोंचलें तर तो अवयव तें मागें घेतें. तीव्र प्रकाशांत त्यास आणलें तर तें आपले डोळे किलकिले करतें. या सर्व क्रिया तें अजाणतः स्वाभाविकपणेंच करीत असतें.

## उपजत बुद्धि—

अशी ही सर्व सचेतन प्राण्यांमध्यें राहणारी व मनुष्य प्राण्यांमध्यें विशेष प्रकारें आढळून येणारी, उपजत बुद्धि म्हणजे तरी काय आहे ? ही एक अशी शक्ति आहे कीं, जिच्यामुळें लहान मुलास आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीस अनुरूप करून घेतां येतें व याच क्रियेमुळें मूल जन्मल्यावर त्याला आपलें जीवित धारण करतां येतें. भूक लागली असतां मूल जें रडूं लागतें तें केवळ अप्पलपोटें अथवा आत्मनिष्ठ असतें म्हणून नव्हे; तर त्यास अन्न पाहिजे असतें, व रडल्याशिवाय अन्न मिळूं शकत नाहीं व अन्न मिळालें नाहीं तर तें मरण्याची भीति असते म्हणून. थोडेंसें मोठें झालेलें मूल समोरून मोटारगाडी आल्यास रस्त्यांतून बाजूला सरतें याचें कारण त्याच्या ठिकाणीं भीति उत्पन्न होते, व त्या भीतीमुळें तें बाजूस सरून आपलें रक्षण करून घेतें. वयांत येईपर्यंत मुलास केवळ स्वतःचें संरक्षण करण्याइतकीच उपजत बुद्धि अथवा स्वाभाविक ज्ञान असतें व त्याच्या सर्व क्रिया त्या बुद्धीस अनुसरून होत असतात. परंतु तें वयांत आल्यावर त्याच्या ठिकाणीं वैषयिक अथवा पुनरुत्पादनाची भावना जागृत होते आणि त्यास मानव जातीच्या एकंदर मानसिक व शारीरिक व्यापारांत वर्चस्व

मिळवावें अशी बुद्धि उत्पन्न होते. ही पुनरुत्पादनाची बुद्धि वंशरक्षणास कारणीभूत होते; आणि तीवरून मनुष्याची आपल्या संततीमार्फत जणूं काय अमरत्व मिळवून स्वतःचें संरक्षण करण्याची बुद्धि दिसून येते. या इच्छेस आपण प्रतिनिधीमार्फत स्वसंरक्षण करण्याची बुद्धि असें पाहिजे तर म्हणूं. आतां ही वैषयिक अथवा पुनरुत्पादनाची बुद्धि मुलाच्या ठिकाणीं तें वयांत आल्याबरोबर एकदम उत्पन्न होते असें नव्हे. तर ती जन्मापासूनच बालस्वरूपांत त्याच्या ठिकाणीं असतेच व लहानपणींहि क्वचित् क्वचित् ती प्रादुर्भूत झालेली दिसून येते व पुष्कळदां मुलांच्या आईबापांस काळजी व दुःख वाटण्यासहि कारण होते. तथापि बालवयांत तिचें अस्तित्व असलें तरी तिच्यापेक्षां स्वसंरक्षण बुद्धि ही अधिक प्रभावी असते; आणि यामुळें लैंगिक प्रवृत्तीस दुय्यम स्थान मिळतें.

**आनुवंशिक संवयींचा उपयोग—**

उपजत बुद्धि अथवा स्वभाव यांस कांहीं अंशीं आनुवंशिक संवयी असें म्हणतां येईल. यामध्यें दीर्घकालचे सभोंवतालच्या परिस्थितीपासून मिळालेले जीवनविषयक अनुभव सारभूतानें ग्रथित केलेले असतात. सृष्टीच्या उत्पत्तीपासून सचेतन प्राण्यास जे सभोंवतालच्या परिस्थितीसंबंधीं अनेक अनुभव आलेले असतात ते सर्व एकत्र करून, त्यांची निवड करून, ते एकापुढें एक मांडून, त्यांचें नीट निरीक्षण करून व विनाशात्मक प्रवृत्ती नष्ट करून आणि संरक्षणात्मक प्रवृत्ती एकत्र करून त्यांचें सार जणूं काय मुलाच्या ठिकाणीं ही उपजत बुद्धि म्हणून ठेवण्यांत येतें. तिच्यामुळें त्याला आपलें या जगांतील जीवित कंठणें, स्वतःचें संरक्षण करणें व आपले अनुभव आपल्या संततीस मार्गदर्शक होण्यासाठीं तिच्या ठिकाणीं स्थापन करणें या गोष्टी करतां येतात.

प्रत्येक पिढीनें जर प्रत्येक गोष्टीस प्रथमपासून आरंभ केला तर प्रगति होणें शक्य होणार नाहीं. मानवविकासाचें अंतिम ध्येय त्याच्या ठिकाणीं पूर्णत्व आणणें हें आहे; व या उपजत बुद्धीमुळें त्या क्रियेस मदत होत असल्यामुळें ती फार महत्त्वाची आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं असणारी चेतना ही या उपजत बुद्धीशीं अत्यंत निगडित असून प्रत्येक क्रियेस तीमुळें चालना मिळत असते. जरी कांहीं मुलांच्या बाबतींत वडील माणसांच्या दृष्टीनें स्वार्थ, चिडखोरपणा, बावळेपणा अथवा असंतोषकारक प्रवृत्ती दिसल्या तरी त्यांमध्यें एक गोष्ट सत्य असते ती ही कीं, या प्रवृत्ती उत्पन्न करणारी जी उपजत बुद्धि ती त्याच्या जीवनक्रमास अत्यंत आवश्यक असून ती उत्पन्न झाली त्यावेळीं अतिशय सुंदर व सर्वमान्य अशी असते.

**स्वाभाविक प्रवृत्तींस इष्ट वळण—**

या प्रवृत्तीमुळेंच उत्तम स्वभावाची घटना होते व शील बनण्याच्या मुळाशीं ही उपजत बुद्धि किंवा स्वाभाविक प्रवृत्तिच असते. ही प्रवृत्ति हा प्रत्येक बालकाचा जणूं काय जन्मसिद्ध हक्कच आहे. तो आपण त्यापासून हिरावून घेणें चांगलें नाहीं. त्याचा आपण योग्य तो उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज मानवजातीपुढें हाच मोठा प्रश्न आहे कीं प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं असणाऱ्या स्वाभाविक प्रवृत्तींचा कोणताहि अंश व्यर्थ न जातां पूर्ण उपयोग कसा करून घ्यावयाचा ? मुलाच्या स्वाभाविक प्रवृत्तींचा त्यास पूर्णपणें व पूर्ण स्वातंत्र्यानें उपयोग करूं न देणें म्हणजे त्याला आपल्या आयुष्यक्रमांत ज्याप्रमाणें एखादा शरीराचा अवयव नसल्यामुळें व्यंग-पणा येतो, तसा व्यंगपणा आणणें होय. एवढेंच नव्हे तर एखादें शारीरिक व्यंग असतांहि एखादा मनुष्य पूर्ण सुखी असूं शकेल,

परंतु अशा तऱ्हेनें त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींचें नियमन करून तो कधींहि सुखी होणार नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या तरुण मालकानें आपला पिढीजात चाललेला धंदा आपल्या हातांत घेतल्याबरोबर जर सर्व जुनीं व अनुभवी माणसें काढून टाकलीं आणि नवीन अननुभवी माणसें नेमलीं, गिऱ्हाइकाशीं परिचित असलेले सर्व प्रतिनिधी दूर केले आणि कचेरीमध्यें जुन्या मुनीमानें लिहून ठेवलेले व नमूद केलेले सर्व अनुभव व ज्ञान यांचा उपयोग केला नाहीं तर त्याची जी स्थिति होईल तीच आपली लहान मुलांच्या ठिकाणीं असलेल्या साहजिक प्रवृत्तींचा उपयोग न केल्यास होईल. व्यक्तीच्या ठिकाणीं असलेल्या या स्वाभाविक प्रवृत्तीमुळेंच आपणास कांहीं लोकांच्या ठिकाणीं विशेष गुण असलेले दिसून येतात. त्यामुळें अशा तऱ्हेच्या एक अथवा अनेक प्रवृत्ती योग्य वाव न देतां जर आपण दाबून टाकल्या तर त्या व्यक्तीच्या ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या विशेष गुणास अगर पात्रतेस आपण मुकलों असें होण्याचा संभव आहे. याकरितां अशा प्रवृत्तींस योग्य दिशा लावून व त्यांचा योग्य मार्गानें परिपोष करून त्यांचा शक्य तों मुलाच्या पुढील आयुष्यास उपकारक व सुखकर होईल अशा तऱ्हेनें विकास करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे.

**स्वाभाविक प्रवृत्तींस अनुसरून वर्तन—**

या स्वाभाविक प्रवृत्तींचें ज्ञान आपणांस त्यामुळें होणाऱ्या मनुष्याच्या वर्तनापासून प्रतीत होतें. मनुष्याचें विशिष्ट वर्तन कोणत्या प्रकारें होत आहे याचा अभ्यास केला असतां तें वर्तन कोणत्या प्रेरणांवरून होत आहे हें कळून येतें, व असें दृष्टीस पडतें कीं प्रत्येक व्यक्तीमध्यें असलेल्या प्रेरणांचें स्वरूप सामान्यतः एकच असतें, परंतु त्यांची उत्कटता मात्र निरनिराळी असते. सर्व जातीच्या स्वाभाविक प्रवृत्ती अथवा

अशा प्रवृत्तींचे समूह पूर्णपणें विकास पावलेल्या अथवा अविकासित अशा स्वरूपांत बहुतेक जातीच्या प्राण्यांमध्यें दिसून येतात. अगदीं क्षुद्र जातीच्या प्राण्यांमध्यें मात्र त्या बहुधा आढळत नाहींत. मनुष्यामध्यें ज्या विशिष्ट स्वाभाविक प्रवृत्तीस विशिष्ट कालीं प्रेरणा होते तीस अनुसरून इतर कोणत्याहि प्रेरणेचा विरोध नसेल तर बहुधा मनुष्याच्या हातून वर्तन होतें. उदाहरणार्थ, मनुष्यामध्यें भीति उत्पन्न झाली असतां त्याची आपल्या शत्रूच्या शक्तीच्या अंदाजाकडे पाहून पळण्याकडे किंवा युद्ध करण्याकडे प्रवृत्ति होईल. भूक लागली असतां मनुष्य अन्न शोधण्याचा प्रयत्न करील व तें जवळपास नसेल तर तें शोधण्याकरितां बाहेर जाईल. मनुष्यामधील स्वत्व प्रवृत्ति त्याची ज्या वस्तूबद्दल अभिलाषा अथवा जिज्ञासा जागृत होईल ती वस्तु आपल्या ताब्यांत घेण्याकडे त्याची प्रवृत्ति करील. मनुष्याची स्वसमर्थन प्रवृत्ति त्याला दुसऱ्यावर सत्ता स्थापन करण्याकडे अथवा एखादें मत स्थापन करण्याकडे किंवा एखादें साहस अंगावर घेण्याकडे प्रवृत्त करील. याप्रमाणें त्याच्या ठिकाणच्या विविध प्रवृत्ती त्याला विशिष्ट क्रिया करण्याकडे प्रवृत्त करतील व अशा क्रिया प्रत्येक मनुष्य अथवा मूल स्वाभाविकपणेंच करीत राहील. हा त्याचा स्वाभाविक धर्मच आहे व त्याविरुद्ध दुसरी कोणतीहि प्रेरणा आड येणार नाहीं तोंपर्यंत प्रत्येक व्यक्ति आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणें अथवा मनाच्या कलाप्रमाणें निरनिराळ्या क्रिया करीत राहील. या त्याच्या कृतीमध्यें एखादी विरुद्ध प्रवृत्ति अथवा प्रेरणा उत्पन्न झाली तरच खंड पडेल. ही गोष्ट विशेषतः लहान मुलाच्या बाबतींत पूर्णपणें आपल्या प्रत्ययास येईल.

**स्वाभाविक प्रवृत्तीविरुद्ध प्रेरणा—**

आतां पांच वर्षांच्या आंतील सामान्य मुलांमध्यें त्याच्या कोणत्याहि

स्वाभाविक प्रवृत्तीला अनुसरून क्रिया करण्याच्या बाबतींत भीति हीच एक विरोधी प्रेरणा असूं शकते. भीतीमुळें तें मूल विशिष्ट प्रवृत्तीस अनुसरून होणारी क्रिया करण्याचें सोडून देईल, किंवा ती भीति जर विशेष मोठी नसेल तर आपलें साध्य एखाद्या युक्तीनें साध्य करून घेईल. त्याप्रमाणेंच भूक हीहि प्रवृत्ति आधीं स्वतःचें शांतवन करून घेण्यासाठीं त्या मुलास इतर कोणतीहि गोष्ट करावयाचें सोडून आधीं अन्न शोधण्याकडे प्रवृत्त करील. अशा तऱ्हेनें विशिष्ट प्रवृत्ति दाबून टाकणाऱ्या गोष्टी अगदीं भिन्न प्रकारच्या असूं शकतात. त्यांचें स्वरूपहि भिन्न असून त्यांचे परिणामहि निरनिराळ्या प्रकारचे होतात, व ते बहुधा वाईट असतात. अशा प्रकारें विशिष्ट प्रवृत्ति दाबून टाकण्याचे प्रसंग मनावर जितके कमी येतील व जितकें मनास स्वातंत्र्य मिळेल त्यावर एखाद्या व्यक्तीचा स्वभाव चांगला किंवा वाईट होणें हें अवलंबून असतें. त्याप्रमाणेंच आयुष्यामध्यें विशिष्ट परिस्थितीस अनुरूप करून घेण्याची त्याची शक्ति किती विस्तृत अगर मर्यादित असेल हेंहि निश्चित होतें व त्याची सुख उपभोगण्याची मर्यादाहि यावरच अवलंबून असून त्याची मानसिक शक्तीहि वरील गोष्टींमुळेंच मर्यादित होते.

---

# प्रकरण चौदावें

# आत्मप्रवृत्ति

**आत्मप्रवृत्ति म्हणजे काय ?—**

अशा प्रवृत्तीमध्यें सर्वांत महत्त्वाची प्रवृत्ति म्हटली म्हणजे आत्मप्रवृत्ति होय. या आत्मप्रवृत्तीमुळें मनुष्य केवळ वैयक्तिक गोष्टी करण्याकडे प्रवृत्त होतो. अशा गोष्टी म्हणजे स्वत्वस्थापन, जिज्ञासापूर्ति, भीतिनिवारण, स्वमहत्त्वस्थापन, स्वप्रौढी, स्वपोषण, आणि हें सर्व साधण्याकरितां प्रयत्न वगैरे होत.

मूल जन्मल्यावरोबर त्याची प्रथम प्रवृत्ति सुखप्राप्तीकडे असते. त्याची स्वतःस सुख मिळवून घेणें एवढीच त्यावेळीं इच्छा असते. याचा अर्थ असा कीं, ज्यावेळीं जी प्रवृत्ति होईल त्यावेळीं त्या प्रवृत्तीमुळें उत्पन्न होणाऱ्या इच्छेचें समाधान करून घेणें हा होय; आणि या इच्छेमुळेंच ती पुरवून घेण्याची क्रिया करण्याकडे त्याची प्रवृत्ति होते. लहान मुलास जर पूर्ण स्वातंत्र्य दिलें तर तें दमेपर्यंत जागृतावस्थेमध्येंच अशा तऱ्हेच्या आपल्या विशिष्ट इच्छा एकामागून एक पुऱ्या करून घेण्याच्या क्रिया करीत राहील व या क्रिया तें कांहीं बाबतींत भीति उत्पन्न झाली तरीहि करीत राहील, कारण भीतीमुळें जरी दुःख उत्पन्न होत असलें तरी ती भीति पळण्यानें टाळतां आल्यास किंवा इतर कोणत्याहि गोष्टीनें नष्ट करतां आल्यास सुखाचीहि प्राप्ति होते. लहान मुलाला जर अगदीं स्वतंत्रपणें वाढूं दिलें व त्याच्या परिस्थितींत आकस्मिक रीतीनें अथवा जाणूनबुजून फरक घडून आला नाहीं तर या

समाजांतील गुंतागुंतीच्या आयुष्यक्रमास तो वयांत आल्यावर अयोग्य ठरेल, कारण या गुंतागुंतीच्या आयुष्यक्रमांत समरस होण्याकरितां कित्येक वेळां आपल्या इच्छा दाबून टाकाव्या लागतात, व कांहीं महत्त्वाच्या गोष्टींकरितां इतर स्वाभाविक प्रवृत्तींस निर्बंध घालावे लागतात.

**मोठें होण्याची आकांक्षा—**

मनुष्याच्या वाढीमध्यें अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या मनोवृत्तींची एकसारखी धडपड चालू असून त्या त्यास निरनिराळ्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करीत असतात. लहानपणापासून मूल वाढण्याकरितां धडपड करीत असतें; आणि न कळत त्याच्यामध्यें अशी एक प्रवृत्ति उत्पन्न होत असते कीं, तीमुळें त्यास आपण पुष्कळ मोठें व्हावें, सर्वथा पूर्ण व्हावें व इतरांपेक्षां श्रेष्ठ व्हावें असें वाटत असतें. ही मोठें होण्याकरितां चाललेली धडपड त्याच्या निरनिराळ्या कृतींमध्यें दिसून येते; ती त्यास विचार करण्यास व कल्पना करण्यास प्रवृत्त करून त्याच्याकडून सर्व आयुष्यभर निरनिराळ्या कृती करविते. आपल्या प्रत्येक विचारामध्यें ही प्रवृत्ति दिसून येते. कारण आपण जे विचार करतों ते नेहमीं आपल्या आयुष्यांत आपल्यापुढें जें ध्येय ठेवितों त्यास अनुसरून चाललेले असतात.

**वैयक्तिक वैशिष्ट्य—**

प्रत्येक व्यक्तीमध्यें एक तऱ्हेचें वैयक्तिक वैशिष्ट्य असतें, व हें वैयक्तिक वैशिष्ट्य त्यानें आपण होऊनच आपल्या कल्पनांप्रमाणेंच तयार केलेलें असतें, यामुळें मनुष्य हा जणूं कांहीं स्वतःच चितारी असून आपल्या स्वतःचेंच चित्र काढीत असतो. परंतु तो कांहीं

पूर्णपणें वाकबगार चितारी नसल्यामुळें व कुशल कारागीर नसल्यामुळें त्याच्या बुद्धीप्रमाणें तो जें चित्र काढतो व रंगवितो त्यांत पुष्कळ दोष असण्याचा संभव असतो.

## व्यक्तिमत्त्व—

अशा तऱ्हेचें जें एखाद्या मनुष्याच्या ठिकाणीं व्यक्तिमत्त्व म्हणून तयार होत असतें, तें तयार होत असतांना त्यामध्यें एक मोठा दोष उत्पन्न होत असतो. तो असा कीं, त्याची रचना केवळ त्या व्यक्तीच्या स्वतःच्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीवरून होत असते. त्यापुढें उदाहरणादाखल अशी विशिष्ट कांहीं वस्तु नसते. एखाद्या वस्तूविषयीं कल्पना म्हणजे कांहीं ती वस्तु नव्हे, यामुळें निरनिराळ्या व्यक्तींच्या एकाच वस्तूबद्दलच्या कल्पना निरनिराळ्या असतात आणि त्याचमुळें निरनिराळ्या व्यक्तींचें व्यक्तिमत्त्वहि निरनिराळें बनतें. प्रत्येकजण आपापल्या वैयक्तिक दृष्टीप्रमाणें जगाकडे पाहून आपलें ध्येय ठरवितो त्यांपैकीं कांहीं लोकांची दृष्टि निर्दोष असते तर कांहीं लोकांची दृष्टि तितकी निर्दोष नसते आणि त्यामुळें प्रत्येक मनुष्याच्या वाढीमध्यें फरक पडत जातो व प्रत्येक व्यक्तीच्या कृतींमध्येंहि बराच भेद असतो. त्यामुळें कांहीं गोष्टी योग्य होतात तर कांहीं अयोग्य होतात. विशेषतः लहानपणांत केलेल्या चुकांचें महत्त्व फार असतें. कारण आपल्या पुढील आयुष्यावर त्यांचा परिणाम होत असतो.

## वर्चस्व प्रवृत्ति—

मनुष्यस्वभावांतील व्यक्तिमत्त्व अथवा वैशिष्ट्य या प्रवृत्तीच्या अंगभूत अशी प्रवृत्ति म्हटली म्हणजे वर्चस्व अथवा यश मिळविण्याचा प्रयत्न करणें ही होय. हा प्रयत्न अर्थात् मनुष्यामध्यें जो हीनभाव अथवा

कमीपणाची जाणीव असते तिच्याशीं संबद्ध असतो. कारण आपणां-मधील उणीवेची जाणीव झाल्याशिवाय आपण चालू स्थितींतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणार नाहीं. याप्रमाणें वर्चस्वाची इच्छा व हीन-भावाची जाणीव या दोन्ही गोष्टी एकाच मनोभावनेच्या दोन बाजू आहेत.

ही वर्चस्वाची जाणीव मनुष्यामध्यें स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणें स्वभाव-जातच असते काय असें पाहूं गेल्यास आपल्यास तशी वस्तुस्थिति आढळत नाहीं. तथापि मनुष्यस्वभावामध्यें एक वर्चस्व मिळविण्याची प्रवृत्ति ही अंगभूत असल्याचें मात्र दिसून येतें. मनुष्याच्या क्रिया व सामर्थ्य कांहीं बाबतींत मर्यादित असतात, ही गोष्ट आपणांस माहीत आहे. उदाहरणार्थ कुत्र्याच्या अंगीं असलेली घ्राणशक्ति मनुष्य आपल्या अंगीं कधींहि आणूं शकणार नाहीं, किंवा त्यास अतिरक्त (Ultra-Red) किरण किंवा त्यांच्यापलीकडचे किरण नुसत्या डोळ्यानें पाहतां यावयाचे नाहींत. तथापि त्याच्या अंगीं असलेल्या कांहीं शक्तींची त्यास वाढ करतां येते; आणि ही वाढ करण्याची मनुष्य सारखी खटपट करीत असतो; आणि यामध्येंच वर्चस्व मिळविण्याच्या प्रयत्नाचें बीज असतें.

स्वतःचें महत्त्व अथवा वर्चस्व स्थापन करण्याची प्रवृत्ति सर्व परि-स्थितींमध्यें मुलांत व प्रौढ माणसांत सारखीच दिसून येते. ती नाहींशी करणें शक्य नसतें. मनुष्याला केव्हांहि कायमचें पराधीन राहावेसें वाटत नाहीं. मनुष्यानें देवाचेंहि महत्त्व कांहीं प्रसंगीं झुगारून दिल्याचें आपणांस दिसून येतें. आपल्या ठिकाणीं असलेला हीनपणा अथवा दुर्बलता घालविण्याची, तसेंच आपल्या ठिकाणची कनिष्ठता दूर करून

श्रेष्ठत्व अथवा उच्च पद प्राप्त करून आपल्यांतील उणेपणा भरून काढून पूर्णत्वाप्रत पोंचण्याची मनुष्याची खटपट सारखी चालू असते.

## दुसऱ्याबद्दल हेवा व मत्सर—

या वर्चस्व मिळविण्याच्या भावनेशीं संबद्ध अशा कांहीं दुसऱ्याहि मनोवृत्ती मुलामध्यें वृद्धि पावत असलेल्या आपणांस केव्हां केव्हां आढळून येतात. उदाहरणार्थ, स्वतःचें वर्चस्व स्थापन करण्याची बुद्धि मनांत उत्पन्न झाली म्हणजे दुसऱ्याबद्दल हेवा व मत्सर उत्पन्न होतातच. अशा तऱ्हेची वृत्ति उत्पन्न झाल्यावर कांहीं मुलें आपल्या प्रतिस्पर्ध्याबद्दल निरनिराळ्या प्रकारच्या दुष्ट भावनाहि मनांत बाळगूं लागतात, व केव्हां केव्हां त्यांच्याकडून मोठमोठे अपराधहि घडतात. कधीं कधीं ही वर्चस्व मिळविण्याची भावना फार बलवान् झाली तर तिची दीर्घद्वेष व सूड या भावनांतहि परिणति होते. अशा प्रवृत्तीचीं मुलें एक प्रकारची बेपर्वाई व भांडखोर वृत्ति दाखवितात. त्यांचे डोळे नेहमीं चकाकत असतात, तीं वरचेवर रागावतात व क्षुल्लक कारणाकरितां युद्धास तयार होतात. अशा मुलांच्या ठिकाणीं जर खरी योग्यता नसेल तर त्यांस परीक्षा देणें वगैरे गोष्टी कमीपणाच्या वाटतात व आपला कमीपणा बाहेर पडूं नये म्हणून ते अशा तऱ्हेचे प्रसंग टाळीत असतात.

## खेळांत पुढारीपणा मिळविण्याची प्रवृत्ति—

ही वर्चस्व मिळाविण्याची प्रवृत्ति खेळांमध्येंहि दिसून येते. ही प्रवृत्ति ज्या मुलांमध्यें विशेष असेल तीं मुलें खेळामध्यें दुय्यम स्थान घेण्याचें सहसा मान्य करणार नाहींत. उदाहरणार्थ, दुसरा मनुष्य हांकणारा असेल तर स्वतः घोडा कधीं होणार नाहींत. त्यांस नेहमीं हांकणारा

व्हावें असेंच वाटेल, व त्यांच्या अशा गुणांमुळें इतर मुलांनीं त्यांस खेळावयास घेतलें नाहीं तर तीं त्यांचा खेळ बिघडावितील. तसेंच शाळेचा खेळ खेळत असल्यास असें मूल नेहमीं शिक्षकाची भूमिका घेण्याचा प्रयत्न करील व घरगुती खेळामध्यें वडील माणसाची भूमिका पत-करील. ही स्वत्वस्थापनेची भावना प्रत्येक हालचालींत दिसून येईल.

ज्या महत्त्वाकांक्षी मुलांचा कधींहि हिरमोड होत नाहीं तीं मुलें सर्व तऱ्हेचे चुरशीचे खेळ खेळण्यास तयार असतात. परंतु त्यांना एखाद्या खेळांत हार खावी लागल्यास त्यांस फार आश्चर्य वाटतें. अशा तऱ्हेची वृत्ति आपणांस निरनिराळ्या खेळांमध्यें, गोष्टींमध्यें, ऐतिहासिक व्यक्ति किंवा मोठमोठे लोक यांमध्यें नेहमीं आढळून येते, व अशाच गोष्टीं-बद्दल अशा तऱ्हेच्या मुलांस मनापासून आवड असते.

स्वतःचें वर्चस्व स्थापन करण्याकरितां निरनिराळीं मुलें जेव्हां प्रयत्न करतांना आढळतात तेव्हां तीं कोणत्या निरनिराळ्या दिशेनें प्रयत्न करतात त्यावरून आपणांस त्यांचे गट पाडतां येतात. अर्थात् हे गट तितक्या स्पष्ट विभाजक रेषांनीं पाडणें कठीण असतें. ज्या मुलांची वाढ व्यवस्थितपणें होत असते तीं मुलें आपली वर्चस्व स्थापन कर-ण्याची प्रवृत्ति चांगल्या गोष्टीकडे लावतात. तीं नेहमीं घरीं आपल्या आईबापांस व शाळेंत शिक्षकांस संतुष्ट करण्याचा व व्यवस्थितपणें राहण्याचा व आदर्श मुलें व विद्यार्थी होण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा तऱ्हेच्या मुलांचें प्रमाण फार मोठें नसतें.

### मुलांची महत्त्वाकांक्षा—

कांहीं मुलें अशीं असतात कीं, त्यांच्या मनांत ही वर्चस्व स्थापन करण्याची जाणीव अत्यंत तीव्रतेनें वसत असते. हीं मुलें फार महत्त्वा-

कांक्षी असतात व महत्त्वाकांक्षा हा एक आपण सद्‌गुण समजतों. परंतु मुलामध्यें अतिशय महत्त्वाकांक्षा असणें चांगलें नसतें. कारण तिच्यामुळें त्याच्या मनावर वाजवीपेक्षां अधिक ताण पडतो. कांहीं कांहीं मुलांस बौद्धिक वर्चस्व मिळविण्याचीच इच्छा असते. अशीं मुलें पुस्तकांतच डोकें खुपसून बसण्यांत सर्व वेळ घालवतात. त्यामुळें त्यांस इतर गोष्टी करण्यास वेळ राहात नाहीं. त्यांची मुख्य आकांक्षा केवळ वर्गांत वर येण्याची व हुशार विद्यार्थी म्हणवून घेण्याची असते. त्यामुळें त्यांच्या शरीराची वाढ योग्य तऱ्हेनें होत नाहीं. अशा मुलांस कांहीं वेळ पुस्तकें बाजूस ठेवून मोकळ्या हवेंत खेळावयास जाणें, आपल्या मित्रमंडळींत खेळणें वगैरे गोष्टी करावयास भाग पाडलें पाहिजे. अशा तऱ्हेचीं मुलें फार नसतात; परंतु मधून मधून आपणांस आढळतात.

### मुलांतील चुरस—

कित्येकदां आपणांस दोन मुलांमध्यें विशेष चुरस असलेली आढळते. याचा परिणाम केव्हां केव्हां परस्परांचा मत्सर व हेवा करण्यांत होतो. अशा मुलांस इतर मुलें यशस्वी झाल्यास त्यांचा मनांतून राग येतो, व प्रसंगीं तीं मनांत कुढूं लागतात. अशा मुलांस मज्जातंतुदोषामुळें डोकें-दुखी, पोटदुखी वगैरेसारखे रोग होऊं लागतात. त्यांस दुसऱ्या मुलांची कोणी स्तुति केलेली आवडत नाहीं. अशीं मुलें आपल्या सोबत्यांशीं नीट वागत नाहींत. त्यांना नेहमीं प्रत्येक गोष्टींत पुढाकार पाहिजे असतो, व खेळामध्येंहि दुय्यम भाग घेणें त्यांस आवडत नाहीं. अशामुळें तीं सांघिक खेळांत भाग घेत नाहींत व आपल्या बरोबरीच्या मुलांशीं उद्धटपणानें वागतात. त्यांना नेहमीं यशाची काळजी वाटते आणि त्यांच्याबद्दल जी इतर लोकांच्या मनांत आकांक्षा असते व त्यांच्या

स्वतःच्या मनांत ज्या भावना असतात त्यांच्या दडपणाखालीं त्यांचें मन नेहमीं दबून गेलेलें असतें. अशा मुलांविषयीं त्यांच्या कुटुंबियांच्या ज्या आकांक्षा असतात त्याहि मुलांच्या मनांत तीव्रतेनें वागत असतात, व आपण नेहमीं पुढें व प्रकाशांत यावें या इच्छेनें तीं मुलें त्यांचेवर सोंपविलेली प्रत्येक कामगिरी पुरी पाडण्यास धडपडत असतात. अशा मुलांस नेहमीं दुसऱ्याकडून वाहवा मिळवून घेण्याची संवय असते; त्यामुळें त्यांस करावयास सांगितलेल्या कोणत्याहि कामांत अडचण आली तर ती दूर करण्याचा तीं मुलें अतिशय मनापासून प्रयत्न करतात; परंतु त्यामुळें त्यांच्या मनावर इतर मुलांच्या मानानें अधिक ताण पडतो व त्यांच्या मनावर इतर मुलांच्यापेक्षां जास्त परिणाम होतो. तसेंच नेहमीं दुसऱ्याकडून स्तुतीची अपेक्षा करीत राहिल्यानें प्रत्येक गोष्टीबद्दल त्यांस दुसऱ्यांचें मत घ्यावें असें वाटूं लागून तीं त्यांवर अवलंबून राहतात.

**महत्त्वाकांक्षा व धीर—**

अशा तऱ्हेनें वर्चस्व मिळविण्याच्या प्रवृत्तीमुळें मुलामध्यें महत्त्वाकांक्षा उत्पन्न होते ही गोष्ट आपणांस दिसून येते. कांहीं मुलांच्या बाबतींत अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा प्रथम उत्पन्न होऊन पुढें दुसरीं मुलें त्यांच्या फार पुढें गेल्यास ती नष्ट होते. ज्या मुलांत पुरेशी महत्त्वाकांक्षा नसते त्यांस कांहीं आईबाप व शिक्षक कमी लेखतात. परंतु असें मानणें चांगलें नव्हे. कारण ज्या मुलांमध्यें पुरेसा धीर असेल तीं आपली सुधारणा करूं शकतील. परंतु ज्यांच्यामध्यें तितका धीर नसेल त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारचा हीनभाव उत्पन्न होईल. तो टाळण्याकरितां त्यांचेशीं जपून वर्तन केलें पाहिजे, त्यांस एखाद्या गोष्टींत यश न मिळाल्यास त्यांस दोष न देतां उत्तेजन दिलें पाहिजे

व त्यांचेशीं कठोर वर्तन न करतां त्यांची योग्यता ओळखून त्यांच्याशीं जर काळजीपूर्वक वर्तन केलें तर त्यांच्यांतहि बुद्धिमत्ता व इतर अनेक गुण असलेले आढळून येतील व अशीं मुलें नेहमीं पुढें येण्याची धडपड करीत असलेलीं दिसून येतील.

**संपादनप्रवृत्ति—**

या आत्मप्रवृत्तीस उपोद्बलक अशी एक प्रवृत्ति म्हटली म्हणजे संपादनप्रवृत्ति ही होय. या प्रवृत्तीमुळें मुलास अगदीं लहानपणापासून एखादी वस्तु दिसली कीं ती आपल्या ताब्यांत घ्यावी असें वाटूं लागतें व तें केव्हां केव्हां दुसऱ्याच्या वस्तूहि घेण्याचा प्रयत्न करतें. परंतु अशा तऱ्हेनें मुलानें एखादी दुसऱ्याची वस्तु घेतल्यास ती चोरली असें कधींहि म्हणूं नये. कारण मुलास चोरणें ही गोष्ट माहीतच नसते.

मुलास अगदीं लहानपणापासून आपलें कोणतें व दुसऱ्याचें कोणतें हें कळूं लागतें मात्र या दोन गोष्टींतील फरक जितका स्पष्टपणें त्याच्या मनावर ठसेल तितका ठसविणें अवश्य असतें.

एखादी वस्तु मुलास दिली असतां त्यास स्पष्टपणें असें सांगण्यांत आलें पाहिजे कीं 'ही आतां तुझी झाली, हिचें तूं वाटेल तें कर' व ती त्याची असल्यामुळें ती त्याच्यापासून कोणीहि दुसऱ्यानें त्यास विचारल्याशिवाय घेतां कामा नये. याप्रमाणें घरांतील मंडळींनें वागलें पाहिजे. या नियमास अनुसरून सामान्यतः घरांतील कोणत्याहि माणसानें मुलाची वस्तु घेऊं नये. पण प्रत्यक्ष पाहावें तों कोणीहि मोठें मनुष्य मुलाची वस्तु त्याला विचारल्याशिवाय घेतें. पण त्यानें मात्र आपली वस्तु घेऊं नये असें त्यास वाटत असतें. अशा वागणुकीमुळें मुलामध्यें मालकीची

कल्पना नीट उत्पन्न होत नाहीं. एखादी आपली वस्तु मुलास पाहिजे असल्यास त्यास स्पष्ट सांगावें कीं, ही वस्तु माझी असून मी कांहीं वेळापुरती ती तुला देईन; व ती तूं मला परत दिली पाहिजेस व त्याप्रमाणें ती वस्तु त्याच्याकडून परत घेतली पाहिजे. एखादी वस्तु मुलास विशेष सुंदर दिसली व ती त्यानें विचारल्याशिवाय घेतली तर त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. पुष्कळ मोठ्या माणसांमध्येंहि चांगली वस्तु दिसली कीं, विचारल्याशिवाय घेण्याची प्रवृत्ति दिसून येते. तेव्हां मुलाच्या बाबतींत ही वृत्ति दिसल्यास आपणांस नवल वाटण्याचें कारण नाहीं. लहान मुलाच्या बाबतींत त्याच्या वस्तु वेगळ्या ठेवून, त्या वस्तूंस कधींहि हात न लावून त्यांची मालकी त्या मुलाकडे आहे ही गोष्ट त्याच्या मनावर पुरतेपणीं बिंबविण्याचा प्रयत्न करावा व त्याच वेळीं त्यास दुसऱ्याच्या वस्तूंस हात लावल्यास धाक दाखविण्याचा प्रयत्न करावा. त्याची एखादी वस्तु आपणांस तात्पुरती लागल्यास ती त्याच्या-जवळून कशाकरितां पाहिजे तें नीट सांगून मागून घ्यावी. लहान मुलास जी वस्तु पाहिजे असेल ती त्यास तात्पुरती उसनी म्हणून देत जावी. पण ती त्याची नसून आपली आहे ही गोष्ट त्यास बजावून ठेवीत जावें. अशा तऱ्हेनें निरनिराळ्या वस्तूंवरची मालकीची भावना त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होऊं द्यावी.

**संपादन वृत्तीचें संवर्धन—**

जी वस्तु मुलास पाहिजे असेल ती त्यानें काम करून, कांहीं प्रयत्न करून, एखादें साहस करून किंवा मितव्यय करून मिळवावी या गोष्टीस उत्तेजन देत जावें. अशा रीतीनें निरनिराळ्या वस्तु मिळविण्याचें योग्य निर्बंधाखालीं पण पूर्ण स्वातंत्र्य असलें म्हणजे मुलांच्या ठिकाणीं असलेली संपादन प्रवृत्ति वाढीस लागून तिच्यावर त्यांच्या

पुढील आयुष्यांतील यश अवलंबून असतें. मुलांची संपादन प्रवृत्ति जर आपण दाबून टाकली तर त्यांची महत्त्वाकांक्षा शिथिल होते व त्यांच्यामध्यें वाजवीपेक्षां अधिक प्रामाणिकपणाची प्रवृत्ति निर्माण होऊन आपले हक्क प्रस्थापित करण्याची व त्याकरितां योग्य त्या क्रिया व जरूर तेथें धडपड करण्याची प्रवृत्ति मंदावते व आपले हक्क नष्ट होत असल्यास त्यास प्रतिकार करण्याची वृत्तिहि त्यांच्या ठिकाणीं योग्य प्रमाणांत जागृत होत नाहीं व एक प्रकारची मवाळ वृत्ति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होते.

याकरितां ही जी मुलाच्या ठिकाणीं स्वत्त्वस्थापनेची अथवा आत्म-प्रवृत्ति वास करीत असते तिचा योग्य मर्यादेंत परिपोष करून व तीस इष्ट तें वळण लावून तिचा सदुपयोग करून घेणें हें पित्याचें अथवा पालकाचें कर्तव्य आहे व तें त्यांनीं योग्य कालीं बजावल्यास मुलास लहानपणींच योग्य तें वळण लागून त्याच्या अंगीं स्वाभाविकपणें वसत असलेल्या गुणांचा पूर्ण विकास होण्यास त्यास अवसर मिळेल. तसेंच त्याची महत्त्वाकांक्षा मर्यादेंत राहून व उलट आपल्या हक्कांचीहि योग्य जाणीव होऊन त्यास समाजामध्यें त्याच्या योग्यतेनुरूप स्थान प्राप्त होऊन त्याला सौख्याची प्राप्ति होईल.

# प्रकरण पंधरावें

# सांघिक अथवा सामाजिक प्रवृत्ति

## सांघिक वृत्ति म्हणजे काय ?—

वर सांगितलेल्या वर्चस्व मिळविण्याच्या प्रवृत्तीखेरीज मुलामध्यें व मनुष्यामध्यें इतर मनुष्यांशीं मिळून मिसळून वागण्याची किंवा त्यांच्याशीं सहकार्य करून एखादें काम करण्याची किंवा त्यांच्या उपयोगी पडण्याची प्रवृत्ति आढळून येते. याच वृत्तीला सांघिक वृत्ति असें म्हणतात. सांघिक वृत्ति व वर्चस्व वृत्ति या दोहोंच्याहि मुळाशीं एकच कल्पना असते व ती म्हणजे स्वत्व स्थापण्याची इच्छा होय. वर्चस्व वृत्तीमध्यें मनुष्यास असें वाटत असतें कीं, आपण कोणाच्या मदतीशिवाय एकट्यानेंच कोणतीहि गोष्ट करूं. उलट सांघिक वृत्तीमध्यें समाजावर अवलंबून राहण्याची थोडीशी प्रवृत्ति दिसून येते.

## सांघिक जीवन—

मनुष्यजातीचा इतिहास पाहिल्यास आपणांस असें दिसून येतें कीं, मनुष्य हा संघजीवि प्राणी आहे व स्वसंरक्षणाकरितां त्यास संघ करून रहावें लागत असे. ज्या प्राण्यांस तीक्ष्ण नखें, दांत, पंख वगैरे साधनें असतात असे प्राणी उदाहरणार्थ, सिंह, वाघ, गरुड वगैरे संघ करून राहात नाहींत. उलट ज्या प्राण्यांस अशीं स्वसंरक्षणाचीं साधनें नसतात असे सर्व प्राणी संघ करून राहतात. माकडें हीं मोठाले संघ करून राहतात. एवढेंच नव्हे तर शत्रूंची बातमी ठेवण्याकरितां हेर ठेवण्याचीहि त्यांच्यामध्यें पद्धति आढळते; व अशा बातमी काढ-

णाऱ्या हेरांकरितां विशेष कडक नियम असलेले त्यांच्या थव्यांतून दिसून येतात. मनुष्यजातीच्या इतिहासांतील पहिले नियम अथवा कायदे पाहरेकऱ्याकरितां केलेले आढळतात. अशा रीतीनें जी प्राणिजात दुर्बल असते तिला संघ करून राहावें लागत असल्यामुळें तिच्यांत सांघिक वृत्ति निर्माण होते. विशेषतः मनुष्यजातीमध्यें जन्मलेलें मूल लहानपणीं अगदींच असहाय्य असतें; आणि त्यास स्वतःच्या पायावर उभें राहतां येईपर्यंत बराच दीर्घकाल संरक्षण द्यावें लागतें. आणि अशाच वेळीं त्याच्यामध्यें सांघिक वृत्ति निर्माण होणें साहजिक असतें; व याच वेळीं त्यास शिक्षण देण्याचीहि आवश्यकता असते. म्हणजे शिक्षण हें एक सामाजिक कार्य आहे आणि त्याकरितां सांघिक किंवा सामाजिक वृत्ति ही वैय्यक्तिक वर्चस्ववृत्तीपेक्षां अधिक महत्त्वाची आहे.

या दृष्टीनें मुलांच्या शिक्षणामध्यें सामाजिक जीविताची व त्याशीं समरूप होण्याची दृष्टि ठेविली पाहिजे व याच दृष्टीनें समाजांतील कल्पनांचीहि वाढ होत आलेली आहे. ज्या गोष्टी समाजास हितकारक असतील त्या आपण चांगल्या समजतों, व ज्या गोष्टी व्यक्तिशः चांगल्या असतील, पण समाजास वाईट असतील त्या आपण वाईट समजतों.

## भाषा हें सांघिक जीवनाचें फळ—

मनुष्यजातीमध्यें जी भाषेची वाढ झालेली दिसून येते तिच्यावरूनहि मनुष्याची सामाजिक वृत्ति स्पष्टपणें दिसून येते. ज्या व्यक्ती पृथक् राहात असतील त्यांस भाषेची इतकी जरूरी वाटणार नाहीं. जीं मुलें समाजांत फारशीं मिळून मिसळून वागत नाहींत व एकएकटीं स्वतंत्र वाढविलीं जातात त्यांची बोलण्याची शक्ति फारशी वाढत नाहीं; व जीं

मुलें समाजांत अधिक मिसळतात त्यांची बोलण्याची शक्ति विशेष वाढली असल्याचें दिसून येतें. जीं मुलें चांगलीं बोलूं शकतात तीं हुशार असतातच असें नव्हे. त्यांच्यामध्यें सामाजिक वृत्ति अधिक वाढलेली असते एवढेंच! हट्टी किंवा लाडावलेलीं मुलें फारसें बोलूं शकत नाहींत किंवा ज्या मुलांच्या गरजा त्यांनीं तोंडांतून शब्द काढण्यापूर्वींच पुरविल्या जातात त्यांसहि तितकें बोलतां येत नाहीं. कांहीं मुलें बोलूं लागलीं असतां त्यांचेकडे पाहून हंसलें किंवा त्यांचा उपहास केला तर तीं निरुत्साह होऊन बोलण्याचें टाळतात. मुलांस एकसारखें हिडिसफिडीस करणें किंवा त्यांच्या चुका काढणें हें त्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें घातक ठरतें. अशा मुलांमध्यें एक प्रकारचा हीनभाव उत्पन्न होऊन तीं मागें पडतात.

**तर्कशुद्ध ज्ञानाची वाढ—**

मुलांच्या बुद्धीची अथवा तर्कशुद्ध पद्धतीच्या ज्ञानाची वाढ होणें हें सामाजिक वृत्तीशिवाय अशक्य आहे. जो मनुष्य केवळ एकाकी राहात असेल त्याला तार्किक पद्धतीची वगैरे कांहीं जरूर नसते. उलट ज्या मनुष्याचा अनेक लोकांशीं संबंध येतो त्याला संभाषण करण्याची व तें तर्कशुद्ध करण्याची आणि तसेंच तारतम्य बुद्धीची जरूरी असते; आणि सर्व तर्कशुद्ध विचार-पद्धतीचें ध्येय सामाजिक संबंध वाढविणें हेंच आहे. आपणांस कांहीं कांहीं वेळां एखादा मनुष्य एखादी गोष्ट सांगूं लागला असतां ती अगदीं मूर्खपणाची वाटते; परंतु त्याच्या वैय्यक्तिक दृष्टीनें ती बरोबर असते. जीं माणसें आपण करतों त्याच पद्धतीनें इतरांनींहि विचार करावा असें समजत असतात, त्यांच्या हातून वरीलप्रमाणें गोष्टी घडतात. यावरून मनुष्यास तारतम्य बुद्धीचें अथवा समाजाच्या वृत्तींचें ज्ञान किती अवश्य आहे

हें दिसून येतें. जर आपणापुढें सामाजिक आयुष्यक्रम नसता तर तारतम्य बुद्धीचीहि फारशी वाढ झाली नसती. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतील मनुष्यामध्यें विचाराची फारशी वाढ झालेली नसते हें आपणांस दिसून येतेंच.

## निश्चित ज्ञानाचें महत्त्व—

सामाजिक वृत्ति ही मनुष्याच्या तर्कशुद्ध विचार करण्याच्या व बोलण्याच्या शक्तीवर महत्त्वाचा परिणाम करते. जर प्रत्येक मनुष्य आपापले प्रश्न केवळ आपल्याच दृष्टीनें सोडवूं पाहील किंवा आपलीच स्वतंत्र भाषा उपयोगांत आणील तर सर्वत्र घोंटाळा माजल्याशिवाय राहणार नाहीं. सामाजिक वृत्तीमुळेंच मनुष्यास एक प्रकारचें स्वास्थ्य मिळून त्या वृत्तीचा जीवनास मुख्य आधार असतो. जरी तर्कशुद्ध पद्धतीमुळें येणारा आत्मविश्वास यापेक्षां महत्त्वाचा असतो तथापि मनुष्याच्या स्वास्थ्यामध्यें सामाजिक प्रवृत्तीचा भाग महत्त्वाचा असतो. आपण संख्येंत सांगितलेली गोष्ट अधिक निश्चित मानतों. कारण संख्येच्या द्वारा ती लोकांस कळण्यास व समजण्यास सुलभ होते. ज्या गोष्टी आपणांस दुसऱ्यास नीटपणें सांगतां येत नाहींत त्या गोष्टींबद्दल आपली तितकी खात्री नसते. बहुधा याच गोष्टीमुळें प्लेटोनें आपलें सर्व तत्त्वज्ञान संख्येमध्यें सांगितलें आहे.

## नीतिशास्त्र व कलादिकांचा उगम—

नीतिशास्त्राचा उगमहि याच सामाजिक वृत्तीमध्यें झाला आहे. ज्या मनुष्याला अगदीं एकाकी राहावयाचें आहे त्यास नीतिशास्त्राची जरूरी नाहीं. नीतिशास्त्रामध्यें समाज व समाजांतील इतर व्यक्तींचे हक्क यांचाच विचार केलेला असतो. कलेमध्यें मनुष्याच्या वैय्यक्तिक प्रवृत्तीस अधिक

वाव असतो; परंतु सौंदर्यशास्त्राचे नियमहि सामान्यतः सामाजिक प्रवृत्तीवरच आधारलेले असतात. जी गोष्ट अनेक लोकांस आवडते तीसच आपण सुंदर म्हणतों व जी कोणासहि आवडत नाहीं तीसच आपण बेढब, कुरूप वगैरे नांवें ठेवतों व या सौंदर्याच्या कल्पना प्रत्येक समाजांत निरनिराळ्या असूं शकतात. यामुळें कांहीं समाजांत रूढ असलेल्या स्वरूपप्रसाधनाच्या गोष्टी इतर लोकांच्या दृष्टीनें अगदीं हास्यास्पद भासतात.

## ही वृत्ति जन्मजात कीं पश्चाज्जात—

लहान मुलांच्या अंगीं ही सांघिक प्रवृत्ति जन्मतःच असते किंवा नाहीं याबद्दल विद्वानांमध्यें अजून मतभेद आहे. जे लोक ही प्रवृत्ति मान्य करतात ते तिला सांघिक प्रवृत्ति अथवा सामाजिक वृत्ति असें नांव देतात. जे ही प्रवृत्ति मान्य करीत नाहींत, त्यांच्या मतें मनुष्य समाजामध्यें राहण्याच्या दृष्टीनें त्याच्या ठिकाणीं जी आपल्या कांहीं प्रवृत्तींवर निर्बंध घालण्याची किंवा त्याग करण्याची बुद्धि उत्पन्न होते ती त्याच्या लैंगिक प्रवृत्तीमुळें उत्पन्न होते. या दोहोंपैकीं कोणतीहि गोष्ट मान्य केली तरी तिच्यामुळें मनुष्याच्या प्रत्यक्ष वागणुकींत फारसा फरक पडत नाहीं. मुख्य महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं या सांघिक अथवा सामाजिक प्रवृत्तीचें स्वरूप असें असलें पाहिजे कीं, त्यामुळें मनुष्याचें समाजांतलें वर्तन योग्य तऱ्हेनें झालें पाहिजे व त्याच्यामुळें त्याच्या दुसऱ्या प्रवृत्तींस योग्य अवसर मिळून त्या दबल्या जाणार नाहींत व त्यांचें योग्य संवर्धन होईल.

## सांघिक वृत्तीस उपोद्बलक वृत्ती—

प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं आपणांस सामान्यतः या प्रवृत्तींस उपोद्बलक अशा तीन वृत्ति दिसून येतातः ( १ ) आत्मत्यागाची प्रवृत्ति. ही

मुलांमध्यें जन्मतःच वसत असते किंवा लैंगिक प्रवृत्तीपासून उत्पन्न होते. (२) प्रेम संपादन करण्याची जबर इच्छा. आपल्या आईबापाचें प्रेम संपादन करण्याकरितां किंवा राखण्याकरितां मूल सामान्यतः कोणतीहि गोष्ट करावयास तयार होतें. या प्रेमसंपादन प्रवृत्तीचा आपणांस मुलाला सुखप्रवृत्तीपासून निवृत्त करण्याकडे उपयोग करून घेतां येईल. (३) अनुकरण प्रवृत्ति. सामान्यतः ज्यांच्यावर आपण प्रेम करतों त्यांच्यासारखें होण्याची आपण इच्छा करतों. ज्या मुलाचें आपल्या आईबापांवर प्रेम असतें त्या मुलाच्या ठिकाणीं त्यांबद्दल आदर असून त्यांचें अनुकरण करण्यांत त्याला नेहमीं आनंद वाटतो. या अनुकरणप्रवृत्तीचा आपणांस त्या मुलाचा स्वभाव बनविण्याच्या कामीं पुष्कळच उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे.

**त्यागवृत्ति —**

मुलाच्या ठिकाणीं जी आत्मत्यागाची प्रवृत्ति असते तिचा उपयोग करून घेऊन ती आपणांस वाढीस लावतां येईल. ही प्रवृत्ति मुलांमध्यें अगदीं बालपणापासूनहि दिसत असून आतांपर्यंत कोणीहि तिचा उपयोग करून घेतल्याचें आढळून येत नाहीं. एवढेंच नव्हे तर या प्रवृत्तीकडे आतांपर्यंत दुर्लक्षच करण्यांत आलें आहे. सामान्यतः लहान मुलाच्या वागणुकीकडे नीट लक्ष दिलें तर बालपणापासूनहि त्याची आत्मत्यागाकडे किती प्रवृत्ति असते हें दिसून येईल. उदाहरणार्थ, मुलांशीं खेळतांना तें खेळामध्यें हलक्या दर्जाचें स्थान घेण्यासहि सहज प्रवृत्त होतें. आपल्यापेक्षां लहान मुलांचें संरक्षण करण्यास तें नेहमीं तयार असतें. स्वतःकडे न पाहतांहि त्याच्या आवडत्या प्राण्यांचें–कुत्रा, मांजर, वगैरे–थंडी, वारा, पाऊस वगैरेपासून रक्षण करण्यास तत्पर असतें. तें लहान बाळास संभाळण्यास नेहमीं तयार असतें; व आपल्या बाहु-

लीला आपल्या आधीं जेवूं खाऊं घालून कपडे वगैरे घालण्याच्या गडबडींत असते.

याप्रमाणें स्वतःचें सुख तात्पुरतें बाजूस ठेवून इतरांस सुखी करण्याची ही आत्मत्यागाची प्रवृत्ति मुलांमध्यें जन्मजात वसत असते.

**प्रेमसंपादनवृत्ति—**

लैंगिक अथवा पुनरुत्पादन प्रवृत्ति हीहि मुलामध्यें जन्मतःच असते; व कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत ती पांच वर्षांचें वय होण्यापूर्वींहि दिसून येते. ही प्रवृत्ति वयांत येण्याच्या सुमारास उत्पन्न होते, अशी जी समजूत आहे ती बरोबर नाहीं. त्यावेळीं त्या प्रवृत्तीस प्रौढ स्वरूप येतें आणि ती अधिक जोरदार होते एवढेंच.

लहान मुलांमधील कोणत्या गोष्टीस लैंगिक प्रवृत्ति म्हणावें याबद्दल मानसशास्त्रज्ञांमध्यें अद्यापि पुष्कळच मतभेद आहे. मुलांच्या आईबापांस या गोष्टीचें महत्त्व केवळ तात्त्विक असून या वादांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. तो एक खरोखर स्वतंत्र विषय आहे.

तथापि ही एक बलवत्तर प्रवृत्ति असून तिचेवर योग्य नियंत्रण घालून तिचा सदुपयोग करून घेणें ही मात्र एक महत्त्वाची गोष्ट आहे, एवढें मातापित्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. या विषयासंबंधीं अलीकडे बरेंच वाङ्मय नवीन नवीन तयार होत आहे. तें याविषयीं अधिक माहिती करून घ्यावयाची असल्यास अवश्य वाचावें. या ठिकाणीं या प्रवृत्तीचें केवळ दिग्दर्शन केलें असून विशेष उहापोह स्थलाभावामुळें केला नाहीं.

## अनुकरण वृत्ति—

तिसरी मुलांतील महत्त्वाची प्रवृत्ति म्हटली म्हणजे अनुकरण-प्रवृत्ति होय.

आपण ज्यांच्यावर प्रेम करतों त्यांच्यासारखेंच व्हावें असें आपणांस वाटत असतें. तसेंच आपणावर दुसऱ्याचें प्रेम आहे अशा प्रकारची जाणीव झाली म्हणजे आपणांमधील प्रेम करण्याची प्रवृत्तिहि जागृत होते. ज्या मुलांचें आपल्या आईबापांवर प्रेम असतें तीं त्यांच्यासारखें होण्याचा प्रयत्न करतात. अशा तऱ्हेनें प्रेम हें अनुकरणप्रवृत्तीस उत्तेजन देऊन तिची वाढ करतें. जर आईबापांची वागणूक नैतिक दृष्ट्या चांगली असेल तर मुलाच्या मनांतीलहि नैतिक भावना जागृत होऊन त्या आईबापांच्या अनुकरणानें अधिक दृढ होत जातात.

## सांघिक वृत्तीचें संवर्धन—

मुलाचें सामाजिक जीवन सुखी होण्याकरितां त्याच्या ठिकाणीं सांघिक वृत्तीचें संवर्धन झालें पाहिजे याकरितां ज्या गोष्टी आपणांस अगदीं सहजसाध्य आहेत त्यांचा अवलंब करून मुलाच्या मनांतील नैतिक भावना आपणांस उत्तेजित करून त्यांचें संवर्धन व पोषण करतां येतें; आणि त्या दृढ करतां येतात व याकरितां आपणांस मुलांस धाक दाखविणें, नीतीचा उपदेश करणें किंवा त्याचा कांहीं बाबतींत निषेध करणें किंवा त्याच्या मनांत भीति उत्पन्न करणें किंवा त्यास शिक्षा करणें यांपैकीं कोणत्याहि गोष्टीचा अवलंब करावा लागत नाहीं. उलट आपल्या योग्य प्रकारच्या वागणुकीनें मुलाच्या प्रवृत्ति आपणांस दाबून ठेवाव्या लागत नाहींत किंवा त्याच्या ठिकाणीं भलत्याच कांहीं नीतिविषयक कल्पना उत्पन्न करून द्याव्या लागत नाहींत.

याप्रमाणें मुलांच्या मनांतील नैतिक भावनांची वाढ करणें व त्यांच्या ठिकाणीं जी एक आत्मप्रवृत्ति असते तिचें नियमन उच्च व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनें करणें या गोष्टी शक्य होतात. आज्ञासूचक शब्दांपेक्षां विनंति-सूचक शब्दांच्या उपयोगामुळें मुलास शक्य तितकें पूर्ण स्वातंत्र्य मिळतें, काम केल्याबद्दल त्यास शाबासकी मिळते आणि आपलें प्रेम योग्य शब्दांत व्यक्त करतां येतें.

## मनुष्याचें वर्तन हेंच त्याच्या सामाजिक वृत्तीचें गमक—

एखाद्या मुलामध्यें सामाजिक वृत्तीची वाढ किती झाली आहे हें आपण कसें सांगूं शकूं असें कोणीं विचारल्यास त्याचें उत्तर असें देतां येईल कीं, मुलाच्या वर्तणुकीमध्यें त्याच्या ठिकाणीं असलेली सामाजिक वृत्ति दिसून येते. जेव्हां आपणांस कांहीं मुलें दुसऱ्यांच्या मनोवृत्तीकडे मुळींच लक्ष न देतां स्वतःचें वर्चस्व स्थापन करण्या-करितां प्रयत्न करतांना आढळतात तेव्हां त्यांच्या ठिकाणीं सामाजिक प्रवृत्तीची वाढ फारशी झालेली नाहीं असें समजावें. समाजांतील प्रत्येक मुलास वैय्याक्तिक वर्चस्व मिळविण्याची इच्छा असावयाचीच आणि त्यामुळें त्याच्या ठिकाणीं सामाजिक वृत्तीची वाढ प्रारंभींच फारशी झालेली नसणार हें उघड आहे. आणि त्यामुळें सामान्यतः मनुष्य हा स्वभावतःच स्वार्थी आहे असें सर्व नीतिशास्त्रज्ञ म्हणत आले आहेत.

याप्रमाणें समाजांतील व्यक्तीची सामाजिक आयुष्याबद्दलची वृत्ति पाहिली असतां त्या व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व आपणांस स्पष्टपणें दिसून येतें. मनुष्याच्या सामाजिक वृत्तीवरून त्याची एकंदर आयुष्याकडे पाह-ण्याची दृष्टि कळून येते. या सामाजिक वृत्तीमुळेंच मनुष्य आपले मित्र

कसे निवडतो व जगांतील इतर लोकांशीं कसें वागतो याबद्दलहि आपणांस ज्ञान होतें. जर एखादा मनुष्य या प्रश्नाचें उत्तर बेफिकीर-पणानें देईल तर त्याच्या ठिकाणीं शिष्ट लोकांबद्दल बेफिकीरपणाची वृत्ति आहे असें आपण समजूं. परंतु आपण ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ही सामाजिक वृत्ति केवळ मित्र जोडणें व इतर लोकांशीं संबंध ठेवणें या बाबतींतच मर्यादित नसून त्या वृत्तीचा मैत्री, सख्य, प्रामाणिकपणा, सत्यप्रवृत्ति व एकनिष्ठा इत्यादि गुणांशींहि संबंध येतो, व त्यावरून व्यक्तीची या सर्व बाबतींतील मानासिक प्रवृत्ति दिसून येते.

## सामाजिक जीवनांत व्यक्तीचें स्थान—

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे विशिष्ट व्यक्ति आपला आयुष्यक्रम कोणत्या प्रकारें आचरणार हा होय. याचा अर्थ एकंदर समाजांतील श्रमविभागणीमध्यें विशिष्ट व्यक्ति कोणता भाग उचलणार याचा विचार केला पाहिजे. समाजामध्यें जर मी, तूं अशा भिन्न व्यक्ति आपणांस आढळतात तर हा प्रश्न व्यक्ति आणि जग ह्यांतील संबंधा-वर अवलंबून राहील, कारण मनुष्य ज्या मार्गांत पडणार किंवा जो व्यवसाय पतकरणार तो त्याच्या एकट्याच्या इच्छेवर अवलंबून नसून व ती केवळ त्याची वैय्यक्तिक अथवा खासगी बाब नसून त्याचे जे इतर व्यक्तींबरोबर संबंध असतील त्यावर अवलंबून आहे, व या ठिकाणीं अनेक व्यक्तींचा संबंध येत असल्यामुळें त्याला केवळ आपल्या मर्जीप्रमाणें वागून चालत नाहीं. आयुष्यांतील यशस्विता ही केवळ आपल्या एकट्याच्या किंवा वैय्यक्तिक इच्छेवर अवलंबून नसून इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असते. यामुळें मनुष्य कोणता व्यवसाय पत-करतो हें त्याचें व्यक्तिमत्त्व व त्याचा समाजांतील इतर व्यक्तींशीं संबंध यावर अवलंबून असतें.

## विरुद्ध जातीच्या व्यक्तीबद्दलची वृत्ति—

तिसरा एक महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे मनुष्य जात ही स्त्री व पुरुष या दोन जातींमध्यें विभागली गेली आहे हा होय. या बाबतींतील स्त्री-पुरुषांचे परस्पर संबंध हेंहि एकाच व्यक्तीच्या वैय्यक्तिक इच्छेवर अवलंबून नसून त्याचें विरुद्ध जातींशीं जें नातें असेल त्यावर अवलंबून असतात. या बाबतींतहि कोणत्याहि व्यक्तीच्या केवळ एकट्याच्या मनावर कोणतीहि गोष्ट अवलंबून नसते, व जेव्हां एक व्यक्ति दुसऱ्या भिन्न लिंगी व्यक्तीशीं संबंध जोडते तेव्हां सरळ मार्गापासून जितकी ती दूर जाईल तितक्या त्याच्या प्रेम व विवाह या बाबतींत चुका होण्याचा संभव असतो.

## आयुष्यांतील ध्येय—

यावरून हें उघड आहे कीं, प्रत्येक व्यक्तीचा आयुष्यक्रम अथवा त्याचें आयुष्यांतलि ध्येय काय याबद्दल जेव्हां तिचा स्वतःशीं विचार ठरेल तेव्हां वरील तीन गोष्टींच्या बाबतींत त्याचें जें वर्तन दिसून येईल त्यावरून आपल्या प्रश्नाचें उत्तर आपणांस मिळूं शकेल. व्यक्तीचें आयुष्यांतील ध्येय हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यावरून त्याचा आयुष्यक्रम व त्याच्या आयुष्यांतील प्रत्येक क्रिया निश्चित होते. उदाहरणार्थ, त्याचें ध्येय जर समाजांतील एक सार्वजनिक व्यक्ति म्हणून व्हावयाचें असेल तर त्याच्या सर्व क्रिया त्या दृष्टीनें उपयुक्त अशा मार्गानें केल्या जातील; आणि त्यामुळें त्याच्या हातून विधायक कार्य करण्याचे प्रयत्न चालू राहून आपली योग्यता व सामर्थ्य विधायक व उपयुक्त क्रिया करण्याच्या कामीं खर्च करण्याकडे त्याची प्रवृत्ति राहील. उलट त्याचें ध्येय जर केवळ वैय्यक्तिक महत्त्व मिळविण्याचें असेल तर त्याची प्रत्येक क्रिया

केवळ आपलें स्वत:चें हित साधण्याकडे प्रवृत्त होईल. परंतु त्याचा सामाजिक जीवनक्रम तितका सुखी असणार नाहीं.

## व्यक्तीवरील सामाजिक जबाबदारी—

हे जे मूळ महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांचा आपल्या सामाजिक जीवनावर फार महत्त्वाचा परिणाम होतो; व सामाजिक दृष्टीनें आपणांवर जीं कर्तव्यें येऊन पडतात, तीं योग्य तऱ्हेनें पार पाडणें हें आपल्या मध्यें जी सामाजिक वृत्ति प्रथमपासून तयार होते तीवर अवलंबून असतें. आपणांवरील सामाजिक जबाबदारी एका अर्थी फार लहानपणापासून सुरू होते. आपण आपले भाऊ, बहीण, आईबाप, नातेवाईक, ओळखीचे लोक, संवगडी, मित्र व शिक्षक यांच्याशीं कशा तऱ्हेनें वागतों, यावर आपल्या मनांतील निरनिराळ्या प्रवृत्ति अवलंबून असून आपल्या सामाजिक जीवनक्रमाचीं बीजें या संबंधांत रुजत घातलेलीं असतात; आणि त्यांचीच वाढ आपल्या पुढील आयुष्यक्रमांत होत असते; व हे संबंध जर तुटत गेले तर त्या मनुष्याचा आयुष्यक्रम फुकट जातो.

समाजाचा घटक या नात्यानें मनुष्यावर पडणारी जबाबदारी ओळखून त्याच्या ठिकाणीं जी एक सामाजिक वृत्ति म्हणून तयार व्हावी लागते तीवर त्याचें जीवितांतील यश अवलंबून असतें. या वृत्तीपासून ज्या मानानें तो ढळेल त्या मानानें त्याचा समाजांतील इतर व्यक्तींशीं व संस्थांशीं विरोध येईल व असा विरोध आला म्हणजे व्यक्तीला स्वत:-बद्दलचें निरर्थकत्व वाटूं लागतें, आणि ज्यांस त्याचेपासून त्रास होतो ते इतर लोकहि त्याचा तिरस्कार करूं लागतात. या दृष्टीनें व्यक्तीच्या मनांत सामाजिक वृत्ति उत्पन्न होणें ही महत्त्वाची गोष्ट असून त्या दिशेनें त्याच्या जीवनास दिशा लागली पाहिजे.

## मुलाच्या सांघिक वृत्तीचें ज्ञान—

या दृष्टीनें मुलाचा आपल्या इतर संवगड्यांशीं संबंध कसा असतो हेंहि पाहणें महत्त्वाचें आहे. तो लवकर मित्र करूं शकतो किंवा तुटक रीतीनें वागूं लागतो, तो खेळामध्यें वगैरे पुढारी बनतो कीं अनुयायी होतो, या गोष्टीहि त्याची सामाजिक वृत्ति कशी आहे हें दाखवितात. तसेंच त्यावरून त्याची इच्छा, आज्ञापालन करण्याची आहे कीं अधिकार गाजविण्याची आहे हें कळून येतें. जेव्हां एखादें मूल एकलकोंडें राहतें, तेव्हां दुसऱ्याशीं स्पर्धा करण्याइतका त्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास नाहीं असें दिसून येतें आणि त्यास इतरांशीं दुय्यम रीतीनें वागणें किंवा राहणें आवडत नाहीं हीहि गोष्ट स्पष्ट होते. जीं मुलें निरनिराळ्या गोष्टींचा संग्रह करतात तीं मुलें स्वतःचें सामर्थ्य वाढवून इतरांवर वर्चस्व मिळवूं पाहतात असें दिसतें. अशा संग्रही मुलांतूनच पुढें विशेष महत्त्वाकांक्षी पुरुष निर्माण होण्याचा संभव असतो. उलट केव्हां केव्हां अशा संग्रही मुलांत चोरून वस्तु जमविण्याचीहि प्रवृत्ति आढळून येते.

या प्रवृत्तीस मात्र ती दिसूं लागतांच प्रारंभींच आळा घालणें अवश्य असून त्यावेळीं योग्य काळजी घेतल्यास व मुलास त्या प्रवृत्तीचा योग्य मार्गानें उपयोग करण्याचें शिकविल्यास तिचा त्याला पुढील आयुष्यांत उपयोग होऊन त्याची अनिष्ट मार्गाकडे प्रवृत्ति होण्याचा अनर्थ खात्रीनें टाळतां येईल.

## या सांघिक वृत्तीची जोपासना—

अशा तऱ्हेनें अस्फुट स्वरूपांत दृग्गोचर होणाऱ्या या सांघिक प्रवृत्तीची वाढ योग्य प्रकारें करून मुलास समाजाचा एक कार्यक्षम घटक

बनविणें हें सर्वस्वीं त्याच्या पित्याच्या अथवा पालकाच्या हातांत असून या प्रवृत्तीची जोपासना ही सामाजिक दृष्ट्याहि फार महत्त्वाची गोष्ट आहे. याकरितां समाजनेत्यांचेंहि लक्ष्य या महत्त्वाच्या गोष्टीकडे जाणें अवश्य आहे.

या वृत्तीची वाढ विशेषतः सांघिक खेळांमध्यें भाग घेण्यानें साधतां येते. याकरितां मुलांस कोणत्या प्रकारच्या खेळांत गोडी उत्पन्न करणें फायदेशीर होईल इकडेहि लक्ष्य देणें अवश्य आहे. याकरितां खेळां-संबंधीं विचार पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत केला आहे.

आतांपर्यंत आपण मुलांमधील आत्मप्रवृत्ति व सांघिक प्रवृत्ति अथवा सामाजिक वृत्ति या ज्या दोन बलवत्तर मनोवृत्ती असतात त्यांचें स्वरूप कसें असतें व त्यासंबंधींची जाणीव आपणांस कशी करून घेतां येईल हें पाहिलें.

## आत्मवृत्ति ही स्वार्थपर असते—

या दोन वृत्ती पृथक् असतात असेंहि मानण्याचें वास्तविक कारण नाहीं. वास्तविक या दोन वृत्ति एकाच वृत्तीचीं दोन अंगें आहेत. मनु-ष्याची स्वत्वसंरक्षण व स्वत्वसंवर्धन ही प्रवृत्ति अत्यंत जोरदार असून ती जन्मजातच त्याच्या ठिकाणीं वसत असते व हीसच आपण आत्मप्रवृत्ति असें म्हटलें आहे. या प्रवृत्तीमुळें तो बलवान होऊन स्वतःचें महत्त्व स्थापन करण्याकडे प्रवृत्त होतो व यामुळेंच त्याची संपा-दनाकडे, संचयाकडे वगैरे प्रवृत्ति होते व या सर्व क्रिया तो स्वसा-मर्थ्य वाढविण्याच्या दृष्टीनें करीत असतो. या वृत्तीमुळें केवळ तो स्वतःकडे पाहत असतो. त्याला या वृत्तींत स्वतःशिवाय दुसरी कसलीहि व कशाचीहि पर्वा नसते. तो केवळ आत्मकेंद्रित असतो.

त्यास समाजाची, राष्ट्राची वगैरे फिकीर वाटत नाहीं. सर्व गोष्टींचा व साधनांचा उपयोग तो केवळ स्वार्थाकडे करीत असतो. याप्रमाणें आत्मप्रवृत्ति ही केवळ स्वार्थावर आधारलेली वृत्ति असते.

## सांघिक वृत्ति ही स्वार्थत्यागपर असते—

जेव्हां तो स्वार्थापलीकडे पाहूं लागतो तेव्हां त्यास त्याच्या जवळील व दूरच्या त्याच्या समाजांतील व्यक्तींची जाणीव होते व नंतर तो त्यांच्याकडे पाहूं लागला म्हणजे या आत्मप्रवृत्तीवर अथवा स्वार्थावर कांहीं निर्बंध घालून त्यांच्या सोयींची, सुखाची वगैरे काळजी करूं लागतो व थोडा फार आत्मप्रवृत्तींवर निर्बंध घालून त्यांस मदत करण्याकडे प्रवृत्त होतो किंवा त्यांची सोय पाहूं लागतो. याप्रमाणें त्याच्यामध्यें थोडीफार आत्मत्यागाची म्हणजे स्वार्थत्यागाची प्रवृत्ति होऊं लागते. या प्रवृत्तीस जसजसा अवसर मिळत जाईल तसतशी त्याची समाजाकडे पाहण्याची दृष्टि अधिकाधिक आपुलकीची होत जाऊन आपलें कुटुंब, जाति, समाज, देश, राष्ट्र वगैरे गोष्टी त्यास आपल्याशा वाटूं लागतात. तो दुसऱ्यांवर प्रेम करूं लागतो. विवाह करून अपत्यनिर्मिति करतो, आपलें कुटुंब बनवितो. आपल्या मुलांबाळांची काळजी घेऊं लागतो. हळू हळू कुटुंबापेक्षांहि ही त्यागी वृत्ति अधिक अधिक पलीकडे जाऊं लागते व तो समाजाचेंहि कांहीं कार्य करूं लागतो व आपल्या राष्ट्राबद्दलहि त्यास आपलेपणा वाटूं लागतो व त्याकरितां तो प्रसंगीं वाटेल तो स्वार्थत्याग किंबहुना आत्मत्यागहि करण्यास तयार होतो.

या सर्व गोष्टींचें मूळ त्याची जी बालपणांत सांघिक अथवा सामाजिक वृत्ति बनते म्हणजे जी स्वार्थत्यागाची किंवा स्वतःच्या वैयक्तिक

हिताच्या पलीकडे पाहण्याची दृष्टि व भूमिका त्याच्या मनांत तयार होते तीमध्यें असते.

**या दोन प्रवृत्तींचे परिणाम—**

याप्रमाणें स्वार्थ व स्वार्थत्याग या दोन एकाच प्रवृत्तीच्या विरुद्ध अंगांवर या आत्मप्रवृत्ति व सामाजिक प्रवृत्ति आधारलेल्या असून समाजांतील अनेक घडामोडींच्या मुळांशीं या दोन प्रवृत्ती दृष्टीस पडतील.

मोठमोठे शूर योद्धे, पराक्रमी वीर, देशविजेते, मोठमोठे कारखानदार, भांडवलवाले व अनेक दृष्टींनीं समाजामध्यें आपलें नांव अजरामर करणारे थोर पुरुष यांपैकीं पहिल्या म्हणजे आत्मप्रवृत्तीनें प्रेरित झालेले आपणांस आढळून येतील तर मोठमोठे दानशूर गृहस्थ, अनाथालयें, धर्मशाळा, शिक्षणसंस्था व शिक्षणमंदिरें, रुग्णालयें, वापी, कूप, तडागादि लोकोपयोगी कार्यें करणारे असे गृहस्थ या प्रवृत्तीची जी दुसरी बाजू म्हणजे स्वार्थत्यागप्रवृत्ति तीमुळें प्रेरित झालेले आपणांस आढळतील. आजपर्यंत जगांतील जुलुमाविरुद्ध लढा चालविणारे पुढारी, गुलामगिरी-विरुद्ध आटापिटा करणारे समाजसेवक, राज्यक्रान्त्या करणारे मुत्सद्दी व समाजनेते, धार्मिक जुलुमाविरुद्ध बंड उभारून मतस्वातंत्र्य प्रस्थापित करणारे धर्मसुधारक, सामाजिक अन्यायांबद्दल चिडून चळवळ करणारे व लोकमताचे आघात सोसणारे मतप्रवर्तक वगैरे सर्व या दुसऱ्या कोटींत पडणारे लोक असतात.

**एकाच प्रवृत्तीचीं हीं दोन भिन्न स्वरूपें होत—**

तसाच आपण जर अधिक सूक्ष्म विचार करूं लागलों तर ज्याला आपण स्वार्थत्याग म्हणतों तो वास्तविक केवळ त्याग नसून त्यांतहि

आपण जरी आपलें वैयक्तिक हित तात्पुरतें बाजूस ठेवीत असलों तरी ज्या समाजाचे आपण घटक असतों त्या समाजाचें आपण हित पाहात असतों. अगदीं ज्याचा आपला कोणताहि संबंध नाहीं अशा व्यक्ती-करितां किंवा समाजाकरितां कांहीं आपण स्वार्थत्याग करीत नाहीं. तेव्हां स्वार्थत्याग हा वास्तविक त्याग असून अधिक विस्तृत अथवा अधिक व्यापक, एकापेक्षां अनेक व्यक्तींचें हित साधणारा स्वार्थच म्हणजे एक-केन्द्रित स्वार्थ नसून बहुजनव्यापी स्वार्थच आहे ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येईल व तें एक स्वार्थाचेंच व्यापक व उदात्त स्वरूप आहे ही कल्पना आपणास त्यांत दिसून येईल. म्हणजे या दोन वृत्तींच्या मुळाशीं एकच वृत्ति भिन्न स्वरूपांत कशी वास्तव्य करीत असते ही गोष्ट आपणांस पटेल.

याकरितां या स्वाभाविक प्रवृत्तीच्या दोन बाजू नीट समजावून घेऊन मुलांच्या ठिकाणीं लहानपणापासून त्यांचा योग्य समन्वय कसा करतां येईल हें पाहून त्याप्रमाणें मुलांचें संवर्धन करणें ही मातापित्यांवरील केवढी जबाबदारी आहे ही गोष्ट त्यांस जितक्या लवकर कळेल व त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्न करणें किती इष्ट व आवश्यक आहे ही गोष्ट जितकी स्पष्टपणें त्यांच्या नजरेस येईल तितकी आणणें हें आज समाज-धुरीणांचें व शिक्षणप्रवर्तकांचें अवश्य कर्तव्य आहे.

---

# प्रकरण सोळावें

# मुलांचे मनोविकार

## मुलांच्या मनोविकारांचें ज्ञान—

मागील प्रकरणांत आपण मुलांच्या ठिकाणीं स्वाभाविकपणें वास करीत असलेल्या आत्मप्रवृत्ति व सांघिक प्रवृत्ति या दोन प्रवृत्ती अथवा एकाच प्रवृत्तीचीं स्वार्थपर व स्वार्थत्यागपर अथवा परार्थपर अशीं दोन स्वरूपें अवलोकन केलीं. या दोन प्रवृत्तींचा मुलांच्या मनावर व त्यांचा स्वभाव बनण्याच्या क्रियेंत फार मोठा परिणाम होतो हेंहि आपण पाहिलें. या प्रवृत्तींस अनुसरून मनुष्याचे लहानपणापासून सर्व व्यवहार चाललेले असतात व त्या प्रवृत्तींस जसें वळण लावावें तसें किंवा त्या प्रवृत्तींचा पगडा मनुष्याच्या मनावर कमी अधिक ज्या प्रमाणांत बसेल त्या मानानें मनुष्याचा स्वभाव बनतो व विशिष्ट व्यक्तींच्या आयुष्यास वळण लागतें ही गोष्ट आपणांस दिसून आली. या दोन प्रवृत्ती आपलें कार्य करीत असतांनाच मनुष्याच्या मनामध्यें निरनिराळे विकार वेळोवेळीं उत्पन्न होतात व ते उत्पन्न होणें हेंहि स्वाभाविकच असतें. अशा मनोविकारांचा मनुष्याच्या कृतीवर व वागणुकीवर निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळा परिणाम होतो व त्यास अनुसरून त्याच्या स्वभावांतील कांहीं विशेष बनत असतात. या मनोविकारांचें ज्ञान व त्यांचे मनुष्याच्या विशेषत: लहान मुलांच्या मनावर व वर्तनावर होणारे परिणाम यांचा अभ्यास आपणांस करणें अवश्य आहे. त्याखेरीज मुलांच्या स्वभावास इष्ट तें वळण कसें लावावें ही गोष्ट पालकांच्या लक्ष्यांत नीटशी

येणार नाहीं. याकरितां अशा मनोविकारांचें दिग्दर्शन येथें करण्यांत आलें आहे. अशा मनोविकारांपैकीं मत्सर व ईर्षा हे अगदीं स्वाभाविक मनोविकार आहेत. म्हणून त्यांस आद्य स्थान देण्यांत आलें आहे.

**मत्सर व ईर्षा—**

मत्सर ही एक अगदीं प्राथमिक व स्वाभाविक भावना आहे. ही भावना मनुष्यप्राणी व इतर सर्व उच्च प्राणिकोटींतल्या प्राण्यांमध्यें दिसून येते व ज्याअर्थीं ती स्वाभाविक आहे त्याअर्थीं आपल्या आयुष्यामध्यें तिला महत्त्वाचें स्थान आहे. परंतु ही भावना दुःखदायक आहे. जोंपर्यंत आपल्या मनामध्यें मत्सराची खळबळ सुरू असते तोंपर्यंत आपणांस कधींहि मनःस्वास्थ्य लाभत नाहीं. मत्सराबरोबर नेहमीं राग हा असतोच व मत्सरानें उत्पन्न झालेल्या रागाच्या भरांतच मनुष्य मोठमोठे गुन्हे करतो.

मत्सर आणि ईर्षा हे दोन विकार परस्परांपासून भिन्न आहेत, परंतु अनेक वेळां त्यांचा घोंटाळा करण्यांत येतो. एखाद्याचें प्रेम संपादन करण्याचे कामीं जर दुसरें कोणी आडवें आलें तर त्याबद्दल आपणास मत्सर उत्पन्न होतो. उलट ईर्षा ही अगदीं निराळ्या परिस्थितींत उत्पन्न होते. आपणाला दुसऱ्या एखाद्या मनुष्याच्या योग्यतेबद्दल व वैभवाबद्दल ईर्षा उत्पन्न होते. याकरितां तिसऱ्या व्यक्तीची जरूरी नसते. मुलाला बहुतेक आपला बाप किंवा आई यांच्यापैकीं कोणाबद्दल तरी असूया वाटत असते. हा विकार व त्यापासून उत्पन्न होणारा राग दाबून टाकण्याचा मनुष्य प्रथमपासूनच प्रयत्न करीत असतो. हा विकार शक्य तों कधींहि वाढूं देतां कामा नये. लहान मुलाच्या बाबतींत तर याबद्दल विशेष

काळजी घेतली पाहिजे व त्याच्या मनांत माता किंवा पिता यांचेबद्दल हा विकार उत्पन्न होणार नाहीं अशी दक्षता बाळगली पाहिजे. उदाहरणार्थ, मुलास आई ही नेहमीं आपणांजवळ असावी असें वाटत असतें; याचे उलट आईबापांस दिवसांतून कांहीं वेळ तरी एकान्तांत असावें असें वाटत असतें, परंतु त्यांनीं आपल्या मुलास आवश्यक तेवढा वेळ जवळ घेणें आवश्यक असतें व त्यास टाळून एकांतांत बसल्यास त्याच्या ठिकाणीं त्यांचेबद्दल मत्सर उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. याकरितां या गोष्टीची काळजी आईबापांनीं घेणें अवश्य आहे.

शक्य तों लहान मुलांस आईबापांनीं निजावयास जवळ घेऊं नये. त्याप्रमाणेंच दोन मुलें असलीं म्हणजे त्यांपैकीं एकाकडे विशेष लक्ष देऊं नये. विशेषतः लहान मुलाकरितां मोठ्या मुलाकडे दुर्लक्ष करतां कामा नये. नाहींतर मोठ्या मुलाच्या मनांत आपल्या लहान भावंडाबद्दल मत्सर उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. याकरितां आपण सर्व मुलांस सारखेंच वागवतों अशी त्यांची समजूत असणें इष्ट आहे.

**मत्सराचा उगम—**

मत्सराचा उगम पहिल्या प्रथम अगदीं साध्या गोष्टींत होतो. मूल आईजवळ असतांना बाप वगैरे जवळ आला तर त्याला तें लहान मूल रागावून मारतांनासुद्धां आढळतें. मुलामधील ही मत्सराची प्रवृत्ति दाबण्याचा प्रयत्न केला तर ती दुसऱ्या एखाद्या रूपानें प्रगट होते व केव्हां केव्हां त्या मुलाच्या स्वभावामध्यें दोष उत्पन्न होतात, किंवा त्याच्या मज्जातंतूंवर परिणाम होतो. केव्हां केव्हां एखादें मूल प्रथम चांगलें वागत असतां मत्सरामुळें हट्टी झाल्याचें आढळून येतें. कधीं कधीं तें कांहीं कारण नसतां एकसारखें रडतांना दिसतें. केव्हां केव्हां ज्याच्याबद्दल

त्याला मत्सर वाटतो, त्याच्याशीं फारच लाडीगोडीचें वर्तन करतांना तें आढळतें व त्याच्याकरितां कोणतेंहि काम करण्याची तयारी दाखवितें. पण ही त्याची कृति त्याबद्दल वाटणाऱ्या हेव्याची द्योतक असते.

**मत्सराचा परिणाम—**

केव्हां केव्हां ज्या व्यक्तीबद्दल मत्सर वाटतो त्या व्यक्तीच्या कांहीं वस्तु चोरण्याची संवय मुलाला लागते. केव्हां केव्हां दुसऱ्या मुलाचे कपडे त्यास घालावेसे वाटतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्याला त्याच्यासारखें व्हावेंसें वाटतें. केव्हां केव्हां मत्सरामुळें मुलास झोंप येत नाहींशी होते व ज्याबद्दल त्याला विशेष मत्सर वाटतो त्या व्यक्तीच्या एकसारखें सान्निध्यांत असावें असें त्यास वाटतें.

केव्हां केव्हां मत्सरामुळें जो राग उत्पन्न होतो, त्यामुळें मुलें नासधूस करतांनाहि आढळतात. केव्हां केव्हां त्यांच्या हातून बऱ्याचशा वस्तु वरचेवर फुटतात त्याचें वास्तविक कारण निष्काळजीपणा नसून मत्सर हेंच असतें. ही गोष्ट सहसा आपल्या लक्ष्यांत येत नाहीं.

**मत्सरावर उपाय—**

एखादें मूल जर आपणास कोणाचा मत्सर करतें असें आढळलें तर त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें किंवा त्याबद्दल त्यास रागें भरणें हें ठीक होणार नाहीं. तर त्या गोष्टीला दुसराच उपाय केला पाहिजे. जर आई-बापांस आपलें मूल आपल्याबद्दल मत्सरी आहे असें वाटत असेल तर त्यानें त्यास तसें स्पष्ट बजावून सांगावें व जी गोष्ट आपणास पाहिजे असेल ती मुलास मिळणार नाहीं असें स्पष्ट बजावून सांगावें. विशेषतः त्यास पूर्णपणें न मिळतां शक्य असेल तर कांहीं वेळ ती गोष्ट मिळूं शकेल असें सांगावें; किंवा योग्य वेळीं त्याला ती प्राप्त होईल असें

सांगावें. असें केलें असतां त्याच्या मनांतील मत्सराची भावना आपणास दिसून आली आहे हें त्यास स्पष्ट कळून येतें व त्या बाबतींत कोणता उपाय करावयाचा तेंहि स्पष्ट होतें. मुलाच्या मनांतील मत्सराबद्दल आपणास कांहीं विशेष वाटत आहे असें दाखवूं नये तर तो विषय थट्टेवारी नेण्याचा प्रयत्न करावा.

**राग—**

कोणत्याहि मुलास एखाद्या बाबतींत विरोध झाला किंवा निराशा झाली असतां त्यास राग येतो. राग येणें हें अगदीं स्वाभाविक आहे आणि याकरितां हा एक चांगला विकार आहे असें मानिलें पाहिजे. राग हा अजीबात नाहींसा करण्यापेक्षां त्याला योग्य दिशा लावली पाहिजे. कारण या विकाराचें आपणास कधींहि उच्चाटन करतां यावयाचें नाहीं व तशा तऱ्हेचा प्रयत्न केल्यास कोणासहि त्यांत यश येणार नाहीं. रागाचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केल्यास उलट आपण तो वाढवितों मात्र; तो तात्पुरता दबून राहतो, आणि दाबून ठेविलेल्या रागापासून पुढें द्वेष उत्पन्न होतो.

**राग येणें अवश्य आहे—**

आतांपर्यंतच्या सर्व नीतिशास्त्रवेत्त्यांनीं राग हा मनोविकार योग्य असल्याबद्दल मान्यता दिली आहे. उदाहरणार्थ ख्रिस्त हा एवढा शांत असूनहि त्याला फॅरिसी लोक व व्याजखाऊ सावकार यांचा राग येत असे. विल्यम विल्बरफोर्सला जर गुलामांच्या मालकांचा राग आला नसता तर अद्यापहि गुलामगिरी चालू राहिली असती. फ्रान्समधील लोकांस जर वरिष्ठ वर्गाबद्दल राग आला नसता तर

फ्रेंच राज्यक्रांति कधींहि झाली नसती व अद्यापहि आपणांस अर्वाचीन फ्रान्सचा उदय झालेला दिसला नसता.

शिवाजीस जर पारतंत्र्याची चीड आली नसती तर महाराष्ट्रास स्वातंत्र्याची प्राप्ति कधींच झाली नसती. लोकमान्य टिळकांच्या मनांत जर इंग्रजी राज्याबद्दल असंतोष उत्पन्न झाला नसता तर आज हिंदुस्थानांत झालेली राजकीय जागृति आपणांस दृष्टीस पडली नसती.

राग ही खरोखर प्रगतीला एक अत्यंत प्रेरक अशी गोष्ट आहे. रागाच्या योगानें मनुष्य आपल्या मार्गांतील अडथळे दूर करतो. राग दाबून टाकला असतां परवशता, स्तब्धता व दुर्बलता हीं उत्पन्न होतात.

**रागाचा परिणाम—**

आपल्या सामान्यतः लक्षांत येत नाहीं, पण बागेंतील तण जें आपण उपटून टाकतों त्याचें कारण त्या तणामुळें बागेचें सौंदर्य व उत्पन्न यांचा नाश झालेला आपणांस पाहवत नाहीं, यामुळें आलेला राग हें होय. निरनिराळे शोध जे आपण लावतों त्यांची प्रेरणा आपणांस आपल्या कर्तृत्वाला मर्यादा घातली जाते किंवा स्थल, काल इत्यादि गोष्टींमुळें येणारे अडथळे आपणांस दूर करावयाचे असतात यामुळें होते. आगगाडी, तारायंत्र, गलबतें वगैरे गोष्टींचे शोध आपल्या मार्गांतील अडचणींचा आपणांस जो राग येतो, त्यामुळेंच लागले आहेत. यावरून रागामुळें ज्ञानाची प्रगति, नवीन वस्तूंची उत्पत्ति, सामर्थ्य व जीवित यांस प्रेरणा मिळते ही गोष्ट स्पष्ट आहे. त्याअर्थी राग हा बहुमोल आहे.

## राग दाबून टाकण्याचा परिणाम—

प्रौढ मनुष्यास राग आला असतां जेव्हां तो एखादा अत्याचार किंवा गुन्हा करतो, किंवा समाजाच्या विरुद्ध वर्तन करतो तेव्हां तो दोषास्पद असतो. अशा वेळीं असें असण्याचा संभव आहे कीं अशा मनुष्यास लहानपणीं राग आला असतां त्याला योग्य तऱ्हेनें वागविण्यांत न आल्यामुळें त्याची प्रवृत्ति अशा तऱ्हेची बनली असावी; किंवा त्या मुलास अतिशय धाकांत व अन्यायानें वागविल्यामुळें त्याच्या मनांत कायमची रागाची वस्ती होऊन त्याचें द्वेषांत रूपांतर झालें असावें.

लहान मुलास राग आला असतां तो दुर्गुण म्हणून मानण्याचें मुळींच कारण नाहीं. त्याच्या मनांत कांहीं गोष्टींबद्दल असंतोष वाटत असल्याचें तें द्योतक आहे व या असंतोषास रागाच्या द्वारें वाट मिळणें अवश्य आहे. ज्याप्रमाणें दुःखाचें परिमार्जन किंवा परिस्फुटता अश्रूंच्या रूपानें होते त्याप्रमाणें असंतोषाचें बाह्य प्रदर्शन रागानें अथवा रागाच्या भरांत केलेल्या कृतीनें होतें. तेव्हां राग हा आवश्यक असून त्याचा योग्य तो उपयोग मात्र करून घेतला पाहिजे.

## मुलाचा राग कसा घालवावा !—

सामान्यतः कोणतेंहि मूल घेतलें तरी त्याला मधून मधून राग हा येतच असतो आणि त्याच्या इच्छेविरुद्ध जर बऱ्याच गोष्टी होत गेल्या तर त्यास तो नेहमींच येत राहतो. त्याबद्दल जर त्यास एकसारखें दोष देत गेलें तर त्याचा स्वभाव बनण्याच्या कामीं तें एक मोठें वैगुण्य होईल व बहुधा त्याचा स्वभाव वाईट बनेल. तें नेहमीं रडकें असेल किंवा दुर्मुखलेलें, दुर्बल मनाचें असें होईल. लहान

मुलाच्या सर्वच इच्छा नेहमीं तृप्त करतां येतील असें नाहीं. तथापि बऱ्याचशा बाबतींत त्याचें सहज समाधान करतां येण्यासारखें असतें. विशेषतः ज्या गोष्टीपासून कांहीं नुकसान होणार नाहीं, किंवा ज्या इच्छा स्वाभाविक आहेत अथवा महत्त्वाच्या आहेत, अशा त्याच्या इच्छा तृप्त करण्यास कांहींच हरकत नाहीं. जर त्याची एखादी इच्छा घातुक असेल तर त्याचें मन दुसऱ्या एखाद्या गोष्टीकडे वळवावें. अशा वेळीं त्यास नीट सांगावें कीं तुला अमुक गोष्ट मिळत नाहीं किंवा अमुक गोष्ट करतां येत नाहीं म्हणून राग आला असेल; पण ती गोष्ट मिळणें शक्य नाहीं. त्या ऐवजीं तुला अमुक गोष्ट मिळेल किंवा अमुक गोष्ट करतां येईल. अशा वेळीं जर मूल रडूं लागलें तर तिकडे लक्ष देऊं नये. दोन्ही गोष्टी त्याच्या समोर मांडून ठेवाव्या व तें काय करीत आहे तिकडे पाहावें. बहुधा तें अनिष्ट गोष्ट न करतां दुसरी गोष्ट करण्याचें पत्करील, परंतु त्यानें तसें न केल्यास त्यास ताकीद द्यावी.

## मुलावर रागावणें—

जेव्हां आपणास मुलाबद्दल राग येईल तेव्हां आपण रागावल्याचें त्यास स्पष्ट सांगावें. आपला राग झांकून ठेवूं नये. तसेंच आपणांस कां राग आला आहे त्याचें कारणहि स्पष्ट सांगावें व त्यावर आपण काय उपाय योजणार आहों तेंहि स्पष्टपणें सांगून टाकावें. तसेंच त्या मुलाशिवाय दुसऱ्या कोणाबद्दल राग आला असल्यास त्याचींहि कारणें सांगून त्याबद्दलचे उपायहि त्यास सांगून टाकावे. आपण मुलावरच काय तें रागावतों व इतरांवर रागावत नाहीं असें त्यास वाटतां कामा नये.

## राग येणें केव्हां अवश्य असतें—

याप्रमाणेंच त्या मुलालाहि एखाद्या गोष्टीची नासधूस होत असेल तर किंवा अन्याय, जुलूम, निष्ठुरपणा, गैरवाजवी निर्बंध वगैरे गोष्टींबद्दल राग येत असेल तर त्यास उत्तेजन द्यावें. असें केल्यानें पुढील वयांत त्यास प्रत्येक गोष्टींत योग्य मत बनविण्यास मदत होईल. तें नेहमीं न्यायाची बाजू घेऊन अन्यायाचा प्रतिकार करील. त्याप्रमाणेंच जेथें गैरवाजवी निर्बंध दिसतील तेथें तें ते दूर करण्याचा प्रयत्न करील. त्याप्रमाणेंच आजार वगैरे येणें ही गोष्ट तें स्वाभाविक न मानतां त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करील. तसेंच घरामध्यें नीट आरोग्य राहावें, तसेंच कोणत्याहि प्रकारची नासधूस होऊं नये या गोष्टीची काळजी घेईल; व अशा तऱ्हेनें तें एक उपयुक्त नागरिक बनेल.

## राग व्यक्त करणें—

मूल रागांत असतांना जर आपल्या विरुद्ध त्यानें एखादी अत्याचाराची गोष्ट केली तर त्याबद्दल आपण अतिशय विस्मय मानूं नये, किंवा त्यास दोषहि देऊं नये. तर उलट त्यास असें दाखवून द्यावें कीं, त्यास राग येणें ही गोष्ट स्वाभाविक व इष्टच असून तो व्यक्त करण्याची पद्धति मात्र चुकीची आहे; व त्यास असें पटवून द्यावें कीं, अत्याचार करणें ही गोष्ट अगदीं शेवटची पायरी आहे. कोणालाहि मारणें ही गोष्ट सद्वर्तनाच्या विरुद्ध आहे; आणि त्याचा परिणाम उलट होण्याची भीति असते; व आपणास मारल्यास आपण उलट त्यास मारूं असें स्पष्ट बजावून सांगावें व तसें प्रत्यक्ष वेळप्रसंगीं करून दाखवावें, व जेवढी इजा त्यानें आपणास केली असेल तेवढी त्यासहि करावी. तथापि प्रत्येक गोष्टींतच अत्याचार करणें वाईट

असें मात्र त्याचें मत बनतां कामा नये. जगामध्यें कित्येक प्रसंगीं अगदीं अखेरची पायरी म्हणून अत्याचाराचाहि अवलंब करावा लागतो, ही गोष्टहि त्याच्या मनावर पटवून द्यावी लागते.

## रागाचें योग्य व्यक्तीकरण—

सद्वर्तनामध्यें आपल्या कांहीं प्रवृत्ती दाबून ठेवाव्या लागतात ही गोष्ट मुलाच्या लक्षांत आणून दिली पाहिजे. जर एखाद्या मुलानें आपल्या दुसऱ्या लहान खेळगड्यास मारलें तर या बाबतींत वरील गोष्टीचाच अवलंब केला पाहिजे व त्या मुलास मारण्यास कांहींतरी कारणहि असण्याचा संभव असला पाहिजे ही गोष्टहि लक्षांत ठेविली पाहिजे. त्या दुसऱ्या मुलाचा पक्ष खरा आहे असें सिद्ध झाल्याशिवाय खरा धरून चालूं नये. कांहीं मुलांच्या बाबतींत त्यांच्या खेळगड्यांकडून त्यांस मार मिळणें हीच शिक्षा योग्य असते; व त्याचा त्यांच्यावर फार चांगला परिणाम होतो. विशेषतः जीं मुलें फार लाडावलेलीं असतात त्यांवर या उपायाचा फार चांगला परिणाम होतो. अशा बाबतींत केव्हांहि मुलास नैतिक दृष्ट्या दोष देऊं नये. मात्र त्यास स्वतःच्या बाबतींत संयम व इतरांच्या बाबतींत सहिष्णुता बाळगण्यास शिकवावें.

जर आपलें मूल आपल्या दाईवर अथवा खेळगड्यावर रागावलें असेल आणि त्यास राग येण्याचें कारण योग्य असेल तर नेहमीं त्याची बाजू घेत जावी; व त्यास असें भासवावें कीं अशा प्रकारची गोष्ट झाली असतां आपणासहि राग आला असता. अशा वेळीं नेहमीं त्याची बाजू घेऊन मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करावा.

## मनांतील राग घालविणें—

केव्हां केव्हां एखादी गोष्ट होऊन गेली तरी मुलाच्या मनांत त्या गोष्टीबद्दलचा राग शिल्लक राहतो; व त्याला तो पूर्णपणें काढून टाकतां न आल्यामुळें मनांत तसाच राहून जातो. अशा वेळीं त्यास तो राग उगवून घेण्याची संधि देत जावी. उदाहरणार्थ, त्यास असें सांगावें कीं, बागेंत वाढणारें तण हें शत्रूप्रमाणें असून त्याच्यावर हल्ला केला पाहिजे. तसेंच माशा, किडे वगैरे प्राणी भयंकर असून त्यांपासून होणारें नुकसान टाळण्यासाठीं त्यांचा नाश केला पाहिजे. मात्र असें करतांना त्या प्राण्यास शक्य तितकें कमी दुःख होईल असें पाहिलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या निरुपयोगी व उपद्रवकारक गोष्टींवर राग काढणें हा राग घालविण्याचा उत्तम उपाय आहे. अशा तऱ्हेनें जेव्हां एखाद्या मुलाची नासधूस करण्याची प्रवृत्ति होईल त्यावेळीं त्या प्रवृत्तीचा शक्य तों चांगल्या कामीं उपयोग करून घेत जावा. उदाहरणार्थ एखादी मोडकी पेटी वगैरे फोडून टाकून ती सरपणाकडे टाकावी किंवा वाळलेलीं झाडें उपटून टाकण्यास त्यास सांगावें; किंवा कात्री देऊन त्यास गवत कापण्यास सांगावें.

## राग व रुदन—

जेव्हां एखाद्या मुलाच्या इच्छेप्रमाणें गोष्ट घडत नाहीं तेव्हां त्यास रडूं येतें. अशा वेळीं त्यास वास्तविक राग येतो, व अश्रु येणें हा त्याचाच परिणाम असतो. रडणें ही क्रिया अशी आहे कीं, आपल्याला राग आला असून जेव्हां त्याचा प्रतिकार करण्यास आपण असमर्थ असतों तेव्हां आपणास आपल्या स्वतःची कींव येऊन आपण रडूं लागतों. लहान मूल रडतें तेव्हां त्यास स्वतःबद्दलाहि दुःख वाटत असतें. अशा वेळीं

मुलास त्याला आलेला राग दुष्टपणाचा किंवा हट्टीपणाचा आहे असें भासूं देऊं नये; कारण वस्तुस्थिति तशी नसते. त्या मुलाची इच्छा तृप्त न झाल्यामुळें त्यास राग येणें अगदीं साहजिक असतें; व योग्य गोष्टीचा राग येणें ही गोष्ट पुढील आयुष्यांत अगदीं आवश्यक असते. योग्य प्रसंगीं राग न येणें हें स्वाभाविक नसून स्वभावास अयोग्य वळण लागल्याचें निदर्शक आहे व त्यामुळें त्या मुलावर वाजवीपेक्षां अधिक दाब पडला असावा असें अनुमान निघतें.

## मुलाची समजूत—

मूल रडूं लागण्यापूर्वीं त्यास असें नीट सांगावें कीं, तुला राग आला आहे हें माहीत आहे, परंतु तुला अमुक गोष्ट मिळणार नाहीं किंवा तुला विशिष्ट गोष्ट करतां यावयाची नाहीं; कारण ती योग्य नाहीं किंवा त्यामध्यें धोका आहे किंवा तें मागत असलेली वस्तु दुसऱ्या कोणाची तरी आहे. अशा वेळीं त्या गोष्टीबद्दल त्यास दुसरी कोणती गोष्ट देतां आली किंवा करतां आली तर तसा प्रयत्न करून पाहावा. तसें न जमल्यास किंवा त्या मुलानें न ऐकल्यास त्यास खुशाल रडूं द्यावें. कांहीं वेळानें तें आपोआप गप्प बसेल. रडण्यानें किंवा ओरडण्यानें सामान्यतः मुलास कोणत्याहि प्रकारची इजा होत नाहीं. शक्य तों त्या मुलाचें मन दुसऱ्या एखाद्या गोष्टीकडे वळवून त्याचा राग अथवा रडें घालविण्याचा यत्न करावा परंतु तसें करणें शक्य न झाल्यास व तें रडत राहिल्यास त्यास रडूं द्यावें.

## मूल रडण्याचीं अन्य कारणें—

जें मूल एकसारखें रडत राहतें तें कांहीं तरी रोगी असलें पाहिजे किंवा द्वाड तरी असलें पाहिजे. तें जर द्वाड असेल तर तें द्वाड

होण्यास कारण आपणच तशी परिस्थिति उत्पन्न केली असली पाहिजे. अशा मुलाच्या मनांत एक प्रकारच्या इच्छा दबून राहिलेल्या असतात आणि आपणांवर वर्चस्व मिळविण्याची त्याची इच्छा असते व तें आपला द्वेष करूं लागतें. एखादें नेहमीं रडण्याची संवय नसलेलें मूल रडूं लागलें तर त्याला कोठें इजा झाली आहे काय किंवा कांहीं दुखत आहे किंवा काय याचा नीट तपास करावा व तें रडण्याचें कारण नीट समजावून घेण्याचा प्रयत्न करावा. तसें कारण असल्याचें बहुधा आढळून येईल व आढळल्याबरोबर तें दूर करून टाकावें. तसें तें आपणास स्वतः दूर करतां नच आल्यास योग्य मनुष्याचा सल्ला घ्यावा.

रात्रीं मूल जेव्हां एकदम दचकून उठतें व रडूं लागतें तेव्हां त्यास बहुधा भीति वाटत असते. अशा वेळीं त्या गोष्टीचा तपास करून त्याची भीति दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामान्यतः मूल रडतें तेव्हां त्यास कांहीं तरी कारण असतें. कारणावांचून मूल कधीं-हि रडत नाहीं. तेव्हां त्या कारणाचा नेहमीं शोध करीत जावें. रड-ण्यास पुरेसें कारण नाहीं अशी खात्री झाल्याशिवाय कधींहि मुलाची रडण्याबद्दल चेष्टा करूं नये किंवा प्रतिबंध करूं नये. अशा वेळींहि बहुधा मुलास रडण्यास योग्य कारण असण्याचा संभव असतो.

## विचारमग्नता—

सामान्यतः निरोगी मूल बहुधा विचार करीत नसतें; तर तें नेहमीं कांहीं तरी चाळा करीत असतें. त्याची वृत्ति सामान्यतः बुद्धिप्रधान नसून भावनावश असते. याचा अर्थ असा नव्हे कीं, मुलास मुळींच विचार करतां येत नाहीं. परंतु सामान्यतः सर्वसाधारण मुलाची प्रवृत्ति कोणती तरी क्रिया करण्याकडे असते. जेव्हां मूल अशा तऱ्हेनें न

वागतां इतर गोष्टी करूं लागेल तेव्हां त्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. अनेकदां त्याचा अर्थ असा होतो कीं, तें मूल क्रिया करण्याच्या ऐवजीं विचार करूं लागतें; किंवा प्रत्यक्ष कृतीपेक्षां कल्पनेमध्यें मग्न होतें. ही गोष्ट वाईट आहे. कारण या कल्पनामग्नतेपासून म्हणजे जणूं कांहीं दिवसा स्वप्नें पाहण्यापासून फार महत्त्वाचे पण अनिष्ट परिणाम होतात. या कल्पनामग्नतेनंतर असा एक काळ येतो कीं, मुलास प्रत्यक्ष आयुष्यक्रमामध्यें गोडी न वाटतां कांहीं काल्पनिक आयुष्यक्रमांत त्याचें मन रमूं लागतें. त्याला प्रत्यक्ष गोष्टीपेक्षां कल्पनेमध्येंच अधिक सुख वाटूं लागतें व त्यामुळें त्याचें चालू आयुष्यक्रमांतून लक्ष उडूं लागतें. अशा तऱ्हेच्या कल्पनामग्नतेपासून पुढें त्या मुलास मेंदूचे विकार उत्पन्न होतात व याचा अतिरेक झाल्यास तें मूल वेडें होण्याचा संभव असतो. इतक्या थरास जरी गोष्टी गेल्या नाहींत तरी अशा प्रकारचें मूल पुढील आयुष्यांत ज्याला स्वप्नसृष्टींत आनंद मानणारें असें म्हणतात अशा प्रकारचें होतें. त्याला एकान्तांत बसावें, दुसऱ्यावर अवलंबून राहावें, कोणतेंहि धाडस करूं नये व नेहमीं गंभीर वृत्तीनें राहावें असें वाटूं लागतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्याचें मन कृतीपेक्षां विचारांत रमूं लागतें.

**कल्पनामग्नतेचीं कारणें—**

अशा तऱ्हेनें कल्पनामग्नता उत्पन्न होण्याचें कारण बहुधा विशेष निर्बंधित अशी परिस्थिति होय. मुलाच्या स्वाभाविक इच्छा योग्य तऱ्हेनें परिपूर्ण झाल्या नाहींत म्हणजे तें कल्पनेंत समाधान मानूं लागतें. व अशा तऱ्हेनें एकदां काल्पनिक समाधान मानण्याची प्रवृत्ति वाढूं लागली म्हणजे प्रत्यक्ष जगांत वावरण्याची प्रवृत्ति कमी कमी होऊं लागते व तें अधिकाधिक कल्पनांच्या मागें लागूं लागतें. व अशा रीतीनें

तें मूल केवळ कल्पनेच्या वातावरणांतच राहूं लागून बाह्य जगास जवळजवळ पारखें होतें.

## कल्पनामग्नतेचे परिणाम—

अशा तऱ्हेची स्थिति झाल्यास पुढील गोष्टी हळू हळू घडून येऊं लागतात. त्या मुलास आयुष्यामध्यें कमी कमी गोडी वाटूं लागते. त्याच्या भावना किंवा विकार हळू हळू कमी होऊं लागतात. त्यास एकान्त जास्त आवडूं लागतो व मंडळींत बसलें असतां तें शांतपणें व स्वस्थ बसतें; आणि संभाषणांत भाग घेत नाहीं. त्याच्या डोळ्यावर झांपड येऊं लागते आणि त्यास निजून राहणें जास्त आवडूं लागतें. व त्यास सकाळीं उठविणें कठीण जाऊं लागतें. त्याच्या जवळ एकदम बोलूं लागल्यास तें दचकतें व एकदम लाजल्यासारखें होतें. या स्थितीला सामान्यतः लोक आळशीपणा समजतात व त्याबद्दल त्या मुलास शिक्षा करतात. वास्तविक तो आळस नसतो. सर्वसाधारण मूल सामान्यतः कधींच आळशी नसतें. व अशा वृत्तीला आळस समजून त्या मुलास तसें वागविणें फार धोक्याचें आहे. त्यामुळें त्या मुलाची प्रवृत्ति अधिकाधिक विचार करण्याकडे व कल्पनेंत अथवा स्वप्नामध्यें मग्न होण्याकडे वाढत जाते.

## तीवर उपाय—

या गोष्टीस योग्य उपाय म्हणजे मुलाच्या मनांतील ही स्थिति शक्य तितक्या लवकर लक्षांत घेऊन त्यावर वाजवीपेक्षां जास्त निर्बंध घातल्यामुळें ही उत्पन्न झाली आहे हें ओळखून अशी स्थिति कायम होण्याच्या अगोदरच त्यावरील निर्बंध सैल केले पाहिजेत व त्यानंतर त्यास मोठ्या कुशलतेनें वागवून त्याचें लक्ष आयुष्यांतील वास्तविक

गोष्टींकडे लागेल असें केलें पाहिजे. आतापर्यंत अनेक मुलांच्या बाबतींत त्यांच्या मनाची ही स्थिति ओळखूं न आल्यामुळें व त्यांस केवळ आळशी समजल्यामुळें त्यांच्या आयुष्याचा नाश झाला आहे. अशा वेळीं मुलास कोणत्या गोष्टींच्या कल्पना सुचतात व तें कसला विचार करीत बसतें याची नीट चौकशी करून व सभोंवतालच्या परिस्थितीचें नीट निरीक्षण करून त्याची खरी अडचण काय आहे तें शोधून काढण्याचा प्रयत्न करावा. जर आपणास ती गोष्ट स्वत: करतां आली नाहीं तर त्या बाबतींत एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा.

## निष्क्रियता—

निष्क्रियता म्हणजे ज्यावेळीं वास्तविक एखादें काम करीत असणें ही गोष्ट नैतिक दृष्ट्या आवश्यक असते अशा वेळीं तें काम टाकून मुद्दाम स्वस्थ बसणें पसंत करण्याची वृत्ति होय. ही गोष्ट वास्तविक प्रौढ मनुष्यासच शक्य आहे. त्यामुळें मूल स्वत: मुळींच निष्क्रिय नसतें. सर्वसाधारण मुलें नेहमीं थकून जाईपर्यंत कांहीं तरी क्रिया करीतच असतात. थकल्यावरच त्यांस स्वस्थ बसणें आवडतें. याकरितां मुलास कधींहि ऐदी किंवा निष्क्रिय म्हणूं नये.

## निष्क्रियतेचीं कारणें—

मूल थकलेलें नसतांहि जेव्हां स्वस्थ बसतें तेव्हां त्याला दोन कारणें असूं शकतात : ( १ ) तें आजारी असतें किंवा एखादा आजार होण्यापूर्वींच्या अवस्थेंत जी एक प्रकारची ग्लानि येत असते तशा अवस्थेमध्यें तें असतें. ( २ ) तें वाजवीपेक्षां अधिक निर्बंध घातले गेल्यामुळें कांहीं तरी कल्पना करीत अथवा जणूं काय दिवसासच स्वप्नें पाहात असतें. जर एखादें मूल आपणास निष्क्रिय असें स्वस्थ

बसलेलें आढळलें तर त्यास कोणतें कारण असेल त्याचा तपास करून त्याप्रमाणें योग्य ती तजवीज करीत जावी. मूल जर कोणतीहि गोष्ट करीत नसेल व स्वस्थ बसलें असेल तर त्याचें कारण आपणच त्यास 'हें करूं नको, तें करूं नको' अशा तऱ्हेचे अनेक निर्बंध घालून त्यास कृतीपासून परावृत्त करीत असलों पाहिजे; व अशा तऱ्हेनें आपण त्यास स्वस्थ बसणें भाग पाडलें तर तें मनांतल्या-मनांत या गोष्टीबद्दल जळफळत तींतून निसटण्याच्या किंवा कांहीं प्रसंगीं रागावून आपल्या आईबापावर सूड घेण्याच्या कल्पना मनांत आणीत असतें; व त्याचा परिणाम वाईट होतो.

**भीति—**

मुलास स्वाभाविकपणें भीति वाटणें ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण तीमुळें त्यास स्वसंरक्षण करण्याची प्रवृत्ति होते. याकरितां लहान मुलास जर स्वाभाविकपणेंच भीति वाटत असेल तर तीबद्दल विशाद न वाटूं देतां तिचें योग्य महत्त्व ओळखलें पाहिजे व तिचें रूपांतर हळूहळू सावधगिरीमध्यें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मुलास वाटत असणारी स्वाभाविक भीति दाबून टाकण्याऐवजीं ती बुद्धीच्या कह्यांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याकरितां मुलाच्या मनांत वसत असणारी स्वाभाविक भीति ही लज्जास्पद अगर बावळेपणाची गोष्ट आहे असें मानूं नये. जर तिला असें मानण्याकडे कल झाला तर ती दाबून टाकण्याकडे प्रवृत्ति होते व तिच्या ऐवजीं दुसरी प्रवृत्ति म्हणजे आडदांडपणाची प्रवृत्ति उत्पन्न होते. असें होणें मुलाच्या दृष्टीनें चांगलें नाहीं. कारण त्यामुळें पुढें त्या मुलाच्या जीवास अगर एखाद्या अवयवास इजा होण्याचा संभव असतो. उलटपक्षीं आपणांस बावळें समजण्यांत येऊं नये म्हणून त्याची भीति

वाटण्यासारख्या गोष्टी टाळण्याकडे प्रवृत्ति होऊन तें अधिकच भित्रें व असाहसी होण्याचा संभव असतो.

भयंकर परिस्थितीमध्यें स्वाभाविकच मनांत भीति उत्पन्न होते. व तिची आपणास प्रत्यक्ष जाणीव झाली अगर न झाली तरी ती मनांत उद्भूत होतेच. जर तिची आपणांस जाणीव झाली तर लागलीच आपली आत्मरक्षणाकडे प्रवृत्ति होऊन आपण प्रतिरोध, संरक्षण किंवा युद्ध करण्याचा मार्ग स्वीकारतों. जर मनांत भीति वसत असून ती दाबून टाकण्याचा प्रयत्न केला तर तिच्या ठिकाणीं दुसरी कोणती तरी भित्रेपणाची प्रवृत्ति उत्पन्न होते. आणि युद्ध वगैरेसारख्या परिस्थितीमध्यें दीर्घ काल भीति उत्पन्न होण्यासारखी स्थिति असल्यामुळें भीतीचें स्थान घेणाऱ्या इतर प्रवृत्तींचाहि जोर कमी होऊन त्या ठिकाणीं मज्जातंतूंचा विकार उत्पन्न होण्याचा संभव असतो. दुसऱ्या एखाद्या वेळीं जेव्हां एकदम भीति उत्पन्न होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न होते व ती भीति दाबून टाकण्याचा प्रयत्न होत असतो तेव्हां त्याच्या बाबतींत एकदम मुखस्तंभाची वृत्ति उत्पन्न होऊन त्याच्या हातून प्रतिरोधक क्रिया घडून येत नाहीं.

याचे उलट भीति वाटणें हें साहाजिक समजून ती आपल्या ताब्यांत ठेवण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन देणें अधिक चांगलें. तसेंच मुलानें एखाद्या बाबतींत धैर्य किंवा सावधगिरी दाखविल्यास त्याची प्रशंसा करीत जावी.

**भीतीचीं कारणें—**

मुलाच्या मनांत अपरिचित अशा वस्तु पाहून किंवा अपरिचित अशा प्रसंगामध्यें स्वाभाविकतः भीति उत्पन्न होते. ज्या वस्तूपासून त्यास भीति वाटते ते पदार्थ बहुधा त्याच्यापेक्षां अवजड असतात. तसेंच ते पदार्थ

बरेच मोठेहि असतात व ते त्यास अधिक सामर्थ्यवान् वाटतात. उदाहरणार्थ, एखादें रेल्वे इंजिन–[ विशेषतः तें जेव्हां मोठा आवाज करून वाफ सोडीत असतें ]– तसेंच उडणारी तोफ, उधळलेला घोडा, विलक्षण तऱ्हेचा पोषाख केलेलीं माणसें, वगैरे गोष्टी पाहिल्यास मुलाच्या मनांत साहजिकच भीति उत्पन्न होते. तसेंच मेघांचा गडगडाट होत असतां किंवा गर्दीमध्यें एकटेंच सांपडलें असतां, किंवा आग लागलेली पाहिली असतां मूल साहजिक भिऊन जातें.

**भीतीच्या मर्यादा—**

मुलास लहानपणीं दुःख किंवा इजा झाली असतांहि त्याच्या मनांत भीति उत्पन्न होते. जेव्हां जेव्हां मुलास भीति वाटेल त्या त्या वेळीं त्यास शांतपणें धीर देऊन त्या भीतीच्या योग्य मर्यादा त्यास समजावून द्याव्या. त्याचे बरोबर आपणांस भीति वाटत असेल तर ती गोष्टहि कबूल करून त्यास त्याचें कारण सांगावें. त्यामुळें त्या मुलास स्वतःबद्दल कमीपणा वाटणार नाहीं; किंवा आपण कमी धीट आहों असें त्याच्या मनांत येणार नाहीं. जेव्हां भीतीचें कारण खरेंच असेल तेव्हां त्याची मर्यादा कमी करून सांगत जाऊं नये. जोंपर्यंत आपण प्लॅटफॉर्मवर आहों तोंपर्यंत आपणांस रेल्वे इंजिनापासून इजा होण्याची मुळींच भीति नाहीं, परंतु आपण त्याच्यापुढें असून जर तें चालूं लागलें तर तें मात्र भीतिदायक आहे. या दोन स्थितींतील फरक मुलास नीट समजावून द्यावा. उधळलेल्या घोड्यापासून खरोखरच भय असतें तेव्हां त्यापासून दूर जाण्यास मुलास शिकविलें पाहिजे. पण असें दूर जातांना कसें तरी पळून न जातां दूर जाण्याची दिशा व गति हीं नीट विचारपूर्वक ठरवून मग दूर गेलें पाहिजे. मेघांच्या गडगडाटापासूनहि इजा होण्याचा संभव असतो.

पण तो फार क्वचित् व कांहीं विशिष्ट परिस्थितींतच असतो ही गोष्ट मुलास नीट समजावून द्यावी, विशेषतः मेघांच्या गडगडाटासंबंधानें सांगतांना तो एक परमेश्वरी कोपाचा प्रकार आहे असें कधींहि सांगूं नये, कारण तो तसा नसून केवळ एक विजेचा चमत्कार आहे. मूल एकटेंच गर्दी-मध्यें सांपडल्यास त्यास भीति वाटणें साहजिक आहे. जर आपणास मुलास घेऊन गर्दीतून जाण्याचा प्रसंग आला तर तें चुकल्यास त्यानें काय करावें हें त्यास आधींच सांगून ठेवावें. त्यास गर्दीतील मवाली लोक त्रास देत नाहींत असेंहि सांगूं नये किंवा गर्दीतील सर्वच लोक मवाली असतात अशीहि त्याची समजूत करून देऊं नये. कारण या दोन्हीहि गोष्टी पूर्णपणें खऱ्या नाहींत. याकरितां गर्दीपासून होणारा त्रास फार कमीहि करूं नये किंवा अतिशयोक्तीनेंहि सांगूं नये. तर त्याच्या ठिकाणीं अधिकाधिक सावधगिरी उत्पन्न होईल असा प्रयत्न करावा. जयें भीति असेल तेथून दूर जाणें हा मुलाच्या बाबतींतील संरक्षणाचा नियम समजावा.

## काळोखाची भीति—

मुलास एकटें असल्याशिवाय काळोखाची भीति वाटत नाहीं. जर तें घरांत एकटें असतांना त्यास काळोखाची भीति वाटत असेल तर असें समजावें कीं, लहानपणीं त्यास योग्य तऱ्हेनें वागविण्यांत आलें नाहीं. कारण अशा तऱ्हेची भीति वाटणें ही गोष्टच त्याच्या मनांतील स्वाभाविक प्रवृत्ति दाबून टाकल्याचें फळ असतें. अगदीं लहान मुलास प्रारंभापासूनच काळोखांत निजविण्याची पद्धत ठेवावी; म्हणजे पुढेंहि तें एकटें काळोखांत निजल्यास त्यास भीति वाटणार नाहीं. मूल काळोखांत एकटें असतांना जर दार लावलें असेल तर त्यास भीति वाटण्याचा संभव असतो. जर कांहीं कारणाकरितां दरवाजा बंद ठेवणें अवश्य

असेल तर तो बंदच ठेवावा. जर मुलास भीति वाटते असें दिसेल तर तो थोडा उघडा ठेवावा. त्यापेक्षां त्यास अधिक धीर देण्याची आवश्यकता असल्यास, त्यास कांहीं लागल्यास आपण अमुक ठिकाणीं बसलों आहों असें सांगावें; पण असें सांगतांना त्यास भीति वाटत असल्यास त्यानें हांक मारावी असें सांगूं नये, कारण असें सांगितल्यानेंच त्यास भीतीची सूचना मिळते, तर केवळ त्यानें हांक मारल्यासच आपण येऊं असें सांगावें; व त्यानें हांक मारल्याबरोबर मात्र आपण तावडतोब जावें. पुढें हळूहळू तो दरवाजा सहजगत्या कमी कमी उघडा ठेवीत जावें, मात्र तसें बोलून दाखवूं नये. मुलानें जर तो पुन: उघडला तर त्यास उघडूं द्यावा व त्यास भीति वाटत आहे हें मनांत समजावें. त्यास कसली भीति वाटते हें विचारावें व त्यास धीर द्यावा. याप्रमाणें हळूहळू प्रगति करीत जावी.

**वास्तविक भीति वाटणाऱ्या गोष्टी—**

लहान मुलास वास्तविक ज्यापासून भीति असते, परंतु त्यास स्वाभाविकपणें ज्या गोष्टीपासून प्रत्यक्ष भीति वाटत नाहीं, अशा गोष्टी म्हणजे विस्तव, दिवा वगैरे होत. त्याप्रमाणेंच चाकू, कात्र्या किंवा उंच जागेवरून पडणें वगैरेची भीति मुलास असते. परंतु सामान्यत: या सर्व गोष्टींबद्दल मूल स्वत:च अनुभव घेऊन शहाणें होत असतें.

कधीं कधीं लहान मुलास कांहीं किडे, पक्षी किंवा उंदीर वगैरेकडे पाहून भीति वाटते; किंवा पोलिसांची भीति वाटते.

किंवा सामान्यत: ज्या गोष्टीपासून भीति वाटणें साहजिक असतें त्याबद्दल सुद्धां मुलास वाजवीपेक्षां जास्त भीति वाटत असलेली दिसून येते. उदाहरणार्थ, साप किंवा मोठाले प्राणी किंवा भिल्ल,

रामोशी, ठाकूर, बैरागी, गोसावी, फकीर, जिप्सीसारखे लोक, डॉक्टर, परके लोक वगैरे यांबद्दल केवळ त्यांच्याकडे पाहूनच मुलांस भीति वाटत असते.

**काल्पनिक व खरी भीति—**

जरी अशा प्रकारची भीति ही त्यांच्या कल्पनांवर अवलंबून असते तरी ही भीति केवळ काल्पनिक नसते. ही सामान्य भीतीपेक्षां कांहीं निराळी नसून तीपासूनहि त्यांच्या मनास दुःख झाल्यावांचून राहात नाहीं. अशा तऱ्हेची कल्पनाजन्य भीति नेहमीं मोठ्या काळजीनें व कौशल्यानें आणि सहानुभूतीनें दूर केली पाहिजे. तिच्याकडे दुर्लक्ष केल्यानें किंवा तिच्यावद्दल चेष्टा केल्यानें किंवा धाक दाखवून ती कमी होत नाहीं. उलट मुलास कांहीं गोष्टींबद्दल नीट समजावून सांगून किंवा आपल्या स्वतःच्या उदाहरणानें अशा प्रकारची भीति त्यास घालवून देण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. अशा तऱ्हेची मज्जातंतुमूलक भीति ही अज्ञात कारणापासून उत्पन्न होत असते व तिच्यावर बुद्धीचा ताबा चालत नाहीं; आणि त्यामुळें कितीहि बुद्धिवाद केला तरी अशा प्रकारची भीति नाहींशी होत नाहीं. अशा तऱ्हेची भीति वाटत असली म्हणजे कोठें तरी मानसिक दोष आहे असें समजावें व हा दोष बहुधा एखादी स्वाभाविक प्रवृत्ति दडपून टाकल्यामुळें उत्पन्न होतो; व याबरोबर इतरहि कांहीं स्वभावांतील दोष त्या मुलामध्यें उत्पन्न झालेले आढळतात. अशा तऱ्हेच्या भीतीवर उपाय म्हटला म्हणजे त्या मुलास उत्तेजन देऊन व परिस्थितींत बदल करूनहि जर ही भीति कमी होत नसेल तर चांगल्या मानसशास्त्रज्ञाचा सल्ला घेणें हाच होय. वास्तविक असा दोष उत्पन्न होणार नाहीं याचीच काळजी घेतली पाहिजे. जर त्या मुलाचा स्वभाव नीट समजावून घेण्याचा प्रयत्न केला व त्याच्या ज्या

निश्चित प्रवृत्ती असतील त्यांस योग्य वाव दिला तर अशा तऱ्हेचे दोष उत्पन्नच होत नाहींत.

## झोंपेंत दचकणें—

अशा तऱ्हेचे दोष उत्पन्न होण्यापूर्वी मुलास रात्रीं झोंपेमध्यें दचकून उठण्याची संवय लागते व त्याच वेळीं काळजी घेतल्यास पुढें अशा प्रकारची भीति उत्पन्न होत नाहीं. जेव्हां मूल झोंपेंत दचकून उठूं लागेल तेव्हां आपण त्या भीतीचें कारण शोधून काढून त्यास भीति वाटत असलेली परिस्थिति बदलून त्याच्या मनांतील भीति काढून टाकली पाहिजे, म्हणजे पुढें त्याच्या मनांत कायमची धास्ती बसणार नाहीं.

## निर्बंधांचा स्वाभाविक प्रवृत्तींवर दाब—

सामान्यतः अशा प्रकारच्या भीतीचें कारण आईबाप मुलावर फार कठिण असे नैतिक निर्बंध लादतात हें होय. यामुळें मुलाच्या मनांत कांहीं स्वाभाविक प्रवृत्तींस वाव देणें म्हणजे पातक आहे अशी समजूत होते. अशी समजूत इतक्या लहान वयांत होणें चांगलें नसतें. मुलावर विशेष नैतिक निर्बंध किंवा ध्येयप्रवृत्ति लादण्याचा प्रयत्न करूं नये म्हणजे बहुधा त्याच्या ठिकाणीं अशा प्रकारच्या भीती फारशा निर्माण होणार नाहींत. यांचे परिणाम केव्हां केव्हां पुढील आयुष्यांत फार महत्त्वाचे व दीर्घकालीन होतात. सध्यांच्या दिवसांत कांहीं गोष्टींबद्दलची भीति बहुतेक प्रत्येक मुलाच्या मनांत उत्पन्न झालेली आढळून येते व ती पूर्णपणें नाहींशी करणें शक्य नसतें.

**भावनांवर आघात—**

केव्हां केव्हां मुलानें एखादा भयंकर प्रसंग पाहिला किंवा त्याच्याच बाबतींत एखादी भयंकर गोष्ट घडली म्हणजे त्याच्या भावनांस मोठा धक्का बसतो. उदाहरणार्थ, तें प्रवास करीत असलेल्या गाडीस अपघात झाला किंवा जवळपास मोठी आग लागली, एखाद्या गायबैलानें किंवा कुत्र्यानें वगैरे एखाद्यावर भयंकर झडप घातली किंवा प्रसंगीं एखाद्या मनुष्यानें कोणास इजा केली तर तेव्हां अशा प्रकारची भीति उत्पन्न होते. अशा वेळीं त्या मुलाला ज्या पद्धतीनें वागविण्यांत येतें त्यावर त्याचे मनावर त्यावेळीं किंवा पुढें होणारे परिणाम अवलंबून असतात.

**अपघातापासून भीति—**

उदाहरणार्थ, असा एखादा अपघात झाला असतां त्या मुलास जर खूपच भीति वाटत असेल तर त्याच्या तोंडावर फिकटपणा येईल, त्याची नाडी जोरानें चालूं लागेल व श्वासोच्छ्वास जड वाटूं लागेल. त्याचे हातपाय किंवा सर्व अंग गार पडेल. तें दमेपर्यंत ओरडूं लागेल. अशा वेळीं त्यास निजवून ठेवावें. कदाचित् झोंपेंतहि तें दचकून उठेल व जागें झाल्यावरहि ओरडत राहील. अशा वेळीं त्यास गरम कपड्यांत गुंडाळून ठेवून त्याच्या हातापायांस चोळून ऊब आणावी. जर तें तुम्हांस चिकटून राहात असेल तर त्यास आपल्या हातांत घ्यावें. तसें नसेल तर त्यास नीट निजवून ठेवावें. त्याच्याजवळ स्वतः बसून राहावें, परंतु बाकीच्या सर्व लोकांस विशेषतः ज्यांच्या भावना विशेष जागृत होऊन तीं रडूं वगैरे लागतात अशा लोकांस खोलींतून बाहेर पाठवून द्यावें. मुलास आवळून धरूं नये, किंवा कोणत्याहि प्रकारें भीतीचें अथवा दुःखाचें प्रदर्शन करूं नये. हळूहळू

त्याचें डोकें थापटून त्यास कांहीं इजा झाली नसून तें सुरक्षित आहे असें सांगावें. म्हणजे तें ओरडावयाचें बंद होऊन झोंपी जाईल. जर तें झोंपेंतून उठून पुनः ओरडूं लागेल तर त्यास पुनः थापटून निजविण्याचा प्रयत्न करावा व जरूर तर त्यास झोंपेचें औषध द्यावें. त्याच्या मनांतील भीति कमी झाली म्हणजे तें तुमच्याजवळ काय झालें तें सांगूं लागेल. तसें त्यानें सांगितलें नाहीं तर त्यास एकदोन दिवसांत विचारून घ्यावें.

**अशी भीति घालविण्याचा उपाय—**

जर त्यास विशेष भीति न वाटून तें आपला अनुभव स्वतःच सांगूं लागेल तर तसें करण्यास त्यास उत्तेजन द्यावें. ती गोष्ट मुलानें विसरून जावी असा प्रयत्न कधींहि करूं नये. त्याला प्रश्न विचारून सर्व हकीकत नीट समाजावून घ्यावी व पुनः पुनः त्या गोष्टीबद्दल चर्चा करून त्या गोष्टीबद्दलची भीति घालवून टाकावी. अशा प्रसंगांत जर त्यानें धैर्य किंवा समयसूचकता दाखविली असेल तर त्याबद्दल त्याची प्रशंसा करावी व ती गोष्ट दुसऱ्यासहि त्याला ऐकूं जाईल अशा पद्धतीनें सांगावी. त्या गोष्टीबद्दलची स्पष्ट माहिती मुलास द्यावी. जर भीतीचें कांहीं कारण नसेल तर त्याच्या मनांतील सर्व भीति गेल्यावर त्यास तसें स्पष्ट सांगावें. अशा प्रसंगामध्यें जर कांहीं भीतिप्रद गोष्ट असेल तर त्यांतील धोक्याची त्या मुलास पूर्ण कल्पना द्यावी व अशा प्रसंगीं तें वागलें त्यापेक्षां दुसरा चांगला मार्ग असल्यास त्यास तो नीट समजावून सांगावा. अशा गोष्टी पुनः घडणें स्वाभाविक असल्यास त्या मुलास असें पुनः होणार नाहीं असें सांगूं नये. त्याच्या वागणुकीवर कोणतेहि निर्बंध घालूं नयेत. युद्धाच्या वेळीं जी मुलांस भीति वाटते त्यावेळीं अशाच तऱ्हेचे उपाय योज-

ण्यांत येतात व त्यामुळें मुलाच्या मनांत ज्या सुप्त अशा कल्पना असतात त्यांस धक्का न बसतां त्या मुलावर इष्ट तो परिणाम घडून येतो असें दिसून येतें.

त्या मुलास जर अशा गोष्टी पुनः स्वप्नांत दिसतील, तर तसें आपणांस सांगण्यास सांगावें व अशा रीतीनें त्याजपासून सर्व बारीक सारीक गोष्टी काढून घेऊन त्याच्या मनांतील अशा प्रसंगाबद्दलची भीति कमी करून टाकावी.

दुःख—

धोक्यापासून दूर राहण्याची जी सामान्य प्रवृत्ति असते तिला कारण दुःख हें असतें. दुःख झाल्यास आपणांस वाईट वाटतें; व दुःख होण्याची भीति वाटत असते म्हणून आपण धोक्यापासून नेहमीं दूर राहण्याचा प्रयत्न करीत असतों. मुलास केव्हां केव्हां भाजणें, कापणें किंवा खरचटणें यांपासून इजा होण्याचा संभव असतो. पण या गोष्टी अगदीं स्वाभाविक असून त्यांचा अनुभव मुलास आलाच पाहिजे असें आईबापांनीं धरून चालावयास हरकत नाहीं व अशा किरकोळ अपघातांची मुलांस संवय झाली म्हणजे त्यांच्याबद्दलचा मुलांच्या मनांतील बाऊ आपोआप कमी होऊन तीं अधिकाधिक धीट होऊं लागतात.

**दुःखाची जाणीव अवश्य आहे—**

दुःखाची जाणीव ही गोष्टहि महत्त्वाची आहे. कारण तीमुळें मनुष्य अधिकाधिक सावधगिरी बाळगण्यास शिकतो व कांहीं गोष्टींत कौशल्य वापरण्यास शिकतो. याकरितां सामान्यतः मुलास दुःखाचा अनुभव येत असेल तर त्यास प्रतिबंध करूं नये, कारण तसा पूर्ण प्रतिबंध

करणें तुम्हांला शक्य होणार नाहीं; व तसा प्रयत्न करीत असतां त्या मुलाच्या अनेक हालचालींवर तुम्ही नियंत्रण मात्र उत्पन्न कराल व त्यामुळें तें मूल भित्रें, असाहसी व नालायक बनेल. मुलास विशेष इजा वगैरे होऊन दुःख होणार नाहीं याबद्दल काळजी घेत जावी व थोडीफार इजा झाल्यास तिचा परिणाम वाईट होणार नाहीं अशी काळजी घेत जावी.

## अपघातांत सहानुभूति—

एखाद्या मुलानें हातपाय भाजून घेतला किंवा कापून घेतला किंवा त्यास पडून वगैरे इजा झाली तर त्यास योग्य ती सहानुभूति दाखवावी. ती इजा लवकरच बरी होईल असें सांगून त्यावर पट्टी वगैरे बांधण्याची तजवीज करावी. रक्त किंवा दुसऱ्यास झालेली इजा पाहून तुमच्या मनावर जर वाईट परिणाम होण्याची तुम्हांला संवय असेल तर त्याबद्दल योग्य ती काळजी प्रथम घेतली पाहिजे. एकदम भीतीचें चिन्ह दाखवूं नये किंवा बेशुद्ध होणें किंवा रडणें या गोष्टी करूं नयेत; विशेष दुःखाचें प्रदर्शन करूं नये; व आपल्या मुलास थोडक्यांतच अनुभव मिळाला याबद्दल आपणास आनंदच वाटला पाहिजे, त्याबद्दल फारसें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. कारण अशा गोष्टी केव्हां तरी घडून यावयाच्याच. जर एखादें मूल अशा ठिकाणीं चढण्याचा प्रयत्न करीत असेल कीं जेथून पडल्यास फारशी इजा होणार नाहीं तर अशा ठिकाणीं त्यास खुशाल चढूं द्यावें व तें चढून पडलें तरी त्याकडे विशेष लक्ष देऊं नये. मात्र त्यास सावधगिरी बाळगण्यास सांगावें. एखादे वेळीं पडून त्यास लागलें म्हणजे तें आपोआपच सावधगिरी बाळगूं लागेल.

## उंचावर चढण—

पांच वर्षांच्या आंतील मूल सामान्यतः जेथून पडल्यास विशेष इजा होईल अशा ठिकाणीं सहसा चढून जात नाहीं. जर तें असें चढून गेल्याचें दिसलें किंवा चढण्याचा प्रयत्न करतांना आढळलें तर प्रथम त्याच्यावर केवळ लक्ष ठेवण्यांत यावें; त्यास चढण्यास प्रतिबंध करूं नये किंवा त्यास एकदम खालीं ओढूं नये. जर तें विशेष उंच व भयप्रद ठिकाणीं चढण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यास पुढें न जाण्यास सांगावें. आणि जर तें तरीसुद्धां जाण्याचा प्रयत्न करूं लागेल तर त्यास आपला हात पोंचत असल्यास एकदम खालीं उत-रवावें, व हात पोंचत नसल्यास शिक्षा करण्याचा धाक घालावा आणि त्यानें ऐकलें नाहीं तर शिक्षा करावी. जर तें मूल तुमचा हात पुरणार नाहीं अशा उंच ठिकाणीं आधींच जाऊन चढून बसलें असेल व त्यास तेथें भीति वाटत नसेल व तेथून तें पडण्याचा संभव नसेल तर त्यास तसेंच राहूं द्यावें; पण खालीं उतरण्यास सांगावें. जर आप-णास मध्यें उभें राहून तें पडत असल्यास झेलतां येत असेल तर तसें करावें. पण या सर्व गोष्टी सहजगत्या कराव्या. त्यांचा फार मोठा बाऊ किंवा गाजावाजा करूं नये. विशेषतः तें वर असेपर्यंत त्यास मुळींसुद्धां भीति दाखविण्यांत येऊं नये व खालीं आल्यावर त्यास सावध राहण्यास सुचवावें.

## चाकू वगैरे हत्यारें वापरणें—

मुलास जर चाकू वापरावा अशी इच्छा झाली तर त्यास तो वापरूं देण्यास हरकत नाहीं. मात्र त्याच्या हातीं अशा आकाराचा व बोथट धारेचा चाकू द्यावा कीं त्यामुळें त्यास सहसा इजा होणार

नाहीं. तो चाकू कसा धरावा व चाकूच्या धारेची बाजू आपणांपासून दूर कशी ठेवावी हें त्यास दाखवून द्यावें. जेव्हां त्याचा अनुभव व कौशल्य वाढेल तेव्हां त्यास यापेक्षां बरा चाकू देण्यास हरकत नाहीं. कौशल्य येण्याकरितां एखाद्या वेळीं हात वगैरे कापला तरी त्याबद्दल विषाद वाटण्याचें कारण नाहीं. मात्र त्याबद्दलची ओरड फारशी करण्यांत अर्थ नाहीं.

## विस्तवाबद्दल जिज्ञासा—

तसेंच मुलास विस्तवासंबंधीं जिज्ञासा उत्पन्न झाली व तो कसा पेटवावा हें त्यास पाहावें असें वाटलें तर त्यास विस्तव कसा पेटवितात हें दाखवावें. त्यास काडी कशी धरतात व ती ओढून कशी पेटवितात हें दाखवून देऊन त्यास काडी ओढून पेटविण्यास सांगावें. तसेंच त्यास एखादी मेणबत्ती किंवा दिवा वगैरे लावून पुनः विझविण्यास सांगावें. तसेंच विस्तवहि पेटविण्यास सांगण्यास हरकत नाहीं. या कामीं एखाद्या वेळीं त्याचा हात वगैरे भाजला तरी तिकडे लक्ष देऊं नये. मात्र त्यास केव्हांहि फार इजा होणार नाहीं एवढी काळजी घ्यावी. थोडीफार इजा होऊनच मनुष्य सावधगिरीनें वागण्यास शिकतो. मुलास विस्तव कसा पेटवावा व तो इकडे तिकडे कसा जाऊं देऊं नये या गोष्टीची संवय झाली पाहिजे. एखाद्या वेळेस बोटें भाजलीं म्हणजे त्यास आपोआपच विस्तवाची जरब थोडीफार बसेल. तें मूल केव्हांहि भलत्याच ठिकाणीं विस्तव पेटविणार नाहीं व तो इकडे तिकडे जाऊं देणार नाहीं याबद्दल मात्र काळजी घेऊन त्यास ताकीदहि दिली पाहिजे.

## इष्ट मनोविकारांस उत्तेजन—

मुलांच्या मनोविकारांस इष्ट तें वळण देतांना पुढील गोष्टींकडे लक्ष देणें अवश्य आहे. मुलांमध्यें कांहीं परस्परविरुद्ध अशा विकारांची खळबळ चालू असते. त्यांपैकीं इष्ट अशा विकारांस उत्तेजन देऊन अनिष्ट विकार दाबून टाकणें अवश्य असतें. असें केल्यास मुलाची मानसिक प्रगति समाधानकारक रीतीनें व्हावयास अडचण पडणार नाहीं. उदाहरणार्थ, धैर्य आणि भीति या परस्परविरुद्ध विकारांपैकीं पहिल्या विकारास उत्तेजन दिल्यास दुसरा आपोआपच मागें पडेल. भीति हा एक अज्ञानाचाच भाग आहे. तसेंच मूल एखाद्या गोष्टीची उदाहरणार्थ, राग, निष्ठुरता, शिक्षा वगैरेची भीति टाळण्याकरितांच असत्य भाषण करण्याचें मनांत आणतें. परंतु त्यास धीर दिल्यास तें तसें करणार नाहीं. याकरितां धैर्याची वाढ करणें म्हणजेच भीतीपासून मुक्तता करणें होय. याप्रमाणेंच उत्साह आणि उदासीनता ही परस्परविरुद्ध जोडी आहे. मुलाच्या मनांत उत्सुकता, साहस, आकांक्षा वगैरे उत्पन्न व्हावीं अशी इच्छा असल्यास त्याच्या मनांतील संशय, अंदेशा, आळस हीं दूर केलीं पाहिजेत. त्याप्रमाणेंच ज्ञान व अज्ञान ही परस्परविरुद्ध जोडी आहे. मुलाची विधायक कार्याकडे प्रवृत्ति व्हावयाची असल्यास त्यास अज्ञानापासून सोडवून विशिष्ट गोष्टींचें ज्ञान प्राप्त करून देणें अवश्य आहे. त्याप्रमाणेंच मुलाची अजागळपणाकडे किंवा अडाणी-पणाकडे प्रवृत्ति होऊं नये असें वाटत असल्यास त्याविरुद्ध सभ्यता, नीटनेटकेपणा वगैरे गोष्टींकडे त्याचें मन वळविलें पाहिजे. त्यास कार्य-प्रवृत्त करावयाचें असल्यास त्याच्या ठिकाणचें औदासिन्य घालविलें पाहिजे. तसेंच त्याच्या ठिकाणीं नम्रता उत्पन्न व्हावी असें वाटत असल्यास त्यास उद्धटपणा व गर्विष्ठपणापासून दूर ठेविलें पाहिजे. अशा

रीतीनें जे परस्पर विरुद्ध मनोविकार मुलाच्या मनांत खळबळ करीत असतील त्यांतील योग्य विकारांस उत्तेजन देऊन अनिष्ट विकारांपासून त्यास दूर ठेविलें पाहिजे.

**मुलामध्यें अवश्य गुण—**

मुलामध्यें सामान्यतः पुढील गुणांची वाढ लहानपणापासूनच झाली पाहिजे.

( १ ) स्वाभाविकता– या गुणाचा विकास होऊन मनुष्यानें कृत्रिमतेपासून दूर राहण्यास शिकलें पाहिजे. ही स्वाभाविकता मुलाच्या आयुष्यामध्यें साधेपणांत दृग्गोचर झाली पाहिजे. उदाहरणार्थ, त्याचें अन्न, झोंप घेण्याची पद्धति, विश्रांतीचे प्रकार व त्याच्या संवयी या सर्व अगदीं साध्या वृत्तीवर अवलंबून असल्या पाहिजेत. साधेपणा हीच स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें तीच योग्य प्रवृत्ति होय.

( २ ) तत्परता– मनुष्यानें नेहमीं जागृत असून जरूर पडेल तेव्हां कोणतेंहि कर्तव्य पार पाडण्यास तत्पर असलें पाहिजे व याकरितां त्याच्या शारीरिक वृत्ती नेहमीं उत्तेजित व त्याच्या पूर्णपणें कह्यांत असल्या पाहिजेत.

( ३ ) चपळता– मनुष्यानें आळस किंवा निरुद्योगीपणा यांस थारा न देतां आपल्या शरीराचे ठिकाणीं उद्योगप्रवृत्ति विशेषेंकरून संवर्धित केली पाहिजे.

४ ) सहनशीलता– हा गुणहि कोणतेंहि श्रमाचें अथवा दगदगीचें काम करण्याच्या बाबतींत अवश्य आहे. याकरितां वेळप्रसंग पडला असतां आपल्या शरीरावर कितीहि ताण पडला तरी तो सोसण्याची

व आपलें ध्येय चिकाटीनें गांठण्याची प्रवृत्ति प्रत्येकाचे ठिकाणीं संवर्धित होणें अवश्य आहे.

(५) शुचिता– प्रत्येकाचें मन व शरीर हें शुद्ध व स्वच्छ असलें पाहिजे. याकरितां त्यानें शुद्ध व स्वच्छ अन्न खाणें आणि व्यायाम, निद्रा व विश्रांति वगैरे बाबतींत योग्य ती काळजी घेणें आणि चांगल्या संवयी व कृति करण्याकडे लक्ष ठेवणें अवश्य आहे. या बाबतींत योग्य काम करीत असतां हस्तव्यवसायावर अंतःकरण व बुद्धि यांची वाढ अवलंबून असून उलट अंतःकरण व बुद्धीवर हस्तकौशल्य अवलंबून आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. याप्रमाणें शारीरिक प्रवृत्तीं-वर मनुष्याचा भविष्यकाळ अवलंबून आहे ही गोष्ट विचारांत घेणें अवश्य आहे.

---

## प्रकरण सतरावें

# गृहपरिस्थितीचा मुलांवर होणारा परिणाम

### गत आयुष्याचा पुढील आयुष्याशीं संबंध—

सामान्यतः मनुष्याचें मानसिक जीवन हें सव आयुष्यभर एका विशिष्ट दिशेनें परिणत होत असतें. त्याच्या मनाची वाढ एकसारखी विशिष्ट दिशेनें व गतीनें चाललेली असते. तीमध्यें एकदम महत्त्वाचे बदल घडून येत नाहींत. मनुष्याची वर्तमानकालीन व भविष्यकालीन वागणूक ही त्याच्या गत आयुष्यांतील वागणुकीवरूनच बनलेली असते. याचा अर्थ मनुष्याची सर्व वाढ केवळ त्याच्या आनुवंशिकतेवर अवलंबून असते असें नव्हे, परंतु त्याच्या गत आयुष्याचा पुढील आयुष्याशीं संबंध असतो, एवढें मात्र निश्चित. यामुळें मनुष्याचा विशिष्ट तऱ्हेचा स्वभाव बनणें ही गोष्टहि त्याच्या गत आयुष्यांतील कांहीं गोष्टींवर अवलंबून असते. एखादा मनुष्य एखाद्या नवीन परिस्थितींत एकदम आला असतां त्याचा मूळ स्वभाव चटकन् बाहेर पडतो, व तो त्याच्या गत आयुष्यांतील परिस्थितीवरून बनलेला असतो.

मुलांच्या बाबतींत मुलें शाळेंत प्रथम जाऊं लागलीं किंवा त्यांच्या घरची परिस्थिति एकदम बदलली म्हणजे त्यांचा खरा स्वभाव दिसून येतो. उदाहरणार्थ, एखाद्या मुलास आपल्या नातेवाइकाच्या घरीं राहावें लागलें म्हणजे लहानपणीं ज्या परिस्थितींत तो वाढला असेल तिचा त्याच्या सर्व आयुष्यावर परिणाम

होतो. तसेंच सावत्र मुलांचे बाबतींत त्यांच्या घरांतील वागणुकीचे त्यांच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहींत. त्याप्रमाणेंच कांहीं मुलें शिक्षक किंवा समोर दिसणारीं मोठीं माणसें यांचें अनुकरण करण्याच्या दृष्टीनें कांहीं गोष्टी करूं लागतात, त्याचाहि त्यांच्या स्वभावावर परिणाम होतो. स्त्री आणि पुरुषविषयक भेदाचाहि मुलांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. मुलींमध्यें वाढलेला मुलगा किंवा मुलांमध्यें वाढलेली एकच मुलगी यांच्या बाबतींत हे परिणाम विशेष स्पष्टपणें दिसून येतात. सामान्यतः बहिणीपेक्षां भाऊ आपण वरचढ आहों असें दाखवितो. हळव्या प्रकृतीच्या मुलास बायकी समजण्यांत येतें. तसेंच विशेष आत्मविश्वासानें किंवा धिटाईनें वागणाऱ्या मुलीस पुरुषी समजण्यांत येतें. वास्तविक हे गुण स्वाभाविक नसून केवळ परिस्थितीमुळें उत्पन्न झालेले असतात, परंतु या लहानपणच्या गोष्टींचाच त्यांच्या पुढील सर्व आयुष्यावर परिणाम झालेला दिसतो व या गोष्टींस आरंभ अगदीं बाल्यावस्थेपासून होतो. अगदीं लहान मुलास घरांत ज्या पद्धतीनें वागविण्यांत आलेलें असेल व तें थोडेंसें मोठें झाल्यावर ज्या परिस्थितींत त्याचें बालपण गेलेलें असेल त्या मानानें त्याच्या मनावर घडलेले संस्कार त्याच्या पुढील आयुष्यावर परिणाम करतात. याकरितां अगदीं बाल्यावस्थेपासून मुलाच्या संगोपनाकडे या दृष्टीनें पाहणें अवश्य आहे.

**लहान मुलाचें कौतुक—**

पुष्कळदां लहान मुलास खेळणें म्हणून समजण्यांत येतें. आणि त्या मुलास काय होईल याच्याकडे दुर्लक्ष करून मोठीं माणसें आपणांस आवडेल तसें वागवितात. ज्यावेळीं मुलास न्हाऊं घालावयाचें असेल किंवा जेवूं घालावयाचें असेल त्याखेरीज त्यास

नेहमीं त्याच्या पलंगावर किंवा हातगाडीमध्यें उघड्यावर ठेवण्यांत यावें. त्यास नेहमीं हातांत घेऊन नाचवूं नये, तसेंच परस्परांनीं एकमेकांकडे हातांतून घेण्यादेण्याचें करूं नये. तसेंच त्याचे अतिशय लाड करून एकसारखे मुके घेण्यांत येतात तसें करूं नये.

मुलास झोंप येण्याकरितां घेऊन फेऱ्या घालतात किंवा पाळण्यांत घालून झोंके देतात, किंवा आंदुळतात तसें करणेंहि ठीक नव्हे. जर त्यास झोंप येत नसेल तर ती न येण्याचें कारण शोधून काढून तें दूर करावें. मुलास कित्येक वेळां वर उडवून झेलतात किंवा वाटोळें फिरवितात तसें करूं नये. असें करण्यानें त्यास इजा होण्याचा संभव असतो व केव्हां केव्हां त्याच्या मनास धक्का बसण्याचा संभव असतो व त्याचा परिणाम अनिष्ट होण्याचाहि संभव असतो. मूल चालूं लागलें म्हणजे त्यास केव्हां केव्हां आधार द्यावा लागतो. पण चालतांना तें मधून मधून पडलें तरी त्याबद्दल फिकीर करूं नये. एकदोनदां पडल्यावर त्यास आपला तोल संभाळण्याचें कळूं लागतें. त्यास वाजवीपेक्षां जास्त मदत केली तर तें भित्रें आणि परावलंबी होतें.

## अस्थिमार्दव व त्यावर उपाय—

मूल एक वर्षाचें होऊनहि चालूं लागलें नाहीं तर त्यास कांहीं तरी रोग झाला आहे असें समजावें. कदाचित् त्यास रिकेट्स् किंवा अस्थिमार्दवरोग झाला असण्याचा संभव असतो; किंवा त्याच्या डोक्यास घाम येत असेल, तें रडत असेल, अगर त्यास अपचन होत असेल तर हाच रोग आहे असें समजावें. याकरितां त्यास निराळ्या प्रकारचें अन्न देऊन मोकळ्या हवेंत व उन्हांत अधिक वेळ ठेवावें. हा रोग जरूर त्या पोषक अगर औजस-

द्रव्यांचा ( व्हिटॅमिन्सचा ) अभाव दाखवितो. मूल तिरवें पाहात असेल तर तिकडेहि दुर्लक्ष करूं नये. विशेषतः तिरवें पाहण्याच्या वेळीं जर त्यास ताप येत असेल किंवा डोक्यांत कळ वगैरे येत असेल तर त्यास कांहीं तरी मज्जातंतूचा विकार झाला आहे असें समजावें. अशा तऱ्हेचा रोग नसल्यास त्यास योग्य डॉक्टरकडून ताबडतोब चष्मा आणून द्यावा. मूल चालूं लागल्याबरोबर त्याच्या पायांत कांहीं दोष असल्यास तो कळून येईल. जर त्याचे दोन्ही पाय बरोबर टेकत नसतील किंवा तें वांकडें उभें राहात असेल तर लागलीच त्याची डॉक्टरकडून तपासणी करून घ्यावी व त्याच स्थितींत राहून हाडास वांकडें वळण लागण्याची संधि देऊं नये.

**लहान मुलाचे लाड—**

मूल लहानपणीं अशक्त असून किंवा त्यास रिकेट्स् झालीं असतां त्यांतून बरीं झाल्यानंतरहि कांहीं मुलें आपल्या शरीराच्या हालचाली सरळ न करतां बेढब रीतीनें करतांना आढळतात. अशा वेळीं तीं बरीं झाल्यावरहि त्यांचे वाजवीपेक्षां अधिक लाड केले जात असले पाहिजेत असें वाटतें. अशा वेळीं आईनें आजारीपणांत मुलाची काळजी घेणें योग्य असलें तरी त्यानंतर त्याचें स्वातंत्र्य नष्ट करणें चांगलें नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे.

अशा वेळीं त्या मुलानें आजारीपणांत विशेष त्रास दिला असेल तर आईनें त्याचे पुढेंहि लाड करणें साहजिक असतें. अशा वेळीं त्या मुलाचा स्वभाव हट्टी बनून आपल्या आईस त्रास देण्यासाठीं निरनिराळ्या युक्त्या एकामागून एक तें मूल शोधीत असतें. अशा मुलांस शिक्षा करूनहि कांहीं उपयोग होत नाहीं व जों जों शिक्षा करावी तों तों तीं अधिकच कोडगीं बनत जातात.

## मुलाच्या स्वतःबद्दलच्या कल्पना—

मुलाच्या वाढीवर त्याच्या वास्तविक सामर्थ्याचा जितका उपयोग होतो किंवा परिस्थितीचा परिणाम होतो त्यापेक्षां तें ज्या मानानें या गोष्टींस महत्त्व देतें त्याचा जास्त होतो. एखाद्या मुलाच्या बाबतींत त्याच्या नैसर्गिक शक्ति किंवा त्याबद्दलच्या मोठ्या माणसांच्या कल्पना यापेक्षां त्या मुलाची स्वतःच्या परिस्थितीसंबंधीं जाणीव व कल्पना याच जास्त महत्त्वाचा परिणाम घडवून आणतात; व या कल्पना जर चुकीच्या असतील तर त्यांचा अनिष्ट परिणाम त्याच्या वाढीवर झाल्याशिवाय राहात नाहीं. या त्याच्या चुकीच्या कल्पना दुरुस्त करणें हेंच शिक्षणाचें काम आहे; कारण मुलाच्या नैसर्गिक प्रवृत्ती दुरुस्त करणें अशक्य असतें, परंतु या त्याच्या स्वतःबद्दलच्या चुकीच्या समजुतींमध्यें मात्र फरक घडवून आणतां येतो.

निरोगी शरीरांत निरोगी मन असतें ही म्हण जरी खरी असली तरी रोगी शरीरांतहि निरोगी मन असण्याचा अनेकदां संभव असतो. उलट मूल निरोगी असूनहि जर परिस्थितीमुळें त्याच्या मनांत आपल्या सामर्थ्याबद्दल चुकीच्या कल्पना ठसल्या तर तें मनानें निरोगी राहणार नाहीं. कोणत्याहि एका कामांत मुलास अपयश आल्यास त्याला आपण अपात्र आहों असें वाटूं लागतें. कारण अशीं मुलें बहुधा अतिशय विकारक्षम अथवा भावनावश असतात; व कोणतीहि अडचण आली असतां त्यांस आपण असमर्थ आहों असें वाटूं लागतें.

## उशीरानें बोलणें किंवा चालणें—

कांहीं मुलें फार उशीरानें बोलूं लागतात. वास्तविक बोलणें आणि

चालणें या दोनहि गोष्टी मुलास बरोबरच येतात. या दोन गोष्टींचा वास्तविक परस्परांशीं संबंध नाहीं. परंतु ज्या पद्धतीनें मुलास वाढविण्यांत येतें त्या पद्धतीवर व कौटुंबिक परिस्थितीवर या गोष्टी अवलंबून असतात. कांहीं मुलांस केवळ बोलावयास मदत न केल्यामुळें तीं उशीरां बोलूं लागतात. वास्तविक जें मूल बहिरें नाहीं त्यास लहानपणींच बोलावयास येऊं लागतें. कांहीं मुलांस बोलण्याचा प्रसंगच येऊं न दिल्यामुळें तीं उशीरां बोलूं लागतात. परंतु एकदां तीं बोलूं लागल्यावर इतकीं जलद बोलूं लागतात कीं, कधीं कधीं त्यांच्यांतूनच उत्तम वक्ते निर्माण होतात.

तसेंच जीं मुलें बहिरीं व मुकीं असतात त्यांसहि शिक्षण दिल्यास तीं बोलूं लागतात. कारण पूर्णपणें बहिरेपणा क्वचितच आढळून येतो. मुलाला ऐकूं येणें कितीहि कठिण असलें तरी हळू हळू त्याची श्रवणशक्ति वाढवितां येते.

## मुलास लळा कोणाचा लागतो—

एखादें मूल विशेषतः घरांतील कोणत्या माणसाबद्दल विशेष आपलेपणा दाखवितें तें पाहणेंहि महत्त्वाचें आहे. सामान्यतः बहुतेक मुलें आईलाच जास्त चिकटून असतात; परंतु जेव्हां एखादें मूल आईपेक्षांहि इतर मनुष्याशीं जास्त लगट करीत असेल तेव्हां त्या गोष्टीची नीट चौकशी केली पाहिजे. विशेषतः घरांतील आजोबा व आजी हीं मुलांस विशेष लळा लावण्याचा विशेष प्रयत्न करतात. कारण वृद्ध माणसांस स्वतःबद्दलचा आत्मविश्वास कमी कमी होत जातो व आपण दिवसेंदिवस निरुपयोगी होत चाललों आहों असें त्यांस वाटूं लागतें. यामुळें तीं लहान मुलास कोणतीहि मागतील ती वस्तु देऊन

त्यांचा हट्ट पुरविण्याचा प्रयत्न करतात व केव्हां केव्हां त्यास बिघडविण्यासहि कारण होतात.

**मुलाच्या बुद्धीची वाढ—**

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मुलाच्या बुद्धीची वाढ ही होय. सामान्यतः बुद्धीची वाढ ही कौटुंबिक परिस्थितीवर अवलंबून असते. सुस्थितींत असलेल्या कुटुंबांत मुलास अधिक मदत करतां येते. तसेंच ज्या मुलांची शारीरिक वाढ चांगली झालेली असते अशा मुलांची मानसिक वाढहि चांगली होते. आणि ज्या मुलांची मानसिक वाढ विशेष अडथळा उत्पन्न न होतां होते तीं मुलें चांगल्या प्रतीचें काम करण्यास लायक होतात; व ज्यांची वाढ होण्यास अधिक काळ लागतो त्यांस हलक्या दर्जाचें काम करावें लागतें. सामान्यतः ज्या ठिकाणीं कांहीं मुलांकरितां विशेष वर्ग भराविण्याची पद्धत आहे अशा वर्गांत गरीब कुटुंबांतील मुलें आढळून येतात. यावरून गरीब स्थितींतील मुलांस जर योग्य परिस्थिति प्राप्त झाली तर तीं सुस्थितींतील मुलांशीं सहज स्पर्धा करूं शकतील असें दिसून येतें. दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न मुलांच्या बाबतींत हा पाहावयाचा असतो कीं, मुलास कधीं उपहास करून किंवा त्रास देऊन निरुत्साही करण्यांत आलेलें असतें काय? कांहीं मुलें अशा तऱ्हेच्या वागणुकीस दाद देत नाहींत किंवा सहन करूं शकतात. परंतु कांहीं मुलें त्यामुळें निरुत्साही बनतात व उपयुक्त गोष्टीकडे लक्ष देण्याचें सोडून देऊन वरवर दिखाऊ गोष्टीकडे अधिक अधिक लक्ष देऊं लागतात. अशा वेळीं अशा मुलांमध्यें आत्मविश्वास कमी आहे असें समजावें. कांहीं मुलें नेहमीं इतर मुलांशीं भांडण करतांना आढळतात. अशा वेळीं त्यांना मनांतून असें वाटत असतें कीं, आपण आधीं भांडण केलें नाहीं तर दुसरीं मुलें

आपणावर प्रथम हल्ला करतील. अशीं मुलें बहुतेक आज्ञाधारक नसतात. आज्ञा मानणें हें त्यांना एकप्रकारें कमीपणाचें वाटतें. तीं उलटून बोलूं लागतात. तीं फारशा तक्रारी करीत नाहींत. कारण दुसऱ्याची सहानुभूति मिळविणें त्यांना कमीपणाचें वाटतें. तीं बहुधा इतरांसमक्ष रडत नाहींत. कारण रडणें हा त्यांस भित्रेपणा वाटतो. अशीं मुलें बहुधा घाणेरडीं, स्वतःबद्दल निष्काळजी व हट्टी असतात. अशा मुलांस योग्य उत्तेजन देऊन त्यांच्या मनांतील भीति घालविली पाहिजे.

## अनौरस मुलें—

अनौरस मुलांच्या बाबतींत फारच चमत्कारिक परिस्थिति असते. वास्तविक मुलांचा त्या बाबतींत कांहीं दोष नसून त्यांनाच या परिस्थितीचे परिणाम भोगावे लागतात. सर्व समाजाकडून त्यांचा तिरस्कार केला जातो. यामुळें तीं सर्व जगाचा द्वेष करूं लागतात. प्रत्येक भाषेमध्यें त्यांच्याबद्दल अपशब्द वापरण्यांत येतात. यामुळेंच बेवारसी मुलें व अनौरस मुलें यांतून बरेचसे गुन्हेगार निपजतात. वास्तविक हे दोष त्यांच्यामध्यें आनुवंशिकतेनें वास करीत नसतात, परंतु परिस्थितीमुळें उत्पन्न होतात.

याकरितां कोणत्याहि मुलाची वागणूक आपणांस निराळी किंवा तऱ्हेवाईक दिसूं लागल्यास ती तशी केव्हांपासून दिसूं लागली व त्याच्यापूर्वींची परिस्थिति कशा प्रकारची होती या गोष्टींचा नीट विचार करून त्यांच्या मागचें योग्य कारण शोधून काढून मुलाच्या परिस्थितींत अवश्य तो फेरफार केला तर त्याची वर्तणूक सुधारण्याचा संभव असतो.

## मुलाच्या परिस्थितीचें ज्ञान शिक्षकास अवश्य—

आईबाप किंवा इतर नातेवाईक यांपेक्षांहि शिक्षकास प्रत्येक मुलाच्या बाबतींत त्याची कौटुंबिक परिस्थिति कशी आहे हें कळणें आवश्यक असतें. मुलाच्या कुटुंबांत कांहीं आनुवंशिक रोग आहेत किंवा काय हेंहि समजून घेणें त्यास अवश्य असतें. तसेंच त्याचा शारीरिक इतिहास समजून घेणेंहि आवश्यक असतें. जीं मुलें तोंडानें श्वासोच्छ्वास करतात त्यांचा चेहरा बेढब दिसतो. त्यांच्या टॉन्सिल्स् काढून टाकणें अवश्य असतें. कुटुंबांतील आजारामुळें मुलांच्या प्रगतींत अडथळा येतो. कांहीं रोग आनुवंशिक असल्यामुळें त्यांचाहि परिणाम मुलांवर होतो. गरिबीमुळेंहि मुलांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. घरांत बापाचा अधिकार सर्व कुटुंबावर चालणें अवश्य असतें. ज्या ठिकाणीं सावत्र आईचा वगैरे घरामध्यें अधिक तोरा चालतो त्या ठिकाणीं निराळी परिस्थिति निर्माण होते. ज्या मुलांच्या आया खाष्ट असतात अशा मुलांस स्त्रियांबद्दल भीति वाटूं लागते. मुलास विशेष धाकांत किंवा फार सौम्यतेनें वागविलें जातें याकडेहि लक्ष देणें जरूर असतें. मुलांस विशेष धाक दाखविल्यास तीं भित्रीं होतात व निरुत्साही बनतात. अतिशय लाड केल्यास तीं परावलंबी होतात. मुलांस पुढील आयुष्याबद्दल विशेष आशा किंवा निराशा कोणत्याहि प्रकारें न दाखवितां पुढील आयुष्याबद्दल त्यांची योग्य तयारी केली पाहिजे व त्यांस स्वावलंबी बनविलें पाहिजे. ज्या मुलांस अडचणींस तोंड देण्यास शिकविलें नसेल तीं मुलें कठिण प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करतात. व भावी आयुष्याबद्दलाहि सोपा मार्ग पसंत करतात. त्यामुळें त्यांचें कार्यक्षेत्र नियमित होतें. तसेंच मुलाजवळ नेहमीं कोण कोण माणसें असतात याचीहि चौकशी

करणें अवश्य असतें. कारण नोकरचाकर लोकांच्या वर्तनाचाहि मुलाच्या वागणुकीवर परिणाम होतो.

### आनुवंशिकतेचे परिणाम—

आनुवंशिकतेचे परिणाम विशेष असतात अशी कांहीं लोकांची समजूत असते. परंतु असें आढळून आलें आहे कीं, मुलाचा स्वभाव बनण्याच्या कामीं आनुवंशिकतेपेक्षां परिस्थितीचाच परिणाम विशेष होतो. आनुवंशिकतेचा परिणाम शारीरिक वाढीवर मात्र विशेष दिसून येतो. आईबापांच्या ठिकाणीं असलेले स्वभावांतील दोष पुष्कळदां मुलांमध्यें दिसून येतात याचें कारण हीं मुलें त्या आईबापांच्या धाकांत व नियंत्रणांत वाढतात हें होय. कारण ते आईबाप ज्या प्रकारच्या परिस्थितींत व नियंत्रणाखालीं वाढलेले असतात तसल्याच प्रकारचें नियंत्रण त्यांच्या मुलांवर लादण्यांत येतें. आणि त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं तेच दोष उत्पन्न होतात. अनियमितपणा हा दोष बहुधा अशा प्रकारच्या धाकापासून उत्पन्न होतो. अनुकरणामुळेंहि कांहीं दोष उत्पन्न होतात परंतु तेथेंहि त्यास नियंत्रणाची जोड मिळाल्याशिवाय केवळ अनुकरणापासून फारसा परिणाम होत नाहीं.

### मुलाचें भावंडांतील स्थान—

प्रत्येक मुलाच्या परिस्थितीमध्यें कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्यांच्याकडे आईबापांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं. प्रत्येक मुलाचें जें आपल्या भावंडांतील स्थान असतें त्याचेंहि त्याचा स्वभाव बनण्याच्या कामीं फार महत्त्व असतें. पहिल्या मुलाची परिस्थिति नेहमीं विशेष असते. कारण तें कांहीं दिवस एकटेंच असतें. तसें दुसऱ्या मुलाचें नसतें. तसेंच सर्वांत जें लहान मूल असतें तेंहि

बरेच दिवस सर्वांहून लहान व अशक्त असल्यामुळें त्यास विशिष्ट तऱ्हेची वागणूक मिळते. जेव्हां दोन लहानमोठीं मुलें एकत्र वाढतात तेव्हां त्यांपैकीं लहान मूल नेहमीं मोठ्याची बरोबरी करण्याचा प्रयत्न करीत असतें व त्याकरितां अधिक झटत असतें. जेव्हां मोठ्या मुलाची प्रगति सर्वसाधारण असते तेव्हां लहान मूल त्यापेक्षां अधिक प्रयत्न करण्यास झटत असतें तितकें वडील मुलाची प्रगति कमी असेल तर त्याच्याकडून झटणें होत नाहीं.

याकरितां कुटुंबामध्यें मुलाची परिस्थिति काय असेल ही गोष्ट समजावून घेणें अवश्य असतें. बहुतेक कुटुंबांतील सर्वांत लहान मुलें तेव्हांच ओळखूं येतात. याकरितां मुलांची वर्गवारी लावतांना या गोष्टी नीट ध्यानांत ठेवल्या पाहिजेत व प्रत्येक मुलाकडे त्याचा स्वतःचा व्यक्तिशः इतिहास समजावून घेऊन लक्ष दिलें पाहिजे.

**सर्वांत लहान मूल—**

सर्वांत लहान मुलांस नेहमीं आपण सर्वांच्या पुढें असावें असें वाटत असतें, व बहुतेक तीं तशीं असतातहि. याच्या उलट कांहीं लहान मुलें त्यांच्याकडे दुर्लक्ष्य झाल्यामुळें अगदीं आळशी बनलेलीं असतात. जेव्हां एखादें लहान मूल पुढें येण्याचा प्रयत्न करीत असतां अयशस्वी होतें तेव्हां तें त्याच्या उलट दिशेला वळून मुळींच प्रयत्न करीनासें होतें व त्यामुळें आळशी बनतें. पुष्कळशा जुन्या गोष्टींतून व यक्षिणींच्या कथांतून आपणांस सर्वांत लहान मूल सर्वांपेक्षां हुशार असून सर्वांच्या पुढें असलेलें वर्णन केलेलें आढळतें. याच्याहि मुळाशीं तीच गोष्ट आहे.

### सर्वांत ज्येष्ठ मूल—

याप्रमाणेंच सर्वांत मोठ्या मुलांतहि कांहीं गुण विशेष आढळतात आणि त्यावरून त्यांचे दोन तीन वर्ग पाडतां येतात. सामान्यतः मोठीं मुलें हीं लहान भावंडावर नेहमीं आपली सत्ता किंवा अधिकार गाजवीत असतात आणि त्यामुळें त्यांना नेहमीं सत्ता व अधिकार आवडत असतो. परंतु जेव्हां एखाद्या वडील भावास लहान बहीण असते तेव्हां त्याची स्थिति मोठी चमत्कारिक होते. कारण त्याची तो एकटा असतांना घरांत जी वाहवा होत असते व जे त्याचे हट्ट व लाड चालत असतात ते धाकटी बहीण झाल्यावर स्वाभाविकपणेंच कमी होऊं लागतात. व ती बहीण अधिक प्रयत्न करून कांहीं बाबतींत त्याच्याहि पुढें जाते. विशेषतः १४ ते १६ या वयांत मुलींची वाढ मुलांपेक्षां अधिक झपाट्यानें होत असल्यामुळें ती मुलगी त्याच्यापेक्षां लौकरच पुढें जाते आणि त्यामुळें तो मुलगा निराश होऊन प्रयत्न करण्याचेंच सोडून देतो व आपल्या मागें राहण्यास कांहीं तरी निराळ्याच सबबी सांगूं लागतो. अशांपैकीं कांहीं मुलें स्त्रीजातीचा भयंकर द्वेष करूं लागतात.

### मुलींत वाढलेला मुलगा—

जेव्हां अनेक बहिणींस एकच भाऊ असतो किंवा एकाच बहिणीस अनेक भाऊ असतात तेव्हांहि त्यांची स्थिति चमत्कारिक होते. अशा रीतीनें बहिणींत वाढलेला मुलगा बहुधा बिघडल्याचें आढळून येतें. एक तर त्याचे फार लाड केले जातात; किंवा त्याला बाजूस टाकल्यामुळें तो एकलकोंडा बनतो. यामुळेंच स्त्रियांनीं मुलांस शिक्षण देऊं नये अशी समजूत पडलेली दिसते. मुलीच्या बाबतींतहि तिचे भाऊ

तिला आपल्यापेक्षां कमी समजत असल्यामुळें ती त्यांच्यासारखें दिसण्याकरितां त्यांचें अनुकरण करते व पुरुषी स्वभावाची बनते. त्यामुळें तिच्या पुढील आयुष्यांत तिला फार त्रास होतो..

**मुलांमुलींचें शिक्षण—**

कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, मुलींसहि मुलांसारखें सर्व प्रकारें वागविण्यांत येऊन त्यांस एकाच प्रकारचें शिक्षण दिलें जावें. परंतु हें सर्वस्वीं बरोबर नाहीं. कांहीं कालपर्यंत दोघांसहि एकाच रीतीनें वागविण्यांत येईल. परंतु मुलांचा पुढील आयुष्यक्रम अगदीं निराळा असतो व त्यांच्या शारीरिक घटनांतहि फरक असतो. तसेंच शिक्षणाचा त्यांच्या पुढील व्यवसायावरहि महत्त्वाचा परिणाम होत असतो; आणि ज्या मुलीस मुलाप्रमाणें वाढविलेलें असतें तीस स्त्रियांचीं कामें मनापासून आवडत नाहींत; आणि त्यामुळें तीस पुढील आयुष्यांत करावीं लागणारीं कामें करण्याचें मोठें जिवावर येतें. तसेंच आपण जर विवाहाच्या प्रश्नावर विचार करूं लागलों तर आपणांस स्त्री आणि पुरुष यांचीं कामें अगदीं भिन्न असून त्यांस निरनिराळ्या पद्धतीचें शिक्षण दिलें पाहिजे ही गोष्ट स्पष्ट होते. ज्या मुलींस मुलांप्रमाणें शिक्षण मिळतें, त्यांना आपण स्त्री आहों याबद्दल असमाधान वाटतें व त्यांस लग्न करण्यांत कमीपणा वाटतो व जर त्यांनीं लग्न केलेंच तर घरामध्यें त्या आपलें वर्चस्व गाजवूं पाहतात. त्याचप्रमाणें ज्या मुलांस मुलींसारखें वाढविण्यांत येतें, त्यांनाहि पुढील आयुष्यांत परिस्थितीशीं जुळवून घेणें कठीण जातें.

**बालवयांत निष्ठुरतेनें वागविलेलीं मुलें—**

यानंतर आतां ज्या मुलांवर लहानपणीं कोणीं प्रेम केलेलें नसतें

अशा मुलांकडे पाहिल्यास आपणांस निराळीच परिस्थिति दिसून येते. अशा लोकांचीं उदाहरणें आपणांस जे मानवजातीचे मोठमोठे शत्रू होऊन गेले त्यांच्या चरित्राचा अभ्यास केला असतां आढळून येतील. या बहुतेक लोकांच्या चरित्रांमध्यें असें आढळून येतें कीं, लहानपणीं त्यांना वाईट रीतीनें वागविण्यांत आलेलें असतें. त्यामुळें त्यांचा स्वभाव कठोर बनून त्यांच्या ठिकाणीं द्वेष आणि मत्सर उत्पन्न झालेले असतात. त्यांस दुसऱ्याचें सुख पाहवत नाहीं. आतां अशा तऱ्हेच्या मत्सरी स्वभावाच्या मनुष्याकडे कांहीं मुलांस सांभाळण्याचें काम आलें म्हणजे त्यांना स्वाभाविकच असें वाटतें कीं, आपणांस जसें लहानपणीं सुख मिळालें नाहीं तसें या मुलांसाहि आपणांपेक्षां जास्त सुख मिळतां उपयोगी नाहीं. अशा तऱ्हेची वृत्ति असलेले कांहीं आई-बाप किंवा मुलांचे नेमलेले पालक आढळून येतात. अशा लोकांच्या मनांत कांहीं दुष्ट हेतु असतो असें नव्हे, तर लहानपणीं त्यांस कठोर-तेनें वागविलें जात असल्यामुळें त्यांची मनोवृत्तीच अशा तऱ्हेची बन-लेली असते. यांस अशा तऱ्हेनें निर्दयपणें वागविणारे लोक आपल्या वागणुकीचें समर्थनहि ‘ छडी लागे छम् छम्; विद्या येई घम् घम् ’ अशा तऱ्हेच्या किंवा दुसऱ्या वचनांनीं करीत असतात व दुसरे अनेक पुरावे देऊन आपली बाजू सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात. **लालने बहवो दोषास्ताडने बहवो गुणाः। तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयेन्नतु लालयेत्॥** हें सुभाषितहि याच वृत्तीचें द्योतक आहे. परंतु अशा तऱ्हेच्या वागणुकीनें अध्यापक व शिष्य यांच्यामधील संबंध दुरावत जातो ही गोष्ट स्पष्ट असल्यामुळें या त्यांच्या वृत्तीचें समर्थन होणें शक्य नाहीं.

## मुलगा व मुलगी—

जर एखाद्या आईबापांस मुलगा व्हावा अशी इच्छा असतांना मुलगी झाली तर त्याबद्दल असमाधान वाटून न घेतां समाधानी वृत्ति ठेवावी. विशेषतः आपलें असमाधान मुलाच्या नजरेस पडणार नाहीं अशी काळजी त्यांनीं घेतली पाहिजे. तसेंच मुलीला मुलासारखें वागण्यास उत्तेजन देऊं नये किंवा हौसेनें मुलास मुलीसारखें वागवूं नये. नेहमीं मुलास पुरुषाच्याच वृत्तीनें व मुलीला स्त्रीच्या वृत्तीनें वाढविणें श्रेयस्कर असतें. याच्या उलट केल्यास त्यापासून अनर्थ होण्याचा संभव असतो. जर मुलगी असेल तर तिला स्वयंपाकघरांत येऊन घरांतील कामें करण्यास उत्तेजन द्यावें. तसेंच तिला बाहुली वगैरे देऊन तिच्याशीं खेळावयास शिकवावें. मात्र तिला या गोष्टी सक्तीनें करण्यास लावूं नये. तसें केल्यास, तिला या गोष्टीबद्दल तिटकारा वाटूं लागेल आणि त्यामुळें तिच्या पुढील आयुष्यावर परिणाम होईल. तिच्या मनांतील विधायक प्रवृत्तीस उत्तेजन मिळावें, म्हणून तिला चित्रें काढण्याचीं साधनें व चित्रें करण्याकरितां शाडू, मेण वगैरे देण्यांत यावींत. मुलीस आपल्या पोशाखामध्यें विशेष लक्ष्य घालण्यास उत्तेजन द्यावें. सामान्यतः तिचा पोशाख मुलापेक्षां मुलीस शोभेल असाच असावा. तथापि त्यामध्यें विशेष फरक असूं नये. परंतु विशेष प्रसंगीं मात्र मुलीचा पोशाख जास्त सुंदर व दिखाऊ असावा. जर मुलीस नीटनेटकेपणा व सौंदर्य यांचा मिलाफ करतां आला तर त्याबद्दल तीस शाबासकी देण्यांत यावी. सौंदर्याची नीट कल्पना येणें ही गोष्ट चांगली आहे. मुलाच्या बाबतींत याप्रमाणेंच त्याच्या प्रवृत्ती जास्त पुरुषी वळणाच्या होतील याची काळजी घेत जावी. त्याच्या ठिकाणीं धाडस असल्यास त्यास उत्तेजन देण्यांत यावें व त्याच्या धीटपणाची प्रशंसा करावी.

पण त्याचवेळीं योग्य सावधगिरी बाळगण्याबद्दलाहि त्यास सूचना देत असावें. त्याला इतर मुलांशीं मैत्री करण्यास उत्तेजन द्यावें व सांघिक खेळ व त्यांतल्या त्यांत चुरशीचे खेळ खेळण्याबद्दल त्यास उत्तेजन देत जावें. तसेंच निरानिराळ्या वस्तु व हत्यारें वापरून त्यांत कौशल्य दाखविण्यास त्यास प्रवृत्त करावें. मुलाचे मित्र सामान्यतः त्याच्याच वयाचे असावे. मोठाल्या मुलांत जर एखादा लहान मुलगा असला तर त्याच्यामध्यें थोडासा हीनभाव उत्पन्न होऊन तो नेहमीं मागें पडत असल्यामुळें कोणत्याहि चुरशीच्या खेळांत त्यास भाग घ्यावा असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें अनेक मुलांत एकच मुलगी असली म्हणजेहि तिची अशीच प्रवृत्ति होते.

**मुलांमुलींची परस्परांबद्दल वृत्ति—**

सामान्यतः मुलांस मुलींबद्दल तुच्छता वाटणें स्वाभाविक आहे. त्याबद्दल त्यांस दोष देऊं नये. तथापि ही गोष्ट केवळ भ्रामक असल्यामुळें त्यांस तसें करण्यास उत्तेजन देऊं नये; व मुलें आणि मुली हीं निराळीं असून तीं सारख्याच योग्यतेचीं आहेत असें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करावा. तसेंच मुलींच्या अंगीं असलेले विशेष गुण मुलांच्या नजरेस आणावे. त्याप्रमाणेंच मुलींस मुलांचा हेवा करण्यास उत्तेजन देऊं नये. तसेंच तिला मुलगी ही कोणत्याहि तऱ्हेनें कमी प्रतीची आहे असें वाटूं न देण्याची काळजी घ्यावी. तसेंच मुलीवर विशेष प्रकारचें नियंत्रण न ठेवतां तिलाहि शक्य तितकें पूर्ण स्वातंत्र्य देऊन स्त्रीजातीचा अभिमान वाटेल असें करावें. पुरुष हे स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहेत ही कल्पना आतां नष्ट झाली पाहिजे. आणि त्यांस परस्परांची योग्यता कळली पाहिजे व ही गोष्ट लहानपणापासूनच होणें इष्ट आहे.

## लहान व मोठीं मुलें—

याप्रमाणें सर्वांत मोठ्या मुलास कांहीं विशेष हक्क आहेत ही कल्पनाहि आतां सोडून दिली पाहिजे. वास्तविक त्यास तशा प्रकारचे हक्क मुळींच नसतात. तर ती एक केवळ कांहीं लोकांच्या मनाची समजूत आहे. पण अशा समजुतीमुळें इतर मुलांवर अन्याय होतां कामा नये. तसेंच एखाद्या मुलाकडे पूर्ण दुर्लक्ष करणें चांगलें नाहीं. पुष्कळदां आईबापांकडून कांहीं मुलांकडे विशेष लक्ष दिलें जातें तर कांहीं मुलांकडे पूर्ण दुर्लक्ष केलें जातें. असली प्रवृत्ति फार घातक आहे. जर आईबापांस एखादें मूल विशेष आवडत असेल तर त्यांनीं ती गोष्ट उघडपणें न दाखवितां इतर मुलांच्या नजरेस येणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. ज्या मुलाकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें जातें त्याचें सर्व आयुष्य दुःखमय होतें व त्याचा भविष्यकालहि दुःखमय जातो. आईबापांस अधिक मुलें नको असल्यास त्यांनीं त्याबद्दल काळजी घ्यावी पण जीं मुलें त्यांस परमेश्वरानें प्रत्यक्ष दिलीं आहेत, त्यांचें योग्य प्रकारें संगोपन करण्याच्या कामीं मुळींच हयगय करूं नये.

## कुटुंबांतील व बाहेरची राहणी—

मुलांसभोंवतींच्या परिस्थितीच्या बाबतींत घराबाहेरच्या परिस्थितीपेक्षां घरांतील परिस्थितीचाच मुलांच्या वागणुकीवर व स्वभावावर अधिक परिणाम होतो व त्यांतल्या त्यांतहि गरिबी वगैरेसारख्या बाह्य गोष्टींपेक्षां नैतिक गोष्टींचा उदाहरणार्थ, वाईट शिस्त, दुर्गुण किंवा व्यसनें व विशेषतः मुलांची आईबापांशीं वागणूक या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. वैयक्तिक गोष्टींमध्यें बुद्धिमांद्य विशेषतः तें थोडक्या प्रमाणांत

असून ज्याला जडबुद्धि म्हणतां येणार नाहीं अशा अवस्थेंत असलें म्हणजे व स्वभावाची चंचलता ही विशेष मोठ्यां प्रमाणावर नसली व रोगाच्या स्वरूपांत नसली म्हणजे त्यांचा परिणाम मुलांचा स्वभाव बनण्याच्या कामीं फार महत्त्वाचा होतो व तो होत असतांना फारसा लक्ष्यांत येत नाहीं. सामाजिक गोष्टींमध्यें सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे कुटुंबांतील राहणी व आयुष्यक्रम व तिच्यानंतर घराबाहेर केलेली मित्रमंडळी यांचा फार मोठा परिणाम होतो. शेंकडा पन्नास मुलांच्या बाबतींत तीं बिघडण्यास वरील चार कारणांपैकीं कोणतें तरी कारण मुख्यत: बलवत्तर असतें. या बाबतींत अमेरिकेंत आंकडेवार माहिती मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत व अशा तऱ्हेचे आंकडे फार उद्बोधक दिसून येतात. उदाहरणार्थ, व्हिट्टर कॅलिफोर्निआ स्टेट स्कूलमध्यें आलेल्या ३०९ मुलांनीं आपणांस बिघडण्यास पुढील गोष्टी कारण झाल्या असें सांगितलें. (१) इतर मुलांपासून घडलेला संगति दोष, (२) साहस अथवा गंमत करण्याची प्रवृत्ति, (३) चोरून घेतलेल्या वस्तूची इच्छा, (४) घरांतील छळ अथवा वाईट वागवणूक, (५) मौज करण्याची इच्छा, (६) शाळेबद्दल नावड.

याप्रमाणें घरांतील परिस्थितीचा अगदीं बाल्यावस्थेपासून लहान मुलांच्या मनावर कसा परिणाम होत जातो हें आपण पाहिलें. याकरितां मातापिता, लहान मुलांचे पालक किंवा शिक्षक यांनीं या बाबतींत किती काळजी घेतली पाहिजे तें स्पष्ट होत आहे. त्यांच्या हातीं आलेल्या या बालसंपत्तीचें योग्य चीज करण्याची जबाबदारी त्यांचेवर असते व ती ओळखून विशेषत: मातापित्यांनीं आपल्या अपत्यांचें संगोपन व संवर्धन करणें इष्ट आहे.

## प्रकरण अठरावें

# मुलांचें शीलसंवर्धन

## अथवा

# त्यांच्या वर्तनास इष्ट वळण

### मुलांच्या मनांत नीतिकल्पनांची वाढ—

मुलाची वर्तणूक चांगली व्हावी याकरितां त्याच्या वर्तणुकींतील एक महत्त्वाचें अंग म्हणजे त्याच्या नीतिकल्पनांची वाढ झाली पाहिजे व ही वाढ होण्याच्या कामीं धाक किंवा शिक्षेचें भय या गोष्टींचा उपयोग जितका कमी करतां येईल तितका केला पाहिजे. तेव्हां मुलाच्या ठिकाणीं असलेल्या स्वाभाविक प्रवृत्तींचाच उपयोग करून ही गोष्ट आपणांस कशी साध्य करतां येईल हें पाहिलें पाहिजे. प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं सुख प्राप्त करून घेण्याची प्रवृत्ति स्वाभाविक असते. परंतु या प्रवृत्तीच्या ऐवजीं दुसरी एखादी चांगली प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं उत्पन्न केली पाहिजे व असें करतांना त्याच्या मनावर शक्य तितका कमी दाब आणून ही गोष्ट आपणांस घडवून आणिली पाहिजे. मनुष्याला आपल्या सभोंवतींच्या परिस्थितीशीं समरस होण्याकरितां किंवा अनिष्ट परिस्थितीशीं झगडण्याकरितां आपल्या स्वाभाविक प्रवृत्तींच्या स्वातंत्र्यावर जितकें कमी दडपण आणतां येणें शक्य असेल तितकें या बाबतींत अधिक यश येतें.

## वाईटाबद्दल असमाधान व चांगल्याबद्दल उत्तेजन—

पांच वर्षांहून लहान मुलाची वागणूक आपण सामान्य नीति-नियमांच्या दृष्टीनें पाहूं नये व या दृष्टीनें लहान मुलाच्या वागणुकीच्या बाबतींत चांगलें व वाईट असे शब्द वापरूं नयेत. त्याला या शब्दांचा कांहींच अर्थ कळत नसून चांगली व वाईट गोष्ट कोणती हें समजण्याचीहि त्याच्या ठिकाणीं पात्रता नसते. तसेंच लहान मुलाच्या बाबतींत आईबाप जो नेहमीं 'द्वाड' हा शब्द वापरतात, तो अजीबात गाळून टाकला पाहिजे, कारण 'द्वाड' या शब्दानें नैतिक चूक ध्वनित केली जाते. ज्या कुटुंबामध्यें 'द्वाड' हा शब्द विशेष प्रचलित असतो, त्या कुटुंबांत त्याच्या उलट चांगली गोष्ट दाखविण्यास योग्य शब्द नसतो. ज्याप्रमाणें एखाद्या मुलानें एखादी वाईट गोष्ट केली असतां आपण त्यास 'द्वाड' असें म्हणतों, त्याप्रमाणेंच त्यानें एखादी चांगली गोष्ट केली असतां त्यास शाबासकी देणें हें आपलें काम आहे व या दृष्टीनें प्रयत्न करून पाहणें जरूर आहे.

## सद्वर्तनाकडे प्रवृत्ति—

प्रत्येक मूल बहुधा वडील मनुष्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्याची स्वतःची एखाद्या बाबतींतील वागणूक योग्य किंवा अयोग्य आहे हें तावडतोब जाणतें. ही गोष्ट त्यास वडील माणसाच्या चेहऱ्यावरील आविर्भावावरून जितकी कळते तितकी शब्दांवरून कळत नाहीं. मग एखादें लांबलचक भाषण करण्यांत काय फायदा? मुलाच्या बाबतींत एकहि रागाचा शब्द बाहेर पडणार नाहीं अशी शक्य तितकी काळजी घ्यावी व त्याला फार तर तूं अमूक गोष्ट करावयास नको होती असें सांगून ती कां करूं नये तें स्पष्ट करीत

जावें. जर त्यानें केलेली एखादी गोष्ट पुन्हां कधींहि करूं नये अशा तऱ्हेची असेल तर तसें निक्षून सांगावें. जर त्याला विशिष्ट बाबतींत अधिक चांगल्या प्रकारें वागतां आलें असतें असें आपणांस वाटत असेल तर तसेंहि त्यास नीट सांगून त्याप्रमाणें त्याच्याकडून कृति करून घ्यावी. एखादें सुंदर व मौल्यवान कांचेचें भांडें त्यानें आपल्या हातांत घेतलें असेल तर तें त्याच्या हातांतून एकदम हिसकून घेण्याच्या ऐवजीं त्यास तें आपण त्याच्या हातांतून कां घेत आहों, हें नीट समजावून सांगावें. तसें न केल्यास आपल्या कृतीची त्याला केवळ भीति व अचंबा मात्र वाटत राहील. परंतु आपण ही गोष्ट कां केली याचा नीट उलगडा होणार नाहीं व त्यामुळें त्याच्या मनावर आपल्या वागणुकीचा जो वास्तविक योग्य परिणाम व्हावयास पाहिजे तो मुळींच न होतां तें मूल केवळ आश्चर्य करीत राहील. किंबहुना त्याच्या ठिकाणीं आपल्याबद्दल अप्रिय भावना उत्पन्न होण्याचा संभव राहील.

**शाब्दिक उपदेश—**

मुलास नैतिक उपदेश करणें, मोठ्या गंभीर आवाजांत त्याच्याशीं बोलणें, मोठ्या गूढ रीतीनें त्याच्याकडे पाहणें किंवा आपणांस राग आला आहे किंवा दुःख झालें आहे असें दाखविणें, त्याची विनवणी करणें, किंवा धाक दाखविणें, या सर्व गोष्टी टाळण्याचा पूर्णपणें प्रयत्न करावा. कारण लहान मुलास त्यांतील एक अवाक्षरहि कळावयाचें नाहीं. आपलें सर्व वक्तृत्व फुकट जाईल व आपण केवळ रागावतों आहों एवढें मात्र त्या मुलास कळून येईल. जर आपणांस एखाद्या गोष्टीचा खरोखर राग आला असेल तर तसें मोकळेपणानें त्यास स्पष्ट सांगणें अधिक हितकारक आहे.

## मुलाची पहिली चूक—

लहान मुलास योग्य मार्गाचें वळण लावणें हें अगदीं अल्पवयापासूनहि शक्य आहे. पुष्कळदां अगदीं लहान वयांत दिसून येणारा मुलाचा हट्टीपणा, रागीट स्वभाव व स्वार्थी वृत्ति यांतच पुढें त्यानें केलेल्या पहिल्या अपराधाचें बीज असतें. शहाणा पालक असा पहिलाच अपराध कधींहि क्षुल्लक म्हणून त्याची उपेक्षा करणार नाहीं. मुलाची पहिलीच चूक सुधारली पाहिजे व ही सुधारण्यास केवळ एक रागाचा दृष्टिक्षेप किंवा थोडा वेळ एखाद्या कोंपऱ्यांत उभें करून ठेवणें इतकी शिक्षा पुरेशी असते व त्यानें केलेली गोष्ट आपणांस मुळींच आवडली नाहीं हें त्यास स्पष्ट होतें आणि आपणांस संतुष्ट करण्याकरितां निदान नाराज न करण्याकरितां तें मूल सहसा तशी गोष्ट पुन्हा करीत नाहीं.

## मुलाच्या मनावर अवास्तव दाब—

पुष्कळ वेळां आपणांस कांहीं आईबाप आपल्या मुलाच्या बाबतींत झालेला अपराध मोठ्या आनंदानें वर्णन करतांना आढळतात. ते म्हणतात कीं, आमचा मुलगा पहिल्यानें फार हट्टी व नादिष्ट असे. त्याला नेहमीं राग येत असे व तो ओंगळ, व अव्यवस्थितपणें राहत असे. पण आतां मात्र तो अगदीं आज्ञाधारक, सुस्वभावी, स्वच्छ आणि व्यवस्थितपणें वागूं लागला आहे. तो किती चांगला मुलगा आहे! अशा वेळीं त्यांना त्या मुलाच्या बाबतींत झालेले इतर फरक दिसत तरी नाहींत किंवा त्यांस ते समजण्याची शक्ति तरी नसते; व या गोष्टींच्या पुढें होणाऱ्या परिणामाचीहि त्यांना कल्पना नसते. केव्हां केव्हां वरील वर्णन पुरें करण्याकरितां हीं आईबापें असेंहि सांगतांना आढळतात कीं,

तें मूल हट्टी असतांना म्हणजे वास्तविक आपल्या स्वभावाप्रमाणें अगदीं मोकळेपणानें वर्तन करीत असतांना खूप हंसत खिदळत असे, खूप खात असे, आणि त्याला झोंपहि चांगली येत असे. एकंदरींत तें मोठें सुखी असे. परंतु त्याच्यामध्यें वर दिलेला व इष्ट असा वाटणारा फरक झाल्यापासून त्याच्या ठिकाणीं असलेली आनंदी वृत्ति नाहींशी होऊन त्याच्या चेहऱ्यावर म्लानता आली असून तें तिरसट आणि रागीट झालें असून त्यास भूकहि चांगली लागत नाहींशी झाली आहे. त्याचें वजनहि कमी झालें असून तें झोंपेंतून दचकून उठतें. अशा तऱ्हेनें अप्रत्यक्षरीत्या त्या मुलाची वर्तणूक हळूहळू मोकळेपणाच्या उलट अस्वाभाविक बनत चालली असून तें वडील माणसांच्या धाकामुळें थोडेंफार कुढ्या स्वभावाचें बनत चाललें आहे ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं; एवढेंच नव्हे तर या त्याच्या स्वभावामुळें त्याच्या आरोग्यावर व वाढीवरहि जो अनिष्ट परिणाम होत चाललेला असतो त्याकडेहि त्यांचें लक्ष्य जावें तसें जात नाहीं. ही गोष्ट त्या मुलाच्या भविष्यकाळाच्या दृष्टीनें अनिष्ट असते. मुलावर रागावलें असतां, त्यास धाक दाखविला असतां किंवा त्याची विनवणी करून त्याला उपदेश करूं गेलें असतां, त्याची विशिष्ट इच्छा सफळ न झाल्यामुळें त्याच्या मनांत उत्पन्न झालेला राग वास्तविकरीत्या वाढीस मात्र लागतो आणि वडील माणसांबद्दलची भीति त्याच्या मनांत वाढत जाते व त्यामुळें त्याच्या स्वाभाविक मानसिक प्रवृत्तींवर अधिक अधिक दडपण पडून त्याचा स्वभाव दिवसेंदिवस वाईट होत जातो व त्याच्या ठिकाणीं मनोदौर्बल्य उत्पन्न होतें. अशा तऱ्हेनें मुलाच्या मनावर वाजवीपेक्षां फाजील दडपण पडल्यामुळें पुढें जे भयंकर दुष्परिणाम होतात; त्यांची सर्व जबाबदारी त्या लहान मुलाचा स्वभाव

बनविणारा जो पिता किंवा पालक असतो त्यावर पडते ही गोष्ट आपण नीट ध्यानांत घेतली पाहिजे. आतांपर्यंत लहान मुलाचें आरोग्य नीट राखण्याचीच जबाबदारी त्याच्या आईबापांवर आहे असें समजलें जात असे, पण अलीकडे मानसशास्त्रदृष्ट्या ही अधिक महत्त्वाची जबाबदारीहि त्यांचेवरच आहे असें मानण्यांत येतें व जितक्या जास्त प्रमाणांत व जितक्या जास्त लोकांच्या बाबतींत या जबाबदारीची जाणीव त्यांस होईल तितका त्यांस फायदा होईल.

## मुलाची कामसू प्रवृत्ति—

याच्या उलट आपण एखाद्या लहान मुलास एखादी गोष्ट करावयास सांगावयाची असल्यास नेहमीं अमुक गोष्ट तूं करशील का? अमुक वस्तु माझ्याकरितां आणशील का? या प्रकारच्या भाषेऐवजीं अमुक कर, तमुक कर, अमुक आणून दे, तमुक घेऊन जा, अशा प्रकारची भाषा नेहमीं वापरलेली आढळून येते. यामध्यें आपण मुलामध्यें, जी स्वाभाविक काम करण्याची प्रवृत्ति असते तिचा पूर्ण फायदा घेण्याच्या ऐवजीं आपण त्यास नुसते हुकूम सोडीत असतों. याच्या उलट त्याच्या ठिकाणीं असलेल्या उपयुक्त कार्य करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा जर आपण उपयोग केला तर त्याच्या वर्तणुकीवरहि इष्ट तो परिणाम होऊन त्यास आज्ञाधारकपणाचेंहि वळण लागल्याशिवाय राहणार नाहीं, केवळ आज्ञावाचक शब्दांपेक्षां जर विनंतिसूचक शब्दांचा आपण वरचेवर उपयोग करीत गेलों तर हुकूमशाही शब्दांचा उपयोग करण्याची पाळी आपणांवर क्वचितच येईल. अशा तऱ्हेच्या शब्दांच्या उपयोगामुळें मुलाच्या मनांत आपणांबद्दल राग किंवा भीतीची भावना मात्र उत्पन्न होते आणि त्याच्या ठिकाणीं असलेली आज्ञाधारकपणाची प्रवृत्ति वाढीस लागत नाहीं. उलट विनंतिसूचक शब्दांनीं ही प्रवत्ति

वाढीस लागून मुलाच्या ठिकाणीं प्रेम व कृतज्ञताबुद्धि हीं जागृत होतात व त्याच्या ठिकाणीं आपलेपणा व प्रेमळ वृत्ति या सत्प्रवृत्तींची वाढ होते.

**या प्रवृत्तीचा उपयोग—**

लहान मुलांस अगदीं प्रथमपासून घरांतील कांहींतरी काम करण्यास सांगत जावें, व त्यांस तशी संधि देत गेलें तर मुलें कांहींतरी उपयुक्त काम करण्यास नेहमीं उत्सुक असतात. त्यांनीं कोणतेंहि काम केलें म्हणजे त्यांची प्रशंसा करीत जावी, परंतु त्याबद्दल प्रत्येक वेळीं कांहीं-तरी बक्षीस देण्याची प्रथा पाडूं नये. बक्षिसाच्या आशेनें केलेल्या कामाची सामाजिक दृष्टीनें मुळींच किंमत नसते. मुलांच्या मनांत अशी कल्पना भरवून देणें इष्ट असतें कीं, घरांतील प्रत्येक व्यक्तीनें कांहीं तरी काम केलेंच पाहिजे व अशा तऱ्हेनें जो घरांतील कामें करीत जाईल त्यास त्याचा अप्रत्यक्षपणें केव्हां ना केव्हां तरी फायदा मिळत जाईल. घरांतील काम हें केवळ आईबापांनींच करावयाचें असतें असें नव्हे. तसेंच कोणतेंहि काम अमुक एक व्यक्तीकरितां करावयाचें नसून आपल्या घरचें म्हणून करावयाचें असतें अशी जाणीव लहान मुलांच्या मनांत प्रथमपासून उत्पन्न होणें इष्ट असतें. घरांतील काम करण्याची प्रवृत्ति मुलांमध्यें उत्पन्न झाली म्हणजे पुढें सामाजिक कामें करण्याचीहि त्यांच्यामध्यें वृत्ति उत्पन्न होते.

**कामाबद्दल बक्षीस—**

मुलानें आपलें कोणचेंहि एखादें विशेष व वैय्यक्तिक काम केलें तर त्याबद्दल त्यास बक्षिस द्यावयास हरकत नाहीं, पण तें बक्षिस फार किंमतीचें नसावें. तसेंच मुलास बक्षिस मिळणें फार सोपें असतें असेंहि वाटतां उपयोगी नाहीं, किंवा त्यास आपण केलेल्या कामाची किंमत

वाजवीपेक्षां जास्त वाटतां कामा नये. कारण अशी समजूत लहानपणींच उत्पन्न झाल्यास त्यास ती पुढें चुकीची असल्याचें आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं व त्यावेळीं त्यास निराशा व किंचित् वाईट वाटल्याशिवाय राहणार नाहीं. मुलानें आपण होऊन एखादें काम केल्यास त्याबद्दल त्यास बक्षिस देण्याचें कारण नाहीं. त्याचे केवळ आभार मानले म्हणजे झालें. याचा उद्देश त्यास काम करण्याची हौस व आवड उत्पन्न करणें हा मुख्यतः असतो व तो कसा साध्य करावयाचा याच दृष्टीनें या गोष्टीकडे पाहिलें पाहिजे.

## स्तुतीपर व उत्तेजक शब्द—

आपण सांगितलेली एखादी गोष्ट मुलानें केल्यानंतर आपण त्याला जर शाबासकीचे अथवा आभारदर्शक दोन शब्द बोललों किंवा एखादा स्तुतिपर शब्द वापरला तर त्यामुळें त्या मुलाच्या ठिकाणीं ज्या एकंदर नैतिक भावना उत्पन्न होऊं शकतील त्या त्याला कितीहि आज्ञा किंवा उपदेश केला तरी उत्पन्न होऊं शकणार नाहींत. याकरितां अमुक कर, तमुक कर वगैरेसारखीं आज्ञार्थक वाक्यें अजिबात गाळून त्यांच्याऐवजीं करतोस का? देशील का? घेशील का? वगैरेसारखीं वाक्यें वापरण्याचा प्रघात ठेवून काम झाल्यावर एकदोन स्तुतीपर अथवा कृतज्ञतादर्शक शब्द वापरण्याची प्रवृत्ति ठेवावी. म्हणजे साहाजिकच त्यास आपण सांगितलेलें काम मनापासून करण्यांत समाधान वाटेल व त्यास अशीं बारीकसारीक कामें करण्याची संवय लागून त्यास कामाचा कंटाळा न वाटतां त्याच्या ठिकाणीं कामसू वृत्ति उत्पन्न होईल.

## हुकूमशाही शब्द—

ज्यावेळीं मुलास एखाद्या भयंकर अथवा गैरवाजवी गोष्टीपासून परावृत्त करावयाचें असेल व याकरितां त्याच्या मनांत भीति उत्पन्न करावयाची असेल त्याच प्रसंगाकरितां फक्त हुकूमशाही शब्द राखून ठेवावे व अशाच प्रसंगीं मुलाच्या मनांत ज्या भीतीच्या भावना असतात त्या जागृत कराव्या. असे प्रसंगहि शक्यतों टाळीत असावें. व ज्या मानानें आपणांस इतर गोष्टींचा मोठ्या युक्तीनें अवलंब करतां येईल त्या मानानें असले प्रसंग कमी कमीच येत जातील.

## मुलांमध्यें आत्मविश्वास उत्पन्न करणें—

मुलाला आपणांकडून ज्या प्रेमळ वागणुकीची अपेक्षा असते त्यामध्यें त्याला शक्य तितकी निरनिराळ्या गोष्टी करण्याची मुभा, चांगल्या गोष्टींबद्दल शाबासकी आणि त्याच्याकडून ज्या गोष्टी चुकत असतील त्या नीटपणें करण्याच्या बाबतींत उत्तेजन या गोष्टींचा अंतर्भाव होतो. अशा प्रकारच्या वागणुकीनें त्याच्या मनांत एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होतो आणि जगामध्यें आपणांलाहि कांहीं किंमत आहे असें वाटूं लागतें व त्यामुळें त्याच्या मनास एक प्रकारचें स्वास्थ्यहि लाभतें.

## मुलांत नैतिक भावनांची जागृति—

लहान मुलाचे पुष्कळसे लाड करणें, त्याच्याजवळ गोड बोलणें, त्याची पुष्कळशी स्तुति करणें, त्यास आंजारणें, गोंजारणें व लाडिकपणा करणें इत्यादि प्रकारानेंहि त्याजवरील आपलें प्रेम व्यक्त करतां येतें. परंतु मुलास सामान्यतः असल्या प्रेमाची फारशी किंमत वाटत

नाहीं. अशा तऱ्हेचें एकीकडे प्रेम व्यक्त करून दुसरीकडे त्या मुलावर बारीकसारीक गोष्टींत निर्बंध घालणें, त्यास कांहीं गोष्टींबद्दल नांवें ठेवणें व योग्य त्यावेळीं त्याची स्तुति न करणें अशा गोष्टी करीत गेल्यास त्या मुलाचा स्वभाव अथवा शील बनविण्याच्या कामीं त्या प्रेमाचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. एवढेंच नव्हे तर त्याचा परिणाम उलट होऊन त्या मुलाच्या ठिकाणीं एक प्रकारचा धाक मात्र उत्पन्न होईल. ज्या प्रकारचें प्रेम खरोखर मुलांस आवडतें व ज्या प्रेमाचें त्यास महत्त्व अथवा किंमत वाटते तो प्रकार वर सांगितलाच आहे आणि अशा प्रेमाची त्यांस किंमत वाटल्यामुळेंच तें मिळविण्यासाठीं व कायम राखण्यासाठीं लहान मुलें कोणतीहि गोष्ट करण्यास तयार होतात. याचा परिणाम असा होतो कीं, त्या मुलांची जी केवळ सुखात्मक गोष्टींकडे प्रवृत्ति असते त्यांजकडून त्यांचें मन आपल्या आईबापांचें प्रेम मिळविण्याकडे वळतें आणि अशा तऱ्हेनें त्यांस मुळींच धाक न दाखवितांहि आईबापांच्या इच्छेस अनुसरून वर्तन ठेवण्याची त्यांस संवय लागते व आईबापांचें वर्तन ज्या प्रकारच्या नीतिनियमांस अनुसरून होत असतें त्याच प्रकारचें वर्तन तीं मुलेंहि ठेवण्याचा प्रयत्न करितात आणि त्यांच्या ठिकाणच्या नैतिक भावनाहि जागृत होतात.

### श्रम व पैसा यांचें वास्तविक मूल्य—

वर दर्शविल्याप्रमाणें लहान मुलांची बक्षिसाबद्दल काम करणें व काम केल्याबद्दल बक्षिस मिळणें या गोष्टी बाजवी होत अशी सामान्यतः कल्पना होणें चांगलें असतें. तथापि त्यांस असेंहि वाटलें पाहिजे कीं, कांहीं सार्वजनिक कामें विनामोबदला करावयाचीं असतात व तीं अनेकांनीं मिळून करावयाचीं असतात ही गोष्टहि

त्यांच्या मनावर बिंबविली पाहिजे. लहान मुलांस बक्षिसादाखल पैसे देण्यासहि हरकत नाहीं व त्यावरोबर पैशांचा उपयोगहि समजावून देणें चांगलें असतें. विशेषतः पैसा हा निरनिराळ्या कामाचा मोबदला म्हणून देण्यांत येतो, अशी त्यांची समजूत होणें हितावह असतें. मात्र त्यांच्या श्रमाची व पैशाची योग्य किंमत त्यांस कळणें इष्ट असून त्याबद्दलच्या त्यांच्या भलत्याच समजुती होणें चांगलें नाहीं. लहान मुलांस काटकसर करण्याची संवय असणें चांगलें. परंतु तीबद्दल बाजवीपेक्षां अधिक महत्त्व वाटतां कामा नये. नाहीं तर त्यांस पैसा खर्च करण्यास प्रत्येक वेळीं अंदेशा वाटूं लागेल व तीं कंजूष होण्याचा संभव राहील. एखाद्या मुलाला जेव्हां एखादी वस्तु विकत घ्यावीशी वाटेल तेव्हां ती विकत घेऊं द्यावी. अर्थात् ती वस्तु त्याच्या दृष्टीनें उपयोगाची असावी. तसेंच योग्य तऱ्हेची काटकसर करण्यास त्यास शिकवून पैसे राखून ठेवण्यापासून होणाऱ्या फायद्याची त्यास कल्पना द्यावी व असे पैसे योग्य वेळीं एखादी जरूरीची वस्तु विकत घेण्यास कसे उपयोगी पडतात तें त्याच्या नजरेस आणावें. मात्र लहान मुलास काटकसर हा एक मोठा सद्गुण आहे असें फारसें भासवूं नये. मुलानें प्रथम स्वतः थोडेसे पैसे वांचवून जर एखादी वस्तु विकत घ्यावयाची इच्छा दाखविली तर त्यास अधिक जरूर ते पैसे देऊन ती वस्तु विकत घेऊन द्यावी व आपण दिलेले पैसे हळूहळू त्याच्या शिलकेंतून वसूल करून घ्यावे. या गोष्टी त्यास नीट समजावून देऊन त्यांत हयगय करूं नये. सामान्यतः मुलास खाऊपेक्षां खेळणीं किंवा इतर कांहीं वस्तु विकत घेण्यास उत्तेजन द्यावें. परंतु केव्हांहि खाऊ विकत घ्यावयाचा नाहीं असा निर्बंध त्यावर घालूं नये. मुलास जर इतर खाण्यापिण्याच्या वेळीं भरपूर खाऊ मिळत असून पुन्हा तो

विकत घेण्याची इच्छा झाली तर त्यावरून त्याला इतर त्याच्या आवडत्या गोष्टींमध्यें कोठें प्रतिबंध होत आहे असें समजावें, व त्या-बाबतींत त्यास अधिक मोकळीक द्यावी.

## कांहीं मुलांचें चमत्कारिक वर्तन—

कांहीं मुलें कांहीं वेळीं अगदीं चमत्कारिक वर्तन करतांना आढळतात. उदाहरणार्थ कांहीं मुलें आडदांड असतात. कांहीं दुसऱ्याच्या वस्तु पळवितात. कांहीं मुलें असत्य भाषण करतात. कांहीं मुलांस नखें कुरतडण्याची संवय असते. कांहीं मुलें दांडगाई करतात. कांहीं मुलें चिडखोर असतात. कांहीं मुलांस आपल्याहून लहान मुलांस मारण्याची खोड असते. कांहीं मुलें वरचेवर रागावतात. कांहींस शाळेंतून पळून जाण्याची संवय असते. कांहीं मुलें परकीय मनुष्याशीं बोलण्यास अतिशय लाजतात. कांहीं मुलें कोणतीहि गोष्ट न करतां तासचे तास एकटींच विचार करीत स्वस्थ बसतात. कांहीं मुलांस मोडतोड करण्याची फार खोड असते. कांहीं मुलांस काळोखाची भीति वाटते. कांहीं मुलांस झोपेंत लघवी होण्याची खोड असते. कांहीं मुलें दुसऱ्याच्या वड्याळें वगैरेसारख्या वस्तु चोरतात. कांहीं मुलें मधून मधून दुर्मुखलेलीं दिसून येतात. कांहीं मुलांस मार मिळाला तरी त्याबद्दल त्यांस कांहीं वाटत नाहीं व तीं कोडगीं बनतात. कांहीं मुलांस घरांतून कांहीं वस्तु नेऊन बाहेर विकण्याची संवय असते. कांहीं मुलांस मुळींच मित्र करतां येत नाहींत. कांहीं मुलें फार अप्पलपोटीं असतात. कांहीं मुलांस आपलें चित्त एकाग्र करतां येत नाहीं. कांहीं मुलांस सांगितलेली गोष्ट लवकर समजत नाहीं. कांहीं मुलांस वरचेवर शाबासकी मिळणें अवश्य असतें व तेवढ्यापुरतीं तीं चांगलीं

वागतात. कांहीं मुलांची वाढ प्रथम अतिशय मंद व पुढें जलद होत असते.

### मुलाच्या मनाचें आकर्षण व त्यास उत्तेजन—

अशा मुलाच्या बाबतींत एक महत्त्वाचा प्रश्न असतो. तो हा कीं, अशा मुलाची चमत्कारिक वृत्ति अगर वागणूक पूर्वी कधीं दृष्टीस पडली होती काय? या प्रश्नाचीं अनेक उत्तरें येण्याचा संभव असतो. कांहीं मुलें अव्यवस्थित असल्याचें दृष्टीस पडतें, याचें कारण त्यांचीं कामें त्यांच्याकरितां दुसरे कोणीतरी करीत असतात. कांहीं मुलें भित्रीं असतात असें सांगण्यांत येतें. अशा वेळीं तीं घरच्या माणसांस सोडून कधींच राहिलेलीं नसतात असें दिसून येतें. कांहीं मुलें अशक्त असतात तेव्हां तीं अशक्त म्हणून त्यांचे विशेष लाड केलेले असतात असें दिसतें. अशा बाबतींत मुलाचें मन आपणांकडे ओढून घेऊन त्यास उत्तेजन देणें आवश्यक असतें. तसेंच मुलाच्या मनांत जो कमकुवतपणा आला असेल तो घालविणें हेंच मुख्य काम असतें. मुलापेक्षां मुली कमी दर्जाच्या असतात अशी जी समजूत आहे तिचाहि मुलांच्या वागणुकीवर फार मोठा परिणाम होतो. या बाबतींतहि त्यांची योग्य समजूत करून देऊन मुलगे व मुली यांस पुढें जरी निरनिराळ्या प्रकारचीं कामें करावयाचीं असलीं तरी त्यांची योग्यता सारखीच आहे ही गोष्ट मुलांच्या मनावर बिंबविली पाहिजे.

### मुलाच्या वर्तनांतील हेतु व त्यास इष्ट वळण—

मुलाच्या वागणुकींतील हेतु अथवा तो करीत असलेल्या क्रियेची किंमत अथवा महत्त्व या गोष्टीहि विचारांत घेऊन त्यांचा त्याचें वर्तन सुधारण्याकडे उपयोग करून घेणें हीहि गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे. लहान मुलाच्या हातीं आगकाडी लागली तर ती घेऊन पेटवावी

हें त्यास स्वाभाविकपणेंच वाटतें. परंतु ही काडी एखाद्या दाराच्या पडद्यास लावणें किंवा बागेंतील कचऱ्याच्या ढिगास लावणें यांपैकीं दोन्हीहि गोष्टी त्या मुलाच्या हातून घडणें स्वाभाविक आहे. परंतु दुसरी गोष्ट उपयुक्त आहे, तर पहिली नुकसानकारक आहे. यांमध्यें कोणताहि नैतिक प्रश्न उत्पन्न होत नाहीं आणि दोन्हीहि गोष्टी स्वाभाविक असल्यामुळें लहान मुलाच्या दृष्टीनें बरोबर असतात. त्याच-प्रमाणें एखादें मूल बागेंत गेलें असतां तेथील चांगलीं रोपें उपटणें किंवा नको असलेलें तण उपटणें या दोन्हीहि गोष्टी त्याच्या दृष्टीनें स्वाभाविक व बरोबर असूनहि पहिली हानिकारक असून दुसरी उपयुक्त असते. लहान मुलानें केव्हां केव्हां आपल्या संभाषणांत भाग घेणें आवश्यक असतें, परंतु तोच वाजवीपेक्षां जास्त घेतला असतां त्रासदायक वाटतो. तसेंच लहान मुलानें आपलें स्वतःचें अथवा त्यानें केलेल्या वस्तूंचें मोठ्या माणसापुढें प्रदर्शन करणें आवश्यक असतें; पण त्यानें आपला फार वेळ घेणें किंवा एकट्यानेंच सर्व लोकांचें लक्ष वेधून घेणें योग्य नसतें. अशा बाबतींत योग्य त्या मर्यादा संभाळणें हेंच फार महत्त्वाचें व कौशल्याचें असतें.

**हें इष्ट वळण कसें लावावें?—**

ह्याकरितां मुलास जें स्वातंत्र्य द्यावयाचें तें त्याच्या स्वाभाविक प्रवृत्ती अथवा मनाचा कल हानिकारक गोष्टींच्या ऐवजीं उपयुक्त गोष्टी कर-ण्याकडे वळवून नंतर दिलें तर त्याचा उपयोग होतो व अशा तऱ्हेनें त्याच्या मनाच्या प्रवृत्ती योग्य दिशेकडे वळविणें याच बाबतींत मुलाच्या आईबापांनीं आपलें चातुर्य खर्च करावें लागतें व ही गोष्ट घडवून आणण्याकरितां त्यांना पुष्कळ वेळ खर्च करावा लागतो व मोठ्या धिमेपणानें या गोष्टी घडवून आणाव्या लागतात व असा वेळ घालविणें

हें फार उपयुक्त ठरतें. कारण मुलांच्या ठिकाणीं आपलें प्रेम आहे असें त्यांस दिसून येण्यास त्यांस पुष्कळ स्वातंत्र्य देणें जरूर असतें. व या गोष्टीचा त्यांचा स्वभाव बनविण्याकडे चांगला उपयोग होतो. वर सांगितलेल्या गोष्टींमध्यें मुलांचा कल योग्य दिशेकडे कसा वळवितां येईल हें आपण थोडक्यांत पाहूं. वरील आगकाडीचेंच उदाहरण घ्या. मुलास आगकाडीचा उपयोग नीट समजावून द्यावा; आणि आपल्या डोळ्यांदेखत त्याच्याकडून विस्तव पेटवून घ्यावा. तसेंच त्यास भलत्याच ठिकाणीं आग लावली असतां तीपासून कोणती भीति आहे तें नीट समजावून सांगून योग्य त्या ठिकाणीं आग लागली असतां कसा उपयोग होतो हें त्याच्या मनावर नीटपणें बिंबवून द्यावें. तसेंच बागेमध्यें असलेल्या निरनिराळ्या झाडांपैकीं चांगलीं झाडें कोणतीं व निरुपयोगी तण कोणतें यांतील फरक त्यास नीट समजाऊन देऊन तण तेवढें कसें उपटून टाकावयाचें तें त्यास दाखवून तें उपटण्याच्या कामीं त्यास उत्तेजन द्यावें. जर त्याच्या हातून प्रथम चुका झाल्या तर त्याबद्दल त्यास रागें न भरतां जेवढें तो चांगलें काम करील तेवढ्याबद्दल मात्र त्यास शाबासकी द्यावी. संभाषणाच्या बाबतींतसुद्धां जेव्हां जेव्हां मुलाशीं संभाषण करण्याचा प्रसंग येईल त्या त्या वेळीं तें करीत जावें. त्याच्या मनांत आपणांस काय सांगावयाचें असेल त्याकडे नीट लक्ष द्यावें आणि त्यास आपण एकट्यानेंच बोलत राहतां कामा नये, तर इतरांसहि योग्य तो अवसर दिला पाहिजे किंवा कोणत्या आवाजांत बोललें पाहिजे, तें नीट समजावून सांगावें. त्यानें जर कांहीं बरोबर मतें मांडलीं तर त्यांबद्दल त्याची स्तुति करावी व फार लहान वयांत त्याच्याकडून विशेष अभिरुचि वगैरेची अपेक्षा करूं नये. प्रदर्शनाच्या बाबतींतहि मुलानें जर गाऊन

किंवा नाचून दाखविलें अथवा कांहीं हावभाव केले तर त्यास उत्तेजन द्यावें. कारण हे सर्व प्रकार महत्त्वाचे आहेत. आपल्या उदाहरणानें त्याच्या ठिकाणीं चांगली अभिरुचि उत्पन्न करावी व योग्य अभिरुचि उत्पन्न करण्याच्या बाबतींत जरूर तेवढ्याच वेळीं मुलाच्या कृतीवर निर्बंध घालावे. केव्हांहि त्यास केवळ नैतिक दृष्टीनें अथवा पोकळ डौल म्हणून एखाद्या गोष्टीपासून परावृत्त करूं नये.

**योग्य प्रवृत्तीस उत्तेजन—**

दुसरें एक उदाहरण घेतलें असतां ही गोष्ट विशेष स्पष्ट होईल. मुलें केव्हां केव्हां दिवाणखान्याच्या भिंतीवरच चित्रें काढून ठेवतात असें दिसून येईल. वास्तविक चित्रें काढणें ही एक विधायक कलेकडे प्रवृत्ति आहे. मुलानें किंवा मुलींनीं चित्रें काढणें आवश्यक आहे. परंतु तीं भिंतीवर काढतां कामा नये. अशा वेळीं एखाद्या मुलानें जरी दिवाण-खान्यांत चांगल्या ठिकाणीं चित्र काढून भिंत खराब केली तरी त्यास पहिल्याच वेळीं रागें भरणें योग्य होणार नाहीं. त्याचे उलट जर आपण त्या चित्राची प्रशंसा केली तर फारच चांगलें होईल. मात्र त्यावेळीं असें म्हटलें पाहिजे कीं, ‘मला हें चित्र फारच आवडलें. हें चित्र फार सुंदर आहे, परंतु तें एखाद्या कागदावर काढलें असतें तर फार चांगलें झालें असतें कारण चित्रें कागदावर काढावयाचीं असतात. तेव्हां मला एक असें चित्र कागदावर काढून दाखव पाहूं.” असें म्हणून त्यास कागद पेन्सील देऊन कागदावर चित्र काढण्यास सांगावें. त्यानें त्याप्रमाणें चित्र काढल्यावर त्या चित्राची स्वतः प्रशंसा करून इतरांकडूनहि करवावी. नंतर त्या मुलास एखादें सुंदर पुस्तक व चित्र काढण्याचीं साधनें देऊन त्यास चित्रें काढण्यास सांगावें व तशीं तो काढूं लागला म्हणजे मधून मधून त्याची प्रशंसा करीत जावी. असें

केल्यास बहुतेक तें मूल पुन्हा भिंतीवर चित्रें काढणार नाहीं व जर त्यानें काढलीं तर भिंतीवरील चित्रांपेक्षां कागदावरील चित्रें आपणांस अधिक आवडतात व भिंत ही चित्रें काढण्याची जागा नसून तीवरील चित्रांपासून आपणांस मुळींच आनंद होत नाहीं असें त्यास स्पष्टपणें बजावून सांगावें. अशा रीतीनें त्या मुलाच्या ठिकाणीं असलेल्या कलात्मक प्रवृत्तीस अधिक स्वातंत्र्य मिळून तें मोठ्या आनंदानें चित्रें काढूं लागेल व कदाचित् त्यास चित्रें काढण्यांतच विशेष मौज वाटूं लागून पुढें तें मूल चित्रकाराच्याच धंद्यांत प्रवेश करून यशस्वी व सुखी होण्याचाहि संभव आहे.

**चांगल्या प्रवृत्ती दाबून टाकूं नये—**

याचे उलट जर आपण त्यानें पहिल्याच भिंतीवर काढलेल्या चित्राबद्दल त्याला नांवें ठेवलीं व शिक्षा केली तर चित्रें काढण्याच्या कलेपासून मिळणारा सर्व आनंद आपण त्याजपासून हिरावून घेऊं एवढेंच नव्हे तर त्याची जी कलात्मक प्रवृत्ति असेल तिची स्वाभाविक वाढहि आपण खुरटून टाकूं. तें मूल त्यानंतर कदाचित् एक सुद्धां चित्र काढणार नाहीं व शाळेंतील चित्रकलेच्या धड्यांतहि त्यास त्रास व कंटाळा वाटूं लागेल. आणि उलट मुद्दाम हट्टानें तें भिंतीवर खराब चित्रें काढून ठेवीत जाईल. उत्तर वयांतहि कदाचित् त्याच्या ठिकाणीं कलेबद्दल द्वेष उत्पन्न होईल आणि चित्रसंग्रहापासून वगैरे मिळणाऱ्या आनंदासहि तें मुकेल. जर तें मूल पुढें घरें बांधण्याचा आणि त्यांचे नकाशे काढण्याचा धंदा करूं लागलें तर त्यांतहि त्यास विशेष आनंद वाटणार नाहीं व त्यामुळें तें त्या धंद्यांत यशस्वीहि होणार नाहीं.

## पूर्वसंस्कारामुळें मनाची वृत्ति—

लहान मुलांच्या बाबतींत कांहीं विधानें पिढ्यान्‌पिढ्या संवयीनें चालत आलेलीं आपणांस आढळून येतात. त्या विधानांच्या अर्थांचा, हेतूचा किंवा त्यांच्या परिणामांचा कोणी विचारहि करीत नाहीं. यावरून मुलाच्या बाबतींतील आपली दृष्टि बाह्यतः व आपल्या जाणून-बुजून होणाऱ्या वागणुकींत जरी बदलली असली तरी अजाणतां आपण अशा अनेक गोष्टी करतों त्यामध्यें बदललेली नाहीं. आपल्या मनावर फार पूर्वींपासूनचे जे धार्मिक संस्कार घडलेले असतात व जी ध्येयात्मक प्रवृत्ति आपल्या मनांत उत्पन्न झालेली असते, तीमुळें आपण मूल होण्यापूर्वींपासूनच त्याचेवर प्रेम करूं व प्रेम करण्याशिवाय दुसरी कोणतीहि गोष्ट आपल्या हातून होणार नाहीं अशा तऱ्हेचे विचार मनांत बाळगीत असतों. आपणांस तीं परमेश्वरी देणगी आहेत असें वाटत असतें व त्यांचेकरितां आपण कोणताहि स्वार्थत्याग अगदीं आत्मत्यागापर्यंतचाहि करण्यास तयार असतों व या उपकारांची तीं मुलें पुढें फेड करतील अशी आपली अपेक्षा असते.

## वास्तविक मानसिक स्थिति—

परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति तशी नसते. ती पुढें लिहिल्याप्रमाणें असते. मनुष्यप्राण्यामध्यें जी मातृपितृप्रवृत्ति स्वभावजात असते तिची वाढ सामान्यतः इतर उच्च दर्जाच्या प्राण्यांपेक्षां फारशी अधिक झालेली नसते. तिचा अर्थ एवढाच असतो कीं, मुलाबद्दलची आपली वृत्ति सामान्यतः प्रेमळ असून त्यांचें संरक्षण व जोपासना करावी असें आपणांस वाटत असतें, व त्याकरितां थोडासा त्यागहि करण्याची आपली तयारी असते. परंतु एवढ्याच वृत्तीनें आपलें समाधान होत नाहीं. आपली इच्छा मुलानें पूर्णपणें आपल्या तंत्रानें चालावें अशी असते, व तें मूल जर

या प्रवृत्तीच्या विरुद्ध गेलें तर वात्सल्याच्या जागीं रागाचा प्रादुर्भाव होतो व आपण त्या मुलावर तो राग काढूं लागतों; आणि कधीं कधीं त्यास कठोरतेनेंहि वागवतों.

**अपत्यप्रेमाचें प्रदर्शन—**

आपल्या मनांत ज्या भावना असतील त्या आपणासच अनुकूल असाव्या अशी आपली इच्छा असल्यामुळें आपण आपल्या अपत्या-बद्दलच्या मनांतील भावना आणि आपले व त्याचे संबंध या गोष्टींचा नीट विचार करून त्यांचें कधीं पृथक्करण करीत नाहीं, उलट अशा तऱ्हेची प्रवृत्ति आपण दाबून टाकून तिच्या ठिकाणीं तिच्या उलट तऱ्हेच्या प्रवृत्तीची वाढ करीत असतों. व त्यामुळें आपण एक तऱ्हेच्या भ्रामक प्रेमाच्या आहारीं जाऊन त्याच्या अनुरोधानें मुलाची काळजी घेण्यांत व त्याची सेवा करण्यांत आपल्या बुद्धीस न पटेल इतक्या मर्यादेपर्यंत आत्मत्याग करण्यांत आनंद मानूं लागतों व अशा तऱ्हेच्या वृत्तीमध्यें आपण स्वतः असल्यामुळें आपण आपल्या मुलावरील प्रेमाचें वाजवी-पेक्षां अधिक प्रदर्शन करतों. त्यांना आपल्यावर वर्चस्व मिळवूं देतों, व त्यांचे एक प्रकारें सर्वस्वीं चाकर बनतों. याप्रमाणें त्यांचे अतिशय लाड झाल्यामुळें तीं मुलें पुढें मोठेपणीं बिघडतात, व याचें कारण केवळ आपलें त्यांच्यावरील अवास्तविक प्रेम व त्यांस सर्वस्वीं आपल्या तंत्रानें वागविण्याची इच्छा हींच कारण असतात.

**मुलावरील वर्चस्व—**

मुलाकरितां आत्यंतिक त्याग करण्याची आपली तयारी असली व आपण जणूं कांहीं पूर्णपणें त्याच्या चाकरासारखे वागूं लागलों तरी एक प्रकारें आपलें वर्चस्व त्याच्यावर पूर्णपणें असावें ही आपली

इच्छा कायमच असते, व ती एका दृष्टीनें त्याचे लाड पुरवीत असतां अतृप्त राहिल्यामुळें अधिकच वाढलेल्या स्वरूपांत दृष्टीस पडूं लागते, व तें स्वरूप म्हटलें म्हणजे त्या मुलावरील आपलें नैतिक वर्चस्व हें होय.

## मुलाबरोबर बोलण्याची पद्धति—

अशा वेळीं आपण मुलास तूं अमुक करूं नकोस किंवा अमुक केल्यास तुला शिक्षा करीन असें न सांगतां अमुक गोष्ट केली तर तें चांगलें व अमुक गोष्ट न केली तर तो द्वाडपणा होय असें सांगतों. अमुक गोष्ट करणें तुझ्या हिताचें आहे, अमुक गोष्ट तूं करावीस अशी देवाची इच्छा आहे, अमुक गोष्ट तूं केली नाहींस तर देव तुला शिक्षा करील अशा स्वरूपांतहि केव्हां केव्हां आपण त्यास सांगत असतों.

## अप्रत्यक्ष शब्दप्रयोग—

अशा वेळीं बहुधा आपण अप्रत्यक्ष प्रयोग करीत असतों ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. आपणा स्वतःसंबंधीं बोलतांना आपण प्रत्यक्ष न बोलतां आपणांस टाळून बोलण्याचा प्रयत्न करतों व मुलानें विशिष्ट गोष्ट चांगली आहे म्हणून करावी असें न सांगतां ती देवास आवडते म्हणून करावी असें सांगतों. अशा वेळीं अर्थात् दोन्हीहि प्रकारांत त्यानें ही गोष्ट न केली तर त्यास शिक्षा मिळण्याचा धाक हा असतोच. अशा वेळीं त्या मुलानें जर एखादी गोष्ट आपल्या आईबापांच्या मर्जीविरुद्ध केली तर त्या आईबापांच्या मनांत मुलानें ती करतांना कोणते विचार येत असतील त्या विचारांचें आपण जर पृथक्करण केलें तर त्यांत आपणांस पुढीलप्रमाणें विचारांची परंपरा असलेली आढळून येईल. ज्या गोष्टींची त्यांस स्पष्ट जाणीव असेल त्या

गोष्टी अशा:-मी तुझ्यावर पुष्कळच प्रेम करतों पण तूं मात्र जी गोष्ट करीत आहेस ती द्वाडपणाची आहे. ती करण्यापासून मी तुला परावृत्त करणार नाहीं, पण तीमुळें तुलाच त्रास होईल अगर देव तुला शिक्षा करील. याकरितां ती तूं आतां करूं नयेस व पुढेंहि केव्हांदेखील करूं नये. ज्या गोष्टींची त्या आईबापांस प्रत्यक्ष जाणीव नसेल अशा गोष्टी ज्या त्यांच्या मनांत असतील त्या अशा:—माझ्या इच्छेविरुद्ध जर तूं कांहीं केलेंस तर मला राग येईल म्हणजे मी तुझ्यावर प्रेम करणार नाहीं व तुला शिक्षा करीन. तेव्हां तूं ती गोष्ट करूं नकोस व पुनः केलीस तर अधिक शिक्षा मिळेल. या वरील दोन गोष्टींकडे आपण पाहिल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, जी गोष्ट आपल्या मनांत असते, पण जिची आपणांस तितकी जाणीव नसते ती प्रत्यक्ष उघड किंवा जाणीव असलेल्या गोष्टीच्या अगदीं विरुद्ध असते. परंतु जी गोष्ट उघड असते तिच्याच प्रमाणें आपल्या तोंडून शब्द बाहेर पडतात किंवा आपण कृति करतों. मुलांना ज्या गोष्टी सांगूं नयेत त्या बहुतेक अशाच प्रकारच्या असतात. त्यांमध्यें मुलावर आपलें पूर्ण वर्चस्व असावें ही अज्ञात इच्छा असून ती अप्रत्यक्ष रीत्या किंवा निषेधात्मक वाक्यानें व्यक्त होते. अशा वेळीं आपण जें बोलतों त्याला अगदीं विरुद्ध रूप दिलें असतां आपल्या मनांतील भाव खरोखरी व्यक्त होतात.

**आत्माभिमानाचा परिणाम—**

जे आईबाप मुलासमोर अशा तऱ्हेचीं विधानें करतात तेच केव्हां केव्हां रागावले असतां त्यांचा तोल सुटून मुलास फार निर्दयपणानें वागवितांना दिसतात. अशा वागणुकीचें ते मुलाच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक म्हणून समर्थन करतात व आपलें त्यांत वैय्यक्तिक कांहीं मुलाविरुद्ध म्हणणें नव्हतें वगैरे सांगतात. तसेंच तें करणें बरोबर

होतें, त्या मुलानें तसें करावयास नको होतें वगैरे गोष्टी सांगतात. अशा तऱ्हेच्या उद्रेकानंतर बहुधा त्या आईबापांस पश्चात्ताप होतो. त्या मुलास इजा झाली आहे काय अशी भीति वाटते व पुनः त्या मुलाचे दुप्पट लाड सुरू होतात. या सर्व गोष्टी जणूं काय स्वतःलाच आपल्या चुकीची मनांतून टोंचणी असल्यामुळें स्वतःच शिक्षा करून घेण्याकरितां करण्यांत येतात. सर्वसाधारण आईबाप अशा तऱ्हेचीं विधानें करणार नाहींत. अशा गोष्टींचा परिणाम प्रत्यक्षापेक्षां अप्रत्यक्ष रीतीनें मुलावर जास्त होतो. तेव्हां अशा तऱ्हेचीं विधानें करणाऱ्या मनुष्याची मानसशास्त्रज्ञाकडून तपासणी करून घेतली पाहिजे.

## केवळ प्रश्नार्थक भाषण—

अशाच तऱ्हेचीं दुसरींहि कांहीं विधानें मुलासमोर करण्यांत येतात तींहि बरोबर नसतात. उदाहरणार्थ, मुलास 'तूं असें का केलेंस?' असें जोरानें विचारणें. वास्तविक या प्रश्नाचें सरळ उत्तर हें आहे कीं, त्या मुलास तसें वाटलें म्हणून. आतां एखादी गोष्ट करावीशी वाटणें हें जर मुलाच्या बाबतींत स्वाभाविक असेल तर त्याबद्दल मुलास दोष देण्यांत अर्थ नाहीं. जर त्या गोष्टीचे परिणाम चांगले असतील किंवा विशेष वाईट नसतील तर ती गोष्ट त्यास करूं देण्यास हरकत नाहीं. परंतु ती गोष्ट करणें आवश्यक नसल्यास त्यास तिच्याऐवजीं दुसरी कोणती तरी गोष्ट करावयास सांगितली पाहिजे.

## अमूर्त नीतिपाठ निरुपयोगी—

मुलांचा स्वभाव बनविणें म्हणजे विशिष्ट प्रकारें वागण्याकडे त्यांच्या मनाचा कल होईल असें त्यांस वळण देणें होय. विशेषतः ज्या गोष्टी चांगल्या समजल्या जातात त्या करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली

पाहिजे. अशी प्रवृत्ति प्रत्यक्ष निरनिराळ्या परिस्थितीमध्यें जी आपली वागणूक होईल तीवरून बनत असते. केवळ अमूर्त अशा नीतीच्या कल्पना किंवा पाठ देऊन बनत नसते. आपली अशी समजूत असते कीं, चांगल्या गोष्टी कोणत्या ह्या मुलांस कळल्या म्हणजे त्यांची प्रवृत्ति त्या करण्याकडे होईल. परंतु मुलें प्रत्यक्ष वस्तुस्थितीवरून शिकत असतात. त्यांना विशिष्ट प्रकारचे अनुभव यावे लागतात. त्यांना दिलेले अमूर्त असे नीतिपाठ प्रत्यक्ष व्यवहारांत किंवा त्यांच्या इतर मुलांशीं किंवा व्यक्तींशीं होणाऱ्या वागणुकींत त्यांच्या उपयोगी पडत नाहींत.

### खेळीमेळीची वागणूक—

आईबापांनीं मुलांशीं मित्रांप्रमाणें वागावें व त्यांस आपल्याबरोबर वागतांना कधीं संकोच वाटूं देऊं नये. त्यांच्याशीं खेळण्यांत किंवा हंसण्याखिदळण्यांत कमीपणा मानूं नये. यामुळें तीं आपणांशीं अधिक मोकळेपणानें वागूं लागतील व आपल्या मनांतील गोष्टी सहज बोलून दाखवितील व त्यांसहि आपल्या मनांतील विचार व चांगल्या वाईटाबद्दलच्या कल्पना सुलभतेनें सहज हंसत खेळत व खेळांतच कांहीं अनुभव आणून देऊन सहज सांगतां येतील व त्यांच्या मनांवरहि ठसवितां येतील.

### मुलाचा स्वभाव बनण्याची क्रिया सतत चालू असते—

मुलांचा स्वभाव त्यांना घरीं अथवा शाळेंत दिलेल्या नैतिक पाठां-वरून बनतो अशी आपली समजूत असल्यास ती प्रथम टाकून दिली पाहिजे. स्वभाव बनण्याची क्रिया ही पाठांकरितां थांबून राहात नाहीं. ती मुलाच्या जागृत अवस्थेंत एकसारखी तें जेथें असेल तेथें घरीं,

शाळेंत, रस्त्यावर किंवा क्रीडांगणांत चालूच असते. त्याच्या जी जी गोष्ट दृष्टीस पडते अथवा कानावर येते तिचा त्याच्या मनावर परिणाम होत असतो. आपण दिलेल्या धड्यांपेक्षां मुलाला जे अनेक प्रकारचे अनुभव येत असतात त्यांमुळेंच तें शहाणें होत असतें व त्याचा स्वभाव बनत असतो, ही गोष्ट लक्षांत आली तर आपण मुलांच्या सभोंवतीं असलेल्या परिस्थितीची अधिक काळजी घेत जाऊं.

शाळेंत व खेळण्याच्या जागीं मुलांचा दुसऱ्या मुलांशीं, मुलींशीं व कमी अधिक वयाच्या इतर माणसांशींहि संबंध येतो. शाळेंत त्यांच्या कानीं जें जें पडतें व त्यांची मित्रमंडळी निरनिराळ्या गोष्टींबद्दल जीं मतें प्रदर्शित करतात त्यांवरून त्यांच्या विचारास दिशा लागते. घरांतीलहि परिस्थितीचा त्यांच्या मनावर परिणाम होतो. त्यांच्या आई-बापांस ज्या गोष्टींबद्दल आदर, तिरस्कार प्रेम अथवा द्वेष वाटत असतो त्यांबद्दल त्यांच्याहि मनांत तेच विकार उत्पन्न होतात. त्यांच्या कानांवर सहजगत्या जरी एखादी गोष्ट पडली तरी तिचा त्यांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. याकरितां आईबापांनीं आपलें वर्तन अतिशय जपून व निर्दोष ठेविलें पाहिजे.

## घरांत स्वातंत्र्य व प्रेमळ वागणूक—

मुलांस घरांमध्यें स्वातंत्र्य व प्रेमळ वागणूक यांची आवश्यकता असते. शक्य तर त्यांस स्वतंत्र खोली असून तीमध्यें त्यांस आपल्या वस्तू व खेळणीं वगैरे ठेवण्यास व आपल्या मित्रमंडळीशीं खेळण्यास जागा असावी. आपल्या मुलांनीं आपली मित्रमंडळी घरीं आणण्यास त्यांस उत्तेजन देण्यांत यावें म्हणजे तीं कोणाशीं मैत्री करितात हेंहि आपणांस समजून येईल. आणि त्यांच्यावराहि आपली अधिक नजर

राहील. पण आपल्या मुलांच्या मनांत इतर मुलें आपल्या घरीं येतात व आपलीं खेळणीं वापरतात यावरून आपण इतर मुलांपेक्षां श्रेष्ठ आहों, अशी भावना उत्पन्न होणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे.

## सत्यप्रियता—

मुलांचा स्वभाव बनविणें अथवा शीलसंवर्धन यामध्यें मुलांच्या ठिकाणीं मुख्यतः सत्यप्रियता, स्वावलंबन, संयम, धैर्य, संवेदना आणि बुद्धि या गुणांचा विकास करणें या क्रियेचा अन्तर्भाव होतो. नैतिक शिक्षणाचा मुख्य हेतु सत्यप्रियता उत्पन्न करण्याचा असतो. मुलांची असत्य भाषणाकडे सामान्यतः भीतीमुळें प्रवृत्ति होते. स्वाभाविकतः त्यांस असत्य भाषण करावें असें वाटत नाहीं. परंतु शिक्षा वांचविण्याकरितां किंवा दुसऱ्या मुलांचें पाहून तीं असत्य भाषणास प्रवृत्त होतात. याकरितां त्यांच्या मनांतील भीति घालवून असत्य भाषण हें वाईट आहे असें त्यांस समजावून दिलें असतां सहसा तीं असत्य भाषण करण्यास प्रवृत्त होणार नाहींत. तसेंच आईबापांनींहि स्वतः सत्यप्रिय असलें पाहिजे तरच त्यांच्या शिकवणीचा मुलांवर इष्ट तो परिणाम होईल. मुलांस शिक्षेचा वगैरे खोटाच धाक दाखविणें हेंहि एक प्रकारचें असत्यच होय. याकरितां तें टाळलें पाहिजे.

## मुलांचे प्रश्न व त्यांस उत्तरें—

निर्भयपणानें वागविलेलीं मुलें अनेक प्रकारचे व केव्हां केव्हां उत्तरें देण्यास अतिशय अवघड असे प्रश्न विचारतात. त्या सर्वांचीं खरीं उत्तरें आईबापांनीं दिलीं पाहिजेत व तींहि मुलांस समजतील अशा सोप्या भाषेंत दिलीं पाहिजेत. विशेष अवघड अशा शास्त्रीय प्रश्नांखेरीज ‘ तूं मोठा झालास

म्हणजे तुला समजेल' असें उत्तर सहसा देऊं नये. सत्यप्रियतेमुळें मुलांची सत्यसंशोधनाकडे प्रवृत्ति झाली पाहिजे व प्रत्येक गोष्टीची सत्यता ताडून पाहून व तिचीं कारणें समजून घेऊन निश्चित करण्याकडे प्रवृत्ति झाली पाहिजे. मुलांस कोणतीहि गोष्ट केवळ आप्तवाक्य म्हणून मान्य करण्यास सांगूं नये. तर त्यांची चिकित्सक वृत्ति संवर्धित करीत जावी. अर्थात् लहान मुलें सामान्यतः बापानें सांगितलेली गोष्ट खरी मानून चालतात. एका बापानें मुलास सर्व खाऊ एकदम खाल्ल्यास आजारी पडशील असें सांगितलें. मुलानें त्याचें न ऐकतां सर्व खाऊ एकदम खाऊन टाकला. पण लवकरच आजारी पडल्यामुळें आपला बाप सांगत होता तें खरें होतें ही गोष्ट त्यास पटली व हा अनुभव अर्थातच तो कधीं विसरला नाहीं.

## मूल स्वावलंबी कसें होईल—

मूल मोठें झाल्यावर तें आपोआपच स्वावलंबी होईल असें आपणांस वाटत असतें. परंतु त्याचें खरोखर स्वावलंबी होणें हें त्यास मिळालेल्या शिक्षणावर व संधीवर अवलंबून असतें. मुलास फार लाडांत वाढविलें तर त्यास जगांत आल्यावर एकदम भांबावून गेल्यासारखें होतें. मुलास लहानपणीं कोणतेंहि काम करूं दिलें नाहीं व त्याचीं सर्व कामें आईबापांनींच केलीं तर त्यास स्वतः कोणतीहि गोष्ट करतां येणार नाहीं. मँटेसोरीच्या पद्धतीमध्यें ज्या गोष्टी घरीं मुलांची आई करते अशा किती तरी गोष्टी मुलांस स्वतः करावयास शिकविण्यांत येतात. तीं स्वतः खातात, स्वतः हातांनीं जेवतात, स्वतः कपडे घालतात व आपल्या वस्तू जागच्या जागीं ठेवतात व या गोष्टी तीं हौसेनें करतात. अशा रीतीनें मुलांस लहानपणापासून संवय लावल्यास तीं पुढें जगांत आपला मार्ग चांगल्या तऱ्हेनें काढूं शकतात. त्यांना स्वतःची पात्रता

व सामर्थ्य यांची कल्पना येते व जगाबद्दलहि त्यांस वास्तविक ज्ञान होतें. ज्या गोष्टी त्यांस करतां येण्याजोग्या नसतात त्या करण्याचा प्रयत्न करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होत नाहीं व अशा प्रयत्नांत तीं आपला काळ फुकट घालवीत नाहींत व आपणांस झेंपतील अशाच गोष्टी करावयास शिकून तीं आपल्या आयुष्याचा सदुपयोग करतात.

**संयमाची आवश्यकता—**

मनुष्याच्या ठिकाणीं संयमाची गरज दोन बाबतींत विशेष असते. (१) राग येण्याच्या वेळीं आणि (२) मोह होण्याच्या वेळीं. कांहीं मनुष्यांस राग फार लवकर येतो व त्याला अनेक कारणेंहि असतात. मुलें आपला राग तक्रारीचे स्वरूपांत किंवा हट्ट करून दाखवितात. जीं मुलें लहानपणीं राग आला असतां तक्रार करतात, तीं मोठेपणीं आपल्या हक्कांकरितां किंवा स्वाभिमानाकरितां झगडण्यास प्रवृत्त होतात.

मुलांस राग आला असतां त्यांस दोष देण्यापेक्षां त्याचें कारण शोधण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. त्यांस पुरेशी झोंप अगर विश्रांति न मिळाल्यासहि मुलें चिरचिर करूं लागतात. मुलानें विनाकारण हट्ट केल्यास त्याचा गैरवाजवी हट्ट चालूं देऊं नये व त्यास त्याची योग्य मागणी कोणती व अयोग्य कोणती हें समजावून द्यावें. तें जर स्वतः-चीं खेळणीं घेऊन आणखी दुसऱ्याचींहि घेऊन बसेल आणि कोणा-सहि घेऊं देणार नाहीं तर त्याचीं कोणतीं व दुसऱ्याचीं कोणतीं तें नीट सांगून त्याच्या गैरवाजवी मागणीची जाणीव त्यास करून द्यावी व त्याचा हट्ट मुळींच चालूं देऊं नये.

मोहाच्या बाबतींतहि संयम हा फार अवश्य आहे. नाहीं तर भल-त्याच संवयी लागण्याचा संभव असतो. एखाद्या नवीन परिस्थितींत

एखाद्या गोष्टीबद्दल मोह होणें स्वाभाविक असतें. अशा वेळीं ती चांगली किंवा वाईट याबद्दल मनाचा निश्चय झालेला नसतो व तिच्या परिणामाची कल्पना नसते. अशा स्थितींतच संयमाची विशेष आवश्यकता असते. परिणामाचें ज्ञान झाल्यावर मनाचा निश्चय होऊन त्याज्य वस्तूपासून दूर राहण्यास मन तयार होतें व अशा रीतीनें मनुष्यास चांगल्या संवयी लागून अनिष्ट मार्गापासून व प्रसंगापासून तो दूर राहतो. पण अशा संवयी बनेपर्यंत त्यास संयमाची विशेष आवश्यकता असते.

## मुलांची क्रियेकडे प्रवृत्ति—

लहान मुलास नेहमीं कांहीं तरी क्रिया करीत राहणें आवडतें व त्यास केवळ असें करूं नको तसें करूं नको असें सांगून चालत नाहीं. त्याच्या हातांत एखादी वस्तु दिली तर तिचा उपयोग करून पाहण्याची त्यास इच्छा होणारच. याकरितां त्यास कांहींच करूं न देण्यापेक्षां तिचा सदुपयोग कोणता व दुरुपयोग कोणता हें नीट समजावून सांगितल्यास तें सहसा भलतीच गोष्ट करणार नाहीं. ही गोष्ट वर चित्रें काढणें व तण उपटणें या क्रियांचीं उदाहरणें देऊन स्पष्ट केलीच आहे. त्याप्रमाणें प्रत्येक वस्तूचा योग्य उपयोग कोणता व दुरुपयोग कोणता हें त्यास नीट समजावून देऊन शक्यतों योग्य गोष्टी करण्यांतच त्यास आनंद वाटेल अशी योजना करावी म्हणजे तें सहसा अयोग्य गोष्टीकडे वळणार नाहीं व त्याच्या विधायक क्रिया-प्रवृत्तीची इष्ट ती वाढ होऊन तिचा त्याला पुढील आयुष्यांत उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं.

## धैर्य, स्वाभिमान व आत्मविश्वासाची वाढ—

मुलांस अनेक गोष्टींबद्दल भीति वाटत असते. त्यांपैकीं स्वाभाविक अशी फार थोडी असते. अनेक गोष्टींबद्दल त्यांस इतरांच्या साहचर्यानें किंवा त्यांचें पाहून भीति वाटूं लागते. मुलांस शिस्त लावण्याकरितां भीति दाखविण्याचा कधींहि प्रयोग करूं नये. कारण मुलांच्या लहानपणीं मनावर झालेले परिणाम फार दीर्घकालपर्यंत टिकतात. भुताखेतांच्या गोष्टी सांगितल्या असतां मुलें झोंपेंतहि दचकून उठतात व त्यांस काळोख वगैरेचीहि भीति वाटूं लागते. मुलांची भीति घालविण्यास आईबापांनीं स्वतः मुलांच्या समोर कोणत्याहि गोष्टीबद्दल भीति दाखवितां कामा नये. त्यांस भीतिदायक गोष्टी सांगूं नयेत. मुलांस भीति दाखविणें सोपें असतें; पण ती काढणें अवघड असतें. अनेक गोष्टींबद्दलची भीति योग्य स्पष्टीकरणानें नाहींशी करतां येते. काल्पनिक भीतीबद्दलहि त्यांची योग्य समजूत घातली असतां ती दूर करतां येते. सर्प वगैरे प्राण्यांबद्दल मुलांस भीति वाटत असते त्या बाबतींत योग्य काळजी घेण्यास त्यांस शिकविलें पाहिजे. कठीण प्रसंगांत त्यांस धैर्य दाखविण्यास शिकविलें पाहिजे. मुलांमध्यें स्वाभिमान उत्पन्न करणेंहि आवश्यक असतें. त्यामुळेंहि त्यांस धैर्य येऊन बिकट प्रसंगांतून धीटपणानें मार्ग काढण्याची त्यांस संवय होते. तसाच त्यांच्या ठिकाणीं एकदां आत्मविश्वास उत्पन्न झाला म्हणजे त्यांना सहसा भीति वाटणार नाहीं.

## इतरांच्या भावनांची जाणीव—

मुलांमध्यें निरनिराळ्या प्रकारच्या संवेदना व भावना जागृत ठेवणेंहि आवश्यक असतें. त्यामुळें त्यांस न्याय अन्याय कळूं लागतात.

आपणांस ज्याप्रमाणें सुखदुःखाच्या भावना असतात तशा इतरांसहि असतात ही गोष्ट त्यांस माहीत झाली म्हणजे त्यांची इतरांशी होणारी वागणूक न्याय्य होण्याचा संभव असतो. आपल्याप्रमाणेंच इतरांसहि सुखदुःखांची कल्पना असते या गोष्टीची जाणीव मुलांमध्यें झाली म्हणजे तीं स्वतःप्रमाणेंच इतरांच्याहि भावनांकडे लक्ष्य देऊं लागतील व त्यामुळें त्यांच्या ठिकाणची सांधिकवृत्ति व सामाजिक भावना दृढ होत जातील व तीं समाजास उपयुक्त असें कार्य करण्याकडे प्रवृत्त होतील.

## मुलांच्या बुद्धीची वाढ—

मुलांमध्यें बुद्धीची वाढ होणेंहि आवश्यक असतें. बुद्धीचा उगम जिज्ञासेपासून होतो. जिज्ञासा प्रौढ माणसांपेक्षां मुलांमध्यें अधिक असते. मुलांस नवीन नवीन गोष्टींबद्दल कौतुक व आनंद वाटत असतो, तितका प्रौढ माणसांस वाटत नाहीं. मुलांची जिज्ञासा त्यांस समजेल अशा भाषेंत नेहमीं पूर्ण केली पाहिजे. त्यांना भलत्याच गोष्टी सांगून किंवा तूं अजून लहान आहेस मोठा झाल्यावर तुला समजेल असें सांगून त्यांची कधींहि वंचना करूं नये. जिज्ञासेच्या मुळाशीं नवीन गोष्टींचें ज्ञान होण्याची बुद्धि असावी. दुसऱ्याचे दोष अगर उणेपणा समजून घेण्याची बुद्धि नसावी. जिज्ञासेची वाढ निरीक्षणाची संवय, धिमेपणा, उद्योग, ज्ञानवर्धनाची हौस आणि मनाचा मोकळेपणा या गोष्टींनीं होते.

## लैंगिक शिक्षणाची आवश्यकता व दिशा—

मुलांचें शीलसंवर्धन योग्य प्रकारें होण्यास त्यांस लैंगिक शिक्षणाचीहि आवश्यकता असते. लैंगिक शिक्षणाकडे पाठ फिरविण्याची अनेक लोकांची प्रवृत्ति असते. विवाहापूर्वी या शिक्षणाची आवश्य-

कता नाहीं असेंहि कांहीं लोकांस वाटतें व विवाहोत्तर तें मुलांस सहज येतें अशी कांहीं लोकांची समजूत असते. या लैंगिक ज्ञानांत व इतर विषयांच्या ज्ञानांत आपण भेद करतों. इतर सर्व गोष्टींचें ज्ञान आपण मुलांस देतों; परंतु या विषयापासून त्यांस अगदीं दूर ठेवतों. परंतु अशी डोळेझांक करून या प्रश्नाचा निकाल लागण्यास मदत होत नाहीं. उलट मुलांची जिज्ञासा गुप्तपणाकडे होते. तीं आपल्या संवगड्यापासून असें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतात व त्यामुळें स्त्रीपुरुषविषयक संबंधाच्या या सरळ कल्पनेस भलतेंच वळण मिळतें व त्यांच्या भलत्याच समजुती होतात. मुलांस लैंगिक विषयासंबंधीं इतर विषयांप्रमाणेंच सरळ ज्ञान देण्यास हरकत नाहीं. प्रथम त्यास तद्विषयक आरोग्यासंबंधीं व शारीरिक रचनेसंबंधीं ज्ञान द्यावें. तसेंच अलीकडे शहरांत वाढणाऱ्या प्रवृत्तींकडे लक्ष दिल्यास त्यांस इंद्रियजन्य रोगांसंबंधींहि ज्ञान देणें अवश्य आहे व त्यांपासून दूर कसें राहावें या गोष्टीचीहि त्यांस जाणीव असणें अवश्य आहे. मुलें वयांत येण्यापूर्वींच मुलांचा जन्म कसा होतो हें त्यांस समजावून देण्यांत यावें. या वयांत तीं हें ज्ञान घेण्यास अधिक योग्य असतात. त्यांस फुलें, पशु, पक्षी वगैरे कशीं उत्पन्न होतात हें सांगून अशा गोष्टींचें ज्ञान देणें सुलभ होतें. यासंबंधीं कांहीं अवडंबर अथवा घोटाळा माजविण्यापेक्षां सरळ सांगणेंच अधिक चांगलें असतें.

**मुलांमध्यें इष्ट प्रवृत्ति—**

मुलांच्या मनोवृत्तीस योग्य वळण लावण्याकरितां त्या वृत्तींचा कल जर पुढील गोष्टींकडे वळविण्यांत आला तर त्याचा त्या मुलांच्या आयुष्यावर फार योग्य परिणाम होईल.

( १ ) सेवावृत्ति–मुलांच्या मनांत सेवावृत्ति बाणल्यास त्यांचे विचार, भावना, मनोवृत्ति व शारीरिक क्रिया यांस योग्य वळण लागल्याशिवाय राहणार नाहीं. सामाजिक प्रवृत्तींचें मुख्य ध्येय समाजाची सेवा हेंच आहे व आपला आनंद इतरांस सहभागी करून उपभोगणें यांतच सेवावृत्तींचें बीज आहे. या वृत्तीमुळें मनुष्याच्या ठिकाणीं आदर, सदिच्छा, भूतदया व दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते.

( २ ) उदात्तता–या भावनेमुळें मनुष्यामध्यें योग्य अशी महत्त्वाकांक्षा व उच्च ध्येयात्मता उत्पन्न होते आणि तीमुळें मनुष्य स्वतःचा व त्याबरोबर इतरांचाहि उत्कर्ष साध्य करण्यास प्रवृत्त होतो.

( ३ ) आत्मसंयमन– तारुण्यामध्यें ज्या अति साहसी किंवा स्वैर अथवा ध्येयरहित अशा मानसिक प्रेरणा होण्याचा संभव असतो त्या ताब्यांत ठेवून तारुण्यांतील सर्व उत्तेजित वृत्तींचा समन्वय करणें हें या आत्मसंयम वृत्तींचें कार्य होय.

( ४ ) विधायक वृत्ति– या वृत्तीमुळेंच मनुष्य कार्यप्रवण होतो आणि आयुष्यांतील अनेक नवीन नवीन क्रिया करण्याची उत्सुकता त्याच्यामध्यें उत्पन्न होते. याच वृत्तीचें प्रेम हें एक अंग असून त्याला योग्य दिशा लावणें ही या कालांतील अत्यंत महत्त्वाची अशी गोष्ट होय.

## प्रकरण एकोणिसावें

# धार्मिक शिक्षण व परमेश्वरविषयक कल्पना

### अमूर्त गोष्टींची कल्पना करणें अवघड असतें—

लहान मुलाला कोणत्याहि अमूर्त गोष्टीबद्दलची जाणीव अगर भावना होऊं शकत नाहीं. त्यामुळें त्याला देवासंबंधीं कल्पना ग्रहण करतां येत नाहीं. यांत मोठेंसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण अनेक बुद्धिवान् लोकांसहि परमेश्वराबद्दलची नीटशी कल्पना नसते. याकरितां त्यास ती जर कल्पना होत नसेल तर ती त्याकडून करविण्याच्या प्रयत्नास लागूं नये. कारण असा प्रयत्न करणें हें अज्ञानाचें द्योतक आहे व त्या प्रयत्नाच्या पाठीस लागणें म्हणजे तर एक प्रकारची त्या मुलावर सक्ति करणें आहे. अशा प्रयत्नांत जर आईबापांस यश येतें असें वाटलें तर त्या मानानें मुलाच्या मनांत परमेश्वराबद्दल आणि त्यांच्याबद्दल प्रेम उत्पन्न होण्याच्या ऐवजीं द्वेष मात्र उत्पन्न होण्याचा संभव असतो. त्या मुलानें जरी वरून दाखविलें नाहीं तरी मनांतून त्याची वृत्ति अधार्मिक झाल्याशिवाय राहणार नाहीं व त्याला परमेश्वराबद्दल एक प्रकारची भीति वाटत असल्याचें दिसून येईल. तसेंच परमेश्वर हा एक शिक्षा करणारा प्राणी आहे अशी त्याची भावना होऊन आपल्या वडिलांबद्दलहि त्याची तीच कल्पना होण्याचा संभव असतो व त्यामुळें त्याच्या मनांत चांगल्या गोष्टींबद्दल द्वेष व वाईट गोष्टींबद्दल आदर उत्पन्न होतो व जितका तो बाहेरून सद्गुणी दिसेल तितका तो मनांतून दुर्गुणी असण्याचा संभव असतो.

### लहान मुलाच्या मनांतील अस्फुट भावना—

पांच वर्षांच्या लहान मुलामध्यें जर आपणांस विशेष आज्ञाधारकता, नम्रता, खऱ्याची आवड व धार्मिकपणा दिसून आला तर त्यावद्दल फारसा विश्वास बाळगण्याचें कारण नाहीं. कारण वास्तविक लहान मुलामध्यें हे गुण अस्फुट स्थितींत वसत असतात. जर आईबाप कोमल वृत्तीचे, दयाळू व प्रेमळ असतील तर मुलाचीहि ईश्वराबद्दलची भावना त्यांच्यासारखीच बनेल; आणि त्याला ईश्वर ही प्रेमळपणाची मूर्ति वाटेल व परमेश्वर रागावला म्हणजे तो निष्ठुर होतो ही कल्पना त्याच्यामध्यें धार्मिक शिक्षणामुळें बिंबविणें कठीण जाईल. ईश्वर हा प्रेमळ आहे ही बुद्धि लहान मुलांच्या मनामध्यें क्वचितच उत्पन्न झालेली आढळते. त्याच्या उलट मात्र प्रवृत्ति दिसून येते. या दृष्टीनें खिस्ती लोकांचा जुना करार हा लहान मुलांस वाचून दाखविण्यास अगदीं अयोग्य असा ग्रंथ आहे. अशा वेळीं आईबापांनीं आपल्या मुलामध्यें धार्मिक वृत्ति निर्माण होण्याकरितां काय करावें असा प्रश्न विचारल्यास पुढें दिल्याप्रमाणें उत्तर देतां येईल. सामान्यतः मुलामध्यें स्वाभाविकतःच धार्मिक प्रवृत्ति वसत असते व हा संस्कार त्याच्या मनावर अत्यंत दीर्घकालापासून वंशपरंपरेनें वसत असतो. त्याचा उपयोग मात्र करून घेतला पाहिजे. मात्र मुलाच्या मनामध्यें अशा गोष्टींबद्दल जाणीव उत्पन्न झाल्यावर त्याच्या ठिकाणची धार्मिक प्रवृत्ति स्वतंत्र आणि दृढ केल्यानें आपल्यास इष्ट तो परिणाम घडवून आणतां येईल.

### मुलांतील जिज्ञासेचा योग्य उपयोग—

स्वभावतःच मुलांनीं सृष्टिचमत्कारासंबंधीं प्रश्न विचारून परमेश्वरासंबंधीं कल्पना करण्यास सुरुवात करण्यापूर्वीं ती कल्पना त्यांच्यावर

लादण्याचा प्रयत्न करूं नये. सृष्टींतील निरनिराळ्या गोष्टींतील सौंदर्य लहान मुलांच्या दृष्टीस पाडण्याची संधि शक्य तितक्या लवकर घेत जावी. तसेंच मनुष्यप्राणि, वनस्पति, झाडें व इतर प्राणी यांची वाढ कशी होत जाते या गोष्टीकडे त्यांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न करावा. त्याप्रमाणेंच दिवसरात्र, ऋतु, भरती–ओहोटी वगैरे गोष्टी कशा होतात तें त्यांस सांगावें. त्याप्रमाणेंच पाऊस, ऊन, धुकें, हवा, वारा इत्यादि गोष्टींचें महत्त्व त्यांस समजावून सांगावें व अशा गोष्टींचा परिणाम मनुष्याच्या आयुष्यक्रमावर कसा होतो तें त्यांच्या दृष्टीस आणावें. तसेंच निसर्गामध्यें जें सौंदर्य व जी व्यवस्था आढळून येते ती लक्षांत घेण्यास त्यांस उत्तेजन देण्यांत यावें. तसेंच त्यांची स्वतःची वाढ व तीं करीत असलेल्या निरनिराळ्या क्रिया कशा होतात तिकडे त्यांचें लक्ष वेधावें व आरोग्य राहण्याकरितां या क्रियांमध्यें सुसंगति राहिली पाहिजे या गोष्टीचें महत्त्व त्यांस पटवून द्यावें.

**सृष्टींतील सुंदर व्यवस्थेचा नियंता—**

याप्रमाणें मुलाच्या मनांत जगासंबंधीं आणि स्वतःसंबंधीं कांहींशी कल्पना येऊन इतरहि अनेक गोष्टींतील सौंदर्य, व्यवस्था, सुसंगति व अंतर्बाह्य व्यवस्था कशी कुणाच्या तरी देखरेखीखालीं चालल्याप्रमाणें व्यवस्थित रीतीनें चालू आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत आणून दिली तर अशा रीतीनें ही व्यवस्था करणारा कोणी तरी नियंता असला पाहिजे अशी कल्पना त्याच्या मनांत स्वाभाविकपणेंच उत्पन्न होऊन मुलानेंच ती व्यवस्था करणारा कोण असा प्रश्न विचारणें स्वाभाविक होईल आणि त्याच्या मनाची अशी तयारी होईल कीं, अशी नैसर्गिक व्यवस्था ठेवणारा कोणी तरी मोठा, अतिशय दयाळू आणि सौंदर्य व व्यवस्था यांचा चहाता असला पाहिजे. यापेक्षां विशेष महत्त्वाची

गोष्ट ही कीं, हें सर्व विश्व त्यानें सुंदर व आपोआप निर्माण होणाऱ्या वस्तूंनीं भरलेलें असून आपणां स्वतःसहि सुव्यवस्थित असें शरीर व मन हीं सुखोपभोग भोगण्याकरितां दिलीं आहेत, तेव्हां ही कोणी-तरी अतिशय महान् अशी शक्ति असली पाहिजे अशीहि त्याची कल्पना झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा वेळीं त्या मुलाच्या मनावर जर आपण परमेश्वर हा या सर्व सृष्टीचा कर्ता आणि जगांतील सर्व गोष्टींचा चालक व अत्यंत दयाळू असा नियंता आहे असें बिंबविण्याचा प्रयत्न केला तर तें त्यास लवकर पटेल. याच वेळीं परमेश्वराच्या शासन करण्याच्या शक्तीची कल्पना देणें चांगलें नव्हे. ती कल्पना त्यास हळूहळू आपोआपच येत जाईल व अशा रीतीनें परमेश्वराचें सत्य स्वरूप त्या मुलालाच हळूहळू ज्ञात होऊं लागेल. या बाबतींत आपल्या समाजामध्यें जी परंपरागत पद्धति असेल तीच मुलाच्या परिचयाची असल्यामुळें तिचाच अवलंब करणें अधिक श्रेयस्कर होय. यामुळें त्याचा आपल्या समाजाबद्दल व परंपरेबद्दलचा आदरहि इष्ट त्या बाबतींत वाढत जातो व हें फार अवश्य आहे.

त्याप्रमाणेंच मुलाच्या मनांत नैतिक कल्पना शिक्षेच्या भीतीमुळें उत्पन्न करणें ही गोष्टहि अतिशय भ्रामक अशी आहे. यापेक्षां चांगल्या पद्धतीनें मुलाच्या ठिकाणीं हळूहळू नीतीच्या कल्पना उत्पन्न करणें शक्य आहे. त्या स्वाभाविकपणेंच त्याच्या मनांत उत्पन्न होऊं देऊन त्यांची वाढ होण्यास मदत करणें अधिक चांगलें.

**परमेश्वराची प्रार्थना—**

वरीलप्रमाणें परमेश्वराची कल्पना मुलाच्या मनांत त्याच्या प्रश्नांस उत्तर देण्याच्या पद्धतीनें उत्पन्न झाल्यानंतरच त्यास परमेश्वराची प्रार्थना

करण्यास शिकविणें अधिक चांगलें. कारण अशा वेळीं परमेश्वराबद्दलची एक प्रकारची कृतज्ञता बुद्धि आधींच निर्माण झालेली असेल. तसेंच परमेश्वराची प्रार्थना कोणत्या वेळीं करावी व कशा पद्धतीनें करावी याहि गोष्टी लहान मुलाच्या कलानेंच घेणें अधिक चांगलें होईल.

**प्रार्थनेचें फल—**

परमेश्वर आपणांस सर्व गोष्टी आपण प्रयत्न केल्याशिवाय देतो अशी कल्पना मुलाच्या मनांत भरवूं नये. कारण तसें प्रत्यक्ष व वास्तविक खरें नसतें. लहान मूल परमेश्वराची प्रार्थना करीत असतां कधीं कधीं मला अमुक गोष्टी मिळूं दे अशा तऱ्हेची मागणी करतांना आढळून येईल. अशा वेळीं त्याची मागणी जर योग्य असेल तर ती जरूर पुरविण्याची तजवीज करावी. जर अशी एखादी वस्तु त्यास एखादें काम करून बक्षिस म्हणून मिळविण्याची संधि येत असेल तर ती अवश्य द्यावी. तसेंच ती वस्तु आपण देत आहों, स्वतः परमेश्वराकडून प्रत्यक्ष प्राप्त होत नाहीं ही गोष्टहि त्याच्या नजरेस आणावी. आपणांस परमेश्वर देतो अशी भलतीच कल्पना त्याच्या मनांत उत्पन्न होऊं देऊं नये व प्रथमपासूनच जो प्रयत्न करतो त्यास परमेश्वर साहाय्य करतो ही गोष्ट मुलाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करावा व हळूहळू त्याला ही गोष्ट दिसून येऊं द्यावी. जर एखादी मुलानें प्रदर्शित केलेली इच्छा अगर मागितलेली वस्तु मिळणें अशक्य असेल तर ती त्यास कां मिळणार नाहीं तें स्पष्ट सांगावें व तिच्याऐवजीं जर दुसरी चांगली वस्तु त्यास देतां आली तर जरूर द्यावी.

**परमेश्वराबद्दल भावना—**

परमेश्वराजवळ आपण जर भलत्याच गोष्टींची मागणी केली तर त्यास राग येईल असें मुलास कधींहि सांगूं नये. तर परमेश्वरास

आपणांबद्दल काय वाटतें याबद्दलचें त्याचें मत त्यालाच आपल्या अनुभवावरून कळून येऊं द्यावें, व असें हळूहळू कळून येऊं लागलें म्हणजे तें परमेश्वराची प्रार्थना योग्य शब्दांत करूं लागेल व त्याच्या मागण्या व आकांक्षाहि मर्यादित होत जातील. तसेंच लौकरच त्याला असेंहि कळून येईल कीं, परमेश्वर आपल्या इच्छा वडील माणसांमार्फत पुऱ्या करतो आणि त्यामुळें वडील माणसांस जें योग्य दिसेल त्याप्रमाणें तें वागूं लागतें. या बाबतींत आपणांस इतकेंच करणें शक्य आहे, तेव्हां तेवढेंच करून समाधान मानलें पाहिजे. लहान मुलास कधींहि आपण आहोंत त्यापेक्षां अधिक चांगलें व्हावें अशा तऱ्हेची परमेश्वरास प्रार्थना करण्यास शिकवूं नये. कारण त्यामुळें त्यास असें वाटूं लागेल कीं, तें आपणांस आवडत नाहीं, व वडील माणसांस आवडण्याशिवाय किंवा आपलें प्रेम संपादन करण्याखेरीज इतर कोणत्याहि गोष्टींकरितां त्याला अधिक चांगलें व्हावें असें वाटत नाहीं. तसेंच तें मूल ज्या वयांत आपणाला पाहिजे असेल तितकें चांगलें झालें नाहीं तर तो दोष त्याचा नसून आपला आहे. आपण स्वतः मात्र अधिक चांगलें होण्याकरितां परमेश्वराची प्रार्थना करावी अथवा प्रत्यक्ष होण्याचाच प्रयत्न करावा.

ज्या गोष्टीमध्यें परमेश्वर शिक्षा करणारा व सूड घेणारा अशा तऱ्हेचा दिसेल असल्या गोष्टी मुलास सांगण्याचें टाळीत जावें. तसेंच परमेश्वर क्रूरपणास उत्तेजन किंवा मान्यता देतो अशीहि त्याची समजूत होऊं देऊं नये. तसेंच ज्या गोष्टींचें आकलन त्यास होणार नाहीं असल्या गोष्टी त्यास सांगूं नयेत. त्यास शिकवावयाचीं स्तोत्रें, श्लोक वगैरे अगदीं साधीं व सुबोध असावीं. तसेंच ज्यामध्यें निराशा व्यक्त केली असेल किंवा आपण पातकी आहोंत, हें जग नश्वर आहे, यांतून

लवकर सुटका झाली पाहिजे वगैरे सारख्या गोष्टी ज्या स्तोत्रांतून सुचविल्या असतील असलीं स्तोत्रें अगर श्लोक मुलांस कधींहि शिकवूं नयेत.

**प्रत्येक धर्माचें वैशिष्ट्य—**

मुलास धार्मिक शिक्षण देत असतां त्यास स्वतःच्या धर्माचें ज्ञान असलेंच पाहिजे, परंतु त्याबरोबर इतर धर्मांबद्दलहि त्यास आदर व सहिष्णुता वाटली पाहिजे. याकरितां निरनिराळ्या धर्मांतील वैशिष्ट्य त्यास माहीत असलें पाहिजे. जगांत आजपर्यंत जे निरनिराळे धर्मसंस्थापक होऊन गेले त्यांनीं प्रत्येकानें स्वतः कांहीं नवीन गोष्ट शोधून काढली असें नव्हे. तर मागील अनुभवाचा फायदा घेऊन त्यानें मनुष्यजातीस नवीन दिशा दाखविली व कालानुसार त्यांनीं आपल्या शिक्षणपद्धतींत फरक केला एवढेंच. आज जगांत असलेल्या भिन्न भिन्न धर्मांचें वैशिष्ट्य पाहावयाचें झाल्यास आपणांस असें दाखवितां येईल.

हिंदुधर्म—कर्तव्यकर्म. बौद्धधर्म—नैतिक व शुद्ध मार्ग. झरथुष्ट्र धर्म—शुचित्व अथवा शुद्धता. महंमदी धर्म—परमेश्वराचें पितृत्व आणि विश्वबंधुत्व. ख्रिस्ती धर्म—व्यक्तिमत्त्व आणि त्याग. यहुदी धर्म—नियमबद्धता.

धार्मिक शिक्षणामध्यें मुख्यतः प्रत्येक धर्माचे संस्थापक व महत्त्वाच्या व्यक्ति यांच्या चरित्राची माहिती देण्यांत यावी. तसेंच प्रत्येक धर्मांतील महत्त्वाच्या उत्सवांची व तत्संबंधीं कथांची माहितीहि देण्यांत यावी.

## परमेश्वराचें दयालुत्व व न्यायीपणा—

याप्रमाणें परमेश्वर हा दयाळू व न्यायी असून आपण योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास तो आपणांस इच्छित फळ देतो अशी कल्पना मुलामध्यें उत्पन्न होणें श्रेयस्कर होय. तो निष्ठुर असून केवळ आपणांकडून होणाऱ्या चुकांचें निरीक्षण करीत बसला असून आपणांस शासन करण्याचें तेवढेंच काम करतो अशी भावना मुलांमध्यें होणें केव्हांहि रास्त नव्हे. तसेंच परमेश्वराची आपणांवर कृपा झाली असतां आपणांस जो लाभ व्हावयाचा तो जगांतल्या इतर गोष्टींप्रमाणेंच जगाच्या राहाटींतच दिसून येतो, तो कांहीं अकल्पित रीतीनें घडून येत नाहीं व आपल्या सद्वर्तनाचें फळ आपणांस कालांतरानें येथेंच मिळतें अशा तऱ्हेची मुलाची भावना होणें अधिक इष्ट असतें.

## सद्वर्तनावर कटाक्ष—

तसेंच त्याच्या धार्मिक भावना सद्वर्तनावर आधारलेल्या असाव्या. त्या त्यास आपलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास प्रवृत्त करतील अशाच तऱ्हेनें वाढीस लावाव्या व त्याचा जगांतील सत्य सृष्टीवर अधिक विश्वास बसून दूरच्या अगर कल्पनागम्य गोष्टींत त्याचें चित्त रममाण होऊन पारलौकिक किंवा पारमार्थिक कल्याणाच्या अवास्तव कल्पना त्याच्या मनांत दृढमूल होऊन तें प्रस्तुत आयुष्यक्रमापासून विन्मुख होईल किंवा कल्पनांतच रमूं लागेल अशा तऱ्हेची त्याची वृत्ति बनणार नाहीं अशी काळजी घ्यावी.

याकरितां त्यास दैवी चमत्कार किंवा अतिमानुष गोष्टी, व पराक्रमाच्या कथा न सांगतां या जगांत त्यास आढळतील, अनुभवास येतील व आकलन करतां येतील अशींच उदाहरणें दाखवून त्यास देवाच्या दयालुत्वाविषयींच्या व न्यायीपणाच्या कथा सांगाव्या.

## धार्मिक वाङ्मय—

अशा तऱ्हेच्या गोष्टींवर व कथांवर आधारलेलें व प्रत्यक्ष आचरणांत आणतां येतील असे सद्वर्तनाचे नियम सांगणारें वाङ्मयच त्यास धार्मिक वाङ्मय म्हणून वाचावयास द्यावें व अद्‌भुत अथवा दैवी पराक्रमाच्या गोष्टींमुळें त्याचें मन वास्तवतेपासून दूर जाणार नाहीं अशी काळजी घ्यावी. म्हणजे त्याची परमेश्वराच्या दयालुत्वाबद्दल व न्यायी-पणाबद्दल खात्री पटून त्याची परमेश्वराच्या ठिकाणीं निष्ठा बसेल व तें मूल त्यास प्रिय होईल असें वर्तन करण्यास प्रवृत्त होईल.

धार्मिक शिक्षणांतहि कांहीं पद्धति अथवा शिस्त लागावी म्हणून कांहीं स्तोत्रें व प्रार्थना मुलांस शिकवून त्यांचेकडून नियमानें त्यांचें पठण, वाचन वगैरे करवून घ्यावें. मात्र त्यांची निवड वर दर्शित केलेल्या तत्त्वाप्रमाणें करण्यांत यावी.

## प्रकरण विसावें

# मुलांतील कांहीं अनिष्ट प्रवृत्ति

### आत्मप्रवृत्ति व सांघिक वृत्ति यांचा मेळ—

प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं स्वाभाविकपणें स्वतः वर्चस्व मिळविण्याची प्रवृत्ति वसत असते ही गोष्ट आपणांस पूर्वीं दिसून आली आहे. ही प्रवृत्ति अगदीं सहजात असते व ही प्रवृत्ति वास्तविक उपकारकच आहे मात्र हिला योग्य वळण कसें लावावें हें आईबापांचें काम आहे. या प्रवृत्तीमुळें मानसिक दौर्बल्य किंवा अनारोग्य प्राप्त होण्याच्याऐवजीं मानसिक आरोग्य आणि सुख कसें प्राप्त करून घेतां येईल हें पाहिलें पाहिजे व याकरितां या प्रवृत्तीचीच दुसरी बाजू जी सांघिक किंवा सामाजिक प्रवृत्ति तिचा योग्य तो उपयोग आपण करून घेतला पाहिजे. स्वार्थ व स्वार्थत्याग अथवा परार्थ या वरील प्रवृत्तीच्याच दोन बाजू अथवा अंगें असतात ही गोष्ट आपण पूर्वीं पाहिलीच आहे व या दोन प्रवृत्तींचा योग्य मिलाफ करणें यांतच खरोखर मुलाच्या स्वभावास योग्य वळण लावण्याची जबाबदारी ज्या आईबापांवर, पालकावर अथवा शिक्षकावर असते त्यांचें खरें कौशल्य दिसून येतें. जो या प्रवृत्तीस इष्ट तें वळण देऊन त्यांचा उपयोग स्वतः मुलाच्या ठिकाणीं असलेला आत्मविश्वास वाढीस लागून त्याचा उपयोग केवळ आपला स्वार्थ साधण्याऐवजीं स्वतःच्या हितावरोबरच समजाचेंहि कल्याण साधण्याकडे करून घेईल तोच समाजाचा उत्तम घटक व राष्ट्राचा योग्य नागरिक बनेल.

## समाजास हितकर तें योग्य—

याची मुख्य गुरुकिल्ली समाजाच्या हितामध्यें आढळून येते. ज्या गोष्टीचा समाजाशीं संबंध नाहीं अशी कितीहि मोठी गोष्ट मनुष्यानें केली तरी तिला फारसें महत्त्व नसतें. आतांपर्यंत जीं मोठमोठ्या पराक्रमाचीं किंवा महत्त्वाचीं कामें झालीं आहेत त्या सर्वांचा समाजाशीं संबंध असून कर्त्याप्रमाणेंच समाजालाहि त्याचा उपयोग झालेला आहे. याकरितां मुलाला जें शिक्षण द्यावयाचें त्याच्या योगानें त्याच्यामध्यें सामाजिक वृत्ति उत्पन्न होऊन समाजाची सुदृढता प्राप्त होईल अशी गोष्ट करण्याकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति झाली पाहिजे.

ज्या मुलांच्या ठिकाणीं सांघिक अथवा सामाजिक वृत्ति नसेल तीं मुलें चमत्कारिक बनतात. याचें कारण त्यांच्या ठिकाणीं असलेल्या वर्चस्व मिळविण्याच्या प्रवृत्तीस योग्य वळण दिलेलें नसतें. आतां समाजाला उपयोगी काय याबद्दल पुष्कळ मतभेद असूं शकेल. परंतु याची परीक्षा आपणांस एखाद्या झाडाचीं फळें चांगलीं किंवा वाईट हें जसें त्यांच्या उपयोगावरून ठरवितां येतें त्याप्रमाणें ठरवितां येईल. कोणत्याहि कृत्याचा समाजाला उपयोग झाला किंवा नाहीं हें त्याच्या परिणामावरून ठरवितां येतें. अर्थात् याकरितां आपणांस कांहीं काळ थांबावें लागून त्याचे परिणाम पाहावे लागतात. परंतु या सर्व गोष्टी आयुष्याला योग्य दिशेनें वळण लागण्यावर अवलंबून असतात व तें वळण कसें लावावयाचें हाच मुख्य प्रश्न असतो.

आतां मुलाच्या ठिकाणीं असलेल्या वर्चस्वाच्या प्रवृत्तीस चांगलें किंवा वाईट वळण कसें लागतें याची चर्चा करण्यापूर्वीं जीं मुलें कांहींच न करतां केवळ आळशी म्हणून समजलीं जातात त्यांच्याबद्दल प्रथम विचार करूं.

## आळस—

प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं जर वर्चस्व मिळविण्याची प्रवृत्ति जागृत होत असेल तर कांहीं मुलें आळशी कां राहतात हा प्रश्न आहे. अशा मुलांस सामान्यतः कांहीं महत्त्वाकांक्षा नाहीं असें आपण म्हणतों. परंतु ही गोष्ट तितकी खरी नसते. त्याच्याबद्दल इतरांमध्यें कोणत्याहि आकांक्षा उत्पन्न होत नसल्यामुळें तें कांहीं न करतां निष्काळजीपणानें स्वस्थ बसून राहतें व आपलीं कामें आईबापांवर किंवा इतरांवर ढकलून एकप्रकारें स्वतःस प्रामुख्य मिळवतें व या दिशेनेंच पुढें येण्याची प्रवृत्ति कांहीं मुलांच्या ठिकाणीं असल्यामुळें तीं आळशी बनतात. परंतु कांहीं मुलें खरोखरच अपात्र किंवा नालायक असतात. परंतु त्यांस तसें म्हणण्याच्या ऐवजीं आळशी म्हणण्यांत येतें. अमुक मुलानें आळस सोडल्यास तें अमुक गोष्टी करील असें जेव्हां आपण एखाद्या मुलाबद्दल म्हणतों तेव्हां तें स्वतः आपल्या मनांत असें समजतें कीं, आपल्या अंगींहि पुष्कळ योग्यता आहे, केवळ आपण तिचा उपयोग करीत नाहीं इतकेंच! तसेंच अशा मुलानें एखादी गोष्ट केलीच तर तीबद्दल त्याची बाजवीपेक्षां जास्त स्तुति केली जाते व त्यामुळें त्याला आपल्या अपात्रतेची जाणीव न होतां आपल्यांतहि कांहीं योग्यता आहे अशी भलतीच समजूत होते. एखाद्यास नालायक म्हणण्यापेक्षां केवळ आळशी म्हटल्यास त्याला तितकें वाईट वाटत नाहीं व याप्रमाणें मुलांतील आत्मविश्वासाचा अभाव हा आळसाखालीं झांकला जातो आणि त्यामुळें जगामध्यें त्यांच्यापुढें जे प्रश्न उभे राहतात ते सोडविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत नाहीं. अशा मुलांस रागावून अथवा शिक्षा करून कांहींहि उपयोग होत नाहीं. परंतु अकस्मात् त्यांच्याकडून एखादी मोठी गोष्ट घडली किंवा त्यांस एखाद्या कामांत अकस्मात्

यश मिळालें तर त्यांस त्यांच्या ठिकाणीं असलेल्या योग्यतेची जाणीव होऊन त्यांच्या वृत्तींत फरक पडतो; किंवा एखाद्या योग्य शिक्षकाच्या हातांत तीं पडल्यास तो त्यांच्या ठिकाणीं जी पात्रता असेल तिचाच योग्य उपयोग करून व त्यांस उत्तेजन देऊन त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास व धैर्य उत्पन्न करतो. अशा वेळीं जीं मुलें आळशी म्हणून समजलीं जातात तींच एकदम उद्योगी बनतात. कांहीं मुलांनीं शाळा बदलल्यावर त्यांच्यामध्यें परिस्थितीच्या बदलामुळें झालेला फरक आपल्या नजरेस येतो. ही गोष्ट वरील प्रवृत्तीचीच द्योतक आहे. पूर्वीच्या परिस्थितींत त्या मुलाच्या ठिकाणीं जो स्वत:बद्दल हीनभाव अथवा अपात्रतेची जाणीव उत्पन्न झालेली असते ती भिन्न परिस्थितींत निराळा अनुभव आल्यास एकदम नाहींशी होऊन तिच्या ठिकाणीं आत्मविश्वास व धैर्य उत्पन्न होतें आणि स्वत: प्रगति करण्याकडे त्या मुलाची प्रवृत्ति होते. याप्रमाणें प्रथम जें मूल आपणांस नालायक वाटतें तें एकदम सुधारून हुशार बनतें.

कांहीं मुलें आळसाऐवजीं आजारीपणाचा बहाणा करतात. तसेंच कांहीं मुलें परीक्षेच्या वेळीं घाबरल्याचा बहाणा करतात. यांतहि त्यांचा उद्देश आपणांकडे इतरांपेक्षां जास्त लक्ष वेधून घेण्याचा असतो. मुलें जेव्हां रडतात, तेव्हां त्यांचाहि उद्देश आपणांकडे विशेष लक्ष वेधून घेण्याचा असतो. व्यंग असलेलीं किंवा तोतरीं मुलेंहि याच वर्गांत पडतात. ज्या मुलांना समाजांत मिसळण्याची, इतर मुलांशीं मैत्री करण्याची तीव्र इच्छा असते तीं मुलें लवकर बोलूं लागतात. परंतु ज्या मुलांच्या सर्व गोष्टी त्यांनीं बोलण्याच्या किंवा मागण्याच्या पूर्वींच पुऱ्या केल्या जातात त्यांस बोलण्याचेंहि फारसें कारण पडत नाहीं आणि

अशीं मुलें बऱ्याच उशीरानें बोलावयास लागतात व सामान्यतः घुमीं बनतात.

**हीनभाव—**

कांहीं मुलें बोलतांना अडखळतात किंवा तोतरीं होतात. त्याचेंहि कारण त्यांच्या ठिकाणीं असलेला आत्मविश्वासाचा अभाव किंवा हीनभाव होय. अशा मुलांस जर योग्य तऱ्हेनें उत्तेजन देऊन त्यांच्या ठिकाणीं असलेला लाजाळूपणा किंवा हीनभाव काढून टाकला व हळू-हळू आत्मविश्वास उत्पन्न केला तर त्यांच्या ठिकाणीं असलेला तोतरे-पणा निघून जातो असें आढळून येतें.

वर्चस्व मिळविण्याच्या प्रवृत्तीबरोबरच उणेपणाची जाणीव मनुष्यामध्यें त्रास करीत असते. मनुष्य प्रयत्न करीत असतो, त्याचें कारण त्याला आपल्यांतील कमीपणा कांहीं अंशीं कळून येतो, आणि तो कमीपणा कमी करण्याकरितां तो यशस्वी प्रयत्न करीत असतो. त्याच्या या प्रयत्नांत तो अयशस्वी झाला किंवा त्याच्या मार्गांत कांहीं अडथळे आले किंवा त्याच्या शक्तीबाहेर तो कमीपणा गेला तर त्याची जाणीव तीव्र होऊन त्याच्या ठिकाणीं एक प्रकारची हीनभावाची प्रवृत्ति उत्पन्न होते. अशा वेळीं तो भित्रा होतो आणि भलत्याच मार्गानें पुढें येण्याचा प्रयत्न करतो. तोतरें बोलण्याची प्रवृत्तीहि ज्या मुलांस सरळ मार्गानें यशस्वी होतां येत नाहीं किंवा लोकांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतां येत नाहीं त्यांच्याच ठिकाणीं उत्पन्न होते आणि ती त्यांच्या ठिकाणीं असलेल्या हीनभावाची द्योतक असते. या युक्तीमुळें जरी प्रथम कांहीं काळ त्या मुलास आपल्या शिक्षकाचें किंवा आईबापांचें विशेष लक्ष वेधून घेतां आलें तरी तो योग्य मार्ग नव्हे. कारण त्याला आपल्या हीनपणाची जाणीव वारंवार मनांतून त्रास देत असतेच.

प्रत्येक मुलाच्या ठिकाणीं स्वाभाविकच थोडी हीनभावाची कल्पना असते व त्यामुळें तें आपली परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत असतें व या पद्धतीनेंच आपल्या हीनपणाची भरपाई करून घेण्याचा प्रयत्न करीत असतें. हें करीत असतां त्याच्या हातून अनेक चुका होण्याचा संभव असतो. अशा तऱ्हेची हीनभावाची भरपाई करण्याची प्रवृत्ति विशेषत: पुढें दिलेल्या तीन प्रकारच्या मुलांमध्यें फार दिसून येते: (१) जीं मुलें अशक्त अथवा व्यंग असतात अशीं मुलें. (२) ज्या मुलांस लहानपणीं अतिशय कडकपणानें अथवा नावडतीं म्हणून वाढविलें जातें अशीं मुलें. (३) ज्या मुलांचे अतिशय लाड होतात अशीं मुलें.

**प्रमाणाबाहेर महत्त्वाकांक्षा—**

या सर्व तीनहि परिस्थितींत मुलांमध्यें एक प्रकारची हीनत्वाची अथवा कमीपणाची भावना उत्पन्न झालेली असते आणि तिच्या उलट प्रतिक्रिया म्हणून एक तऱ्हेची त्यांच्या शक्तीबाहेरची महत्त्वाकांक्षाहि उत्पन्न होते. कमीपणाची जाणीव आणि श्रेष्ठपणाची हांव या दोनहि एकाच वृत्तीच्या दोन बाजू असून त्या कधींहि एकमेकांपासून दूर करतां येत नाहींत. ज्या मुलाच्या ठिकाणीं हा हीनभाव असतो त्याला नेहमीं मोठेपणाची भयंकर हाव सुटून तें नेहमीं असंतुष्ट असतें. या असंतोषामुळें त्याची कांहीं चांगली गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति होते असें नाहीं. कारण बहुधा त्याची महत्त्वाकांक्षा प्रमाणाबाहेर असल्यामुळें ती सफल होण्याची फारशी आशा नसते; आणि त्यामुळें या गोष्टीचा त्याच्या स्वभावावर परिणाम होऊन तें तऱ्हेवाईक बनतें. तें नेहमीं चिडखोर बनून आपल्याला कोणी नांवें ठेवीत आहे काय किंवा आपला

कोणी अपमान करीत आहे कीं काय याबद्दल विचार करीत राहून त्याबद्दल फार हळुवार बनतें.

या प्रकारच्या वृत्तीचीं माणसें पुढें विक्षिप्त व तऱ्हेवाईक बनतात; आणि त्यांच्या अंगीं असलेले गुण सुप्तावस्थेंतच राहून त्यांचा योग्य विकास होत नाहीं व त्यापासून कांहीं फलनिष्पत्तीहि होत नाहीं. त्यांना स्वतःबद्दल अभिमान वाटत असतो व वास्तविक जगापासून दूर राहून एखाद्या निराळ्या स्वतंत्र जगांत तीं वावरत असतात; व आपल्याच मनाप्रमाणें एखादें आयुष्याचें चित्र रंगवून त्यांत तीं रममाण होतात.

**उत्तेजन व सहानुभूति—**

अशा मुलांस अधिकाधिक उत्तेजन देऊन व त्यांच्या ठिकाणीं धैर्य उत्पन्न करून व त्यांस स्वतःच्या सामर्थ्याच्या व योग्यतेच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न करून पुढें येण्याचा मार्ग दाखविला पाहिजे. त्यांस भीति किंवा धाक दाखविण्यापेक्षां सहानुभूति दाखवून त्यांचें मित्रत्व संपादिलें पाहिजे व हळूहळू त्यांस आपल्यांत सुधारणा करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे; व त्यांस उद्योग, नेट, अभ्यास आणि धैर्य यांच्यामुळें कोणतीहि गोष्ट साध्य करून घेतां येते हें पटवून दिलें पाहिजे.

एखादा मुलगा भलत्याच मार्गास लागला असतां तो वाईट निघेल असें त्याबद्दल विधान करणें हें त्याच्या शिक्षणाच्या दृष्टीनें चांगलें नव्हे. एखादा मुलगा पुढें वाईट होणार असें म्हटल्यानें त्याच्या ठिकाणचा भित्रेपणा अधिक वाढतो. अशावेळीं उलट त्या मुलाच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न केला पाहिजे. मुलाची मानखंडना करून, किंवा

त्यास लाजवून त्याची आपण सुधारणा करूं असें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कांहीं मुलांस लाजविलें असतां आपली फजिती होऊं नये म्हणून तीं आपल्या वर्तणुकींत सुधारणा करतात ही गोष्ट खरी आहे; परंतु तो योग्य मार्ग नव्हे.

**हीनभावाचा उगम—**

मुलांच्या ठिकाणीं हीनभावाची वृत्ति कितपत असते हें आपणांस त्यांची जी इतरांजवळ वागणूक होते त्यावरून दिसून येतें. कांहीं मुलें नेहमीं धीटपणानें चालतांना व बोलतांना आढळतात. उलट कांहीं मुलें त्यांच्याजवळ बोललें असतां भित्रेपणा दाखवितात. अशांच्या ठिकाणीं थोडा तरी हीनभाव उत्पन्न झालेला असतो. कांहीं लोकांच्या मतें हा हीनभाव जन्मजातच असतो. ज्या मुलांचे आईबाप भित्रे असतात, तीं मुलेंहि भित्रीं होतात. परंतु त्याचें कारण वांशिक नसून त्यांच्या भोवतीं असलेलें वातावरण होय. या दृष्टीनें कुटुंबांतील वातावरण आणि आईबापांचा स्वभाव या गोष्टी मुलाच्या स्वभावावर फार महत्त्वाचा परिणाम घडवून आणतात. जीं मुलें शाळेमध्यें एकलकोंडेपणाची वृत्ति दाखवितात, तीं मुलें बहुधा अशा कुटुंबांतील असतात कीं, ज्यांना फारसे नातेवाईक नसतात किंवा त्यांचा इतर कुटुंबांशीं फारसा संबंध येत नाहीं. जीं मुलें लहानपणीं आजारी पडल्यामुळें वगैरे अशक्त असतात त्या मुलांस इतर जग कठोर व शत्रूसारखें वाटतें. अशा मुलांस कोणीतरी आपली विशेष काळजी घेणारा मित्र लागत असतो व असा मित्रच त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारचा हीनभाव उत्पन्न करतो. लहान मुलांत आणि मोठ्या माणसांत जें सामान्यतः अंतर असतें त्या-मुळेंहि मुलांच्या ठिकाणीं एक प्रकारचा हीनभाव उत्पन्न होतो. तसेंच मुलानें अमुक करूं नये असें जेव्हां त्यास मोठ्या माणसाकडून वरचे-

वर सांगण्यांत येतें तेव्हां त्याच्या ठिकाणीं असलेली ही हीनभावाची जाणीव अधिक तीव्र होते. अशावेळीं तीं मुलें आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीशीं समरस होण्याऐवजीं आपल्या स्वतःबद्दलच केवळ विचार करूं लागतात आणि अशीं मुलें बहुधा एकलकोंडीं होतात.

**अशक्त किंवा व्यंग मुलें—**

बहुतेक अशक्त, व्यंग किंवा कुरूप मुलांच्या ठिकाणीं फार तीव्रतेनें हनिभावाची वृत्ति उत्पन्न झालेली असते. तीं बहुधा भित्रीं असतात व त्यांच्याजवळ बोललें असतां लाजून तीं दूर जातात. उलट कांहीं मुलें अधिक द्वाड असतात. ही त्यांची वर्तणूक जरी अगदीं विरुद्ध प्रकारची दिसली तरी त्याचें कारण एकच असतें. त्यांना दुसऱ्याचें लक्ष आपणांकडे वेधून घ्यावयाचें असतें. अशीं मुलें एका दिशेनें त्यांची बरीच वाढ झाल्यावर दुसऱ्या दिशेस वळविणें बरेंच कठिण असतें. त्यांस हळूहळू व अत्यंत धीमेपणानें सुधारावें लागतें. एखादा मुलगा गणितांत कच्चा असल्यास त्यास एकदोन आठवड्यांत सुधारणें अशक्य असतें. परंतु कोणत्याहि सामान्य मुलांत सुधारणा करणें शक्य असतें. त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला हीनभाव हा त्याची विशिष्ट तऱ्हेनें वाढ झालेली असल्यामुळें उत्पन्न झालेला असतो व तो घालविणें शक्य असतें.

**भित्रेपणा**

मुलामध्यें भित्रेपणा उत्पन्न होणें चांगलें नाहीं. कारण त्यामुळें त्याच्यांतील सामाजिकवृत्ति नाहींशी होते. त्यास नेहमीं लोक आपणांस चिडवितील, आपली चेष्टा करतील, आपणाकडे नीट लक्ष देणार नाहींत अशी भीति वाटत असते, त्याला नेहमीं लोक आपणाबद्दल काय

बोलत असतील याची भीति वाटत असते व तो जणूं कांहीं शत्रूंच्या देशांत राहात आहे असें त्यास वाटावयास लागून त्याच्या ठिकाणीं इतरां-बद्दल संशय व हेवा वाटूं लागून तो स्वार्थी बनतो.

अशा वृत्तीच्या मुलांस दुसऱ्यांची स्तुती सहन होत नाहीं व त्यांस दुसऱ्यावर सरळ मार्गानें वर्चस्व मिळविण्याच्या ऐवजीं दुसऱ्यांस खालीं पाडून आपण पुढें येण्याची वृत्ति उत्पन्न होते. एखाद्या मुलाबद्दल कमी-पणाची वृत्ति इतर मुलांच्या ठिकाणीं उत्पन्न होणें हेंहि घातुक असतें. कारण त्यामुळें त्या मुलाच्या ठिकाणीं हीनभाव उत्पन्न होऊन त्याचें धैर्य कमी होतें. एखाद्या मुलास जर आपल्या भविष्यकाळाबद्दल धास्ती वाटूं लागली तर तो सरळ मार्ग सोडून भलत्याच मार्गाला लागण्याचा संभव असतो. मुलाच्या ठिकाणीं धैर्य आणि उत्साह उत्पन्न करणें हेंच त्याच्या शिक्षणांतील मुख्य काम होय.

**निरुत्साह—**

कांहीं मुलांच्या ठिकाणीं केव्हां केव्हां तात्पुरता निरुत्साह उत्पन्न होतो. उदाहरणार्थ जेव्हां त्यांची अखेरची परीक्षा पास होते व जेव्हां त्यांस कोणता तरी धंदा सुरू करावयाचा असतो त्यावेळीं त्यांच्या मनांत एक प्रकारची धास्ती उत्पन्न होत असते. कारण अशा वेळीं त्यांस एक मार्ग सोडून दुसऱ्या मार्गाकडे वळावयाचें असतें. कांहीं मुलांस परीक्षेंत उत्तम प्रकारचें यश न मिळाल्यास कमीपणा वाटूं लागतो. अशा मुलांच्या ठिकाणीं उत्पन्न होणारा निरुत्साह ताबडतोब दूर केला पाहिजे नाहींतर पुढील आयुष्यांत त्यांस या वृत्तीमुळें त्रास होऊन त्यांच्या ठिकाणीं आपला धंदा वरचेवर बदलण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते व कोणत्याच गोष्टींत आपणांस यश मिळणार नाहीं असें वाटूं लागतें.

## स्वसामर्थ्याची जाणीव—

मुलाच्या ठिकाणीं स्वसामर्थ्याची जाणीव उत्पन्न होणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आपण कांहीं मुलांस एखादें काम सांगितलें असतांना तीं तें काम केव्हां केव्हां अर्धवट करून टाकून देतांना आढळतात. अशा वेळीं कांहीं लोक, त्यांस आळशी म्हणतात व कांहीं त्या मुलांचें लक्ष नसतें असें म्हणतात. परंतु या दोन्हींच्या मुळाशीं त्यांच्या ठिकाणीं असलेला आत्मविश्वासाचा अभाव हा असतो व तीं मुलें स्वतःस कमी योग्यतेचीं अथवा कमी हुशार समजत असतात. ही त्यांच्या ठिकाणची वृत्ति घालविली पाहिजे. त्यांस त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या गुणांची व शक्तीची जाणीव करून देऊन त्यांच्या मनांत कोणतेंहि कार्य करण्याबद्दल हुरूप व उत्साह निर्माण केला पाहिजे. तसा तो वेळींच केल्यास त्यांसाहि आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय येऊन तीं अधिक उत्साही व कार्यक्षम बनल्याशिवाय राहणार नाहींत.

## मानसिक दौर्बल्य—

ज्या मुलांच्या मेंदूचीच वाढ बरोबर झाली नसेल त्या मुलांच्या ठिकाणीं मानसिक दौर्बल्य येणें साहजिक असतें. परंतु केव्हां केव्हां अशा प्रकारचे शारीरिक दोषहि पूर्ण वाढीनंतर निघून जातात व मानसिक दोष मात्र तसेच राहतात असें आढळून येतें. केव्हां केव्हां योग्य तऱ्हेनें शरीराचें पोषण न झाल्यानें किंवा निष्ठुरपणानें वागविलें गेल्यामुळें मुलांच्या ठिकाणीं हीनभाव उत्पन्न होण्याचा संभव असतो. अशा मुलांस सुधारणेंहि बरेंच कठीण असतें. कारण त्यांच्यामध्यें सर्व लोकांबद्दल एक प्रकारचा तिटकारा उत्पन्न झालेला असतो. त्यांना

चांगले मित्रहि जोडतां येत नाहींत. कारण जे लोक सुस्थितींत वाढलेले असतात त्यांचा तीं मुलें हेवा करीत असतात. शाळेंत जाणें ही गोष्टसुद्धां त्यांस कठीण वाटूं लागते. अशा मुलांतील ही एकलकोंडेपणाची वृत्ति काढून टाकून त्यांस इतर मुलांत अधिक मिसळण्यास शिकविलें पाहिजे म्हणजे त्यांच्या ठिकाणची सांघिक वृत्ति वाढीस लागून त्यांचें मनोदौर्बल्य हळू हळू कमी होत जाईल.

असें न केल्यास अशीं मुलें मोठीं झाल्यावर इतरांस फार त्रासदायक होतात. तीं आपल्यापेक्षां दुबळे असलेल्या लोकांस नेहमीं कांहीं तरी त्रास देत असतात व स्वतः वर्चस्व मिळविण्याची इच्छा असल्यामुळें तीं नेहमीं आपल्यापेक्षां दुर्बल असलेल्याशींच मैत्री करतात, किंवा आपल्यापेक्षां लहान किंवा गरीब मुलांतच वावरतात, आणि त्यांस नेहमीं पीडा देत असतात.

**असत्य भाषण—**

मूल जें खोटें बोलतें तें सुद्धां पुष्कळदां भीतीनेंच बोलत असतें; व ही भीति त्याच्या ठिकाणीं आईबाप ज्या प्रकारचें वर्तन करीत असतील त्यावर अवलंबून असते. अशा प्रकारच्या भीतीमुळें मुलें नेहमीं खोटें बोलूं लागतात. त्यांची ही खोटें बोलण्याची वृत्ति कायम राहणें व त्यांनीं पुढील आयुष्यांत असत्यभाषी होणें हें त्यांच्याशीं होणाऱ्या आईबापांच्या वर्तनावर व त्यांस लहानपणीं मिळणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असतें. दुसरीहि प्रवृत्ति या वागणुकीमुळें मुलांमध्यें मोठेपणीं उत्पन्न होण्याचा संभव असतो व ती म्हणजे तीं स्वतः अगदीं नेहमीं खरें बोलणारीं होतात, पण दुसऱ्यांबद्दल मात्र त्यांना नेहमीं संशय येत असतो.

ज्याअर्थी मूल वडील मनुष्यांबद्दलच्या भीतीमुळें खोटें बोलतें त्याअर्थी त्याला आपणाबद्दल भीति न वाटतां उलट प्रेम वाटेल अशी वागणूक वडील मनुष्यांनीं किंवा आईबापांनीं त्यांच्याजवळ ठेवावी. अशा वृत्तीमुळें मुलांच्या विश्वासास आपण पात्र होऊन परस्परांस परस्परां-बद्दल भरंवसा वाटूं लागेल व प्रामाणिकपणाची वृत्ति वाढत जाईल. अशा परिस्थितींत प्रत्येक वेळीं मूल आपणांजवळ आपलें मन मोकळें करीत जाईल व कोणत्याहि प्रकारचा आडपडदा बाळगणार नाहीं.

जेव्हां आपणांस प्रथमच मुलानें असत्य सांगितल्याचा भास होईल तेव्हां प्रथम त्या गोष्टीचा पडताळा पाहून घ्यावा. जर त्याचें विधान असत्य ठरलें तर त्यास तें दुरुस्त करण्याची संधि द्यावी. त्याबद्दल विशेष धाक वगैरे दाखवूं नये. कारण त्यामुळें त्याच्या मनांत अधिकच भीति उत्पन्न होऊन तें त्या असत्य गोष्टीसच चिकटून राहील. त्यास ती गोष्ट तशीच आहे कां म्हणून सहज पुन्हा एकदां विचारून पाहावें व तें जर असत्यासच धरून राहील तर त्यास स्पष्टपणें असें सांगावें कीं ती गोष्ट खरी नसून तें भीतीनें तसें सांगत असावें. परंतु वास्तविक तसें भिण्याचें कांहीं कारण नाहीं. जर त्यास एखादी गोष्ट करण्याबद्दल शंका वाटत असेल तर ती करण्यापूर्वी त्यानें आपणांस प्रथम येऊन विचारीत जावें इतका त्याच्या ठिकाणीं आपणांबद्दल विश्वास उत्पन्न केला पाहिजे व ती करणें योग्य असेल तर ती त्यास करावयास सांगत जावी. जर अयोग्य असेल तर अयोग्य कां हेंहि नीट समजून सांगावें; व त्या मुलाकडून नेहमीं मी खरें बोलेन व आपणहि माझ्याशीं खरें बोला असें म्हणवून घ्यावें.

जेव्हां जेव्हां मूल खरें बोलेल त्या त्या वेळीं त्याची प्रशंसा करीत जावी.

जर मूल पुन्हा एखाद्या वेळीं खोटें बोलतांना आढळलें तर पहिल्या वेळेप्रमाणेंच सर्व गोष्टी करून त्यास अधिक स्पष्टपणें बजावीत जावें कीं, आपणांस नेहमीं सत्य हेंच आवडतें; व जरूर तर आपली नापसंती हळू हळू अधिक अधिक स्पष्टपणें त्याच्या नजरेस आणून त्यास शिक्षा करण्याची ताकीद द्यावी. मात्र ही क्रिया सावकाश झाली पाहिजे. पांच वर्षांच्या आंतील मूल अगदीं सर्व परिस्थितींत केवळ खरेंच बोलेल असें धरून चालूं नये. आपण मात्र त्याच्याशीं खरेंच बोलत जावें; व स्वतःच त्याच्याशीं वागण्यामध्यें खरें बोलण्याचा धडा त्यास घालून देत जावा.

खोटें बोलण्यापासून होणाऱ्या तोट्याचीहि त्यास जाणीव करून देत जावी, व त्यास एकदोन उदाहरणें देऊन खोटें बोलण्यानें कशी फसवणूक होते हें नीट समजावून सांगावें. या बाबतींत आपणांस यश येणें हें मुलाचें आपल्यावरील प्रेम व विश्वास यावर अवलंबून राहील. आपणाबद्दल त्यास भीति वाटत नसेल, व आपणांस खूष करण्यांत त्यास आनंद वाटत असेल तसेंच आपण स्वतः जर नेहमीं खरें बोलत असलों तर आपलें अनुकरण करून त्यासहि खरें बोलण्याची संवय लागेल.

## अशिष्ट वर्तन—

मुलें अनेकदां शिष्टपणाच्या वागणुकीस अयोग्य असे अपशब्द बोलतांना आपणांस ऐकूं येतात. त्याबद्दल वास्तविक मोठें भय वाटण्याचें कारण नाहीं. केव्हां ना केव्हां तरी ते त्यांच्या कानावर पडतच असतात; परंतु असे शब्द उच्चारण्याची त्यांस संवय लागणें किंवा न लागणें हें आपलें त्यांच्यावर जें वजन असेल व त्यांचा स्वभाव

आपण ज्याप्रमाणें बनवूं त्यावर अवलंबून राहील. मुलास अशा तऱ्हेचे शब्द उच्चारणें हें चांगल्या वर्तणुकीच्या विरुद्ध आहे ही गोष्ट नीट समजावून सांगावी. मात्र तसा शब्द क्वचितच त्याच्या तोंडून गेल्यास त्यास शिक्षा करणें टाळीत जावें. एखाद्या अपशब्दाचा अर्थ मुलानें विचारल्यास त्यास तो स्पष्टपणें सांगावा. अशा तऱ्हेचे अपशब्द बहुधा कांहींतरी रागामुळें निघालेले असतात, किंवा त्यांस लैंगिक अर्थ असतो. मुलास या बाबतींत अज्ञानांत ठेवीत जाऊं नये. त्याच्या स्वभावास योग्य वळण लागेल अशा तऱ्हेचें योग्य वर्तन त्याच्याशीं ठेवावें व त्याला जगांतील निरनिराळ्या प्रकारांबद्दल शक्य तितकें पूर्ण ज्ञान करून द्यावें. त्यामुळें आपणांस कधींहि पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाहीं.

**कृतज्ञतेचा अभाव—**

मुलें केव्हां केव्हां ज्यास आपण कृतघ्नपणा म्हणतों अशा तऱ्हेचें वर्तन करतांना आढळतात. सामान्यतः कृतज्ञता बुद्धि उत्पन्न होणें व ती योग्य शब्दांत व्यक्त करणें ही गोष्ट बऱ्याचशा प्रगतीनंतर घडून येते; व तितकी मानसिक प्रगति मुलाची झालेली नसते. आपण एखादी गोष्ट मुलाला दिली किंवा त्याच्याकरितां कांहीं केलें तर लागलीच त्याला त्याबद्दल कृतज्ञता वाटणें हें कांहीं स्वाभाविक नाहीं. याकरितां मुलाला मनापासून आपणाबद्दल कृतज्ञता. वाटल्याशिवाय त्याच्या तोंडून कृतज्ञतेचे उद्गार बाहेर पडण्याची अपेक्षा करूं नये. मुलास केव्हांहि स्वतःकरितां किंवा दुसऱ्या कोणाकरितां कृतज्ञतेचे उद्गार सक्तीनें बाहेर काढण्यास भाग पाडूं नये. जर आपण स्वतः नेहमीं थँक्स ( Thanks ) किंवा शाबास, फार चांगलें वगैरे म्हणत असलों, तर मुलेंहि लवकर आपलें अनुकरण करतील व तेवढ्यावरच

आपण समाधान मानलें पाहिजे. ज्या अनेक वस्तू आपण मुलास देतों किंवा त्याच्याकरितां आपण जें कांहीं करतों त्या प्रत्येक वेळीं त्या मुलास कृतज्ञता वाटतेच असें नाहीं. कारण आपणांस असें आढळून येतें कीं, त्यांपैकीं बऱ्याच गोष्टींची त्या मुलास जरूरीच नसते. मुलानें आभार मानले नाहींत तर त्याबद्दल त्यास कधींहि दोष देऊं नये. जर त्या मुलास खरोखरच आभार वाटत असतील तर त्याच्या तोंडावर आनंदाचीं चिन्हें दिसून येतील व त्यांतच आपले आभार आले. मुलाच्या चेहऱ्यावर जेव्हां आनंदाचीं चिन्हें दिसतात तेव्हां त्यास खरोखरच आनंद झालेला असतो. आणि त्याची किंमत वरवरच्या अनेक आभारांपेक्षां अधिक असते. समाजांतील योग्य वर्तणुकीचे नियम शिकविण्यास याच्यानंतर पुष्कळ वेळ असतो. तेव्हां त्याकरितां मुलावर लहानपणीं सक्ति करण्यांत अर्थ नाहीं. मुलांस कृत्रिम सभ्यतेचे नियम शिकविण्यापेक्षां त्यांच्या ठिकाणीं योग्य वर्तणूक करण्याची बुद्धि जागृत करणें व त्यांस विशिष्ट प्रसंगीं कसें वर्तन करावें याचें उदाहरण घालून देणें हेंच त्यांच्या वर्तणुकीस योग्य वळण लागण्याच्या कामीं अधिक उपयोगी पडतें व या बाबतींत पाश्चात्य शिष्टाचारांचें अनुकरण करण्यापेक्षां विनयशील प्रवृत्ति मुलाच्या ठिकाणीं कशी वाढीस लागेल व त्यास सभ्यतेचें वळण स्वाभाविकच कसें लागेल याचाच विचार करून त्यापाशीं वर्तणूक करणें अधिक फलदायी होईल.

**आत्मविश्वासाचा अभाव—**

एखाद्या मुलास नेहमींच वाईट अथवा मूर्ख म्हणूं लागल्यास त्यास आपलेंच म्हणणें खरें आहे असें वाटूं लागतें; व त्याच्या ठिकाणचा आत्मविश्वास कमी होऊं लागतो. आणि त्यामुळें त्यानें एखादी गोष्ट

करावयास घेतल्यास ती त्यास नीटपणें करतां येत नाहीं, व आपण मूर्ख आहों अशी त्याची भावना दृढ होऊं लागते. त्यास प्रारंभींच्या परिस्थितीमध्यें आपला आत्मविश्वास कमी झाला आहे ही गोष्ट कळून येत नाहीं आणि त्यामुळें तें स्वतःच आपल्या इतर मित्रांपेक्षां आपणास कमी योग्यतेचें समजूं लागतें, व त्यामुळें त्यास आपल्या योग्यतेची व सामर्थ्याची पुरती जाणीव होत नाहीं व तें नेहमीं खिन्न मनःस्थितींत वावरतांना आढळतें.

मुलें ज्या चुका करतात त्या प्रत्येक चुकीच्या मुळाशीं विशेष परिस्थितीचा परिणाम असल्याचें दिसून येतें. उदाहरणार्थ, मूल अव्यवस्थित होतें याचें कारण त्याची इकडे तिकडे पडलेली प्रत्येक वस्तु व्यवस्थितपणें ठेवण्याचें काम त्याच्याकरितां दुसरें कोणी तरी करित असतें हें होय. जें मूल नेहमीं खोटें बोलतें तें लहानपणीं कोणा तरी मोठ्या मनुष्याच्या विशेष धाकांत असून त्यानें त्यास खोटें बोलण्याबद्दल वरचेवर शिक्षा केलेली असते असें आढळतें. एखादें मूल बढाईखोर असतें त्याच्याहि मुळाशीं कांहींतरी परिस्थितीचाच गुण आढळून येतो. अशा मुलास आपली स्तुति व्हावी असें जितकें वाटत असतें त्या मानानें कोणतेंहि काम झालेंच पाहिजे असें वाटत नसतें. त्यामुळें तें नेहमीं दुसऱ्यानें आपली स्तुति करावी म्हणून नुसत्या बढाईच्याच गोष्टी सांगतें.

**अनिष्ट प्रवृत्तींचें वर्गीकरण—**

मुलांच्या ठिकाणीं ज्या कांहीं अनिष्ट प्रवृत्ती आढळून येतात त्यांचें वर्गीकरण पुढें दिल्याप्रमाणें करतां येईल.

(१) वैय्यक्तिक अनिष्ट प्रवृत्ती—लहरीपणा, विमनस्कता, लाजाळू-

पणा, एकांतप्रियता, कल्पनारम्यता, एकतानतेचा अभाव, घाबरटपणा व निरुत्साह.

( २ ) वर्तणुकींतील अनिष्ट प्रवृत्ती—चोरी, असत्य भाषण, लैंगिक दोष, घरांतून पळून जाणें, लहान मुलास त्रास देणें, लहरी स्वभाव, आडदांडपणा करणें व इतरांशीं द्वाडपणाची वर्तणूक करणें.

( ३ ) संवयींतील अनिष्ट प्रवृत्ती—नखें कुरतडणें, अंग खाजविणें, हातापायांचें चाळे करणें, बोलतांना अडखळणें, अस्वस्थ झोंप लागणें व लैंगिक चाळे करणें.

( ४ ) बौद्धिक अडचणी—वर्गांत मागें राहणें, किंवा कांहीं विषय उदाहरणार्थ- गणित वगैरे कच्चे असणें.

**अनिष्ट प्रवृत्तींवर उपाय—**

याकरितां मुलाच्या ठिकाणीं लहानपणींच ज्या कांहीं वाईट प्रवृत्ती आढळून येतील त्या सुधारण्याकरितां त्यास केवळ धाक दाखविण्यापेक्षां त्याच्या मनांत अधिक खोल शिरून त्यांच्या कारणांचा विचार केला पाहिजे आणि त्यास शिक्षा करण्यापेक्षां एखाद्या मित्राप्रमाणें किंवा डॉक्टराप्रमाणें त्यास योग्य तो सल्ला देऊन सुधारलें पाहिजे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लहान मुलाच्या नैतिक भावना जागृत कराव्या, त्यास प्रेमळपणानें वागवावें, त्याची मधून मधून प्रशंसा करावी व त्यास उत्तेजन देत जावें. प्रेमळपणामुळें त्यास आपलें अनुकरण करण्याकडे प्रवृत्त करावें, तसेंच एखाद्या गोष्टीपासून त्यास परावृत्त करावयासाठीं दुसरी तीपेक्षां चांगली गोष्ट करण्याकडे त्याचें मन वळवावें. वेळप्रसंगीं त्यास धाक दाखवावयाचा असेल तेव्हां तो बेतानें पण निश्चितपणें दाखविण्यांत यावा. त्यास वरचेवर हुकूम करण्याचें

टाळण्यांत यावें. त्याचप्रमाणें त्यास शिक्षा करणें किंवा निषेध करणें शक्य तों टाळावें.

अशा पद्धतीनें लहान मुलास वाढविलें असतां पांच वर्षांमध्यें त्याच्या अंगच्या नैतिक गुणांची वाढ किती होईल हें कांहीं निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. कारण अशा पद्धतीनें वाढविलेलीं मुलें फारच थोडीं आढळण्यांत येतात; परंतु जीं मुलें विशेष. धाकामध्यें किंवा आकुंचित दृष्टीनें वाढविण्यांत आलेलीं नाहींत अशीं मुलें जीं मधून मधून आढळतात तीं शरीरानें सुदृढ असून त्यांचा स्वभावहि चांगला व मोकळा दृष्टीस पडतो. तसेंच त्यांच्या नैतिक भावनाहि केवळ कृत्रिम किंवा वरवरच्या नसून वास्तविक व मनापासूनच्या आढळतात. आतांपर्यंतच्या अर्वाचीन मानसशास्त्रीय ज्ञानावरून अशा तऱ्हेनें वाढलेलीं मुलें पांच वर्षांच्या वयांत जुन्या पद्धतीप्रमाणें वाढविलेल्या मुलांपेक्षां नैतिक दृष्ट्या अधिक उच्च दर्जाचीं व स्वतंत्र मनोवृत्तीचीं आढळून येतील अशी खात्री वाटते.

या नवीन पद्धतीमध्यें मुलाच्या मनावर कोणत्याहि तऱ्हेचा दाब घालावा लागत नाहीं. उलट जुन्या पद्धतीमध्यें लहान मुलांच्य मनावर नेहमीं एक प्रकारचें दडपण असलेलें आढळून येतें. जुन्या पद्धतीमुळें मुलांच्या मनांत एक प्रकारच्या संकोचित व दिखाऊ पण अवास्तविक नैतिक भावना उत्पन्न होतात. याचे उलट नवीन पद्धतीमध्यें मुलें जास्त स्वतंत्र वृत्तीचीं बनून त्यांच्या ठिकाणीं आढळणाऱ्या नैतिक भावना अधिक वास्तविक व स्वतंत्रपणाच्या असून भक्कम पायावर उभारलेल्या असतात व त्यांचा त्यांच्या मनावर पूर्ण पगडा असतो.

---

## प्रकरण एकविसावें

# मुलांची अल्लड वृत्ति

### सांक्रमिक अवस्था—

मुलांच्या वाढीमध्यें एक प्रकारची तारुण्यापूर्वी अल्लडपणाची वृत्ति असते. यावेळीं तीं अगदीं लहान मुलें नसतात व त्यांची पूर्ण वाढहि झालेली नसते. अशा वेळीं त्यांच्या वृत्तीमध्यें कांहीं बदल झालेले आढळतात. हे बदल ज्या मानानें लहानपणांत त्यांच्या मनाची वाढ झालेली असेल त्यावर अवलंबून असतात. या ठिकाणीं आपणांस नवीन परिस्थितींत आल्यामुळें दिसून येणारे फरक आढळतात.

अशा वेळीं कांहीं मुलांमध्यें सांघिक प्रवृत्ति अगदीं कमी झालेली आढळते, कारण लहानपणचे मित्र त्यांनीं सोडलेले असतात व नवीन मित्रांची जोड झालेली नसते. याच वेळीं त्यांच्या पुढें कोणता धंदा निवडावा हा प्रश्न असतो व ही निवड जर त्यांच्या बालपणच्या मनोवृत्तींस अनुसरून झाली तर त्यांची प्रगति चांगली होते. परंतु तशी न झाल्यास तीं एक सोडून दुसरा याप्रमाणें वरचेवर आपले व्यवसाय किंवा शाळा बदलीत असतात, किंवा मुळींच स्वस्थ बसून राहतात. याच वेळीं त्यांच्या पुढें विवाहाचा प्रश्न असतो. ज्यांच्या मनाची पूर्वतयारी नीट झालेली असेल त्यांना प्रेम आणि विवाह यांच्या बाबतींत फारशी अडचण पडत नाहीं व त्यांचा मार्ग सरळ असतो; परंतु कांहीं मुलें अतिशय लाजाळू तर कांहीं अतिशय धीट बनतात. कांहीं मूलांस याच काळांत घर सोडून दूर जावेंसें वाटतें; याचेंहि कारण

त्यांस आपल्या घरीं मनाजोगती परिस्थिति आढळत नाहीं व घरीं बरें वाटत नाहीं हेंच असतें.

## सुमित्र संपादन—

या सर्व गोष्टींवर उपाय म्हणजे मुलानें चांगले मित्र संपादन करणें हा होय; व मुलांनीं आपल्या मित्रांशीं चांगलें वर्तन ठेवणें हा होय. याप्रमाणेंच कुटुंबांतील मंडळींमध्यें परस्परांबद्दल आपलेपणा व परस्पर विश्वास वाटत असला पाहिजे. मुलांचा आपल्या आईबापां-वर व शिक्षकांवर विश्वास असला पाहिजे. असें असेल तरच मुलें घरांत व शिक्षकांशीं मोकळेपणानें वागतात; नाहीं तर त्यांस टाळण्याचा प्रयत्न करतात.

या वयांत कांहीं मुलांस आपल्या अंगांत असलेल्या निरनिराळ्या शक्ती उघड करून दाखवाव्या असें वाटत असतें; व त्या बाबतींत पुष्कळदां त्यांचेकडून अतिरेक होण्याचा संभव असतो. या वयांत मुलांस जरूर तितकें लैंगिक विषयाचेंहि शिक्षण देणें अवश्य असतें व त्यांच्या पुढील आयुष्याची पूर्वतयारीहि करून द्यावयाची असते.

## याचें मूळ सांघिक वृत्तीमध्येंच—

याप्रमाणें या वयांत मुलांच्या ठिकाणीं सहकार्याची वृत्ति उत्पन्न होऊन कुटुंबांत मित्रत्वाची भावना असेल आणि त्यांस योग्य लैंगिक शिक्षण मिळालें असेल तर अशीं मुलें भलत्याच मार्गास लागण्याची भीति नसते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या वयांत मुलामध्यें जर सांघिक वृत्तीची योग्य वाढ झालेली असेल तर समाजांत आपलें

योग्य स्थान मिळवून आपला आयुष्यक्रम कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक वगैरे बाबतींत पूर्णपणें सुखाचा करतां येणें प्रत्येक व्यक्तीस शक्य असतें व आपलें मूल्य ओळखून व आपल्या अंगच्या शक्तींचा योग्य उपयोग करून तें आपलें आयुष्य यशस्वी रीतीनें या जगांत घालवितें.

---

## प्रकरण बाविसावें

# बिघडलेलें मूल व त्याची सुधारणा

**मूल बिघडण्याचें मूळ कारण—**

आतांपर्यंत आपण कुटुंबांत मुलाचें 'जें स्थान असेल त्यावर व त्याच्या सभोंवतालच्या परिस्थितीवर आणि त्यास मिळणाऱ्या वागणुकीवर त्याची वर्तणूक व स्वभाव हीं कशीं अवलंबून असतात हें पाहिलें. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मुलाची वाढ निरनिराळ्या प्रकारानें होते. याकरितां मुलाचें शिक्षण जितक्या लवकर सुरू करतां येईल तितकें त्यास अधिक उपयोगी पडतें. नाहीं तर एकदां त्याच्या स्वभावास चुकीची दिशा लागली तर त्यास पुढें सुधारणें कठीण जातें. कुटुंबामध्यें एक मूल चांगलें व एक वाईट असें असलें म्हणजे चांगल्या मुलास साहजिकच कुटुंबांत महत्त्वाचें स्थान मिळतें व वाईट मुलास तसें मिळत नसल्यामुळें तें कुटुंबांतील मंडळींचें लक्ष आपणाकडे वेधून घेण्याकरितां अधिकच हट्टी व खोडकर बनतें. परंतु त्यास जर निराळ्या परिस्थितींत ठेविलें तर तेंच मूल चांगलें निघतें. कांहीं मुलें प्रथम चांगल्या स्वभावाचीं असूनहि पुढें त्यांची परिस्थिति बदलली तर तीं वाईट निघण्याचा संभव असतो. कांहीं मुलें आपणांस आळशी बनलेलीं दिसतात याचेंहि कारण त्यांस उद्योग करून पुढें येण्याचें साधत नसतें आणि त्यामुळें तीं आळसाचें पांघरूण घेऊन इतर गोष्टींबद्दलचा आपला तिटकारा व्यक्त करीत असतात. तीं स्वतःमध्येंच दंग असतात व स्वतःच कांहीं तरी कल्पना करण्यांत किंवा दिवसासच स्वप्नें पाहण्यांत दंग असतात.

जेव्हां त्यांस आपल्या कल्पनांत व प्रत्यक्ष वस्तुस्थितींत पुष्कळच अंतर असलेलें दिसून येतें त्यावेळीं कांहीं मुलें परिस्थितीशीं थोडें फार जमवून घेतात व कांहीं मुलें अधिकच आपल्या कल्पनांत रममाण होत जाऊन बाहेरच्या जगाशीं आपला संबंध कमी कमी करीत आणतात.

कांहीं मुलें नेहमीं जगांतील वस्तूंचे दोन वर्ग करून त्यांची परस्पर-विरुद्ध मांडणी करतात. उदाहरणार्थ, उष्ण व थंड, चांगलें व वाईट अशा दृष्टीनें जगाकडे पाहणारीं मुलें कांहीं अंशीं हट्टी बनून मिळालें तर सर्व नाहीं तर मुळींच नको अशा वृत्तीचीं बनतात. अशीं मुलें बहुधा महत्त्वाकांक्षी बनतात.

**कल्पनारत अथवा ध्येयवादी मुलें—**

जीं मुलें आळशी असून ज्यांच्या मनाप्रमाणें गोष्टी घडून येत नाहींत तीं प्रत्यक्ष जगापासून अधिकाधिक दूर दूर जाऊन आपल्या कल्पनांतच रममाण झालेलीं आढळतात. अशीं मुलें ध्येयवादी बनतात. स्वतः निरनिराळ्या कल्पना करून त्यांत आनंद मानणें ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं. कलावन्त लोक किंवा लेखक अथवा शास्त्रज्ञ यांस कल्पकतेची जरूरी असते व अशांतूनच पुष्कळदां मोठमोठे पुढारी तयार होतात. कारण त्यांपैकीं कांहीं, सत्य सृष्टीमध्यें त्यांस कांहीं पाहिजे असलेल्या गोष्टी न मिळाल्यास प्रयत्न करून भोंवतालच्या परि-स्थितीशीं झगडून आपल्या मनाप्रमाणें गोष्टी घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतात. कांहीं मोठमोठीं माणसें प्रारंभीं वाईट विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असल्याचें आपणांस आढळतें; परंतु असेच लोक योग्य परि-स्थिति आली असतां तिचा फायदा घेऊन आपला मार्ग शोधून

काढून पुढें आलेले आढळतात. याकरितां मुलांतून मोठीं माणसें कशीं निर्माण करावीं यासंबंधीं निश्चित मत सांगतां येणार नाहीं. परंतु एवढें मात्र निश्चितपणें सांगतां येईल कीं, अशा मुलांबद्दल एकदम कोणतेंहि मत बनवून त्यांस बाजूस न करतां त्यांस वरचेवर उत्तेजन देऊन व जगांतील परिस्थितीचें योग्य ज्ञान देऊन आयुष्याकडे पाहण्याची त्यांस योग्य ती दृष्टि आणून दिल्यास तीं चांगल्या मार्गास लागतील यांत शंका नाहीं.

**बिघडलेल्या मुलांचे प्रकार—**

ज्या मुलांस बिघडलेलें असें म्हणतां येईल त्यांचे दोन प्रकार आपणांस आढळून येतात. हे दोन प्रकार अगदीं पृथक्पणें आपणांस आढळून येत नाहींत. तथापि त्यांचीं लक्षणें आपणांस मुख्यतः वेगवेगळीं सांगतां येतील. अनेकदां या दोन प्रकारांचें थोडें फार मिश्रण झालेलें असतें. ( १ ) पहिला प्रकार म्हणजे अपक्व विचारांचें प्रदर्शन होय. ( २ ) दुसरा प्रकार जो आपणांस विशेष आढळतो तो म्हणजे दबलेल्या मनोवृत्तींमुळें उत्पन्न होणारा होय. यांसच सामान्यतः व्यवहारांत बिघडलेलीं मुलें म्हणतात.

पहिला प्रकार आपणांस विशेषतः ज्या मुलांतील अहंभाव अथवा लैंगिक प्रवृत्ति अपक्व असतांनाच आईबापाकडून त्यांस चेतना मिळते व मुलाची सांघिक प्रवृत्तीची वाढ झालेली नसते किंवा तीस योग्य वाव मिळालेला नसतो, अशा वेळीं उत्पन्न झालेला असतो. याचा परिणाम मुलाचा स्वभाव बनण्यावर फारसा झालेला नसतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तें मूल थोड्याशा वन्य किंवा असंस्कृत् स्थितींतच राहतें. तें अप्पलपोटें व उर्मट बनतें. तें सामान्यतः जगामध्यें भौतिक

दृष्टीनें कदाचित् यशस्वी मनुष्यहि बनतें. कदाचित् व्यापारांत खूप पैसा मिळविणारें असेंहि तें बनूं शकेल. आपला आयुष्यक्रम खूप चैनींत घालवील व समाजामध्येंहि उच्च जीवनांत त्यास भाग घेतां येईल, परंतु अशा लोकांस खरें सुख केव्हांहि मिळणार नाहीं. त्याच्या मनोवृत्तीवर क्वचितच दाब पडल्यामुळें त्याचा स्वभाव धीट व निर्भय होईल व त्यामुळें त्यास मेंदूची वगैरे विकृति कधींहि होणार नाहीं. व्यापारी राष्ट्रास अशाच तऱ्हेच्या मनोवृत्तीच्या लोकांची जरूरी असते. कारण ते धीट, धाडसी व आत्मविश्वासी असे असतात. मात्र याच प्रकारापैकीं यांच्या उलट असणाऱ्या व्यक्ती गुन्हेगार किंवा आळशी बनून समाजास निरुपयोगी बनतात.

दुसऱ्या प्रकारामध्यें ज्याला सामान्यतः बिघडलेलें मूल म्हणतात तें अधिक लाड झाल्यानें किंवा अधिक दाब पडल्यानें किंवा दोहोंच्याहि परिणामानें तसें बनतें. अशा मुलाचे आईबाप बहुधा वाजवीपेक्षां जास्त मृदु अंतःकरणाचे किंवा उलट अधिक कठोर अंतःकरणाचे असतात. भौतिक दृष्टीनें ते मृदु असतात तर नैतिक दृष्ट्या ते कठोर असतात. असे आईबाप बहुतेक स्वतःच लहानपणीं ज्यांस बिघडलेले असें म्हणतां येईल असेच असतात. त्यांना कांहीं बाबतींत वाजवीपेक्षां जास्त स्वातंत्र्य असतें व कांहीं बाबतींत अतिशय थोडें स्वातंत्र्य असतें.

## आईबापांवरील जबाबदारी—

मुलें बिघडण्याचीं कारणें अनेक असूं शकतात. अशा मुलांच्या आई-बापांच्या विशिष्ट वागणुकींतील हेतूंची त्यांस स्वतःस स्पष्टपणें जाणीवहि नसते, व तशी जाणीव होईल तर आपलें मूल बिघडेल अशा रीतीनें

ते कधींहि वागणार नाहींत. मुलास बिघडवून त्याचा घात करण्याची इच्छा असली तरी सुद्धां ते अशा पद्धतीनें वागण्यापेक्षां दुसऱ्या एखाद्या रीतीनें त्याचा घात करतील, परंतु जाणून बुजून त्यांस बिघडविणार नाहींत. बिघडलेल्या मुलांच्या आईबापांस आपण काय करीत आहों हें प्रथम तितकें कळत नसतें व आपल्या वागणुकीचा परिणाम अशा रीतीचा झालेला पाहून पुढें त्यांस फार आश्चर्य वाटतें व तें आश्चर्य अगदीं मनापासून असून त्यांस त्याबद्दल दुःखहि वाटत असतें.

कांहीं आईबापांस आपणावर लहानपणीं जे अतिशय निर्बंध असत त्यांची आठवण असून ते आपल्या मुलांस अधिक स्वातंत्र्य द्यावयाचें ठरवितात व याचा परिणाम म्हणजे ते त्यांचे अधिक लाड करितात, व त्यांस वाटेल तसें वागूं देतात. अशा वेळीं आपल्या आईबापांपेक्षां आपण कांहीं विशेष करावें ही भावना त्यांच्या मनांत असल्यामुळें त्यांची वर्तणूक अगदीं उलट दिशेला होऊन ते मुलाचे बाजवीपेक्षां जास्त लाड करतात. अशा वेळीं मुलें पहिल्या प्रकारचीं म्हणजे अपक्व विचारस्वातंत्र्याचीं होतात. तथापि दुसऱ्या प्रकारापेक्षां हा प्रकार कमी घातक आहे.

वास्तविक बिघडलेलीं मुलें असें ज्यांस म्हणतां येईल तीं ज्या आई-बापांवर विशेष दाब पडलेला असतो अशा आईबापांच्या हाताखालीं वाढलेलीं असतात. अशा आईबापांच्या लैंगिक प्रवृत्तीवर विशेष निर्बंध पडले गेल्यामुळें त्यांच्या मुलाच्या बाबतींत ते अतिशय ढिले केले जातात व अशा मुलांच्या बाबतींत बहुतेक मेंदूचे विकार उत्पन्न होतात.

## कांहीं आईबापांची मनोवृत्ति—

अशा आईबापांच्या मानसिक प्रवृत्ती सामान्यतः पुढीलप्रमाणें आढळून येतात. त्यांच्या मनापुढें नेहमीं बहुधा अतिशय उच्च व कधींहि न गांठतां येण्याजोगें असें ध्येय असतें व त्यामुळें सर्व जगाची सुधारणा करण्याची इच्छा ते मनांत बाळगीत असतात व अशा तऱ्हेची सुधारणा घडवून आणण्याची योजना ते मनांत बनवीत असतात. प्रत्यक्ष काम करण्याचें लोकांवर सोंपवून स्वतः मोठमोठीं भाषणें करणें व अध्यक्ष होणें वगैरेसारखीं कामें ते करीत असतात. प्रत्यक्षतेचा थंडगार वारा सुद्धां लागला म्हणजे त्यांचा उत्साह लौकरच गोठून जातो, व लौकरच ते दुसऱ्या एखाद्या चळवळीकडे लक्ष देऊं लागतात. ते स्वतः जगांतील रीतीभातींबद्दल अत्यंत नापसंती दर्शवीत असले तरी आपण मात्र सर्व सामाजिक रीतीभाती मनापासून पाळणारे असतात. त्यांना लोकांच्या योग्यतेची वगैरे जाणीव करून घेण्याची पात्रता जरी स्वतःस नसली तरी त्यांची योग्यता मात्र लोकांनीं नीट समजावी अशी त्यांची इच्छा असते. त्यांना नेहमीं लोकांच्या सहानुभूतीची अपेक्षा असते; व ते आजारी असले तर अशी अपेक्षा विशेष असते व बहुतेक त्यांची प्रकृति कधीं बरोबर नसते; व त्यांना स्वतः-बद्दलच फार कींव वाटत असते. त्यांना कोणतीहि गोष्ट अव्यास्थित-पणें झालेली आवडत नाहीं, व घरामध्यें खाण्यापिण्याच्या जिन्नसांत व एकंदर सर्व जगांत खूप स्वच्छता असली पाहिजे असें त्यांस वाटत असतें. ते नेहमीं प्रेमाचे भुकेले असतात व स्वतः दुसऱ्या-बद्दलच्या प्रेमाचें प्रदर्शन करून स्वतःबद्दलहि त्यांनीं तसेंच करावें अशी अपेक्षा बाळगतात. त्यांना जग म्हणजे नीरस अशी एक रानटी जागा वाटते, व घरामध्यें नेहमीं ते स्वतःचा आजार, सहानुभूतीबद्दलची

याचना, डोळ्यांत पाणी आणणें, घरांतून निघून जाण्याची धमकी देणें व अखेरीस आत्महत्त्येची भीति घालणें, इत्यादि गोष्टींनीं सर्व घरांतील लोकांचें लक्ष आपणाकडे वेधून घेतात. त्यांचा कधीं कधीं कलेकडे कल असलेला आढळून येतो व क्वचित् एखादी कला त्यांस उत्तमपणें अवगतहि असते. परंतु ती कला पूर्णपणें साध्य करून घेण्यास लागणारी स्वार्थत्यागाची तयारी त्यांच्याजवळ नसल्यामुळें त्यांस ती कधींच पूर्णतः साध्य होत नाहीं. त्यांच्या मनांत कांहीं तरी एखादें मोठें कार्य करावयाचें आहे असें ते सांगत असतात, परंतु ते संसारांत पडल्यामुळें तें साध्य होत नाहीं असें ते म्हणतात. कोणतीहि गोष्ट वर्णन करीत असतां ते सुंदर, छानदार, उत्तम अशा तऱ्हेचीं मोठमोठीं विशेषणें वापरतात, परंतु त्यांच्या मनांत खरी भावना मुळींच नसते. तसेंच लैंगिक संबंधांतहि ते थोडेसे थंडच असतात. अशा तऱ्हेचे आईबाप मनांतून अप्पलपोटे असून बाहेरून मात्र जगांत आपणांस कांहीं स्वार्थ नाहीं असें भासवीत असतात.

**त्यांच्या मुलाकडून अपेक्षा—**

अशा आईबापांचीं मुलें ह्या अप्रत्यक्ष वागणुकीच्या दडपणाखालीं सांपडतात. त्यांना आपल्या आईबापांच्या अश्रूंची, त्यांच्या टाकून देण्याबद्दलच्या ओरडीची व वरून वरून उत्कट प्रेम प्रगट करण्याबद्दल अपेक्षेची भीति वाटूं लागते. या आईबापांच्या आपल्या मुलाबद्दलच्या प्रेम, कर्तव्य, आज्ञाधारकपणा, स्वच्छता वगैरे बाबतींतील अपेक्षा गैरवाजवी असतात; त्यांच्या विरुद्ध मुलानें कोणतीहि गोष्ट केली तरी तीबद्दल त्यास दोष देण्यांत येतो. त्यांना आपल्या मनांतील कल्पनांप्रमाणें मुलानें तावडतोब बनलें पाहिजे अशी इच्छा असते; आणि त्यामुळें मुलानें कोणतीहि गोष्ट आपल्या स्वतःच्या मनाप्रमाणें केली तर ती त्यांना

चुकीची वाटते; आणि तीपासून त्यास परावृत्त करण्याकरितां तीं धाक दाखवितात. त्यामुळें मुलाच्या मनावर एक प्रकारचें कायमचें दडपण बसल्यासारखें होतें, व त्यामुळें फार भयंकर परिणाम होतात.

**मुलाचें फाजील कौतुक अथवा लाड—**

उलट पक्षीं कांहीं आईबाप आपल्या मुलांकरितां प्रत्येक गोष्ट करण्यासाठीं इतकी धडपड करतात कीं, तीं जणूं काय त्यांचे चाकरच बनतात व एकसारखीं त्यांच्या पुढें पुढें करून त्यांच्या मनांत स्वतःच्या महत्त्वाबद्दल चुकीची कल्पना भरवून देतात, व जी गोष्ट त्यांस स्वतःस सहज करतां आली असती तीबद्दलहि तीं मुलें दुसऱ्यावर अवलंबून राहावयास शिकतात. त्या मुलांच्या मनांत स्वतःच्या महत्त्वाबद्दल असलेली भलतीच कल्पना त्यांच्या आईबापांच्या प्रेमाच्या प्रदर्शनामुळें अधिकच बळावते. मात्र हें प्रेमाचें प्रदर्शन तीं त्यांच्या दृष्टीनें मूल जेव्हां चांगलें असतें तेव्हांच करतात. अशा आईबापांस आपल्या मुलांत कोणतेहि दुर्गुण दिसत नाहींत व दुसऱ्या कोणीं त्यांच्या मुलास वाईट म्हटल्यास ते त्यांस लागलीच मोडून काढून त्या मुलाच्या मनांत असलेल्या स्वतःबद्दलच्या कल्पनांस अधिकच दृढ करतात. अशा आईबापांस आपलें मूल फार सुंदर, कौतुकास्पद व कोणतीहि वाईट गोष्ट न करणारें असें वाटतें. आपल्या मुलानें कोणतीहि वाईट गोष्ट केलेली आपल्याला अगदीं सहन होणार नाहीं, आपणांस अगदीं मरणप्राय दुःख होईल असें त्याची आई सांगत असते. त्याच्या मनांतील विचार व तें कोणकोणत्या गोष्टी करतें या सर्व तिला ठाऊक असतात असें ती सांगत असते. या प्रकारच्या वागणुकीमुळें मुलास स्वतःबद्दलची यथातथ्य कल्पना कधींच येत नाहीं. एका क्षणांत त्याची स्तुति केली जाते, लाड केले जातात व बडदास्त

ठेविली जाते तर दुसऱ्याच क्षणांत त्यास रागें भरून शिक्षा केली जाते व त्याचा अपमान केला जातो. त्यामुळें आपण एखादा क्षुद्र जंतु आहों का परमेश्वर आहों ही गोष्ट त्यास कळत नाहीं. अशा तऱ्हेच्या मुलास बहुधा मेंदूच्या विकृति होतात. असें मूल एकटेंच असेल किंवा त्याच्या जन्मानंतर दुसरें मूल लौकर झालें नाहीं तर अशा मुलावर फार वाईट परिणाम होतो.

**दुर्वृत्त मुलाचीं लक्षणें—**

सामान्यतः पांच वर्षें वयाचें व ज्यास बिघडलेलें आहे असें म्हणतां येईल अशा मुलांत पुढील गोष्टी आढळून येतात. तें नाजूक असून त्याला नेहमीं छातीचा किंवा अपचनाचा विकार होतो. त्याला मधून मधून कसली तरी भीति वाटत असते, व कधीं कधीं आंचके येऊं लागतात. त्याचें वजन बहुधा वाजवीपेक्षां कमी असतें. त्याला नेहमीं स्वच्छ ठेवण्यांत येत असतें व त्याला घाणीची नावड असते. तें अकालींच प्रौढ बनतें व त्याला प्रौढ माणसांच्या विशेषतः आईच्या सहवासांत रहावेंसें वाटतें. तें क्वचितच स्मित करतें किंवा हंसतें व बहुतेक कधींहि आवाज करीत नाहीं. त्याच्या मर्जीविरुद्ध जरा एखादी गोष्ट झाल्यास तें रडूं लागतें. त्याच्या मनाची स्थिति नेहमीं अति आज्ञाधारकपणा किंवा रागीट हट्ट या दोहोंमध्यें हेलकावे खात असते व त्याच्या मनाप्रमाणें गोष्टी न घडल्यास तें दुबळेपणानें अश्रू ढाळूं लागतें. त्याला आपल्या बरोबरीच्या मुलांत खेळावेसें वाटत नाहीं व आपल्यापेक्षां लहान मुलांत खेळत असतां नेहमीं सर्वांत महत्त्वाची जागा स्वतःस घेऊन दुसऱ्यावर आपला तोरा गाजवीत असतें. आणि तसें न साधल्यास घरांत आईकडे तक्रार घेऊन येतें व तिला साहजिकच इतरानें त्यास द्वाडपणानें वागविलें असेल असें वाटून ती त्याचा

नेहमीं कैवार घेते. आईबापांपैकीं जें त्याचे विशेष लाड करीत नसेल त्याकडे जाण्याचें तें नेहमीं टाळीत असतें. अशा मुलामध्यें वरवर जो चांगुलपणा दिसून येतो तो नुसता आभासात्मक असतो व त्याच्या मनांत अगदीं विरुद्ध विचार चालू असून त्याची कृतिहि तितकी चांगुलपणाची नसते. त्याच्या विचारामध्यें नेहमीं सत्तेच्या, जुलुमाच्या व घाणेरड्या खेळाच्या कल्पना असतात, व आईबापांच्या आड ज्या गोष्टी तें मूल करतें त्यामध्येंहि याच गोष्टींचा प्रादुर्भाव दिसून येतो.

## आईकडे विशेष दोष—

सामान्यतः मूल बिघडण्याचें कारण जरी आई व बाप हीं दोन्हीं-हि असलीं तरी त्यामध्यें आईचा भाग विशेष असतो. याचें कारण मुलाच्या वागणुकीवर लहानपणीं आईचाच परिणाम फार होत असतो. कारण तें तिच्याच जवळ जास्त वेळ असतें. त्याप्रमाणेंच मुलास बिघडविण्यास कारण होणारे मनोधर्म आईच्याच ठिकाणीं जास्त असतात. पुरुष हा सामान्यतः कष्ट करणारा, व्यवहारी, लायक व व्यवहारज्ञान असलेला असा असतो. जर स्त्रीपुरुषांचे गुणधर्म विशेष जुळत नसले तर प्रथम अपत्य झाल्याबरोबर त्यांचेमध्यें थोडाफार परकेपणा उत्पन्न होतो, व मुलाच्या वागणुकीबद्दल त्यांच्यांत मतभेद होऊं लागला म्हणजे हें त्यांच्या स्वभावांतील अंतर अधिकाधिक वाढत जातें. हीं व अशा तऱ्हेचीं कारणें मुलीपेक्षां मुलास बिघडण्यास अधिक कारणीभूत होतात.

## मुलें दुर्वृत्त होण्याचीं कारणें—

मुलें बिघडण्याचीं कारणें त्यांच्या महत्त्वाच्या मानानें बर्ट या ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें क्रमानें दिलीं आहेत. ( १ ) योग्य शिस्तीचा

अभाव. (२) विशिष्ट प्रवृत्ति. (३) मनोविकारांची सामान्यतः चंचलता. (४) विशिष्ट स्वभावदोषामुळें उत्पन्न होणारी विषण्ण मनःस्थिति किंवा कधीं कधीं विषण्णता उत्पन्न झाल्यामुळें मधून मधून येणारी विचित्र स्वभावाची लहर. (५) आनुवंशिक दुर्गुणांची किंवा गुन्हे करण्याची परंपरा. (६) बौद्धिक दोष अथवा उणेपणा. उदाहरणार्थ, मंदबुद्धि किंवा जडबुद्धि असणें. (७) सदोष मनःप्रवृत्ति अथवा विचित्र प्रकारच्या आवडी किंवा हौस. उदाहरणार्थ, साहस करण्याची वृत्ति, अतिशय सिनेमा पाहण्याची आवड वगैरे. (८) शारीरिक व मानसिक वाढ होण्याची अवस्था. उदाहरणार्थ तारुण्यांत येण्याचा काळ, बुद्धीची अकालीं अथवा लवकर वाढ. (९) आनुवंशिक बुद्धिहीनतेची परंपरा अथवा इतिहास. (१०) दुर्वृत्त आप्त लोकांशीं संबंध. (११) घराबाहेरील कांहीं अनिष्ट गोष्टींचा परिणाम. उदाहरणार्थ वाईट संगत, करमणुकीच्या साधनांचा अथवा प्रकारांचा अभाव अथवा अतिरेक इ. (१२) आनुवंशिक स्वभावदोष. उदाहरणार्थ घराण्यांतील पूर्वींच्या व्यक्तींपैकीं कोणास वेड लागलेलें असणें. (१३) आनुवंशिक शारीरिक दौर्बल्य. (१४) दारिद्र्य व तदनुषंगिक हालअपेष्टा वगैरे. (१५) शारीरिक दौर्बल्य अथवा अशक्तता वगैरे नैसर्गिक दोष. या अनेक प्रकारांपैकीं कोणता तरी प्रकार आपण ज्यास बिघडलेलें मूल म्हणतों त्याच्या या प्रकारच्या प्रवृत्तींच्या मुळाशीं असतो.

**आईबापांचें अज्ञान—**

एक गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मुलें बिघडण्याचा दोष आजच्या परिस्थितींत तितकासा आईबापांकडे येऊं शकत नाहीं. कारण आपण काय करीत आहों व त्याचे काय परिणाम होतात ही गोष्ट त्यांसहि नीटशी कळत नाहीं. तीं आपल्या दृष्टीनें मुलाचें हितच करीत

असतात व त्यांच्या वागणुकीच्या मागें त्यांच्या मनांतील इच्छा किंवा हेतु काय असतात हें त्यांचें त्यांनाहि नीट कळत नाहीं. कारण त्या गोष्टी आपोआप घडून येत असतात. तथापि ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, आईबापांस योग्य तऱ्हेचें ज्ञान करून दिल्यास लहान मुलांचे स्वभाव बनविण्याचे कामीं आज त्यांच्या अज्ञानामुळें जे अनिष्ट प्रकार घडत आहेत व त्यामुळें जे घोर परिणाम होत आहेत ते बरेचसे वांचतील. आपणांस जें आज वाढत असलेलें अनारोग्य व दुःख, पिढी दर पिढीस अधिकाधिक होत चाललेलें दिसत आहे त्याचा आरंभ या ठिकाणीं होत असतो.

जें मूल अगोदरच बिघडलेलें आहे त्यावर घरामध्यें कोणताहि उपचार करतां येणें शक्य नसतें. तें काम एखाद्या मानसशास्त्रवेत्त्याकडेच सोंपवावयाचें असतें. घरीं कोणती गोष्ट करणें शक्य असेल तर ती प्रतिबंधक स्वरूपाचीच होय; व याकरितां आईबापांनीं स्वतःचेंच नीट निरीक्षण आणि परीक्षण केलें पाहिजे व अशा तऱ्हेचें परीक्षण केलें असतां कित्येक वेळां मुलास बिघडण्यास कारणीभूत होत असलेले स्वभावदोष त्यांच्याच ठिकाणीं दिसून येतात व त्यामुळें त्यावर त्यांस नीट नियंत्रण ठेवतां येत नाहीं असें आढळून येतें.

## मुलास सुधारण्याचे उपाय—

याकरितां आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून पुढील गोष्टी करणें हितावह होईल.

( १ ) सामान्यतः प्रारंभींच मुलाच्या प्रवृत्ती परिपक्क होऊन त्यांस परिस्फुटता मिळेल अशी काळजी घ्यावी.

(२) मुलास अगदीं आरंभापासून म्हणजे दोन वर्षांच्याहि आधींपासून स्वतः निरनिराळ्या गोष्टी करण्यास उत्तेजन द्यावें.

(३) पांच वर्षांच्या अगोदर त्याच्यापुढें फार मोठीं ध्येयें ठेवण्याचा प्रयत्न करूं नये.

(४) मुलाची चांगली वाढ होण्याच्या कामीं त्यास उत्तेजन द्यावें.

(५) मुलाबद्दलचें आपल्या ठिकाणीं असलेलें प्रेम योग्य रीतीनें व शांतपणें दाखविण्याचा प्रयत्न करावा. परंतु उगाचच त्याचे मुके घेऊन त्याला हातावर वगैरे खेळवून किंवा त्याचे अतिशय लाड करून निष्कारण प्रेमाचें वारंवार प्रदर्शन करूं नये.

(६) मुलाची जी वास्तविक योग्यता असेल तीच नीट ओळखून घ्यावी. त्याच्याभोंवतीं उगाच एक फार थोरपणाचें वलय उत्पन्न करूं नये.

(७) मुलाच्या वयाच्या मानानें त्यास शिस्त लावण्याचा प्रयत्न करावा. अर्थात् पांच वर्षें वयापर्यंत या शिस्तीचें प्रमाण अगदीं अल्प राहील.

(८) मुलास नेहमीं दुसऱ्या मुलाच्या संगतींत राहूं द्यावें. तेच त्याचे स्वाभाविक सोबती व सवंगडी होत. आपणांस स्वतःस मुलें नसल्यास त्याच्याच वयाचीं किंवा थोड्या कमीअधिक वयाचीं इतर मुलें असतील त्याजबरोबर त्यास खेळूं द्यावें.

(९) मुलास आपण एकच काय ते सवंगडी आहों अशी त्याची कल्पना होऊं देऊं नये.

(१०) जर आपणांस विशेष उत्कट प्रेमाची अपेक्षा असेल तर तें मुलापासून मिळविण्याच्या ऐवजीं प्रौढ माणसापासून मिळविण्याचा प्रयत्न

करावा. नाहीं तर आपली इच्छा तर तृप्त होणार नाहींच, पण मूल मात्र बिघडून जाईल, व जी शिस्त आपण स्वतःस लावून घेतली पाहिजे ती टाळण्याचा प्रयत्न आपणाकडून होईल.

( ११ ) मुलापुढें कोणत्या गोष्टी बोलूं नयेत याचा अभ्यास केला पाहिजे, आणि तशा गोष्टी बोलण्याचें टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेंच स्वतःच्या चेहऱ्यावरहि अशा गोष्टींचा परिणाम होणार नाहीं अशी काळजी घेत जावी. रडणें, दुःखाचें प्रदर्शन करणें, खोलींतून निघून जाणें वगैरे गोष्टी मुलासमोर करण्याचें टाळीत जावें. कारण या गोष्टींचा अर्थ मुलास बरोबर कळतो व त्याचा परिणामहि त्याच्या मनावर होतो.

या गोष्टी करण्यांत जितकें आईबापांस यश मिळेल तितकें आपण आपलें योग्य कर्तव्य केलें याची जाणीव होऊन त्याबद्दल आपणांस योग्य तें बक्षिस मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

यावरून लहान मुलास विशेषतः त्याच्या बालपणांत योग्य तऱ्हेनें वाढविण्याची जबाबदारी आईबापांवर किती असते हें दिसून येईल व या कालांत मातापित्यांच्या हातून घडलेल्या क्षुल्लक चुकीचाहि परिणाम त्यांच्या प्रिय अपत्यास आयुष्यभर भोगावा लागेल ही जाणीव आई-बापांस जितकी लवकर होईल तितकी आपल्या राष्ट्राची भावी पिढी अधिक सुखकर, सुदृढ व कर्तबगार करण्याचें कार्य त्यांच्याकडून अधिकाधिक होत जाईल.

## प्रकरण तेविसावें

# शिक्षा

### शिक्षेची आवश्यकता—

लहान मुलास आपण कितीहि ममताळूपणानें वागविलें, कितीहि पद्धतशीर रीतीनें त्याचें संगोपन करण्याचा प्रयत्न केला तरी आपल्या मनाविरुद्ध किंवा आपण योजलेल्या पद्धतीविरुद्ध त्याच्या हातून केव्हां केव्हां वर्तन होणें स्वाभाविक असतें व तें मूल पुढें बिघडूं नये याची काळजी आपणांस घ्यावयाची असते. 'योग्य वेळीं घातलेला एक टांका पुढें घालावे लागणारे नऊ टांके वांचवितो' अशी जी एक इंग्रजींत म्हण आहे तीप्रमाणें योग्य वेळीं दाखविलेला थोडासा निष्ठुरपणा किंवा योग्य प्रसंगीं केलेलें थोडेंसें आत्मसंयमन पुढील मोठा अनर्थ टाळण्यास कारण होतें. याप्रमाणें आपण कितीहि काळजी घेतली तरी मुलाकडून प्रसंगवशात् गैरवर्तणूक होण्याचा संभव असतो व तिची उपेक्षा केल्यास पुढें तिचा परिणाम वाईट होण्याचा संभव असतो. याकरितां त्यास अशा गैरवर्तणुकीबद्दल वेळींच शिक्षाहि करणें जरूर असतें.

### अखेरचा उपाय—

मुलास कोणत्याहि गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा करणें ही गोष्ट अगदीं प्रथमच मनांत न आणतां शेवटची पायरी म्हणून या गोष्टीचा अवलंब करावा. अगदीं अखेरची गोष्ट व जेथें दुसरा कोणताहि उपाय नाहीं अशाच वेळीं फक्त शिक्षा करण्यांत यावी. एरव्हीं कधींहि शिक्षेचा अवलंब करूं नये. मुलाच्या आयुष्यामध्यें त्यानें एखादी गोष्ट

प्रथमच केली असतां त्यास शिक्षा करावी लागेल असा प्रसंग कधींहि येत नाहीं हा अगदीं सामान्य नियम समजावा. मग त्या मुलानें केलेल्या गोष्टीचे परिणाम कांहींहि असोत. मुलास शिक्षा करावयाचे प्रसंग त्याच्या आयुष्यांत पुढें हळूहळू येतच असतात. अशा वेळीं त्यास शिक्षा करावयाची ती कोणती व कोणत्या पद्धतीनें करावयाची या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत.

## शिक्षेचे परिणाम—

शिक्षा केल्यानें हळव्या मनाच्या मुलास आयुष्याबद्दल तिटकारा वाटूं लागतो. शिक्षेमुळें कांहीं मुलांचें अन्तःकरण कठोर बनतें; व कोणासहि आपल्या हुकमतींत वागवावयाचें असल्यास त्यास शिक्षा केली पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. शिक्षेमुळें मुलांच्या मनांत प्रेमापेक्षां भीति उत्पन्न होते व आईबाप व मुलें यांच्यामध्यें स्वाभाविक सख्य व मोकळेपणा राहात नाहीं. रागानें उच्चारलेले शब्द हेहि एक प्रकारची शिक्षा असून त्यांचा उपयोग फारच क्वचित् केला पाहिजे.

## दुर्वर्तनास आजाराचें स्वरूप—

कधीं कधीं मुलाचें दुर्वर्तन त्यास शिक्षा करण्यापेक्षां तें आजारी आहे असें समजूत वागविल्यास व त्याची अडचण शोधून काढण्याचा प्रयत्न केल्यास लवकर सुधारतें. केव्हां केव्हां त्यास विश्रांतीची जरूर असते. मुलास शिक्षा करण्यास केव्हां केव्हां आईबाप केवळ चिडल्यामुळें प्रवृत्त होतात. वास्तविक चिडण्यामध्यें त्यांचाच दोष असतो. डॉक्टरानें रोग्याबद्दल कधींहि चिडून जातां कामा नये. मॉंटेसोरीनें आपण अशा मुलांस कसें सुधारतों तें पुढील शब्दांत सांगितलें आहे:

"आम्हांस अनेकदां असें आढळून आलें आहे कीं, आम्हीं शिक्षा केली तरी तिकडे लक्ष न देतां कांहीं मुलें इतरांस त्रास देतांना आढळत. अशा मुलाची प्रथम डॉक्टरकडून तपासणी करण्यांत येते. जर त्याची प्रकृति ठीक असेल तर त्यास खोलीच्या एका कोपऱ्यांत एकीकडे एक खुर्ची मांडून वेगळें ठेवण्यांत येतें. त्याजवळ त्याला पाहिजे असतील तीं खेळणीं ठेवण्यांत येतात, व त्यास इतर मुलें काम करीत किंवा खेळत असलेलीं त्या जागेवरून दिसत असतात. अशा रीतीनें त्यास एकीकडे बसाविलें म्हणजे तें मूल बहुतेक लवकरच समजतें. त्याला बसल्या ठिकाणाहून त्याची सर्व इतर मित्रमंडळी व मुलें आपापलीं कामें करीत असतांना दिसत असतात व आपण एकटेंच वेगळें बसलों आहोंत हें त्याच्या लक्षांत येतें. त्यामुळें शिक्षकानें सांगितलेल्या हजार गोष्टींपेक्षां या प्रत्यक्ष देखाव्यानें त्याच्या मनावर अधिक परिणाम होतो. हळूहळू त्यास त्या मुलांतच राहून काम करण्यांत काय फायदा आहे तें कळूं लागतें व आपणहि त्याच्यांतच राहून काम करीत असावें असें वाटूं लागतें. अशा रीतीनें जीं मुलें प्रथम द्वाडपणा करीत त्या सर्वांस आम्हीं सुधारलें आहे. ज्या मुलास एकीकडे बसविलेलें असेल त्याची जणू कांहीं तें आजारीच आहे असें समजून अधिक काळजी घेण्यांत येते. मी स्वतः खोलींत आल्याबरोबर प्रथम तें जसें कांहीं अगदीं लहान बाळ आहे अशाप्रमाणें अगोदर त्याच्याकडे जातें आणि नंतर इतरांकडे लक्ष देतें, त्याच्या कामाकडे पाहातें व त्यास निरनिराळे प्रश्न विचारतें. ज्या मुलास अशा तऱ्हेची शिस्त लावण्याचा प्रसंग येई त्याच्या मनांत काय होत असे तें आम्हांस कळत नाहीं, परंतु अशा तऱ्हेनें सर्व मुलांस पूर्णपणें शिस्त मात्र लागत असे."

## शिक्षेकडे सामान्य प्रवृत्ति—

शिक्षणपद्धतीमध्यें एका काळीं कडक शिस्तीचें व ती न पाळल्यास कडक शिक्षा करण्याचें महत्त्व फार मानलें जात असे. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, ग्रहणशक्ति वगैरे गोष्टी लक्षांत न घेतां व त्याच्या मनाच्या स्वाभाविक वृत्ति अथवा कल यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून प्रत्येक विद्यार्थ्याचा विशिष्ट अभ्यासक्रम विशिष्ट वेळांत झालाच पाहिजे अशा तऱ्हेची वृत्ति सर्व शिक्षक व पालक यांमध्यें आढळून येत असे. तसेंच मुलाचा स्वभाव बनविण्याच्या कामींहि शिक्षेस विशेष प्राधान्य देण्यांत येत असे. ही गोष्ट एकदां मागें उल्लेखिलेल्या पुढील सुभाषितावरून दिसून येते.

**लालने बहवो दोषास्ताडने बहवो गुणाः।**
**तस्मात् पुत्रं च शिष्यं च ताडयेन्न तु लालयेत्॥**

त्याप्रमाणेंच

**लालयेत् पंच वर्षाणि दश वर्षाणि ताडयेत्।**
**प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्॥**

यावरूनहि मुलांस इष्ट वळण लावण्याच्या कामीं युक्तीच्या ऐवजीं शिक्षेचाच उपयोग अधिक करण्याची प्रवृत्ति त्यावेळीं समाजांत असावी असें स्पष्ट होतें.

याच वृत्तीचें गमक म्हणजे सर्व विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या ओळखीची म्हण ‘छडी लागे छम् छम्। विद्या येई घम् घम्’ हीमध्यें आपणांस सर्वत्र आढळून येतें. ही प्रवृत्ति केवळ आपल्या इकडेच आढळत असे असें नव्हे तर पाश्चात्य देशांतहि अशाच तऱ्हेची समजूत होती हें ‘Spare the rod and spoil the Child’

म्हणजे 'छडीची उपेक्षा केल्यास मुलें बिघडतात' अशी जी म्हण सार्वत्रिक रूढ झालेली दिसते, तीवरून व्यक्त होते. एका काळीं समाजांत शिस्तीस फार महत्त्व होतें. तसेंच शिस्त ही केवळ शिक्षेच्या भीतीनें किंवा प्रत्यक्ष दंडनानेंच उत्पन्न होते अशीच समजूत त्यावेळीं सर्वत्र प्रचलित होती असें तत्कालीन वाङ्मय वगैरे वरून प्रत्ययास येतें. परंतु हळू हळू या समजुतींत आतां फरक पडत गेला आहे व शिक्षेच्या भीतीपेक्षां प्रेमाचें बंधन व सामर्थ्य अधिक आहे ही गोष्ट दिवसेंदिवस समाजांतील विचारी लोकांस पटत चालली असून शिक्षेचा अवलंब शक्य तों टाळणेंच इष्ट आहे असेंहि त्यांस आतां वाटूं लागून त्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत.

**सौम्य उपायांचा अवलंब—**

लहान मुलांना कोणत्याहि अनिष्ट गोष्टींपासून परावृत्त करण्यासाठीं शिक्षेचा अवलंब करण्याऐवजीं त्याचें मन सौम्यपणें त्या गोष्टीपासून होणारे तोटे व अनिष्ट परिणाम हे त्याच्या मनास अन्य मार्गानें पटवून दिले असतां आपला इष्ट हेतु अधिक सुलभतेनें व परिणामकारक रीतीनें आणि कायमचा अधिक शाश्वत स्वरूपांत साध्य करून घेतां येतो ही गोष्टहि आतां पालकांस, शिक्षणशास्त्रवेत्त्यांस व शिक्षकांस पटूं लागली आहे. एवढेंच केवळ नव्हे तर शारीरिक शिक्षा करणें हें आतां सुसंस्कृत समाजाला एक प्रकारचें लांछन मानण्यांत येऊन तें एक प्रकारचें रानटीपणाचें लक्षण आहे असें मानण्याकडे प्रवृत्ति होत असून शारीरिक शिक्षा ही केवळ शिक्षणक्षेत्रांतच नव्हे तर सर्वत्रच बंद करण्यांत यावी अशा तऱ्हेचे प्रयत्न सुरू आहेत.

शिक्षण क्षेत्रांतहि शाळांतून शारीरिक शिक्षा देण्यांत येऊं नये अशा तऱ्हेचे निर्बंध व नियम करण्यांत आले असून शिक्षणाधिकाऱ्यांनीं

अशा तऱ्हेच्या सूचना सर्व शाळांना दिल्याचेंहि आढळून येतें व अलिकडे शारीरिक शिक्षा बहुतेक बंद झाली असून तिचा अवलंब फारच क्वचित् व विशेष अनिष्ट प्रसंगींच करण्यांत येतो.

## शारीरिक शिक्षेविरुद्ध चळवळ—

याप्रमाणेंच पालकांनींहि आपल्या लहान मुलांस शारीरिक शिक्षा करतां कामा नये अशा तऱ्हेची वृत्ति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली पाहिजे व याकरितां जरूर तर तसे निर्बंधहि घातले गेले पाहिजेत, अशा तऱ्हेचे विचार आपणांकडे अनेक दिवस व्यक्त होत आलेले आहेत व कांहीं ठिकाणीं तसे प्रयत्नहि करण्यांत आले असल्याचें आढळून येतें. उदा. ग्वाल्हेर व अड्यार येथें एक पालक व शिक्षक यांचा संघ स्थापन करण्यांत आला होता [ २८ डिसेंबर १९१५ ].

या संघाचे मुख्य उद्देश असे नमूद करण्यांत आले होते.

१ घरांत व शाळेंत मुलास शारीरिक शिक्षा मिळणार नाहीं असा बंदोबस्त करणें.

२ पालक व शिक्षक यांच्यामध्यें शिक्षणशास्त्रविषयक व मुलांच्या संगोपन व संवर्धनविषयक अद्यावत् व नवीन कल्पनांचा व ज्ञानाचा प्रसार करणें.

त्या संघातर्फे कांहीं वाङ्मय मधून मधून प्रकाशित करण्यांत येत होतें. या संघातर्फे जीं पत्रकें निघालेलीं आहेत, त्यांपैकीं एका पत्रकांत "मुलांच्या बाबतींतील निष्ठुर वागणुकीस प्रतिबंध" ( Prevention of Cruelty to Children–by Y. L. Gunye 1919–1921 ) असें पत्रक प्रसिद्ध झालें होतें व त्यामध्यें एका कायद्याची मागणी करण्यांत येऊन त्या कायद्याची रूपरेषाहि देण्यांत आली

होती. या कायद्याचा उद्देश मुलास न्याय व समता यांचा लाभ मिळवून देणें व मातापित्यांची मुलाशीं होणारी वागणूक या तत्त्वांवर होईल अशी तजवीज करणें असा होता.

## पितृपदाची पात्रता—

या कायद्याच्या उद्देशासंबंधींच्या उपोद्घाताच्या उपसंहारांत असेंहि म्हटलें होतें कीं, जर या कायद्यामुळें इष्ट हेतु साध्य झाला नाहीं तर दुसरा एक कायदा करून भावी मातापित्यांस मुलांचें संवर्धन, पोषण व संगोपन या विषयाचें व्यवस्थित शिक्षण देणें आवश्यक करण्यांत येऊन स्त्री व पुरुष यांच्या नियमित परीक्षाहि अशा शिक्षणामध्यें घेतल्या जाव्या व अशा स्त्रीपुरुषांस हें शिक्षण घेतल्याबद्दलचे व ते योग्य आणि कार्यक्षम पालक होण्यास पात्र असल्याचे दाखले देण्यांत यावेत; आणि असा कायदा झाल्यानंतर असा दाखला नसणाऱ्या व्यक्तीस पितृपदाचा अथवा पालकत्वाचा अधिकार असण्यास अपात्र समजण्यांत यावें व त्यास आपल्या पाल्यास योग्य नागरिक बनविण्यास असमर्थ मानण्यांत यावें. ज्याप्रमाणें सांप्रत शिक्षकास अध्यापन विषयांत परीक्षा देऊन पात्रतेचा दाखला घ्यावा लागतो, त्याप्रमाणेंच पितृपदासहि पात्र होण्याचा दाखला अवश्य करण्यांत आला पाहिजे. त्याप्रमाणेंच या पुस्तकांत ग्वाल्हेर येथील डॉ. य. गो. आपटे यांनीं सांगितलेल्या आपल्या एका अनुभवाचाहि उल्लेख केला होता तो असा:—

## बालगुन्हेगारांची चौकशी—

"बर्मिंगहॅम येथें बाल गुन्हेगारांसाठीं एक कोर्ट स्थापन करण्यांत आलें आहे. तेथें कशा तऱ्हेनें चौकशी करण्यांत येते त्याची थोडीशी रूपरेषा येथें दिल्यास शिक्षकांस व पालकांस लहान मुलांनीं कोणताहि

अपराध केल्यास त्यांच्याशीं कसें वागावें हें कळून येण्यास पुष्कळच मदत होईल म्हणून त्याचें येथें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे.

ही संस्था त्या देशांत अशा कार्यासाठीं स्थापन झालेल्या संस्थांत आद्य संस्था होय. अशा ठिकाणीं प्रथम जीं मुलें नियमाविरुद्ध वागल्याचें आढळून येतें त्यांस आणि त्या मुलांचे आईबाप अगर बहिणभाऊ यांस एका दिवाणखान्यांत एकत्र करण्यांत येतें व त्या मुलांस पहिली गोष्ट ही सांगण्यांत येते कीं, तुम्ही सर्वांनीं सत्य असेल तें सांगितलें पाहिजे. आपल्या हातून जर चूक झाली असेल तर ती कबूल करण्यास लाजतां कामा नये. असत्य भाषण करण्याची मात्र प्रत्येकास लाज वाटली पाहिजे. असत्य भाषणामुळें आपण अधिकाधिक दुर्वर्तनी बनत जातों. तुम्ही सत्यास चिकटून राहाल तर तुम्ही सज्जन व उपयुक्त नागरीक व्हाल.

ही संस्था मुख्यतः शिक्षा करण्यापेक्षां सुधारणा करण्याच्या उद्देशानें स्थापन करण्यांत आली आहे. येथें मुलांस इतर लोकांच्या दृष्टीस तीं पडूं नयेत म्हणून एका बाजूच्या दरवाजानें आणण्यांत येतें आणि त्यांचा इतर गुन्हेगारांशीं कोणत्याहि तऱ्हेनें संबंध येणार नाहीं अशी सक्त तजवीज करण्यांत येते. या कामाकरितां एक अतिशय सहानुभूतिपूर्ण व समजदार असा अधिकारी नेमण्यांत येतो व तो क्षुल्लक गुन्हे करणाऱ्या मुलांस अधिक गंभीर गुन्हे करणाऱ्या मुलांपासून अगदीं पृथक् ठेवतो. त्यांची चौकशी शक्य तों अगदीं गुप्त रीतीनें व एकान्तांत केली जाते. केवळ जिज्ञासू व गमतीखातर येणाऱ्या प्रेक्षकांस मुळींच प्रवेश दिला जात नाहीं. तेथें प्रौढ गुन्हेगार कधींहि दिसत नाहींत. तसेंच चौकशीचें काम इतर पोलीस कोर्टाच्या पद्धतीनें न चालतां एखाद्या कुटुंबांतील मंडळी एकत्र जमून चर्चा करतात तसें चालतें. मुलांस आपल्या चुकीबद्दल येथें

आपणांस धाक दाखवून समज दिली जाणार आहे याची जाणीव असते, त्यामुळें त्यांस इतर लोकांपुढें गुन्हा झांकून ठेवून किंवा खोटें बोलून वेळ मारून नेण्याची प्रौढी मिरवण्याची इच्छा होत नाहीं. कोणत्याहि एका मुलास दुसऱ्या मुलाचा गुन्हा माहीत होऊं दिला जात नाहीं. एखाद्या मुलानें केलेल्या चुकीबद्दल रोष किंवा निष्ठुर निर्भर्त्सना दाखविण्यापेक्षां दुःख प्रदर्शित करण्यांत येतें. मुलाचें हृदय व स्वाभिमान जागृत होईल अशा तऱ्हेनेंच त्यास प्रश्न करण्यांत येतात. आणि यामुळें त्याची सत्प्रवृत्ति जागृत होऊन बहुतेक मुलें आपली चुकी कबूल करतात. त्यांस थोडासा मायाळूपणानें उपदेश केला व केलेल्या चुकीबद्दल त्याचा दोष दाखवून दिला म्हणजे बहुधा तीं मुलें पुनः असें न करण्याचें वचन देऊन मोकळीं होतात व बहुधा पुन्हा तीं अशा प्रकारचें अपकृत्य करीत नाहींत.

या सर्व कार्याची व्यवस्थित रीतीनें नोंद ठेवण्यांत येते व ज्या बालगुन्हेगारांस सुधारण्यासाठीं कांहीं मुदत दिलेली असते त्यांच्या वागणुकीवर तेवढ्या मुदतींत नजर ठेवून जर तीं मुलें सद्वर्तनी दिसलीं तर त्यांचें नांव त्या नोंदींतून काढून टाकण्यांत येतें. हें सर्व नोंदणी-पुस्तक गुप्त ठेवण्यांत येतें व त्यामध्यें या मुलावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांचे शेरे लिहून ठेवण्यांत येतात. या एकंदर गोष्टीचा परिणाम तेथें असा दिसून आला कीं, वार्षिक सुमारें ७०० मुलांपैकीं शेंकडा फक्त २ मुलांनीं पुनः दुर्वर्तन केल्याचें आढळून आलें. हे देखरेख करणारे अधिकारीहि सुशिक्षित असून आपल्या कामावर त्यांची फार भक्ति असते. यांत कांहीं स्त्रियाहि असतात. तेथील अधिकाऱ्यानें मोठ्या अभिमानानें असें सांगितलें कीं, गेल्या दोन वर्षांत बर्मिंगहॅम

जिल्ह्यांत १६ वर्षांखालील एकहि मूल तुरुंगांत गेलें नाहीं व यांतच या पद्धतीची उपयुक्तता व कार्यक्षमता दिसून येते."

## शिक्षेचे प्रसंग कमी होणें अवश्य—

आज मुलास एखाद्या गोष्टीपासून परावृत्त करण्यासाठीं आपण जी त्या मुलास बारंवार शिक्षा झाल्याचें पाहतों ती गोष्ट आपल्या ज्ञानाच्या वाढीबरोबर कमी कमी होत गेली पाहिजे. अशा तऱ्हेनें शिक्षेचे प्रसंग कमी येणें यावरून त्या मुलाच्या आईबापांचें ज्ञान, त्या मुलाबद्दलची सहानुभूति व कौशल्य यांचें मापन करतां येईल. मात्र ही गोष्ट जे आईबाप अगदीं उलट दिशेस जाऊन आपण आपल्या मुलास कधीं-हि शिक्षा करीत नाहीं, शिक्षा करण्यावर आपला मुळींच विश्वास नाहीं असें सांगतात त्यांच्या बाबतींत लागू नाहीं. जरूर त्यावेळीं मुलास योग्य प्रमाणांत शिक्षा करणें अवश्य असतें ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेविली पाहिजे.

## शिक्षा करण्याची पद्धति—

अशा वेळीं शिक्षा करण्याची पद्धति व कोणती शिक्षा करावयाची या गोष्टी महत्त्वाच्या असतात. मुलाचें ज्ञान व मातापित्यांचें ज्ञान जसजसें वाढत जाईल तसतशी मुलांस प्रतिबंधात्मक शिक्षा करण्याची वेळ कमी कमी येत जाईल. ही गोष्ट विशेषें करून आईबापांच्या ज्ञानावर, सहानुभूतीवर व कौशल्यावर अवलंबून असेल.

सामान्यतः न्यायाच्या बाबतींत पुढील गोष्टी अगदीं प्राथमिक महत्त्वाच्या समजल्या जातात. (१) आरोपीस संशयाचा फायदा मिळाला पाहिजे. (२) आरोपी दोषी आहे असें आढळून आल्यास त्यास

ताकीद देऊन सुधारण्याकरितां कांहीं मुदत दिली पाहिजे व शिक्षा करण्याचें लांबणीवर टाकलें पाहिजे. ( ३ ) जी शिक्षा करावयाची ती शिक्षा त्या गुन्ह्याच्या प्रमाणांत असली पाहिजे. ( ४ ) आरोपीला कायदा माहीत असला पाहिजे, आणि गुन्ह्याचें स्वरूप कळण्याइतकी त्याची मनःस्थिति शाबूत असली पाहिजे. तसेंच त्यास बचाव करण्याची पात्रता असली पाहिजे. या वरील न्यायांतील तत्त्वांची आपणांस मुलास शिक्षा करण्याची वेळ येईल तेव्हां पूर्ण जाणीव असली पाहिजे.

**शिक्षा करण्याचा प्रसंग—**

शिक्षा करण्याचा प्रसंग पुढें दिलेल्या परिस्थितींत उत्पन्न होतो. एखादें मूल त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीस योग्य व वाजवी अशा मार्गानें प्रकट होण्याचा पूर्ण वाव दिला असतां व शक्य त्या सर्व गोष्टी केल्या असतांहि तें मूल गैरवाजवी पद्धतीनें आपल्या प्रवृत्तीस वाव देत आहे. उदाहरणार्थ, मुलास चित्रें काढण्याचीं सर्व साधनें दिलीं असतां आणि त्यानें कागदावर चित्रें काढलीं असतां त्यांचें योग्य तें कौतुक व प्रशंसा केली असतांहि जर तें भिंतीवर चित्रें काढण्याचा हट्ट करील तर त्यास शिक्षा करणें अवश्य होतें.

तथापि त्यानें प्रथमच चुकी केली असतां त्यास केवळ ताकीद द्यावयाची असते व ही ताकीद देत असतां त्यास असें स्पष्ट सांगावयाचें असतें कीं, अशी गोष्ट पुनः झाल्यास त्यास अमुक अमुक तऱ्हेची शिक्षा मिळेल. ही ताकीद स्पष्ट शब्दांत दिली असली पाहिजे. उदाहरणार्थ, वरील बाबतींत मुलास असें सांगावें कीं, 'तुला कागद वगैरे सर्व गोष्टी दिल्या असतां तूं भिंतीवर रेघोट्या काढतोस. जर पुनः

असें करशील तर तुला अमुक शिक्षा करीन.' उदाहरणार्थ, 'निजा-वयास अर्धा तास लवकर पाठवीन.' त्याचीं चित्रें काढण्याचीं साधनें मात्र काढून घेण्याचा धाक त्यास दाखवूं नये. तसेंच अशा वेळीं त्यास नीतिमत्तेच्या गोष्टी सांगूं नयेत. कारण त्याचा हा गुन्हा नैतिक स्वरूपाचा नसतो. तर केवळ आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीस अयोग्य मार्गानें वाव देण्याचा किंवा प्रकट करण्याचा असतो. लहान मुलास नीति वगैरेचे नियम अज्ञात असतात व त्यामुळें त्यास कोणत्याहि नैतिक गुन्ह्याबद्दल दोष देतां येत नाहींत.

जर त्यानें पुन्हा चुकी केली तर तावडतोब त्यास पूर्वी दिलेल्या ताकिदीची आठवण देऊन तावडतोब शिक्षा करावी. अशा वेळीं त्यास आपणांस शिक्षा कशाबद्दल केली जात आहे हें स्पष्ट समजावें. एवढ्यापुरतेंच भाषण करावें.

## शिक्षा करतेसमयींची वृत्ति—

शिक्षा करतेवेळीं आपल्या मनांतील कोणत्याहि विकारास वाव देऊं नये. शक्य तों न्यायाधिशाची व अगदीं निर्विकार वृत्ति ठेवावी. अशा वेळीं राग किंवा खेद मुळींच दाखवूं नये. त्या मुलाची कोणत्याहि प्रकारें आपण व्यक्तिशः त्याजवर राग काढीत आहों अशी समजूत न होतां केवळ योग्य वागणुकीचे जे नियम आहेत त्यांचें पालन करीत आहों अशी समजूत झाली पाहिजे.

ज्यावेळीं त्याच मुलानें एखादी चूक केली आहे किंवा नाहीं हें प्रत्यक्ष किंवा स्पष्टपणें निश्चित झालें नसेल अशा वेळीं त्या मुलास त्या विशिष्ट चुकीबद्दल जबाबदार धरावें किंवा नाहीं याबद्दल प्रथम नीट चौकशी झाली पाहिजे. अशा चौकशीची पद्धति शक्य तों

न्यायाच्या कचेरींतील पद्धतीसारखी असावी. मुलाला आपलें म्हणणें मांडण्यास व त्याच्या सत्यतेबद्दल साक्षी वगैरे देण्यास पूर्ण वाव देऊन त्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा अडथळा आणूं नये व त्यानें आपली बाजू पूर्णपणें मांडल्यानंतर मगच त्यास उलट प्रश्न विचारावा व संशयाचा फायदा पूर्णपणें मुलास दिला पाहिजे. आपण नेहमीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, घरांतील इतर मुलें व नोकर-चाकर आपण केलेल्या चुकीचा दोष लहान मुलावर टाकण्यास कमी करीत नाहींत.

पांच वर्षांखालील मुलानें एखादी गोष्ट आपण केली नाहीं असें साफ सांगितलें तर आपणांस त्याबद्दल आश्चर्य किंवा राग वाटतां कामा नये. तसेंच एखादी गोष्ट नाकबूल केली म्हणून त्यास अधिक शिक्षा करूं नये. उलट त्यानें एखादी चुकी कबूल केल्यास त्याबद्दल मात्र त्याची प्रशंसा करून त्याची शिक्षा कमी करावी व खरें बोलल्या-बद्दल त्यास कमी शिक्षा मिळत आहे असें स्पष्ट सांगावें. केवळ चुकी कबूल करीत आहे म्हणून सर्व शिक्षा कधींहि माफ करूं नये.

## शिक्षेचें स्वरूप—

शिक्षेचें स्वरूप पुढीलप्रमाणें असावें: (१) तिच्या योगानें तें मूल विशिष्ट दोषापासून परावृत्त झालें पाहिजे. (२) चुकी सिद्ध झाल्या-बरोबर तावडतोब शिक्षा अमलांत आणली पाहिजे म्हणजे त्या मुलाच्या मनांत त्या चुकीबद्दल शिक्षा झाली ही गोष्ट स्पष्टपणें राहील. (३) तसेंच विशिष्ट प्रकारच्या चुकीबद्दल विशिष्ट प्रकारची शिक्षा मिळा-वयाची अशी कांहीं तरी योजना असली पाहिजे. उदाहरणार्थ, जेवा-वयास येण्यास उशीर झाला तर त्यास पान वाढलें असलें तरी कांहीं

वेळ थांबून राहण्यास सांगावें. निजावयास जाण्यास उशीर झाला तर त्यास तितका वेळ लवकर निजावयास पाठवावें. त्यानें बागेंत कांहीं नासधूस केली तर ती त्यास दुरुस्त करावयास लावावी किंवा कांहीं वेळ त्यास घरांत अडकवून ठेवून बागेंत जाण्यास प्रतिबंध करावा.

**शिक्षेंतील मर्म—**

प्रतिबंधक शिक्षेंतील मुख्य तत्त्व दुःख हेंच आहे. त्याअर्थी शिक्षा मिळाली म्हणजे मुलास दुःख होणें हें साहजिकच आहे. हें दुःख त्यास दोन स्वरूपांत होऊं शकतें. एक त्याला पाहिजे असेल अशा गोष्टींबद्दल प्रतिबंध करून किंवा कांहीं शारीरिक शिक्षा करून. यांचा उपयोग पुढें दिलेल्या प्रकारानें करावा. त्याचें स्वातंत्र्य मर्यादित करणें किंवा त्यास ज्या गोष्टीपासून सुख होईल अशा गोष्टीपासून दूर ठेवणें हा पहिला शिक्षेचा प्रकार झाला. शारीरिक शिक्षा जेव्हां करावयाची तेव्हां ती परिणामकारक व्हावयाची असल्यास तीपासून त्यास दुःख झालेंच पाहिजे. मात्र अशी शिक्षा दुसरे सर्व उपाय करून थकल्या-वरच केली पाहिजे. तसेंच ती मुलगा असेल तर बापानें व मुलगी असेल तर आईनें करावी. बापानें कधींहि मुलीच्या अंगावर हात टाकूं नये. अशा तऱ्हेची शारीरिक शिक्षा करण्याची वेळ जितकी कमी येईल तितकी त्या मुलाच्या वागणुकीची पद्धत यशस्वी आहे असें म्हणतां येईल.

**शिक्षा व तीपूर्वींचा क्रम—**

मुलास मारावयाचें असल्यास त्याच्या हातावर मारावें. मुलाच्या डोक्यावर कधींहि मारूं नये. मारावयाचें झाल्यास हातानें न मारतां वेताच्या छडीनें मारावें. हातापेक्षां छडीचा परिणाम जास्त होतो व

तिच्याशीं मारणाऱ्या व्यक्तीचा संबंध कमी वाटतो. मुलास दुसऱ्याच्या समोर मारून किंवा त्यास करावयाच्या शिक्षेची प्रसिद्धि करून विनाकारण त्याची अधिक मानहानि करूं नये. तसेंच शिक्षा करतांना नीतीवर व्याख्यान देऊं नये. शिक्षा करावयाची असें निश्चित ठरल्यास ती शक्य तितक्या लवकर अमलांत आणावी. शिक्षा करण्यापूर्वी जेव्हां ताकीद द्यावयाची असते तेव्हां अमुक मुदतीपर्यंत त्यानें अमुक गोष्ट करूं नये अशी पाहिजे तर अट घालण्यांत यावी आणि जर त्यानें त्या मुदतींत पुन्हा चुकी केली नाहीं तर त्याबद्दल त्यास शाबासकी देण्यास विसरूं नये व त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं नये. वरील गोष्टींचा क्रम थोडक्यांत पुढें दिल्याप्रमाणें लावतां येईल.—( १ ) प्रथम चुकी केल्यास ताकीद व अमुक शिक्षा होईल म्हणून धाक. ( २ ) वरीलप्रमाणें ताकीद व विशिष्ट मुदतीपर्यंत पुन्हा चूक होऊं नये अशी अट. ( ३ ) दुसरी चुकी केल्यास शिक्षा. ( ४ ) पुन्हा तशाच प्रकारची चूक झाल्यास अधिक कठोरपणाची शिक्षा.

**शिक्षेसंबंधीं नियम—**

शिक्षा देण्याच्या बाबतींत पुढील नियम लक्षांत घेण्यांत यावेत. (१) शिक्षा करावयाची ती राग किंवा दुसरा कोणताहि विकार मनांत न आणतां केली पाहिजे. ( २ ) शिक्षा करतांना मला तुझ्या इतकेंच किंवा त्यापेक्षांहि वाईट वाटतें असें कधींहि म्हणूं नये. कारण तशी वस्तुस्थिति नसते व खरोखरच आपणांस वाईट वाटत असल्यास तें मुलास शिक्षा होते म्हणून वाटत नसून आपल्या आत्मप्रौढीस धक्का बसतो म्हणून वाटत असतें. ( ३ ) शिक्षा करतांना गंभीरता असली पाहिजे. निदान तीमध्यें कोणत्याहि प्रकारची चेष्टा अथवा विनोद, असतां कामा नये. ( ४ ) शिक्षा नेहमीं एकांतांत केली पाहिजे. अगदीं

अखेरची पायरी म्हणूनच फार तर ती दुसऱ्या मुलासमोर अगर मोठ्या माणसासमोर करण्यांत यावी. ( ५ ) शिक्षा दिल्यानंतर लागलीच त्या मुलाशीं प्रेमळपणाची व मित्रत्वाची वागणूक करण्यांत यावी. तसें आपल्या हातून न घडल्यास त्या मुलावरील आपलें प्रेम त्याच्या चुकीमुळें कमी झालें आहे असें म्हणावें लागेल. आपल्याला त्या मुलाबद्दल प्रेम नसलें तरी निदान शिक्षा दिल्याबरोबर दोषाचें परिमार्जन झालें ही न्याय्य गोष्ट तरी आपण मानली पाहिजे. ( ६ ) मुलावरचें प्रेम कमी करणें अशा तऱ्हेची शिक्षा मुलास कधींहि करूं नये. अशा तऱ्हेची शिक्षा जर अमलांत आणणें कोणास शक्य वाटत असेल तर त्याचें त्या मुलावर खरें प्रेम कधींच नव्हतें असें म्हणावें लागेल. आणि जर तसें असेल तर जें प्रेम एखाद्यास कमी करतां येतें असलें प्रेम त्याजवर नसलेलेंच बरें. किंबहुना अशा मनुष्यास मूल न झालेलेंच बरें. ( ७ ) जे दोष आपल्याच ठिकाणीं असतील त्याबद्दल मुलास कधींहि शिक्षा करूं नये. मुलाचें परीक्षण करण्यापूर्वी आपलें स्वतःचें परीक्षण करावयास पाहिजे. जे दोष आपल्याच अंगीं असतात त्याबद्दल जर आपण मुलास शिक्षा करूं लागलों तर तें आपला तिरस्कार करूं लागेल.

---

# प्रकरण चोविसावें

# बाल-शिक्षण-मंदिर

**बालशिक्षण—**

मुलांचें शिक्षण त्यांना थोडें फार समजूं लागल्यापासूनच वास्तविक सुरू असतें. मुलें आपल्या सभोंवतीं ज्या निरनिराळ्या गोष्टी दृष्टीस पडत असतात व जे प्रसंग घडत असतात त्यांपासून कांहीं तरी नवीन ज्ञान मिळवीतच असतात. त्यांच्या ठिकाणीं जी उपजत जिज्ञासा असते तीमुळें त्यांच्या दृष्टीस पडणाऱ्या प्रत्येक वस्तूबद्दलचें ज्ञान तीं करून घेत असतात. तसेंच मुलांस नेहमीं स्वस्थ बसण्यापेक्षां कांहीं तरी क्रिया करीत राहणें आवडतें. त्यामुळें त्यांचे हातापायांचे व्यापार नेहमीं चालू असतात. या त्यांच्या स्वाभाविक जिज्ञासेस व क्रियाप्रवण प्रवृत्तीस योग्य वळण व क्षेत्र तयार करून दिलें व त्यांच्या ठिकाणच्या निरनिराळ्या वृत्ती अधिकाधिक जागृत करून त्यांस योग्य दिशेनें मार्गास लावलें तर त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीस पुष्कळच मदत होईल. या दृष्टीनें विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांनीं अगदीं लहान मुलासहि शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्याचा उपक्रम केलेला आपणांस आढळून येतो. पाश्चात्य देशामध्यें बालोद्यान ( किंडरगार्टन ), मॉंटेसोरी वगैरे पद्धतीनें लहान मुलांचें शिक्षण करणाऱ्या अनेक संस्था ठिकठिकाणीं सरकारी व खाजगी प्रयत्नानें स्थापन झालेल्या आहेत. व त्यांची दिवसेंदिवस अधिकाधिक वाढ होत आहे. लहान मुलांच्या शाळांकरितां मोठमोठाल्या शहरांतून राखीव उद्यानें व अनेक साधनांनीं सुसज्ज अशीं शालागृहें निर्माण होत आहेत. अशा संस्थांमुळें पाल-

कांसहि आपल्या मुलांच्या संगोपनाच्या जबाबदारीमध्यें थोडीफार उसंत मिळून इतर गोष्टी करण्यास फुरसत मिळूं लागली आहे. तसेंच मुलांचेंहि संगोपन केवळ मातापित्यांच्या लहरीवर अथवा तुटपुंज्या ज्ञानावर अवलंबून न राहतां तें पद्धतशीर व शास्त्रीय शिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या देखरेखीखालीं होत आहे. या उपक्रमाची जितकी अधिकाधिक वाढ होईल तितकें या राष्ट्राच्या बालसंपत्तीचें संवर्धन व संगोपन अधिकाधिक चांगलें होत जाईल. या दृष्टीनें बालशिक्षणमंदिराची आवश्यकता काय आहे, त्यामध्यें कोणत्या प्रकारचें साहित्य असावें व अशा तऱ्हेचा उपक्रम इतरत्र व आपल्याकडे कशा प्रकारें होत आहे त्याचें त्रोटक दिग्दर्शन पढें केलें आहे.

### बालशिक्षणमंदिराची आवश्यकता—

बालशिक्षण मंदिरांची आवश्यकता विशेषतः पुढील गोष्टींकरितां आहे :

( १ ) मुलांस आरोग्यकारक अशी परिस्थिति उत्पन्न करून देणें व त्यांस भरपूर प्रकाश, ऊन, मोकळी जागा व स्वच्छ हवा मिळेल अशी तजवीज करणें.

( २ ) मुलांच्या स्नायूंस पुरेसा व्यायाम मिळावा व त्यांस पुष्कळशी हालचाल करतां यावी याकरितां बाहेरचे खेळ व शाळेंतील सर्व हालचाली मोकळेपणानें करतां याव्या अशी संधि त्यांस मिळवून देणें.

( ३ ) मुलांच्या आरोग्यावर योग्य तऱ्हेची देखरेख राहील व त्यांस जरूर तेव्हां वैद्य किंवा डॉक्टराची मदत मिळेल अशी काळजी घेणें.

( ४ ) मुलास स्वतःचा स्वभाव योग्य तऱ्हेनें बनविण्यास मदत करणें.

(५) मुलाच्या कर्तृत्वशक्तीला व कल्पनांना परिस्फुटता मिळण्यास अवसर देऊन मुलामध्यें जिज्ञासा व कामाची गोडी उत्पन्न करणें.

(६) मुलामध्यें लहानशा प्रमाणावर सांघिक सहवासाबद्दल आवड उत्पन्न करून त्यास सांघिक सहवासाचा अनुभव मिळवून देणें आणि आपण विशिष्ट समाजाचे जबाबदार सभासद आहों याबद्दलची त्याच्या ठिकाणीं जाणीव उत्पन्न करणें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मुलाच्या शारीरिक, सामाजिक व बौद्धिक गरजा पुरविण्याकरितां अशा बालशिक्षण मंदिरांची आवश्यकता आहे.

बालशिक्षण मंदिरांतील खेळाचें साहित्य असें असलें पाहिजे कीं, तें

(१) मुलांच्या स्नायूंस खेळतें ठेवील व हालचाल करणाऱ्या स्नायूंची योग्य वाढ होईल.

(२) मुलांमध्यें मनापासून खेळण्याची आवड वाढेल.

(३) निरनिराळ्या प्रकारच्या हालचाली करतां याव्या व कंटाळा येऊं नये याकरतां पुष्कळसे निरनिराळे प्रकारचे खेळ असावे.

(४) मुलांच्या रचनाकौशल्यास व बुद्धीस पुरेसा वाव मिळावा.

(५) मुलांच्या वयाच्या व शरीराच्या वाढीच्या प्रमाणांत हे खेळ असावे.

अशा तऱ्हेचीं बालशिक्षणमंदिरें सासगी प्रयत्नांनीं आपल्या देशांत कांहीं स्थापन होत आहेत. अशा कार्यकर्त्यांस अमेरिकेमधील पुढील एका बालशिक्षण-मंदिराची हकीकत उत्तेजक व मार्गदर्शक वाटेल.

**सहकारी बालशिक्षणमंदिर—**

व्योमिंग येथें एक सहकारी बालशिक्षण-मंदिर कसें स्थापन झालें याची हकीगत मोठी मनोरंजक आहे.

प्रथम या गोष्टीस आरंभ सकाळच्या प्रहरीं कांहीं मुलांच्या आया आपल्या लहान मुलांस गाडींत घालून फिरावयास म्हणून रस्त्याच्या कोंपऱ्यावर उन्हांत उभ्या राहात व परस्पर गप्पागोष्टी मारीत या केवळ काकतालीय गोष्टीवरून झाला. अशा गप्पांतूनच पुढें या शाळेचा उपक्रम झाला. या आयांस सकाळचे एक दोन तास मुलांस फिरविण्याच्या कामीं खर्च करूनहि मुलांस खेळावयाची किंवा इकडे तिकडे फिरण्याची व बागडण्याची संधि देतां येत नाहीं असें आढळलें. तेव्हां त्यांनीं आपल्या मुलांस एखादी बंदिस्त अशी मोकळी जागा व कांहीं खेळण्याच्या वस्तू व ऊन, झाडें, कांहीं प्राणी वगैरे सारख्या सोयी आणि एखाद्या माणसाची योग्य देखरेख अशी मिळवून देतां येणार नाहीं काय असा विचार चालविला. त्यांपैकीं कांहींनीं या लहान वयांतील मुलांच्या गरजा, बालशिक्षण शाळा, त्यांचे उद्देश व पद्धति यासंबंधीं कांहीं वाङ्मय वाचलें; व अशा शाळा दिवसेंदिवस फार वाढत आहेत असेंहि त्यांस आढळून आलें; व आपल्या मुलांची योग्य वाढ व शिक्षण व्हावयाचें असल्यास अशा शाळेची आवश्यकता आहे हेंहि त्यांस पटलें. अशी शाळा त्यांस सरकारकडून तावडतोब मिळणार नाहीं ही गोष्टहि त्यांच्या लक्षांत आली. तेव्हां त्यांनीं सहकारी तत्त्वावर अशी शाळा काढण्याचें ठरविलें; व प्रत्येक आईनें पाळीपाळीनें देखरेख करावी व मुलांच्या बापांनीं शिक्षणाचें साहित्य जमवून द्यावें आणि सर्व खर्च सर्वांनीं सारखा वांटून घ्यावा असें ठरलें. जवळच्या देवळाच्या ( चर्चच्या ) आवारांत त्यांच्या मुलांस खेळावयाची परवानगी मिळाली व तेथील रविवारच्या वर्गांत वर्ग भरविण्याचीहि परवानगी मिळाली. जागा मिळाल्याबरोबर त्यांनीं बारा मुलें जमवून शाळा सुरू केली. प्रथम प्रथम मुलांच्या आया दररोज पाळीपाळीनें शिक्षकाचें

काम करीत. पण त्यांत एकसूत्रता व पद्धतशीरपणा नाहीं असें त्यांस आढळून आलें. त्यांच्यापैकीं एकीनें कॉलेजमध्यें बालशिक्षण हा विषय घेतलेला होता. तेव्हां तिच्यावरच शिक्षणाची सर्व जबाबदारी टाकण्यांत आली. लवकरच त्यांस पहिलीपेक्षां अधिक चांगली व बंदिस्त अशी मोकळी जागा खेळण्याकरितां व वर्ग भरविण्याकरितांहि मिळाली. मुलांची संख्याहि वाढून पंधरा पंधरा मुलांच्या तीन तुकड्या बनल्या. पहिल्या तुकडींत दोन वर्षांचीं, दुसरींत तीन वर्षांचीं व तिसरींत पांच वर्षांचीं मुलें असत. प्रत्येक तुकडीची खेळण्याची जागा व वर्ग निरनिराळे असत. आणि प्रत्येक तुकडीवर स्वतंत्र व पद्धतशीर शिक्षण घेतलेल्या शिक्षकाची देखरेख असे. हे वर्ग सकाळीं ९-१२ पर्यंत भरत असत.

शाळेच्या सुरवातीस मुलें आल्याबरोबर मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यांत येत असे. याच मुलांच्या आयांपैकीं एकीनें वैद्यकीचें शिक्षण घेऊन पदवी मिळविली होती. ती सर्व मुलांची तपासणी करून त्यांस कोणाचा संसर्ग होणार नाहीं अशी काळजी घेत असे. नंतर मुलें उघड्या जागेंतील खेळ खेळत असत. याठिकाणीं सीसॉ, मुलांच्या गाड्या, घरें बांधण्याचे मोठाले लांकडी ठोकळे वगैरे साहित्य असे. हें सर्व साहित्य हळूहळू जमविण्यांत आलें होतें. कांहीं वेळानें मुलें वर्गांतील खोल्यांत जाऊन तेथेंहि निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळत व याप्रमाणें त्यांस अनेक क्रिया करण्याचें शिक्षण मिळत असे.

वर दिलेला अनुभव हा अमेरिकेंतील झाला, पण आपल्या देशांतहि असे प्रयत्न कांहीं ठिकाणीं चालू आहेत. त्यांपैकीं एकाचें वर्णन पुढें दिलें आहे.

## मद्रास येथील उपक्रम—

मद्रास येथें कामगार लोकांच्या बायकांस मुलें संभाळावयाचा त्रास पडूं नये व त्यांस काम करण्यास मिळावें म्हणून त्या ठिकाणीं एक बालशिक्षण मंदिर १५ जून १९३५ रोजीं काढण्यांत आलें. हें व्हेपरी-मध्यें मेथॉडिस्ट मुलींच्या शाळेच्या जागेंत भरतें. यामध्यें प्रथम दोन ते चार वर्षें वयाचीं १५ मुलें चाळीस मुलांतून निवडून घेण्यांत आलीं. हीं जास्त गरजू लोकांचीं मुलें होतीं. मुलांच्या पालकांकडून त्यांच्या ऐपतीप्रमाणें आठ आण्यापासून दोन रुपयेपर्यंत फी घेण्यांत येते. शाळेची वेळ सकाळचे ९ वाजल्यापासून दुपारचे ४ वाजेपर्यंत असते. प्रथम मुलांची आरोग्य निरीक्षकाकडून ( हेल्थ व्हिजिटरकडून ) तपासणी करण्यांत येऊन मुलास शाळेंतील कपडे घालण्यास देण्यांत येतात. नंतर मुलें मोकळ्या जागेंत उन्हांत अथवा झाडाखालीं खेळतात. ९॥ वाजतां त्यांस थोडें खाण्यास व लिंबाचें सरबत पिण्यास देण्यांत येतें. नंतर गोष्टी सांगणें व गाण्याचा कार्यक्रम असतो. यावेळीं कांहीं संगीत कवा-यत घेण्यांत येते. नंतर मुलें शाळेंत किंवा व्हरांड्यांत बाहुल्या, चेंडू, खेळणीं वगैरे घेऊन खेळतात. नंतर स्नानें करून जेवण्यास येतात. जेवणानंतर एक तासभर लहानशा चटईवर प्रत्येक मूल झोंप घेतें. दुपारीं पुन्हा मुलें निरनिराळ्या प्रकारचा खेळ खेळतात. तीन वाजतां त्यांस रागी किंवा कांजी व दूध देण्यांत येतें. नंतर अर्धा तास झोके, घसरगुंडी वगैरे खेळ खेळण्यांत येतात. चार वाजतां सुटी होते. प्रथम प्रथम मुलें शाळेंत यावयास नाखूष असत, परंतु कांहीं दिवसांनीं सुटीची वेळ झाली तरीहि तीं खेळतच राहात. मुलें आपापलीं खाण्या-पिण्याचीं भांडीं, चटई, टॉवेल वगैरे त्यावर केलेल्या खुणांनीं किंवा

काढलेल्या चित्रांनीं बरोबर ओळखतात व जागच्याजागीं नीट ठेवतात. त्यांच्या आयांस त्यांमध्यें झालेला फरक पाहून फार आश्चर्य वाटतें.

**आपल्या सरकारची अनास्था—**

इंग्लंडमध्यें बाल-शिक्षण-मंदिरें सरकारी असून त्यांचा खर्च सरकारांतूनच चालतो व त्यांस शिक्षणक्रमांतच स्थान आहे. यूरोपमधील बऱ्याच देशांत अशा तऱ्हेच्या शाळा तेथील सरकारांनीं चालविलेल्या आहेत, परंतु हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची कोणतीहि सोय केलेली नाहीं व शिक्षण खातें अशा प्रकारची व्यवस्था करीत नाहीं. यावरून लोकमताचें पुरेसें वजन या बाबतींत सरकारवर पडत नाहीं असें दिसतें. विशेषतः हिंदुस्थानांतील गरीब लोकांचीं घरें व त्यांतील परिस्थिति चांगली नसते व त्यांस आर्थिक अनुकूलताहि नसते अशा वेळीं खासगी संस्थांनीं अशा तऱ्हेच्या लहान मुलांच्या शाळा काढणें अवश्य आहे.

**खासगी प्रयत्न—**

पुणें येथें अशा तऱ्हेच्या बाल-शिक्षण-मंदिराचा उपक्रम माझे मित्र रा. सत्यबोध बाळकृष्ण हुदलीकर यांनीं कांहीं वर्षांपूर्वी 'बालक मंदिर' या नांवाची संस्था स्थापन करून केला होता. परंतु डेक्कन जिमखान्यावरून कँपमध्यें स्थलांतर करूनहि त्यांच्या प्रयत्नांस अखेरीस यश आलें नाहीं. तेव्हां त्यांनीं मुंबई येथें अशा प्रकारचेंच एक बालक मंदिर स्थापन केलें व सध्यां त्या संस्थेशीं त्यांचा संबंध सुटला असला तरी तें उत्तम प्रकारें चाललें आहे व त्याचें अनुकरणाहि आतां पुणें व मुंबई येथें होत आहे. मात्र अद्यापि ही गोष्ट लोकांस फारशी

मटली आहे असें दिसत नाहीं. तथापि या बाबतींत प्रथम प्रयत्न करणारे म्हणून रा. हुदलीकर यांस श्रेय देणें अवश्य आहे.

## सुशिक्षित स्त्रियांस कार्यक्षेत्र—

वास्तविक अलीकडे नवीन नवीन सुशिक्षित स्त्रिया अनेक विषयांत पदवी संपादन करीत आहेत परंतु त्यांमध्यें कोणतीहि ध्येय प्रवृत्ति आढळून येत नाहीं. एक वैद्यकीय ज्ञानाशिवाय स्त्रियांच्या इतर ज्ञानाचा समाजास फारसा उपयोग होत नाहीं. अशा स्त्रियांनीं जर शिक्षण विषयाचा व बाल मानसशास्त्राचा थोडा फार अभ्यास केला तर त्यांस लहान लहान बाल–शिक्षण–मंदिरें केवळ एक हौसेची गोष्ट म्हणूनहि सहज चालवितां येतील. वास्तविक पुणें-मुंबईसारख्या शहरांत प्रत्येक गल्लीमध्यें किंवा मोहल्यामध्यें एक एक बाल–शिक्षण–मंदिर चालवितां येईल अशी परिस्थिति असते व अनेक आईबापांस आपल्या मुलांकडे लक्ष्य द्यावयास वेळ नसतो किंवा त्यांचें संगोपन व जोपासना कशी करावी याचें पद्धतशीर ज्ञान नसतें. अशा आईबापांचीं मुलें जर दिवसाचे कांहीं तास त्यांच्यापासून दूर व योग्य नियंत्रणाखालीं व देखरेखीमध्यें राहिलीं व त्यांस एक प्रकारचें वळण लागलें किंवा त्यांच्यामध्यें सांघिक वृत्ति निर्माण झाली व शाळेंत जाण्याच्या पूर्वीची पूर्वतयारी त्यांची करून घेण्यांत आली तर त्यांची किती तरी सोय होईल व किती तरी मुलें हट्टी किंवा फार लाडावलेलीं किंवा नेहमीं आईपाठीमागें असणारीं व त्यामुळें भित्रीं, लाजरीं वगैरे न होतां अधिक धीट, समाजांत किंवा इतर मुलांत मिसळण्यास अधिक योग्य व शिक्षण घेण्यास आणि शिस्तींत वागण्यास अधिक पात्र अशीं निर्माण होतील. तसेंच पांढरपेशा सुशिक्षित स्त्रियांस एक चांगलें करमणुकीचें,

उपयुक्ततेनें वेळ घालविण्याचें व त्याबरोबरच थोडी फार प्राप्ति करून देणारें साधन निर्माण होईल. या दृष्टीनें खरोखरच सुशिक्षित व सुखवस्तु स्त्रियांनीं या प्रश्नाकडे लक्ष्य देणें अवश्य आहे. विशेषतः येथें जोंपर्यंत परकीय सरकार अस्तित्वांत आहे तोंपर्यंत नागरिकांच्या शिक्षणाचा व त्यांतल्या त्यांत बालशिक्षणाचा प्रश्न सरकारकडून आपल्या इच्छेप्रमाणें व योग्य तऱ्हेनें सोडविला जाईल अशी अपेक्षा न करतां तो आपणासच सोडविला पाहिजे. याकरितां मोठमोठ्या शहरांतून तरी लोकांनीं आपण होऊनच असे उपक्रम केले पाहिजेत. नाहीं म्हणावयास बडोद्यामध्यें मात्र तेथील सुविद्य राज्यकर्त्यांकडून अशा तऱ्हेचे थोडे फार प्रयत्न झालेले आढळून येतात बाकी इतरत्र या प्रश्नाकडे अलीकडे कोठें थोडें फार लक्ष्य द्यावयास सुरवात झालेली दिसते. वास्तविक हा प्रश्न पुढील पिढीच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा असून सुज्ञ लोकांनीं त्याकडे अधिक लक्ष्य दिलें पाहिजे.

# प्रकरण पंचविसावें

# मुलांचें शिक्षण

**मुलाचा शाळेंत प्रवेश—**

अगदीं लहान मुलांकरितां किंवा बालकांकरितां बाल-शिक्षण-मंदिरांचा उपक्रम होण्यास आतां कोठें सुरुवात झाली आहे. अशीं मंदिरें अनेक होऊन त्यांचा सर्व कुटुंबांस लाभ होणें सध्यांच्या परिस्थितींत अशक्य आहे. याकरितां बहुतेक कुटुंबांस व पित्यांस आपलीं मुलें सध्यां असलेल्या सामान्य प्रकारच्या शाळांतच घालावीं लागतात. तथापि शाळेंत घालण्यापूर्वीं त्या मुलांच्या मनाची पूर्वतयारी करणें सर्वस्वीं आईबापांवर अवलंबून असतें. मुलाच्या ठिकाणीं जर इतर मुलांत मिसळण्याची, खेळण्याची, बरोबर काम करण्याची वगैरे प्रवृत्ति आरंभापासून उत्पन्न होऊन वाढीस लागली असेल तर त्यास शाळेंत गेल्यावर विशेष अवघड वाटणार नाहीं व त्याची वर्गाबरोबर प्रगति समाधानकारक रीतीनें होण्यास हरकत येणार नाहीं. पण तें जर अगोदर एकलकोंडें असेल अगर बुजरें असेल तर त्यास शाळेंत गेल्यावर प्रथम त्रास झाल्याशिवाय राहणार नाहीं. याकरितां मूल प्रथम शाळेंत घालतांना कांहीं दिवस त्याचेकडे विशेष लक्ष्य देणें जरूर आहे. कारण तें एका परिस्थितींतून म्हणजे घरच्या वातावरणांतून भिन्न परिस्थितींत म्हणजे नवीन वातावरणांत प्रवेश करीत असतें.

## मुलाचें शाळेंतील वर्तन—

मूल शाळेंत कसें वागतें याकडेहि लक्ष देणें अवश्य असतें. मुलास शाळेंत जाणें नकोसें वाटतें काय किंवा तें दिरंगाई करतें काय हें पाहिलें पाहिजे. मुलांस शाळेबद्दल वाटणारी भीति निरनिराळ्या मार्गांनीं दृष्टोत्पत्तीस येते. त्यांस घरीं करावयाचा अभ्यास दिला असतां तीं चिडखोरपणा दाखवितात. मुलांस शाळेमध्यें रोज मार्क देण्याची पद्धति चांगली नव्हे. कारण त्यामुळें त्यांची जणूं कांहीं रोजच परीक्षा चालली आहे असें त्यांस वाटतें आणि कमी मार्क मिळणारीं मुलें निरुत्साही बनतात. घरीं दिलेला अभ्यास करावयास विसरणें म्हणजे आपल्यावरील जबाबदारी टाळणें होय. मुलांची शाळेबद्दलची नावड त्यांना कांहीं तरी इतर गोष्टी करावयाच्या आहेत असें दाखविते. जेव्हां कांहीं मुलांचा शाळेंतील अभ्यास बरोबर नसतो तेव्हां तीं अपात्रतेच्या ऐवजीं आळशीपणाची सबब पुढें करतात; व आळशीपणाखालीं आपली अपात्रता झांकूं पाहतात. अशाच वर्गांत जीं मुलें निरुत्साही असतात, ज्यांचें लक्ष कामाकडे नीट वेधत नाहीं, जीं नेहमीं दुसऱ्यावर अवलंबून असतात व जीं लाडावलेलीं असतात, अशा सर्व मुलांचा समावेश होतो.

## मुलाची शिक्षकाबद्दलची वृत्ति—

मुलाची शिक्षकाबद्दलची वृत्ति कशी आहे हाहि एक महत्त्वाचा प्रश्न असतो. मुलें आपल्या शिक्षकासंबंधींचें मत कधींहि उघडपणें व स्पष्टपणें सांगत नाहींत. जेव्हां एखादें मूल नेहमीं दुसऱ्यावर टीका करतांना किंवा त्यास कमीपणा आणण्याचा प्रयत्न करतांना आढळतें तेव्हां त्याच्या ठिकाणीं स्वतःबद्दलचा पुरेसा आत्मविश्वास नाहीं असें

समजावें. अशीं मुलें बहुधा उर्मट, व स्वत:बद्दल आत्मप्रौढी मारणारीं असतात.

## शाळा ही घर व जग यांमधील दुवा—

शाळेंत गेल्याबरोबर आपण एका नव्या जगांत आलों आहों असें मुलाला वाटतें व या नवीन जगांत वागण्याची त्याच्या मनाची कितपत तयारी झाली आहे हें पाहण्यासारखें असतें. ज्या मुलांच्या मनाची वाढ योग्य प्रकारें झालेली नसते त्यांस शाळा म्हणजे एक बागुलबोवा वाटतो. वास्तविक शाळेमध्यें जर पद्धतशीरपणें मुलास वागविण्यांत येईल तर त्याच्या मनावर लहानपणीं झालेले अनिष्ट संस्कारहि दुरुस्त होतील. शाळा हें वास्तविक घर आणि बाहेरील जग यांस जोडणारा दुवा आहे. शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्याची जागा नसून आयुष्यांत कसें वागावें याचें ज्ञान करून देणारें स्थळ आहे. तथापि शाळेमध्यें हें काम होण्यापूर्वी आईबापांनीं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हेंहि आपणांस पाहिलें पाहिजे; आणि याकरितां शाळेंतील मुलांच्या वागणुकीकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे.

## सांघिक वृत्ति नसलेलीं मुलें—

ज्या मुलांस इतर मुलांशीं संगत करण्यास शिकविलें नसेल त्यांना शाळेंत एकलकोंडें वाटतें. अशा मुलांस शाळेंतील इतर मुलें तऱ्हेवाईक समजून त्यांच्यांतील तुटकपणाची वृत्ति वाढत जाते, त्यामुळें त्यांची वाढ बरोबर न होतां तीं विशेष विचित्र वर्तणुकीचीं उदाहरणें म्हणून होतात. अशा वेळीं शाळांस दोष देण्यांत येतो. परंतु वास्तविक या बाबतींत शाळेमध्यें एवढीच गोष्ट होते कीं, जे दोष अशा मुलांच्या ठिकाणीं गृहशिक्षणामुळें सुप्तावस्थेमध्यें उत्पन्न झालेले असतात

तेच शाळेमध्यें प्रकट होतात. अशा तऱ्हेच्या मुलांची शाळेमध्यें प्रगति होऊं शकते काय? हा मोठा प्रश्न आहे. शाळेंत मुलगा नापास झाला म्हणजे आपणांस मोठी भीति वाटते; परंतु नापास होण्यांत त्याच्या ठिकाणीं अभ्यासांतील उणीवेपेक्षां त्याच्या वागणुकींतील दोष दिसून येतात. त्यामुळें त्यास आत्मविश्वास कमी वाटत आहे हें उघड होतें. त्याची नाउमेद होते आणि योग्य मार्गानें जावयाच्या ऐवजीं तो इतर मार्गानें स्वातंत्र्य व यश मिळविण्याचा प्रयत्न करतो. जो रस्ता समाजानें घालून दिलेला आहे त्या मार्गानें न जातां तो आपणांतील कमीपणा भरून काढण्याकरितां आडमार्गाचा अवलंब करून आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न करतो. साहजिकच त्याची प्रवृत्ति सामाजिक निर्बंध मोडण्याकडे व अशा तऱ्हेनें आपलें वर्चस्व स्थापण्याकडे होते.

**शिक्षणाचें ध्येय—**

आपण जर आतांपर्यंतच्या शाळांच्या इतिहासाकडे पाहिलें तर आपणांस असें दिसून येतें कीं, समाजाचें विशिष्ट काळांत जें ध्येय असेल त्यास अनुसरून शाळांमध्यें शिक्षण दिलें जातें. आतांपर्यंत समाजांत क्रमानें उमरावी, धार्मिक, नागरिक व लोकशाही तत्त्वांस प्रामुख्य दिलें जात असे; व त्याच अनुरोधानें शाळेंतील मुलांचे शिक्षणक्रमहि आंखलेले असत. कारण समाजास त्या त्या वृत्तींचीं माणसें त्या त्या काळीं जरूर असत. आतां आज समाजाची वृत्ति बदलली आहे त्याप्रमाणें शाळांतहि बदल झाला पाहिजे. आज समाजामध्यें प्रत्येक व्यक्ति शक्य तों स्वतंत्र, स्वयंप्रवृत्त व धैर्यशील अशी बनली पाहिजे अशी अपेक्षा आहे व त्या ध्येयास अनुसरून शाळेमध्यें शिक्षण मिळालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शाळा हें साध्य नसून

समजावें. अशीं मुलें बहुधा उर्मट, व स्वतःबद्दल आत्मप्रौढी मारणारीं असतात.

## शाळा ही घर व जग यांमधील दुवा—

शाळेंत गेल्याबरोबर आपण एका नव्या जगांत आलों आहों असें मुलाला वाटतें व या नवीन जगांत वागण्याची त्याच्या मनाची कितपत तयारी झाली आहे हें पाहण्यासारखें असतें. ज्या मुलांच्या मनाची वाढ योग्य प्रकारें झालेली नसते त्यांस शाळा म्हणजे एक बागुलबोवा वाटतो. वास्तविक शाळेमध्यें जर पद्धतशीरपणें मुलास वागविण्यांत येईल तर त्याच्या मनावर लहानपणीं झालेले अनिष्ट संस्कारहि दुरुस्त होतील. शाळा हें वास्तविक घर आणि बाहेरील जग यांस जोडणारा दुवा आहे. शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्याची जागा नसून आयुष्यांत कसें वागावें याचें ज्ञान करून देणारें स्थळ आहे. तथापि शाळेमध्यें हें काम होण्यापूर्वीं आईबापांनीं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हेंहि आपणांस पाहिलें पाहिजे; आणि याकरितां शाळेंतील मुलांच्या वागणुकीकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे.

## सांघिक वृत्ति नसलेलीं मुलें—

ज्या मुलांस इतर मुलांशीं संगत करण्यास शिकविलें नसेल त्यांना शाळेंत एकलकोंडें वाटतें. अशा मुलांस शाळेंतील इतर मुलें तऱ्हेवाईक समजून त्यांच्यांतील तुटकपणाची वृत्ति वाढत जाते, त्यामुळें त्यांची वाढ बरोबर न होतां तीं विशेष विचित्र वर्तणुकीचीं उदाहरणें म्हणून होतात. अशा वेळीं शाळांस दोष देण्यांत येतो. परंतु वास्तविक या बाबतींत शाळेमध्यें एवढीच गोष्ट होते कीं, जे दोष अशा मुलांच्या ठिकाणीं गृहशिक्षणामुळें सुप्तावस्थेमध्यें उत्पन्न झालेले असतात

तेच शाळेमध्यें प्रकट होतात. अशा तऱ्हेच्या मुलांची शाळेमध्यें प्रगति होऊं शकते काय? हा मोठा प्रश्न आहे. शाळेंत मुलगा नापास झाला म्हणजे आपणांस मोठी भीति वाटते; परंतु नापास होण्यांत त्याच्या ठिकाणीं अभ्यासांतील उणीवेपेक्षां त्याच्या वागणुकींतील दोष दिसून येतात. त्यामुळें त्यास आत्मविश्वास कमी वाटत आहे हें उघड होतें. त्याची नाउमेद होते आणि योग्य मार्गानें जावयाच्या ऐवजीं तो इतर मार्गानें स्वातंत्र्य व यश मिळविण्याचा प्रयत्न करतो. जो रस्ता समाजानें घालून दिलेला आहे त्या मार्गानें न जातां तो आपणांतील कमीपणा भरून काढण्याकरितां आडमार्गाचा अवलंब करून आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न करतो. साहजिकच त्याची प्रवृत्ति सामाजिक निर्बंध मोडण्याकडे व अशा तऱ्हेनें आपलें वर्चस्व स्थापण्याकडे होते.

**शिक्षणाचें ध्येय—**

आपण जर आतांपर्यंतच्या शाळांच्या इतिहासाकडे पाहिलें तर आपणांस असें दिसून येतें कीं, समाजाचें विशिष्ट कालांत जें ध्येय असेल त्यास अनुसरून शाळांमध्यें शिक्षण दिलें जातें. आतांपर्यंत समाजांत क्रमानें उमरावी, धार्मिक, नागरिक व लोकशाही तत्त्वांस प्रामुख्य दिलें जात असे; व त्याच अनुरोधानें शाळेंतील मुलांचे शिक्षणक्रमहि आंखलेले असत. कारण समाजास त्या त्या वृत्तींचीं माणसें त्या त्या काळीं जरूर असत. आतां आज समाजाची वृत्ति बदलली आहे त्याप्रमाणें शाळांतहि बदल झाला पाहिजे. आज समाजामध्यें प्रत्येक व्यक्ति शक्य तों स्वतंत्र, स्वयंप्रवृत्त व धैर्यशील अशी बनली पाहिजे अशी अपेक्षा आहे व त्या ध्येयास अनुसरून शाळेमध्यें शिक्षण मिळालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शाळा हें साध्य नसून

साधन आहे व त्या साधनाचा उपयोग व्यक्तीस समाजोपयोगी बनविणें हा आहे. याकरितां जीं मुलें शाळेंत आदर्श विद्यार्थी म्हणून दिसणार नाहींत त्यांच्याकडेहि दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्या मुलांच्या ठिकाणींहि कांहीं विशिष्ट गुण व महत्त्वाकांक्षा वसत असतातच व कांहीं बाबतींत त्यांस यश मिळणें सुलभहि असतें. ते उत्तम गणिती होणार नाहींत, पण कदाचित् उत्तम पहिलवान किंवा सैनिक बनूं शकतील. तेव्हां अशा मुलांस टाकाऊ न समजतां त्यांची योग्य दिशेनें प्रगति होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे.

**मुलामध्यें आत्मविश्वास उत्पन्न करणें—**

नवीन विद्यार्थी शाळेंत आल्याबरोबर पहिल्याच दिवशीं शिक्षकास त्याच्यासंबंधीं बऱ्याच गोष्टी आढळून येतील. कांहीं मुलांस शाळा मुळींच आवडणार नाहीं. तीं एकलकोंडीं असतील. अशा मुलांस इतर मुलांशीं मैत्री करणें शिकविलें पाहिजे. त्यांच्या ठिकाणीं जर पूर्वींच घरांतील वागणुकीमुळें दोष उत्पन्न झाले असतील तर ते घालविले पाहिजेत. अशा मुलांस शाळा आवडत नाहीं याचें कारण आपणांस शाळेमध्यें कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी नीटपणें करतां यावयाच्या नाहींत अशी त्यांस मनांतून भीति वाटत असते; व त्यांच्या ठिकाणीं पुरेसा आत्मविश्वास नसतो. घरामध्यें केव्हां केव्हां कोणीं त्यांस मूर्ख, नादान वगैरे म्हटलेलें असतें. अशा मुलांच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न करून त्यांस शाळेची गोडी लावली पाहिजे. त्यांना कधींहि आपण फार मागें पडलों आहों असें वाटतां उपयोगी नाहीं. तसें वाटूं लागल्यास तीं मुलें अजिबातच शाळा सोडून देण्याची इच्छा करतात. कांहीं मुलें चोरून घरीं राहतात; व त्याबद्दल शिक्षा मिळाल्यास कांहीं तरी खोट्या सबबी तयार करतात; व त्यांतच पूर्णता

मिळविण्याचा किंवा वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न करतात. अशीं मुलें पुढें भयंकर माणसें होतात; व त्यांस नियम पाळण्यापेक्षां मोडण्यांतच अधिक भूषण वाटूं लागतें व तीं पुढें कायदेहि मोडूं लागतात.

**कडक शिस्तीचा परिणाम—**

कांहीं घरांमध्यें जेथें अतिशय कडक शिस्त असते अशा ठिकाणीं मुलें मोठीं झाल्यावर त्या शिस्तीविरुद्ध बंड करून अगदीं उलट दिशेला गेलेलीं आपणांस आढळून येतात; व त्यांना लहानपणीं जो त्रास झालेला असतो त्याचा जणूं काय सूड उगविण्याकरितां तीं अगदीं उलट दिशेनें वर्तन करूं लागतात. अशा मुलांच्या बाबतींत जर वेळींच काळजी घेतली नाहीं तर तीं बिघडण्याचा संभव असतो.

**शाळेंतील प्रारंभींची वर्तणूक—**

लहान मुलास जेव्हां आपण शाळेंत घालतों तेव्हां तें अगदीं एका नव्या परिस्थितींत येऊन पडतें; व अशा वेळीं त्याच्या मनोवृत्तींची परीक्षा होते. जर त्याची वाढ योग्य तऱ्हेनें झालेली असेल तर त्याला या ठिकाणीं कोणतीहि अडचण वाटणार नाहीं. शाळेमध्यें त्याला शिक्षक व इतर मुलें यांच्याशीं सहकार्य करावयाचें असतें; व आपल्या धड्याकडेहि लक्ष्य द्यावयाचें असतें. त्याच्या या बाबतींतील सहकार्यावरून व नवीन परिस्थितींत तें कसें वागतें यावरून त्याच्या मनाची दिशा व त्याला कोणत्या गोष्टींत गोडी लागते हें कळून येईल. एका मुलाला त्याच्या घरांत सर्व मुलीच असल्यामुळें लहानपणीं मुलींच्या शाळेंत घालण्यांत आलें होतें व तेथून त्यास लवकरच काढून घेण्यांत आलें, त्यामुळें त्याच्या मनास जो धक्का बसला त्यानें त्यास जन्मभर त्रास होत राहिला. अशा रीतीनें लहान मुलांच्या

मनावर जे परिणाम त्यांच्या शाळेंत जाण्याच्या वयांत होतात त्यांवरून त्यांच्या पुढील आयुष्यास वळण लागण्याचा संभव असतो. याकरितां लहान मुलांची शाळेंतील प्रारंभींची वागणूक विशेष लक्ष देऊन पाहणें अवश्य असतें. कांहीं मुलें एकचित्त होऊन अभ्यासाकडे लक्ष देत नाहींत. अशीं मुलें बहुधा लाडावलेलीं असतात व नवीन मनुष्य पाहिला कीं त्यांस चमत्कारिक होतें. अशा मुलांची स्मरणशक्ति चांगली नसते असें नव्हे, कारण इतर गोष्टींची आठवण त्यांस चांगली राहते. अशा मुलांचा जर अभ्यास नीट झाला नाहीं तर त्यांस धाक दाखविण्यांत अगर शिक्षा करण्यांत कांहीं अर्थ नसतो. अशा मुलांचें मन जर शिक्षकानें आपल्याकडे वळवून घेतलें तर तीं मुलें पुढें चांगलीं होतात असें दिसून येतें; परंतु अशीं मुलें जर एखाद्या विषयांत एकदां मागें पडलीं तर त्यांची प्रगति एकदम थांबते. तीं स्वतः धडपड करून कोणतीहि गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करीत नाहींत; कारण त्यांस तसें करण्याची प्रथमपासून संवयच नसते.

## शाळेंत जाण्याची पूर्वतयारी—

यावरून मुलाच्या मनाची शाळेंत जाण्याकरितां कोणती पूर्वतयारी करावी लागते हें लक्षांत येईल. या गोष्टीची जबाबदारी मुख्यतः आईबापांवर असते; आणि त्यांनीं जर आपली जबाबदारी नीटपणें पार पाडली नाहीं तर त्याचा परिणाम मुलाच्या प्रगतीवर होतो. आईबापांप्रमाणेंच कुटुंबांतील इतर माणसें, इतर मुलांशीं त्यास करावी लागणारी स्पर्धा या गोष्टींचाहि मुलाच्या मनावर परिणाम होतो. याशिवाय कांहीं बाहेरच्या गोष्टीहि मुलांच्या मार्गांत येत असतात. या सर्व गोष्टींवरून मुलाची शाळेमध्यें जी प्रगति होत असते तिच्यावरून त्या मुला-

बद्दलचें ठाम मत एकदम बनविणें बरोबर होणार नाहीं, असें दिसून येईल. शाळेच्या प्रगति–पत्रकावरून त्या मुलाच्या तत्कालीन मानसिक स्थितीबद्दल तेवढें ज्ञान होईल. शाळेंत मिळणाऱ्या मार्कांवरून त्याची बौद्धिक प्रगति अजमावणें बरोबर होणार नाहीं. त्याकरितां बुद्धिमापनाचीं प्रमाणें व पद्धति हीं ज्ञापकें अधिक महत्त्वाचीं व खात्रीलायक असतात.

## मुलांचें बुद्धिमान—

अलीकडे या बुद्धिमापनाच्या परीक्षांस बरेंच महत्त्व दिलें जात असून त्यांच्यामध्यें बरीच प्रगतिहि होत आहे. शिक्षकांस त्या फार महत्त्वाच्या वाटतात व त्यांपासून कांहीं कांहीं वेळां इतर साधनांनीं न मिळणारी माहितीहि मिळूं शकते. कधीं कधीं एखाद्या मुलाची वर्गांतील प्रगति प्रत्यक्ष कमी दिसत असतां त्याचें बुद्धिमान अधिक असल्याचें आढळून येतें. अशा वेळीं त्याला खालच्या वर्गांत ठेवण्यापेक्षां वरच्या वर्गांत घातलें असतां अधिक उत्तेजन मिळून सुधारल्याचा अनुभव येतो. परंतु बुद्धिमापनाची परीक्षा घेतली असतां मुलाचें बुद्धिमान काय आहे हें त्यास स्वतःस अगर त्याच्या आईबापांस कळतां कामा नये. कारण बुद्धिमानाच्या ज्ञानानें एक प्रकारें त्याच्या कर्तृत्वाची मर्यादा काय आहे हेंच जणूं कांहीं कळून येतें, असा त्यास भास होतो आणि त्यामुळें मुलाच्या मनावर केव्हां केव्हां अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. केवळ बुद्धिमान चांगलें असलें म्हणजे मनुष्य पुढील आयुष्यांत यशस्वी होतो असें नाहीं. कांहीं आयुष्यांत यशस्वी झालेल्या मनुष्यांचेंहि बुद्धिमान कमी असल्याचें दिसून आलें आहे. तसेंच बुद्धिमानाची कसोटी जर पुनःपुन्हा लावली तर संवयीमुळें त्याच मुलाचें बुद्धिमान अधिक वाढल्याचेंहि आढळून येतें.

## अभ्यासक्रम व शिस्त—

शाळेंतील अभ्यासक्रमाचा व शिस्तीचा मुलावर काय परिणाम होतो हेंहि पाहणें महत्त्वाचें आहे. शाळेंत जे विषय शिकविले जातात त्यांचा उद्देश काय हें मुलास समजलें पाहिजे. नाहीं तर त्यास त्या विषयांत गोडी वाटणार नाहीं. गणितासारखा विषय प्रत्यक्ष दृश्य वस्तूंचा उपयोग करून शिकविल्यास अधिक मनोरंजक करतां येईल. मुलांस कोणत्या गोष्टींत विशेष गोडी वाटते हें समजावून घेऊन त्या गोष्टींशीं शिकवावयाच्या विषयाचा संबंध जोडला तर तो विषय अधिक सुलभ होतो. वर्गांतील मुलांमध्यें एक प्रकारची सामान्यतः स्पर्धा दिसून येते. ही स्पर्धा योग्य प्रमाणांत राहील अशी शिक्षकानें काळजी घेतली पाहिजे, आणि मुलांमध्यें स्पर्धेच्या ऐवजीं सहकार्य उत्पन्न होईल अशी परिस्थिति उत्पन्न केली पाहिजे.

## आनुवंशिक गुण—

मुलांचे गुण आनुवंशिक असतात ही गोष्टहि तितकीशी खरी नाहीं. कारण शिक्षणानें मुलांच्या अंगीं अनेक गुण उत्पन्न करतां येतात; व आनुवंशिकताच पहावयाची तर आपणांस असें दिसून येईल कीं प्रत्येक मुलास आई व बाप अशीं दोन पितरें असून त्यांचा वंशवृक्ष पाहूं गेल्यास पांच पिढ्यांमध्यें त्यांचा ६४ व्यक्तींशीं व दहा पिढ्यांमध्यें ४०९६ व्यक्तींशीं संबंध येतो व इतक्या व्यक्तींमध्यें प्रत्येक बाबतींत एक तरी व्यक्ति अत्यंत विद्वान् किंवा शूर अशी दाखवितां येईल. आतां आनुवंशिकतेचा परिणाम एवढा मात्र होतो कीं, कांहीं कुलांतून एका तऱ्हेची परंपरा आढळून येते आणि तिचा परिणाम मात्र मुलांच्या मनावर विशेष होतो. तेव्हां या परंपरेस जितकें विशेष महत्त्व आहे तितकें आनुवंशिकतेस नाहीं.

## प्रगति-पुस्तकांतील शेरे—

यानंतर दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मुलाच्या शाळेंतील प्रगतीसंबंधीं शेरे ही होय. मुलास वाईट शेरा दिला असतां तें सुधारेल अशी कांहीं शिक्षकांची समजूत असते. परंतु प्रत्येक मुलाच्या घरची परिस्थिति भिन्न भिन्न असते व कांहीं मुलें वाईट मिळालेला शेरा घरीं दाखविण्याचें टाळण्याकरितां शाळेंतच येण्याचें सोडून देण्याचा संभव असतो. याकरितां शिक्षकानें मुलांच्या घरची परिस्थितिहि समजून घेऊन कांहीं मुलांस सौम्यतेनें वागवून उत्तेजन देणें जरूर असतें.

## मागें राहिलेलीं मुलें—

ज्या मुलांस वर्गाबरोबर जातां येत नाहीं त्यांस सुट्टीमध्यें अगर इतर वेळीं अधिक शिक्षण व उत्तेजन देऊन त्यांची इतरांबरोबर तयारी करून दिली असतां तीं मुलें सर्वांच्या बरोबर प्रगति करतात असें आढळून येतें.

## मुलांच्या नैसर्गिक वृत्तींचा उपयोग—

मुख्यतः मुलांस शिक्षण देतांना त्यांस कोणत्या गोष्टी आवडतात व कोणत्या गोष्टी तीं यशस्वी रीतीनें करूं शकतात हें पाहून त्यांस योग्य तें उत्तेजन देऊन त्याच विषयांच्या अनुरोधानें व त्यांची यशस्वी वृत्ति कायम ठेवून त्यांचें शिक्षण करणें हा सर्वांत उत्तम मार्ग होय. तसेंच मुलें आपल्या कोणत्या इंद्रियांचा अथवा अवयवांचा विशेष उपयोग करतात हें पाहून त्यांचा शिक्षणाकडे उपयोग करून घेणें फायदेशीर ठरतें. कांहीं मुलांस पाहणें व निरीक्षण करणें अधिक आवडतें, कांहीं मुलांस ऐकत राहणें अधिक आवडतें तर कांहीं मुलांस

चळवळ करीत राहावें असें वाटतें. या त्यांच्या प्रवृत्तींचा योग्य उपयोग करून त्यांचें शिक्षण केलें पाहिजे. ज्यास निरीक्षणाची संवय व हौस विशेष आहे त्यास भूगोलासारख्या विषयांत अधिक गोडी वाटेल. ज्यास चळवळ करावी असें वाटतें त्यास हस्तव्यवसायाचे विषय विशेष शिकविले असतां त्या मुलाच्या स्वाभाविक वृत्तींचा अधिक परिपोष होऊन त्यास त्याच्या उत्तर आयुष्यांत त्यांचा विशेष उपयोग होईल.

### व्यंग मुलें—

प्रत्येक गोष्टीची योग्य किंमत करावयास पाहिजे ही गोष्ट व्यंग मुलांच्या बाबतींत विशेषत्वानें मनावर ठसते. आपल्या रोजच्या व्यवहारांत डावखोऱ्या मुलास किती अडचणी येतात हें आपण पाहतों. परंतु कांहीं मुलें वास्तविक जन्मतःच डावरीं असतात. परंतु डाव्या हातानें त्यांस नीट लिहितां वगैरे न आल्यानें आपण त्यांस मंद किंवा जड म्हणतों; व त्यांसहि आपल्यांत कांहीं तरी वैगुण्य आहे असें वाटूं लागतें. परंतु आपणांस डावखोऱ्या लोकांतहि अनेक चितारी, नक्षीकाम करणारे वगैरे कलावन्त लोक आढळून येतात; तसेंच कित्येक मोठमोठ्या पदवीस चढलेले लोकहि आढळतात. तेव्हां डावखोरा असणें हा कांहीं दोष नाहीं, हें जर आपण लहान मुलाच्या मनावर बिंबवूं शकलों तर तीं मुलें निरुत्साही न होतां जगामध्यें खात्रीनें पुढें येऊं शकतील.

### धैर्य व चिकाटी—

मुलाच्या मनांत वाजवीपेक्षां जास्त महत्त्वाकांक्षा उत्पन्न होणें चांगलें नव्हे. कारण आपण मुलाची योग्यता त्याच्या यशाप्रमाणें मोजतों. परंतु

वास्तविक मुलाची योग्यता कोणतीहि गोष्ट करीत असतांना तीं मुलें मार्गांतील अडचणी दूर करण्याच्या कामीं जे प्रयत्न करतात, त्यावरून ठरविली पाहिजे. थोडक्याच प्रयत्नानें यश मिळालें तर तें टिकाऊ नसतें, याचकरितां मुलास महत्त्वाकांक्षी होण्यापेक्षां धैर्यशील, नेटानें प्रयत्न करणारें व आत्मविश्वासी बनविणें अधिक चांगलें. मुलाच्या मनावर ही गोष्ट ठसविली पाहिजे कीं, कोणत्याहि गोष्टींत अपयश आलें असतां निरुत्साही न होतां नवीन युक्ति योजण्याची प्रवृत्ति उत्पन्न होणें अवश्य आहे. तसेंच मुलाच्या शिक्षकास कोणत्या गोष्टीमध्यें मुलाच्या प्रयत्नास यश आलें नाहीं व मुलानें कोठपर्यंत स्वतः होऊन प्रयत्न केले ही गोष्ट प्रत्येक बाबतींत कळून येणें अवश्य आहे.

**परिस्थितीशीं झगडा—**

कांहीं परिस्थितींत मुलामध्यें हीनतेची, दुर्बलतेची किंवा अनिश्चिततेची भावना उत्पन्न होऊन ती त्यास कार्यास प्रवृत्त करतांना आढळते. व ही प्रवृत्ति त्याच्यामध्यें जन्मभर दिसून येते. अशीं मुलें नेहमीं आपल्या सभोंवतीं असलेल्या परिस्थितींतून वर येण्याचा प्रयत्न करीत असतात आणि आपला श्रेष्ठ दर्जा प्रस्थापित करण्याची खटपट करीत असतात. ज्या मानानें त्यांची मनोवृत्ति वर येण्याकरितां अधिकाधिक खळबळ करीत असते त्या मानानें त्यांचें उच्च पदाकडे जाण्याचें ध्येय असतें.

**परीक्षा—**

याकरितां परीक्षा वगैरे घेण्याची पद्धति निरनिराळ्या मुलांच्या स्वभाववैशिष्ट्यावर अवलंबून ठेविली पाहिजे. प्रत्येक मुलाची परीक्षेबद्दलची कल्पना सारखीच असते असें नाहीं. कांहीं मुलांस परीक्षा म्हणजे एक मोठें दिव्य वाटतें. तीं लाजतात किंवा एकदम फिकीं पडतात.

त्यांचें अंग कांपूं लागतें व त्यांच्या मनांत भीतीनें धडकी भरते. याचे उलट कांहीं मुलांस इतर मुलांच्या बरोबर प्रश्न विचारले तरच तीं उत्तरें देतात. एकट्यासच प्रश्न विचारला तर तीं घाबरतात.

**उदासीन वृत्ति—**

कांहीं मुलें अतिशय उदासीन, निरुत्साही व तटस्थ वृत्तीचीं असतात. त्यांस मार्गावर आणणें फार कठिण असतें. कारण त्यांचें औदासिन्य हें मनापासून नसून केवळ दिखाऊ असतें. त्यांच्यावरचें नियंत्रण दूर झाल्यास तीं अतिशय रागीट बनतात. कोणतीहि गोष्ट सांगितल्याशिवाय तीं करीत नाहींत. यांना वरचेवर उत्तेजनाची आवश्यकता असते.

**गणिताचा बाऊ—**

कांहीं मुलें शाळेमध्यें सर्व विषयांत चांगलीं असून एखाद्याच विषयांत—विशेषतः गणितांत—मागें असतात. याचें कारण त्यांचें असामर्थ्य नसून केव्हां तरी त्यांस गणिताबद्दलची भीति वाटावयास लागलेली असते हें होय; व त्यामुळें त्या विषयांत प्रयत्न करण्यासच त्यांस निरुत्साह वाटतो. तसेंच मुलांपेक्षां मुली गणितांत मागें असतात ही समजूतहि चूक आहे. पुष्कळ स्त्रिया उत्तम गणिती होऊन गेल्या आहेत. परंतु वरील गोष्ट मुलींच्या अनेकवार कानावर पडल्यामुळेंच त्यांस त्याबद्दल भीति वाटूं लागते.

गणित हा विषय असा आहे कीं, त्यांतील ज्ञान निश्चितपणाचें असल्यामुळें त्याच्या योगानें मनुष्यास सुरक्षितता वाटते. गणित करण्याच्या क्रियेमध्यें आपण इतस्ततः अव्यवस्थित असलेल्या गोष्टींतून निश्चित व स्थिर स्वरूपाची माहिती तेवढी निवडून काढतों. त्यामुळें ज्या

मुलांचें मन अस्थिर असतें व त्यामुळें त्यांस पूर्ण सुरक्षितता वाटत नाहीं तीं मुलें गणितांत कच्चीं असतात.

**विचारांस स्थिरता व निश्चितपणा—**

याप्रमाणेंच इतर कांहीं विषयांच्या बाबतींतहि म्हणतां येईल. लेखनानें आपल्या मनांतील विचारांस स्थिरता येते. चित्र काढतां आल्यास आपल्या मनांतील काल्पनिक दृश्यांस किंवा दृश्यांच्या कल्पनांस कायमचें स्वरूप देतां येतें. कसरत केल्यानें मनुष्यास शारीरिक सुरक्षितता प्राप्त होते व आपल्या शरीरावर आणि गात्रांवर पूर्ण ताबा मिळविण्यानें मानसिक स्वास्थ्यहि मिळतें. याकरितांच शिक्षणामध्यें खेळ किंवा क्रीडानैपुण्यास प्राधान्य दिलें आहे. ज्या मुलांस पोहावयास येत नाहीं त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारचा हीनभाव आढळून येतो. ज्या मुलांस लवकर पोहतां येतें त्यांस इतर बाबतींतहि यश मिळविणें बरेंच सोपें असतें. ज्यास लवकर पोहतां येत नाहीं त्यास स्वतःबद्दल व शिकविणाराबद्दलहि विश्वास कमी वाटूं लागतो. कांहीं बाबतींत असेंहि आढळून येतें कीं, ज्या मुलास प्रथम पोहणें शिकतांना जड वाटतें तेंच पुढें पटाईत पोहणारें होतें. याचें कारण आपणांतील कमीपणा घालविण्याचा त्यानें केलेला नेटाचा प्रयत्न होय.

एखादें मूल जर आपणांस एखाद्या विषयांत विशेष प्रवीण दिसून येईल तर त्याच विषयांत त्यास प्रगति करण्यास उत्तेजन देण्यांत यावें.

**बुद्धीचा उपयोग—**

मनुष्य आणि पशु यांमध्यें मुख्य फरक त्यांच्यांतील बुद्धिप्रधान व प्रवृत्तिप्रधान मानसिक घटनेमध्यें आहे. यामुळें पशु हा सामान्यतः

एकाच क्षुण्ण मार्गानें जात असतो व मनुष्य हा आपल्या बुद्धीचा उपयोग करून नवीन नवीन मार्ग व दिशा शोधीत असतो. याकरितां त्याचा प्रथम प्रयत्न म्हणजे अनेक गोष्टींचें ज्ञान प्राप्त करून घेणें हा असतो. या ज्ञानाची प्रथम पायरी म्हणजे निर-निराळ्या गोष्टींचें पृथक्करण करणें ही होय. मुलाच्या मनांत प्रत्येक गोष्टीचें पृथक्करण करून तिचें ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा प्रथम उत्पन्न होते. आणि त्यानंतर या पृथक्कृत कल्पनांचें पुन्हा संयोजन करून तें आपल्या ज्ञानांत भर घालीत असतें. याप्रमाणें ही पृथक्करण व संयो-जनाची क्रिया त्याच्या मनांत सारखी चालू असते. ज्योतिष, पदार्थ-विज्ञान, रसायन, गणित वगैरे सर्व शास्त्रांच्या मुळाशीं ही पृथक्करण व संयोजनाची कल्पना असते.

**ज्ञानसंग्रह व ज्ञानाचें वर्गीकरण—**

या कल्पनांचा ठसा त्यास आपल्या स्मृतींत कायमचा उठवून घ्याव-याचा असतो व या पद्धतीनें ज्ञानाचा संग्रह करावयाचा असतो. याप्रमाणेंच कांहीं गोष्टी विस्मृतींत लीन करावयाच्या असतात व अशा तऱ्हेनें चांगल्या आणि वाईट गोष्टींची निवड करून त्यांस स्मृतींत किंवा विस्मृतींत स्थान द्यावयाचें असतें. अशा तऱ्हेनें हें मानसिक कार्य चालू असतां पुढील पांच प्रकारांनीं त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असतो.

( १ ) संशोधन– यामध्यें नवीन नवीन गोष्टी हुडकून काढणें, साहस करणें, नवीन नवीन शास्त्रें, भूप्रदेश व ज्ञानाचीं क्षेत्रें यांत प्रवेश करणें व त्यांतील व्यवस्थांचें ज्ञान करून घेणें या गोष्टी येतात.

( २ ) निवड– यामध्यें उपयुक्त व अनुपयुक्त अशा गोष्टींत भेदाभेद करून त्यांतील उपयुक्त गोष्टींचा संग्रह करावयाचा असतो.

( ३ ) निश्चितता– यामध्यें प्रत्येक नियमाची व ज्ञानशाखेची मर्यादा बिनचूकपणें समजून घेण्याचें कार्य करावयाचें असतें. या बाबतींत चांगल्या वाईट गोष्टींची निवड करतांना आपणांस सारासार विचारावरून आपलीं मतें निश्चित बनवावयाचीं असतात.

( ४ ) व्यवस्था– यामध्यें निरनिराळ्या गोष्टींचें झालेलें ज्ञान सुसंगत रीतीनें व पद्धतशीरपणानें मांडावयाचें असतें व त्यामध्यें परस्परविरोध न होईल व सुसूत्रता येईल अशी काळजी घ्यावयाची असते.

( ५ ) व्यापक नियमशोधन– यामध्यें वरील पद्धतींनें उपलब्ध झालेल्या ज्ञानावरून सर्व विश्वांत आढळून येणाऱ्या व्यापक नियमांचें ज्ञान करून घ्यावयाचें असतें व याप्रमाणें सर्व विश्वाची रचना समजून घेऊन आपल्या ज्ञानाची कक्षा अमर्यादपणें वाढवावयाची असते.

ज्या मुलास वयाच्या १५ व्या वर्षीं आपण काय करावें याबद्दल निश्चितपणें सांगतां येत नाहीं अशा मुलास उत्तेजन देऊन योग्य मार्गदर्शन केलें पाहिजे. अशा वेळीं त्याच्या घरांतील व्यक्ति करीत असलेले निरनिराळे व्यवसाय व त्याचे बहीणभाऊ वगैरे बरोबर असलेले संबंध या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन त्यास योग्य मार्ग दाखविणें जरूर असतें.

### शिक्षकाचे गुण—

विद्यार्थ्यांस मार्गदर्शनाचें काम करण्याची मुख्य जबाबदारी पालकाप्रमाणेंच शिक्षकावरहि असते. याकरितां त्याच्या अंगीं पुढें दिल्याप्रमाणें कांहीं महत्त्वाचे गुण असणें अवश्य आहे.

(१) सभ्यता– यामध्यें शिष्टाचार, धैर्य, प्रेमळपणा, प्रौढता, सुसंस्कृतता इत्यादि गुण अंतर्भूत होतात.

(२) सुज्ञता– यामध्यें विशिष्ट ध्येयप्रवृत्ति, सत्यप्रियता, शोधक बुद्धि, सहिष्णुता वगैरे गोष्टी येतात.

(३) समजूतदारपणा– यांत सारासार विचार, समतोल बुद्धि यांचा समावेश होतो.

(४) धिमेपणा– यामुळें शिक्षक आपले विकार ताब्यांत ठेवून मुलाशीं अत्यंत शांतपणें वागण्यास प्रवृत्त होतो.

(५) ज्ञान– हें तर शिक्षकाच्या ठिकाणीं अवश्यच पाहिजे. त्यास स्वतःस अनेक गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान झाल्याशिवाय तो मुलांस शहाणे करूंच शकणार नाहीं.

(६) उत्साह–या गुणामुळें शिक्षकास आपल्या कामांत नेहमीं हौस वाटत राहील.

(७) प्रामाणिकपणा–शिक्षक हा आपल्या धंद्याशीं प्रामाणिक असणें अत्यंत अवश्य आहे व त्याच्या मनांत आपल्या कर्तव्याची योग्य जाणीव असेल तरच तो आपलें कार्य यशस्वी रीतीनें करूं शकेल.

(८) धैर्य–शिक्षकाच्या अंगीं धैर्य असेल तरच तो आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगीं धीटपणा आणूं शकेल.

अर्थात् हे सर्व गुण प्रत्येक शिक्षकाच्या अंगीं नैसर्गिकपणें असणें शक्य नाहीं. तसे असतील तर तो जन्मजात शिक्षकच म्हटला पाहिजे, परंतु प्रत्येक शिक्षकास हे गुण कमी अधिकपणें आपल्या अंगीं आणतां आणण्यासारखे असतात, ते तसे आणण्याचा त्यानें प्रयत्न केला पाहिजे.

## शिक्षण पद्धति—

अलिकडे शिक्षणामध्यें पेस्टालॉझी, फ्रोबेल, मॉंटेसोरी, डाल्टन प्लॅन (कार्यपद्धति) वगैरे नवीन नवीन अनेक प्रकारच्या पद्धति पुढें येत आहेत. या सर्व पद्धतींचें ज्ञान शिक्षकांस अवश्य असलें पाहिजे व त्यानें त्या पद्धतींचा परिचय करून घेतला पाहिजे. परंतु कोणत्याहि एका विशिष्ट पद्धतीचें केवळ अंधानुकरण न करतां आपल्या सभोंवतीच्या परिस्थितीचें योग्य आकलन करून आपणाजवळील साधनें व ज्या विद्यार्थ्यांस शिकवावयाचें त्यांची आर्थिक, बौद्धिक व सामाजिक परिस्थिति यांचें यथायोग्य ज्ञान करून घेऊन त्यांस योग्य अशी स्वतःचीच पद्धति अनुसरणें जास्त चांगलें. मुख्यतः त्याची आपल्या कार्याशीं तादात्म्य वृत्ति होणें अवश्य आहे व ती तशी झाली म्हणजे तो आपलें कार्य योग्य प्रकारें पार पाडील यांत मुळींच शंका नाहीं.

## शाळेंतील अभ्यासक्रम—

याप्रमाणें मुलास लहानपणापासून कोणत्या पद्धतीनें शिक्षण देण्यांत यावें व त्या शिक्षणाचा त्याचा स्वभाव बनविण्याचे कामीं योग्य उपयोग कसा होईल याची काळजी घेणें किती अवश्य आहे हें आतांपर्यंत थोडक्यांत सांगितलें आहे. तसेंच अशा पद्धतीनें मुलांचें शिक्षण व्हावयाचें म्हणजे त्याच्या मातापित्यांनीं अथवा पालकांनीं त्याच्या बालपणांत कशा प्रकारें काळजी घेतली पाहिजे व या कार्यांतील त्यांची जबाबदारी किती मोठी आहे याचेंहि दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. त्यानंतर तें मूल बालशिक्षण मंदिरांत गेलें असतां तेथें त्याच्याकडे कोणत्या पद्धतीनें लक्ष दिलें पाहिजे हेंहि मॉंटेसोरीच्या पद्धतीचें उदाहरण घेऊन दाखविलें आहे. पुढें तें सामान्य शाळेंत गेल्यास तेथील शिक्षकानें

त्याची कोणत्या प्रकारें काळजी घ्यावी व त्याची आपल्या शिक्षण-क्रमांत योग्य प्रगति होईल अशी दक्षता कशी बाळगावी व याकरितां शिक्षकाच्या अंगीं कोणते गुण अवश्य आहेत व त्यानें आपलें वर्तन कसें ठेविलें पाहिजे याचेंहि विवेचन करण्यांत आलें आहे. आतां शाळेंतील शिक्षणाचा क्रम अथवा अभ्यासपत्रक कसें असावें व तें तयार करीत असतांना शिक्षकानें आपल्यापुढें कोणतें ध्येय ठेवावें व आपल्या हातीं आलेल्या विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ बनविण्याचें जें महत्त्वाचें कार्य शिक्षकाचे हातीं असतें त्याचें स्वरूप व अंतिम ध्येय हें पूर्णपणें लक्षांत आणून तें कसें साध्य होईल याच दृष्टीनें एकंदर शिक्षणांतील अभ्यासक्रम कसा आंखावा हें ठरविलें पाहिजे व याकरितां शिक्षकानें कोणत्या विशेष गोष्टींकडे प्रामुख्यानें लक्ष दिलें पाहिजे त्यांचें थोडक्यांत पुढें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे.

( १ ) शाळांतील शिक्षणाचा अभ्यासक्रम व शिक्षणपद्धति हीं शक्य तों अलीकडे झालेल्या संशोधनावर व प्रयोगावर आधारलेलीं असावींत.

( २ ) प्रत्येक विद्यार्थ्याचें शिक्षण त्याची जात, वंश, धर्म अथवा संप्रदाय यांचेकडे लक्ष न देतां केवळ त्याच्या शिक्षण घेण्याच्या पात्रते-कडे पाहून करण्यांत आलें पाहिजे.

( ३ ) बालशिक्षण वर्गांतील अभ्यासक्रम मुलांच्या मनाचा कल पाहून व त्यांच्या सभोंवतीं जी नैसर्गिक व सामाजिक परिस्थिति असेल तिचा शहरांतील व खेड्यांतील मुलांच्या मनाचा योग्य विकास करून घेण्याच्या कामीं पूर्ण उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें आंखला पाहिजे.

(४) प्रत्येक विद्यार्थ्यास त्याची राष्ट्रीय परंपरा अभिमानास्पद वाटेल व इतर राष्ट्रांकडून जी जगांतील संस्कृतींत भर पडत असेल तीबद्दल योग्य तो आदर वाटेल अशी त्याच्या मनाची प्रवृत्ति बनविली पाहिजे.

(५) शाळा ही एक समाजामध्यें एकत्र राहून सर्वांचें हित साधण्यासाठीं एकत्र कार्य करण्याचे प्रयत्न करण्याची व अशा रीतीनें नागरिकत्वाचें शिक्षण घेण्याची जागा आहे असें मानण्यांत आलें पाहिजे.

(६) मुलाच्या प्रत्येक हालचालीचा व कृतीचा योग्य तो उपयोग करून त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीस योग्य तो अवसर दिला पाहिजे. शिक्षा किंवा धाक दाखवून त्याच्या या प्रवृत्तिवर आळा न घालतां त्यांचा योग्य तो उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे.

(७) सृष्टींतील सामान्य नियम व त्यांचें कार्य यांची जाणीव मातृभाषाद्वारां आणि गणिताचे सामान्य व प्राथमिक नियम त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबवून त्यांचे मार्फत करून दिली पाहिजे.

(८) मुलांच्या ठिकाणची विचारशक्ति वाढीस लावली पाहिजे.

(९) प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाचें पूर्ण ज्ञान करून घेऊन त्याच्या ठिकाणीं असलेल्या प्रवृत्तींचा व शक्तींचा पूर्ण उपयोग करून घेण्यास शिकलें पाहिजे.

(१०) विधायक कृति व रचनात्मक कार्य करण्याचें शिक्षण देऊन त्यापासून मनुष्याचा स्वभाव बनेल व तो स्वावलंबी व स्वाभिमानी बनेल अशा तऱ्हेचें त्यास शिक्षण दिलें पाहिजे. तसेंच कोणतेहि परिश्रम करणें हें कमीपणाचें आहे अशी वृत्ति विद्यार्थी किंवा पालक यांच्या मनांत उत्पन्न होतां कामा नये.

(११) प्रत्येक विद्यार्थ्यास आपल्या समाजास उपयुक्त होईल अशा तऱ्हेचा व्यवसाय निवडण्यास मदत करणें.

(१२) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं कला, साहित्य व संगीत यांमध्यें स्वतंत्र वृत्ति दिसून येऊन प्रत्यक्ष कृति करण्याकडे त्याची प्रवृत्ति होईल आणि निरनिराळ्या क्षेत्रामध्यें कांहीं तरी नवीन कल्पना व प्रवर्तक कार्य करण्याची शक्ति येईल अशी त्याच्या अंगीं असलेल्या प्रवृत्तींची तयारी करून देणें.

(१३) विद्यार्थ्यांचें शरीर व मन निरोगी व सुदृढ राहील अशी काळजी घेणें.

(१४) विद्यार्थ्यांचें कौटुंबिक जीवन सुखाचें व सन्मानार्ह होईल अशी त्यांची तयारी करून देणें.

**शिक्षणाचें ध्येय—**

याप्रमाणें प्रत्येक मुलास आपल्या राष्ट्राचा एक उपयुक्त व कर्तबगार नागरिक बनविणें हें शिक्षणाचें ध्येय ठेवून प्रत्येक मुलामध्यें जे विशेष गुण व प्रवृत्ती आढळतील त्यांस योग्य अवसर देऊन त्यांचा परिपोष करणें व त्यांचा मानसिक कल कोणत्या गोष्टींकडे आहे हें पाहून त्या विषयाचें त्यास शिक्षण देणें हें आईबापांचें व शिक्षकाचें कर्तव्य आहे. मुलामध्यें कधींहि निरुत्साह, आत्मविश्वासाचा अभाव किंवा हीन-भाव उत्पन्न होणार नाहीं याबद्दलची काळजी घेणें अत्यंत जरूर आहे व त्यास वरचेवर उत्साहित करून व उत्तेजन देऊन त्याच्या ठिकाणीं जे गुण कमी प्रमाणांत असतील ते हळूहळू वाढविले पाहिजेत व जे विशेष असतील त्यांचें संवर्धन केलें पाहिजे व अशा तऱ्हेचे विषय

त्यास देऊन त्याच्या ठिकाणच्या मानसिक शक्तींचा योग्य विकास होईल व त्या त्या विषयांत तो पारंगत होईल अशी तजवीज केली पाहिजे. अशा रीतीनें जर प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या गुणांस योग्य वाव व उत्तेजन देऊन त्यांचा परिपोष केला तर आपणांस टाकाऊ असा मनुष्यच आढळणार नाहीं व सर्व व्यक्तींचा राष्ट्राचें सामर्थ्य अनेक अंगांनीं वाढविण्याच्या कामीं उपयोग करून घेतां येईल.

---

(११) प्रत्येक विद्यार्थ्यास आपल्या समाजास उपयुक्त होईल अशा तऱ्हेचा व्यवसाय निवडण्यास मदत करणें.

(१२) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं कला, साहित्य व संगीत यांमध्यें स्वतंत्र वृत्ति दिसून येऊन प्रत्यक्ष कृति करण्याकडे त्याची प्रवृत्ति होईल आणि निरनिराळ्या क्षेत्रामध्यें कांहीं तरी नवीन कल्पना व प्रवर्तक कार्य करण्याची शक्ति येईल अशी त्याच्या अंगीं असलेल्या प्रवृत्तींची तयारी करून देणें.

(१३) विद्यार्थ्यांचें शरीर व मन निरोगी व सुदृढ राहील अशी काळजी घेणें.

(१४) विद्यार्थ्यांचें कौटुंबिक जीवन सुखाचें व सन्मानार्ह होईल अशी त्यांची तयारी करून देणें.

**शिक्षणाचें ध्येय—**

याप्रमाणें प्रत्येक मुलास आपल्या राष्ट्राचा एक उपयुक्त व कर्तबगार नागरिक बनविणें हें शिक्षणाचें ध्येय ठेवून प्रत्येक मुलामध्यें जे विशेष गुण व प्रवृत्ती आढळतील त्यांस योग्य अवसर देऊन त्यांचा परिपोष करणें व त्यांचा मानसिक कल कोणत्या गोष्टींकडे आहे हें पाहून त्या विषयाचें त्यास शिक्षण देणें हें आईबापांचें व शिक्षकाचें कर्तव्य आहे. मुलामध्यें कधींहि निरुत्साह, आत्मविश्वासाचा अभाव किंवा हीनभाव उत्पन्न होणार नाहीं याबद्दलची काळजी घेणें अत्यंत जरूर आहे व त्यास वरचेवर उत्साहित करून व उत्तेजन देऊन त्याच्या ठिकाणीं जे गुण कमी प्रमाणांत असतील ते हळूहळू वाढविले पाहिजेत व जे विशेष असतील त्यांचें संवर्धन केलें पाहिजे व अशा तऱ्हेचे विषय

त्यास देऊन त्याच्या ठिकाणच्या मानासिक शक्तींचा योग्य विकास होईल व त्या त्या विषयांत तो पारंगत होईल अशी तजवीज केली पाहिजे. अशा रीतीनें जर प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या गुणांस योग्य वाव व उत्तेजन देऊन त्यांचा परिपोष केला तर आपणांस टाकाऊ असा मनुष्यच आढळणार नाहीं व सर्व व्यक्तींचा राष्ट्राचें सामर्थ्य अनेक अंगांनीं वाढविण्याच्या कामीं उपयोग करून घेतां येईल.

# प्रकरण सव्विसावें

# पोषाख

## मुलांचा पोषाख कसा असावा—

मुलांच्या वृत्तीवर इतर गोष्टींप्रमाणें त्यांच्या पोषाखाचाहि थोडा फार परिणाम होणें साहजिक असतें. तेव्हां त्याबद्दलहि कांहीं विचार येथें प्रदर्शित करण्यांत आले आहेत.

मुलांचा पोषाख सामान्यतः पुढें दिल्याप्रमाणें असावा. तो दिसावयास व खर्चाच्या बाबतींतहि अगदीं साधा असावा. मुलाचे कपडे जितके थोडे असतील तितकें चागलें. त्यांचें वजन व कापड हवामानाप्रमाणें बदलण्यांत यावें. मुलांच्या अंगांतील कपड्यांमुळें त्यांचा मोकळेपणा मुळींच कमी होतां कामा नये. ते गळा, छाती, कमर, मनगटें व ढोपरें यांच्या ठिकाणीं सैल असून हवा खेळेल व हृदयावर किंवा मानेवर तसेंच फुप्फुसावर किंवा पोटावर त्यामुळें दाब बसणार नाहीं असे असावेत. उपयुक्ततेकडे अधिक लक्ष देऊन फॅशनकडे कमी लक्ष्य देण्यांत यावें.

मुलास थंडी बाधेल म्हणून फार कपडे किंवा घट्ट कपडे घालूं नयेत. मुलास अधिक खेळकर होण्यास उत्तेजन देऊन त्यास आवडेल तें व पुरेसें खावयास देऊन आणि नीट श्वासोच्छ्वास करावयास शिकवून थंडीपासून रक्षण करण्यास शिकवावें. कोणत्याहि कारणास्तव अयोग्य असे कपडे मुलाच्या अंगावर घालूं नयेत. मूल कांहीं वेळ उघडें राहिलें तरी घाबरण्याचें कारण नाहीं. कपड्यामुळें मुलाचें स्वातंत्र्य

कधींहि कमी होतां कामा नये. तसेंच त्यांचा प्रकार असा असावा कीं, ते फाटले किंवा मळले तरी विशेषशी फिकीर बाळगण्याचें कारण नसावें. मुलाच्या आरोग्याची व सुखाची काळजी त्याच्या बाह्य स्वरूपापेक्षां अधिक घेणें जरूर आहे.

## पोषाखाचा रंग

मुलांस भडक रंग आवडतात. त्यांस रंगीत कपडे पाहिजे असल्यास करून द्यावे. मुलींच्या बाबतींत ही गोष्ट विशेष लक्षांत घ्यावी. आपण चांगलें दिसावें अशी आवड मुलांमध्यें उत्पन्न होण्यास उत्तेजन द्यावें. तसेंच केवळ सामाजिक नियमांपेक्षां चांगल्या गोष्टींची आवड मुलाच्या ठिकाणीं उत्पन्न होईल याची काळजी घ्यावी. आत्मप्रौढीप्रमाणेंच विनयाच्या फाजील कल्पनेपासूनहि तितकेंच नुकसान होतें. मुलास जरूरीपेक्षां जास्त कपडे थंडीच्या भीतीनें घालण्यांत येऊं नयेत. खेळतांना अंगावरील कपडे ओले झाले तरी जोंपर्यंत तें मूल खेळत आहे तोंपर्यंत त्यास कांहीं इजा होत नाहीं. घरांत आल्याबरोबर मात्र ते कपडे बदलून टाकावेत. त्यास थंडी किंवा पाऊस यामुळें जो त्रास होतो त्याची थोडीशी कल्पना येऊं द्यावी. विशेषतः कपड्याच्या बाबतींत मुलास आपल्या मर्जीप्रमाणें वागूं देऊन त्यावर आपलें मत कधींहि लादूं नये.

## उपयुक्तता—

याप्रमाणें हल्लीं फॅशनपेक्षां किंवा पूर्वापार रूढीपेक्षां प्रत्येक बाबतींत उपयुक्ततेकडे अधिक लक्ष्य देण्याची प्रवृत्ति वाढत आहे. हीस अनुसरून मुलाचें आरोग्य, थंडी, वारा, ऊन, पाऊस यांपासून रक्षण व नीटनेटकेपणा व स्वच्छता या गोष्टींकडे लक्ष्य देऊन त्याच्या स्वाभा-

विक हालचालींस विशेषतः त्याच्या खेळकर वृत्तीस बंधनकारक होणार नाहींत असे कपडे मुलास वापरण्यास देणें इष्ट आहे व त्यास कांहीं वेळ शरीराचा कांहीं भाग उघडा ठेवूं देणेंहि अवश्य आहे. त्यामुळें त्याच्या शरीराच्या ठिकाणीं अनवश्यक मार्दव न येतां तें सुदृढ व निरोगी बनेल व निसर्गानें दिलेल्या त्याच्या शरीरसंपत्तीचा त्यास पूर्ण उपयोग करून घेतां येईल.

**गणवेष—**

विशिष्ट प्रकारचे गणवेषहि कांहीं मुलांस फार आवडतात व गणवेष घातला म्हणजे एक प्रकारची शिस्तीची व सांघिक वृत्तीची कल्पना त्याच्या मनांत सहजच उद्भूत होते. याकरितां विशिष्ट शाळांचे किंवा संस्थांचे गणवेष असतात तसे गणवेष वापरणें हितावह आहे. तसेंच निरनिराळ्या प्रकारचे बाल किंवा तरुण संघ असतात अशा संघांत जाण्याची मुलाच्या ठिकाणीं लहानपणापासूनच वृत्ति निर्माण होईल अशी काळजी घेणेंहि फायदेशीर असतें. मुलाच्या स्वाभाविक वृत्तीस अनुसरून पुढें तो सैनिक, नाविक, वैमानिक किंवा इतर प्रकारचा नागरिक होणार हें ओळखून त्या त्या प्रकारची मनोवृत्ति त्याची बनेल अशी काळजी पोषाखाच्या बाबतींतहि घेणें हें मुलाच्या पुढील आयुष्य-क्रमाच्या दृष्टीनें हितावह आहे.

---

# प्रकरण सत्ताविसावें

# मुलांचें वाङ्मय

## मुलांचें वाचन—

लहान मुलें काय वाचतात व काय ऐकतात या गोष्टींवर त्यांच्या मानसिक प्रवृत्तींस कोणतें वळण लागणार हें अवलंबून आहे. याकरितां त्यांच्या हातांत कोणत्या तऱ्हेचीं पुस्तकें अगर वाङ्मय पडावें, त्यांनीं कोणत्या गोष्टी ऐकाव्या वगैरे गोष्टींकडे लक्ष्य देणें फार महत्त्वाचें आहे.

## दुसऱ्यानें वाचलेलें किंवा सांगितलेलें ऐकणें—

सामान्यतः लहान मुलास वाचून दाखविलेलें ऐकणें आवडतें. अशा तऱ्हेचें त्यास वाचून दाखवावयाचें वाङ्मय मात्र विशिष्ट प्रकारचें असलें पाहिजे; तथापि अशा वाङ्मयानें प्रत्यक्ष क्रियेचें स्थान कधींहि घेतां कामा नये. एखादी गोष्ट दुसऱ्या कोणीं तरी केली आहे, अशा तऱ्हेची गोष्ट त्यास वाचून दाखविण्यापेक्षां त्यास तशी प्रत्यक्ष कृति करण्यास सांगणें अधिक चांगलें. जेव्हां लहान मुलास गोष्टी वाचून दाखविलेल्या ऐकण्याची विशेष आवड किंवा उत्सुकता दृष्टीस पडेल त्यावेळीं त्या मुलाच्या प्रत्यक्ष कृतीवर कांहीं तरी निर्बंध असले पाहिजेत असें समजावें. तसेंच यावरून मूल एखादी गोष्ट प्रत्यक्ष करण्यापेक्षां त्याबद्दलच्या केवळ कल्पनाच करण्यांत आनंद मानतें असें समजावें. अशा वेळीं त्यास वाचीत बसविण्याऐवजीं कांहीं तरी कृति करण्यास सांगत जावी. ज्या वाङ्मयानें मुलाची प्रत्यक्ष कृति करण्याकडे प्रवृत्ति

होणार नाहीं तें वाङ्मय त्याच्या दृष्टीनें निरुपयोगी समजावें. ज्या वाङ्मयामुळें त्याचा स्वभाव बनण्यास मदत होणार नाहीं तें वाङ्मय त्यास वाचूं देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. चांगल्या वाङ्मयानें नेहमीं मुलास चांगल्या गोष्टी करण्याची प्रेरणा मिळते. लहान मुलीच्या हातांत जें वाङ्मय द्यावयाचें असेल त्यामुळें तिच्यामध्यें असलेले स्त्रियांस आवश्यक असे गुण वाढीस लागले पाहिजेत. त्याप्रमाणेंच मुलाच्या बाबतींतहि हीच गोष्ट खरी आहे. लहान मुलांच्या हातीं द्यावयाचें वाङ्मय असें असलें पाहिजे कीं, त्यामुळें त्या मुलांच्या ठिकाणीं असणाऱ्या स्त्रीपुरुषविषयक प्रवृत्ती वाढीस लागल्या पाहिजेत.

**अद्भुत कथा—**

लहान मुलांस वाचावयास कोणतीं पुस्तकें द्यावयाचीं याबद्दलहि खबरदारी घेतली पाहिजे. लहान मुलांस देवदूत, परी किंवा यक्ष-यक्षिणींच्या गोष्टींचीं पुस्तकें सामान्यतः देण्यांत येत असतात. परंतु त्यांतील गोष्टी विलक्षण व अद्भुत असल्यामुळें त्या वास्तविक नाहींत हें नीट मुलांच्या मनावर ठसवून देण्यांत आलें पाहिजे. नाहीं तर त्यांची एकंदर जगाबद्दल विपरीत कल्पना होण्याचा संभव असतो. जुन्या पौराणिक कथांबद्दलहि असेंच म्हणतां येईल. त्याप्रमाणेंच वर्तमानपत्रें हीं प्रौढ माणसांकरितां असतात; तीं सर्वच लहान मुलांस देण्यास योग्य असतात असें नव्हे. कांहीं ठिकाणीं लहान मुलांकरितां स्वतंत्र वर्तमानपत्रें असतात. तीं बहुधा चांगलीं असतात. परंतु सामान्य वर्तमानपत्रांत ज्या आकर्षक म्हणून खून, मारामाऱ्या वगैरेंच्या बातम्या व वर्णनें असतात तीं मुलांच्या मनास अपाय करणारीं असतात व त्यामुळें मुलें भित्रीं बनतात.

**विधायक कृतींच्या कथा—**

या दृष्टीनें मोठमोठ्या साहसाच्या, धैर्याच्या, शौर्याच्या व कांहीं तरी पराक्रम केल्याच्या गोष्टी मुलांच्या दृष्टीनें उपयुक्त असतात. परंतु या गोष्टींमध्यें ग्रथित केलेलीं तत्त्वें काल्पनिक नसून वास्तविक असावीं. एखाद्या धंद्यामध्यें, कलेमध्यें किंवा कार्यामध्यें यश मिळविणाऱ्यांच्या गोष्टी, युद्ध किंवा बंड, दंगा वगैरेमध्यें यश मिळविणाऱ्यांच्या गोष्टींपेक्षां अधिक चांगल्या. एखाद्या समुद्रावरील चांच्याच्या गोष्टीपेक्षां ज्यानें एखादा मोठा बंधारा बांधला आहे किंवा एखाद्या ओसाड प्रदेशांत कालवे काढले आहेत अशा माणसाचें उदाहरण सध्यांच्या मुलांच्या पुढें ठेवणें अधिक चांगलें. युद्धासंबंधींच्या गोष्टी लहान मुलास सांगूं नयेत असें नव्हे, परंतु युद्ध हा अगदीं अखेरचा उपाय आहे अशी त्या मुलांची समजूत करून दिली जावी. मुलींच्या बाबतींत गृहव्यवस्था, कुटुंब, कला, समाज वगैरेसंबंधीं ज्या मुलीच्या स्वाभाविक प्रवृत्ती असतात त्याच वाढीस लागतील असें वाङ्मय त्यांच्या हातीं पडणें अधिक चांगलें. यक्षिणी अथवा परींच्या गोष्टी मुलांस वाचावयास दिल्यास त्या गोष्टी काल्पनिक असून प्रत्यक्ष व्यवहारांत तसें कधींच घडत नाहीं, तर उलट आपणांस आपल्या कामांत मिळणारें यश आपलाच प्रयत्न, चिकाटी, धैर्य, प्रेमळपणा व दयाळूपणा वगैरे गोष्टींवर अवलंबून असतें या गोष्टी त्यांस स्पष्ट करून सांगाव्या. राक्षस, भुतेंखेतें, दुष्ट आईबाप, सवती, सूड वगैरेसंबंधींच्या गोष्टी मुलांच्या बाबतींत अगदीं अयोग्य समजाव्या. कारण त्यांमध्यें जी चांगली गोष्ट म्हणून झाल्याचें दाखविलेलें असतें ती कोणाच्याहि प्रयत्नापासून झाल्याचें नसून एखाद्या यक्षिणीच्या कृपेमुळें घडून आल्याचें वर्णन असतें. आपल्याबद्दल दुसऱ्याच्या मनांत प्रेम उत्पन्न होणें ही गोष्ट आकस्मिक रीतीनें किंवा परमेश्वर वगैरेच्या कृपेमुळें होणारी नसून आपल्याच

प्रेमळपणावर अवलंबून आहे ही गोष्ट मुलांच्या मनावर चांगली बिंबविली पाहिजे. अशा बाबतींत बायबल विशेषतः त्यांतील जुना करार या सारखीं पुस्तकें अगदीं अयोग्य आहेत हें वर सांगितलेंच आहे. ज्या गोष्टींमधून मुलें अतिशय सद्गुणी वगैरे दाखविलीं आहेत किंवा ज्यामुळें मुलांवर उदासिनतेचे किंवा इतर वाईट परिणाम होण्यासारखे असतील अशा गोष्टी मुलास कधींहि सांगूं नयेत. ज्या गोष्टींमध्यें आईबाप वगैरे वाईट दाखविले असून त्यांची खोड मोडल्याचें दाखविलें असेल त्या गोष्टी मुलांच्या बाबतींत वाईट होत. याच्या उलट प्राण्यांच्या अगर मुलांच्या एकत्र, प्रेमळ व सलोख्याच्या राहणीसंबंधीं, व परस्परांच्या उपयोगी पडण्यासंबंधींच्या गोष्टी मुलांच्या बाबतींत अधिक चांगल्या होत. कारण त्यांपासून त्यांच्या मनांतील सांघिक प्रवृत्तीची वाढ होईल व सामाजिक राहणीचें महत्त्व त्यांस विशेष वाटूं लागेल.

**बालवाङ्मय—**

आपल्याकडे बालवाङ्मय असें फारसें उपलब्ध नाहीं. या दृष्टीनें मुलांस वाचावयास देण्यासारखीं पुस्तकें तयार झालीं पाहिजेत व तीं अर्वाचीन शैक्षणिक दृष्टीनें तयार करण्यांत आलीं पाहिजेत. जुन्या पौराणिक गोष्टींचीं व कथांचीं लहान लहान पुस्तकें मुलांसाठीं म्हणून बनविण्यांत येतात पण त्यांतील राक्षसांच्या, देवांच्या, अवतारांच्या व त्यांनीं केलेल्या चमत्कारांच्या गोष्टी केवळ अद्भुत व कल्पनासृष्टींतील वाटून मुलांस त्यांचेबद्दल आश्चर्य वाटण्याखेरीज दुसरा कांहीं परिणाम त्यांच्या मनावर होत नाहीं. त्यांस प्रत्यक्ष अनुकरण करण्यास प्रवृत्त करील असा कथाभाग त्यांत फारच थोडा असतो. यापेक्षां ऐतिहासिक पुरुष त्यांस अधिक जवळचे वाटतात. याकरितां जगामध्यें जे मोठमोठे थोर पराक्रमी,

साहसी पुरुष होऊन गेले, भूगोलावर प्रवासादि साहसें करून ज्यांनीं भूप्रदेशांचा शोध लावला, अनेक नवीन नवीन शोध लावून ज्यांनीं भौतिक व इतर शास्त्रांची प्रगति केली, औद्योगिक क्षेत्रांत ज्यांनीं विशेष कर्तबगारी दाखविली, मोठमोठीं बांधकामें करून ज्यांनीं आपली कीर्ति अजरामर करून ठेविली, राष्ट्रांस स्वातंत्र्य देऊन ज्यांनीं लोकसेवा केली व इतर अनेक सामाजिक कार्यांत ज्यांनीं परिश्रम करून समाजसुधारणा वगैरे केल्या अशा पुरुषांचीं चरित्रें मुलांस वाचावयास दिल्यास त्यांस त्यांच्यापैकीं कोणासारखें तरी व्हावें असें मनापासून वाटूं लागेल व त्यांच्या ठिकाणीं असलेल्या सुप्त भावनांस चालना मिळून त्या त्यांस कर्तव्यपर बनवितील व त्यांचे हातून पुढें कांहीं तरी समाजोपयोगी कार्य होईल.

**अनिष्ट वाङ्मय—**

सध्यांचें जें प्रचालित साप्ताहिक, लघुकथा, कादंबऱ्या वगैरे बरेंचसें बाष्कळ वाङ्मय तयार होत आहे त्यांत मुलांस उपयुक्त असें कांहींच नसून अनिष्ट असा भाग मात्र फार असतो. याकरितां मुलांस त्यापासून अलिप्त ठेवणें अत्यावश्यक आहे. पण तें केवळ त्यांच्या हातीं पडूं न देण्यानें तीं अलिप्त राहतील असें नाहीं. तीं तें तुमच्या न कळत मिळेल तेथें वाचूं लागतील व प्रतिबंधानें त्यांच्या ठिकाणीं उलट प्रतिक्रिया करण्याची मात्र वृत्ति जागृत होऊन त्यांचा कल तेंच वाङ्मय पण गुप्तपणें किंवा तुम्हास न समजूं देतां वाचण्याकडे विशेष होत जाईल. याकरितां यावर उत्तम उपाय म्हणजे या वाङ्मयाच्या ऐवजीं त्यांच्या हातांत उपयुक्त वाङ्मय पडेल अशी व्यवस्था करणें हाच होय.

याकरितां मुलांच्या ठिकाणीं असलेल्या सुप्त पण उपयुक्त मनोवृत्तींस चालना मिळेल, त्यांच्या ठिकाणीं योग्य नीतीचें संवर्धन होईल, त्यांची

समाजिक वृत्ति अधिकाधिक वाढत जाईल, त्यांची स्वार्थापेक्षांहि समाजोपयोगी गोष्टींकडे प्रवृत्ति वाढेल व आपण एका समर्थ राष्ट्राचे उपयुक्त नागरिक बनूं अशी भावना त्यांच्या ठिकाणीं जागृत होईल अशाच कथा, गोष्टी, चरित्रें, वर्णनें, निरानिराळ्या मोठमोठ्या कार्यांचा अथवा घटनांचा वृत्तांत निरानिराळ्या प्रभावशाली राष्ट्रांचे इतिहास वगैरे तऱ्हेचें वाङ्मय अधिकाधिक निर्माण होऊन मुलांच्या हातीं पडेल व सहसा त्यांस गलिच्छ वाङ्मयाकडे जावेंसें वाटणार नाहीं अशी तजवीज होणें व त्या दृष्टीनें मुलांची मनोभूमिकाहि बनविणें इष्ट आहे.

# प्रकरण अठ्ठाविसावें

# खेळ

### खेळांचें महत्त्व—

वाङ्मयाप्रमाणेंच मुलांच्या मनोवृत्ती बनविण्यामध्यें खेळांस फार महत्त्व आहे. विशेषतः सांघिक खेळांमुळें मुलांतील सांघिक प्रवृत्ति वाढीस लागते व इतर बौद्धिक किंवा विधायक खेळांत त्यांच्या इतर मनोवृत्तींस चालना मिळते. याकरितां मुलांनीं कोणते खेळ खेळावे हाहि एक महत्त्वाचा प्रश्न असून त्याचा विचारहि मातापित्यांस आणि पालकांस व शिक्षकांसहि करणें आवश्यक आहे.

### मुलांच्या मनोवृत्तींचें ज्ञान—

लहान मुलांच्या मनाच्या प्रवृत्ती कोणत्या प्रकारच्या आहेत हें ओळखण्यासाठीं जर त्यांच्यापुढें निरनिराळीं खेळणीं ठेवलीं तर तीं कोणतीं घेतात यावरून त्यांच्या प्रवृत्ती सहज समजून येतात. अशा वेळीं मुलाची ज्या योगानें सहकार्याकडे प्रवृत्ति होईल किंवा त्यास विधायक कार्य करण्याची स्फूर्ति मिळेल अशीं खेळणीं देण्याची अथवा त्याच्या हातीं पडतील अशी व्यवस्था करावी; किंवा मुलास स्वतःच खेळणीं तयार करून घेण्यास शिकवावें.

### खेळाचें आकर्षकत्व—

ज्या खेळामध्यें मन रमणार नाहीं, किंवा जो खेळ मनापासून मुलास आवडणार नाहीं असल्या गोष्टीस मग ती कितीहि इतर दृष्टींनीं चांगली असली तरी खेळ असें म्हणतांच येणार नाहीं; व ज्या खेळांत

मुलाच्या कोणत्या तरी भावना अथवा स्वाभाविक प्रवृत्तींचें समाधान होणार नाहीं तो खेळ मुलांस आवडणार नाहीं. खेळ खेळण्यास साधनांची आवश्यकता असते व मुलांचीं खेळणीं हींच त्यांचीं साधनें होत; व तीं अगदीं साध्या वस्तूपासून अनेक मोठमोठ्या वस्तूंपर्यंत निरनिराळ्या प्रकारचीं असूं शकतात. मुलाच्या हातांत एखादें खूप मोठें खेळणें देऊन त्यास खेळत बसण्यास सांगणें म्हणजे कांहीं खेळ होत नाहीं; कारण त्या मुलास कदाचित् ती विशिष्ट क्रिया करणें मुळींच आवडणार नाहीं; व अशा प्रकारचा कंटाळवाणा खेळ त्याचें मन कधींच आकर्षून घेणार नाहीं आणि त्यामुळेंच खेळांतील मुख्य हेतु जो मुलाचें मन रमणें तो मुळींच साध्य होणार नाहीं.

**खेळाचें साध्य—**

ज्या स्वाभाविक प्रवृत्तींचें समाधान होणें मुलास विशेष आवडतें अशा प्रवृत्ती म्हटल्या म्हणजे एक आत्मप्रवृत्ति, दुसरी लैंगिक किंवा उत्पादन प्रवृत्ति व तिसरी सांघिक प्रवृत्ति या होत.

ज्या खेळामध्यें मुलास एखादें अधिकाराचें अथवा महत्त्वाचें स्थान मिळतें त्या खेळामध्यें त्याची आत्मप्रवृत्ति तृप्त होते. लैंगिक अथवा उत्पादक प्रवृत्तीचें समाधान जेव्हां लहान मूल एखादी वस्तु तयार करतें तेव्हां होतें, व त्याच्या सांघिक प्रवृत्तीचें समाधान ज्या खेळांमध्यें अनेक सवंगड्यास घेऊन एखादें मूल दुसऱ्यास पुढारीपण देऊन सर्वांशीं सहकार्य करून खेळतें, अशा खेळांमध्यें आपणांस दृष्टीस पडतें. ज्या खेळांमध्यें संघ करून खेळावयाचें असतें ते खेळ या प्रकारांत येतात. या तीनहि प्रकारचे खेळ खेळण्यास मुलास संधि व त्याबरोबरच साधनें दिलीं पाहिजेत.

कोणते खेळ खेळावयाचे हें ठरविणें शक्य तों मुलाच्याच आवडीवर अवलंबून असावें. म्हणजे त्याला विशिष्ट वेळीं त्याच्या मनामध्यें जी प्रवृत्ति विशेष उत्कटत्वानें वास करीत असेल तशाच प्रकारचा खेळ खेळावा असें वाटेल. जर उत्पादक भावना त्याच्या मनांत विशेष खळबळ करीत असेल तर त्याला त्यावेळीं एखादा सांघिक खेळ खेळावयास सांगितला असतां तो आवडणार नाहीं.

## मुलांचा खेळ व प्रौढ माणसें—

मुलाच्या सभोंवतीं जर नेहमींच मोठीं माणसें असतील तर त्यास एक प्रकारचा संकोच वाटत असतो व आपण स्वत: फार लहान असल्यामुळें एक प्रकारची दुर्बलतेची भावना त्याच्या मनांत उत्पन्न होते. अर्थात् ही गोष्ट केवळ परिस्थितीमुळें उत्पन्न झालेली असते; परंतु तीमुळें मुलाच्या मनांतील जी एक अधिकार किंवा सत्ता वापरून पाहण्याची इच्छा असते ती तृप्त होण्याचा संभव फारच कमी असतो. ही संधि त्यास खेळानें प्राप्त करून घेतां येते. अशा तऱ्हेच्या खेळाचीं साधनें त्यास पुरवून त्या मुलाच्या ठिकाणीं अशा प्रकारचा खेळ खेळण्याची इच्छा उत्पन्न होत आहे काय हें पहावें, व तसें असल्यास त्यास तो खेळ खुशाल खेळूं द्यावा. योग्य साधनें दिलीं तर मुलाच्या मनांतील उत्पादक प्रवृत्तीचेंहि अशाच एखाद्या खेळामध्यें समाधान करून घेतां येईल. उदाहरणार्थ, मुलाच्या हातांत जर मातीचा किंवा मेणाचा गोळा दिला तर त्याच्या निरनिराळ्या वस्तू तयार करून आपल्या मनांतील आत्मवर्चस्वाची भावना त्यास कोणत्या वस्तु तयार करावयाच्या हें ठरवितांना तृप्त करतां येईल. तसेंच ज्या वस्तू तो प्रत्यक्ष तयार करील त्या करतांना त्याच्या मनांतील उत्पादक प्रवृत्तीचें समाधान होईल. अशा तऱ्हेचे खेळ खेळण्याकरितां मातीचीं माणसें, शिपाई,

प्राणी वगैरे तयार करतां येतील आणि त्यांस निरनिराळ्या कृती करावयास लावून त्यांचेवर हुकमत चालवितां येईल. मुलीच्या बाबतींतहि निरनिराळ्या प्रकारच्या बाहुल्या करून त्यांचेकडून निरनिराळीं कामें करून घेण्यांत तिच्या या दोन्ही भावनांची तृप्ति होईल. अशा तऱ्हेची अधिकारप्राप्तीची भावना मुलामध्यें जागृत असतां व तशा प्रकारचा खेळ तो खेळत असतां त्यामध्यें जर मोठ्या माणसानें भाग घेतला तर त्या खेळांतील सर्व गंमत निघून जाईल व त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. याकरितां प्रौढ माणसांनीं मुलास खेळण्यास पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यापासून दूर राहिलें पाहिजे. उत्पादक प्रवृत्तीच्या खेळांतहि प्रौढ माणसांनीं प्रत्यक्ष भाग घेतां कामा नये. फार तर प्रेक्षक म्हणून हजर राहावयास हरकत नाहीं. अशा प्रकारचे खेळ खेळतांना मुलांच्या मनांत मोठ्या माणसाकडून केवळ शाबासकी व उत्तेजन मिळण्याची अपेक्षा असते.

## सांघिक खेळांतील मुलांची वृत्ति—

सामान्यतः सांघिक खेळांमध्यें सर्वसाधारणपणें मुलें दुय्यम प्रकारचें स्थान घेतात; व आपल्या खेळांतील स्वतःच्या वाटणीचा कार्यभाग आपल्या पक्षास एकनिष्ठ राहून व स्वार्थत्याग करूनहि पूर्णपणें पार पाडतात. परंतु मधून मधून आपल्या पाळीप्रमाणें सत्तेचें स्थानहि त्यांस मिळावेसें वाटतें. सामान्यतः मुलें खेळांतील निरनिराळीं कामें वाटून देण्याच्या बाबतींतहि नि:पक्षपाती असल्याचें दिसून येतें. जर अशा सांघिक खेळांमध्यें एखाद्या मुलाच्या मनांत सत्ता धारण करावयाची व सत्ता मान्य करण्याची अशा दोनहि प्रवृत्ती दिसून आल्या नाहींत तर त्याच्या मनांत घरांतील कांहीं निर्बंधामुळें दोष उत्पन्न झाला आहे असें समजण्यास हरकत नाहीं. मुलास पुरेसे खेळगडी मिळवून देऊन सांघिक खेळ

खेळण्याच्या बाबतींत उत्तेजन देत जावें. अशा खेळांत जर कांहीं प्रौढ माणसांस भाग घ्यावयाचा असेल तर तो त्यांनीं मुलांनीं मुद्दाम त्यांस बोलाविलें तरच घ्यावा; आणि आपलें ठराविक काम करण्यामध्यें जरूर तो आज्ञाधारकपणा दाखवून व मोठ्या आनंदानें लहानसहान कामेंहि करून मुलास उदाहरण घालून देण्याचा प्रयत्न करावा. अशी वृत्ति जर तुमच्या ठिकाणीं वास करीत असेल तर मुलेंहि मोठ्या आनंदानें तुम्हांस न वगळतां आपल्या खेळांत सामील करून घेतील.

### खेळांपासून इतर अपेक्षा—

वास्तविक खेळापासून मुलांना वरील तीन प्रकारच्या प्रवृत्तींच्या समाधानाखेरीज अधिक कांहीं तरी फायदा झाला पाहिजे. तथापि जरी वरील प्रकारच्या भावनांची तृप्ति होणें एवढेंच काम खेळांमुळें झालें तरी तेवढ्यानेंहि मुलाची वाढ योग्य प्रकारें होण्यास व त्याला पुढें सुखाची प्राप्ति होण्याच्या बाबतींत आपण पुष्कळच पल्ला गांठला असें मानावयास हरकत नाहीं. परंतु वास्तविक या खेळांचा उपयोग मुलाच्या अंगांतील इतर शक्तींची वाढ होण्याच्या कामींहि झाला पाहिजे. उदाहरणार्थ, खेळांच्या सहाय्यानें मुलाची शारीरिक वाढ होऊन त्याचे स्नायु मजबूत झाले पाहिजेत; व शारीरिक शक्ति व मानसिक शक्ति यांची योग्य अशी जोडणी होऊन मुलाच्या अंगांत एक प्रकारचें कौशल्य आलें पाहिजे. धांवणें, पळणें, उड्या मारणें, चेंडू वगैरे फेंकणें, निरनिराळ्या वस्तू तयार करणें, ठोकळे एका ठिकाणीं जमवून त्यांच्या निरनिराळ्या आकृती तयार करणें, विटा वगैरे मांडून त्यांचें घर तयार करणें, अशा तऱ्हेचे खेळ खेळण्यानें मुलांची सर्व बाजूनें वाढ होण्यास चांगली मदत होते. अशा खेळांचा उपयोग त्यांची बुद्धि वाढविण्याकडे होतो. घरें वगैरे बांधणें, कोडीं सोडविणें अशा तऱ्हेच्या खेळां-

मुळें त्यांच्या ठिकाणीं दूरदृष्टि व समयज्ञता ही येते. बहुतेक सर्व खेळांमध्यें करावयाच्या कृती आपणांस पुढील आयुष्यामध्यें करावयाच्या कामांच्या सारख्याच असतात; मात्र त्यांचें स्वरूप अगदीं साधें असतें एवढेंच.

**काम व खेळ—**

मोठ्या माणसांना पुष्कळदां काम म्हटलें म्हणजे एखादी त्रासदायक गोष्ट वाटते याचें कारण त्यांच्या मनांत काम व खेळ यांच्या बाबतींत जें साहचर्य आहे त्याची भावना नसते. वास्तविक जें मूल लहानपणीं खेळत असतांनाच काम करूं शकतें, व बहुतेक खेळांत आपणांस तसें आढळतेंहि, त्याच मुलाच्या मनांत प्रौढपणीं काम करीत असतांनाहि खेळाडूवृत्ति उत्पन्न होऊन त्यापासून त्यास आनंद वाटावयास कांहीं हरकत नाहीं; व त्यास काम म्हणजेच एक प्रकारचा खेळ वाटला पाहिजे; परंतु अशा तऱ्हेची वृत्ति आपणांस अनेकदां आढळून येत नाहीं. याचीं कारणें पुढील प्रकारचीं असावींत: (१) लहानपणीं त्या मुलाच्या स्वाभाविक प्रवृत्ती दबल्या गेल्या असल्या पाहिजेत आणि त्यामुळें त्यास त्या कामामध्यें आनंद किंवा उत्साह वाटत नसला पाहिजे. (२) त्या मुलास खेळण्याकरितां आवश्यक तीं साधनें न मिळाल्यामुळें त्याच्या ठिकाणच्या निरनिराळ्या शक्तींची वाढ झाली नसली पाहिजे. (३) कांहीं कारणांमुळें त्या व्यक्तीकडे असलेलें काम त्यास स्वतःस समाधानकारक वाटत नसलें पाहिजे व त्यास योग्य त्या कामाची निवड करण्याची संधि मिळाली नसली पाहिजे. ज्या मनुष्याच्या स्वाभाविक मनोवृत्तींवर लहानपणांत दाब पडलेला नसतो व ज्यास खेळण्याकरितां योग्य तीं खेळणीं पुरविलीं जातात व पुढें आपल्या कामाची योग्य ती निवड करतां येते त्याला लहानपणीं

खेळ खेळण्यामध्यें जितका आनंद वाटतो तितकाच मोठेपणीं काम करण्यामध्यें वाटतो.

**खेळाचीं साधनें—**

याप्रमाणें मुलांनीं कोणते खेळ खेळावे हें ज्याप्रमाणें त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तींस अनुसरून ठरवावयाचें असतें त्याप्रमाणें त्यांस साधनेंहि पुरविण्याचें काम त्याच दृष्टीस अनुसरून करावयाचें असतें. आपल्याकडे ठराविक सांच्याच्या पूर्वापार आलेल्या खेळण्यांच्या पलीकडे अलीकडील काळास अनुरूप असे खेळहि फारसे तयार होत नाहींत. पण परदेशांतून हल्लीं अनेक प्रकारचे नवीन नवीन खेळ आयात होत असतात व कांहीं अलीकडे येथेंहि तयार होऊं लागले आहेत. ज्यांची विधायक व यांत्रिक रचना वगैरे करण्याकडे प्रवृत्ति असते अशा मुलांस ठोकळ्यांचीं घरें करणें, मेकॅनोपासून निरनिराळ्या यंत्रांचे नमुने करणें, नकाशांचे किंवा चित्रांचे तुकडे केलेले असतात ते एकत्र जोडणें, निरनिराळ्या पदार्थांचे नमुने बनविणें वगैरेसारखे खेळ उपयुक्त वाटतील. ज्यांची कलांकडे प्रवृत्ति असेल त्यांस मेण किंवा शाडूपासून निरनिराळीं चित्रें बनविणें, फ्रेटवर्कचे निरनिराळे कापून नक्षीदार पदार्थ व वस्तू तयार करणें, लांकडांच्या लहानमोठ्या ठोकळ्यांपासून प्राण्यांचीं चित्रें बनविणें, त्यांस निरनिराळे रंग देणें, लहानमोठ्या गाड्या, घोडे वगैरे प्राणी किंवा वस्तू तयार करणें अशा प्रकारचे खेळ आवडतील; तसेंच ज्यांची बौद्धिक विषयांकडे प्रवृत्ति असेल अशांस शब्दांची देवघेव करणें, अक्षरांच्या तुकड्यांवरून निरनिराळे शब्द बनविणें, निरनिराळीं कोडीं सोडविणें, भिन्न भिन्न रेषांपासून भिन्न भिन्न आकृति बनविणें, शब्दांवरून गोष्टी बनविणें अशांसारखे खेळ आवडूं लागतील. याप्रमाणें बैठ्या खेळांचेहि अनेक प्रकार करून त्यांत

विविधता आणून मुलांच्या अंगच्या स्वाभाविक प्रवृत्तींचें ज्ञान करून घेऊन त्यांचें योग्य संवर्धन करतां येईल.

**मैदानी खेळ—**

यापेक्षांहि बाहेरील मैदानी खेळांस विशेष महत्त्व आहे. कारण बैठे खेळ थोडेबहुत वैयक्तिक स्वरूपाचेच असतात. त्यांत सांघिक वृत्ति बनण्यास जरी गडी गडी वाटून घेतले असतां थोडाफार वाव मिळाला तरी फारसा वाव नसतो. याकरितां मुलाचें शरीर व मन आणि त्याच्या ठिकाणची सांघिक वृत्ति यांची वाढ होण्यास मैदानी खेळच अधिक उपयुक्त होत.

पूर्वीच्या आपल्या इकडील मैदानी खेळांस फारशीं साधनें लागत, नसत. आट्यापाट्या, खोखो, हुतुतू यांसारखे खेळ केवळ मैदान असलें म्हणजे कोणतेंहि साधन न लागतां खेळतां येतात. विटीदांडू, लगोऱ्यादि खेळांस फार अल्प साधनें लागतात. तरी त्यांतहि सांघिक प्रवृत्ति वाढण्यास भरपूर वाव असतो व अलीकडे त्यांस अधिक व्यवस्थित स्वरूपहि देण्यांत आलें आहे. अलीकडे पाश्चात्य खेळांची आवड विशेष वाढली असून क्रिकेटसारखे खेळ फारच लोकप्रिय झालेले आहेत व त्यांतील कांहीं खेळाडूंबद्दल मुलांमध्यें विशेष आदर वाढत चाललेला आहे; परंतु या खेळांमध्येंहि हल्लींच्या सामन्यांच्या पद्धतीमुळें ज्या कांहीं अनिष्ट प्रवृत्ती वाढत चालल्या आहेत त्या कमी झाल्या तर अशा खेळांपासून मुलांच्या मनावर योग्य तो परिणाम घडून येईल, एवढेंच नव्हे, तर त्यामुळें राष्ट्रांतील निरनिराळे समाज एकत्र येण्यास व त्यांचेमध्यें परस्परांबद्दल आपुलकी व स्नेह वाढण्यासहि मदत होऊन अशा खेळांपासून सार्वराष्ट्रीय ऐक्यासहि मदत होण्यासारखी आहे.

यावरून मुलांच्या आयुष्यांत खेळांस किती महत्त्वाचें स्थान आहे ही गोष्ट लक्ष्यांत येईल. तसेंच मुलाच्या आवडी लक्ष्यांत घेऊन त्यास योग्य तऱ्हेचीं साधनें पुरविलीं असतां खेळाच्या द्वारेंहि आपण त्याच्या पुढील आयुष्यास उपयुक्त असें शिक्षण त्यास कसें देऊं शकतों ही गोष्टहि वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. अशा तऱ्हेनें जर प्रत्येक आईबापानें अथवा पालकानें किंवा शिक्षकानें आपल्या ताब्यांत असलेल्या मुलास योग्य तो खेळ खेळण्यास शिकविलें व त्या कामांत उत्तेजन दिलें तर त्या मुलाच्या सुप्त प्रवृत्तींस चालना मिळून त्याला तरुणपणीं आपल्या मनोवृत्तींस योग्य असा व्यवसाय शोधून काढणें सुलभ होऊन तो भलत्याच मार्गाकडे वळून अयशस्वी होण्याचा संभव राहणार नाहीं व अनुरूप व्यवसाय निवडल्यानंतर त्या व्यवसायांत त्याचें लक्ष्य लागून त्यांत तो इष्ट ती प्रगति करण्यास व आपलें आयुष्य सुखानें व यशस्वी रीतीनें घालविण्यास समर्थ होईल.

## प्रकरण एकोणतिसावें

# विश्रांति - झोंप

**विश्रांतीची आवश्यकता—**

मुलास ज्याप्रमाणें विद्याभ्यास करणें व खेळ खेळणें या गोष्टींची आवश्यकता असते त्याप्रमाणें त्यास दिवसामध्यें होणाऱ्या परिश्रमांचा परिहार करण्याकरितां विश्रांतीचीहि जरूरी असते. ही विश्रांति त्यास यथेच्छ व शांत झोंप मिळाल्यास प्राप्त होते.

याकरितां मुलास योग्य वेळीं भरपूर व शांत झोंप मिळणें अवश्य असतें. ती त्यास लहानपणापासून कशा प्रकारें मिळाल्यास त्यास त्याचें शारीरिक व मानसिक आरोग्य प्राप्त होईल या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे.

**झोंप—**

लहान मुलास प्रथमपासून स्वतंत्रपणें एकटें निजवावें व त्याच्याकरितां एखादी स्वतंत्र खाट त्याच्या जन्मापासून तयार ठेवावी व तीवर त्यास निजवीत जावें. ती त्यास आपले अवयव पूर्णपणें पसरून निजतां येईल इतक्या आकाराची असावी. तसेंच ती ज्या ठिकाणीं हवा चांगली खेळेल पण वाऱ्याचा झोत अंगावरून सारखा वाहणार नाहीं अशा ठिकाणीं असावी. त्याप्रमाणेंच खाटेवरील कपडे, मच्छरदाणी वगैरे सामान अगदीं साधें असून धुतां येईल अशा कापडाचें असावें. त्यास घालावयाचें पांघरूण बेताचें गरम असून हलकें असावें. त्याच्या तोंडावरून कधींहि पांघरूण घालूं नये. कारण त्यामुळें त्यास श्वासो-

च्छ्वास करण्यास वगैरे ताजी हवा मिळत नाहीं, आणि तिची त्यास फार जरूरी असते. मूल निजलें असतां त्याच्या डोळ्यावर तीव्र प्रकाश येणार नाहीं, व वारा लागणार नाहीं अशी काळजी घ्यावी.

सर्वसाधारण मुलास स्वस्थ झोंप लागते. त्याचा श्वासोच्छ्वास मंद व नियमितपणें चालतो. तें कधीं दचकून उठत नाहीं अगर झोंपेमध्यें रडत नाहीं. जर असें होत नसेल तर कांहींतरी निजण्याच्या जागेंत वगैरे दोष आहेत असें समजावें व नीट तपास करून त्याबद्दल योग्य ती काळजी घ्यावी. लहान मुलास झोंपेंत बोलण्याची किंवा हंसण्याची अथवा या कुशीवरून त्या कुशीवर होण्याची संवय असते. त्यांत कांहीं वावगें नसतें.

**स्वतंत्र खोली—**

लहान मुलास निराळ्या खाटेवर निजवावें एवढेंच नव्हे तर त्यास आईबापांपासून निराळ्या अशा स्वतंत्र खोलींत निजवावें. मूल एक वर्षाचें झाल्यावर त्यास कधींहि आईबापांनीं आपल्या खोलींत निजावयास घेऊं नये. जवळ जवळ सारख्याच वयाचीं दोनतीन मुलें एकाच खोलींत निजविण्यास हरकत नाहीं. शक्य तों निजण्याच्या खोलीची खिडकी उघडी ठेवीत जावी. मात्र मुलाच्या अंगावर प्रत्यक्ष वाऱ्याचा झोत येणार नाहीं अशी काळजी घ्यावी.

**निजण्याची स्थिति—**

मुलास त्यास आवडेल अशा स्थितींत उताणें किंवा कुशीवर निजूं द्यावें. त्याला ज्या स्थितींत गाढ झोंप येईल अशीच स्थिति तें पसंत करील व आरोग्यदृष्ट्याहि ही स्थिति चांगली असते. कारण तीमध्यें त्याच्या अंगच्या श्रमांचा परिहार लवकर होऊन त्यास झोंपहि लवकर

लागते. विशिष्ट स्थितींत निजण्यानें मुलास कांहीं अपाय होतो ही समजूत चुकीची आहे व मुलास आपण त्रास दिल्यानें तर तें आपल्याला योग्य असेल अशाच स्थितींत निजतें व त्यास तशाच स्थितींत निजूं द्यावें. मुलास रात्रीं तहान लागल्यास पिण्याकरितां जवळपास पाणीहि ठेवण्याची व्यवस्था करावी. मुलाच्या निजण्याच्या जागीं जितकी शांतता असेल तितकें चांगलें व एकदां निजल्यावर त्यास शक्य तों न उठविणें चांगलें.

**झोंप न येण्याचीं कारणें—**

मुलास झोंप न येण्याचीं कारणें सामान्यतः पुढीलप्रमाणें असतात: (१) त्याची झोंप येण्याची वेळ झालेली नसते. (२) तें आजारी असतें. (३) एखाद्या दिवशीं अधिक उकडत असतें किंवा थंडी पडलेली असते किंवा त्याचें पोट साफ नसतें. (४) त्यास निजावयाची भीति वाटत असते. (५) त्यास झोंप येत असूनहि जागें राहण्याची इच्छा असते. (६) त्यास भूक किंवा तहान लागलेली असते. (७) त्यास डांस, ढेकूण वगैरे चावत असतात. (८) किंवा सभोंवतीं फार गोंगाट होत असतो.

वरील कारणांशिवाय जर मूल जागें असेल तर त्यास झोंप येत नाहीं असें समजावें. तें बहुतेक अशा वेळीं खेळत असतें किंवा कांहींतरी करीत असतें; नाहीं तर बिछान्यावर डोळे उघडे ठेवून पडून राहून आपल्याशींच कांहींतरी बोलत किंवा गुणगुणत असतें; किंवा त्यास एखाद्या खेळण्याची जरूरी असते. अशा स्थितींत मुलास तसेंच राहूं द्यावें. त्यास खेळणें पाहिजे असेल तर तें द्यावें. त्यास आपणांस कांहीं सांगावयाचें असेल तर तें ऐकावें व त्याची समजूत करून त्यास एकटेंच पडूं द्यावें. त्यास कधींहि रागें भरून झोंपी जाण्यास

सांगूं नये. कारण अशा वेळीं झोंप येणें त्याच्या हातांत नसतें. झोंप येण्याची क्रिया ही त्याच्या ताब्यांत नसलेल्या इतर शारीरिक क्रियांवर अवलंबून असते आणि तीवर त्यास ताबा चालवितां येत नाहीं. त्यास जेव्हां झोंप येऊं लागते तेव्हां तें निजतें, व अशी झोंप त्यास जेव्हां शारीरिक श्रमामुळें पुरेसा शीण येतो व त्याच्या रक्तामध्यें विशिष्ट प्रकारचा गुणधर्म येतो त्यावेळीं येऊं लागते आणि योग्य वेळीं त्याचा थकवा जाऊन त्याचें रक्त व पेशी ताज्यातवान्या झाल्या म्हणजे तें जागें होतें. इतकीच झोंप त्या मुलास आवश्यक असते व ही गोष्ट त्या मुलाच्या इच्छेवर अवलंबून नसते.

मुलास झोंप न येण्याचें कारण एखाद्या वेळेस एक तर त्यास लवकर निजावयास पाठविणें हें असेल किंवा तें जागें असतां त्यास पूर्णपणें यथेच्छ खेळूं–बागडूं दिलेलें नसावें, हें असेल. अशा वेळीं त्यास थोडा वेळ उशीरा निजावयास पाठवावें व त्यास थोडें खेळूं द्यावें.

**झोंपेची वेळ—**

मुलास अमुक एक तास झोंप अवश्य असते ही जुनी कल्पना चुकीची आहे व ती मुलाच्या हिताच्या दृष्टीनें बनविलेली नसून आईबापांच्या सोईकरितां बनविलेली आहे. लहान मुलास जितका वेळ प्रत्यक्ष झोंप लागेल तितकीच झोंप त्यास अवश्य असते. इतर झोंप न येण्याच्या कारणांवर योग्य ते उपाय योजण्यांत यावे. उदाहरणार्थ, मूल आजारी असल्यास त्यावर योग्य ते उपाय करावे. त्यास जरूर तितकें पांघरूण घालावें. त्याचें पोट साफ नसल्यास त्यास रेचक द्यावें, किंवा भूक लागली असल्यास अन्न व तहान लागली असल्यास पाणी द्यावें. डांस वगैरे चावत असल्यास ते नाहींसें करण्याची तजवीज

करावी. त्यास इजा वगैरे झाली असल्यास त्यावर मलम वगैरे लावावें आणि गोंगाट होत असल्यास तो बंद करावा.

**स्वप्नें—**

मुलास निजावयास जाण्यास भीति वाटण्याचें वास्तविक कांहीं कारण नसतें. सर्वसाधारण मुलास अशी भीति वाटत नाहीं व ज्या कांहीं मुलांस अशी भीति वाटते त्याचें कारण बहुधा त्यांस स्वप्नें वगैरे पडतील अशी भीति वाटत असते. एखाद्या मुलास कधीं कधीं भयंकर स्वप्नें पडतात व तें दचकून उठतें. सर्वसाधारण आरोग्यकारक स्थितींत असलेल्या मुलास कधींहि स्वप्नें पडून भीति वाटत नाहीं अगर तें कधीं झोंपेंतून दचकून उठतहि नाहीं. असें होण्याचें कारण मुलांत कांहीं दोष असला पाहिजे व असें वरचेवर होत असेल तर खात्रीनें कांहीं तरी बिघडलें आहे असें समजावें. अशी भीति वाटण्याचें कारण कदाचित् कांहीं शारीरिक असेल. उदाहरणार्थ, दांत येणें, श्वासोच्छ्वासास प्रतिबंध होणें किंवा अपचन होणें अशासारखें एखादें कारण असूं शकतें. तसेंच भयंकर स्वप्न पडण्याचें कारण मानसिकहि असूं शकतें व तें मुलाच्या मनावर विशेष दाब पडला असतां उत्पन्न होतें. अशा रीतीनें मुलास वरचेवर रात्रीं भीति वाटत असल्यास एखादा डॉक्टर किंवा मानसशास्त्रज्ञ यांचा सल्ला घेतला पाहिजे.

मुलास जर स्वप्नें पडत असतील अगर तें भीतीनें दचकून उठत असेल तर त्यास कोणतें स्वप्न पडलें अगर कसली भीति वाटते तें सांगण्यास सांगावें. त्यास या गोष्टी सविस्तरपणें सांगण्यास लावावें व त्यासंबंधीं बोलण्यास उत्तेजन द्यावें म्हणजे त्या गोष्टी त्याच्या मनांतून पूर्णपणें बाहेर पडतील. केव्हांहि त्या मुलाची अगर त्याला

पडलेल्या स्वप्नाची चेष्टा करूं नये किंवा त्यानें सांगितलेल्या गोष्टी कितीहि असंभाव्य असल्या तरी त्यांवर टीका करूं नये.

**अतृप्त इच्छा—**

सर्वसाधारण मुलास जीं स्वप्नें पडतात त्यांमध्यें त्याच्या अतृप्त इच्छा व्यक्त होतात. तें स्वप्नामध्यें एखादी बाग तयार करीत असतें, किंवा एखादा ससा, मांजर वगैरे प्राण्यास खाऊं घालीत असतें, किंवा आपल्या बाहुलीस जेवूं खाऊं वगैरे घालीत असतें. अशा वेळीं मुलास कोणती वस्तु पाहिजे आहे तें विचारून ती त्यास देण्याची व्यवस्था करावी. इतर त्याच्या कोणत्या इच्छा असतील तर त्या त्याच्याकडून काढून घेऊन त्या तृप्त होतील अशी व्यवस्था करावी. कधीं कधीं अशा स्वप्नांच्या मागें अशा इच्छा असतात कीं त्या समजावून घेतां येत नाहींत. जर आपण पूर्ण सहानुभूतीनें व समजूतदारपणानें वागलों तर लहान मुलांच्या स्वप्नापासून आपणांस पुष्कळच महत्त्वाची व उपयुक्त माहिती मिळूं शकते. अशा वेळीं स्वप्नांबद्दलची आपली वृत्ति उदासीन न ठेवितां त्यांचा योग्य तो उपयोग मुलांच्या बाबतींत करून घेतला पाहिजे. कधीं कधीं मुलाची एखादी इच्छा अतृप्त राहिल्यामुळें त्यास झोंपच येईनाशी होते. उदाहरणार्थ, घरांतच कांहीं मंडळी पाहुणी आली असून त्यांस द्यावयाच्या मेजवानींत भाग घेण्याची इच्छा मुलास असते किंवा कांहीं विशेष गोष्ट घडत असल्यास ती त्यास पाहावयाची असते. अशा वेळीं त्यास हजर राहूं द्यावयाचें नसल्यास तसें स्पष्ट सांगावें. मात्र त्याला कोणत्याहि आवाजापासून त्रास होणार नाहीं अशी व्यवस्था करावी. एखाद्या वेळीं आईबापांत रागाचे शब्द निघत असल्यास मुलास त्याबद्दल जिज्ञासा वाटून ते ऐकण्याकरितां तें जागें राहतें. अशा वेळीं आईबापांनीं मुलांसमोर रागावण्याचे प्रसंग टाळावे.

मुलास आपल्या आईबापांच्या अनेक गोष्टींबद्दल जिज्ञासा असते. याप्रमाणेंच तीं काय बोलतात, करतात याकडे मुलांचें नेहमीं लक्ष असतें.

याकरितांच मुलास निराळ्या खोलींत निजविण्याची आवश्यकता असते; व विशेषतः मुलांच्या खोलींत बाहेरचे कोणतेहि आवाज येणार नाहींत याची दक्षता घ्यावी लागते. तसेंच मुलांसमोर कोणत्याहि प्रेमाच्या अगर रागाच्या गोष्टी करणें इष्ट नसतें.

---

# प्रकरण तिसावें

# आजार व अपघात

## मुलाचें आरोग्य—

लहान मुलाची आपण कितीहि काळजी घेत असलों तरी मधून मधून केव्हां तरी त्याचें शरीरस्वास्थ्य बिघडून तें आजारी पडण्याचा संभव असतो. अशा वेळीं त्याची योग्य ती शुश्रूषा करणें व इतर तजविजी करणें अवश्य असतें. याकरितां कांहीं गोष्टींचें ज्ञान मातापित्यांस अवश्य आहे. म्हणून या प्रश्नाचाहि येथें थोडक्यांत विचार केला आहे.

तसेंच मुलास प्रसंगविशेषीं एखादा अपघात झाला तर घाबरून न जातां योग्य ती तजवीज करतां आली पाहिजे. याकरितां अशा वेळीं आईबापांनीं कसें वर्तन करावें हेंहि त्यांस माहीत असणें अवश्य आहे.

## आजार हा शत्रु आहे—

मूल आजारी पडलें तर तो आजार त्यास शांतपणें सहन करण्यास शिकवावें आणि त्या आजारास शत्रु समजून त्यास लवकर दूर करण्याची इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न करावी. तसेंच या शत्रूची हकालपट्टी लवकर व्हावी म्हणून वेळचे वेळेवर औषध घेणें व सांगितलेल्या गोष्टी नियमितपणें करणें व पथ्य सांभाळणें या गोष्टी आपणांस कांहीं काळ केल्याच पाहिजेत अशीहि त्याची समजूत करून द्यावी म्हणजे आजारीपणांतील कष्ट व गैरसोयी त्यास सुसह वाटतील. त्याप्रमाणेंच त्यास ज्या वस्तू पाहिजे असतील त्या प्रयत्न व श्रम करून त्यास मिळूं शकतील व कोणतीहि वस्तु त्यास मिळत नसली तर ती

प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न त्यानें कधींहि सोडूं नये, अशी त्याची समजूत करून द्यावी.

**घरांतील माणसांचें वर्तन—**

आपल्या घरांत येणाऱ्या माणसांनींहि मूल आजारी असतां त्यास त्रास होणार नाहीं अशाच तऱ्हेचें वर्तन ठेविलें पाहिजे, याबद्दल खबरदारी घेत जावी; आणि जे तसे वागणार नाहींत त्यांस घर सोडून जाण्यास सांगावें. आपल्या मुलाचें मानसिक आरोग्य हें औपचारिक गोष्टींपेक्षां अधिक महत्त्वाचें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. मुलास घेण्याकरितां वगैरे ठेवलेली दाई किंवा इतर नोकर चाकर यांनींहि असेंच वर्तन ठेविलें पाहिजे व तीं जर तसें न ठेवतील तर त्यांस काढून टाकलें पाहिजे. नाहीं तर आपण ज्याकरितां एवढी खटपट करीत असतों ती सर्व एखाद्या मोलकरणीच्या हलगर्जीपणामुळें व्यर्थ जाण्याचा संभव असतो.

**बालपणांतील दोष—**

जेव्हां एखादें मूल उशीरां चालूं लागतें, परंतु एकदां चालायला लागल्यावर बरोबर चालूं लागतें, त्याच्यामध्यें पुढें हीनभाव उत्पन्न होईल असें मानण्याचें कारण नाहीं. तथापि ज्या मुलांस लहानपणीं आपल्या सर्व गात्रांचा नीट उपयोग करतां येत नाहीं, त्यांस जरी त्यांची मानसिक वाढ झालेली असली तरी एक प्रकारचा अविश्वास उत्पन्न होतो; व त्यांस एक प्रकारची आपल्या पुढील आयुष्याबद्दल भीति वाटत असते. ज्या मुलांस लहानपणीं रिकेट्स् अथवा अस्थि-मार्दव रोग होतो तीं मुलें जरी बरीं झालीं तरी त्यांस कांहीं तरी त्या रोगाची खूण राहिलेली आढळते. उदाहरणार्थ, त्यांचे पाय वांकडे

होतात किंवा तीं बावळट होतात, त्यांचा कणा वांकलेला असतो किंवा सांधे दुर्बल असतात इत्यादि. त्यांच्या मनावरील आजारीपणांतील दुर्बलता नाहींशी झालेली नसते आणि त्यामुळें तीं थोडींशीं अनुत्साही होतात. याचा परिणाम दोन तऱ्हेचा होतो. एक त्यांना कोणतीहि प्रगति करण्याच्या प्रयत्नांस पुरेसा धीर वाटत नाहीं किंवा आपला शारीरिक दोष लपविण्यासाठीं तीं इतरांच्याहि पुढें जाण्याचा वाजवीपेक्षां अधिक प्रयत्न करतात; व त्यांस आपली परिस्थिति नीट ओळखण्याचें ज्ञान राहात नाहीं.

जीं मुलें खेळांत व कसरतींत वगैरे विशेष प्रावीण्य दाखवितात व विशेष महत्त्वाकांक्षी असतात, त्यांस इतर गोष्टींत पुढें येण्याची खात्री नसते व मागें राहण्याची तर त्यांची इच्छा नसते. जीं मुलें सर्वसाधारण जरुरीपेक्षां अधिक वाचतात त्यांस वाचनानें पुढें येण्याची महत्त्वाकांक्षा असते. हीं मुलें वस्तुस्थितीबद्दल साशंक असतात. पण कल्पना करण्यांत मात्र फार पुढें असतात. मुलांस कोणत्या गोष्टी आवडतात हेंहि पाहाण्यासारखें असतें. त्यांस कादंबऱ्या, यक्षिणींच्या गोष्टी, चरित्रें, प्रवासवृत्तें किंवा शास्त्रीय ग्रंथ यांपैकीं कोणतीं पुस्तकें वाचणें आवडतें यावरून त्यांच्या मनाचा कल कळून येतो.

**बालपणांतील मुलांची काळजी—**

केव्हां केव्हां मूल जन्मण्याच्या वेळीं त्याच्या जिभेचें टोंक व खालची टाळू यांच्यामध्यें एक पातळ पडदा जोडलेला आढळून येतो. तसा तो आढळल्यास डॉक्टरनें तावडतोब तो कापून टाकावा म्हणजे तोतरें बोलण्याची किंवा बोबडें वगैरे बोलण्याची संवय त्या मुलास लागणार नाहीं.

मूल दीड वर्षाचें होण्याच्या सुमारास त्याची टाळू भरून येते. तशी ती भरून न आल्यास त्यास अस्थिमार्दव रोग आहे असें समजावें. जर टाळू भरून येतांना मध्यें फुलीसारखा खड्डा राहिला तर हाच रोग पण जरा उशीरा सुरू झाला आहे असें समजावें व त्यावर योग्य तो उपचार करावा. टाळूच्या ठिकाणीं असणारा मृदु भाग नेहमीं खालींवर होत असतो. पण तो फार खोल किंवा फार वर असतां कामा नये. तसें असल्यास डॉक्टरकडून योग्य ती तजवीज करावी.

मुलास जर पडसें येऊन तांबडा शेंबूड येत असेल व पृष्ठभागावर वगैरे चट्टे असतील तर या गोष्टीकडे तावडतोब लक्ष देण्यांत यावें.

कांहीं मुलांस जन्मतःच कांहीं खुणा असतात. त्यांचेकडे तावडतोब लक्ष देऊन मुलांस त्यांचेपासून विशेष इजा होणार नाहीं तोंच त्या दुरुस्त कराव्या. त्यांवर इलाज केल्याशिवाय त्या बहुधा बऱ्या होत नाहींत.

मूल कोणतीहि गोष्ट स्पष्टपणें बोलूं शकतें किंवा नाहीं हेंहि पाहावें लागतें. कांहीं मुलें आपला कमीपणा झांकण्याकरितां मोठमोठ्या बाता व बढाया मारतांना आढळतात. कांहीं मुलें आपला कमीपणा झांकण्या-करितां बोलावयाचेंच टाळतात.

**अपघात—**

मुलास एखाद्यावेळीं अपघात झाला असतां एकदम घाबरून जाऊं नये. अगदीं शांत असावें. विशेषतः भीतीनें मुलास एकदम ओढून घेऊं नये. कारण अपघातांत हाड वगैरे मोडलें असतां त्यास इजा किंवा दुःख होण्याचा संभव असतो. निदान अशा वेळीं तें मूल घाबरून जातें. जर कोठें खरचटलें वगैरे असेल तर तो शरीराचा भाग स्वस्थ ठेवून त्यावर थंड

पाण्याची थोडें स्पिरिट मिसळून पट्टी बांधावी. जर जखम झाली असेल तर तो भाग गरम पाण्यानें धुऊन वर आयोडीन लावावें. आयोडिनमुळें आग होत नाहीं असें खोटेंच मुलास सांगूं नये. कारण त्यामुळें थोडीशी आग होते, पण ती फारच थोडा वेळ टिकते. नंतर पट्टी बांधून वर रक्त येणार नाहीं इतकें घट्ट बँडेज बांधावें. जर असें करून रक्त थांबलें नाहीं तर जखमेच्या वरच्या बाजूस घट्ट पट्टी बांधून डॉक्टरास बोलावणें पाठवावें. मुलास कधींहि हात धरून ओढूं नये. कारण त्यामुळें त्याच्या कोपरांतील अगर खांद्यांतील सांधा ढिला होण्याचा संभव असतो. मुलाचें हाड मोडलें असेल तर त्यास स्वस्थ निजवून तो शरीराचा भाग उशीनें वगैरे एका जागीं स्थिर राहील असा ठेवावा. मुलें कधीं कधीं कानांत किंवा नाकांत वाटाण्याचा दाणा, मणि वगैरे घालतात किंवा कधीं कधीं एखादा किडा आंत प्रवेश करतो. अशा वेळीं तो जर वरच समोर दिसत असेल तर चिमट्यानें काढून टाकावा; नाहीं तर डॉक्टरास बोलावून आणावें. अशा वेळीं मुलाची भीति प्रथम घालवावी व भिण्याचें कारण नाहीं असें त्यास स्पष्ट सांगावें. मुलानें जर एखादी वस्तु गिळली तर ती एकदम घशांतून खालीं जाते किंवा घशांतच अडकून राहते. ती घशाखालीं गेल्यास आपणांला मुळींच दिसून येणार नाहीं. तथापि केव्हां केव्हां मुलें प्रत्यक्ष न गिळतांच एखादी वस्तु आपण गिळून टाकली असें सांगतात. अशा वेळीं या गोष्टीचा नीट तपास करून त्यानें एखादी वस्तु खरीच गिळली आहे काय हें पाहावें. गिळलेली वस्तु जर लहान वाटोळी असेल तर तिच्यापासून कांहीं इजा न होतां ती तशीच बाहेर पडेल. साधारणतः एखादी वस्तु गिळून मुलास अपघात झाला आहे असें क्वचित् घडतें. यामुळें याकरितां फारसें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. जर गिळलेली वस्तु घशांत

अडकून राहिली असेल तर श्वास कोंडला जाईल. अशा वेळीं ताबड-तोब इलाज केला पाहिजे. मुलाचें तोंड एखाद्या पट्टीनें किंवा कानांच्या मागें दाबून उघडें ठेवावें; आणि जिभेच्या पाठीमागून आपलें बोट घशांत घालून तें वांकडें करून ती वस्तु काढून टाकावी. तशी निघाली नाहीं तर मुलास उलटें धरून त्याच्या छातीच्या उलट्या बाजूवर हळूहळू चापट्या माराव्या. अशा वेळीं मुलास लागेल वगैरे याची पर्वा करूं नये. कारण अशा प्रसंगीं मुलाचा जीव धोक्यांत असतो. मुलास जखम वगैरे झाली असतां स्वच्छ गरम पाण्याशिवाय तीवर कांहींहि लावूं नये. फार तर एखादें जंतुनाशक औषध किंवा आयो-डिन त्यांत घालावें; व त्यावर स्वच्छ कापडाची पट्टी बांधावी.

**औषधें हा अखेरचा उपाय—**

मुलास उठल्यासुटल्या औषध देत जाऊं नये. अगदीं अखेरचा इलाज म्हणून औषधें देत जावीं. मुलास कधींहि औषधांची संवय लावूं नये. सामान्यतः कोणत्याहि रोगाचें कारण नाहींसें करण्याचा प्रयत्न करावा. उदाहरणार्थ, मुलास अपचन होत असल्यास म्हणजे त्यास ढेकरा किंवा ओकारी वगैरे येत असल्यास त्याच्या अन्नामध्यें फरक करावा. त्याप्रमाणेंच बद्धकोष्ठ होत असल्यास अन्नामध्यें फरक केल्यानें काम होईल आणि तसें न झाल्यास त्याचा कोठा साफ करण्याचा प्रयत्न करावा. मुलास पडसें झाल्यास नाक स्वच्छ ठेवावें. तसेंच थंडी झाल्यास त्यास गरम कपडे वगैरे घालून विश्रांति द्यावी.

मुलास औषधें द्यावयाचीं झाल्यास फक्त सारक किंवा पाचक औषधें द्यावीं लागतात. सारक औषधें द्यावयाचीं झाल्यास एरंडेल, मॅग्नेशिया किंवा पातळ पॅरॅफिन वगैरे द्यावीं. तथापि वरचेवर सारक औषधें

दिलीं असतां बद्धकोष्ठता वाढण्याचाच संभव जास्त असतो. मुलास खोकला झाल्यास डॉक्टरनें सांगितल्याशिवाय औषध देऊं नये. जर खोकला विशेष झाला असून ताप आला असेल तर मुलास गरम कपडे देऊन निजवून ठेवावें. जर २४ तासांत ताप उतरला नाहीं तर डॉक्टरास बोलवावें. मुलाचा ताप उतरावा म्हणून त्यास औषध देऊं नये. त्यास विश्रांति देऊन पातळ अन्न खावयास द्यावें. लहान मुलास अफू किंवा ॲस्पिरिन् केव्हांहि देऊं नये.

याप्रमाणें सामान्य आजारामध्यें घ्यावयाची काळजी व अपघात वगैरे झाल्यास तावडतोब कसें वर्तन करावें यासंबंधीं त्रोटक माहिती येथें देण्यांत आली आहे. वास्तविक हा एक स्वतंत्र विषय असून त्यावर अनेक ग्रंथ आहेत. येथें फक्त या विषयाचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. सामान्यतः वर सांगितलेल्या प्राथमिक गोष्टी आईबापांनीं करणें इष्ट असून कमी जास्त वाटल्यास योग्य डॉक्टराचा सल्ला घेणें अवश्य आहे व तो शक्य तितका लवकर घेऊन त्याच्या सल्ल्याप्रमाणें प्रथम-पासून उपचार करीत गेल्यास मुलास बालपणांत केवळ दुर्लक्ष्य अगर हयगय झाल्यामुळें पुढें आयुष्यभर भोगाव्या लागणाऱ्या आपत्ती सहज वांचतील व या दृष्टीनें पालकांनीं आपली जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें वर्तन ठेवणें अवश्य आहे. अलीकडे बालमानसशास्त्रज्ञ व बालरोगचिकित्सक अधिकाधिक निष्णात होत आहेत व कांहीं देशां-तून सरकारहि या बाबतींत पालकांकरितां अनेक सवलती व सोयी करून देत आहे त्यांचा फायदा पालकांनीं घेणें हें त्यांचें महत्त्वाचें कर्तव्य आहे.

# प्रकरण एकतिसावें

# प्रौढ मुलांचें शिक्षण

**मुलांच्या स्वाभाविक शक्तींचें ज्ञान—**

आतांपर्यंत आपण लहान मुलांचें, विशेषतः पांच वर्षांपर्यंतच्या मुलांचें, संगोपन, संवर्धन व शिक्षण कसें करावें यासंबंधीं विचार केला. हें वय प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत फार महत्त्वाचें आहे, परंतु आतांपर्यंत या गोष्टीकडे फारच थोड्या लोकांचें लक्ष गेलेलें होतें. तथापि अलीकडे मानसशास्त्राचा अभ्यास जसजसा वाढत चालला व विशेषतः वैय्यक्तिक मानसविज्ञानाचें महत्त्व शास्त्रज्ञांस पटूं लागलें तसतसा या बाबतींत विशेष विचार व्हावयास लागला व प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या स्वाभाविक शक्तींचा व प्रवृत्तींचा विकास या बालवयांतच विशेष होतो व त्यावेळीं जें लहान मुलास वळण लागेल त्याचा त्याच्या पुढील सर्व आयुष्यावर परिणाम घडून येतो ही गोष्ट लक्षांत आली. यामुळें व्यक्तीचें जें व्यक्तिमत्त्व अथवा स्वभाव बनावयाचा तो याच काळांत बनत असल्यामुळें सर्व शिक्षणशास्त्रज्ञ आज या वयास फार महत्त्व देऊं लागले आहेत व आईबापांस व शिक्षकांस सल्ला देण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं मानसशास्त्रज्ञांचीं उपचार केन्द्रेंहि स्थापन होत आहेत. कांहीं देशांतून या बाबतींत सरकारकडूनच विशेष प्रयत्न चालू आहेत.

**स्वाभाविक प्रवृत्तींस उत्तेजन—**

अशा तऱ्हेनें लहान मुलाच्या अंगच्या साहजिक प्रवृत्तींचें योग्य तें ज्ञान झाल्यानंतर त्याच्यामधील सुप्त शक्ती कोणत्या प्रकारच्या आहेत

हें कळून आल्यानें त्यास कोणत्या दिशेनें इष्ट तें वळण लावावें व त्याच्या अंगांतील कोणत्या प्रवृत्तींस उत्तेजन दिलें असतां त्यास आपला भावी आयुष्यक्रम अधिकांत अधिक यशस्वी करतां येईल व त्याचा राष्ट्रास शक्य तितका अधिक उपयोग होईल हें माहीत होतें आणि त्या दिशेनें त्यास आवश्यक त्या विषयांचें शिक्षण देऊन त्याच्या उपजत शक्तींचा पूर्ण विकास करून घेतां येतो. याकरितां प्रत्येक मुलाचें या लहान वयांत योग्य निरीक्षण करून त्याच्या भावी आयुष्यक्रमाची दिशा ठरविणें हें पित्याचें अथवा पालकाचें कर्तव्य होय.

**त्यांस अनुसरून शिक्षण—**

अशी दिशा ठरल्यानंतर त्यास जरूर तें शिक्षण कसें देतां येईल हा त्याचे पुढील प्रश्न होय. या बाबतींत अर्थात् इतर अनेक गोष्टींचा संबंध येतो. त्यामध्यें विशिष्ट विषयांचें शिक्षण मिळण्याच्या सोयी, पित्याची सांपत्तिक स्थिति वगैरे गोष्टींचा विचार करावा लागेल. परंतु एकदां मुलाच्या स्वाभाविक प्रवृत्तींचें व त्याच्या अंगीं असलेल्या सुप्त शक्तींचें ज्ञान झाल्यावर त्यांचा योग्य विकास करणें हें मात्र त्याचें कर्तव्य ठरतें व त्याप्रमाणें त्यानें आपलें कर्तव्य आपल्या शक्तीप्रमाणें पार पाडलें पाहिजे.

एकदां मुलाच्या प्रवृत्ती कळून आल्यानंतर ज्याप्रमाणें साधनें व सांपत्तिक स्थिति अनुकूल असतील त्याप्रमाणें त्यास विशिष्ट विषयांचें शिक्षण देणें हें काम सोपें आहे. आज बहुतेक देशांत विशिष्ट शिक्षणाचीं स्वतंत्र विद्यालयें स्थापन होत आहेत व दिवसेंदिवस प्रत्येक बाबतीमध्यें विशेष शाखेमध्यें प्रगति होत आहे. अशा तऱ्हेनें प्रत्येक शास्त्राच्या अनेक शाखा पडून त्यास वैशिष्ट्य प्राप्त होत आहे व अशा

विशिष्ट शाखांमध्यें प्रावीण्य संपादन करणें अवश्य होऊं लागलें आहे. अशा तऱ्हेचें विशिष्ट शिक्षण मिळणें हें त्या त्या शाखेचीं विद्यालयें व उपलब्ध वाङ्मय यावर अवलंबून आहे.

परंतु या गोष्टी कोणत्याहि एका व्यक्तीच्या हातीं नसून राष्ट्राच्या अथवा शासनसंस्थेच्या हातांत असतात व याकरितां प्रत्येक राष्ट्रांतील धुरीणांनीं आपल्या भाषेचें व वाङ्मयाचें संवर्धन होऊन प्रत्येक शास्त्रांतील अनेक शाखांवर ग्रंथनिर्मिती होईल व त्या त्या विषयांचीं विद्यालयें स्थापन होतील या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे व या बाबतींत पित्याचें अथवा पालकाचें काम उपलब्ध असलेल्या साधनांचा आपल्या मुलास आपल्या परिस्थितीप्रमाणें शक्य तों अधिकांत अधिक उपयोग करून देणें हें आहे.

## विद्यार्थ्याचें कर्तव्य—

आतां अशा तऱ्हेच्या सवलतींचा व साधनांचा योग्य तो उपयोग करून घेणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें कर्तव्य आहे व आपल्या आवडीच्या विषयाच्या अभ्यासाची संधि व साधनें हीं पित्यानें उपलब्ध करून दिल्यानंतर आपल्या कर्तव्यांत हेळसांड न करतां आपल्या आयुष्याचा सदुपयोग करून घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर आहे. या बाबतींत पालक किंवा शिक्षक यांचें काम फक्त मार्गदर्शनाचें आहे. तें त्यांनीं योग्य प्रकारें केल्यानंतर स्वतःचा पूर्ण विकास करून घेणें हें प्रत्येक व्यक्तीच्या हातांत असून त्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवरच पडते व त्याबद्दल पित्यास अथवा पालकास कोणत्याहि प्रकारें जबाबदार धरतां येणार नाहीं.

**योग्य आयुष्यक्रम—**

मुलानें योग्य असा आयुष्यक्रम आचरावयाचा म्हटल्यास त्याचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें करतां येईल. त्याचें आचरण सुव्यवस्थित असलें पाहिजे. त्यास कांहीं तरी निश्चित असें धोरण अथवा दिशा असली पाहिजे. त्याच्यापुढें आयुष्यामध्यें साध्य करावयाचें कांहीं तरी ध्येय असलें पाहिजे. त्या आयुष्यक्रमांत स्वतःच्या ठिकाणीं असलेल्या सर्व शक्तींचा पूर्णपणें उपयोग करून घेतला पाहिजे. तसेंच त्याचें जिवन अगदीं साधें असलें पाहिजे, तें शांत असलें पाहिजे व सत्यास अनुसरून असलें पाहिजे.

कोणत्याहि मुलाच्या हातून कांहीं कार्य व्हावें अशी अपेक्षा असल्यास त्याच्या मनांत व्यवस्थितपणा, नियमबद्धता व हेतुपूर्णता या गोष्टींची जाणीव झाली पाहिजे. सर्व विश्वामध्यें कांहीं तरी सुव्यवस्थित अशी रचना आढळते व ती कांहीं नियमांनीं बद्ध असते व तीमध्यें कर्त्याचा कांहीं तरी हेतु असतो ही गोष्ट त्यास स्पष्ट झाली पाहिजे. याकरितां त्याच्या ठिकाणीं शिस्त व आज्ञाधारकता हे गुण बाणले पाहिजेत. त्यास एकंदर व्यवहार कांहीं तरी शिस्तीनें कसे चालत असतात व श्रेष्ठ पुरुष, वडील माणसें, शिक्षक वगैरेंबद्दल आदर दाखविणें किती अवश्य आहे हें त्याच्या मनावर बिंबावें लागतें. याप्रमाणेंच त्याच्या ठिकाणीं कांहीं तरी कल्पकता असणें जरूर असतें. चित्रकला, संगीत वगैरे विषयांत कल्पकतेचें जसें महत्त्व विशेषत्वानें दिसून येतें तसें तें इतरहि अनेक प्रकारच्या व्यवहारांत दिसून येतें. याच गुणामुळें जगामध्यें अनेक नवीन नवीन विचार, कार्यें व योजना यांचा प्रादुर्भाव होऊन मानव जातीची प्रगति घडून येते.

## प्रचलित शिक्षणक्रमांत सुधारणा—

प्रौढ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करीत असतां सध्या प्रचलित असलेल्या शिक्षणपद्धतीमध्यें सुधारणा होणें कोणकोणत्या बाबतींत अवश्य आहे तें नमूद करणें अगत्याचें आहे. त्याशिवाय या विषयाचें विवेचन पूर्ण होणार नाहीं.

कोणत्याहि राष्ट्राच्या ज्ञानाची कक्षा वाढवावयाची असेल तर त्या राष्ट्रांतील विद्यार्थ्यांचें व लोकांचें शिक्षण त्यांच्या मातृभाषेंतूनच होणें अवश्य आहे. सर्व जगाच्या उलट परकीय भाषेंतून शिक्षण देण्याचा उपक्रम जो या राष्ट्रांत चालू आहे व पाश्चात्यांचें अनिष्ट बाबतींतहि अन्ध अनुकरण अथवा स्तुतिगायन करणारांनीं पुरस्कारिला आहे तो अजीबात बंद झाला पाहिजे. त्याशिवाय राष्ट्रांतील सर्वसामान्य जनतेच्या ज्ञानाची पातळी कधींहि वाढणार नाहीं. तसेंच वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत जर ज्ञान पाझरत यावयास पाहिजे असेल तर तें मातृभाषेंतूनच शक्य होईल व सुशिक्षित व अशिक्षित हे जे दोन स्पष्ट थर आज आपल्या देशांत दृष्टीस पडतात ते नाहींसे होऊन साक्षरतेबरोबरच ज्ञानाची कक्षा सामान्य लोकांचीहि वाढत जाईल. अर्थात् याकरितां मातृभाषेंतून अनेक विषयांवरील ग्रंथ व वाङ्मय तयार झालें पाहिजे व तें समाजांतील सर्व लोकांस सुलभतेनें मिळूं शकलें पाहिजे.

त्याप्रमाणेंच हल्लीं जो एकच चाकोरीचा शिक्षणाचा मार्ग आहे तो अधिक विस्तृत झाला पाहिजे. इंग्रजी भाषेच्या ज्ञानावर सर्वस्वी अवलंबून असलेली व एकमेव विद्यापीठाची परीक्षा ही सर्व ज्ञानकक्षांच्या प्रवेशद्वारावरील मोठी आडकाठी दूर झाली पाहिजे. केवळ कारकुनी

व मास्तरकीलाच उपयोगी पडतील असे जे शिक्षणक्रम आज आंख-लेले दृष्टीस पडतात ते बदलून अभ्यासक्रम अधिक व्यापक, अनेक विषयांत नवीन नवीन संशोधन करण्यास उपयुक्त व विशेषतः व्यव-हारांतील अनेक अंगांस उपयुक्त होतील व नवीन नवीन शास्त्रीय व इतर संशोधनाचा व्यवहारांत उपयोग करून घेतां येईल अशा प्रकारचे आंखले गेले पाहिजेत.

विद्यापीठ हें केवळ ठराविक किंमत घेऊन प्रमाणपत्रकें विकण्याचें दुकान न राहतां ज्ञानसंवर्धनाचें आणि निरनिराळ्या शास्त्रांतील व कलां-तील उच्च ज्ञान व संशोधन विद्यार्थ्यांच्या कक्षेंत आणून देणारें व अनेक शास्त्रांत व कलांत संशोधन करण्याच्या सोयी उपलब्ध करून, उच्च विद्यार्जनाच्या कामीं खरोखर मार्गदर्शक असें बनलें पाहिजे.

**विविध शिक्षणक्रम—**

तसेंच सर्वच विद्यार्थ्यांच्या किमान बुद्धिमापनाचें साधन जें एकमेव विद्यापीठाची प्रवेश परीक्षा हेंच बनून राहिलें आहे ती परिस्थिति बदलून नवीन व्यावसायिक व इतर शिक्षणाचा उपक्रम करण्यांत आला पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांस ठराविक सांचाच्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत प्रगति करतां येत नसेल त्यांस प्रारंभींच त्यांच्या कार्यक्षमतेस व बुद्धीस अनुरूप अशा इतर व्यवसायांचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे म्हणजे विनाकारण विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेशीं टक्कर देत बसण्यांत त्यांचा जो कालापव्यय होतो तो वांचून शिवाय त्यांची यामुळें जी निरुत्साही वृत्ति होण्याचा संभव असतो तोहि टळेल.

याकरितां अनेक व्यावसायिक शिक्षणक्रम विद्यार्थ्यांच्या सुमारें १५ वर्षेपर्यंतच्या वयांत त्यांस घेतां येतील असे सुरू करून त्यांची निर-

निराळ्या दिशांनीं प्रगति घडवून आणण्याची तजवीज राष्ट्रांतील शिक्षणाबद्दल जबाबदार असलेल्या व्यक्तींनीं केली पाहिजे. जोंपर्यंत हें कार्य शासनसंस्थेकडून होणार नाहीं तोंपर्यंत खासगी संस्थांनीं तें अंगावर घेतलें पाहिजे व एकाच क्षेत्रांत गर्दी करण्यापेक्षां नवीं नवीं क्षेत्रें या शिक्षणाच्या कार्यांतच शोधून काढून नवे नवे उपक्रम करण्याकडे समाजधुरीणांनीं लक्ष्य पुरविलें पाहिजे.

बडोदें येथील कलाभुवनामध्यें प्रारंभीं मराठींतूनच शिक्षण घेतलेले व सामान्यत: विद्यापीठाच्या परीक्षांकडे जाण्यास अयोग्य म्हणून मानण्यांत आलेले किती तरी विद्यार्थी पुढें उत्तम विणकाम किंवा रंगकलाप्रवीण अथवा यंत्रशिल्पज्ञ म्हणून पुढें आलेले आहेत. उदाहरणच द्यावयाचें तर भिवंडी येथील प्रसिद्ध लोखंडी यंत्रांचे कारखानदार श्री. जी. जी. दांडेकर यांचें देतां येईल.

अशा तऱ्हेनें ज्याची बुद्धि एका क्षेत्रांत चालत नसेल त्यास त्याच्या बुद्धीच्या कलाच्या अनुरूप जर दुसऱ्या योग्य क्षेत्रांत घातलें व तसें शिक्षण दिलें तर त्या क्षेत्रांत तो यशस्वी होण्याचा बराच संभव असतो ही गोष्ट ध्यानांत घेऊन अनेक विविध प्रकारचे व निरनिराळ्या वयाच्या व बुद्धिमानाच्या विद्यार्थ्यांस झेंपतील असे जर शिक्षणक्रम आंखण्याची तजवीज करण्यांत आली व सर्व शिक्षण मातृभाषेंतून देण्याची तजवीज झाली तर ज्यास जडबुद्धि म्हणतां येईल असा मनुष्य सांपडणें बहुतेक विरळाच घडून येईल व सर्व राष्ट्रांतील व्यक्तींचा राष्ट्राच्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत उपयोग करून घेतां येईल.

## व्यवसायाची निवड—

मुलानें कोणता व्यवसाय पत्करावयाचा हाहि एक महत्त्वाचा प्रश्न असतो. कारण या बाबतींत त्याच्या सभोंवतालची परिस्थिति, त्याच्या ठिकाणीं असलेला आत्मविश्वास व धैर्य आणि त्याची सामाजिक प्रवृत्ति या सर्व गोष्टींचा परिणाम त्याचेवर होत असतो. मुलास त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींस अनुरूप असा व्यवसाय मिळाल्यास त्यामध्यें त्यास आनंद वाटून आपल्या कार्यांत त्यास नेहमीं उत्साह राहील. तसेंच त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींचाहि अनुकूल वातावरणांत योग्य तो विकास होऊन त्याची कार्यक्षमता अधिकाधिक वाढत जाईल. यामुळें पुढें तो आपल्या व्यवसायांत एक यशस्वी व्यक्ति म्हणून मानाचें स्थान मिळवील. परंतु तोच जर त्यास आपल्या मानसिक प्रवृत्तींच्या विरुद्ध किंवा त्यांशीं विसंगत असा व्यवसाय मिळाला तर तो करण्यामध्यें त्याला पुरेसा उत्साह वाटणार नाहीं, किंबहुना त्याच्या ठिकाणीं पुरेसा आत्मविश्वास उत्पन्न होणार नाहीं. त्यामुळें त्याच्या अंगच्या कार्यप्रवृत्तीस योग्य चालना मिळण्याऐवजीं एक प्रकारची निरुत्साही व हीन भावाची वृत्ती त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होईल. त्याचें मन त्या व्यवसायांत रमणार नाहीं व त्यामुळें स्वाभाविकच त्याचें त्या व्यवसायाकडे दुर्लक्ष होत जाईल व आपलें मन गुंतविण्याकरितां किंवा निदान थारेपालट म्हणून तो भलत्याच गोष्टींकडे आपली दृष्टि वळवील; किंवा अन्य मार्गानें आपल्या मनाचें समाधान करून घेऊं लागेल. कदाचित् त्यास अनुचित असा एखादा नाद अथवा व्यसन लागण्याचाहि संभव उत्पन्न होईल.

अशा तऱ्हेचे कांहीं लोक एका व्यवसायांत योग्य प्रगति होत नाहीं असें दिसून आल्यास आपला व्यवसाय वरचेवर बदलूं लागतील.

यामुळें त्यांच्या आयुष्यांत त्यांस स्थैर्य प्राप्त होणार नाहीं व त्यांच्या मनास शांतीचाहि लाभ मिळणार नाहीं. तसेंच वरचेवर धंदा बदलीत गेल्यामुळें कोणताच व्यवसाय त्यांस यशस्वीपणें करतां येणार नाहीं व एकंदरींत त्यांचें आयुष्य असमाधानकारक रीतीनें व कदाचित् दुःखांत जाण्याचा संभव उत्पन्न होईल.

## आनुवंशिक व्यवसाय—

अनेक लोकांस आपल्या मुलांनीं आपलाच व्यवसाय पुढें चालवावा असें वाटत असतें, परंतु आनुवंशिक दृष्ट्या कांहीं कुटुंबांमध्यें कांहीं परंपरा जरी दीर्घकाल चालत असल्या तरी सर्वांशीनीं ही गोष्ट हटकून घडून येतेच असें नाहीं. कांहीं धंद्यांत ती दृष्टीस पडते हें आपण मागें पाहिलेंच आहे, पण ते धंदे बहुधा कलाकौशल्याचे, कारागिरीचे वगैरे असतात. कांहीं मुलांच्या स्वाभाविक प्रवृत्ती परंपरेच्या विरुद्ध किंवा निदान थोड्या फार प्रतिकूल किंवा दूर असण्याचा संभव असतो. तसेंच आनुवंशिकतेमध्यें पित्याप्रमाणें मातेचाहि अंश असतो व तीं जर भिन्न प्रकृतीचीं असतील तर त्याचा परिणाम मुलांच्या बाबतींतहि झाल्याशिवाय राहणार नाहीं. याखेरीज वैद्यकी, कायदेपांडित्य, विशिष्ट शास्त्राचा अभ्यास वगैरे गोष्टींमध्यें वैयक्तिक गुणावगुणांचा व बौद्धिक सामर्थ्याचा फार मोठा अंश असतो व अशा व्यवसायांतील यश वैयक्तिक गुणांवरच विशेषतः अवलंबून असतें. सावकाराच्या पेढीचीं किंवा इतर व्यापारांतील दुकानांचीं किंवा व्यवसायांतील कुळें ज्याप्रमाणें त्याच पेढीस किंवा दुकानास मालक बदलला तरी दीर्घकाल चिकटून राहतील त्याप्रमाणें वकिलाचीं किंवा डॉक्टराचीं कुळें त्याच्या मुलाकडे तो त्याच व्यवसायांत पडला तरी चिकटून राहतीलच असें नाहीं. हे धंदे विशेषतः वैयक्तिक बुद्धिमत्तेवर व अनुभविक ज्ञानावर चाललेले अस-

तात. तसेंच वकिलाच्या मुलाची कायद्याच्या ज्ञानाकडे किंवा डॉक्टराच्या मुलाची वैद्यकीय ज्ञानाकडे अगदीं अवश्यमेव प्रवृत्ति असेल असेंहि नाहीं. याकरितां मुलाच्या स्वाभाविक प्रवृत्तींचें ज्ञान प्रथम करून घेऊन त्याच्या मनाचा कल किंवा त्याची वृत्ति कोणत्या गोष्टींकडे अधिक स्वाभाविकपणें जाते हें पाहूनच त्याचें शिक्षण व व्यवसाय हीं असलीं पाहिजेत; तरच त्याच्या स्वाभाविक गुणांचा योग्य विकास होऊन त्याचें आयुष्य यशस्वी होईल. एखादा मनुष्य चांगला वकील किंवा डॉक्टर होऊं शकला नाहीं तरी उत्तम स्थापत्यशास्त्रज्ञ, किंवा यंत्रशास्त्रज्ञ, अथवा उत्तम कारागीर, चित्रकार, संगीतज्ञ किंवा सैनिक, व्यायामपटु वगैरे होण्याचा संभव आहे. मात्र त्याची मानसिक प्रवृत्ति वेळेवर ओळखून त्याला त्या त्या व्यवसायाचें शिक्षण मिळालें पाहिजे.

आपल्या मध्यम वर्गांत सरकारी नोकरी किंवा कमी अधिक दर्ज्याची कारकुनी करण्याकडे गेल्या एकदोन पिढ्यांची प्रवृत्ति फारच वाढली होती व नोकरी सोडतांना आपल्या मुलास चिकटवून देण्याची इच्छा बहुतेक सेवानिवृत्त होणाऱ्या पालकांची असल्याचें दृष्टीस पडतें. याप्रमाणें वंशपरंपरेनें ही गुलामी वृत्ति चालविण्याचें व्रतच जणूं कांहीं लोकांनीं घेतलेलें दिसतें व आपल्यांत प्रचलित असलेल्या ‘ उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी ’ या म्हणीचा अगदीं विपर्यास झालेला आढळतो. परंतु या ठिकाणीं ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं, सभोंवतालची परिस्थिति ज्याप्रमाणें बदलत जाईल त्याप्रमाणें आपल्या आयुष्यक्रमास वळण लावणें इष्ट असतें व त्या परिस्थितीस अनुसरून राष्ट्रापुढें व राष्ट्रांतील प्रत्येक नागरिकापुढें ध्येय असलें पाहिजे. याकरितां तशा प्रकारची वृत्ति प्रत्येक सुबुद्ध व्यक्तींत उत्पन्न होऊन नवीन

पिढीमध्येंहि तशीच वृत्ति उत्पन्न झाली पाहिजे. तशी ती मुलांमध्यें उत्पन्न होईल व वाढीस लागेल अशी काळजी प्रत्येक व्यक्तीनें घेतली पाहिजे व राष्ट्राच्या प्रत्येक भावी नागरिकास आपल्या ठिकाणीं असलेल्या सुप्त शक्तींचा योग्य विकास होईल असें कार्यक्षेत्र व व्यवसाय स्वतः स्वतंत्रपणें निवडणें व तो आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें चालविणें शक्य होईल अशी तजवीज करणें अवश्य आहे. निदान प्रत्येक आईबापानें व पालकानें आपल्या स्वाधीन असलेल्या बालकाचें आयुष्य अशा दृष्टीनें त्याच्या मनोवृत्तींस व बुद्धिमत्तेस अनुरूप अशा मार्गानें व अशा कार्यक्षेत्रांतच यशस्वी रीतीनें त्यास वालवितां येईल अशी त्याची पूर्वतयारी करून देणें हें त्याचें त्याच्या अपत्याच्या व राष्ट्राच्या कल्याणाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य असें कर्तव्य आहे व ही आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्याच्या कामीं त्यांनीं यत्किंचितहि कसूर करतां कामा नये.

**मानवजातीचें वर्गीकरण—**

आर्यतत्त्ववेत्त्यांनीं मानवजातीपुढें मुख्य चार प्रकारचीं कार्यें असतात असें धरून त्यांची चातुर्वर्ण्यामध्यें विभागणी केली आहे व त्यास अनुक्रमें ( १ ) ब्राह्मण–अध्ययन, अध्यापन; ( २ ) क्षत्रिय–बलसंवर्धन व संरक्षण; ( ३ ) वैश्य–व्यापार व धनसमृद्धि व ( ४ ) शूद्र–राष्ट्रसेवाधर्म अशीं नांवें व कार्यें वांटून दिलीं आहेत. रस्किननें राज्यांतील लोकांचे पांच वर्ग कल्पिले आहेत. ( १ ) सैनिक–संरक्षण. ( २ ) उपाध्याय किंवा धर्मोपदेशक–शिक्षण. ( ३ ) वैद्य–आरोग्यसंवर्धन. ( ४ ) न्यायशास्त्री–न्यायदान. ( ५ ) वैश्य–धनसंवर्धन. या पांच वर्गांनीं राष्ट्रसंवर्धनाकरितां आपापलें कर्तव्य करावयाचें असून तें करीत असतांना

कर्तव्यच्युत होण्याच्या ऐवजीं मरणहि पत्करलें पाहिजे असा त्याचा कटाक्ष होता.

याप्रमाणें कोणतेंहि वर्गीकरण घेतलें तरी राष्ट्रास वरील प्रकारच्या निरानिराळ्या वर्गांतील नागरिकांची आवश्यकता असते व त्याप्रमाणें ज्या व्यक्तीच्या ठिकाणीं यांतील विशिष्ट वर्गाचे गुण असतील त्या व्यक्तीस त्या विशिष्ट वर्गास अनुरूप असें शिक्षण मिळण्याची व त्या दृष्टीनें त्याची वाढ होत जाईल अशी काळजी घेण्याची जबाबदारी त्या राष्ट्रांतील शासन-संस्थेवर, सुविद्य अशा नेतृवर्गावर व मुलांच्या आईबापांवर, पालकांवर व शिक्षक वर्गावर आहे ही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें आपापलें कर्तव्य बजावलें पाहिजे; आणि याप्रमाणें तें योग्य प्रकारें बजावलें गेल्यास त्या राष्ट्राचा अभ्युदय अवश्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

येथें वरील वर्गीकरणांत प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र रीतीनें विचार केला पाहिजे. तेथें वंश, जात, कुल वगैरे गोष्टींस थारा न देतां प्रत्येक व्यक्ति ही एक राष्ट्राची घटक म्हणून तिच्या स्वाभाविक व मानसिक प्रवृत्तीस अनुसरून तिची व तिच्याठायीं असलेल्या गुणांची जोपासना, संवर्धन व विकास झाला पाहिजे.

**व्यक्तीच्या ठिकाणीं आवश्यक गुण—**

प्रत्येक व्यक्ति ही एक आपल्या राष्ट्राचा नागरिक व्हावयाची असते. त्याकरितां प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं कांहीं विशेष गुण अवश्य असले पाहिजेत. अशा व्यक्तीच्या ठिकाणीं प्रथम आपण आपल्या कुटुंबाचे एक घटक आहोंत ही जाणीव असली पाहिजे. त्यानंतर आपलें गांव, आपला प्रान्त, आपली शिक्षणसंस्था वगैरे संबंधीं त्याच्या मनांत

आपलेपणा उत्पन्न झाला पाहिजे. यानंतर आपण ज्या राष्ट्राचे नागरिक असूं त्या राष्ट्राबद्दलहि आपणास अभिमान वाटला पाहिजे. याकरितां पुढील वृत्ती मनुष्यामध्यें जागृत झाल्या पाहिजेत.

( १ ) स्वदेशाभिमान – या वृत्तीमुळें मनुष्यास आपल्या राष्ट्रासंबंधीं आदर वाटून इतर देशांबद्दलहि बंधुभाव वाटला पाहिजे.

( २ ) स्वाभिमान – याच्या पोटांत आपली जन्मभूमि, आपला राजा किंवा शासनसंस्था, आपला धर्म, आपलें राष्ट्र यांबद्दल विशेष आदर मनामध्यें ठेवून इतरांशीं वर्तणूक करीत असतांना त्यामध्यें कोणताहि कमीपणा येणार नाहीं व आपली प्रतिष्ठा कायम राहील अशी सावधानता बाळगण्याची वृत्ति उत्पन्न झाली पाहिजे.

( ३ ) सेवावृत्ति – या वृत्तीच्या अनुषंगानें आपलें नागरिकत्वाचें कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी मनुष्यामध्यें उत्पन्न झाली पाहिजे. याकरितां आपलें व आपल्या राष्ट्राचें आरोग्य व ऐश्वर्य कायम राखणें, आपल्या देशाकरितां वेळेकर पडेल तें काम करणें, आपल्या देशी उद्योगधंद्यांना मदत करणें व सार्वराष्ट्रीय व्यवहारांत आपली जबाबदारी ओळखून ती पार पाडणें व याकरितां जरूर तो त्याग करावयास तयार असणें या गोष्टी अंतर्भूत होतात.

**विशिष्ट गोष्टींकडे लक्ष्य देणें अवश्य—**

वरील प्रकारची जबाबदारी पार पाडण्याकरितां प्रत्येक व्यक्तीनें आपल्या स्वतःच्या बाबतींत पुढील गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

( १ ) वैय्यक्तिक आरोग्य व शरीराची सुदृढता. ( २ ) आपल्या सभोंवतालची परिस्थिति व तीस आपल्यास अनुकूल असें द्यावयाचें

स्वरूप. ( ३ ) योग्य तऱ्हेचें शिक्षण. ( ४ ) जरूर तेवढी विश्रांति व त्या विश्रांतीचा अन्य व्यापार करण्यांत जरूर तो उपयोग. ( ५ ) योग्य तऱ्हेची सर्व कार्यक्षेत्रांत संधि अथवा सवड. ( ६ ) योग्य तऱ्हेचा व्यवसाय. ( ७ ) अवश्य तें संरक्षण, व त्याची शारीरिक व इतर प्रकारें तरतूद.

या गोष्टी समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें साध्य केल्यास त्या समाजाची उन्नति झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## प्रत्येक राष्ट्राचें वैशिष्ट्य—

अनेक विषयांचा अभ्यास करीत असतां प्रत्येक व्यक्तीनें आपला मानसिक विकास कसा होत जाईल इकडे लक्ष दिलें पाहिजे व केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षां सांस्कृतिक व मानसिक विकासाकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. उदाहरणार्थ, निरनिराळ्या देशांचा इतिहास अथवा भूगोल यांचा अभ्यास करीत असतां प्रत्येक देशाचें सांस्कृतिक वैशिष्ट्य काय या दृष्टीनें निरनिराळ्या देशांची माहिती मिळवून अभ्यास केला पाहिजे. उदाहरणार्थ, आपणांस पुढील वैशिष्ट्यें बरींच उद्-बोधक वाटतील व त्यांचा आपल्या स्वतःच्या मानसिक विकासाच्या दृष्टीनें आपणांस उपयोग करतां येईल व असे अनेक भिन्न गुण आपल्या राष्ट्रांतील तरुणांच्या अंगीं कसे उत्पन्न होतील या गोष्टीचा आपल्या राष्ट्रधुरीणांस व समाजनेत्यांस विचार करतां येईल.

हिंदुस्थान–.आर्य अथवा भारतीय संस्कृति आणि तींतील आध्या-त्मिक उन्नति.

इटली– उच्च पाश्चात्त्य संस्कृति व स्वातंत्र्यप्रीति.

फ्रान्स– भावना व बुद्धिप्रधान तेज आणि व्यक्तिमत्त्व व व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना.

जर्मनी– शिस्त आणि परमोच्चता गांठण्याची मानसिक तयारी.

हॉलंड– व्यवहारकुशलता व व्यावहारिक ध्येयात्मक प्रवृत्ति.

इंग्लंड– कायदा, व्यवस्था व परंपरा यांबद्दल आदर आणि बुद्धिप्रधान व्यावसायिक नीति व व्यवहार.

बेल्जम– स्वातंत्र्य व उद्योगप्रियता.

स्पेन व पोर्तुगाल– स्वातंत्र्य व साहसप्रियता.

अमेरिका– नावीन्यप्रियता व प्रगतिपर ध्येयप्रवृत्ति.

जपान– स्वातंत्र्य व परंपराप्रियता याबरोबरच नावीन्य व उद्योगप्रियता.

# प्रकरण बत्तिसावें

# माता व अपत्यसंगोपन

**मातेचें महत्त्व—**

कुटुंबामध्यें पित्याइतकेंच किंबहुना पित्यापेक्षांहि कांहीं बाबतींत अधिक महत्त्वाचें मातेचें स्थान असतें. माता आणि अपत्य यांचा संबंध अतिशयच निकटचा असतो व पित्याचा त्या मानानें दूरान्वित असतो ही गोष्ट आपण पूर्वीं एकदा उल्लेखिलीच आहे. किंबहुना मातृसत्ताक पद्धति हीच समाजाची अधिक प्राथमिक अवस्था असून पितृसत्ताक पद्धति ही नंतर परिणत झाली असली पाहिजे ही गोष्टहि आपण मागें पाहिलीच आहे. यावरून अपत्यसंवर्धनाच्या कामीं मातेवर केवढी जबाबदारी असते ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येईल. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धरी' या अगदीं प्रत्येकाच्या तोंडीं असलेल्या सामान्य म्हणीमध्येंहि ही कल्पना व्यक्त केलेली आढळते. बालकाच्या मनावर जे संस्कार अत्यंत लहानपणीं घडून येतात ते चिरकालिक असतात. आजपर्यंत ज्या मोठमोठाल्या व्यक्ती होऊन गेल्याचें आढळतें त्यांमध्यें मातेनें बालपणांत ज्या गुणांचें बीज मुलांच्या ठिकाणीं पेरलें होतें त्यांचा विकास होऊनच पुढें त्या मुलांस महत्त्व आलेलें आपणांस दिसून येतें. प्रसिद्ध जगज्जेता अलेक्झांडर हा आपल्या मातेस याचकरितां अतिशय पूज्य मानीत असे व तिच्या विरुद्ध केलेल्या तक्रारींच्या पत्राबद्दल त्यानें असे उद्गार काढले होते कीं, 'माझ्या मातेचा एक अश्रु अशीं शेंकडों पत्रें पुसून टाकण्यास पुरेसा आहे.' शिवाजीची

स्वातंत्र्यस्फूर्ति त्यास जिजाबाईपासूनच विशेष मिळाली होती, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. कुंतीलाहि एक आदर्श माता मानण्यांत येतें. नेपोलियन हाहि मातृभक्त होता असें सांगतात. अशा तऱ्हेचीं अनेक उदाहरणें देतां येतील कीं ज्यांमध्यें मातेनें बालपणांत लावलेल्या वळणामुळें त्यांच्या मुलांचें आयुष्य मोठमोठीं कार्यें करण्यांत व आपल्या राष्ट्राचें वैभव वाढविण्यांत खर्च झालें.

**संस्कारक्षमता—**

बालवयांत मुलांचें मन अतिशय संस्कारक्षम असून प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीचा व घटनेचा त्याच्या मनावर परिणाम होत असतो. तेव्हां अशा वयांत त्याच्या डोळ्यांपुढें आदर्श चारित्र्याच्या व्यक्ती व त्यांचें आचरण सतत असल्यास त्यांचें अनुकरण करून त्यांच्यासारखें व्हावेंसें त्यास वाटणें साहजिक आहे. अशाकरितां मुलांच्यापुढें उत्कृष्ट व्यक्तींचीं चरित्रें असणें हें फार उपकारक आहे.

बालपणांत मुलांचा कोणत्या व्यक्तींशीं अथवा घटनांशीं संबंध येऊं द्यावयाचा ही गोष्ट जितकी मातेच्या हातांत असते तितकी इतरांच्या हातांत नसते. तीमुळें बालकाच्या सभोंवतीं जी परिस्थिति निर्माण करावयाची तिची जबाबदारी मातेवरच अधिक असते.

**आरोग्याचें महत्त्व—**

'निरोगी शरीरांत निरोगी मन असतें' या न्यायानें लहान मुलाच्या आरोग्याची काळजी घेणें हेंहि मातेचें एक महत्त्वाचें कर्तव्य असतें. याकरितां तिला स्वतःच्या आरोग्याचीहि काळजी घेणें अवश्य असतें. मुलाच्या प्रकृतींत किंचितहि बिघाड झाल्यास तें मातेच्या लक्षांत अधिक लवकर येतें व त्यावर उपाययोजनाहि करणें तिला अधिक

सुलभ असतें. वारंवार आजारी पडणारें मूल चिडखोर, हट्टी वगैरे बनून त्याच्या स्वभावास प्रथमपासूनच अनिष्ट वळण लागतें. तसें न होऊं देण्याची जबाबदारी आईवरच मुख्यतः असते. मुलास नेहमीं घरांतच कोंडून ठेवण्यापेक्षां त्यास स्वच्छ हवा व मोकळ्या हवेंत खेळण्यास व फिरण्यास मिळेल या गोष्टीची काळजी जितकी आईस घेतां येईल तितकी बापास घेतां येणार नाहीं. तसेंच त्याचे कपडे, खेळणीं वगैरे-कडेहि माताच अधिक लक्ष देऊं शकेल.

## अपत्यसंवर्धन शिक्षण—

अपत्यसंवर्धन हें एक आतां शास्त्र बनलें आहे व त्याचें शिक्षण घेणें हें प्रत्येक मातेचें कर्तव्य आहे. तसेंच पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती-मुळें जो वृद्ध मनुष्यांच्या अनुभवाचा व सहकार्याचा कांहीं फायदा पूर्वीच्या कुटुंबांस मिळत असे तोहि अलिकडे मिळत नाहींसा झाला आहे. वैय्यक्तिक कुटुंबपद्धति दिवसेंदिवस अधिकाधिक प्रचलित होत असून मातापिता यांवरच प्रत्यक्षतः अपत्यसंवर्धनाची जबाबदारी पूर्ण-पणें पडूं लागली आहे. यामुळें मुलाकडे जितकें लक्ष द्यावयास पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतींत वेळ मिळत असे तितका आपले व्यवसाय संभा-ळून आईबापांस कितपत देतां येईल याबद्दलहि शंकाच आहे. या-करितां सार्वजनिक सोईचा जितका फायदा त्यांस घेतां येईल तितका त्यांनीं घेतला पाहिजे व जें सहकार्य पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीनें लाभत असे तें अर्वाचीन काळीं सार्वजनिक संस्थांच्या रूपानें साधलें पाहिजे. अशा रीतीनें अपत्यसंगोपनाचें ज्ञान देणाऱ्या संस्था, प्रत्यक्ष लहान मुलांस शिक्षण देणाऱ्या संस्था, मुलांच्या आरोग्यसंवर्धनाचें कार्य करणाऱ्या संस्था, मुलांचीं क्रीडांगणें, उपवनें वगैरे उपलब्ध करून

देणाऱ्या संस्था यांच्या सहकार्यानें ही जबाबदारी आईबापांनीं पार पाडली पाहिजे.

रशियामध्यें शासनसंस्था हीच बालसंवर्धनाची जबाबदारी आपल्या अंगावर पूर्णपणें घेत आहे व मूल जन्मल्यापासून तें राष्ट्राचें एक नागरिक म्हणून मानलें जात आहे व त्या दृष्टीनें त्याचें संवर्धन करून त्यास कार्यक्षम बनविण्याची जबाबदारी शासनसंस्थेवरच पडत आहे. परंतु तशी सोय इतर देशांत नसल्यामुळें व गृहसंस्था हीच राष्ट्राचा पाया मानण्याची प्रवृत्ति इतर सर्व राष्ट्रांमध्यें वसत असल्यामुळें अशा गृहांतील गृहदेवता जी माता तिनें ही आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

**सापत्न माता—**

कुटुंबामध्यें सापत्न माता व मुलें यांचा योगायोग ही एक अनेकदां अपरिहार्य परंतु विलक्षण अशी घटना आहे. अशा परिस्थितींत वस्तुतः व्यक्तिशः कोणाचाहि दोष नसला व व्यक्तीनें आपणांकडून कितीहि काळजी घेतली तरी कांहीं गोष्टींबद्दल गैरसमज व अनिष्ट असे प्रसंग उत्पन्न होणें अनेक वेळां अपरिहार्य असतें. सापत्न मातेबद्दल एक प्रकारचा दूषित असा पूर्वग्रह परंपरागत चालत आलेला आहे. प्रत्येक भाषेंतील वाङ्मयांत सापत्न माता ही अप्रिय अशी एक व्यक्ति म्हणून मानण्यांत आलेली आहे व तिचें चित्र नेहमीं भडक रंगांत व सामान्यतः तिरस्कार उत्पन्न होईल अशा शब्दांत चितारलेलें असतें. लहान मुलांस ज्या कल्पित कथा सांगण्यांत येतात त्यांमध्येंहि निरपवाद तिचें चित्र एक खाष्ट स्त्री म्हणून काढलेलें असतें व तिच्या दुष्टपणाचें रसभरित वर्णन केलेलें असतें. ती आपल्या सापत्न मुलास बहुधा करण्यास अशक्य व अत्यंत

अवघड अशीं कामें सांगत असलेली, त्यांच्या खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्यांची हेळसांड करीत असलेली अशी रंगविलेली असते. लहान मुलांच्या कोंवळ्या मनावर या गोष्टींचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. भुतांखेतांच्या गोष्टींप्रमाणेंच अशा गोष्टी मुलांस न सांगितलेल्याच बऱ्या. सर्वच सापत्न माता दुष्ट व खाष्ट असतात असें नाहीं. ज्यांच्या मनावर शिक्षणाचा सुपरिणाम झालेला असतो अशा स्त्रिया स्वतःच्या व सापत्न मुलांत सहसा फरक करीत नाहींत. मातृपदाच्या जबाबदारीची ज्यांना योग्य कल्पना आलेली असेल अशा स्त्रिया सापत्न मुलासहि योग्य तऱ्हेनें वागविण्याची खबरदारी घेतील. तथापि सर्वच माता सुशिक्षित व आपल्यावरील जबाबदारी पूर्णपणें ओळखणाऱ्या असतात असें नाहीं. अशा वेळीं कुटुंबांतील सापत्न संबंधाचा परिणाम मुलांच्या मनावर व स्वभावावर झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा बाबतींत पित्यानें योग्य वेळींच आपल्या मुलांच्या संवर्धनाची व शिक्षणाची काळजी घेणें अवश्य आहे. नाहीं तर अशीं मुलें एकलकोंडीं, दुसऱ्याचा हेवा करणारीं, दुःस्वभावी व दुर्वर्तनी निघाल्याशिवाय राहणार नाहींत. कित्येक वेळां या सापत्न संबंधाचा परिणाम मुलांवर सूक्ष्मपणानें होत असून तो कुटुंबांतील मंडळीच्या सहसा ध्यानांतहि येणार नाहीं. परंतु हें मूल शाळेंत अथवा निराळ्या परिस्थितींत गेल्याबरोबर त्याच्या मनांतील सुप्त विकार जागृत होऊन त्याच्या वागणुकींत त्यांचें प्रतिबिंब आढळल्याशिवाय राहात नाहीं व अशा वेळीं तें मूल एकदम बदलल्यासारखें आपणांस वाटतें, परंतु हा बदल होण्याचें मुख्य कारण त्याच्या मनांतील विकार सुप्तावस्थेंत किंवा दडपून ठेवलेले असतात ही गोष्ट होय. अशा वेळीं शिक्षकानें ही गोष्ट ओळखून त्या मुलाच्या मनावरील दडपण कमी

होईल व त्यास अधिक स्वातंत्र्य व मनाचा मोकळेपणा मिळेल अशी काळजी घ्यावी व त्याच्या आईबापांसहि ही गोष्ट कळवून त्यांस कुटुंबांतहि अधिक स्वातंत्र्य मिळेल व तें अधिक मोकळ्या मनानें वागूं लागेल अशी काळजी घेत जावी. असें केल्यानें त्या मुलाच्या मनांतील भावनांस योग्य वाव मिळून त्या भलत्याच मार्गानें बाहेर पडणार नाहींत व त्यांस आपल्या बुद्धीचा व इतर मानसिक शक्तींचा योग्य विकास करण्यास वाव मिळेल.

## सावत्र पिता—

सापत्न मातेप्रमाणेंच सावत्र पित्याचीहि परिस्थिति मोठी नाजूक व जबाबदारीची असते. आपल्याकडील उच्च समाजामध्यें अशी परिस्थिति फारशी आढळत नाहीं. कारण आपला समाज आतांपर्यंत विधवाविवाहासच प्रतिकूल होता. परंतु दिवसेंदिवस ही मनोवृत्ति पालटत असून विधवाविवाह सामान्यतः रूढ होत चालले आहेत व त्याबद्दलचा लोकांचा दुराग्रह कमी कमी होत चालला आहे. त्यामुळें मुलें असलेल्या विधवांचेहि विवाह अलिकडे होऊं लागले आहेत. ज्या समाजांत पुनर्विवाह पूर्वीपासूनच रूढ होता अशा समाजांत सापत्न पिता ही गोष्ट अपरिचित नसून अनेक विधवांचीं मुलें त्यांच्याबरोबर नवीन पित्याच्या घरीं राहावयास गेलेलीं आढळतात. मनूनें सांगितलेल्या बारा प्रकारच्या पुत्रांमध्यें सहोढ या पुत्राची गणना केलेलीच आहे. यावरून फार प्राचीन कालापासून अशा तऱ्हेचे पुत्र आपल्या समाजांत मान्य होते ही गोष्ट स्पष्ट आहे व पदराखालीं आलेला मुलगा हीहि व्यक्ति आपल्या समाजांतील कनिष्ठ वर्गास चिरपरिचित अशी आहे. अशा परिस्थितींत सापत्न पिता असलेल्या मुलांची कुचंबणा झाल्याशिवाय राहत नाहीं. त्यांच्या स्वभावावरहि घरांतील परि-

स्थितीचा व भिन्न वागणुकीचा परिणाम होऊन तीं निसर्गतः सत्प्रवृत्तीचीं असलीं तरी दुर्वृत्त म्हणून मानलीं जाण्याचा अगर हळू हळू तशीं बनण्याचा फार संभव असतो. अशा परिस्थितींत पित्यानें आपली जबाबदारी फार काळजीपूर्वक रीतीनें पार पाडणें अवश्य आहे. मुलांच्या मनांत शक्य तों आपल्या भावंडांत व आपल्यांत फरक करण्यांत येत नाहीं असेंच वाटण्याची काळजी आईबापांनीं घेतली पाहिजे. म्हणजे तीं अधिक मोकळेपणानें वागूं लागून आपल्या मनःप्रवृत्ति झांकून किंवा दडपून ठेवणार नाहींत व त्यामुळें कुढ्या स्वभावाचीं अगर चमत्कारिक रीतीनें वागणारीं बनणार नाहींत.

**पितृवियोग—**

सापत्न संबंधाप्रमाणेंच घटस्फोटानंतर माता अथवा पित्यापासून वेगळ्या झालेल्या मुलांचीहि स्थिति चमत्कारिक असते. या परिस्थितीपासूनहि आतांपर्यंत आपल्या समाजांतील उच्च वर्ग अलिप्त होता. पण यापुढें ही परिस्थिति दीर्घकाल टिकून राहील असें वाटत नाहीं व कनिष्ठ वर्गांत तर घटस्फोट आज दीर्घकालापासून रूढ असून अशा कुटुंबांतील मुलांवर त्या परिस्थितीचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. घटस्फोटानंतर सामान्यतः अल्पवयीन मुलें मातेजवळच राहावीं अशी व्यवस्था करण्यांत येते. परंतु तिची सांपत्तिक स्थिति चांगली नसल्यास किंवा तिनें पुनर्विवाह केल्यास अशा मुलांची आबाळ झाल्याशिवाय राहात नाहीं. अशीं मुलें सामान्यतः इतर मुलांपेक्षां निराळ्या स्वभावाचीं बनणें स्वाभाविक असतें व त्यांस जर योग्य वेळीं सहानुभूतीनें वागविण्यांत आलें नाहीं व आपणांवर माया करणारें किंवा आपली काळजी करणारें या जगांत कोणी नाहीं अशी जर त्यांची समजूत झाली तर तीं मानव जातीचा व जगाचा द्वेष करूं

लागतील व या जगांत जर आपणांस स्वास्थ्य आणि सुख मिळत नसेल तर तें इतरांसहि मिळूं नये अशी भावना त्यांच्या मनांत उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं व यामुळें त्यांची गुन्हे करण्याकडेहि प्रवृत्ति होण्याचा संभव उत्पन्न होईल. ज्या समाजांत घटस्फोट फार सुलभ व प्रचलित आहे अशा समाजांत अनाथ मुलांच्या आश्रमांची आवश्यकता अधिक भासते ही गोष्ट मागें उल्लेखिलीच आहे. अर्थात् अशा अनाथगृहांमध्यें मुलांची जोपासना जितकी घरामध्यें आईबापांच्या देखरेखीखालीं होऊं शकते तशी होणार नाहीं हें उघड आहे.

**समाजावर जबाबदारी—**

वरील तऱ्हेच्या मुलांचें संगोपन जर त्यांच्या कुटुंबांत योग्य तऱ्हेनें होत नसेल तर त्यांची योग्य काळजी घेण्याचें व त्यांचें संवर्धन करण्याचें कार्य ज्या समाजांत तीं उत्पन्न होतात त्या समाजाचें अथवा राष्ट्राचें आहे असें समजलें पाहिजे व अशा मुलांचें संगोपन व संवर्धन करणाऱ्या सार्वजनिक संस्था समाजानें स्थापन केल्या पाहि-जेत. प्रत्येक राष्ट्रानेंहि आपलें व्यक्तिबल कायम राखण्यासाठीं, व वाढ-विण्यासाठीं निदान तें निरोगी राहील अशासाठीं तरी अशा मुलांची काळजी घेणें अवश्य आहे. आपल्या समाजांत सर्व समाजावर रुष्ट झालेलीं किंवा त्याचा द्वेष करणारीं माणसें निर्माण होणार नाहींत व त्यापासून समाजस्वास्थ्याचा बिघाड होणार नाहीं, तसेंच त्यांत गुन्हेगार किंवा आत-तायी माणसें निर्माण होऊन त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं आपलें द्रव्यबल व मनुष्यबल खर्च होणार नाहीं अशी काळजी घेणें हें प्रत्येक राष्ट्राचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य जर राष्ट्रानें योग्य प्रकारें बजावलें तर ज्या लोकांची बुद्धिमत्ता दंगेधोपे व गुन्हे करण्याच्या कामीं खर्च होते तेच लोक कदाचित् उत्तम नागरिक बनून त्यांच्या

ठिकाणीं असलेले साहसादि गुण व बुद्धिमत्ता राष्ट्राच्या बलसंवर्धनाकडे खर्च करतील आणि राष्ट्राचा दुप्पट फायदा होईल.

रशियासारख्या साम्यवादी शासनसंस्थेंत साहाजिकच मुलें ही राष्ट्राची संपत्ति मानण्यांत येत असल्यामुळें व त्यांचें संगोपन व संवर्धन राष्ट्रीय दृष्ट्या करण्यांत येत असल्यामुळें अशा राष्ट्रांत सापत्नभाव, सावत्र पितृभाव अथवा घटस्फोटानंतरची मुलांची पोरकी अवस्था अशा गोष्टींची तजवीज राष्ट्रासच करावी लागते परंतु ज्या समाजांत कुटुंबसंस्थेस प्राधान्य आहे अशा समाजांत वरील परिस्थिति अपरिहार्य असून अशा समाजांतील आईबापांनीं व विशेषतः पित्यानें आपली वागणूक आपल्यावरील जबाबदारी ओळखून ठेविली पाहिजे व तसें त्यास शिक्षणहि मिळालें पाहिजे.

---

## प्रकरण तेहतिसावें

# पिता व पालक यांवरील जबाबदारी
# व
# त्यांचें शिक्षण

### कुटुंबांतील व्यक्तींचे संबंध—

याप्रमाणें आतांपर्यंत पिता अथवा पालकांच्या स्वाधीन होणाऱ्या अर्भकाची कशी स्थिति असते, त्याबद्दलच्या समाजाच्या प्राथमिक अवस्थांतील कल्पना कशा प्रकारच्या असत व त्या पुढें समाजाच्या सांस्कृतिक प्रगतीबरोबर कसकशा बदलत आलेल्या आहेत व पितापुत्रांतील संबंधांत आतांपर्यंत कसकसा फरक होत गेला आहे व त्यांच्यांतील नातें दिवसेंदिवस केवळ समजुती, रूढी, सामाजिक नियम, परंपराप्राप्त आचारविचार या गोष्टींपासून समाजधारण, राष्ट्रपोषण, राष्ट्रसंवर्धन, सांस्कृतिक प्रगति वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टींमुळें कसें महत्त्वाचें बनत आलें आहे व केवळ ईश्वरी नेमानेम किंवा यदृच्छा यांपेक्षां पितापुत्रसंबंध हा प्रेममूलक व प्रेमसंवर्धक कसा बनत गेला आहे, त्या संबंधावर आधारलेले कौटुंबिक संबंध हे दिवसेंदिवस इतर आनुषंगिक गोष्टींपेक्षां प्रेमावरच कसे आधारले जात असून त्याच बंधनामुळें ते कसे स्थिर स्वरूप पावून चिरकालिक बनत आहेत व पुढेंहि कायम राहणार आहेत हें आपण पाहिलें.

कुटुंबामध्यें यापुढेंहि परस्परांबद्दल प्रेम आणि त्याबरोबरच शिस्त हीं राहिलीं पाहिजेत व तीं राहतीलहि पण तीं केवळ शिक्षेच्या भीतीनें किंवा सक्तीनें न राहतां कुटुंबांतील व्यक्तींचा मानसिक विकास अधिकाधिक होत जाऊन सर्वांनीं एक दिलानें व एक विचारानें वागणें व मुलांनीं मातापित्यांच्या आज्ञेंत राहणें व आपलीं कौटुंबिक व इतर कर्तव्यें योग्य तऱ्हेनें बजावणें हें सर्वांच्याच सौख्यास व स्वास्थ्यास कसें आवश्यक आहे व त्या दृष्टीनें आपला शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास करून घेणें हें कुटुंबाच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीनें सर्वांच्या हिताचें कसें आहे व त्यावरच आपली प्रगति कशी अवलंबून आहे हें समाजांतील प्रत्येक व्यक्तीस अधिकाधिक कळूं लागेल व त्यामुळें पितापुत्रांतील संबंध यापुढें अधिकाधिक जिव्हाळ्याचा व मित्रत्वाचा होत जाऊन तो प्रेमाच्याच आधारावर चिरकाल टिकेल अशी समाजाची वृत्ति बनत चालली आहे व या बाबतींत प्रत्येक राष्ट्रानें इष्ट अशा मार्गानें प्रगति करीत राहिलें पाहिजे.

## पित्यावरील जबाबदारी—

यावरून पित्यावरील अपत्यसंवर्धनाची जबाबदारी दिवसेंदिवस कशी वाढत जात आहे व स्वतः एखाद्या राष्ट्राचा कार्यक्षम नागरिक म्हणून आपण जन्म दिलेल्या अपत्यासहि आपल्याप्रमाणेंच, किंबहुना जगामध्यें दिवसेंदिवस ज्ञान व साधनें यांची जी भर पडत आहे तिचा फायदा घेऊन थोडाफार आपल्यापेक्षां अधिकच, कर्तबगार, स्वावलंबी, धैर्यशील व राष्ट्रोपकारक नागरिक बनवून आपल्या कुटुंबाचें, समाजाचें, राष्ट्राचें व अप्रत्यक्षतः जगाचें कल्याण कसें साधलें पाहिजे ही गोष्ट

प्रत्येक मातापित्यास आतां कळून येऊन त्याप्रमाणें त्यांचें वर्तन व आयुष्यक्रम चालला पाहिजे.

**अपत्याचें महत्त्व—**

कोणत्याहि समाजामध्यें जन्मास येणारें प्रत्येक अपत्य हें केवळ एक खेळणें किंवा कौतुक करण्यासारखी गोष्ट नसून ती एक आपल्या हातीं परमेश्वरानें दिलेली देणगी व शक्ति असून तिचा योग्य परिपोष करणें हें प्रथमतः मातापित्याचें व नंतर त्या समाजाचें किंवा राष्ट्राचें कर्तव्य आहे.

समाजांतील कोणतेंहि मूल टाकाऊ नसून त्याच्या अंगीं कांहीं तरी विशिष्ट शक्ति व प्रवृत्ति वास करीत असतात. त्यांचें योग्य ज्ञान करून घेऊन त्यांस इष्ट तें वळण लावून त्यांचा समाजोपयोगी असा प्रकर्ष करून घेतला पाहिजे म्हणजे प्रत्येक व्यक्तीची उन्नति समाज-पोषक व राष्ट्रपोषक अशी होऊन समाजाच्या कल्याणास कारण होत जाईल. कोणतेंहि मूल आडमार्गास जाऊन तें बिघडणें हें त्याच्या घातास कारणीभूत होत असलें तरी ही त्याची चुकी नसून त्यास इष्ट वळण न देणाराची असते व त्या दृष्टीनें तो आपलें, आपल्या अपत्याचें व समाजाचें नुकसान करीत असतो ही गोष्ट प्रत्येक पित्यानें व पालकानें लक्ष्यांत ठेवली पाहिजे.

**मातापित्यांचें शिक्षण—**

याकरितां मातापित्यांस व पालकांस अपत्यसंवर्धनासंबंधीं शिक्षण मिळणें अवश्य आहे व पाश्चात्त्य राष्ट्रांत त्याप्रमाणें प्रयत्नहि चालू आहेत. यूरोपांत व विशेषतः अमेरिकेंत असे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर

चालू असून तेथें अनेक संस्था अशा प्रकारचें कार्य करीत आहेत. त्यांचीहि थोडक्यांत माहिती करून घेणें आपणांस उपयुक्त व महत्त्वाचें आहे.

सर्व जगांत शांतता नांदावी, लोक जास्त निरोगी व सुखी व्हावे यासंबंधींची सर्व आशा जितके जास्त आईबाप आपल्या मुलावर प्रेम करूं लागतील व त्यांची सेवा करूं लागतील, त्यांच्या संख्येच्या वाढीवर अवलंबून आहे. याकरितां आईबापांस या गोष्टींचें ज्ञान व उच्च प्रकारचें शिक्षण मिळणें अवश्य आहे व या शास्त्राचा या बाबतींतील त्यांची गरज भागविण्याचा प्रयत्न चालू आहे.

**शिक्षक व पालक संघ—**

याकरितां ठिकठिकाणीं पालकांचे संघ अथवा संस्था स्थापन होणें अवश्य आहे. पालक व शिक्षक यांमध्यें जितकें अधिक सहकार्य होईल व त्यांचा परस्परांशीं जितका अधिक निकट संबंध येईल तितकें मुलांच्या शिक्षणास अधिक उपकारक होईल व पालकांस आपली जबाबदारी पार पाडणेंहि अधिक सुलभ होईल. अशा तऱ्हेनें 'पालकसंघ' अथवा 'शिक्षक आणि पालकसंघ' स्थापन करण्यांत शिक्षकांनीं पुढाकार घेतल्यास हें कार्य सहजसाध्य होईल. याकरितां सामान्यतः प्रथम उपक्रम म्हणून पुढील गोष्टी करण्यासारख्या आहेत.

(१) महिन्यांतून एकदां एक रात्रीचा पालकांचा वर्ग भरवावा व त्या ठिकाणीं मुलांस योग्य असे कपडे कोणते असावे, त्यांचें अन्न कोणत्या प्रकारचें व कसें तयार केलेलें असावें, घरांतील आरोग्य कसें

राखावें, मुलांच्या वागणुकीकडे योग्य लक्ष कसें द्यावें वगैरे गोष्टींची चर्चा करण्यांत यावी.

(२) पालकांच्या व्यक्तिशः भेटी घेऊन शिक्षकानें त्या त्या पालकाशीं त्याच्या मुलांच्या वागणुकीबद्दल व प्रगतीबद्दल चर्चा करावी.

(३) विद्यालयामध्यें आपलें मूल इतर मुलांबरोबर कसें वागतें हें पाहण्यासाठीं मधून मधून कांहीं ठराविक दिवशीं पालकांस शाळेस भेट देण्यास सांगावें व अशा भेटींत मुलांस घरीं कसें वागविण्यांत यावें यासंबंधीं योग्य दिशा दाखवावी.

(४) शिक्षकानें मुलांच्या पालकांच्या घरीं जाऊन त्यांच्या घरां-तील परिस्थितीचें अवलोकन करावें व पालकांशीं अधिकाधिक परि-चय करून घ्यावा.

**पालकांच्या शिक्षणाचे प्रयत्न—**

पालकांसहि शिक्षण दिलें पाहिजे ही कल्पना विशेषतः अमेरिकेंत प्रथम उत्पन्न होऊन १८९० च्या सुमारास याबद्दल विशेष चळवळ सुरू झाली. समाजशास्त्र व जीवितशास्त्र यांचीं तत्त्वें आईबापांस सोप्या भाषेंत समजावून देणें हें काम मुख्यतः या चळवळीनें हातीं घेतलें. याकरितां मिसेस थिओडोर डब्ल्यू. गिरने या बाईनें १८९७ मध्यें 'मातांची राष्ट्रिय संस्था' (National Congress of Mothers) ही संस्था स्थापन केली. १९०८ मध्यें तिला 'पालक–शिक्षक–संघ' (Parents' Teachers' Association) ही संस्था जोडण्यांत आली व १९२४ मध्यें तिचें रूपान्तर 'पालक–शिक्षक राष्ट्रसभा'

( National Congress of Parents and Teachers ) या संस्थेंत झालें. या संस्थेच्या सर्व संस्थानांत शाखा आहेत; व तिचे दहा लाख सभासद् आहेत. या संस्थेनें प्रत्येक विषयाकरितां स्वतंत्र समित्या नेमिल्या आहेत. त्यांचा मुख्य कार्यक्रम म्हटला म्हणजे शिक्षक व पालक यांचा संबंध जोडणें हा होय. यांच्या बैठकींतून शाळेसंबंधीं सर्व विषयांची चर्चा होते व विशेषतः बालकांचा अभ्यास करण्यांत येतो.

यानंतर १९२८ मध्यें 'अमेरिकेंतील बालकाभ्यास संघ' ( Child's Study Association of America ) या नांवाची एक संस्था निघाली. तिचीं १९४ केन्द्रें आहेत व तिच्या शाखा चीन, जपान, रशिया, लंडन व कॅनडामध्येंहि पसरल्या आहेत. यांच्या वार्षिक परिषदा भरविण्यांत येतात व पालकांस द्यावयाचें शिक्षण या विषयाची मुख्यतः चर्चा होते. याशिवाय निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून बालकां-विषयींचा जो अभ्यास होतो त्याचें एकत्रीकरण करण्याकरितां एक राष्ट्रीय संशोधन सभेची 'बालसंवर्धन समिति' ( Child Development Committee of the National Research Council ) या नांवाची संस्था १९२६ मध्यें स्थापन करण्यांत आली. तिचीं बालकाभ्यासाचीं २२४ केन्द्रें आहेत. याशिवाय मोठमोठीं शहरें सोडून दूर दूर राहणाऱ्या पालकांस चांगल्या शिक्षकांचा लाभ व्हावा म्हणून 'भेटी देणाऱ्या शिक्षकांचा राष्ट्रसंघ' ( National Association of Visiting Teachers ) या नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचीं केन्द्रें न्यू यॉर्क, बोस्टन व हार्टफर्ड या ठिकाणीं असून तेथून निरनिराळ्या ठिकाणीं मधून मधून शिक्षक भेटी देण्यास पाठविण्यांत येतात.

याखेरीज 'मानसिक आरोग्य राष्ट्र समिति' (National Committee of Mental Hygiene, 1910) या संस्थेमार्फत मुलांच्या मज्जादोषांवर व इतर मानसिक विकारांवर उपाय योजण्याचें काम चालू असतें. या संस्थेचीं मुलांस मार्गदर्शक अशीं अनेक केन्द्रें (Child Guidance Clinics) उघडण्यांत आलीं आहेत. याखेरीज अनेक खासगी संस्था सरकारी खात्यांच्या सहाय्यानें मुलांस व त्यांच्या आईबापांस शिक्षण देणें, प्रदर्शनें भरविणें वगैरे कार्यें करीत असतात; व त्यांस अमेरिकन सरकारच्या शेतकी खात्यापासून सर्व खात्यांचें, तसेंच स्थानिक नगरपालिकादि संस्था व इतर संस्थानी सरकारांचें सहाय्य असतें, व त्यामार्फत व्याख्यानें, प्रात्यक्षिकें व अभ्यास–केन्द्रें स्थापन करण्यांत येतात.

**इंग्लंडमधील प्रयत्न—**

अमेरिकेच्या मानानें इंग्लंडमध्यें या बाबतींत विशेष चळवळ झालेली दिसत नाहीं. तथापि अलिकडे हळूहळू कांहीं गोष्टी करण्यांत येऊं लागल्या आहेत. उदाहरणार्थ, पालकांनीं भेट द्यावी म्हणून शाळांतून कांहीं दिवस मोकळे ठेवण्यांत येतात. त्या दिवशीं पालक शाळेंत जाऊन आपल्या मुलांची प्रगति कशी चालली आहे तें पाहतात. तसेंच शैक्षणिक आठवडे, विद्यार्थ्यांनीं केलेल्या कामांचीं प्रदर्शनें, त्याप्रमाणेंच सार्वजनिक सभा, परिषदा वगैरे भरविण्यांत येऊन तेथें शिक्षणतज्ज्ञांचीं व्याख्यानें वगैरे करविण्यांत येतात.

लंडन कौंटी कौन्सिल मुलांस मार्गदर्शक अशीं शिक्षणविषयक व निरनिराळ्या व्यवसायांची माहिती देणारीं व निरनिराळें शिक्षण मिळण्याच्या सोयी यांची माहिती देणारीं पुस्तकें प्रसिद्ध करतें. कांहीं

ठिकाणीं पालकांच्या सभा स्थापन होत आहेत. अशांपैकीं लंडनमधील मँचेस्टर स्ट्रीटवरील 'पालक संघ' ( Parents' Association ) ही संस्था महत्त्वाची आहे. तसेंच 'पालक राष्ट्रीय शिक्षणसंघ' ( Parents' National Education Union ) ही संस्था मिस शार्लट मेसन हिनें स्थापन केली असून या संस्थेमार्फत 'पालकनिरीक्षक' ( The Parents' Review ) या नांवाचें एक मासिक निघत असतें.

**इतरत्र—**

ठिकठिकाणीं शाळांच्या व्यवस्थापक मंडळांत पालकांचे प्रतिनिधी घेण्याची पद्धति रूढ होत आहे. फ्रान्समध्यें ही गोष्ट आवश्यक करण्यांत आली आहे. तसें इंग्लंडमध्यें नसलें तरी बहुतेक ठिकाणीं अशी व्यवस्था होत आहे व याचा परिणाम चांगला होत असल्याचें दिसून येत आहे.

आपल्या इकडे आतां कोठें इंग्लंडमधील संस्थांचें अनुकरण करणाऱ्या कांहीं शिक्षक-पालक-संघासारख्या संस्था अस्तित्वांत येत आहेत. सरकार तर या बाबतींत पूर्णपणें उदासीन आहे. कांहीं पाश्चात्त्य देशांत शिक्षण घेऊन आलेल्या शिक्षकांस अशा तऱ्हेचे प्रयत्न होणें अवश्य आहे असें वाटत आहे व त्या दृष्टीनें उपक्रम करण्यांत येत आहेत. पण हे प्रयत्न अद्यापि इतर सर्व चळवळींप्रमाणेंच बाल्यावस्थेंत असून इकडील पालक व बहुतेक शिक्षकवर्गहि जवळजवळ उदासीनच आहे. ही स्थिति पालटणें अवश्य आहे व याकरितां जोराचे प्रयत्न होणें जरूर आहे. ग्वाल्हेरचे प्रो. कुलकर्णी व रा. य. ल. गुण्ये यांनीं केलेल्या कांहीं प्रयत्नाचें दिग्दर्शन पूर्वी करण्यांत आलें आहे याखेरीज फारसा कोठें प्रयत्न झालेला महाराष्ट्रांत तरी आढळत नाहीं.

या बाबतींत माहिती मिळविण्याकरितां मीं कांहीं पत्रव्यवहार केला परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. पुणें येथील ट्रेनिंग कॉलेज-मध्यें असा उपक्रम झालेला होता म्हणून पत्र पाठवून माहिती मागविली. पण, त्या पत्राची पोंच अगर उत्तरहि आलें नाहीं. अड्यार येथील थिऑसफिकल सोसायटीकडून उत्तर आलें पण आमच्या संस्थेमार्फत अशी संस्था काढण्यांत आलेली नाहीं, असाच त्यांत मजकूर होता.

---

## प्रकरण चवतिसावें

# उपसंहार

आतांपर्यंत आपण पितापुत्रांचे संबंध समाजाच्या वन्य अथवा प्राथमिक अवस्थेपासून निरनिराळ्या समाजांत कसकसे होते व त्यांत हळूहळू सांस्कृतिक प्रगतीबरोबर कसकसे फरक पडत गेले हें पाहिलें. प्राचीन विकारवश भावनांपासून मनुष्याची विचाराधिष्ठित आचरणाकडे कसकशी प्रगति होत गेली व तिचा परिणाम इतर गोष्टींप्रमाणें पितापुत्रसंबंधावरहि कसा घडत गेला; पितापुत्र, कुटुंब, गोत्र, समाज वगैरे निरनिराळ्या समूहांपासून राष्ट्रांची निर्मिति कसकशी होत गेली, हें आपण पाहिलें.

पित्याची पुत्रावर प्राचीन कालीं जी अप्रतिहत सत्ता होती व जीमध्यें पित्यास आपल्या अपत्यास देऊन टाकण्याचा, विकण्याचा किंवा ठार मारण्याचाहि अधिकार होता तो हळूहळू कसा मर्यादित होत गेला. तसेंच कुटुंबसंस्थेमध्यें पूर्वीं जी केवळ परंपरागत व जन्मतः श्रेष्ठत्व प्राप्त झाल्यामुळें कडक व अनियंत्रित शिस्त होती ती हळूहळू कशी शिथिल होत गेली व व्यक्तिमत्त्वाचा उदय कसकसा होत गेला व त्यामुळें मुलांस हळूहळू स्वातंत्र्य कसें मिळूं लागलें, मुलांच्या स्वाभाविक मनोवृत्तीकडे मातापित्यांनीं लक्ष्य देणें किती आवश्यक आहे ही गोष्ट हळूहळू त्यांस कशी पटत गेली व पुत्राचें संवर्धन ही केवळ कौटुंबिक गोष्ट नसून तें एक राष्ट्रकार्य आहे ही गोष्ट विचारी लोकांच्या हळूहळू प्रत्ययास येऊन अपत्यसंगोपन व संवर्धन हें शास्त्र कसें बनत गेलें व प्रत्येक व्यक्ति ही राष्ट्राची नागरिक असून तिची

बाल्यांत व तारुण्यांत योग्य ती काळजी घेतली जाणें ही गोष्ट राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें कशी अवश्य आहे व प्रत्येक व्यक्तीस योग्य तें संरक्षण व शिक्षण मिळण्याचा हक्क असून तें राष्ट्रास कसें पोषक आहे हें आपण पाहिलें व त्या दृष्टीनें पितापुत्रांतील संबंध केवळ निर्बंधित न राहतां तो प्रेममूलक पण अधिक मोकळ्या व स्वतंत्र-तेच्या पायावर उभारलेला व त्याच्या व्यक्तिमत्त्वास परिपोषक राहील अशी प्रवृत्ति दिवसेंदिवस कशी वाढत आहे याचेंहि आपण अव-लोकन केलें.

दिवसेंदिवस राष्ट्रांच्या मर्यादाहि अल्प वाटून सर्व जगांतील चळ-वळींकडे व उलाढालींकडे पाहण्याची लोकांस संवय होत चालली आहे व अखिल मानव जातीचें हित कसें साधतां येईल व मानव जातीच्या कल्याणाच्या आड येणाऱ्या गोष्टींचें निराकरण कसें करतां येईल व त्याकरितां भिन्नभिन्न अवस्थांतील मानवसमाजांत शिक्षण, संस्कृति, वगैरेंचा प्रसार करून त्या सर्वांस उच्च सांस्कृतिक अशा एका पातळीवर कसें आणतां येईल, समाजांतील उच्चनीच भावनांचा लोप होऊन अखिल मानव समाज एका समान भूमिकेवर कसा आणतां येईल व सर्व मानवजात हें एक कुटुंब कसें बनेल अशा तऱ्हेचे विचार अलीकडील समाजांचे नेते व समाजशास्त्रप्रणेते करीत आहेत व विश्वकुटुंबत्वाची भावना सर्व दूर पसरविण्याची खटपट करीत आहेत.

अशा वेळीं कोणत्याहि लहानमोठ्या मानवसमूहांतील नातें मग तें एक कुटुंब असो कीं मोठें राष्ट्र असो, परस्पर सहानुभूति व सहकार्य

यांवरच अवलंबून राहील व तें समानतेचेंच असूं शकेल. याकरितां प्रत्येक नागरिकाचें संवर्धन व पोषण अशा रीतीनेंच झालें पाहिजे कीं, ज्यामुळें त्याच्या नैसर्गिक शक्तींचा योग्य व पूर्ण विकास होईल व तो या जगांत आपल्या वांट्याचें कार्य व कर्तव्य योग्य तऱ्हेनें व कार्यक्षमतेनें बजावण्यास समर्थ होईल. हें कार्य सर्व समाजास व राष्ट्रास योग्य तें उपयुक्त शिक्षण दिल्यानेंच होणार आहे व अशा तऱ्हेची मनोभूमिका सर्वत्र निर्माण व्हावी याकरितां योग्य त्या शिक्षणाच्या तजविजी, सोयी व प्रचार होणें अवश्य आहे.

अशा तऱ्हेची मनोभूमिका जेव्हां सर्वत्र तयार होईल तेव्हां स्वार्थादि मनोवृत्तींसहि योग्य तें वळण मिळून त्यांची परिणति सांघिक मनोवृत्ति वाढण्यामध्यें होईल व पूर्वी म्हटल्याप्रमाणें स्वार्थी मनोवृत्तीचीच जी दुसरी अथवा अधिक विस्तृत अशी सामाजिक स्वार्थ अथवा वैय्यक्तिक स्वार्थत्याग या भूमीवर अधिष्ठित असलेली भावना म्हणजे सांघिक अथवा सामाजिक वृत्ति ती यथार्थतेनें वाढीस लागून त्या वृत्तीनें प्रेरित झालेले समाज संकुचित भावना टाकून देऊन अधिक व्यापक दृष्टीनें व विश्वबंधुत्वाच्या दृष्टीनें विचार करूं लागतील व सर्वत्रच पितापुत्र संबंध हाच विश्वभ्रातृत्वसंबंध आहे ही जाणीव होऊन अखिल मानवजातीच्या उत्कर्षास उपोद्बलक होत जाईल व मानवामध्यें असलेला ईश्वरी अंश प्रभावी ठरून तो इतर आसुरी अथवा पाशवी अंशावर विजय मिळवून अखिल मानवजातीमध्यें सलोखा व हितसंबंध निर्माण करून सर्वांचें कल्याण साधण्यास प्रत्येक मनुष्यास

प्रवृत्त करील. अशा रीतीनें आपणांस आपलें उपनिषदांत सांगितलेलें ध्येय गांठतां येईल.

सहनाववतु । सहनौभुनक्तु ।
सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु ।
माविद्विषावहै ।
ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

इतिशम् ।

समाप्त

# सूची

अग्निपुराण १०१
अत्रिस्मृति १०१
अथर्ववेद १३८
अथेन्स ६८
अद्भुत कथा ३६६
अध्यात्म रामायण ५८
अनिष्ट प्रवृत्ती-वर्गीकरण २९५
अनिष्ट वाङ्मय ३६९
अनुकरण वृत्ति १७८
अनौरस मुलें २२७
अपघात ३९०
  -भीति २११
  -सहानुभूति २१४
अपत्य-प्रेमप्रदर्शन २५६
  -महत्त्व ४२०
  -संवर्धन-शिक्षण ४११
अप्रत्यक्षशब्द प्रयोग २५७
अबिसीनिया १०४
अभ्यासक्रम ३५७
अमूर्त-गोष्टींची कल्पना २७०
  -नीतिपाठ २५९
अमेझॉन १३४
अय्यर अनंत कृष्ण २६
अशिष्ट वर्तन २९२
असत्य भाषण २९०
असुरी संस्कृति ६४
अस्त्यागस १३५
अस्थिमार्दव २२२
अज्ञान-अवस्था १०८
  -दत्तक १११
  -पालक ११०
  - पोषण ११२
  -मुलाची मालमत्ता-मुसलमान १२२
  -विधवा ११५
  -विवाह ११३
आजार-शत्रु ३८७
आत्मप्रवृत्ति १६०
आत्मविश्वास २४६
  -अभाव २९४
आत्मवृत्ति स्वार्थपर १८४
आत्मसंयमन २६९
आदाम व ईव्ह ४५
आनुवंशिक संवयी १५५

आनुवंशिकता ३७, २२९
आपस्तम्ब धर्मसूत्र १३२
आयुष्यांतील ध्येय १८१
ऑस्ट्रेलिया ८५, १३१
आळस २८१
इदिगा ३०
इरेन ६६
इष्ट मनोविकारांस उत्तेजन २१७
इष्ट वळण लावणें २५१
ईजिप्त १०४
ईर्षा १८९
उंचावर चढणें २१५
उत्तेजक शब्द २४५
उत्तेजन–सहानुभूति २८५
उदात्तता २६९
उद्धित पितर १३८, १३९
उद्यान संघ ७५
उपजत बुद्धि १५४
उप्पर ३०
उमरावी सत्ता १५
उशीरानें बोलणें–चालणें २२४
ऋग्वेद ४९,५०,५१,५४,९५,१३९
ऋष्यशृंग ९९
एकत्र कुटुंब ३५
एकत्र कुटुंबपद्धति–दोष ४०
— लाभ ३७
एलियन १३१
एस्किमो १०५, १०६
एहरेनफेल्स डॉ. बॅरन होमर रोल्फ २३
ऐतरेय ब्राह्मण ५३, ५४, ५५, ५८, ६३, ९८, ९९
ओक्कलिग हलिकार ३०
ओक्कलु ३०
और्ध्वदेहिक ८६
औरस पुत्र ९४
औषध ३९२
कनिष्ठायत्तपद्धति २७
कप्पू ३०
कमार २९
कलादिकांचा उगम १७४
कल्पनामग्नता
—उपाय २०२
—कारणें २०१
—परिणाम २०२
कल्पनारत मुलें ३०२
कॅन्सस १०६
कँबोडिया १०५
कॅलव्हिन २०

कादिर ३०
कामस् वृत्ति २४३
कालिदास ४४, ९६
काळोख–भीति २०७
किलेक्यता ३०
कुटुंब २
—भारतीय ४८
—मूळ घटक पिता ३
—संवर्धक पुत्र ३
कुटुंबसंस्था–आवश्यकता ५
—भवितव्य ३३
कुंभार ३०
कुमार ४३
कुराण १२३, १२५, १२७, १२८
कुरूब ३०
कृतज्ञता अभाव २९३
कृषिप्रधान समाज ३५
कोमटी ३०
कोमसार्ग ७६
कोर्चा ३०
कोलेया ३०
कोळी २९
कौल ८७
क्रियाप्रवृत्ति २६५
क्सकल ३०
खानेसुमारी–हिंदुस्थान १३९
खासी ३०
खासी संस्थान २७
खेळ–इतर अपेक्षा ३७५
—प्रौढ माणसें ३७३
—महत्त्व ३७१
—मैदानी ३७८
—व काम ३७६
—सांघिक ३७४
—साधनें ३७७
—साध्य ३७२
खोंड ३०
गंगदिकर ३०
गणवेश ३६४
गाणिग ३०
गर्डन २७
गॅला–आफ्रिका १०४
गारो ३०
गुमेर १४०
गृहशिक्षण १४७
गोंड २९
गोत्र २
गोत्रसमाज ९

गोल्ला ३०
गोवारी २९
गोसावी २०९
ग्रव डब्ल्यू. बी. १३४
ग्रीक–दत्तकाविधि १०३
ग्रीक संस्कृति ६५
घटस्फोट १३३
घटस्फोट सुलभता ३१,३२
चपळता २१८
चमार २८
चिनी पितृपूजा ८५
चुरस १६६
चेरुमान ३०
जपानी पितृपूजा ८६
जमात २
जलारी ३०
जस्टीनियन ७१
जात २
जॉर्जिया ८२
जिप्सी २०९
जोगी ३०
ज्येष्ठ पुत्र महत्त्व ५७,६०
ज्येष्ठ मूल २३१
ज्येष्ठ वारस ३६
ज्येष्ठायत्त पद्धति २७
–दोष ४०
–लाभ ३९
झुलू १०६
झोंप ३८१
–न येण्याचीं कारणें ३८२
– वेळ ३८३
झोंपेत दचकणें २१०
टर्नर १२७, १४०
टास्मानिया ८५
लो. टिळक १९३
टोकिओ ८१
ट्राजन १३१
ठाकूर २०९
डॉक्टर २०९
डायोनिसियस १२९
डोंब ३०
तत्परता २१८
तरवड–मलबार २४
तरुण साम्यवादी संघ ७९
तवजी २४, २८
तिगल तोरेया ३०
तीर्थेंदुशेखर १०१
तैत्तिरीय संहिता ५९, ६३, ९९

तोडा ३०
तोत्तियान ३०
त्यागवृत्ति १७६
थर्स्टन २६
दत्तक पुत्र ५१, ९८
दत्तक हेतु १०२
दत्तविधान विधि १०३
दंदासी ३०
दर्जी ३०
दशरथ ९९
दुर्वृत्त मुलांचीं लक्षणें ३०९
दुःख २१३
देवक ८७
द्वादश पुत्र ५६
धर्म–वैशिष्ट्य २७६
धर्मव्याध ८९
धार्मिक वाङ्मय २७८
नायर २५, ३०
निपुत्रिक ९५
नियोग १०१
निरुत्साह २८८
निर्बंध २१०
निष्क्रियता २०३
निष्ठुरतेनें वागविलेलीं मुलें २३२
नीतिकल्पनांची वाढ २३८
नीतिशास्त्र उगम १७४
नैतिक भावना जागृति २४६
न्यूझीलंड ८५
पॅट्रिया पोटेस्टस ७०
परमेश्वर–प्रार्थना २७३
परमेश्वराबद्दल भावना २७४
पराया ३०
पॅरिस ८१
परीक्षा ३५१
पशुपाल समाज १२
पहिली चूक २४१
पालक–अज्ञान मुलीचा १११
–मुसलमानी कायदा १२१
–शिक्षण ४२२
पाल्यपालकसंबंध १२०
पाश्चात्य पितृपूजा–रोमन ८६
पितरांबद्दल आदर ८८
पिता–जबाबदारी ४१९
–महत्त्व ४५
पिता व पुत्र ४३
पितृऋण ११६
पितृकृत दायभाग ६२
पितृवियोग ४१५

पितृसत्ताक समाज १३
पितृसेवा ८९
पित्याची पुत्रावरील सत्ता ४८
पित्याचें क्रौर्य ११९
पित्याचें पालकत्व रद्द १२१
पुढारीपणा १६४
पुत्र–त्याग ११६
–प्रशंसा ९६
–महत्त्व ५३
–विक्रय–अधिकार ५०
–विवाह–भार ११४
पुंडलीक ९०
पुलस्यन ३०
पूर्वगामीप्रासाद ७७
पूर्वगामी संघस्थान ७८
पूर्व संस्कार २५५
पोषाख ३६२
प्रगति पुस्तक ३४९
प्राचीन जर्मन लोक १२९
प्रॉटेस्टंट कुटुंब २१
– पंथ १९
प्राथमिक समाज ७
प्राथमिक समाज–आशिया–दत्तकविधि १०४
प्रेमसंपादनवृत्ति १७७
प्लॉस १३४
प्लिनी १३१
प्लेटो ६९, १३०
फकीर २०९
फ्रेंच राज्यक्रांति १९३
बॅंक्रॉफ्ट १२७
बनियन २०
बर्लिन ८१
बहुपत्नीत्व १९
बक्षीस २४४
बायबल १३२
बालगुन्हेगार ३२१
बालवाङ्मय ३६८
बालशिक्षण ३३१
बालशिक्षण मंदिर आवश्यकता ३३२
–मद्रास ३३६
बालसंगोपन गृहें–क्रेचेस ७४
बालोद्यान शाळा ७४, ७६, ७७
बांटू १०६
बिघडलेलीं मुलें–प्रकार ३०३
बिथ्निया १३१
बुद्धिमान ३४७
बेसिल पहिला ७१

बैरागी २०९
बौधायन स्मृति ५६
बौद्धिक अडचणी २९६
ब्राह्मण २९
ब्रिटिश कोलंबिया १०५
भवभूति ९६
भागवत ९९
भावनांवर आघात २११
भावनांची जाणीव २६६
भीति २०४
—कारणें २०५
—काल्पनिक व खरी २०९
—घालविणें २१२
—मर्यादा २०६
भित्रेपणा २८७
भिल्ल २०८
भुंजिया २८
मजूर संघ समिति ७६
मठ संस्था १७
मत्सर १६४, १८९
—उगम १९०
—परिणाम १९१
—वर उपाय १९१
मत्स्य पुराण १०१
मदनपारिजात १०१
मध्यकालीन यूरोपीय कुटुंब १८
मध्ययुगीन कुटुंब २०
मनु–स्मृति ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, १०९, १३२
मराठा २९
मरार के. नारायण २६
मलबार मॅन्युअल ऑफ २६
मल्ल ३०
महत्त्वाकांक्षा १६५, १६७
महाभारत ८९, ९७
माता–महत्त्व ४०९
मातापिता–शिक्षण ४२०
मातृकन्या परंपरा २३
मातृसत्ताक कुटुंब २२
मादिग ३०
मानवजात–वर्गीकरण ४८४
मानसिक दौर्बल्य २८९
मामाचें महत्त्व २८
मारवान ३०
मॉस्को ८१
माळी २९
मुकदोरा ३०
मूल बिघडण्याचें मूळकारण ३०१

—म्हणजे काय १५२
—स्वावलंबी २६३
मुलाचा स्वभाव—घटक १४९
मुलांची छावणी ७५
मुलाचें कौतुक २२१
—चमत्कारिक वर्तन २४९
—फाजील कौतुक ३०८
—भावंडांतील स्थान २२९
—लाड २२३, ३०८
मुलाच्या बुद्धीची वाढ २२६, २६७
—मनाचें आकर्षण २५०
—मानसिक क्रिया १५३
—वर्तनांतील हेतु २५०
मुलांत इष्ट प्रवृत्ति २६८
मुलांतील अवश्य गुण २१८
—जिज्ञासा २७१
मुलांमुलींची परस्परवृत्ति २३५
मुलांशीं प्रेमळ वागणूक २६१
मुलास लळा २२५
मुलींत वाढलेला मुलगा २३१
मुलें दुर्वृत्त होण्याचीं कारणें ३१०
मुलें सुधारण्याचे उपाय ३१२
मृतपितर—आदर ८४
मोंडारू ३०
यम—यमी ४५
याज्ञवल्क्य १३२
युद्धप्रिय समाज ११
योग्य प्रवृत्ति दाबून टाकणें २५४
योग्य प्रवृत्तीस उत्तेजन २५३
रडण्याचीं कारणें १९९
रशियन कौटुंबिक स्थिति ८०
रसेल २८, २९
राग १९२
—अवश्य १९२
—कसा घालवावा १९४, १९८
—दाबून टाकणें १९४
—परिणाम १९३
—व्यक्त करणें १९५, १९६
रॉथ, एच. लिंग. १२९, १४०
रॉबर्टसन सर जॉर्ज १०४
रामायण ९०, ९९
रामोशी २०९
राष्ट्र २
राष्ट्र—वैशिष्ट्य ४०७
रिंक १०६
रुदन १९८
रोम संस्कृति ६५
रोमन १२९, १३१

रोमन कॅथॉलिक संप्रदाय १६
रोमन कुटुंब ३९
रोम्युलस १२९
लंडन ८१
लहान मूल २३०
लायकरगस ६८, १३०
लिओ तिसरा ७१
—सहावा ७१
लैंगिक शिक्षण २६७
लोकभ्रम १३०
लोमपाद ९९
वन्य समाज ८५
वर्चस्वप्रवृत्ति १६२
वर्तणूक—अनिष्ट प्रवृत्ति २९६
वर्षश्राद्ध ८७
वसिष्ठ स्मृति ५०, ५१
वाजसनेयी संहिता ९४
विचारमग्नता २००
विद्यार्थी—कर्तव्य ३९६
विधायकवृत्ति २६९
विवाहसंस्कार ५
विवाहसंस्कारास बंदी १९
विष्णुस्मृति १३२
विस्तव २१६
वेदकालीन समाज ४९
वैयक्तिक अनिष्ट प्रवृत्ति २९५
व्यक्ति—आवश्यक गुण ४०५
व्यक्तिमत्त्व ४१, १६२
—उदय २१
व्यक्तीवरील सामाजिक जबाबदारी १८२
व्यंग मुलें २८७, ३५०
व्यवसाय—आनुवंशिक ४०२
—निवड ४०१
व्हेंदिदाद १३४, १३५, १३९
शक्ति ४३
शिव ४३
शहानामा १३५
शांता ९९
शाब्दिक उपदेश २४०
शायस्त ला शायस्त १३४
शारीरिक शिक्षा—विरुद्ध चळवळ ३२०
शाळेंत प्रवेश ३४०
शिवाजी १९३
शिशुसंगोपनगृहें ७६, ७७
शिक्षक—गुण ३५५
शिक्षक पालक संघ ४२१
शिक्षकाबद्दल वृत्ति ३४१
शिक्षणक्रम—विविध ३९९

शिक्षणपद्धति ३५७
शिक्षा–आवश्यकता ३१५
–नियम ३२९
–पद्धति ३३०
–परिणाम ३१६
–पूर्वक्रम ३२९
–प्रसंग ३२५
–स्वरूप ३२७
शीएम २७
शीलसंवर्धन १४७
शुचिता २१९
शौनक ५१
श्रम व पैसा यांचें मूल्य २४७
श्राद्ध ८३, ८६
श्रावण ९०
सत्यप्रियता २६२
सदस् ३०
सद्वर्तन २७७
सद्वर्तनाकडे प्रवृत्ति २३९
संपादन प्रवृत्ति १६८
संबंधम् विवाह ११५
समायिक भांडवल ३७
संयम २६४
सरकॅशियन १०४
सरजामी सत्ता १५
सवयींतील अनिष्ट प्रवृत्ति २९६
संस्कृतिसंवर्धक विश्रांतिदायक
उद्यानें ७८
सहकारी बालशिक्षण मंदिर ३३३
सहशिक्षण २३२
सहनशीलता २१८
सहक्षेत्र ७९
सांघिक जीवन १७१
सांघिक वृत्ति १७१
सांघिकवृत्ति संवर्धन १७८
सांघिकवृत्तीची जोपासना १८३
सांघिकवृत्तीचें ज्ञान १८३
सांघिकवृत्ति स्वार्थत्यागपर १८४
साझोनॉफ जी. पी. ८२
सापत्न माता ५१२
सापिंड्य ४६
साम्यवादी कुटुंब ३१
साम्यवादी रशियांतील मुलें ७३
साम्यवादी संघटक ७६
साम्राज्य २
सायरस १३५
साराबाक १२९
सावत्र पिता ४१४

सिंपशिअन १०५
सुमित्रसंपादन २९९
सेवावृत्ति २६९
स्टोरी ११७, ११९
स्ट्रॅबो १३९, १४०
स्पार्टन–चौर्यस्वातंत्र्य ६६
स्पार्टा ६५, १३०
—ऱ्हास ६७
स्पींगेल १३९
स्पेन्सर व गिलन १३१
स्पेन्सर हर्बर्ट ८६
स्वप्न ३८४
स्वाभाविकता २१८
स्वाभाविक प्रवृत्ति–वळण–वर्तन १५६, १५७
स्वाभाविक प्रवृत्तिविरुद्ध प्रेरणा १५८
हंटर १०६
हत्यारें वापरणें २१५
हरिवंश ९९
हळबी २९
हॉबिट १२७
हिंदुकुश १०४
हिब्रू १९
हिब्रू–यहुदी १३२
हिरोडोटस १३०, १३५, १४०
हीनभाव २८३
हुकूमशाही शब्द २४६
हुद्लीकर सत्यबोध बाळकृष्ण ३३७
हेमाद्री ९९
हेवा १६४
होमर १२८
हो आणि वेस्ट १३४

REFBK-0006257

# राष्ट्रांतील तरुण सुदृढ पाहिजेत.

**शक्ति येण्यास पौष्टिक व सुग्रास अन्न पाहिजे.**

योग्य व सकस अन्नाची घरगुती सोय नसल्यास आपण

## बी. तांबे लिमिटेड

( पूर्वीचें तांबे आरोग्यभुवन )

**या कंपनीचे मालकीच्या उपाहारगृहांत या.**

( १ ) शेअरबाजार समोर फोर्ट.

( २ ) मापला महाल, ठाकुरद्वार.


( ३ ) कोना रेस्टॉरंट—मॅजिस्टिक सिनेमा जवळ.

( ४ ) इन्कमटॅक्स ऑफीस, क्वीन्सरोड.

( ५ ) रिझर्व बॅंक, फोर्ट

**ऑफीस—संझगिरी सदन, गिरगांव. फोन १०६८०**

**सूचना**—पहिल्या दोन ठिकाणीं जेवणाची व्यवस्था आहे.



डोंगरे यांच्या बालामृतानें

मुलांस

शक्ति व बाळसें येतें.

शिवाय दांत त्रासाशिवाय निघतात.

आयुर्विमा क्षेत्रांत हिंदुस्थान परावलंबी नाहीं. हिंदी विमा कंपन्यांनीं या क्षेत्रांत स्पृहणीय यश संपादन केलें आहे.

दी ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीनें विमेदारांना कसलाहि जादा हप्ता न आकारतां विम्याचें संपूर्ण संरक्षण ( ज्यामध्यें हवाई हल्ल्यामुळें येणाऱ्या अपमृत्यूचाहि अंतर्भाव होतो ) दिलें आहे.

विशेष माहितीकरतां आजच भेटा अगर लिहाः—


मॅनेजर

**दी ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशु. कं. लि.**

लक्ष्मीरोड—पुणें.

**आमची एजन्सी घेऊन आपली प्राप्ती व सामाजिक दर्जा वाढवा.**

## –शिलाप्रवंग–



× शुक्रदोष

× मूत्ररोग

× स्वप्नावस्था

× धातुक्षय

इत्यादि

विकारांवर

शक्ति व

वीर्यवर्धक

( टॉनिक )

**श्रीधूतपापेश्वर पनवेल लिमिटेड.**

**आद्य औषधि कारखाना.**

बोध चिन्ह

**पुणें**–सिटी पोस्टासमोर. **मुंबई**–गिरगांव व काळबादेवी.

* महाराष्ट्रांतील यशस्वी साखरेचा कारखाना *

# बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट

लि.

## अत्यंत पवित्र स्वदेशी साखर

मॅनेजिंग एजन्ट्स—

चन्द्रशेखर गोविंद आगाशे,

बी. ए., एलएल. बी.

## दृष्टीमुळेंच सृष्टि——

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठीं नजर साफ असावी लागते. कोणत्याहि कारणामुळें तुमच्या डोळ्यांस त्रास होत असेल तर——

**सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासू**

## आर्. एन्. शिंदे ॲन्ड सन्स.




यांच्या येथें डोळ्याच्या हॉस्पिटलमध्यें काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून घ्या

**——: उत्तम माल व माफक दर :——**

( १ ) २०७ गिरगांव रोड, मुंबई नं. ४
( २ ) चामारबाग, पोयबावडी, मुंबई नं. १२
( ३ ) रानडे रोड, दादर, मुंबई नं. १४

# आमचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्रीय ज्ञानकोश | ... | विभाग १—२३ |
| महाराष्ट्रीय शब्दकोश | ... | विभाग १—७ |
| महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश | ... | विभाग १—२ |

[ किंमतीबद्दल चौकशी करणें ]

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र भाषाभ्यास | ... | किं. ५ रु. |
| डॉ. केतकरकृत— | ... | |
| महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण | ... | किं. १॥ रु. |
| आशावादी | ... | किं. २ रु. |

य. रा. दाते

डेक्कन जिमखाना, पुणें ४